७८७
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.

मकरन्द पुस्तकमाला

पुस्तक ४९ वें.

# पिशाचसाधन

प्र[illegible]क.

[illegible]ाहत. मकरन्द

श्री. नार[illegible] [illegible] या[illegible] [illegible]पटे

कोरेगांव

शके १८४१

किमत २ रुपये

# पिशाचसाधन

अथवा

# संपत्तीचा परिणाम.

...हेत. मकरन्द

... या...

मकरन्द पुस्तकमाला.

पुस्तक ४९ वें.

# पिशाचसाधन

अथवा

## आसुरी संपत्तीचा परिणाम.

लेखक,

श्रीयुत नारायण हरी आपटे.

कोरेगांव

प्रकाशक

नरहर नारायण पटवर्धन,

मकरन्दकार्यालय.

वांई

मुद्रक

श्रीयुत दामोदर लक्ष्मण लेले,

मोदवृत्त प्रेस

३४३ मधली आळी, वांई.

मार्च, सन १९२०

(सर्व हक्क प्रकाशकांनीं स्वाधीन ठेवले आहेत.)

किंमत २ रुपये.

## दैवी संपत्ति !

* * * * * * * * * *

**तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता ।**
**भवन्ति संपदं दैवीमभिजातस्य भारत ॥ ३ ॥**

— हे भारता, तेजस्विता, क्षमा, धृति, शुचिर्भूतपणा, द्रोह न करणें, अति मान नसणें हे गुण दैवी संपत्तींत जन्मलेल्यास प्राप्त होतात.

——:o:§:o:——

## आसुरी संपत्ति !

* * * * * * * * * *

**काममाश्रित्य दुष्पूरं दंभमानमदान्विताः ।**
**मोहाद् गृहीत्वाऽसद्ग्राहान्प्रवर्तन्तेऽशुचिव्रताः ॥१०॥**

— कधींच पूर्ण न होणाऱ्या कामाचा म्हणजे विषयभोगेच्छेचा आश्रय करून दंभ, मान व मद यांनीं व्यापिलेले हे ( आसुरीलोक ) मोहानें खोटेनाटे म्हणजे ...ऱ्या कल्पना ( मनांत ) धरून घाणेरडी कामें क... ...तात.

## दोहोंचा परिणाम.

* * * * * * * * * *

**दैवी संपद्विमोक्षाय निबंधायासुरी मता ॥ ५ ॥**

* * * * * * * * * * *

— ( या पैकीं ) दैवी संपत्ति ( परिणामीं ) मोक्षदायक आणि आसुरी बंधदायक असें समजतात.

— गीतारहस्यावरून पृष्ठें ८११–८१५.

# केवळ कृतज्ञतेसाठीं !

## श्रीमंत शेट मोतीलाल माणिकचंद

ऊर्फ

## श्रीमंत प्रतापशेट.

प्रताप मिल्सचे चालक व तत्वज्ञानमंदिर संस्थेचे संस्थापक
मु॥ अमळनेर यांस:—

**शेट साहेब,**

श्री आणि सरस्वती यांचा योग क्वचितच घडून येतो. आपल्या ठायीं तो घडून आला आहे आणि त्याची प्रत्यक्ष ओळख आपण इ. स. १९१६ सालीं Indian Institute of Philosophy या नांवाची संस्था मकरन्दहून, महाराष्ट्रास दिली आहे. आपली ही कृति आपल्या मनांतील वेदान्ताविषयींची गोडी व्यक्त करणारी आहे. आपल्या चरित्रांतील हा विशेष कोणाच्याही मनांत आपल्याविषयीं प्रेमादरबुद्धि निर्माण करील. आणि तीच दर्शविण्याकरितां माझ्या कादंबरी लेखनाचा हा

**श्रीगणेशा**

मी आपल्या हस्तांजलींत अर्पण करीत आहें. स्वीकार व्हावा ही विनंति.

लेखक.

# प्रस्तावना.

आज जी कादंबरी मी वाचकांचे सेवेंत सादर करीत आहें; ती इंग्रेजी भाषेंत Romance नांवाचा कथालेखनाचा जो एक प्रकार आहे, त्या धर्तीची आहे. Romance या शब्दाचा a tale of extra - ordinary adventures असा खुलासा इंग्रजीच्या एखाद्या साध्या शब्दकोशामध्येंही सांपडतो. तात्पर्य, ज्या कथेंत अलौकिक, अमानुष किंवा अतिमानुष अशा कृत्यांचें वर्णन करितात, तिचें नांव 'रोमान्स!' या व्याख्येप्रमाणें बाणकवीची कादंबरी अथवा गुणाढ्य कवीचा कथासरित्सागर हीं संस्कृतमधील रोमान्सें होत. मराठीमध्यें हातीमताई, गुलबकावली, शाकंबरी, विचित्रपुरी, मंजुघोषा, चार दरवेशी किंवा तत्समान इतर पुस्तकें याच सदरांत येतील. इंग्रेजीमध्यें तर अशा धर्तीच्या नवलकथा हजारांनीं मोजण्यासारख्या आहेत. रेनाल्ड्सचें फॉस्ट, वॅगनर धी व्हरवुल्फ, निक्रोमॅन्सर, किनेथ यांचीं नांवें आंग्लभाषाभिज्ञ वाचकांना माहीत असतीलच. यांपैकीं बहुतेक पुस्तकांचीं भाषांतरें मराठींत झालीं आहेत. मकरन्दाच्या वाचकांना श्री. नाथमाधव यांनीं केनेथ ऊर्फ वीरधवल याची ओळख करून दिलेलीच आहे. असो.

अलीकडे मात्र 'रोमान्स'चा अर्थ फारच व्यापक समजला जातो. अलौकिक, दैविक किंवा पैशाचिक अशा कोणत्याही साधनांचा यत्किंचितही उपयोग न करितां केवळ वाचकांच्या मनोवृत्ति आश्चर्यचकित् करणारे उदात्त प्रसंग घालून रेखाटलेलीं मानवचरित्रेंही रोमान्स सदराखालीं मोडूं लागलीं आहेत. मेरी कॉरेलीच्या कित्येक कादंबऱ्या अशा नांवाखालीं आहेत. आमच्या इकडे मराठींत तर काय, ज्या कथेंत उत्कट प्रणय भरला आहे, अशा कोणत्याही पुस्तकाला 'रोमॅन्टिक' (अद्भुतरम्य) म्हणण्याची चाल पडली आहे! तुटपुंज्या ज्ञानाची चतुःसीमा केव्हांही आटपसरच असावयाची!

इंग्रेजीमध्यें रोमान्सचें वाङ्मय प्रचंड असूनही त्यामध्यें तितक्याच प्रमाणांत विविधताही आहे. अद्भुतरस एकच खरा; पण तिकडील निरनिराळ्या लेखकांनीं त्यांत नानाप्रकारें नटवून वाचकांचें मनोरंजन केलें आहे. जुन्या काळांतील धर्मसमजुती, प्रचलित दंतकथा, दैविक अथवा पैशाचिक चमत्कार इत्यादि विषयांवर तर रोमान्सें झालींच आहेत; शिवाय मेस्मेरिझम, हिप्नाटिझम्, मिस्टिसिझम्, अर्वाचीन शास्त्रीय शोध, पृथ्वीवरील निरनिराळ्या देशांतील लौकिक समजुती इत्यादि साधनांचाही त्यांनीं कथावाङ्मय निर्माण करण्यांत भरपूर उपयोग करून घेतला आहे. लॉर्ड लिटन, जूलसव्हर्न, डूमाज, मेरीकॉरेली, एच्. जी. वेल्स, रायडर हॅगर्ड, रिचर्ड मार्श, वुल्की कुलीन्स इत्यादि कितीतरी प्रसिद्ध लेखकांनीं वर सांगितलेल्या साधनांचा उपयोग केल्याचें त्यांच्या पुस्तकांवरून दिसून येतें. पण आमची नजर रेनाल्ड्स खेरीज पलीकडे गेली नाहीं व जाऊं इच्छित नाहीं. वास्तविक भाषांतर करून लेखक होऊं पाहणाऱ्या होतकरू लेखकांनीं आपली दृष्टि थोडी व्यापक केली तर भाषांतरेंच कां होईनात पण तीं अनेक तऱ्हेचीं होऊन कथावाङ्मयाला थोडीतरी शोभा येईल. स्वतंत्र रोमान्सें निर्माण करण्यासही आमच्याकडे कांहीं कमी साधनें नाहींत. आमच्या संतांच्या चरित्रांतील अद्भुत चमत्कार, पिशाचविषयक रूढ कल्पना, जादूटोणा, मोहन-वशीकरण, जारणमारण, बीरमंत्र इत्यादि प्रकार, परकाया प्रवेशाच्या समजुती, कामरूप देशाच्या आख्यायिका, अघोरपंथी लोक व शाक्त-मतानुयायी, कापालिक यांचीं चरित्रें इत्यादि कितीतरी प्रकार असे आहेत कीं, ज्यांची प्रचलित व ऐतिहासिक माहिती मिळवून मनोरंजक अशा स्वतंत्र कथानकें गुंफितां येतील. स्वाभिमानाला इच्छेची व इच्छेला प्रयत्नांची जोड मात्र पाहिजे !

रोमान्सविषयीं एवढा अल्प परिचय देऊन आतां मी 'पिशाच-साधना' कडे वळतों. हें पुस्तक रेनॉल्ड्स् साहेबांच्या Faust नामक रोमान्सचें अनुकरण आहे. अनुकरण म्हणण्याचें कारण, यांतील कथासूत्र जरी फॉस्टवरून असलें तरी कथानकाची एकंदर मांडणी अगदीं स्वतंत्र आहे या कादंबरीचा जवळ जवळ तीन चतुर्थांश भाग माझा असून एक चतुर्थांश भाग फॉस्ट मधील आहे. ही गोष्ट मी मौलीकरितां नमूद

करीत नसून पिशाचसाधनाचे दोष फास्टच्या माथीं मारले जाऊं नयेत म्हणून सांगत आहे.

'पिशाच साधन' तयार झाल्याचा इतिहास थोडक्यांत असा आहे:—

विद्यार्थी दशेंत असतांना कांहीं किरकोळ गोष्टी लिहून त्या (करमणुकींत) प्रसिद्ध झाल्यावर आपण एखादी कादंबरी लिहावी, असें माझ्या मनानें घेतलें. याचवेळीं माझ्या एका मित्रानें वर सांगितलेलें रेनाल्ड्सचें फॉस्ट वाचलें होतें. त्यानें त्या कादंबरीचें कथानक मला सांगितलें व उभयतांच्या मतें फॉस्टचें भाषांतर करण्याचें ठरलें. परंतु मला त्यावेळीं फॉस्ट समजण्याइतकें इंग्रेजी येत नव्हतें व त्या आमच्या मित्राला (तो हिंदी असल्यामुळें—कारण त्यावेळीं मी राजपुतान्यांत होतों—) मराठी येत नव्हतें. तात्पर्य, भाषांतराचा जम बसेना. तेव्हां फॉस्ट बाजूला सारिलें व स्वतःच्या अननुभवी कल्पनेचा बेफाम वारू कादंबरीकार म्हणवून घेण्याच्या महत्वाकांक्षेच्या मैदानावर मोकाट सोडून दिला! त्यावेळची माझी चांगल्या कादंबरीची व्याख्या म्हणजे कादंबरी खूप मोठी, कथानक अत्यंत घोटाळ्याचें व अद्भुत प्रकारांची खिचडी अशी होती. अर्थात् कादंबरी त्याबरहुकूम लिहिली गेली!

पिशाचसाधनाचा जन्म हा असा झाला. ज्या फॉस्टवरून हा आमचा पोथा तयार झाला आहे, तो मात्र यासारखा नाहीं. ती एक चांगली कादंबरी आहे. जर्मनींत रूढ असलेल्या एका लोकवदंतेवर तिची रचना असून, रोमचा धर्मगुरु सहावा पोप याच्या कारकीर्दीचा ऐतिहासिक भाग त्यास जोडण्यांत आला आहे. त्यामुळें फॉस्ट कादंबरी चांगली मनोरंजक व अद्भुत रसात्मक झाली आहे. ज्या लोकवदंतेवरून फॉस्टची रचना रेनाल्ड्स साहेबांनीं केली तिची थोडीशी माहिती वाचकांचे मनोरंजनार्थ देतों.

जर्मनीमध्यें इ. सनाच्या पंधराव्या सोळाव्या शतकाचे दरम्यान डॉक्टर फॉस्टस Dr. Faustus या नांवाचा एक प्रसिद्ध किमयागार (alchemist) होऊन गेला. त्या वेळची alchemy ही आजच्या

chemistry ची जननी होय. ज्ञानवृद्धीमुळें, आजच्या शास्त्रीयशोधामुळें जननेचा गैरसमज होत नाहीं; पण भूतकालांत कित्येक शास्त्रज्ञांना प्राणदंड भोगावा लागल्याचीं अनेक उदाहरणें युरोपच्या इतिहासांत आहेत. त्या समजुतीप्रमाणें डॉ. फॉस्ट हा जादुगार चेटका असून त्यानें पिशाच वश करून घेतलें आहे, अशी लोकांची समजूत होती आणि त्यामुळें लोक त्यास भिऊन असत व मनांतून त्याचा तिरस्कार करीत. ( फोनोग्राफ व सिनेमेटाग्राफ शोधून काढणारे प्रसिद्ध अमेरिकन शास्त्रज्ञ एडीसनसाहेब हे डॉ. फॉस्टच्या वेळीं असते तर त्यांचीही अशीच अवस्था झाली असती. ) डॉ. फॉस्टचें हें पिशाचवशीकरण ख्रिस्तीधर्माच्या अगदीं विरुद्ध व फार भयंकर असें पाप होतें. आपल्या इकडेही अशा अघोरी लोकांना मुक्ति मिळत नाहीं, अशी समजूत आहेच; परंतु त्यांच्या व आपल्या पिशाचवशीकरणाच्या समजुतींत एक फार मोठा फरक आहे. आपल्या इकडे जारणमारणादि प्रयोग करणारांना अत्यंत धर्मभ्रष्ट व किळसवाणें आचार आचरावें लागतात आणि त्यामुळें असले लोक पुढें पिशाचयोनीला पोंचतात, अशी कल्पना आहे. पाश्चिमात्यांची कल्पना याहून भिन्न आहे. ख्रिस्ती धर्मशास्त्रांत प्रत्यक्ष परमेश्वराशीं वैर करणारा ( The Arch-Enemy of God ) सैतान नांवाची एक व्यक्ति आहे. हा सैतान मनुष्यमात्राला भुरळ पाडण्याचा प्रयत्न करून त्यांना परमेश्वरविन्मुख करण्याचा प्रयत्न करीत असतो. ह्मणजे संकटांत सांपडलेल्या मनुष्यास सुखाची लालूच दाखवून त्यास धर्मबाह्य आचरण करण्यास भाग पाडतो. या प्रकारास सैतानास आपला आत्मा विकणें असें म्हणतात. ज्यानें आपला आत्मा कांहीं अटीवर सैतानास दिला तो मनुष्य अनंतकालाकरितां नरकलोकाप्रत जातो; मानवीदेह संपल्यानंतर त्यास सुख, मुक्ती कांहीं कांहीं लाभणें शक्य नाहीं, असें ख्रिस्ती धर्मात वर्णन आहे. फॉस्टनें जें पिशाचसाधन केलें होतें तें असें. चोवीसवर्षांच्या करारानें त्यानें आपला आत्मा सैतानास दिला असें फॉस्ट कादंबरींत वर्णन आहे. या चोवीस वर्षांत पिशाचाच्या सहाय्यानें फॉस्टनें संतति, संपत्ति व विषयसुख यांची लयलूट केली तरी पण आत्मा सैतानाला विकल्यामुळें सबंध आयुष्यांत त्यास चित्त-

शांतीचा लाभ झाला नाहीं. म्हणजे खोट्या सुखाला भाळून तो खऱ्या सुखाला कायमचा आंचवला ! फॉस्ट कादंबरींत याचेंच वर्णन सविस्तर दिलें आहे. असो.

फॉस्टच्या या अद्भुत चरित्रावरच जर्मनीचा नामांकित लेखक गोटे यानें फॉस्ट या नांवाचेंच एक सुंदर नाटक लिहिलें आहे. हें पूर्ण करण्यास गोटेनें आपलें सबंध आयुष्य खर्च केलें आणि ऐहिक सुखानें लाचावलेला आत्मा ईश्वरविन्मुख झाल्यास त्याची काय स्थिति होते याचें अत्यंत सूक्ष्म व हृदयभेदक चित्र रेखाटलें !

आम्हाला वाटतें, फॉस्ट कादंबरी लिहिण्याची कल्पना रेनाल्ड्स-साहेबांनीं गोटेच्या फॉस्टवरूनच उचलली असावी आणि त्या अद्भुत गोष्टीला ( सहाव्या पोपचीं दोन मुलें ) *लुक्रेशिया बोरजिआ व सीझर बोरजिआ या बहीण भावंडांच्या इतिहासप्रसिद्ध क्रूरकर्मांची भयंकर कथा जोडून आपलें रोमान्स रचलें असावें. असो.

पण फॉस्टचें महत्व केवळ येवढ्यापुरतेंच नाहीं. मनोरंजनाबरोबरच त्यामध्यें एक फार मोठा उपदेश सांगितलेला आहे. तो म्हणजे आसुरी व दैवी संपत्तीचे कसकसे परिणाम असतात; हा होय. भगवद्गीतेंत यासंबंधीं जे श्लोक दिले आहेत, ते या कादंबरीला ( पिशाचसाधनाला ) इतरत्र जोडले आहेत. ते वाचून पाहून फॉस्टच्या किंवा पि. सा. तील विमलचंद्राच्या चरित्राचा विचार केला पाहिजे. ख्रिस्ती धर्मातील समजुतीप्रमाणें सैतानाला आत्मा विकून आसुरी आचरण करणें काय आणि आमच्या धर्माप्रमाणें पापपुण्याची क्षिति न बाळगतां कामक्रोधादि षड्रिपूंच्या तडाक्यांत सांपडून पिशाची वर्तन करणें काय ? दोहींचें रहस्यही एकच आहे आणि तात्पर्यही एकच आहे. सद्धर्माचरण हेंच मनुष्याचें इतिकर्तव्य आहे आणि तें आचरिल्यानेंच त्याच्या जन्माचें सार्थक होतें

---

* लुक्रेशिया ही बया जितकी सुंदर होती, तितकीच राक्षसी कृत्या होती. ' राक्षसी महत्वाकांक्षा ' या नाटकाचें मूळ या बयेच्या चरित्रांत आहे, एवढें सांगितलें म्हणजे पुरे.

आणि त्याला इहपरलोकीं सुख मिळतें असा 'फॉस्ट' कादंबरीचा निष्कर्ष आहे. आंग्लभाषाभिज्ञांनीं या दृष्टीनें ही कादंबरी जरूर वाचावी. निवळ मराठी वाचकांकरितां रा. गो. ना. दातार यांनीं 'अधःपात' या नांवानें फॉस्टचें जें भाषांतर केलें आहे, तें पहावें.

'पिशाचसाधन' लिहिण्यांतही मीं तोच हेतु धरिला होता. माझ्या कादंबरी लेखनाचा तो श्रीगणेशा असल्यामुळें प्रयत्न वेडावांगडा आहे खरा तरी त्यांत वाचकांना ग्रहण करण्यालायखें थोडें तरी साहित्य खास आढळेल. तें आपलेपणानें गोड मानून घ्यावें अशी विनंति आहे.

शेवटीं जवळ जवळ १२।१४ वर्षें सांदीकोंपऱ्यांत पडून असलेलें 'पिशाचसाधन' आपलेपणाच्या जाणिवीनें मकरन्दकर्त्यांनीं वाचकांपुढें आणिल्याबद्दल त्यांचे आभार मानून व सर्वांना सुखी ठेवण्याबद्दल परमेश्वराची करुणा भाकून लेखणी आवरतों.

फाल्गुन शके १८४१
ता० २७।२।२०

नारायण हरि आपटे.

# पिशाच्चसाधन.

## प्रकरण पहिलें.

### बंदिवान्.

ग्रंथ संग्रहालय ... वा. क्र. ६२८०

एका अगदीं अंधःकारमय, कुबट घाण येत असलेल्या कोठडींत विमलचंद्र कैद होता. हवा येण्याकरितां ठेवलेल्या एका लहानशा झरोक्यांतून येणारा प्रकाश मंद मंद होत चालला होता. त्यावरून त्यानें संध्याकाळ होत आली असावी, अशी कल्पना केली. पण संध्याकाळ झाली काय व न झाली काय, विमलचंद्रास दोन्ही गोष्टी सारख्याच होत्या. त्या अंधारकोठडींत पडल्यापासून दिव्याचा प्रकाश त्यानें कधींही पाहिला नव्हता. त्या अंधेरांत हातपाय जोडून बसण्यापलीकडे विमलचंद्राच्या हातांत कांहीं नव्हतें. आपणास कोणत्या कारणामुळें कैद केलें व आपली सुटका होणार कीं, या कोठडींतच आपलें जीवन संपणार याची त्याला कांहींच कल्पना नव्हती. त्याच्यावर देखरेख करणारे शिपाई दगडमातीचे पुतळे होते, म्हणण्यास हरकत नाहीं. काय ? विमलचंद्रासारख्या तरुणाचें आयुष्य त्या कारागृहांत नष्ट होणार ? आणि त्यास कारागृहांत टाकण्याचा अन्याय कोणीं केला ? आणि या अन्यायाबद्दल विमलचंद्रास सूड घेण्याची संधी मिळणार नाहीं काय ? अहाहा ! विमलचंद्राचा प्राण घेऊन जरी त्यास कोणीं त्याच्या अन्यायकर्त्याचा सूड घेण्याची संधी दिली असती, तरी विमलचंद्र आपले प्राण देण्यास मोठ्या आनंदानें कबूल झाला असता. तो आपल्या छातीवर हात धरून म्हणाला, " हाय ! या जगांत न्याय नाहीं ना ? जिकडे जावें, जिकडे पहावें, तिकडे अन्याय ! एखाद्यानें एखाद्यावर

प्रेम करणें हा अन्याय अं ? हे प्रभो ! माझ्या न्यायाचा दिवस कधींच उगवणार नाहीं काय ? मला या अन्यायाबद्दल सूड घेण्याची संधी मिळणार नाहीं काय ? पण हाय ! प्रिय कुमुद ! तूं मनांत काय समजशील ? तूं मला कपटी तर समजणार नाहींस ? कीं आज सहा महिन्यांत मी न भेटल्यामुळें माझा तुला विसर पडला असेल ?

"गरीब–होय, मी गरीबच नव्हे तर काय ?—कुमाराची तुला आठवण तरी असेल ? होय, कुमुद, मला भरंवसा आहे. मला तुझ्या अकृत्रिम प्रेमाची पूर्ण ओळख आहे. तूं मला विसरली नसशील आणि हृदयेश्वरी मीही पण तुला लवकरच भेटेन."

अगदीं याचवेळीं एक व्यंगपूर्णहास्यध्वनी विमलचंद्राच्या कानीं पडला ! त्यानें दचकून वर पाहिलें तों त्याचा मुख्य रक्षक शृगालदत्त आपल्याकडे पाहून हंसत असलेला त्याच्या दृष्टीस पडला. विमलचंद्र आपल्या विचारांत इतका व्यग्र होता कीं, शृगालदत्त कोठीचें दार उघडून आंत केव्हां आला हें त्यास समजलेंसुद्धां नाहीं. तो आश्चर्यानें शृगालदत्ताकडे पहात राहिला.

"काय विमलचंद्र !" शृगालदत्त व्यंगार्थी ह्मणाला, "तुझी मुक्तता होणार वाटतें !"

विमलचंद्रास व्यंगार्थ मुळींच समजला नाहीं. तो हर्षातिशयानें वेडा होऊन म्हणाला, "काय म्हटलेंत ? माझी मुक्तता ? खरेंच कां मी निर्दोषी ठरलों ?"

आपल्या बोलण्याचा व्यंगार्थ त्यास न समजलेला पहातांच शृगालदत्तास जास्तच आनंद झाला. तो थोडेसें व्यंगार्थी हंसून ह्मणाला, "तूं निर्दोषी आहेस याबद्दल शंकाच नाहीं ह्मणा; पण तुझी सुटका होणार कीं नाहीं हें मला नाहीं माहित बोवा !"

विमलचंद्र थोडासा निराश होऊन बोलला, "मग आतां आपण म्हटलेंत कीं, तुझी सुटका होणार वाटतें—"

शृगालदत्त तिरस्कारानें स्मित करून ह्मणाला, "कितीरे मूर्ख आहेस तूं ? तूंच नव्हतास कां बरळत कीं, 'अगदीं थोड्याच काळांत माझी सुटका होईल ह्मणून' त्यावरून मला वाटलें कीं, तुला कोणीं अंतस्थ निरोप पाठविला आहे."

शृगालदत्त आपली चेष्टा करीत आहे, हें आतां कुठें विमलचंद्राच्या लक्षांत आलें व त्यास त्याबद्दल क्रोधही आला; पण उपाय काय ? तो थोडासा त्रासिक आवाजानें म्हणाला, " वा ! एका दुःखी मनुष्याची अशाप्रकारें थट्टा करणें आपणास शोभन नाहीं ! "

" थट्टा ! " शृगालदत्त त्यास चिडविण्याच्या हेतूनें ह्मणाला, " आपल्यासारख्या निर्दोषी, गरीब कुमाराची थट्टा—निरापराध माणसाची थट्टा ? शिव ! शिव ! ! "

" एकंदरींत मी दोषी आहें, असें आपणास वाटतें कां ? " विमलचंद्र ओठ चावीत म्हणाला, " पण पक्कें ध्यानांत ठेवा कीं, केव्हांना केव्हां असा काल येईल कीं, ज्यावेळीं सर्व जगासमोर मी निर्दोषी ठरेन."

" हः हः ! ! खरें हो खरें ! " इतकें बोलून शृगालदत्त मोठ्यांदा हंसला. तो पुढें हळूंच ह्मणाला, " आणि येथून सुटल्यानंतर मला वाटतें, तुमचा विवाह मोठ्या थाटांत होणार असेल नाहीं ? "

शृगालदत्ताच्या थट्टेनें चिडण्यांत कांहीं अर्थ नाहीं, हें विमलचंद्रानें तेव्हांच ताडलें. तो थोडा शांत होऊन ह्मणाला, " याचकरितां आज अवेळीं आपण येथें आलांत वाटतें ? "

" छे, नाहीं. मी तुला एक निरोप सांगावयास आलों आहें. "

" निरोप ? " विमलचंद्र आश्चर्यानें ह्मणाला, " मला कोणाकडून निरोप बोवा ? "

" आपल्या भावी श्वशुरांकडून. "

" आज आपण कोणत्या उद्देशानें येथें आलां आहांत ? माझ्या दुःखावर डागण्या देऊन मला जास्त दुःख कसें होतें, हें पहाण्याकरितां कां आलां आहांत ? "

" कायहो तुमच्यावर दुःखाचे पर्वत कोसळले आहेत ! " शृगालदत्त व्याजोक्तीनें ह्मणाला, " खुशाल खायला मिळत आहे ! इतर कैद्यांना काम तरी आहे, तुह्माला तेंहि नाहीं ! खुशाल खावें आणि झोंपा काढाव्यात ! मोठेंच दुःख बोवा ! "

" परदुःख शीतळ ह्मणतात, तें कांहीं खोटें नाहीं ! " विमलचंद्र आपल्याशींच पुटपुटला. नंतर तो शृगालदत्तास म्हणाला, " कृपा करून आपण येथून जाल तर फार बरें होईल ! "

शृगालदत्त मध्येंच ह्मणतो, " निरोप सांगितल्याशिवाय— "

" होय. " विमलचंद्रानें रागानें उत्तर दिलें.

" पहा बरें; विचार कर. निरोप फार महत्त्वाचा आहे व तो ऐकून तुला त्यानीनें आनंदहि होईल. "

आपल्या प्रिय कुमुदिनीकडून कांहींतरी उत्साहवर्धक निरोप असावा, असें विमलचंद्रास वाटलें ह्मणून तो शांत होऊन ह्मणाला, " थट्टा न करितां जो कांहीं निरोप सांगावयाचा असेल तो सांगा. मी ऐकण्यास तयार आहें. "

" उद्यां तुला न्यायाधिशापुढें उभें करण्यांत येणार आहे. " शृगालदत्त त्याकडे सूक्ष्म दृष्टीनें पहात म्हणाला.

" हाच कां निरोप ! " विमलचंद्र थोडासा निराश होत्साता ह्मणाला, " तरी पण कांहीं हरकत नाहीं. माझ्या मुक्ततेचा समय जवळ आला यांत मुळींच शंका नाहीं. "

त्याचें हें भाषण ऐकून शृगालदत्त पुन्हा मोठ्यांदा हंसला.

" माझ्या सुटकेबद्दल बोललों असतां आपणास येवढें कसलें बरें हंसूं येतें ? " विमलचंद्रानें उद्वेगानें विचारलें.

" खुळ्या ! " शृगालदत्त तिरस्कारानें म्हणाला, " मरणाशिवाय आपली सुटका येथून होईल, असें तुला वाटलें तरी कसें ? "

" ह्मणजे ! " विमलचंद्रानें दचकून विचारलें.

" ह्मणजे काय घेऊन बसलास ! " शृगालदत्त कांहींशा गंभीर आवाजानें बोलला, " तुझा न्याय झाल्यावर तुझी सुटका होईल, असें कां तुला वाटतें ? तुला सुळीं देण्याचा विचार केव्हांच ठरून गेला आहे ! "

" पण माझा अपराध ? " विमलचंद्रानें त्वेषानें विचारलें.

" अपराध ? " शृगालदत्त त्यास वेडावून म्हणाला, " तुझ्यासारख्या एका दरिद्री पोरानें वसंतदुर्गाच्या मालकाच्या मुलीचें पाणिग्रहण इच्छावें, हा काय लहानसहान अपराध आहे होय ? "

" अस्सें ? " विमलचंद्र ओंठ चावून म्हणाला, " जें मनुष्य आपल्यावर अत्यंत प्रेम करितें, त्यावर उलट प्रेम करणें हा अपराध वाटतें ? वा ! महाराज वा ! वसंतदुर्गांतून न्यायदेवतेनें काळें केलें वाटतें !

सत्याचा लोप आतांच झाला वाटतें! आणि या भयंकर अपराधाबद्दल शिक्षा काय-- तर सूळ!"

" यांत तुझ्यावर दयाच दाखविली आहे हें मोठें भाग्य समज." शृगालदत्त ऐटीनें बोलला.

" तें कसें काय बोवा ?" विमलचंद्रानें आश्चर्यानें प्रश्न केला.

" प्रथम असें पहा, दारिद्र्यासारखें दुःख नाहीं. त्या दुःखांतून तुला मुक्त केलेंसें होईल व दुसरें, मनुस्मृतींत अशा अपराधाला पांचदां सुळीं देऊन सहाव्यांदा गाढवावरून वरात काढावी अशी शिक्षा सांगितली आहे. त्या तुला तर एकाच वेळीं सुळीं देण्यांत येणार आहे व गाढवा-वरील वरात तर अगदीं माफ!"

" खरेंच! फारच मोठी दया! शिक्षा विलक्षण, मनस्मृतीही पण विल-क्षण आणि असा निरोप घेऊन सांगणारे बहादरहि पण विलक्षण! फक्त लांब कानाची व शेंपटाचीच उणीव!" विमलचंद्र शेंवटलें वाक्य हळूंच बोलला.

शृगालदत्ताचें त्याच्या बोलण्याकडे मुळींच लक्ष नव्हतें. तो त्याच्या-कडे सूक्ष्म दृष्टीनें पहात होता. विमलचंद्राच्या मनांत काय काय विचार येतात, हें समजून घेण्याची त्या धूर्ताची इच्छा होती म्हणून तो त्याकडे बारकाईनें पहात उभा राहिला.

विमलचंद्र आपल्या मनांत म्हणाला, " हा म्हणतो त्याप्रमाणें खरो-खरच आपलें जीवन संपणार काय? कीं, केवळ माझें दुःख कसें वाढतें, माझ्या मनाला यातना कशा होतात, हें पहाण्याकरितां हा वरील-प्रमाणें बोलतो आहे! पण असें पहाण्यापासून याला फायदा काय? अरेरे! एकंदरींत एका यःकश्चित् अपराधाबद्दल—छे, अपराध तरी कसला?- मी अन्यायाला बळी पडणार अं? आणि त्याबद्दल मला सूड घेण्यास—या अन्यायी दुर्गेशास त्याच्या अन्यायाबद्दल यथायोग्य शासन करण्यास—संधीसुद्धां मिळूं नये! पण छे, अशी गोष्ट घडणार नाहीं. कुमुदिनीस ही गोष्ट समजल्यास ती हरप्रयत्न करून माझे प्राण वांच-वील." शेंवटलें वाक्य विमलचंद्राच्या तोंडून जोरानें बाहेर पडलें व त्याचवेळीं शृगालदत्त फारच मोठ्यांदा हंसला! विमलचंद्र दचकून त्याकडे आश्चर्यानें पाहूं लागला. कांहीं कांहीं वेळीं हा असा तिरस्का-

रानें कां हंसतो याचें कारण त्याच्या लक्षांत येईना. पण इकडे शृगालदत्तानें त्याचे मानसिक विचार पूर्णपणें ताडले.

" आपण असें वारंवार व्यंगार्थी कां हंसतां बरें ? " विमलचंद्रानें त्रासून विचारलें.

" केवळ तुझ्या मूर्खपणावर- " शृगालदत्त गंभीरपणानें ह्मणाला, " प्रथम तूं येवढा मोठा अपराध करून स्वतःला निर्दोषी समजतोस हें माझें हंसण्याचें पहिलें कारण. आपली येथून मृत्यूवांचून सुटका होईल असें तुला वाटतें ! अशी तुला खात्री आहे—हें हंसूं येण्याचें दुसरें कारण. आणि तिसरें एका भलत्याच गोष्टीविषयीं-कुमुदिनी आपली सुटका करील, अशी वेडगळ आशा बाळगतोस—याबद्दल तर मला फारच हंसूं येतें-"

" कुमुदिनीच्या प्रेमाविषयीं आपल्यास संशय वाटतो ? " विमलचंद्र रागावून म्हणाला, " पण तुम्हाला तसें वाटतें ह्मणून मी तसा संशय घेणार नाहीं. मी तिचें माझ्यावरील प्रेम किती अवर्णनीय आहे हें पूर्णपणें जाणतों आहें. "

" खरेंच, खरेंच. " शृगालदत्त खोंचून ह्मणाला, " तुझ्या विरहानें तिला अन्न गोड लागत नाहीं, सुंदर सुंदर वस्त्रें धारण कराविशीं वाटत नाहींत, दागिने घालावेसे वाटत नाहींत, कांहीं, कांहीं आवडत नाहीं ! अगदीं सारखी विरहाग्नींत होरपळत आहे ! अरेरे ! प्रणयी जनांचा वियोग कठीण खराच ! ! खरेंच गड्या विमलचंद्रा ! तूंही एखादें मेघदूतासारखें सुरस काव्य रच. नायकनायिकेकरितां दूर जावयास नकोच आहे. राहिलें दूताचें काम. तें आपलें मी करीन. " इतकें बोलून शृगालदत्त दांत विचकून खोखो हंसूं लागला.

" बरें, बरें. " विमलचंद्र चिडून म्हणाला, " आपलें इथून काळें कराल तर बरें ! "

शृगालदत्तास त्याच्या या बोलण्याचा मुळींच राग आला नाहीं. तो हंसत ह्मणाला, " तुला आणखी एक महत्वाची गोष्ट सांगून मी तुझ्या ह्मणण्याप्रमाणें काळें करतों. विमलचंद्र, आतां मी थट्टा करीत नाहीं. अगदीं खरें तें तुझ्या हिताचें बोलतों तें शांतपणें ऐकून घे. त्यावर शांत चित्तानें विचार कर. जर माझें बोलणें पटलें तर ठीकच; नाहीं तर तुम्ही तूं मुखत्यार आहेस. माझें बोलणें ऐकण्याची तुझी मर्जी आहे?"

कांहींतरी एक विवक्षित गोष्ट शृगालदत्ताच्या मनांत बोलावयाची आहे, असें विमलचंद्रास वाटलें. तो ह्मणाला, " यापुढें थट्टेचा एक शब्दसुद्धां मी ऐकूं शकणार नाहीं. ही अट कबूल असल्यास मी तुमचें बोलणें ऐकण्यास तयार आहें. "

" मी सांगेन त्याप्रमाणें मग करशील ? " शृगालदत्तानें त्याकडे तीक्ष्ण नजरेनें पहात विचारलें.

" योग्य वाटल्यास! " विमलचंद्रानें शांतपणें उत्तर दिलें.

" योग्य वाटेलच. बरें; ऐक. वेड्या, तूं थोडासा विचार कर कीं, कुमुदिनीसारखी श्रीमंताची मुलगी तुझ्यावर कशी अनुरक्त होईल ? छे, मध्येंच माझें भाषण तोडूं नकोस. पुरतें ऐकून घे. एक विलक्षण वेडगळ आशा बाळगून तूं आज आपल्या प्राणास आंचावितों आहेस. विचार कर; तुझें सौंदर्य अवर्णनीय आहे; हें मीच काय पण आंधळ्याशिवाय सारी मानव जात कबूल करील. पण बाबारे, नुसत्या सौंदर्याकडे कोण बघणार. दुनियेंत एक–एकच वस्तु इच्छित आशा पूर्ण करण्यास उपयोगी पडते. ती वस्तु कांचन हें होय. हें ज्याच्याजवळ यथास्थित आहे तोच मनुष्य पाहिजेल ती वस्तु प्राप्त करूं शकतो. हें जेथें आहे, तेथें सर्व कांहीं आहे व हें जेथें नाहीं तेथें आमावास्येचा अंधःकार ! तूंच सांग, जर तुझ्याजवळ विपूल धन असतें तर आज या कारागृहांत पडण्याचा तुला प्रसंग येतां काय ? जर तूं धनाढ्य असतास तर कुमुदिनीच्या पित्यानें आपण होऊन तुला आपली मुलगी देण्याचें कबूल केलें असतें कीं नाहीं ? आणि जरी मुलगी दिली नसती तरी आपल्या मुलीवर प्रेम केल्याबद्दल त्यास तुला कैदेंत तरी खास टाकतां आलें नसतें. जर कैदेंत टाकतां तर त्याचा सूड तूं आपल्या धनाच्या योगें घेऊं शकतास. पण पहा, एक धन नसल्यामुळें कुमुदिनीची प्राप्ती नाहीं ती नाहीं; उलटें सहा महिने कारागृहवास भोगावा लागला व याचा परिणाम काय तर प्राणार्पण ! सांग बरें; मी म्हणतों हें खोटें कां आहे ? "

विमलचंद्रास वरील भाषण अक्षरशः पटलें व त्यानें होकारार्थी मान हालविली. शृगालदत्त पुढें म्हणाला, " एक कांचन नसल्यामुळें तूं सौंदर्यसंपन्न व गुणवान् असूनहि कुमुदिनीवर प्रेम केल्यानें दोषी ठरलास. मी मघाशीं उगीच थट्टा केली. वास्तवीक तूं सर्वस्वी निर्दोषी आहेस,

हें कोणीहि कबूल करील. एकाद्यानें एखाद्यावर प्रेम करणें हें कांहीं पाप नव्हे. सुंदर वस्तूकडे कोणाचें मन ओढ खात नाहीं? कुमुदिनी सौंदर्यखनी आहे, तिला पाहून मोठमोठे तपस्वी मोहित होतील मग तुझ्यासारख्या रूपवान् तरुणाचा पाड काय? पण बाबारे, तुझ्यामध्यें एक फारच मोठा अवगुण आहे व तो अवगुण दरिद्रता! त्यायोगें कुमुदिनीसुद्धां तुझ्यावर प्रेम करीत नाहीं."

"अगदीं खोटें!" विमलचंद्र मध्येंच जोरानें ओरडला.

"तुझें चुकतें आहे तें येथेंच. कदाचित् तुझ्या सौंदर्याला भुलून कुमुदिनी तुझ्यावर प्रथमदर्शनीं अनुरक्त झाली असेल; पण तें प्रेम सर्वकाळ टिकणें शक्य नाहीं. कांहीं हावभावांनीं आपण तुझ्यावर मोहित आहोंत, असें कुमुदिनीनें तुला भासविलें असेल; पण तें केवळ दिखाघट! त्यांत सत्यांश असणें शक्य नाहीं. कुमुदिनी अतुल सुंदरी आहे. अर्थात् ती रूपगर्विता असणें शक्य आहे—नव्हे, तो तरुणीजनांचा एक स्वभावच आहे. सौंदर्यशालिनी कुमुदिनी मानिनी आहे. तुझ्यासारख्या लवचिक मनाच्या तरुणांना आपल्या नादीं लावणें, हा यौवनपंथांत पाऊल टाकलेल्या प्रत्येक रूपवती प्रमदेचा मुख्य अवगुण असतो. तोच अवगुण कुमुदिनीच्या अंगीं पूर्ण आहे. आपण रूपराशी आहोंत, अशी तिची खात्री आहे व त्याचमुळें तिला आपले लाळ घोटणारे पुष्कळजण असावेत असें वाटतें व म्हणून ती तुझ्यासारख्या तरुणांना आपल्या मोहजाळ्यांत अडकवते. जी एका मोठ्या अधिपतीची मुलगी, श्रीमंती थाटांत वाढलेली, नानातऱ्हेचीं मिष्टान्नें खाऊन सवकलेली, नजर फेंकतांच दासदासी जिच्या सेवेला तयार व स्वतः जी विलक्षण रूपसंपन्न ती तुझ्यासारख्या एका दरिद्री पोरावर मोहित होणें कितपत शक्य आहे याचा तूंच विचार कर. हें मानवीस्वभावाच्या विरुद्ध आहे."

इतकें बोलून शृगालदत्त विमलचंद्राकडे बारकाईनें पाहूं लागला व आपण चाटविलेली मात्रा लागूं पडत चाललेली पाहून त्यास मनांतल्या मनांत खूप आनंद झाला. विमलचंद्रास त्याचें बोलणें खरें वाटूं लागलें व जों जों तो विचार करूं लागला तों तों त्यास तें अक्षरशः पटूं लागलें.

"आपण म्हणतां हें पुष्कळ अंशीं खरें आहे—"

"पुष्कळ अंशीं कां? सर्वांशीं खरें आहे असें म्हण. जर कुमुदिनी

तुझ्यावर खरोखरच प्रेम करती; तर तूं नाहींसा झाल्याबरोबर तिनें आकाशपाताळ एक करून सोडलें असतें. तुला माहित नाहीं. स्त्रियांचा स्वभावच असा आहे कीं, ज्यावर त्या प्रेम करतील त्याच्याकरितां आपलें सर्वस्व अर्पण करण्यास कधींहि मागें घेणार नाहींत. त्याच्याकरितां त्या पाहिजेल तें धाडस, पाहिजेल तें सत्कृत्य अगर दुष्कृत्य करण्यास कमी करणार नाहींत. आणि हा स्त्रिस्वभाव आपल्या पूर्वींच्या ऋषींनीं जाणल्यामुळेंच त्यांनीं ' स्त्रीनें आपल्या पतीवरच प्रेम करावें ' अशी अट घातली आहे व त्याप्रमाणें बंधनेंहि घालून ठेविलीं आहेत. त्यामुळें आज जीं कांहीं सुखीं जोडपीं आपल्या दृष्टोत्पत्तीस येताहेत त्याचें बीज तेथेंच आहे. या स्वभावास अनुसरून जर कुमुदिनी प्रेम करती तर तिनें तुझी मुक्तता हरप्रयत्न करून केली असती; अगर तुझ्याकरितां प्राण दिला असता. ती तुझ्या मुक्ततेची ना काळजी करते ना तुझ्यावर प्रेम करिते. थोड्याच दिवसांत तिचा विवाह होणार असल्यामुळें ती आपल्याच आनंदांत आहे. "

" काय ? कुमुदिनीचा विवाह होणार ? " विमलचंद्रानें आश्चर्य, दुःख व निराशा इत्यादि विकारांनीं मिश्रित आवाजानें विचारलें.

" यांत काय संशय ? "

" मग आतां मला जगून तरी काय करावयाचें आहे ! उद्यां मला सुळीं देतील तर बरेंच होईल. " विमलचंद्रानें निराशेनें म्हटलें.

" मोठेंच आश्चर्य ! " शृगालदत्त आंतून आनंदून पण बाह्यतः आश्चर्य करीत म्हणाला, " एका पोरीनें फसविलें म्हणून तूं जीव कां गमाविणार ?"

" नाहींतरी मला वांचण्याची आशा थोडीच आहे ! आपण म्हणालांत ना कीं-- "

" होय. मी म्हटलें तें अगदीं खरें; पण असें पहा, तूं जी कुमुदिनीच्या तर्फे मुक्ततेची आशा करीत होतास, ती स्वतःच्या प्रयत्नावर कां करीत नाहींस ? " शृगालदत्त कांहींशा हेतुपूर्वक आवाजांत म्हणाला.

" म्हणजे याचा अर्थ काय ? "

" अर्थ अगदीं उघड आहे. येथून तूं स्वतःच्या प्रयत्नानें कां मुक्त होत नाहींस ? "

" पण साधन- "

" हं: " शृगालदत्त निष्काळजीपणें म्हणतो, " त्याची नको काळजी. मी तें देण्यास तयार आहें आणि त्यांत माझा एक स्वार्थहि पण आहे; हेंहि ध्यानांत ठेव. "

" तें कसें काय ? कारण माझ्यापासून आपणास कांहीं मिळेल याची शंकाच नको. "

" हं: तें सर्व कांहीं होऊन जाईल. " शृगालदत्त हेतुपूर्वक बोलला.

" मग मी तयार आहें. पण मग आपण इतकावेळ भाकडकथा कां सुरू ठेविली होती ? "

" तुला ही भाकडकथाच वाटते अं ? पण असेना कां ! " शृगालदत्त निष्काळजीपणें म्हणाला, " माझ्या पुढील नाटकाची ही प्रस्तावना आहे. तुला सांगितलेल्या गोष्टी पटल्या एवढेंच सध्यापुरतें मला पुरें आहे-"

" आपल्या मनांत पुढें काय करण्याचा विचार आहे ? " विमलचंद्रानें कांहींसें साशंक होऊन विचारलें.

" आपला स्वार्थ साधून तुझी सुटका करण्याचा. " शृगालदत्त गंभीरपणानें म्हणाला, " तुझी मुक्तता करण्यांत माझा स्वार्थ आहे असें सांगण्यांतच माझा एक हेतू आहे. तुझ्या मनांत कोणत्याहि प्रकारचा संशय येऊं नये व तुझें व माझें हित व्हावें अशी माझी इच्छा आहे. अगदीं नेहमीं ध्यानांत ठेव कीं, कोणीहि मनुष्य कोणतेंहि काम स्वार्थाशिवाय करीत नसतो. बरें तें असो. आतां मी सांगतों तें लक्षपूर्वक ऐक. "

सं.श.२८

## प्रकरण दुसरें.

# मुक्ततेचा एक मार्ग.

विमलचंद्र आश्चर्य करीत उत्सुकतेनें ऐकूं लागला व शृगालदत्त पुढील प्रमाणें सांगूं लागला, " महत्वाची गोष्ट सांगण्यापूर्वी तुला बजावतों कीं, मी सांगीन ती गोष्ट तिसऱ्याला कळतां उपयोगी नाहीं. कळल्यास त्यांत तुझेंच नुकसान विशेष आहे हें ध्यानांत ठेव. कारण तूं कैदी आहेस.तुला माहित आहे कीं,आमच्या या वसंतदुर्गाविषयीं एक विलक्षण वदंता लोकांत प्रचलीत आहे ? "

" ती कोणती ? " विमलचंद्रानें उत्सुकतेनें प्रश्न केला.

" येथें या दुर्गांत एक असें स्थान आहे कीं, ज्यांत भुतें वावरतात-"

" हो हो— " विमलचंद्र मध्येंच म्हणाला, ' मीं असें ऐकिलें होतें खरें कीं, प्रस्तुत किल्ल्यांत तशी एक कोठी आहे. ज्यांत भुताटकीचे चमत्कार दिवसाढवळ्या घडत असतात असें एकादें स्थान येथें खरेंच कां आहे ? "

" होय. "

" आणि भुतें नाचतात हेंही खरें ? " विमलचंद्रानें उत्सुकतेनें विचारिलें.

" भुतांनीं पछाडलेलें असें एक घर येथें आहे हें खास. आतां त्यांत भुताटकी होते कीं नाहीं हा प्रश्न निराळा. येवढें मात्र खरें कीं, लोकवदंता अगदींच खोटी नाहीं. "

"आणि मीं असेंहि ऐकलें होतें कीं, ज्या ठिकाणीं सध्या भुतांचा त्रास होतो; त्याठिकाणीं पूर्वी एक चांगला महाल होता सध्यांच्या दुर्गाधिपतीचे पूर्वज त्याठिकाणीं बसून आपल्या प्रजेला न्याय देत असत. "

" हीही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. " शृगालदत्त गंभीरपणानें म्हणाला, " मी तोच इतिहास आतां तुला सांगणार आहे. असें सांगतात कीं, प्रस्तुत दुर्गेशाचे वडील त्यावेळीं आपला अंमल चालवीत होते. एके दिवशीं वसंतऋतूंत संध्याकाळच्या वेळीं शीतलचंद्र ( दुर्गाधिपतीचें नांव ) तटावरून फिरत असतां खालीं एका झुडपाजवळ एक मध्यम वयाचा गृहस्थ तळमळत पडलेला त्यांनीं पाहिला. तात्काळ त्यांना त्याची दया

आली व त्यांनीं दोनचार नोकरांकडून त्यास दुर्गांत आणविलें. त्या मनुष्याचें वय चाळीस-पंचेचाळीस वर्षांचें असेल नसेल. वर्णानें तो अगदीं काळा होता. त्याचे केश पिंगट वर्णाचे होते. नाक डेंबरें, डोळे लाल व एकंदर चेहरा राकट व क्रूर दिसे. त्याचें शरीरही चांगलें धिप्पाड होतें. त्याच्या गळ्यांत एक दोन ताईत व दंडांत लोखंडाचें एक कडें होतें. त्याला किल्ल्यांत आणल्यावर थोडें खाऊं घातलें. त्यामुळें त्यास बरीच ताकद आली व तो उठून बसला. त्याची एकंदर आकृति इतकी भयंकर होती कीं, सध्याचे किल्लेदार त्यावेळीं आपल्या पित्याजवळ बसले होते, त्यांनीं भीतीनें किंचाळी फोडिली. त्यावेळीं ते लहान होते. त्या लहान मुलाला आपली भीति वाटलेली पाहून त्या भयंकर मनुष्यास मुळींच वाईट वाटलें नाहीं. उलट तो मोठ्यांदा हंसला ! त्याचें तें हंसणें किती भयप्रद होतें म्हणतोस ! तेथें उभी असलेली सर्व नोकर मंडळी तर घाबरलीच; पण स्वतः किल्लेदारहि घाबरले. आपल्या हंसण्यानें सर्वांच्या मनांत भीति उत्पन्न झालेली पाहून त्या राक्षसास मोठी धन्यता वाटली. हा सांगितलेला सर्व प्रकार त्या बैठकीच्या महालांत घडला."

"जिथें सध्यां भुतें नाचतात-"

"तिथेंच. त्याच रात्रीं किल्लेदाराच्या पत्नीच्या पोटांत भयंकर रीतीनें दुखूं लागलें. किल्लेदार तेथून उठून अंतरमहालांत गेले. पुष्कळ औषधोपचार केले; पण पोटांत दुखण्याचें राहीना. जिकडे तिकडे गोंधळ उडाला. त्या भयंकर स्वारीला ती हकीकत समजली. त्यांनीं आपल्या कर्कश आवाजांत एका नोकरास सांगितलें, 'जा. आपल्या धन्यास जाऊन सांग कीं, ज्याअर्थी तूं माझ्यावर उपकार केले आहेस त्याअर्थी मी तुझ्या पत्नीला औषध देऊन बरें करतों !' त्या नोकरानें त्याचा निरोप त्या किल्लेदाराला कळविला. किल्लेदारांनीं त्यास अंतर्महालांत आणण्यास सांगितलें. त्यावेळीं दुर्गेशपत्नीस अगदीं प्राणांतिक वेदना होत होत्या. त्या वांचतील अशी कोणालाच आशा वाटेना. त्यांचीं दोन्हीं मुलें त्यांच्याजवळच बसून मातृदुःखानें व्याकूळ होऊन आक्रंदन करीत होतीं. स्वतः किल्लेदार उद्विग्न मनानें एका बाजूला उभे होते. कधीं कधीं ते आपल्या दोन्हीं बालकांना-नलिनी व धर्मचंद्र-

यांना समजावीत होते. नलिनी त्यावेळीं अठरा वर्षांची होती. अद्याप ती कुमारी होती. तिचा विवाह करण्याचें घाटत होतें. धर्मचंद पांच वर्षांचा होता. असो. नोकरानें लवकरच त्या स्वारीस बोलावून आणिलें. एकवार त्या स्वारीनें दुर्गेशपत्नीकडे पाहिलें. आपला कठोर हात तिच्या पोटावरून फिरविला, तोंच क्षणार्धांत पोटदुखी बंद झाली!"

"मोठेंच आश्चर्य!" विमलचंद्र आश्चर्यानें उद्गारला.

"आश्चर्य तर खरेंच." शृगालदत्त पुढें सांगूं लागला, "दुर्गाधिपतींना किती आनंद वाटला! सर्वांनीं त्या भयंकर मनुष्याला धन्यवाद दिला. उदारचित्त नलिनीला तर फारच उपकार वाटले व ती त्या मनुष्याच्या पुढें येऊन साश्रुनयनांनीं आपली मुद्रिका पुढें करीत म्हणाली, 'आज आपले आमच्यावर जे उपकार झाले आहेत, ते कशानेंहि फिटणार नाहींत; तरी पण आठवण म्हणून ही माझी बालिकेची भेट ग्रहण करावी!'

"तो मनुष्य चकित होऊन एक दोन पाउलें मागें सरला व अतुल रूपराशी तरुण नलिनीकडे कामेच्छेनें पहात मोठ्यांदा म्हणाला, 'आहा! ज्या पुष्पाचा इतक्या दिवस शोध करीत मी या भूमंडलावर फिरतों आहे, तें हेंच! तें हेंच!!' असें आपल्या कर्कश आवाजांत बोलत त्यानें आपले बाहू पसरले! सुंदरी नलिनीच्या सुकुमार देहाला आपल्या बेंवेंत घट्ट आवळून त्यानें तिच्या कोमल व निर्दोष गालाचें चुंबन घेतलें!"

"अरे दुष्टा! आणि याबद्दल त्याला कोणींहि अटकाव केला नाहीं!" विमलचंद्रानें आश्चर्य करीत त्वेषानें विचारलें.

"वरील गोष्ट इतक्या अल्प कालांत घडली कीं, सर्व माणसें तटस्थ झालीं. नलिनी तर त्या राक्षसी बाहुपाशांत बेशुद्धच झाली. 'आतां ही माझीच आहे.' असें म्हणत त्यानें बेशुद्ध नलिनीला खालीं ठेविली व तेथून शांतपणें गमन केलें. त्या राक्षसाच्या अंगीं कांहीं विलक्षण व गूढ सामर्थ्य आहे; असें सर्वांस वाटलें. यावर दुर्गाधिपतींनीं त्यास एका नोकराकडून किल्ल्यांतून एकदम निघून जाण्यास सांगितलें. पण तो तसा थोडाच ऐकणार होता. तो त्या महालांत पुनः जाऊन बसला व त्यानें त्याचें दार लावून घेऊन व निरोप पाठविला, 'नलिनीला पाठवून द्या म्हणजे मी चालता होतों.' या गोष्टी रात्रीं नऊ वाजतां

घडल्या. त्यामुळें दुसऱ्या दिवशीं त्या मनुष्याला चांगली शिक्षा ठोठावण्याचा विचार ठरला व त्या महालाच्या सभोंवतीं पहारा ठेविला. पण रात्रीं ऐन मध्यरात्रीच्या वेळीं त्या महालांतून स्त्रीच्या हृदयभेदक किंचाळ्या ऐकूं येऊं लागल्या. सर्व पहारेकरी घाबरून गेले. आंत काय प्रकार चालला आहे; हें खिडकींतून पहाण्याचें कोणासच धाडस होईना. अखेरीस एकानें दबत दबत जाऊन एका खिडकींतून आंत डोकावलें ! हरे राम– "

" काय पाहिलें त्यानें ? " विमलचंद्रानें भीतीनें विचारलें.

" किती भयंकर ? " शृगालदत्त भीतीनें कांपत म्हणाला, " त्या दुष्टानें नलिनीला– "

" काय नलिनीला ? " विमलचंद्र दचकून म्हणाला, " तो पिशाच होता कीं काय ? "

" जवळ जवळ संबंध होता म्हणावयास हरकत नाहीं.– " शृगालदत्त भीतीनें चोहोंकडे पहात म्हणाला, " हरेराम ! नुसती त्या गोष्टीची आठवण काढली तरी अंगाचा थरकांप होतो; मग ज्यानें ती गोष्ट प्रत्यक्ष पाहिली असेल त्याची काय अवस्था झाली असेल बरें ? "

शृगालदत्तानें वर सांगितलेली विलक्षण हकीकत ऐकतांच विमलचंद्र आश्चर्यचकित् झाला, भीतीनें गांगरून गेला व आपली स्थिति विसरून गेला. तो टकमक शृगालदत्ताकडे पाहूं लागला. इकडे शृगालदत्तहि भीतीनें खराच गांगरला होता. तोहि विमलचंद्राकडे पहात बसला.

" बरें, पुढें काय झालें ? त्या शिपायानें आंत काय पाहिलें ! " विमलचंद्रानें किंचित् शुद्धीवर येऊन विचारलें.

" त्या राक्षसानें नलिनीला आपल्या बेंबेंत दाबून धरली होती व तिच्या कौमार्यभंगार्थ त्यानें तिच्या वस्त्राला हात घातला होता ! "

" नलिनी तेथें आली कशी ? " विमलचंद्रानें विस्मयानें प्रश्न केला.

" तेंच मोठें गूढ आहे. सर्वांची कल्पना आहे कीं, मंत्रसामर्थ्यानें त्यानें तिला तेथें आणिली असावी. "

" एकंदर मंत्रतंत्र, जारणमारण, मोहनवशीकरण खरें आहे तर ! " विमलचंद्रानें आश्चर्य करीत विचारिलें.

" म्हणजे ! इतक्या दिवस तुला तें खोटें वाटे कीं काय ? "

" अगदीं तसेंच जरी ह्मणतां येत नाहीं, तरी पण त्यावर भरंवसा रहता हें खास. बरें पुढें सांगा पाहूं. तुमची गोष्ट जितकी भीतिप्रद तितकीच मनोरंजकहि पण आहे. "

" आणि तुला व मला लाभदायकसुद्धां— " शृगालदत्तानें किंचित् हंसून उत्तर दिलें. त्याचें हें भाषण ऐकून विमलचंद्र चकित् झाला.

" तें कसें काय ? "

" शेंवटीं कळेलच. " शृगालदत्त पुढें सांगूं लागला, " तो राक्षस त्या बालिकेला वश करूं पहात होता व ती हृदयभेदक किंचाळ्या फोडित त्याच्या गाढालिंगनांतून सुटण्याचा प्रयत्न करीत होती. तिच्या त्या किंचाळ्या ऐकून किल्ल्यांतील सर्व माणसें त्या महालासभोंवतीं एकत्र झालीं. दुर्गाधिपती स्वतः आले पण त्या राक्षसानें मंत्रसामर्थ्यानें सर्वांस असें जखडून टाकलें होतें कीं, महालाचें दार फोडण्याची कोणासच आठवण झाली नाहीं. बऱ्याच वेळानें खिडकींतून तीर मारून त्या दुष्टाचें निर्दलन करण्याचें ठरलें. दोन शूर पठ्यांनीं तीर मारण्याचें काम पत्करलें. तीरावर तीर आंत मारले; त्या दुष्टलाहि पण खूप जखमा झाल्या; पण तो कामांध तिकडे कसचा लक्ष देतो. तो त्य सुकुमार फुलाला चुरडण्याच्या विचारांत चूर झाला होता. [illegible] वेळांत नलिनीचें प्राणोत्क्रमण झालें ! तिचें प्राणोत्क्रमण झालेलें [illegible] तांच त्या स्वारीनें संतापून तें शव तसेंच आपल्या बाहूंत [illegible] खिडकीकडे तोंड फिरविलें. तोंडानें तो कांहींसा मंत्र पुटपुटत [illegible] मंत्र जर पुरा बोलला जातां, तर आज ह्या दुर्गाचें नामनिशाणही [illegible] राहतें ! पण एक तीर त्या दुष्टाचा कंठनाळ चिरीत गेला व तो राक्षस धाडदिशी जमिनीवर पडला व विव्हळूं लागला; पण पडल्या पडल्या त्यानें जवळच्या भिंतीवर आपल्या रक्तानें तो पिशाचसाधनी मंत्र लिहून ठेविला व त्याखालीं त्याचा साधनविधीहि पण लिहिला आहे. "

" तो मंत्र अद्याप त्या कोठडींत आहे ? " विमलचंद्रानें उत्सुकतेनें प्रश्न केला.

" हो ! आहे तर— " असें ह्मणून शृगालदत्त समोरील भिंतीवर बारकाईनें पाहूं लागला.

" तिथें इतक्या बारकाईनें काय पाहतां ? " विमलचंद्रानें साशंक चित्तानें विचारलें.

" याच-याच कोठडींत- " शृगालदत्त भीतीनें चोहोंकडे पहात म्हणाला, " वरील सर्व गोष्टी घडल्या ! "

" काय म्हणतां ? " विमलचंद्रानें भीतीनें गांगरून विचारलें.

" होय, हीच कोठडी ती. इथेंच पूर्वी चांगला महाल होता; पण वरील गोष्ट घडल्यानंतर तो महाल लवकरच पाडला गेला. फक्त मंत्र लिहिलेली भिंत पाडण्याचा प्रयत्न केला असतांही पडली नाहीं व गड्यांना त्रास होऊं लागला म्हणून त्याच भिंतीला आणखी दोन भिंती घालून ही कैद्याची कोठी बांधली ! "

" पण आज सहा महिने मी येथें असतां मला एकदां सुद्धां कसा त्रास झाला नाहीं ? " विमलचंद्रानें आश्चर्यानें विचारलें.

" छे. ज्यांना लवकरच मृत्यु प्राप्त होणार असतो अशाच कैद्यांना या कोठडींत ठेवितात. त्यामुळें मला वाटतें, पिशाचाला त्याची दया येऊन तो त्यांना त्रास देत नसेल. "

" बरें; तो मंत्र कोणत्या भिंतीवर कुठेसा लिहिला आहे ? "

" तूं पाहूं इच्छितोस ? " शृगालदत्तानें इतकेंच विचारून मंत्र लिहिलेल्या भिंतीच्या विरुद्ध भिंतीला असणारी एक बंद खिडकी उघडली. आज किती दिवस तरी ती खिडकी बंद होती; पण आज ती उघडली गेली व खोलींत चक्क प्रकाश पडला.

" तें पाहिलेंस. " शृगालदत्तानें एका विवक्षित स्थानीं अंगुलीनिर्देश करून म्हटलें.

विमलचंद्रानें पाहिलें तों खरेंच ! एका चौकोनी दगडावर अगदीं ओल्या रक्तांत चार ओळींचा मंत्र व त्याची साधण्याची कृति लिहिलेली स्पष्ट चमकत होती.

" हे भगवान् ! " विमलचंद्र विस्मयानें छातीवर हात ठेवून बोलला, " हें रक्त तर अगदीं ओलें-जसें कांहीं नुकतेंच लिहिलें-असें दिसतें ! "

" तें पूर्वीपासूनचेंच तसें आहे, आणि पुढेंहि तसेंच राहणार म्हणतात. "

यावर बराच वेळ दोघेहि स्तब्ध होते.

" बरें; आतां तुमचें काय म्हणणें आहे ? " विमलचंद्रानें साशंक प्रश्न केला.

" त्या मंत्राच्या खालीं काय लिहिलें आहे तें वाचलेंस ? " शृगालदत्त

त्या मंत्राकडे बोट दाखवून म्हणाला. विमलचंद्रानें वाचलें तों त्यांत पुढील मजकूर होता.

" जो कोणी हा मंत्र साध्य करील त्यास पिशाच साध्य होईल. त्या पिशाचाच्या कांहीं अटी कबूल कराव्या लागतील; पण त्या-योगें मंत्रसाधकास अलोट संपत्ति, विलक्षण शक्ति अतुल सौंदर्य प्राप्त होईल. आणि त्याच मंत्रसाधकाच्या हातून या दुर्गाधिपतीचा निर्वंश होईल ! "

वाचून झाल्यावर विमलचंद्रानें शृगालदत्ताकडे हेतुपूर्वक पाहिलें.

" मग काय आहे इच्छा ? " शृगालदत्तानें खोंचून विचारलें.

" कसली ? "

" इथून निघून जाण्याची, संपत्तीमान, रूपवान् होण्याची—"

" म्हणजे ? " विमलचंद्रानें आश्चर्य करीत विचारलें, " मी मंत्र-साधन करूं ? "

" कां तुला एवढें आश्चर्य कसलें वाटतें ? " शृगालदत्त किंचित् आश्चर्ययुक्त तिरस्कारानें म्हणाला, " मंत्र साध्य केल्यापासून तुझा फायदा नाहीं कां ? "

' छे, आपल्या हातून नाहीं हें होणार. "

" मग उद्यां सुळीं जायचें हें ठरलेलें ! मरणावांचून तुझी येथून सुटका होईल, याची तूं आशाच धरूं नको ! अशा भरज्वानींत संसार-सुख न भोगतां मरणें तुला बरें वाटत असल्यास तुझी मर्जी ! पण मी तुझ्या हिताचीच गोष्ट सांगतों कीं, जर कां मंत्र साध्य झाला तर तुला कित्ती कित्ती गोष्टी करतां येतील. अगदीं पहिली गोष्ट, तुला आपल्या दुष्मानाचा पुरा सूड घेण्यास सांपडेल आणि कुमुदिनीसारख्या सुंदर तरुणी तर तुझ्या पायाशीं लोळतील. "

" आणि मंत्र साध्य नाहीं झाला तर ? " विमलचंद्रानें आशेनें विचारिलें.

शृगालदत्त मध्येंच म्हणाला, " हंः ! त्याची कशाला पर्वा ! इवी-तिवी तूं मरणार ! तुला मुक्त होण्याचा हाच एक मार्ग आहे. साध्य झालाच तर रमणीय उपवनांनीं वेष्टित अशा मोठमोठ्या राजप्रासादांत रहावयास सांपडेल, अलोट संपत्ति खर्च करावयास मिळेल व सुंदर

रमणींचा उपभोग घेण्यास सांपडेल. जर फसलेंच तर मरण हें आहेच. " शृगालदत्त मंत्र लिहिलेल्या भिंतीकडे पहात म्हणाला, " आणि मंत्र साध्य करण्याची कृतीही कांहीं विशेष अवघड नाहीं. "

विमलचंद्रानेंही त्या भिंतीकडे नजर फेंकली. मंत्राखालींच मंत्रसाधनाची कृतिही लिहिलेली होती.

"हा मंत्र अमावास्येस रात्रीं बारा वाजतां छाती इतक्या पाण्यांत उभें राहून जपावा. दक्षिणाभिमुख उभें रहावें. जपसंख्या एकशें एकुणचाळीस! मंत्र साधनाला धूप, दीप, उडीद, शेंदूर, लिंबें व कापूर इत्यादि. प्रथम एक सुंदर मूल बळीं द्यावें. त्याचें शीर आपल्या हातांत उलटें धरून त्यांत तेल घालून एक काकडा पेटवावा! नंतर तें मुंडकें आपल्या हातांत घेऊन पाण्यांत जावें व जप सुरू करावा! कसलीही भीति, कसलेंही आश्चर्य वाटलें तरी मन चंचल होऊं देऊं नये. जपसंख्या पूर्ण झाल्यावर तें मुंडकें वर फेंकून द्यावें. तें वरच्यावर नाहींसें झाल्यास मंत्र साध्य झाला असें समजावें! वर सांगितलेल्या गोष्टींत थोडीसुद्धां चूक होऊं नये! नाहींतर सर्वस्वी घात होईल! "

साधनकृति वाचून झाल्यावर कितीवेळ तरी विमलचंद्र शृगालदत्ताकडे पहात राहिला.

" मग ? " शृगालदत्तानें त्याकडे बारकाईनें पहात विचारिलें.

" आपल्या हातून हें नाहीं होणार. " विमलचंद्रानें मध्येंच म्हटलें.

" कां बरें ? यांत काय कठीण आहे ? "

" मी बालहत्या करूं ? हाय! हें महत्पाप केवळ स्वतःचा प्राण वाचवण्या—"

" असें, असें—" शृगालदत्त खेंकसून म्हणाला, " त्या लोहशूळावर होणाऱ्या प्राणांतिक यातना तूं सहन करणार होय ? त्यापेक्षां मूर्खा, एकदां पाप करून अनंत सुख भोगणें योग्य नाहीं कां ? ज्यावेळीं तुझ्याजवळ धन येईल; त्यावेळीं पुण्य करून पाप धुतां येईल. "

हाय! दुष्ट जिव्हा मोठी कठीण आहे. ' मधुनिष्ठति जिव्हाग्रे हृदये तु हलाहलम् ' म्हटलें आहे; तें खोटें नव्हे!

" बरें पण त्याची तयारी—"

" मी—मी करितों कीं—" शृगालदत्त छातीवर हात मारून म्हणाला, ' मात्र एक अट आहे. "

" कोणती ? "

" मंत्र साध्य झाल्यावर मी मागेन तितकें धन दिलें पाहिजे. "

" कबूल. "

अमावास्येचा भीषण अंधःकार सर्वत्र पसरला होता ! वसंतदुर्गावर असणाऱ्या एका तलावाच्या कांठीं विमलचंद्र एका शिळेवर बसला होता. ती वेळ साडेअकरा वाजण्याची होती. थोड्याच वेळांत शृगालदत्तानें एका बालकास वस्त्रांत लपेटून आणिलें. बालक बेशुद्ध स्थितींत होतें. त्याचें मुख शृगालदत्तानें वस्त्रानें झांकलें होतें. त्यामुळें विमलचंद्रास तें मूल ओळखतां आलें नाहीं.

" हं अटप. ही सर्व तयारी आहे. " असें म्हणून त्यानें तें मूल खालीं ठेविलें व एक तीक्ष्ण धारेची तलवार म्यानाबाहेर काढून विमलचंद्राच्या हातांत दिली. विमलचंद्राचा हात थरथर कांपूं लागला.

" न्—न्—नाहीं. मी—न—" विमलचंद्र भीतीनें अडखळत बोलला.

" तें कांहीं नाहीं. तुला हें काम केलेंच पाहिजे. " शृगालदत्त दरडावून म्हणाला, " हं अटप; एक घाव दोन तुकडे ! हा त्याचा गळा पहा ! "

दुर्दैवी विमलचंद्रानें आपलें सर्व बळ एकत्र करून तें नग्न खड्ग आपल्या हातांत घेतलें व तो त्या झांकलेल्या बालकाकडे पहात राहिला.

" हं पहातोस काय ? आटप. "

विमलचंद्र ! अद्यापीही तूं शुद्ध आहेस ! त्याच खड्गानें त्या दुष्ट शृगालदत्ताचा जर प्राण घेतलास तर तुला पुण्यच लागेल ! पण छे; विलक्षण लोभानें तुला पकडलें आहे. हायरे बालक ! क्षणार्धात् त्याचें शीर अलग झालें ! ! लागलींच शृगालदत्तानें त्यावरचें रक्तानें भरलेलें वस्त्र काढून घेतलें. अंधुक प्रकाशांत त्या बालकाचा चेहरा विमलचंद्रास स्पष्ट दिसला !

" घात झाला ! ! " विमलचंद्र अस्फुट स्वरांत ओरडला व धाडकन् बेशुद्ध होऊन पडला !

तें बालक दुसरें कोणी नसून त्याच्या प्रिय कुमुदिनीचा लहान भाऊ होता ! !

## प्रकरण तिसरें.

# त्रिशूलचिन्ह.

पंधरा दिवसानंतर सूर्यनारायणानें नानारंगी पश्चिमदिक् समुद्रांत नुकतीच बुडी मारिली होती. अशावेळीं एक तरुण घोडेस्वार वसंतदुर्गाकडे जाणाऱ्या राजरस्त्यावरून चालला होता. त्याच्या घोड्याची गती साधारण होती. सबंध दिवसभर त्यानें चांगलीच मजल मारल्यामुळें त्या स्वाराचा घोडा अगदीं थकून गेला होता. तो तरुण स्वार जरी थकलेला दिसत होता तरी आजच्या आज वसंतदुर्गास जाण्याचा त्याचा विचार होता. पण वसंतदुर्ग तेथून किती दूर आहे हें तो जाणत नसल्यामुळें कोणा आल्यागेल्या मनुष्यास त्यासंबंधीं विचारून नंतर घोड्यास थोडीशी विश्रांति देऊन पुढील मार्ग आक्रमावा असा त्यानें विचार ठरविला होता. अकस्मात् त्या स्वाराच्या तीक्ष्ण नजरेस दूर एक मंदीर दिसलें; म्हणून त्यानें आपला मोर्चा तिकडे वळविला. थोड्याच वेळांत तो त्या मंदिराजवळ जाऊन पोंचला. मंदिराचा पुजारी मंदिराला लागून असलेल्या लहानशा बागेंतील फुलें तोडीत तोंडानें कांहीं पुटपुटत, इकडे तिकडे फिरत होता. पुजाऱ्यास पहातांच आमच्या स्वारानें आपला घोडा आंखडला. पुजारीहि चटकन् त्याच्याजवळ आला.

"येथून वसंतदुर्ग अद्याप किती लांब आहे बरें ?" आमच्या स्वारानें आपल्या घोड्यास चुचकारित विचारलें.

"सुमारें चार कोस." पुजारी विनयानें ह्मणाला, "पण रस्ता अत्यंत वाईट आहे पहा. चोरांचा फार सुळसुळाट आहे. एकट्यादुकट्याला रात्रीचें जाणें फारच धोक्याचें आहे." हें त्याचें बोलणें पुरें होतें न होतें तोंच मंदिरांतून एक अंगानें किडकिडीत, साधारण गोरा वृद्ध मनुष्य बाहेर आला. त्याकडे बोट दाखवून पुजारी पुढें ह्मणाला, "ह्यांनाहि वसंतदुर्गाकडेच जावयाचें आहे; पण आतां रात्र पडत चालल्यामुळें त्यांना अशा अवेळीं जाऊं देणें मला बरें वाटलें नाहीं. ह्मणून

मीं त्यांना आग्रहानें ठेवून घेतलें आहे. आपणहि आजची रात्र इथेंच काढावी, असें मला वाटतें. "

" जीव हवा असल्यास पहा बुवा ! " तो वृद्ध बोलला, " वीरापेक्षां वीर असतात पण आतां अंधेऱ्या रात्रीं जाणें एकंदरींत धोक्याचेंच ! " इतकें बोलून त्यानें पुजाऱ्याकडे सांकेतिक नजरेनें पाहिलें. मात्र युवकाचें लक्ष त्या इषाऱ्याकडे गेलें नाहीं.

" काय ? " तो युवक आश्चर्यानें म्हणाला, " वसंतदुर्गेश आपल्या प्रजेविषयीं इतके कां बेफिकीर आहेत ? "

" महाराज, " तो पुजारी म्हणाला, " हा प्रांत वसंतदुर्गेशाच्या अंमलाखालीं नाहीं. "

" कदाचित् आनंददुर्गाधिपतीच्या ताब्यांत असेल. " तो वृद्ध बोलला.

" कोण आनंददुर्गाधिपती ? " युवकानें आश्चर्यानें विचारलें, " तो गर्विष्ठ सरदार वाटतें ? जो विक्रमार्काच्या राज्यारोहणाला आला नव्हता. ",

" असेल–असेल. " पुजारी हलक्या आवाजांत म्हणाला, " आनंददुर्गाधिपतीचें नांव काढणें अगर त्याच्या संबंधीं कांहीं बोलणें महा अपायकारक आहे. "

युवकानें त्याच्या या भाषणाकडे दुर्लक्ष केलें. त्यानें थोडावेळ विचार करून आपला निश्चय ठरविला. तो पुजाऱ्यास म्हणाला, " रात्रींच्या रात्र मी इथें राहिल्यास आपणास त्रास तर होणार नाहीं ? "

" छे, घर आपलेंच आहे. " असें म्हणून त्यानें घोड्याचा लगाम धरला. तरुणानें घोड्यावरून खालीं उडी मारिली. पुजारी घोडा घेऊन देवळाच्या पाठीमागें असलेल्या गोठ्यांत त्यास बांधण्यास गेला. त्याच्या मागोमाग तो वृद्धहि गेला. युवक मंदिरांत शिरला.

" हाच का तो घोडेस्वार ? " पुजाऱ्यानें त्या वृद्धास हलकेंच विचारिलें.

" हाच. मात्र ध्यानांत ठेव, त्याला त्याच खोलींत निजावयास जागा दे बरें. " तो हुकुमी आवाजानें म्हणाला.

" पण हा आहे कोण ? " पुजाऱ्यानें उत्सुकतेनें विचारिलें, " याच्याजवळ कांहीं गरमागरम दिसत नाहीं. "

" चूप. " तो वृद्ध नाकावर बोट ठेवून म्हणाला, " मूर्ख कुठला. तुला काय करावयाचें ? " इतकें झाल्यावर दोघेहि पुनः मंदिरांत आले.

इकडे त्या युवकाचें पुजाऱ्याच्या बायकोनें योग्य तें स्वागत केलें. युवकाचें वय तेवीसच्या आंत बाहेर होतें. जरी तो म्हणण्यासारखा सुंदर नव्हता, तरी कुरुप होता असेंहि नाहीं. त्याच्या शरिराची एकंदर ठेवण मोहक होती. त्याचे कपडे विशेष भपक्याचे नव्हते, तरी तो युवक उच्चकुळज असावा असें वाटे. त्याच्या शरिराचा एकंदर आकार मध्यमपैकीं होता; तरी शरीर बळकट दिसत होतें. त्याच्या डोळ्यांत एक विलक्षण तेज चमकत होतें. असो.

पुजाऱ्याच्या स्त्रीनें लवकरच स्वैंपाक केला व रितीप्रमाणें जेवणें आटोपलीं. पण जेवतेवेळीं एकदोन वेळ त्या युवकास त्या वृद्धाचा व पुजाऱ्याचा संशय आला. संशयाचें कारण त्या दोघांचें सांकेतिक इशारे युवकाच्या नजरेस आले. तरी त्यानें त्याकडे विशेष लक्ष दिलें नाहीं. जेवणें आटोपल्यावर युवकानें निद्रा करण्याविषयीं जागा विचारली.

"आपण बरेच थकलेले आहांत," पुजारी कावेबाजपणानें म्हणाला, "तेव्हां आपणास मुलाबाळांचा त्रास न होईल अशी जागा देतों. यावें." असें म्हणून दिवा घेऊन पुजारी पुढें झाला. युवकहि आपल्या तलवारीवर हात ठेवून त्याच्या मागोमाग जाऊं लागला. देवळाच्या पाठीमागें गोठ्याजवळ एक कोठी होती. त्यांतच युवकास निजण्यास जागा देण्याचें ठरलें होतें. गोठ्याजवळून जातांना युवक आपल्या घोड्यास चुचकारावयास विसरला नाहीं. ते दोघेहि कोठीजवळ पोहोंचले. पुजाऱ्यानें दार उघडून आंत दिवा नेऊन ठेविला. खोलींत निजण्याची सर्व तयारी होती. युवक आंत गेला. पुजाऱ्यानें बाहेर येऊन दार ओढून घेतलें. अकस्मात् बाहेरून कडी लावल्याचा आवाज युवकाच्या कानीं पडला.

"अरेच्या दगा !" युवक दचकून म्हणाला. त्यानें दाराजवळ येऊन दार ओढून पाहिलें तों दार खरेंच लागलेलें !

"ठीक आहे ! लुच्चांनो ! पुजारीपणाच्या नांवाखालीं हा धंदा चालविला आहेत होय ? ठीक आहे." असें म्हणून युवकानें आंतून दाराला घट्ट कडी लाविली व तो लक्षपूर्वक त्या खोलीची रचना पाहूं लागला. त्या लहानशा खोलींत संशयाला कारण असें कांहींएक नव्हतें. मात्र बिछान्याच्या पायथ्याशीं जमिनीला लागून एक लहानसा कोनाडा होता.

कांहीं चीज ठेवण्याच्या उपयोगीं म्हणावा तर तो बराच लहान होता. कोणत्या उद्देशानें तो कोनाडा तेथें केला असावा. असा विचार करीत युवक त्या कोनाड्याकडे पहात उभा असतां, अकस्मात् एक खटका झाला व त्या लहानशा कोनाड्यांतून एक त्रिशूलधारी हात बाहेर आला. त्या हातानें तो तीक्ष्ण धारेचा त्रिशूल जमिनींत गाडला व तो पुनः दिसेनासा झाला ! वरील कृत्य इतक्या थोड्या कालांत आटपलें कीं, तो तरुण युवक भयचकित् झाला. त्यानें धांवत जाऊन त्या कोनाड्यांत हात घातला; पण व्यर्थ. साध्या कोनाड्याप्रमाणेंच तो होता. युवकानें दिवा घेऊन नीट बारकाईनें तो कोनाडा तपासला. पण कांहींएक फायदा झाला नाहीं. नंतर त्याची नजर त्या गाडलेल्या त्रिशुलाकडे गेली. तो त्रिशूल जमिनींत अगदीं सरळ खुपसला होता व त्यास एक चिठ्ठी बांधिली होती. अत्यंत आश्चर्यकरीतच युवकानें ती चिठ्ठी घेतली व उलगडून वाचली तों त्यांत पुढील मजकूर होता.

" या त्रिशूल चिन्हाच्या आज्ञेनें तुम्हांस कळविण्यांत येतें कीं, आज रात्रीं बारा वाजतां तुमच्याकडे एक व्यक्ति येईल, त्या व्यक्तीबरोबर कोणत्याहि तऱ्हेची कुरकुर न करितां निघून यावें. यांत काडीमात्र चुकूं नये. "

ती चिठ्ठी त्या तरुणाच्या हातून गळून पडली ! भयानें सर्वांग थरथर कांपूं लागलें. तो अस्फुट स्वरांत पुटपुटला, " एकंदरींत आटपलें आमचें जीवन ! ही आज्ञा मी प्राणांतीहि टाळूं शकत नाहीं. "

थोड्या वेळानें युवक बिछान्यावर जाऊन बसला व घडलेल्या गोष्टींचा विचार करूं लागला. पण भीतीचा पहिला अवसर निघून गेल्यावर युवकाला इतकें घाबरून गेल्याबद्दल फारच लाज वाटली. तो आपल्या जागेवरून उठला व इकडे तिकडे फिरूं लागला. फिरतां फिरतां तो स्वतःशींच पुटपुटला, " मला इतकी भीति कां वाटावी बरें ? त्रिशूल-चिन्हसभेची ही आज्ञा मी अमान्य करूं शकत नाहीं हें खरें; पण त्रिशूलचिन्हसभेनें मीं काय अहित इच्छिलें म्हणून ती मला मारील ! छे, हें कधींहि शक्य नाहीं. पण मग मला ही आज्ञा कां बरें ? एखाद्या गुप्त वैऱ्यानें तर हा डाव साधला नसेल ! पण छे, हेंहि शक्य दिसत नाहीं. कारण त्रिशूलचिन्हसभा अन्याय करण्याकरितां स्थापन झालेली

नाहीं. मोठमोठे अधिकारी अधिकारमदानें प्रजेला त्रास देतात, त्यांना दहशत बसावी, चोर, लुटारू यांनीं प्रजेस त्रास देऊं नये, अन्यायी मनुष्यांनीं अन्याय करूं नयेत अशाकरितां ही स्थापन झालेली आहे. मी कोणताहि लहान मोठा अन्याय केलेला मला आठवत नाहीं मग मी कां भ्यावें बरें? पण दैवगतीपुढें कोणाचें काय चालणार ! " अशा प्रकारचे विचार आमच्या तरुण स्वाराच्या मनांत येतांच त्यास एक प्रकारचें धैर्य आलें. जसजशी बारा वाजण्याची वेळ जवळ येत चालली तसतसें त्याचें तें धैर्य द्विगुणित होत गेलें.

बारा वाजलें ! युवकाच्या कानावर बाहेरून कोणीतरी दार उघडीत असल्याचा आवाज ऐकूं आला. युवकास ना आश्चर्य वाटलें ना भीति वाटली. तो शांत चित्तानें आपल्या तरवारीवर हात ठेवून उभा राहिला ! थोड्याच वेळांत एक कृष्णाकृति दार उघडून आंत आली व तिनें आमच्या तरुण स्वारास नमन केलें. ती व्यक्ति पुढें चालूं लागली व युवक तिच्या मागोमाग चालूं लागला. दोघेहि मंदिराच्या बाहेर पडले. मंदिराच्या बाहेर पडतांच आणखी दोन व्यक्ति तरुणाच्या दोन्ही बाजूनें चालूं लागल्या. बरेंच दूर गेल्यावर त्यास नेण्यास आलेली व्यक्ति थांबून म्हणाली, " वीर पुरुषा, इथें तुझे नेत्र बांधणें आमचें कर्तव्य आहे. "

" पण मला तुम्ही कोठें घेऊन जात आहांत ? " युवकानें साशंक प्रश्न केला.

त्या व्यक्तीनें एक त्रिशूल काढून दाखविला व म्हटलें, " याच्या आज्ञेप्रमाणें तुमचे डोळे बांधले पाहिजेत. तुम्हाला कांहीं अपाय करावा अशी माझी मुळींच इच्छा नाहीं. मी फक्त हुकमाचा ताबेदार आहें. " यावर युवक कांहींच बोलला नाहीं. त्याचे नेत्र बांधण्यांत आले. मंडळी पुनः पुढें चालूं लागली.

अशाप्रकारें ती मंडळी सुमारें अर्धाघंटा चालल्यावर एकदम थांबली. भेरीचा कर्कश आवाज युवकास ऐकूं आला.

" कोण तें ? " कोणीसें जोरानें विचारलें.

" त्रि. त्रि. स. " एका व्यक्तीनें उत्तर दिलें. लागलींच खंदकावर पूल मारल्याचा आवाज झाला. त्यावरून त्या युवकास आपण एखाद्या

भुईकोट किल्ल्याजवळ आलों असें वाटलें. आणि ही त्याची कल्पना खोटी नव्हती पुलावरून सर्व मंडळी पलीकडे गेली. दरवाजा उघडल्याचा आवाज ऐकूं आला व मंडळींनीं किल्ल्यांत प्रवेश केला बराच वेळ चालल्यावर ती मंडळी एका दिवाणखान्यांत जाऊन पोहोंचली.

"कैद्याचे नेत्र सोडा!" एकानें ह्मटलें. हा आवाज आमच्या तरुणास परिचित् वाटला. तरुणाचें नेत्रबंधन सोडण्यांत आलें! तेव्हां त्याच्या नेत्रास एक अपूर्व देखावा पहावयास मिळाला!

एका अगदीं जुन्या चालीच्या दगडी दिवाणखान्यांत एक सिंहासन मांडलें होतें व त्यावरच त्रि. चि. स. चा न्यायाधिश बहुमूल्य पोषाख करून बसला होता. जरी आमचा युवक आश्चर्य, भीति व क्रोध इत्यादि विकारांनीं गोंधळून गेला होता तरी त्यानें त्या बहुमूल्य वस्त्रधारी न्यायाधिशास तशा स्थितींतहि तेव्हांच ओळखलें! मंदिरांतील वृद्ध प्रवासी तो होता!!

"शांति." न्यायाधिशानें बजावलें व सर्व सभा स्तब्ध झाली.

"कैद्याला पुढें आणा!" न्यायाधिशानें युवकाच्या रक्षकांस आज्ञा केली.

रक्षकांनीं त्या युवकास सभेच्या मध्यभागीं असलेल्या एका अर्धवर्तुळ पिंजऱ्यांत आणून उभें केलें.

"तुह्मी येथें कां आला आहांत?" न्यायाधिशानें युवकास प्रश्न केला.

"त्रिशूलचिन्हाच्या आज्ञेवरून." युवकानें धिटाईनें उत्तर दिलें.

"एकंदरींत तुह्मी त्रि. चि. स. ची शक्ति आणि योग्यता जाणतां एकुण?"

"मी सभेची शक्ति पूर्ण जाणतों आहे."

"आणि सभेची योग्यता नाकबूल करतां?"

युवकानें उत्तर दिलें नाहीं.

"ठीक आहे. आम्ही आपणास ही सभा योग्य आहे कीं नाहीं हें लवकरच दाखवूं. बरें, आपलें नांव काय?"

"वा! सभा माझें नांवसुद्धां जाणत नाहीं?" युवक थोडासा क्रुद्धित होऊन बोलला, "मग मला इथें कां बोलाविलें?"

" सभा कैद्याच्या प्रश्नाचें उत्तर देऊं इच्छित नाहीं. " न्यायाधिशानें सगर्व प्रश्न केला, " आपण कोणत्या नांवानें प्रवास करीत आहां ? "

" मी एक साधा मनुष्य आहें. माझें नांव नवीनचंद्र असें आहे. "

" आपण साधे मनुष्य आहांत काय ? " न्यायाधीश व्यंगार्थानें म्हणाला, " ठीक. सभेला त्याविषयीं विशेष फिकीर नाहीं. बरें, आपण कोणीकडे चालला होतां ? "

" वसंतदुर्गाकडे. "

" कोणत्या कामाकरितां ? " न्यायाधिशानें उत्सुकतेनें विचारलें.

" सभेला त्याची जरूर ? " नवीनचंद्रानें क्रुद्ध होऊन विचारलें.

" बरें, आपणाला येथें कां बोलाविलें आहे हें जाणतां ? "

" नाहीं. " नवीनचंद्रानें तिरस्कारानें ह्मटलें.

" हा तक्ता वाचा. " असें ह्मणून न्यायाधिशानें एक तक्ता रक्षका-हस्तें नवीनचंद्रास दिला. नवीनचंद्र मोठ्या उत्सुकतेनें व लक्षपूर्वक त्यावरील मजकूर वाचूं लागला. सुमारें पाव घंट्यांत नवीनचंद्राचें वाचन आटपलें. वाचून होतांच " हें मीं वाचलें. " असें रागानें ह्मणून त्यानें तो तक्ता न्यायाधिशाकडे फेंकून दिला !

" बस्स. त्यावर आपली सही करा कीं आपली मुक्तता होईल. "

" आणि जर मीं नाकारलें तर ? " नवीनचंद्रानें मध्येंच विचारिलें.

" मृत्यु ठेवलेलाच ! " न्यायाधिशानें ओंठ चावून ह्मटलें.

" दुष्टांनो ! " नवीनचंद्र ओंठ चावीत ह्मणाला, " जाणतां आहांत तुह्मी कोणाला धमक्या देतां आहांत तें ? "

" अगदीं पूर्णपणें. सभा कोणाचीहि मनधरणी करीत नसते समजलांत ! तरीहि मी तुम्हाला त्या तक्त्यांतील अटी मुकाट्यानें कबूल करण्याविषयीं सूचना करतों. "

" नवीनचंद्र अशा सूचनांना अथवा दरडावण्यांना मुळींच भीक घालीत नाहीं. " नवीनचंद्र छातीवर हात ठोकित क्रोधानें बोलला.

न्यायाधीश ओंठ चावीत म्हणाला, " मग सभेला आपला नियम अमलांत आणावा लागेल. पण, पुनः विचार करा. "

" नवीनचंद्राला कोणत्याहि गोष्टीचा दोनदा विचार करावा लागत नाहीं. " नवीनचंद्र उद्धटपणें ह्मणाला, " समजलांत ? मी सभेलाच अशी

आज्ञा करतों कीं, तिनें आपला पूर्ण विचार करून माझ्याशीं वागावें. ध्यानांत ठेवा. माझा एक केस वांकडा होईल तर सभेचे तुकडे तुकडे होतील ! "

नवीनचंद्राचें हें भाषण ऐकतांच न्यायाधिशाचें मुख क्रोधानें आरक्त झालें. त्यानें तुच्छतेनें म्हटलें, " उर्मट पोरा ! ज्या अर्थी तूं आपला हेका सोडित नाहींस, त्याअर्थी सभेलाही आतां दया दाखविण्याची जरूरी नाहीं. "

" सभेची दया मला नकोच आहे ! " नवीनचंद्र ठासून म्हणाला.

" पण सभेचा मृत्युदंड तर सहन कराल ? " न्यायाधिशानें टोंचून म्हटलें व कांहीं निकाल वाचून दाखविला.

इतराप्रमाणेंच शांत चित्तानें नवीनचंद्रानेंहि तो ऐकला. त्यास फांशी-ची शिक्षा सुनावण्यांत आली होती.

निकाल वाचून झाल्यावर न्यायाधिशानें कैद्यास घेऊन जाण्याविषयीं रक्षकांना खूण केली. सहा रक्षकांनीं नवीनचंद्रास न्यायालयाबाहेर आणिलें. नंतर त्यास एक लाल अंगरखा घालण्यांत आला. लवकरच तीं सर्व मंडळी बाहेर पडली.

यावेळीं नवीनचंद्रास विलक्षण धैर्य प्राप्त झालें होतें. तो मुकाट्यानें ईश्वराचें नामस्मरण करीत रक्षकांमधून चालला होता. यावेळीं त्याचे नेत्र बांधण्याचें कांहींच कारण नव्हतें. कारण त्याचें जीवन संपलें होतें. त्याचे नेत्र खुले असल्यामुळें त्यास किल्ल्यांतील प्रत्येक वस्तु नीट पाहतां आली. थोड्याच वेळांत ते सर्व किल्ल्याच्या बाहेर पडले. खंदक ओलां-डून ते जंगलांत आले. जरी चांदणें पडलें होतें तरी वृक्षांच्या दाटी-मुळें अरण्यांत बराच अंधकार पडला असल्यामुळें एका शिपायानें मुद्दाम आणलेली एक मशाल पेटविली व तो सर्वांस वाट दाखविण्यास पुढें झाला. थोड्याच वेळांत ते राजरस्त्यावर येऊन पोहोंचले.

" इथेंच आपणास फांशी देण्याचें ठरलें आहे. " मुख्य रक्षकानें एका वडाच्या झाडाकडे बोट दाखवीत म्हटलें. " आपली वेळ आतां जवळ आली आहे, तेव्हां आपण ईशप्रार्थना करावी हें बरें. "

नवीनचंद्रानें दोन्ही हात जोडले आणि वर आकाशाकडे पाहून म्हटलें, " भगवान् ! चुकूनसुद्धां कोणाचाहि अपराध न करितां आज हा मृत्यु

प्राप्त होत आहे ! इच्छा तुझी ! आमच्यापेक्षां तुला आमची काळजी विशेष आहे हें खास. आणि याकरितां मी मरणाला भीत नाहीं ! " नंतर तो रक्षकाकडे वळून ह्मणाला, " हा मी तयार आहें. "

" तुमचें धैर्य विलक्षण आहे. " मुख्य रक्षक पुटपुटला.

इकडे दोन शिपायांनीं त्या वडाच्या खांदीला दोर बांधून फांस तयार केला व नवीनचंद्र त्या फांसाखालीं येऊन उभा राहिला. त्याचे दोन्ही हात बांधण्यांत आले व फांस त्याच्या गळ्यांत अडकविला. पण धन्य त्या वीराची ! त्याच्या तोंडांतून एक चकार शब्द निघाला नाहीं कीं, नाकावाटे दुःखाचा सुस्कारा आला नाहीं. त्याचे ओठ ईश्वराचें नामस्मरण करीत होते. आतां त्याच्या जगण्याची अशा फारच थोडी होती.

त्याचा फांस खेंचला जाणार इतक्यांत, कृष्णवस्त्र परिधान केलेली एक भव्य आकृती त्या स्थलीं उपस्थित झाली व आपल्या गंभीर आवाजांत ह्मणाली, " नीचांनो ! सोडा त्या निरापराध्यास. " असें म्हणून तिनें आपल्या तीक्ष्ण तलवारीनें तो दोर कापून टाकला.

" पकडा दुष्टाला ! " मुख्य रक्षक संतापानें ओरडला, " त्रिशूलचिन्ह सभेच्या कामांत अडथळा करणारा जिवंत राहूं शकत नाहीं. "

नवीनचंद्रास, आपल्याकरितां एक निरापराध व्यक्ति बळी पडत असलेली पाहून फारच वाईट वाटलें. दोन नोकरांनीं नवीनचंद्रास पकडून ठेवलें व चौघे त्या व्यक्तीच्या अंगावर तरवारी घेऊन धांवले. त्या व्यक्तीचे क्षणांत तुकडे होतील अशी नवीनचंद्राची कल्पना होती !

" कीटकांनो ! मागें सरा ! " त्या व्यक्तीनें तिरस्कारानें ह्मटलें व आपली तलवार जराशी हालविली. काय चमत्कार पहा ! विद्युत्पाताप्रमाणें चौघेहि धाडदिशी जमिनीवर बेशुद्ध होऊन पडले. राहिलेले दोघे नवीनचंद्रास सोडून पळून गेले. नवीनचंद्राच्या आश्चर्यास सीमा राहिली नाहीं. तो चकित मुद्रेनें त्या अमानुष व्यक्तीकडे पहात राहिला.

" आटपा. चला. या मजबरोबर. " ती व्यक्ति गंभीरपणें नवीनचंद्रास ह्मणाली.

एखाद्या बालकाप्रमाणें नवीनचंद्र त्या व्यक्तीच्या पाठोपाठ गेला. थोड्याच अंतरावर दोन घोडे तयार होते. त्यांपैकीं एक नवीनचंद्राचा होता.

" चला. वसा आपल्या घोड्यावर व वसंतदुर्गाचा रस्ता धरा. आतां आपणास कोणीहि त्रास देणार नाहीं. "

" आणि आपण ? " नवीनचंद्रानें स्तिमित होऊन विचारलें, " आपण कोण ! आपलें नांव काय ? "

" लवकरच समजेल. " असें म्हणून त्या विलक्षण व्यक्तीनें आपल्या अश्वावर आरोहण केलें व घोड्यास टांच दिली.

---

## प्रकरण चवथें.

### आक्रमण.

गिरि अरवलीच्या एका रमणीय शिखरावर वसंतदुर्ग बांधला गेला होता. ज्याप्रमाणें दुर्ग भव्य होता, तसाच तो मजबूतहि पण विलक्षण होता. आमच्या कथानकाच्या वेळीं वसंतदुर्गावर व त्याच्या आसपासच्या बऱ्याच मोठ्या प्रदेशावर आमच्या कथ नायकेचा—कुमुदिनीचा—पिता महाराजा धर्मचंद्र आपला अधिकार चालवीत असे. त्याची प्रजा सुखी व धनसंपन्न होती. स्वतः महाराजांची पत्नी जरी सध्या जिवंत नव्हती; तरी तिनें आपल्या प्रेमाच्या दोन खुणा—एक मुलगा व एक मुलगी — आपल्यामागें ठेविल्यामुळें महाराजास पत्नीदुःख विशेष असह्य होत नव्हतें. महाराज आपल्या अपत्यांचें पालन करून आपलें जीवन सुखांत कंठीत होते यांत मुळींच संशय नव्हता; पण सुमारें दोन महिन्यांपासून त्यांच्या या सुखांत व्यत्यय येण्यास सुरवात झाली. वसंतदुर्ग प्रदेशाला लागूनच आनंददुर्ग या नांवाचा एक दुर्ग व तदंतर्गत प्रदेश होता. या प्रदेशावर महाराजा राक्षसनाथ हा आपला जुलमी अम्मल चालवीत होता. त्यानें महाराजा धर्मचंद्राच्या सुखांत विघाड करण्याचा प्रारंभ केला. धर्मचंद्राची मुलगी विवाहास योग्य झाली होती. तिची राक्षसनाथानें मागणी केली होती; पण राक्षसनाथ वृद्ध, व्यसनी, क्रूर व भ्रष्टकीर्ति सरदार असल्यामुळें धर्मचंद्रानें त्याची मागणी अमान्य केली. त्यामुळें चिडून राक्षसनाथानें वसंतदुर्गाच्या राज्यांतील प्रजेस दुःख

देण्यास सुरवात केली होती. त्याचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य धर्मचंद्राच्या अंगीं नसल्यामुळें त्याला तें सहन करावें लागत होतें. पण येवढेंच दुःख धर्मचंद्रास सहन करावयाचें नव्हतें. त्याच्याकरितां याहिपेक्षां असह्य दुःख वाढून ठेविलें होतें. सुमारें पंधरा दिवसांपूर्वी धर्मचंद्राचा लहान मुलगा एकाएकीं नाहींसा झाला होता व त्याचा अद्यापपर्यंत पत्ता लागला नसल्यामुळें पुत्रशोकानें वृद्ध धर्मचंद्र मरणोन्मुख झाला होता. त्याचा व त्याचप्रमाणें कुमुदिनीचा सर्व संशय त्याचा प्रतिस्पर्धी राक्षसनाथ यावर होता. त्या दुष्टानें कांहीं तरी कपट लढवून आपल्या पुत्रास नेलें आहे, असें धर्मचंद्रास वाटे; पण हाय हाय! खरी स्थिति किती विलक्षण होती! वसंतदुर्गावरच त्या अर्भकाचा विमलचंद्राच्या हस्तें वध झाला होता. आणि या गोष्टीचें कुमुदिनीस स्वप्न तरी होतें काय? पण ही गोष्ट एक शृगालदत्तालाच फक्त माहित होती. विमलचंद्रानें पिशाचसाधन करून आपली मुक्तता केव्हांच करून घेतली होती; पण नंतर तो त्या प्रदेशांत राहिला नव्हता हें खास. तो सध्यां कुठें होता व काय करीत होता हें पुढें लवकरच कळेल. तोंपर्यंत आपण बंधुविरहानें विव्हल झालेल्या कुमुदिनीचा परिचय करून घेऊं.

सुंदरी कुमुदिनी दोन सख्यांसह आपल्या महालांत बसली होती.

कुमुदिनी एक अनुपम सुंदरी होती. तिचे नखशिखांत सर्व अवयव तिच्या सडपातळ व सुबक शरिरास विलक्षण शोभा देत होते. शोकातिशयामुळें तिच्या गुलाबी गालावरील मनोहर लाली जरी नाहींशी झाली होती तरी तिच्या मुखमंडलावर एक प्रकारचें म्लान सौंदर्य झळकत होतें. तिच्या दोन्ही सख्या—कमलिनी व कला—तिच्याइतक्या जरी सुंदर नव्हत्या तरी त्या रमणीय नव्हत्या असें म्हणतां येणार नाहीं.

कमलिनी अठरा वर्षांची एक गतधवा तरुणी होती. जरी वैधव्याची अस्फुट उदासिनता तिच्या रमणीय मुखेंदूवर क्वचित् वेळीं झळके तरी तिच्या आरक्त ओष्टद्वयांवर नेहमीं मधुर हास्य खेळत असे व त्यामुळें तिचा चेहरा रमणीय दिसे.

कला आपल्या मैत्रिणीच्या—कुमुदिनीच्याच—वयाची म्हणजे सोळा सतरा वर्षांची होती. कला मधुर लावण्याची मूर्ति होती! वसंतांतील सुहास्य चंद्रकलेनें युक्त, कुसुमसौरभमिश्रित मंद समीर तरंगानें दरव-

ळलेली प्रशांत निशा ज्याप्रमाणें मनास, नेत्रास व शरिरास सुखाविते, त्याप्रमाणेंच कलेचें मधुर लावण्य मनास पुलकित करीत असे, नेत्रास आनंदवीत असे. असो.

दोन प्रहर उलटून बराच वेळ झाला होता. वर सांगितल्याप्रमाणें तिघीहि बसल्या असतां कुमुदिनी मध्येंच म्हणाली, "आज बरोबर वीस दिवस झाले !"

"कोणत्या गोष्टीला ताईसाहेब ?" कलेनें उत्सुकतेनें प्रश्न केला. पण तितक्यांत तिला आठवण झाली व ती दुःखानें पुटपुटली, "खरेंच, आज त्या भयंकर गोष्टीला वीस दिवस झाले !" कमलिनीलाहि वरील गोष्टीचा आशय समजला. तिनें आश्चर्यानें विचारिलें, "पण ही गोष्ट घडली कशी ? याचें मला मोठें आश्चर्य वाटतें."

"अग वेडे, त्यांत आश्चर्य तें कसलं ?" कुमुदिनी उदासीनतेनें म्हणाली, "दैवांत दुःख भोगावयाचं असलं म्हणजे अशाच गोष्टी घडतात ! नाहींतर किल्ल्यावर इतका बंदोबस्त असतां बाळ विक्रम ( कुमुदिनीचा बळी पडलेला धाकटा भाऊ ) नाहींसा व्हावा, याला काय म्हणावं ?" कुमुदिनीला एक हुंदका आला व ती चुप्प बसली.

"नाहींतर तातोबा ( कुमुदिनीचा बंधु विक्रम याचें शिक्षण योग्य प्रकारें व्हावें, या हेतूनें धर्मचंद्रानें त्यास एका योग्य गृहस्थाचे हवालीं केलें होतें. बहुतेक रात्रंदिवस तो आपल्या गुरुजवळच असे. त्यांनाच सर्व तातोबा म्हणत. ) त्याच्यावर किती प्रेम करीत असत. बिचाऱ्याच्या नेत्राचे अश्रु अद्याप बंद झाले नाहींत." कला दुःखित स्वरांत बोलली.

"त्या बिचाऱ्या म्हाताऱ्याला बेशुद्ध करून विक्रमाला नेतांना नेणाराचे हात कसे गळून पडले नाहींत म्हणते ?" कमलिनी त्वेषानें म्हणाली.

"आपलंच दैव फुटकं तिथें दुसऱ्याला दोष लावून काय उपयोग ?" कुमुदिनी दुःखित स्वरांत पुटपुटली.

हा विषय पुढें चालू ठेवणें बरें नाहीं, असें चतुर कलेला वाटलें म्हणून तो विषय उडवून देण्याच्या हेतूनें ती म्हणाली, "आपल्या इथं जे पाहुणे आले आहेत, ते कुठून आले आहेत बरें ?"

कमलिनीनें मध्येंच म्हटलें, "त्यांचा चेहरा किती उदास दिसतो पण!"

"तरीपण त्यादिवशीं रात्रीं ते ज्यावेळीं आले–" कला किंचित्

लज्जेनें म्हणाली, "त्यावेळीं त्यांचा तो सुंदर चेहरा फारच उदास दिसत होता."

"वाटेच्या श्रमामुळें असेल कदाचित् !" कुमुदिनीनें म्हटलें.

"किंवा ज्या दुर्गेच्या मंदिरांत ते रात्रीं उतरले होते, तेथें कांहीं त्रास झाला असेल." कमलिनीनें म्हटलें.

"ते उज्जनीहून आले आहेत असं ऐकलं, हें खरं का ?" कलेनें औत्सुक्यानें विचारिलें.

"होय. उज्जनीचे महाराज विक्रमार्क यांजकडून ते एक पत्र घेऊन आले आहेत. त्यांत लिहिलं आहे कीं, 'हे एक मोठ्या कुलांतील आहेत. तऱ्हतऱ्हेचे देश पहावेत या उद्देशानें ते बाहेर प्रवासास निघाले आहेत. त्यांचा योग्य मानमरातब ठेवावा.' इत्यादि बाबा सांगत होते पण कायग कले, तुला त्यांच्याविषयीं इतकी कां उत्सुकता वाटावी ? प्रेमपाशांत तर नाहींना सांपडलीस ?" कुमुदिनीनें शेवटलें वाक्य विनोदानें हंसत हंसत विचारिलें.

"खरंच का ?" कमलिनी लज्जेनें खालीं मान घातलेल्या कलेस हालवून म्हणाली, "कले, खरंच का पाहुण्यांनीं आपला प्रेमपाश तुझ्या-वर टाकला आहे. पण सांभाळ बरं, पुरुषांचा मुळींच भरंवसा नसतो"

"किती खरं बोललीस." कुमुदिनी दुःखानें म्हणाली, "ज्यांची मूर्ति रात्रंदिवस माझ्या हृदयांत वास करिते, ज्यांचें नांव स्वप्नांतसुद्धां माझी जिव्हा विसरत नाहीं, ज्यांचें सुंदर मुखमंडळ माझ्या नेत्रासमो-रून कधींहि हालत नाहीं, त्यांना माझी आठवण तरी आहे का ?"

कुमुदिनी यावेळीं आपला बंधुविरह विसरून गेली. प्रणय विरहाची दबलेली तीक्ष्ण ज्वाला पुन भडकली. त्यामुळें तिच्या मनाप्रमाणें तिच्या शरिरासहि विलक्षण ताप होऊं लागला. तिनें "हाय ! प्राण-नाथ ! प्रिय विमलचंद्र," म्हणत कमलिनीच्या खांद्यावर मस्तक टाकलें.

"अरेरे ! ताईसाहेब, आपलें त्यावर इतकें प्रेम आहेना ? आणि तें एका नीच स्त्रीवरांवर—"

'छे कमलिनी, ही गोष्ट अगदीं खोटी आहे ! जरी लोकवदंता, ते एका नीच स्त्रीला घेऊन कोठें निघून गेले आहेत, अशी आहे तरी मला तें अगदीं खरं नाहीं वाटत. माझी मनोदेवता मला अद्याप सांगते कीं

ते जिवंत आहेत व अद्याप ते माझ्यावर प्रेम करताहेत; पण ती गोष्ट केव्हां खरी होईल तें भगवान् जाणे ! " कुमुदिनीनें दुःखानें म्हटलें.

" एकंदरींत ताईसाहेबाचें विमलचंद्रावर अकृत्रिम प्रेम आहे अं ? " कला स्वगत पुटपुटली, " असंच आहे."

इतक्यांत त्या महालाचें द्वार खाडदिशीं उघडलें गेलें व भीतीनें गर्भगळीत झालेली एक दासी आंत आली.

" काय गडबड आहे ? " तिघींनीं एकदम उठून विचारिलें.

" शत्रु–शत्रु आले ! " दासीनें अडखळत उत्तर दिलें.

" शत्रु ? कोण शत्रु ? " कमलिनीनें आश्चर्यानें विचारिलें.

" आनंददुर्गेश राक्षसनाथ– "

" अरे चांडाळा ! " कमलिनी म्हणाली, " मेल्याचं वाटोळं कसं होत नाहीं ! चांडाळाचं अद्याप शांतवन नाहींका झालं ? "

इतक्यांत युद्धाच्या तयारीनें सज्ज झालेला वृद्ध धर्मचंद्र तेथें आला. " बाबा, ही काय गडबड आहे ? " कुमुदिनीनें धावरून आपल्या पित्यास प्रश्न केला.

धर्मचंद्र क्रोधानें यावेळीं अगदीं वेडा झाला होता. तो विकट हास्य करून म्हणाला " राक्षसनाथाचें आयुष्य संपलें ! त्याची आज पुण्यतिथी आहे. आज सर्व–सर्व त्रासांचा बदला कुमुद, या माझ्या लाडक्या तरवारीला त्या नराधमाचें रक्त पाजून–मी–मी घेणार ! " असें म्हणत पुनः धर्मचंद्र हंसला. त्याचें हें क्रोधयुक्त हंसणें सर्वांसच भयप्रद वाटलें.

कुमुदिनी भीत भीत म्हणाली, " बाबा– "

" हंः ". धर्मचंद्र मध्येंच म्हणाला, " इतकें घाबरण्याचें कारण नाहीं; आपल्या खालच्या तळघरांत क्षणभर जाऊन बसा. आज त्या दुष्टाचा निकाल लावल्याशिवाय मी परत येत नाहीं. " असें म्हणून धर्मचंद्र तेथून निघून गेला.

" माझा उजवा डोळा कां लवतो बरं? " कुमुदिनीनें भीतीनें विचारिलें.

" छे ताईसाहेब, भिऊन आपल्या मनाला उगीच त्रास करून घेऊं नका. देव करील तर सर्व चांगलेंच होईल. " कलेनें शांतवन करण्याच्या हेतूनें म्हटलें.

" सख्यांनो, " कुमुदिनी गद्गद स्वरांत म्हणाली, " ईश्वर करो, सर्व

संकट निवारण होवो ह्मणा; पण आजचं चिन्ह कांहीं टीक दिसत नाहीं !"

"तो विचारच मनांत आणूं नका." कमलिनी ह्मणाली, "वेळ पडली तर आपणहि वीरकन्या आहोंत; बरं चला, आतां आपण इथें रहाणं ठीक नव्हे."

लागलींच त्या सर्वजणी तेथून निघून गेल्या.

आपण वसंतदुर्गेश धर्मचंद्राकडे वळूं. दुर्गेश धर्मचंद्र आपल्या नवीन पाहुण्यासह मुख्य दरवाजावर येऊन उभा होता, इतक्यांत आनंद-दुर्गाधिपतीकडून एक स्वार कांहीं निरोप घेऊन आला. वसंतदुर्गांतील मुख्य सेनापतीनें त्यास धर्मचंद्रापुढें आणून उभें केलें. धर्मचंद्रानें एकवार त्या स्वाराकडे तिरस्कारानें पाहिलें व विचारिलें, "काय काम आहे ?"

तो स्वारहि ऐटीनें उत्तरला, "राजाधिराज आनंददुर्ग व तदंतर्गत-प्रदेशाधिपती राक्षसनाथ महाराजांचा आपणास असा हुकूम—नव्हे—निरोप आहे कीं, आपल्याकडे कोणी नवीनचंद्र या नांवाचे पाहुणे आले आहेत, त्यांना माझ्या स्वाधीन करण्यास सांगितलें आहे."

"तें काय ह्मणून ?" धर्मचंद्रानें नवीनचंद्राकडे— कारण तो पाहुणा नवीनचंद्रच होता— पहात विचारिलें, "त्यांना काय ह्मणून तुझ्या स्वाधीन करावयाचें ?"

"त्याला पुष्कळच कारणें आहेत."

"तीं कोणतीं ?"

"तीं मी सध्या सांगूं इच्छित नाहीं." तो शिपाई कुत्सितपणें म्हणाला, "मला सांगण्याची परवानगी नाहीं."

"असें काय ?" धर्मचंद्र आपला ओंठ चावून म्हणाला, "मग तुझ्या धन्याला जाऊन सांग जा कीं, नवीनचंद्रांनीं तुझा कोणताहि लहान मोठा अपराध केलेला असो, जोंपर्यंत ते माझे पाहुणे ह्मणून या दुर्गांत आहेत, तोंपर्यंत प्राण गेला तरी मी त्यांना तुझ्या स्वाधीन करणार नाहीं व करीन नाहीं."

"या गोष्टीचा परिणाम पाहूनच कां आपण हा निरोप सांगतां ?" तो स्वार खोंचून म्हणाला, "विचार करा."

" जा-जा. " धर्मचंद्र तिरस्कारानें ह्मणाला, " तुझ्या सल्ल्याची आह्मास जरूरी नाहीं. "

" पूर्ण विचार— "

" पुनः पुढें बोलतोस ! " धर्मचंद्र तरवारीस हात घालून म्हणाला, " आपलें उत्तर घेऊन चालता हो नाहींतर धक्के खाशील. "

" बरें, बरें पाहूं. " तो स्वार मिशीला पीळ देत म्हणाला, " आपण लढाईला तयार असा म्हणजे झालें ! "

" पूर्णपणें. " धर्मचंद्रानें उत्तर दिलें.

तो स्वार गेल्यावर नवीनचंद्र धर्मचंद्रास म्हणाला, " केवळ माझ्याकरितां आपणास व आपल्या इतर मनुष्यांस त्रास व्हावा हें मला मुळींच पसंत नाहीं. मात्र आपल्या संशयनिवारणार्थ मी एवढें खात्रीपूर्वक सांगतों कीं, प्रस्तुत आनंददुर्गेशाची व माझी तोंडओळखसुद्धां नाहीं. असें असतां त्यांनीं माझ्याविषयीं असा निरोप पाठवावा हें आश्चर्य होय. "

" आश्चर्य कसलें ! दुष्टांचा हा स्वभावच आहे. तुह्माला माहित नाहीं, वयानें हा पन्नास वर्षांचा थेरडा असून त्याला अद्याप लग्न करावेंसें वाटतें व त्याकरितां त्यानें माझ्या मुलीची मागणी केली होती; पण मीं ती स्पष्टपणें नाकारली. त्याचा बदला त्यानें माझ्या प्रजेला त्रास देऊन व हाय ! माझ्या लहानग्या— " पुढें त्याच्यानें बोलवेना.

" हां " नवीनचंद्र तो विषय टाळावा या हेतूनें ह्मणाला, " एवढें मात्र खरें कीं, काल संध्याकाळीं एका प्रवाशाजवळ मी जरा उघडपणें आनंददुर्गेशाविषयीं बोललों होतों. "

" तें कसेंहि असो, " धर्मचंद्र आपले अश्रु पुसून म्हणाला, " ज्याअर्थी आपण माझे पाहुणे आहांत, त्याअर्थी आपलें रक्षण प्राणापलीकडे करणें माझें कर्तव्य आहे. आणि त्यांतल्यात्यांत उज्जनीच्या राजाधिराजाकडून ज्याअर्थी आपल्या आदरसत्काराविषयीं आज्ञा आहे, त्याअर्थी मला ती शिरसावंद्य आहे. बरें; आपण मदत करालच. " शेवटलें वाक्य दुर्गेशानें किंचित् हंसून विचारिलें.

" अगदीं अखेरपर्यंत— "

नवीनचंद्राचें पुढील बोलणें ऐकण्यास दुर्गेश राहिले नाहींत. दुर्गावर लढाईला तोंड देण्याकरितां, योग्य बंदोबस्त करण्याकरितां ते तेथून निघून गेले.

दुर्गेश धर्मचंद्र वयानें पन्नास वर्षांचे होते, तरी शरिरानें उंच व धिप्पाड होते. त्यांच्या मुखमंडलावर वीरश्री खेळत होती. त्यांनीं युद्धाला योग्य असें चिलखत व शिरस्त्राण धारण केलें होतें. कमरेला तीक्ष्ण धारेचें खड्ग लटकत होतें. अशाप्रकारें ते दुर्गाच्या तटावरून फिरत असतां सेनापतीची गांठ पडली.

" कसें काय ? तयारी जय्यत आहेना ? " दुर्गेशानीं प्रश्न केला.

" जराशी दृष्टी फेकतांच बंदोबस्त कसा काय केला आहे तें महाराजांना तेव्हांच कळून येईल. " सेनापती वीरदत्त नम्रपूर्वक म्हणाला.

" यावेळीं आपली खडी फौज किती आहे ? "

" सुमारें आठशें वीर यावेळीं अगदीं जय्यत तयार आहेत. " सेनापती अभिमानपूर्वक पुढें म्हणाला, " प्रत्यक्ष काळालाहि त्यांच्यापुढें मान वांकवावी लागेल, अशापैकीं सुमारें शंभर शंभर योद्धे मुख्य मुख्य द्वारावर ठेवले असून बाकीचे इतर ठिकाणीं ठेविले आहेत. "

" ठीक आहे. असें करा, सुमारें पन्नास वीर, आपले पाहुणे नवीनचंद्र यांच्या हाताखालीं द्या; पण त्यांना सक्त ताकीद द्या कीं, नवीनचंद्रांच्या केसासहि धक्का लागतां उपयोगी नाहीं. ( दूरवर न्याहाळून ) हें पहा, आनंददुर्गेशाचें निशाण दिसूं लागलें. समय येतांच लढाईला सुरवात करा समजलें ? आज या भांडणाचा काय तो सोक्षमोक्ष होणार आहे. "

" शत्रु जरा येऊन भिडूं दे तर खरा; निवडक योद्ध्यांसह त्यांच्याशीं सामना करण्याचा माझा विचार आहे. महाराजांच्या इतक्या दिवस खाल्लेल्या भाकरीचें आज चीज होणार आहे. " सेनापतीनें सगर्व म्हटलें.

सुमारें पंधरा मिनिटांत आनंददुर्गेशाची सेना स्पष्ट दिसूं लागली. सेनापती वीरदत्त आपल्या तीक्ष्ण नजरेनें शत्रूची हालचाल पहात होता. शत्रुसेना बाणाच्या टप्प्यांत आलेली पहातांच सेनापतीनें आपल्या सेनेस बाण चालविण्यास इशारा केला व शत्रुसेनेवर बाणांचा भयंकर वर्षाव होऊं लागला. त्यामुळें शत्रुसैन्यांत बरीच गडबड उडाली.

धर्मचंद्र आनंदानें टाळी वाजवून सूक्ष्मदृष्टीनें पहात म्हणाला, " शाबास! वीरहो शाबास ! ! सेनानी, आपल्या वर्षावानें शत्रुसेनेंत बराच गोंधळ उडालेला दिसतो नाहीं ? "

" छे सरकार, " सेनापती नम्रतापूर्वक म्हणाला," आपली सेना थोडी आहे हें आनंददुर्गेशानें जाणल्यामुळें तो आपल्या फौजेचे तीन भाग करून निराळी व्यवस्था करीत आहे ! ( दचकून ) अरे पण हे पहा, शत्रुसेना पुढें पुढेंच येऊं लागली. ( न्याहाळून ) तिनें तें उंच स्थानहि गांठलें. आतां तिच्याकडील बाणांचा वर्षाव होणार ! "

इतक्यांत शत्रुसेनेकडील बाण सूं सूं करीत दुर्गांत येऊं लागले ! त्याचवेळीं दुर्गाच्या दुसऱ्या भागाकडे गडबड उडालेली सेनापतीच्या दृष्टीस पडली. " महाराज, दगा ! " सेनापती त्या बाजूस धावत ऊर्ध्व श्वासांत म्हणाला. " इकडे सांभाळा, मी तिकडे पहातों. ( दचकून ) अरेरे ! ही नवीन सेना कुठली ! ! आनंददुर्गेशानें धोका दिला ! ! " इत्यादि बडबडतच सेनापती त्या बाजूस धांवत गेला ! पहातों तों शत्रु-सेना तटास शिड्या लावून वर चढण्याच्या बेतांत होती.

" वीरहो ! " सेनापती आपल्या शिपायांस ओरडून म्हणाला. " हीच परीक्षेची वेळ आहे ! कापा ! ! तोंडाकडे काय पहातां ! शिड्या कांपून काढा ! छे; चढलेच ते ! तळघर—तळघराकडे लक्ष असूं द्या ! "

सेनानीची तलवार हवेंत चमकूं लागली ! पण सेनापतीचे सर्व प्रयत्न व्यर्थ होते. शत्रुसेना दुर्गांत शिरली व तिनें तळघराकडे मोर्चा वळविला ! शत्रुसेनेचें काम झालें !

सुंदरी कुमुदिनीला बंधन करून नेण्यांत आलें !

" अरेरे ! दुष्टानें डाव साधला अं ! " असें पुटपुटतच सेनानी त्या टोळीकडे जिनें कुमुदिनीस बंधन केलें होतें तिजकडे धांवला !

---

## प्रकरण पांचवें.

# युद्धानंतर.

इकडे दुर्गेश धर्मचंद्र व नवीनचंद्र मोठ्या शौर्यानें शत्रुसेनेचा पाडाव करण्यांत गुंतले होते. शत्रुसेना आतां अगदीं तटाला येऊन भिडली होती. नवीनचंद्र आपल्या हाताखालच्या लोकांना वारंवार उत्तेजन देऊन शत्रूनें लावलेल्या शिड्या तोडून पाडवीत होता, पण शत्रुसेना प्रबळ असल्यामुळें थोड्याच वेळांत शत्रु तटावर चढले ! आतां मात्र युद्धास खरें रूप प्राप्त झालें ! शत्रुसेनेपुढें वसंतदुर्गांतील सेनेचा जोर चालेना. पटापटा लोक पडूं लागले ! नवीनचंद्रानें बोलल्याप्रमाणें कृतीहि करून दाखविली. त्याचें विलक्षण युद्धकौशल्य पाहूनच उरलेल्या सेनेस वारंवार उत्तेजन येई, पण हें कुठवर चालणार ? नवीनचंद्रास दोन तीन बऱ्याच मोठ्या जखमा झाल्या व त्यांतून रक्तप्रवाह बराच झाल्यामुळें त्याच्या अंगांत आतां लढण्याचें त्राण राहिलें नव्हतें. त्यांत त्याच्याशीं एकाच वेळीं चार योद्धे लढून त्याचा प्राण घेऊं पाहात होते. ते चारीहि त्याच्या पूर्ण परिचयाचे होते. त्रि. चि. सभेपुढें त्यास त्यारात्रीं मारण्याचा हुकूम झाल्यावर जे शिपाई त्यास घेऊन अरण्यांत फांशी देण्यास गेले होते, त्यापैकींच ते होते.

"तरुणा," त्या चौघांपैकीं एक ह्मणाला, "आतां तूं वांचणें कठीण !" असें ह्मणत त्यानें आपली तलवार फिरविली व तें खड्ग नवीनचंद्राच्या शिरावर पडणार इतक्यांत, "हं, मागें सर !" असा हुकमी आवाज ऐकूं आला. सर्वांनींच वळून पाहिलें तों त्या रात्रीची तीच कृष्णाकृती ! पुनः नवीनचंद्रास अत्याश्चर्य वाटलें व ते चौघे योद्धे तोल जाऊन तटावरून खालीं कोसळले !

त्या व्यक्तीनें आपलें सर्वांग—मुखसुद्धां—आच्छादिलें होतें. ती नवीनचंद्राजवळ येऊन इतकेंच ह्मणाली, "आपल्याला बरेच श्रम झाले आहेत. तेव्हां आपण महालांत जावें हें बरें ! मी आतां सर्व बंदोबस्त करतों." असें ह्मणून ती व्यक्ति आपली तलवार हलवीत दुसरीकडे

निघून गेली ! यावेळीं शत्रुसेनेनें दुर्गावर पूर्ण ताबा केला होता, असें ह्मणण्यास हरकत नाहीं; पण कृष्णवीर व्यक्तीचें आगमन होतांच सर्वच प्रकार उलटला ! शत्रुसेना विलक्षण भयभीत होऊन तटाखालीं उड्या घेऊं लागली ! क्षणांत शत्रूचा मोड झाला आणि ती कृष्णव्यक्तीही पण अंतर्धान पावली. वसंतदुर्गांतील पुष्कळांनीं त्या वीरव्यक्तीस पाहिलें होतें; पण ती कोण व कुठली याचा कोणासच पत्ता नव्हता. प्रत्येकजण आपापल्यापरीं कल्पना लढवीत होता.

जरी शत्रुसेनेचा विमोड झाला, तरी ज्या हेतूनें शत्रूचें आगमन झालें होतें, त्यांत तिला यश आलें होतें ! कुमुदिनीला त्यांनीं पळविलीच ! !

थोड्याच वेळांत दुर्गांत सर्वत्र शांतता झाली; पण कुमुदिनीस शत्रूनें पळवून नेलेलें ऐकतांच सर्वांस दुःख झालें. दुर्गेश धर्मचंद्र तर अगदीं वेडा झाला. पंधरा वीस दिवसांपूर्वीं त्याचा एकुलता एक पुत्र नाहींसा झाला. आज त्याची प्रिय कन्याही शत्रूनें पळविली. इतका कडेकोट बंदोबस्त केला असतां, शत्रूनें दगा देऊन आपलें काम साध्य केलें, याचें धर्मचन्द्रास फार वाईट वाटलें. यापूर्वीं युद्धांत अपयश धर्मचंद्रास मुळींच ठाऊक नव्हतें. आजही अखेरीस शत्रूचाच पाडाव झाला; पण तो एका अपरिचित व्यक्तीच्या सहाय्यानें ! धर्मचन्द्रास आजचा पराजयच वाटला आणि ही गोष्ट कांहीं खोटी नव्हती. तो महालांत गेला. तेथें कला व कमलिनी शोक करीत बसल्या होत्या. धर्मचन्द्रास पाहतांच त्यांना जास्तच हुंदके येऊं लागले. धर्मचन्द्र आपलें दुःख आवरून त्यांचें शांतवन करून ह्मणाला, "कायग कले ! मी गेल्यानंतर इकडे काय काय घडलें तें सर्व सांग पाहूं ?" असें ह्मणून तो जवळच एका कोचावर बसला.

कला आपले नेत्र पुसून ह्मणाली, "आपण सांगितल्याप्रमाणें आह्मी सर्वजणी तळघरांत जाऊन बसलों. थोड्याच वेळांत दुर्गावर गोंधळ उडाल्याचें ऐकूं आलें. त्यावरून लढाईस सुरुवात झाल्याचें आह्मीं जाणलें. पुढें काय होणार ही चिन्ता करीत आह्मी सर्वजणी बसलों असतां महालांत गडबड ऐकूं येऊं लागली ! शत्रूनें दुर्गांत प्रवेश केल्याचें आह्मीं तेव्हांच ताडलें. आतां पुढें काय करावें या विचारांत

आम्ही बसलों असतां तळघराचें दार फोडीत असल्याचें ऐकिलें. थोड्याच वेळांत दार मोडून पडलें व वीस पंचवीस योद्धे एकदम आंत शिरले. त्यांनीं प्रथम कमलिनीलाच पकडलें. त्यांना वाटलें तीच ताईसाहेब आहे. पण एक दासी ' ताईसाहेब ! पळा हो पळा ! ' म्हणतांच त्यांनीं अदमासानें ताईसाहेबास पकडलें व कमलिनीस सोडून दिलें. थोड्याच वेळांत ते तेथून ताईसाहेबांना घेऊन चालते झाले. ताईसाहेबांना नेतांना त्यांनीं ओरडून सांगितलें कीं, ' कले, बाबांना आठ दिवसांच्या आंत माझी सुटका करण्यास सांग. तोंपर्यंत मी आपलें जसें होईल तसें रक्षण करीन. ' लागलींच त्या बेशुद्ध झाल्या. "

" असें काय ? ठीक आहे. आठ दिवसांच्या आंत कुमुदिनीची सुटका करूंच करूं. नाहींतर सर्व मरून जाऊं. " असें ह्मणत धर्मचंद्र बाहेर आला व त्यानें सेनापतीस सर्वांना एकत्र करण्यास आज्ञा केली.

थोड्याच वेळांत युद्धांत वाचलेले सर्व शिपाई नवीनचंद्रसुद्धां एकत्र झाले. धर्मचंद्र त्या सर्वांना उद्देशून ह्मणाला, " वीरांनों, तुह्मी सर्वांनीं माझ्याकरितां आज आपले प्राण हातावर घेऊन युद्धांत शौर्य गाजविलेंत, याबद्दल मी तुमचा फार आभारी आहें. तरी तुह्मी माझे नोकर आहांत. ईश्वरकृपेनें माझ्या ऋणांतून मुक्त होण्याचा प्रसंग आज तुह्मांस आला हें ठीकच झालें; पण आपले पाहुणे नवीनचंद्र यांचे उपकार आपण सर्वांनीं जरूर मानिले पाहिजेत. त्यांचा व आपला कांहींएक संबंध नसतां आज युद्धांत त्यांनीं जें विलक्षण शौर्य गाजविलें त्यावरून माझी तर काय, पण सर्वांची खात्री होऊन चुकली असेल कीं, नवीनचंद्र एक अतुल्य वीर आहेत. युद्धाच्या वेळीं दिसलेली त्यांची दक्षता, धैर्य वगैरे गुण खरोखरच अनुकरणीय आहेत यांत मुळींच शंका नाहीं. या त्यांच्या उपकाराबद्दल मी त्यांचा कसा उतराई होईन, हें सांगवत नाहीं; पण प्रसंगीं आजच्या उपकाराची फेड यथाशक्ति करण्यास मी मुळींच मागें घेणार नाहीं. ईश्वरकृपेनें असा प्रसंग लवकरच येवो म्हणजे झालें. असो. आतां ज्या कार्याकरितां मीं तुह्मास बोलाविलें आहे तें सर्व लक्षपूर्वक ऐकतील व त्यांत सर्वजण यथाशक्ति सहाय्य करतील; अशी मला खात्री आहे. मित्रांनों, मनुष्याला काय किंवा जगांतील दुसऱ्या कोणत्याहि वस्तुला काय एकच स्थिति रहात नाहीं. जगाच्या इतर

लहानमोठ्या घडामोडींबरोबर त्या वस्तूंतहि फरक पडत जातो; किंवा जगांतील प्रत्येक वस्तूंत होणाऱ्या फरकालाच जगाची रहाटी म्हणतात. त्याप्रमाणेंच आपली सर्वांची स्थिति आहे. एक काल असा होता कीं, ज्यावेळीं आपल्या या राज्यांत सर्वत्र आनंदीआनंद होता. वसंत-कालांत ज्याप्रमाणें वृक्ष नवपल्लवित होतात, लता कुसमित होतात, समीर मंद तरंगानें वाहूं लागतो, नद्या, निर्झर, मंजुरवानें वाहूं लागतात, कोकिलांचें मनोल्हादक कूजन सुरू होतें, त्याचप्रमाणें आपल्या ह्या वसंतदुर्ग राज्यांत आनंदसाम्राज्य होतें. आज तो काल निघून गेला व त्याबरोबरच तें आनंदसाम्राज्यही विलीन झालेलें दिसतें! वाईट स्थिति प्राप्त झाली असतां रडत बसणें, हें कांहीं शहाण्या मनुष्याचें काम नव्हे. तर त्या संकटांत धैर्य धरून युक्तीनें त्यांतून आपला व आपल्या इतर मंडळींचा उद्धार करणें, हेंच त्याचें कर्तव्य होय. आज आपलीही स्थिति अशीच आहे. राक्षसनाथानें इतक्या दिवस त्रास देऊन अखेरीस आपला डाव साधलाच. कुमुदिनीचें पाणिग्रहण करावें, अशी त्याची पुष्कळ दिवसांपासून इच्छा आहे. त्या इच्छेला तो पुरी करूं इच्छितो आणि म्हणूनच त्यानें आज कांहींतरी निमित्त काढून कुमुदिनीला बलात्कारानें पळवून नेलें आहे. तुमच्यासारखे वीर पुरुष तिच्या रक्षणास असतां राक्षसनाथानें तिला पळवून न्यावें, हें खरोखर सर्वांसच लांछनास्पद आहे. याकरितां शक्य तितका प्रयत्न करून तिची सुटका करणें आपलें कर्तव्य होय. यांत आपले प्राण विसर्जन झाले तरी पत्करलें. आज पुष्कळ दिवसांपासून राक्षसनाथानें आपल्यास नानाप्रकारें त्रास देऊन छळलें आहे व आपण त्याचा प्रतिकार केला नाहीं, त्यामुळें त्यास बराच अभिमान झाला आहेसें दिसतें. गर्वाचें घर खालीं झालेंच पाहिजे. त्यांतून दुष्टाचें निर्दलन तर झालेंच पाहिजे! राक्षसनाथानें तुम्हांस, तुमच्या कुटुंबास. तुमच्या जातीबांधवास, निराश्रितास व अनाथ अबलांना नानाप्रकारें छळलें आहे, त्याचें प्रायश्चित्त त्यास कोण देणार? तुमच्यासारखे वीर गरिबांचा कैवार घेणार नाहींत, त्यांचें रक्षण करणार नाहींत. तर त्यांनीं कोणाच्या तोंडाकडे पहावें? काय? तुमच्यांत कोणीहि असा वीर नाहीं कीं, जो त्या दुष्ट राक्षसनाथाला बंधन करून माझ्यासमोर आणून उभा करील? त्या वीराला

लागणारी सर्व मदत द्यावयास मी तयार आहें. हां, त्यानें एवढें मात्र लक्षांत ठेवावें कीं. हें काम सुलभ नाहीं. यांत त्यानें आपल्या प्राणाची आशा मात्र अगदीं सोडली पाहिजे. पण जर कां या कामांत–राक्षसनाथाला पकडून आणण्यांत–तो यशस्वी झाला; तर तो कोणीही असो, त्याला मी आपली प्रिय कन्या कुमुदिनी मोठ्या आनंदानें अर्पण करीन. एवढेंच नव्हे तर माझ्या पश्चात् वसंतदुर्गाचा व तदंतर्गत राज्याचाही पण तो मालक होईल." इतकें बोलून धर्मचंद्र स्तब्ध बसला व जमलेल्या मंडळींकडे पाहूं लागला.

लागलींच सेनानी वीरदत्त उभा राहून गंभीर वाणीनें बोलूं लागला, "इतक्या दिवस महाराजांच्या खाल्लेल्या मीठ भाकरीचें सार्थक करून दाखविण्याचा प्रसंग आम्हांवर आला होता व त्या प्रसंगांत प्रत्येकजण आपापल्या इमानास कशाप्रकारें जागला, हें महाराजांना माहित आहेच. ईश्वराच्या अवकृपेनें आमच्या प्रयत्नांस यश आलें नाहीं; हें आमचें दुर्दैव होय. महाराजांच्या सेवेंत असलेल्या वीर सेनेची माहिती सर्वांस आहे. राक्षसनाथालाहि तिनें आपला प्रभाव पुष्कळ वेळां दाखविला आहे आणि जरी आजच्या अपयशाचा कलंक तिला लागला आहे तरी अगदीं लवकरच तो लागलेला कलंक धुऊन काढण्यास प्रत्येकजण प्राणांतीही मागें सरणार नाहींत हें महाराजांनीं पक्कें लक्षांत बाळगावें. माजी आनंददुर्गेशाचें व महाराजांचें अत्यंत सख्य होतें व त्यावेळीं उभयतांनीं एकमेकांस संकटप्रसंगीं सहाय्य करावें असें ठरलें होतें; पण राक्षसनाथाच्या हातांत अधिकार आल्यापासून ती स्थिति पालटली आहे. राक्षसनाथाच्या अंगीं असें कांहीं एक गुप्त सामर्थ्य आहे कीं, त्यामुळें तो प्रत्यक्ष महाराजाधिराज विक्रमार्क यांनाही कस्पटाप्रमाणें समजतो अशी लोकवदंता आहे, आणि त्यामुळेंच चढून जाऊन राक्षसनाथ आजच्यासारखें अपमानास्पद, अनुचित कार्य करण्यास प्रवृत्त झाला आहे. पण या कर्माचें फळ त्यास भोगावें लागेल. वसंतदुर्गाच्या हाताखालील शूर योद्धेच हें सत्कार्य करतील. राक्षसनाथाला पकडून आणण्याचें काम माझ्या हातून होईलच हें जरी मी खात्रीपूर्वक सांगूं शकत नाहीं, तरी कुमारी कुमुदिनीची मुक्तता मात्र मी आठ दिवसांच्या आंत खात्रीनें करीन; नाहींतर

त्या कार्यांत आपलें प्राणार्पण करीन ! पण हें काळें नोंड महाराजांना दाखविणार नाहीं हें खास. याकरितां महाराजांनीं कुमारी कुमुदिनी-विषयीं अगदीं काळजी करूं नये अशी प्रार्थना आहे. " इतकें बोलून सेनापती वीरदत्त खालीं बसला.

वसंतदुर्गेश धर्मचंद्र यावर बोलला, " सेनानी आपलें म्हणणें पूर्ण करून दाखवितील यांत मुळींच शंका नाहीं. कारण त्यांची योग्यता सर्वांना ठाऊकच आहे. ईशकृपेनें त्यांच्या कामांत यश येवो म्हणजे झालें."

नंतर नवीनचंद्र म्हणाला. " वसंतदुर्गेशांचें व राक्षसनाथाचें पूर्वी-पासून काय भांडण होतें, हें जरी मला ठाऊक नाहीं; तरी आजचा प्रसंग केवळ माझ्यामुळेंच ओढवला असें मला वाटतें. "

" छे छे, नवीनचंद्र, " धर्मचंद्र मध्येंच म्हणाला, " राक्षसनाथाच्या मनांत पुष्कळ दिवसांपासून आमच्याशीं झगडा करण्याचा विचार होता. तो संधी पहात होता इतकेंच. मला यांत आश्चर्य एवढेंच वाटतें कीं, तुम्ही त्याला मुळींच जाणत नसून तो तुम्हालाच कां मागत होता ? "

हा प्रश्न ऐकतांच नवीनचंद्र क्षणभर स्तब्ध बसला. एकवार—अगदीं क्षणमात्र- एकंदर घडलेला वृत्तांत सांगावा असें त्याच्या मनांत वाटलें; पण पुनः त्यास वाटलें कीं, न जाणो कदाचित् त्या भयंकर गुप्त व अन्यायी त्रिशूलचिन्ह सभेचा एखादा सभासद या जमलेल्या मंडळींत असेल; याकरितां चुप्प बसावें हें बरें. असा विचार करून तो म्हणाला, " देवीच्या मंदिरांत उतरलों होतों त्यावेळीं आनंददुर्गेशाविषयीं मी थोडेसें तिरस्कारानें बोलल्याचें मला आठवतें खरें, पण हा कांहीं मोठा अपराध नव्हे "

" तें कसें कां असेना. " धर्मचंद्र मध्येंच म्हणाला, " तुम्ही माझे अतिथी आहांत एवढ्याचकरितां तुमचें यथाशक्ति रक्षण करणें माझें काम आहे. त्यांत माझें कितीही नुकसान झालें तरी हरकत नाहीं. "

" आणि या उपकाराबद्दल मीही यथाशक्ति सेवा करण्यास तयार आहें. " नवीनचंद्र विनयानें पुढें म्हणाला, " कुमारी कुमुदिनीच्या सुटकेचें काम सेनापतींनीं आपल्याकडे घेतलें आहेच. गर्विष्ट राक्षस-नाथाला पकडून आणण्याचें काम मी आनंदानें आपल्याकडे घेतों. "

" तुह्मी वीररत्न आहांत. " धर्मचंद्र कृतज्ञतेनें म्हणाला, " तुमच्या हातून हें काम खात्रीनें पार पडेल यांत मुळींच शंका नाहीं. पण- "

" पण वगैरे कांहीं नाहीं. " नवीनचंद्र मध्येंच बोलला, " पन्नास शूर योद्धयांना मजबरोबर येण्याची आज्ञा व्हावी म्हणजे झालें. "

" जशी तुमची मर्जी. " धर्मचंद्रानें हंसून म्हटलें व त्यानें सर्वांस जाण्यास सांगितलें. अल्प कालांत सर्व आपापल्या ठिकाणीं गेले. धर्मचंद्र महालांत निघून गेला. नवीनचंद्र सेनापतीसह दुसरीकडे गेला.

" नवीनचंद्र ! " सेनानी वीरदत्त त्यास आलिंगून म्हणाला, " तुमची माता धन्य होय ! आजचें तुमचें युद्धकौशल्य पाहून खरोखरच धन्य वाटतें ! " म्हणतां म्हणतां वीरदत्ताचे नेत्र आनंदाश्रूंनीं भरून आले. तो पुढें म्हणाला, " आजच्या तुमच्या बहादुरीबद्दल मीं तुह्मास काय बरें द्यावें ? "

" आपला आशीर्वाद ! " नवीनचंद्र गहिंवरून म्हणाला, " थोर माणसांच्या आशीर्वचनांनींच लहानांचीं सर्व कामें पार पडतात. मला इतर देणग्यांपेक्षां आशीर्वादच फार प्रिय आहे. "

" खरें आहे. " वीरदत्त नवीनचंद्राची विनयशीलता पाहून आनंद पावून म्हणाला, " सर्वांचे आशीर्वाद मिळतील अशींच कामें नेहमीं करावीत. "

थोडावेळ दोघेही स्तब्धतेनें चालूं लागले.

" आनंददुर्गाची आपणास माहिती असेल नाहीं ? " नवीनचंद्रानें मध्येंच प्रश्न केला.

" कां बरें ? आपण ह्मटल्याप्रमाणें तें काम हातीं घेणार वाटतें ? " वीरदत्तानें प्रश्न केला.

" आपणास शंकाशी वाटते ? " नवीनचंद्रानें आश्चर्यानें विचारिलें.

" शंका नाहीं वाटत; पण मला वाटलें कीं, या कामाला थोडीशी अवधी लागेल. "

" छे, अवधी कसली ? मला योग्य ती माहिती मिळाली कीं, मी क्षणाचाहि विलंब लावणार नाहीं. गर्विष्ठ राक्षसनायाचें गर्वखंडन झालेंच पाहिजे. त्यानें माझा- " नवीनचंद्रानें येथेंच आपली जीभ चावली.

वीरदत्ताचें याकडे लक्ष गेलें नाहीं. तो म्हणाला, " आपल्याला कसली माहिती पाहिजे ? "

" आनंददुर्ग व त्या भोंवतालचा प्रदेश याविषयींची माहिती इतकी बरोबर मिळाली पाहिजे कीं, त्या योगानें मला आपला पुढील एकंदर बेत बसविण्यास ठीक पडावें. "

" इतकी बरोबर माहिती देण्याची बुद्धि माझ्यांत असेल, असें मला वाटत नाहीं. " वीरदत्त हंसत हंसत उत्तरला, " तरीपण ती जशी वेडी-वांकडी मला सांगतां येईल, ती ऐकून घेऊन त्यावर तुमचें काम भाग-ण्यासारखें असल्यास पहा. "

" तसें कां होईना. " नवीनचंद्र बोलला व तो लक्षपूर्वक वीरदत्ता-कडे पाहूं लागला.

वीरदत्त पुढीलप्रमाणें आनंददुर्गाची माहिती सांगूं लागला, " आपल्या दुर्गाच्या आग्नेयदिशेस सुमारें तीन कोसांच्या टप्प्यांत आनंददुर्ग आहे. आनंददुर्ग हा एक मजबूत व विस्तीर्ण भुईकोट किल्ला आहे. किल्ल्याच्या सभोंवतीं चांगला उंच व रुंदीर तट असून त्या तटाभोंवतीं खोल खंदक आहे. खंदकांत नेहमीं स्वच्छ जल तुडुंब भरलेलें असतें. दुर्गाचा मुख्य दरवाजा दक्षिणाभिमुख असून त्यावर शोभेकरितां एक गोल घुमट बांधला आहे! याच घुमटावर आनंददुर्गेशाचें निशाण फडफड करीत असतें. "

" अरेच्या ! " नवीनचंद्र एकदम उद्गारला. त्रि. त्रि. स. पुढें त्यास ज्या किल्ल्यांत नेलें होतें त्या किल्ल्याच्या मुख्य दरवाजावर अशा प्रकारचा घुमट पाहिल्याचें त्यास आठवलें. म्हणूनच त्यास आश्चर्य वाटून त्याच्या तोंडून वरील उद्गार बाहेर पडला. त्यानें शंकित होऊन विचा-रिलें, " खंदक ओलांडून किल्ल्यांत प्रवेश करण्यास कोणतें साधन आहे? मला वाटतें सरकता पूल असावा. "

" अगदीं बरोबर ताडलेंत. दरवाजांतून आंत प्रवेश करतांच समो-रच एक उंच पाषाणस्तंभ दिसतो. "

" रात्रीं या पाषाणस्तंभावर दिवा लावतात नाहीं ? " नवीनचंद्रानें स्तंभित होऊन विचारिलें.

" हें आपण कसें ओळखलेंत ? आपण कधीं त्या दुर्गांत गेला आहांत असें वाटतें ? " वीरदत्तानें कांहींसें आश्चर्यानें विचारिलें.

आतां नवीनचंद्राची अगदीं पूर्ण खात्री झाली कीं, गेल्या रात्रीं आपणास ज्या किल्ल्यांत नेण्यांत आलें होतें तो आनंददुर्गच होय. आनंददुर्गेशानें आपणास पकडून जें मागितलें त्याचें कारणही आतां त्याच्या लक्षांत आलें. आपणास त्यानें आपल्या पंजांत पकडलें होतें; पण आयत्यावळा एका रहस्यमय व्यक्तीच्या सहाय्यानें आपण त्याच्या तडाक्यांतून-मृत्युमुखांतून-सुटलों. त्रि. चि. सभेचें मुख्य स्थान एकंदरींत आनंददुर्गांत आहे अं ? त्रि. चि. सभेचीं सूत्रें राक्षसनाथासारख्या दुष्ट मनुष्याच्या हातांत आहेत म्हणायचीं ! ठीक आहे. याचा पूर्ण शोध करून बंदोबस्त केला पाहिजे. इत्यादि विचार नवीनचंद्राच्या मनांत आले. पण लवकरच त्यानें शुद्धीवर येऊन वीरदत्तास ह्मटलें, " हं, पुढें चालूं द्या. "

त्याचें हें एकंदर वर्तन जरी वीरदत्तास चमत्कारीक वाटलें तरी त्यास कांहीं संशय आला नाहीं. तो पुढें म्हणाला, " दुर्गाच्या आंतील एकंदर व्यवस्था मोठ्या कुशलतेनें मनोहर व बंदोबस्ताची केली आहे. त्याप्रमाणें वागल्यास आनंददुर्ग खरोखरच आनंददुर्ग असून शत्रूस सहसा हार जाणारा नाहीं. पण मला वाटतें तुह्मास आंतल्या माहितीची कांहीं विशेष जरूरी नसेल. "

" आंतील माहिती जरी विशेष महत्वाची नाहीं तरी साधारण तिची जरूर असलीच पाहिजे. पण प्रथम आनंददुर्गेशाचें रूपवर्णन सांगा पाहूं?"

" हो. " वीरदत्त हंसत ह्मणाला, " नाहींतर सगळेंच मुसळ केरांत जायचें ! पण पहा बोवा, मी कांहीं कवी नाहीं; तेव्हां मला कांहीं रसभरीत वर्णन करतां येणार नाहीं. "

" मीही कांहीं रसभरीत वर्णनाचा भोक्ता नाहीं. साधारण ठोकळ बातमी समजल्या ह्मणजे झालें. " नवीनचंद्रानेंहि हंसत ह्मटलें.

" मग अगदीं साधें वर्णन ह्मटलें ह्मणजे- " वीरदत्त विनोदानें हंसत म्हणाला, " त्याला एक डोकें, दोन डोळे, दोन कान, दोन हात, दोन पाय इत्यादि आपल्याप्रमाणेंच सर्व अवयव आहेत. "

" वा ! " नवीनचंद्र हंसत म्हणाला, " या एवढ्या माहितीवर मी त्याला लाखांत ओळखून काढीन ! "

वीरदत्त पुढें म्हणाला, " राक्षसनाथ शरिरानें धिप्पाड आहे. रंग अगदीं गोरा म्हणजे अगदीं कोळशाइतका. मुद्रा क्रूर, नाक नकटें, त्या खालीं केरसुणीसारख्या मिशा, तोंडाला टाकी लागलेली, आवाज घोगरा व एकंदर गुण व कृती नांवाप्रमाणें राक्षसी आतां तर ओळखून काढाल?"

" बरें; आतां मीं जें काम हातीं घेतलें आहे, तें कोणत्या युक्तीनें पार पाडावें ? "

" ह्या बाबतींत खरें जर विचारलेंत तर तुम्हाला एकवार त्या प्रदेशांत प्रत्यक्ष फिरून आलें पाहिजे. "

" माझ्यासुद्धां मनांत तीच कल्पना आली होती. "

" आणि तुह्मीं वेषपरिवर्तन करावें हेंही हितावह आहे. "

" सोंग कशाचें घ्यावें बरें कीं, ज्यायोगें तें सुरक्षित विशेष होईल. कारण आपल्याला अनुभव बरेच आहेत. "

" या करितां आपण मग बोलूं. सध्यां मला बरीच भूक लागली आहे. आपल्यालाही लागली असेलच. आतां बराच वेळ झाला आहे. मला वाटतें, महाराज ( धर्मचंद्र ) आपली वाट पहात असतील. ध्यानांत ठेवा. तुम्ही जें काम हातीं घेतलें आहे, तें बरेंच कठीण आहे. तर तें जितकें विचारपूर्वक होईल तितकें बरें. "

नवीनचंद्रासही त्याचें हें बोलणें पटलें. लागलींच वीरदत्त आपल्या स्थानीं गेला. नवीनचंद्रही विचार करीत महालाकडे वळला.

जातां जातां वाटेवरच किल्ल्यावरील मारुतीचें देवालय होतें. त्यावरून तो जात असतां त्यास स्त्रीचें रुदन ऐकल्याचा भास झाला.तो लक्षपूर्वक ऐकूं लागला तों त्यास कोणी तरी स्त्री रुदन करीत असल्याचें आढळलें. हें कोण रुदन करीत आहे. तें पहाण्याकरितां त्यानें त्या मंदिरांत प्रवेश केला तों मूर्तीसमोर कलेची लावण्यखनी छबी हात जोडून उभी असलेली त्याच्या दृष्टीस पडली. त्या रमणीय मूर्तीला पहातांच नवीनचंद्र चकित झाला, मोहित झाला व स्तब्ध पहात राहिला ! रमणीरत्ना ! धन्य तुझी ! ! अजिंक्य वीरांना जिंकणारें असें तूंच एक ! !

## प्रकरण सहावें.

# रहस्यमय महालांत.

आनंददुर्गेशाच्या वीस पंचवीस योद्ध्यांनीं तळघरांत शिरून बलात्कारानें कुमुदिनीचें हरण केलें व तिला वसंतदुर्गाच्या बाहेर नेऊन एका मेण्यांत बसविलें. एवढें होईपर्यंतच कुमुदिनी शुद्धिवर होती. त्यानंतर पुढें काय झालें हें तिला मुळींच समजलें नाहीं या अकस्मात् आलेल्या संकटानें तिच्या कोमल हृदयावर असा कांहीं परिणाम केला कीं, त्यायोगें ती कितीवेळ तरी बेशुद्ध स्थितींत होती. अशा प्रकारें ती कितीवेळ त्या स्थितींत होती; हें तिला मुळींच समजलें नाहीं. शुद्धींत आल्यावरसुद्धां तिनें बऱ्याच वेळानें आपले नेत्र उघडले तों तिला कला—तिची प्रिय सहचरी—आपल्या बिछान्याजवळ उभी राहून विस्मयानें आपलें मुख पहात असल्याचें आढळलें ! तिला आश्चर्य वाटलें ! पुनः तिनें आपले नेत्र बंद केले. अद्यापिहि तिचें मस्तक भ्रमण करीत होतें. एकंदर घडलेल्या गोष्टी तिला स्वप्नवत् भासूं लागल्या ! कला आपल्याकडे इतक्या आश्चर्यानें कां पहात उभी होती; असें तिला वाटलें व त्याचें कारण तिला विचारावें, असा विचार करून तिनें पुनः आपले नेत्र उघडले तों भलताच प्रकार तिच्या नजरेस पडला ! आपण आपल्या नेहमींच्या महालांत नसून दुसऱ्याच—अगदीं अपरिचित् अशा—महालांत एका सुसज्जित पलंगावर असल्याचें तिला आढळलें ! हें काय ? अद्यापिहि आपण स्वप्नांत आहोंत काय ? असाच विचार कुमुदिनीच्या मनांत आला. ती पलंगावर उठून बसली व लक्षपूर्वक सभोंवतालची प्रत्येक वस्तु पाहूं लागली. आपण स्वप्नांत आहोंत कीं, एखादा विचित्र जादूचा खेळ पहात आहोंत, याचा तिला उलगडा पडेना व त्याचमुळें तिला सर्व वस्तूंचें लक्षपूर्वक परीक्षण करण्यास बराच वेळ लागला. परीक्षण संपल्यावरसुद्धां ती वेड्यासारखी इकडे तिकडे पहात होती. थोड्यावेळानें तिनें आपलें मस्तक दोन्ही हातांनीं दाबून व आपलें मन स्थिर करून ती एकेक गोष्ट आठवूं लागली. एके दिवशीं

तिसऱ्या प्रहरीं आपण आपल्या दोन मैत्रिणींसह आपल्या महालांत बसलों होतों, इतकें तिला आठवलें; पण त्या गोष्टीला किती दिवस झाले, किंवा ती आजचीच गोष्ट आहे हें तिला आठवेना. यापुढील एकेक गोष्ट तिला स्पष्टपणानें आठवूं लागली. आपल्या गोष्टी चालल्या असतां एका दासीनें शत्रु आल्याची वातमी दिली. मागून आपला बाप आला. त्याच्या सांगण्यावरून आपण तळघरांत जाऊन बसलों. थोड्या वेळानें तळघरांत कांहीं शिपाई शिरून, त्यांनीं आपणास पकडलें व एका मेण्यांत नेऊन ठेविलें इत्यादि घडलेल्या सर्व गोष्टी तिला पूर्णपणें आठवल्या; पण या सर्व गोष्टी खऱ्याच घडल्या कीं, आपण तें स्वप्नांत पाहिलें याचा तिला उलगडा होईना. जर स्वप्न म्हणावें तर अद्यापिहि आपण स्वप्नावस्थेंतच आहोंत, असें दिसतें व जर खरें घडलें म्हणावें, तर आपणास कुठें आणिलें आहे ? अशाप्रकारचे कितीतरी भ्रमिष्ट विचार तिच्या मनांत आले. अकस्मात् 'राक्षसनाथाच्या महालांत तर आपणास आणिलें नाहीं ?' असें तिला वाटलें. विचारांतीं तिला हीच गोष्ट खरी वाटली; पण त्या शिपायांनीं आपणास एकटीलाच आणिलें होतें. मग कलेला आपण जें मुकेनेंच पाहिलें, तें खरें कीं खोटें ? कीं आपल्याप्रमाणें कलेलाही पकडून आणिलें आहे ? कदाचित् तसेंच असलें पाहिजे. नाहीं तर कला अशा पर ठिकाणीं कशी येऊं शकेल? असा विचार करून ती पलंगावरून खालीं उतरली व बाहेर जाण्याकरितां मार्ग पाहूं लागली. समोरच एक बंद दार तिला दिसलें व ती हळूंच त्या दाराजवळ गेली. तिनें तें उघडण्याचा प्रयत्न केला; पण तें बाहेरून कोणीतरी बंद केलेलें तिला आढळलें. आतां काय करावें ? आपण इथें कैदी तर नाहीं ? अशी तिला शंका आली. थोडा-वेळ ती थांबली. नंतर तिनें मोठ्यांदा "कले, अग कले !" अशा तीन चार हाका मारिल्या; पण कोणींही उत्तर दिलें नाहीं. अखेरीस निराश होऊन तिनें तो महाल तपासण्यास सुरवात केली.

ज्या महालांत कुमुदिनी सध्यां बंद होती, तो महाल चांगला प्रेक्षणीय होता. यावेळीं प्रहररात्र झाली होती. महालांत दोन्ही बाजूंस दोन सुगंधित तेलाचे दीप स्वच्छ प्रकाशानें तेवत होते. त्यामुळें कुमुदिनीस तेथील प्रत्येक वस्तु लक्षपूर्वक व स्पष्टपणें पहाण्यास मुळींच

अडचण पडली नाहीं. ज्या पलंगावर कुमुदिनी निजली होती, अथवा ज्यावर तिला निजविण्यांत आलें होतें तो उत्तम व मजबूत लाकडाचा बनविला असून त्यावर मऊ परांची गादी हांतरली होती. त्या पलंगाशिवाय कलावतूचें उत्तम काम केलेले व मोठ्या कुशलतेनें मखमलीनें मढविलेले दोन कोच व चार खुर्च्या तेथें ठेविल्या होत्या. त्याच खुर्च्याजवळ एक विस्तीर्ण वर्तुलाकार मेज असून त्यावर भोजनाची सामुग्री, फळफळावळें मोठ्या व्यवस्थेनें मांडण्यांत आलीं होतीं. सर्व महालांत जमिनीवर मऊ व चित्रविचित्र गालीचा हांतरला होता. भिंतीवर ठिकठिकाणीं मनोहर चित्रपट रेखाटले होते. महालांत हवा येण्याकरितां दोन चार वातायनें होतीं; पण तीं बंद केलीं होतीं. त्यावर उत्तम रक्त गजनीचे पडदे सोडिले होते. एकंदरींत तो महाल कोणातरी विलासी मनुष्याचें शयनगृह असावें, असें वाटत होतें; पण प्रत्येक वस्तुवर धूळ चढलेली पाहून व ती नुकतीच कोणीतरी झाडून साफसूफ केल्यामुळें बऱ्याच दिवसांपासून किंबहुना महिन्या—वर्षा—पासून तो महाल वापरण्यांत येत नसावा, असें कुमुदिनीस वाटलें. थोड्याच वेळानें तिचें महाल पहाणें संपलें. इतका वेळ झाला तरी अद्याप कोणी माणूस कसा येत नाहीं याचें कुमुदिनीस आश्चर्य वाटलें. पुनः तिनें "कले, अग कले! इथें कोणीच कां नाहीं?" इत्यादि मोठ्यानें ओरडून म्हटलें; पण ज्याचें नांव तें! कोणीही तिच्या ओरडण्यास उत्तर दिलें नाहीं! आतां मात्र कुमुदिनीस एकप्रकारची भीति वाटूं लागली व आपण कलेला पाहिलें तें खरें कीं भास! अशी शंका आली. जर खरें म्हणावें तर मग ती आपणास सोडून गेली कुठें? बरें, भास म्हणावा तर तेंही मनास पटत नाहीं. इत्यादि विचार करीत ती उभी असतां एकाएकीं तिला भिंतीवरील चित्रें पहाण्याची इच्छा उत्पन्न झाली, म्हणून ती क्रमशः एकेक चित्र पाहूं लागली.

कुमुदिनीसारख्या कोमलचित्त बालिकेवर अशाप्रकारचें संकट आलें असतां, पुढें याचा परिणाम काय होणार, याची जिला यत्किंचितही कल्पना करतां आली नाहीं, जिचें मन नानाप्रकारच्या दुःखद विचारांनीं भरून गेलें आहे, अशा प्रकारची सर्वस्वी शोचनीय स्थिति प्राप्त झाली असतांही कुमुदिनीस त्यावेळीं भिंतीवरील चित्रें पाहण्याची

इच्छा व्हावी, हें आश्चर्यच नव्हे का ? पण कांहीं कांहीं प्रसंगीं मनुष्याचें मन चिंतातुर असतांही त्यास एखादी विलक्षण इच्छा उत्पन्न होते. मग ती इच्छा आपोआप होवो, अगर आपलें मन ओढून ताणून दुसरीकडे लावण्याकरितां त्यानें उत्पन्न केलेली असो. एवढें मात्र खरें कीं, एखाद्या संकटप्रसंगीं सुद्धां मनुष्यास एखादी गोष्ट करण्याची इच्छा उत्पन्न होते व ती पूर्ण करून घेण्यास तो तशा प्रसंगींही उद्युक्त होतो. यावेळची आमच्या कथानायिकेची अशीच स्थिति होती. कदाचित् आपला वेळ काढण्याकरितां तिनें चित्रें पाहण्यास सुरुवात केली असेल. कसेंही असो. ती प्रथम ज्या चित्राजवळ उभी होती, त्या चित्राचा विषय 'विषया व चंद्रहास' हा होता. चित्रपट बराच मोठा होता व चित्रांत दाखविलेलें एकंदर दृश्य चित्ताकर्षक व मनावर ठसण्यासारखें होतें. विषयेच्या पुष्पवाटिकेंतील एका वटवृक्षाखालीं चंद्रहास स्वस्थ निजला आहे. जवळच त्याचा अश्व बांधलेला आहे. अकस्मात् विषया सहल करण्याकरितां आली असतां परपुरुषाला—चंद्रहासाला—आपल्या पुष्पवाटिकेंत पाहून व त्याच्या अनुपम सौंदर्यानें मोहून तिची झालेली मुग्ध स्थिति इत्यादि गोष्टी चित्रकारानें अशा खुबीनें त्या चित्रांत दर्शविल्या होत्या कीं, मनुष्यानें पहातच रहावें. त्या चित्राकडे पाहून कुमुदिनी थोडावेळ आपली स्थितीही विसरून गेली. विषया व चंद्रहास ' यांची विवाहकथा कुमुदिनी जाणत होती व त्यामुळेंच तिनें विषयेशीं आपली तुलना करण्यास सुरवात केली. ती स्वतःलाच उद्देशून मनांत ह्मणाली, " विषया एका मांडलिक राजाची कन्या होती व आपणही एका मांडलिक राजाचीच कन्या आहों. विषयेला चंद्रहासाची कांहीं माहिती नसतां, तिनें आपणास चंद्रहास पती मिळावा ह्मणून शालिग्रामाची प्रार्थना केली व नुसत्या सौंदर्यावर भुलून चंद्रहासाला आपलें मन देऊन टाकिलें, त्याप्रमाणेंच आपल्यालाही विमलचंद्राविषयीं कांहीं माहिती नसतां केवळ त्याच्या सौंदर्याला मोहित होऊनच आपण आपलें तनमन त्यास देऊन चुकलों. विषयेला चंद्रहासाचें प्रथम दर्शन बागेंत घडलें, आपल्यालाही विमलचंद्राचें पहिलें दर्शन बागेंतच घडलें. विषयेचा चंद्रहासाशीं झालेला विवाह तिच्या बापास पटला नाहीं व विमलचंद्रावर आपण अनुरक्त असल्याचें आपल्या

पित्यास स्वपन नाहीं. इत्यादि किती तरी बाबतींत आपलें व विषयेचें चरित्र जुळतें आहे. पण विषया अखेरीस आपल्या इच्छित पतीला वरून सुखी जाहली, आपलीही ती इच्छा तशीच पूर्ण होईल काय ?" इत्यादि विचार करीत ती त्या चित्रपटाजवळ बराच वेळ उभी होती. अखेरीस विचार करकरून मनाला त्रास होतो हें पाहून ती दुसऱ्या चित्राकडे वळली. दुसरें चित्र 'मदनरतीचा द्यूत विनोद' हें होतें. पहिल्या चित्राप्रमाणेंच हेंही चित्र पहाण्यासारखें होतें. सौंदर्यखनी रतीनें द्यूत खेळून सगळ्या जगाला त्राही भगवान् करणाऱ्या आपल्या पतीस जिंकल्याचें त्या चित्रांत रेखाटलें होतें. विजयामुळें रतीच्या मुद्रेवर आलेली अभिमानास्पद स्मिताची छटा, मदनाचें आपल्या प्रेयसीकडे प्रेमदृष्टीनें पहाणें इत्यादि भाव फारच मनोहर वठविले होते. हें चित्र पाहून झाल्यावर ती तिसऱ्या चित्राकडे वळली. तिसरें चित्र 'स्त्रीवेषधारण' हें होतें. श्रीरामचंद्र सीतेशीं द्यूतांत हरल्यामुळें पणाप्रमाणें त्यांना स्वपत्नीच्या हस्तें स्त्रीवेष धारण करावा लागला, असा चित्राचा विषय होता. स्वहस्तें पतीस आपला पोषाख चढवितांना सीतेस येत असलेलें अनावर हंसूं व त्यामुळें तिच्या मुद्रेवर आलेली रमणीयता, समोरील आदर्शांत आपलें स्त्रीवेषांतील रूप पाहून श्रीरामचंद्रास येणारें हास्य इत्यादि भाग चांगलाच मनोरंजक होता. त्यानंतर ती ज्या चित्राकडे वळली, तें 'चंद्रसेनेचा प्रणयभंग' हें होतें. अगदीं आयत्या वेळीं पर्यंकछेदन झाल्यामुळें चंद्रसेनेची झालेली निराशा, भक्ताच्या वरामुळें विलक्षण संकटांत सांपडलेल्या श्रीरामचंद्राचें वेळेवर संकट-मोचन झाल्यामुळें त्यांची झालेली आनंदी मुद्रा व त्यांतच प्रणयभंगा-मुळें चंद्रसेनेची झालेली विव्हल स्थिति पाहून त्यास झालेलें दुःख इत्यादि भाग फारच मनोरम उतरला होता. त्यानंतर ती 'लक्ष्मण व उर्मिळा' या चित्राकडे वळली. लक्ष्मण आपल्या प्रिय पत्नीजवळ—उर्मिळेजवळ—श्रीरामचंद्राबरोबर वनवासांत जाण्याकरितां आज्ञा मागत आहे; पतीच्या इच्छेप्रमाणें वागणारी सुशील उर्मिळा स्वपतीचा चवदा वर्षे विरह होणार हें पाहून दुःख करीत असल्याचा देखावा चितान्यानें इतक्या उत्तम तऱ्हेनें रेखाटला होता कीं, पाषाणहृदयी पुरुषासही त्या चित्राकडे पाहून पाझर फुटावा. चित्रपटावरील त्या दोघा पतिपत्नींच्या

मुद्रेवरील चिंतान्यनें उठविलेले हृदयद्रावक विकार पाहून कुमुदिनीचे नेत्र अश्रूंनीं भरून आले.

अशा प्रकारें तिनें आणखी दोन तीन चित्रें पाहून चित्रें पाहण्याचें सोडून दिलें व ती पुनः पलंगावर जाऊन बसली. ती जागी झाल्यापासून आतांपर्यंत सुमारें तीन चार घटका काळ लोटला असेल; पण अद्यापपर्यंत तिच्याकडे कोणीही आलें नाहीं, याचें तिला फारच आश्चर्य वाटलें. जोंपर्यंत ती चित्रें पहात होती तोंपर्यंत तिला स्वस्थितीचें जवळ जवळ विस्मरणच पडलें होतें म्हणण्यास हरकत नाहीं, पण तें दुःस्थितीचें विस्मरण केवढा वेळ टिकणार ! ईश्वरानें मनुष्याच्या मनाची रचना तरी किती चमत्कारिक बनविली आहे ? ज्या गोष्टीचें मनुष्यास विस्मरण पडावेंसें वाटतें, त्याचें कधींही विस्मरण होत नाहीं; पण जी गोष्ट नेहमीं आपल्या स्मृतिपथांत असावी, असें मनुष्यास वाटतें, त्याची स्मृति रहाणें मोठें कठीण ! कुमुदिनीला स्वस्थितीची क्षणिक काळच आठवण नव्हती; पण तो क्षण निघून जातांच पुनः तिच्या मनांत दुःख, चिंता, भय, आश्चर्य इत्यादि विकारमिश्रित विचारांचें तुंबळ युद्ध सुरू झालें !

एका तत्ववेत्त्यानें म्हटलें आहे, ‘ सुख किंवा दुःख मनुष्यास प्राप्त झालें असतां, तो मानतो तितकें तें नसतें. ’ हें खरें आहे. सौख्यकालाच्या मानानें पहातां दुःखकाल हा कांहीं विशेष समयपर्यंत टिकणारा असतो, असें कांहीं नाहीं आणि पुष्कळ वेळां तर दुःखकाळ फारच थोडा असतो; पण तेवढा अल्पकाळसुद्धां मनुष्यास इतका दुःसह होतो कीं, त्यांत धैर्यानें निभावून जाणारे फारच थोडे ! मग आमच्या नायिकेची कथा काय ?

पुनः थोडावेळ गेला. तरीही कोणी आलें नाहीं. या महालांतून बाहेर पडण्यास दुसरा एखादा रस्ता तर नसेल ? अशी कुमुदिनीस शंका आली. दुसरा एखादा रस्ता असल्यास पहावा, या हेतूनें ती उठली तों पलंगाच्या उशागतीं जवळच असणाऱ्या भिंतीवर एक लाल पडदा सोडलेला तिला दिसला. त्या पडद्याकडे पाहून कुमुदिनीस मोठेंच आश्चर्य वाटलें ! हा नवीन पडदा तेथें कोठून आला, असें तिला वाटलें. पण ती तिची समजूत चुकीची होती. तो पडदा पूर्वीपासूनच तेथें होता.

त्यावेळीं तिनें महालांतील सर्व वस्तु पाहिल्या त्यावेळीं ती आपल्या पलंगाच्या सभोंवतालच्या वस्तु पहाण्यास अगदीं विसरली होती एवढेंच. असो. आश्चर्य करीतच ती त्या पडद्याजवळ गेली. काय असेल तें असो पडदा उघडतांच आपणास कांहीं तरी अद्भुत प्रकार दृष्टीस पडणार असें कुमुदिनीस वाटूं लागलें व तिनें भीतभीतच पडद्यास हात घातला व तो बाजूला सारला, तों काय आश्चर्य ! ! तिची सहचरी कला एका तरुणपुरुषाच्या हातांत हात घालून उभी असलेली तिच्या दृष्टीस पडली ! आश्चर्य व भीति या दोन विकारांनीं कुमुदिनी अगदीं गोंधळून गेली ! तिच्या हातांतून तो पडदा सुटला ! तो विलक्षण देखावाही तिच्या दृष्टीआड झाला. त्यावेळची तिच्या मनाची स्थिति कल्पनेनेंच ताडली पाहिजे ! आपण पाहिला तो प्रकार खरा कीं निव्वळ भास ? पण कला इथें कुठून आली व तो तरुण कोण ? आणि तीं दोघे त्या पडद्याआड कां उभीं आहेत ? इत्यादि कितीतरी चमत्कारिक विचार तिच्या मनांत आले. पुनः तो पडदा बाजूला करून आपला संशय निवारण करून घ्यावा, असें तिला वाटलें; पण तो पडदा पुनः बाजूला करण्याचें तिला धैर्य होईना. अशाप्रकारें द्विधामनानें ती त्या पडद्याकडे पहात उभी असतां, त्या महालाचें बाहेरून लावून घेतलेलें दार कोणीं तरी हलकेंच उघडीत असल्याचा कुमुदिनीस भास झाला. ती दाराकडे वळली व आश्चर्यानें तिकडे पाहूं लागली ! क्षणांत दार उघडलें गेलें व एक वृद्धा आंत आली.

" ताईसाहेबांची निद्रा पुरी झाली म्हणायची ? " म्हातारीनें किंचित् हसून विचारलें, " कांहीं दुःख तर झालें नाहीं ? "

त्या म्हातारीच्या या प्रश्न विचारण्याच्या आवाजावरून कुमुदिनीनें तिची किमत तेव्हांच ताडली व तिला किंचित् चाईटही वाटलें. तिनें हलकेंच प्रश्न केला " मला कुठें आणली आहे वर ? "

" हं:, मोठ्ठंच आश्चर्य ? " ती आपला एक हात कमरेवर ठेवून व दुसरा आपल्या पुढें आलेल्या हनुवटीवर ठेवून आश्चर्य करीत म्हणाली " आपल्याला कुठें आणलं आहे, हें आपणास समजलं नाहीं ? मोठ्ठंच आश्चर्य म्हणायचं ! ज्या महालांतील सौख्यापुढें स्वर्गांतील इंद्रसौख्यही फिकं पडेल, ज्या महालांत रहाण्याकरितां मोठमोठ्या राज-

कन्यांनींही आशा करावी, ज्या महालांतील शृंगार पाहून मदनाच्या शृंगारीत महालांनीं खालीं माना घालाव्यात, त्याच भूलोकावरील साक्षात् स्वर्गांत आपणास आणिलें असतां, आपण ' मला कुठें आणलं आहे ? ' ह्मणून दुःखानं प्रश्न करावा, याचं मला तरी निदान आश्चर्य वाटतं ! "

त्या म्हातारीचें हें वर्णनात्मक उत्तर ऐकून कुमुदिनीस किती समाधान वाटलें असेल, याची कल्पनाच केली पाहिजे. तिनें चकित होऊन त्रासून विचारलें, " पण हा महाल कुणाचा ? आणि मला कां येथें आणिलं ? "

" महाल कुणाचा ? " म्हातारी तिच्या मुख्य प्रश्नाकडे दुर्लक्ष्य करून ह्मणाली, " महालपण महाल ! इथले हे सुगंधित तेलाचे दिवे, भिंतीवरले मनोरम चित्रपट, जमिनीवर पसरलेले पराचे नरम रुजामे, तो भव्य पलंग, ते सुंदर कोच व इतर सर्व शृंगार आपल्यास काय क्षुल्लक वाटतात ? "

" हे सर्व पदार्थ अत्यंत अमूल्य आहेत, हें मी सुद्धां कबूल करत्यें ! " कुमुदिनी त्रासून ह्मणाली, " पण हे सर्व पदार्थ कुणाचे ? याचा मालक कोण ? "

म्हातारी मध्येंच ह्मणाली, " मालकाशीं तुह्माला आतांच काय करायचं ? आतांपासूनच त्यांना भेटण्याची इच्छा झाली कीं काय ? बरोबरच आहे— " म्हातारी हलकेंच हंसत ह्मणाली, " विलासीमहालांत विलासी पुरुष जवळ पाहिजे खरा ! "

म्हातारी आणखी किती जरी बडबडती, तरी कुमुदिनीस त्याचें कांहींच वाटलें नसतें. तिच्या प्रश्नाला तिनें योग्य उत्तर दिलें नसतें तरी कुमुदिनीस पुरवतें, पण म्हातारीच्या वरील बोलण्यांतील शेवटलें वाक्य तिला इतकें झोंबलें व तें अश्लिल वाक्य ऐकून इतका संताप आला कीं, तिनें ताडदिशीं त्या म्हातारीचें मुस्कट रंगविलें व म्हातारीही गाल चोळीत खोलीच्या बाहेर निघून गेली. कुमुदिनीनें दार लावून घेतलें व आंतून कडी लाविली. बिचारी कुमुदिनी पुनः पलंगावर जाऊन पडली. किती वेळ तरी ती अश्रु ढाळीत पडली होती. पुनः ती पलंगावर उठून बसली. सहज तिची नजर त्या पडद्यावर गेली. पुनः तो पडदा बाजूला सारून त्याच्या आड पाहिलेला पूर्वीचा चमत्कारिक देखावा पहावा, असें तिला वाटलें व ती त्या पडद्याजवळ गेली.

---

## प्रकरण सातवें.

# वसंतदुर्गांतून प्रयाण.

मनुष्याच्या आयुष्यक्रमांत कांहीं कांहीं वेळा अशा असतात कीं, त्यावेळीं त्याला स्वस्थता अशी मुळींच वाटत नाहीं. त्याचें चित्त इतकें उदास होतें, त्यास आपल्या आयुष्याचा इतका कंटाळा येतो कीं, काय करावें, कोणत्या कारणानें आपलें मन इतकें उदास झालें आहे, काय केलें असतां आपली अस्वस्थता नाहींशी होईल, इत्यादि कशाचाही त्यास उलगडा पडत नाहीं. त्यामुळें तो अगदीं वेड्यासारखा होऊन जातो. कोणत्याही गोष्टीचें सुख असें त्यास वाटत नाहीं. त्यामुळें इतर जग त्यास हंसतें. त्याचें त्यास आश्चर्य वाटतें. जगांतील चाललेला आनंद त्यास असह्य होतो. कारण जग हंसत असतें व तो रडत असतो. जगाची रहाटी अबाधित आहे. जग व्यक्तीचा विचार करीत नाहीं, व्यक्तीला जगाचा विचार करावा लागतो. एखाद्याला अत्यंत आनंद झाला काय, अथवा एखाद्याला अत्यंत दुःख झालें काय, जगाला दोन्ही प्रकार सारखेच. जग त्या व्यक्तिशः आनंदाचा किंवा दुःखाचा विचार करीत नाहीं. जगाचें ध्येयही तेंच व कर्तव्यही तेंच 'पुढें-पुढें.' कोणाचें कांहींही होवो जग कांहीं मागें उलटून पहात नाहीं!

राक्षसनाथानें कुमुदिनीला पळवून नेल्याला आज तीन दिवस झाले! वृद्ध धर्मचंद्राला असह्य मानसिक वेदना होत होत्या. त्याला अन्न गोड लागत नव्हतें. त्याची अवस्था मरणोन्मुख झाली होती; पण जगाचा व्यवहार अडून राहिला होता कां? मुळींच नाहीं. जग धर्मचंद्राच्या दुःखाचा विचार करीत नव्हतें. धर्मचंद्राला मात्र आपलें दुःख बाजूला ठेवून जगाच्या प्रवाहाबरोबर जावें लागत होतें. कुमारी कुमुदिनीच्या दोन्ही सख्या कमलिनी व कला यांचीही स्थिति अशीच होती. दोघींचेंही कुमुदिनीवर अकृत्रिम प्रेम होतें. मात्र दोघींच्या मनांची स्थिति एक नव्हती. कलेला दुःख होत असें; पण तें असह्य नव्हतें. जगांतील आनंद तिच्या आनंदी मनाला विघ्न करीत नव्हता. उलटा तिचा

आनंद द्विगुणित होत होता. आपली हास्यमुद्रा पाहून जग हंसत आहे; असें तिला आजकाल वाटूं लागलें होतें. तिच्या आनंदी स्वभावामुळें तिला असें वाटत असेल किंवा दुसरीहि कांहीं कारणें असतील. एवढें मात्र खरें कीं, कुमुदिनीचा विरह तिला इतका असह्य झाला नव्हता. कलेच्या अगदीं उलट कमलिनीची स्थिति होती. कुमुदिनी गेल्यापासून तिला दुःख तर होत होतेंच; पण काल रात्रीपासून तिचें मन इतकें उदास झालें होतें कीं, कोणत्याही गोष्टीचें तिला सुख म्हणून वाटेना. या प्रकरणाच्या आरंभीं सांगितल्याप्रमाणेंच तिची स्थिति झाली. आणि अशी स्थिति होण्याचें कारण काय, हें तिचें तिलाच समजत नव्हतें. वसंतदुर्गांतून निघून दुसरीकडे कोठेंतरी जावें अशी तिच्या मनानें उचल खाल्ली आणि त्याप्रमाणें कोठें जावयाचें हें तिनें ठरविलेंही. तिला कोणीसें असें सांगितलें होतें कीं, वसंतदुर्गाच्या जवळ दीड दोन कोसांवर एक रमणीय व अगदीं एकांत असें अरण्य असून त्यांत एक शंकराचें देवालय आहे. हें देवालय चांगलें जागृत स्थान असून तेथें दररोज शंकराची आपोआप पूजा होत असते, अशीही वदंता तिनें ऐकली होती. तर तो चमत्कार आपण तेथें जाऊन पहावा. एक दोन दिवस त्या देवालयांत राहून शिवपूजनांत वेळ घालवावा व नंतर चित्तास जरा शांती मिळाल्यावर परत वसंतदुर्गांत यावें. तोंपर्यंत सेनानी वीरदत्त प्रतिज्ञेप्रमाणें कुमुदिनीला सोडवून आणतीलच. असा विचार कमलिनीनें ठरविला व संधी साधून हलकेंच तो विचार कलेस कळविला. तें ऐकून कलेला फार आश्चर्य वाटलें. ती ह्मणाली, " मला नाहीं बाई हें बरं वाटत. महाराज काय ह्मणतील बरं ? "

" महाराजांना सांगायला जातय कोण ? "

" ह्मणजे ? " कलेनें आश्चर्यानें विचारिलें, " त्यांना विचारल्यावांचून का तूं जाणार ? "

" दोन दिवसाकरितां त्यांना काय विचारायचं आहे ? मी गेल्यावर त्यांनीं विचारलंच तर तूं समजावून सांग ह्मणजे झालं. खरं जर विचारशील कीं नाहीं कले, तर इथें रहाणें ह्मणजे माझं मरण आहे. " कमलिनीनें दुःखानें म्हटलें. तिचा तो त्या वेळचा आवाज इतका कारुण्यजनक होता कीं, कलेला जितकें दुःख झालें, तितकेंच आश्चर्यही पण वाटलें.

ती दुःखानें ह्मणाली, " तुझं मन इथें राहण्याविषयीं इतकं विटाव याचं आश्चर्य वाटतं. "

" खरंच. अशी स्थिति कशानं झाली, हें माझं मलाच सांगतां येईल कीं नाहीं कोण जाणे ! थोडचा काळापुरतं का होईना; पण मला दुसरीकडे कुठें तरी जाऊं दव. मग सांग, जाऊं ना मी ? "

" गडे, तूं गेल्यावर मग मला इथें कसं करमणार बरं ? "

" खरं. पण त्याला माझा उपाय नाहीं. " कमलिनी दुःखानें पुढें ह्मणाली, " एवढं कर कीं, मी गेल्यावर कोणीं कांहीं विचारल्यास त्यांना नीट समजावून सांग. "

" तें खरं, पण मग मलाही कां नेत नाहींस ? " कला केविलवाण्या स्वरानें ह्मणाली. तिचे नेत्र अश्रूंनीं भरून आले.

" छे. छे, तुझी व माझी गोष्ट अगदीं निराळी आहे. " कमलिनी कांहींशा उदासीनतेनें ह्मणाली, " जगांतील सौख्य उपभोगण्यास तुला अद्याप संधी आहे. तूं कुमारी आहेस. तुझं संसाराविषयीं मन विटण्यास कांहीं कारण नाहीं. हें आनंदी जग सोडून तूं माझ्याबरोबर अरण्यवासिनी होण्याची इच्छा कां करतेस ? आणि मी तरी बाहेर राहणार किती दिवस ? सारी दोन दिवस. फार झालं तर चार दिवस. मग तुला त्याचं एवढं काय वाटावं ? "

अखेरीस कमलिनीनें पुष्कळ विनवणी करून, समजाऊन कलेची परवानगी तर घेतली. दुसरे दिवशीं पहाटे तिनें प्रवासाला योग्य तें सामान व खाण्यापिण्याच्या जिनसा बांधून घेतल्या व ती वसंतदुर्गांतून बाहेर पडली. दुर्गांतून बाहेर पडण्याविषयीं तिनें योग्य तो बंदोबस्त पूर्वींच केला असल्यामुळें तिला कोणीं रोखलें नाहीं. ती निर्विघ्नपणें दुर्गांतून बाहेर पडली.

सूर्योदय होण्यास आतां फारसा अवकाश नव्हता. पूर्व दिशेनें ताम्रवस्त्र सोडून पीतवस्त्र केव्हांच धारण केलें होतें व तेंही सोडून शुभ्र वस्त्र धारण करण्याच्या ती अगदीं बेतांत होती. दिनकराची स्वारी लवकर येणार ह्मणूनच कीं काय, अरुणोदयानें प्रथम येऊन आकाशमार्ग साफ करून ठेविला होता. त्यामुळें निशाकालीं रजनीनाथाच्या स्वागतार्थ उधळलेलीं तारारूपी मानिपुष्पें आकाशमार्गावर दिसत नव्हतीं.

आकाशमार्ग एका धवलवस्त्रानें आच्छादिलेला भासत होता. या-वेळीं निसर्गसुंदरीही कांहीं चुप्प बसली नव्हती. तीहि आपल्या सकळ रमणीय वस्तूंसह लवकरच अवतीर्ण होणाऱ्या बालार्काचें स्वागत करण्यास सज्ज होती. रमणीय अरण्यवासी स्वेच्छाविहंगगण आपल्या विचित्र स्वरांत मधुर आलाप घेत होते. त्यांतच मधुलुब्ध भ्रमरांचा मंजुगुंजारव संमिलित झाला होता. उंच उंच गगनचुंबित वृक्ष आपल्या शाखाप्रशाखा हवेंत इतस्ततः सोडून निस्तब्धपणें उभे होते. नानाप्रकारच्या कुसुमभारांनीं लवलेल्या लता–यौवनभारानें पिडित झालेली तरुणी ज्याप्रमाणें आपलें कोमल कर आपल्या प्राणेशाच्या स्कंधावर ठेवून उभी असते त्याप्रमाणें–आपले कुसुमालंकृत कर आपल्या जवळच्या वृक्षशाखेवर टाकून उभ्या होत्या. अशाप्रकारें जरी त्या लता आपल्या प्राणेशाच्या आधारानें उभ्या होत्या, तरी प्रातःकालचा मंद व शीतल समीर त्यांना कांपवीत त्यांच्यापासून बलात्कारपूर्वक कुसुमगंध लुटीत होता व दशदिशा फेंकीत होता. या समीरकंपनामुळें त्या लतांचे कोमल पल्लव हलत होते व त्यावर असणारे दंवबिंदु वरच्या पानावरून खालच्या पानांवर, त्या पानांवरून त्याच्या खालच्या पानांवर टपटप गळत होते. जणुं काय आपल्या या अधःपतनावरून ते दंवबिंदु वैभवशिखरावर असणाऱ्या मनुष्याला उपदेशच देत होते कीं, ' बाबारे ! आपल्या वैभवाचा अहंकार धरूं नको. क्षणापूर्वी आम्ही कोमल लतापल्लवांवर चमकून मुक्ताफळांना लाजवीत होतों; पण क्षणार्धांत तो काळ निघून गेला व तें आमचें वैभव नष्ट झालें ! मनुष्यप्राण्या, तुझेंही वैभव असेंच क्षणिक आहे ! तें नष्ट होण्यास, तुझें अधःपतन होण्यास वेळ नाहीं. मग तूं कां बरें अहंमन्य असावेस ? ' पण या निसर्ग उपदेशाकडे कोण लक्ष्य देतो बरें ? असो. अल्पकालांत क्षितिजावर रविबिंब दिसूं लागलें. आकाशांत उज्वल पण सौम्य व रम्य प्रकाशाच्या लाटांवर लाटा उसळूं लागल्या. प्रतिक्षणीं विहंगांचा कलकल आरव वाढूं लागला. सुगंधयुक्त शीतल समीर मंद गतीनें वाहूं लागला. वृक्षगण आपल्या प्रियतम लतांसह शिरकंपन करून बालरवीचें स्वागत करूं लागले. आणि या सर्व आनंदमय साम्राज्यांत मधुकर गणांनीं आपला वीणा विनिंदित गुंजारव मीलित

करून त्यास बहार आणून सोडिली. आरक्त रविबिंब, उज्वल पूर्व-दिशा, स्वच्छ आकाशपट, आरण्यवासी विहंग, उंच उंच वृक्ष, त्यांच्या आधारभूत लता इत्यादि सर्व वस्तु हंसत होत्या. प्रकृतीदेवीचें हें रमणीय हास्य दशदिशा उसळून राहिलें होतें. जगूं काय उदासीन झालेल्या कमलिनीला उत्साह देण्याचा, तिच्या दुःखी मनाला आनंद-मय करण्याचा प्रत्येक वस्तूनें निश्चयच केला होता. प्रकृतीनें आपलें रमणीय वस्तूंचें प्रदर्शनच मांडिलें होतें; पण तें पाहिल्यापासून कमलि-नीस व्हावा तसा आनंद झाला नाहीं. तिच्या उदासीन मुद्रेवर हास्याची झुळुक दिसली खरी; पण ती क्षणिकच ! हें पाहून वाचकांप्रमाणे प्रकृती-देवीसही आश्चर्य वाटलें. ती क्षणभर स्तब्ध बसली; जगूं काय, आपल्या या सौंदर्यांत कोणत्या गोष्टीची वाण आहे, हेंच ती पहात असावी. अकस्मात् कुसुमगंधानें दर्वळलेल्या वातावरणांत मंद, मंजूळ व मोहक वंशीध्वनि उठूं लागला. हलकेहलके तो वाढतही चालला. प्रातःकालीन सृष्टिसौंदर्यांत भर पडली. तो ध्वनि ऐकून कमलिनी तल्लीन झाली. ती आपली स्थिति विसरली. तिनें आपला घेतलेला मार्ग सोडला. ज्या दिशेनें त्या ध्वनीच्या लाटा तिच्या कर्णपथावर येऊन आदळत होत्या, तिकडे ती वळली. त्या स्वर्गीय बांसरीनादानें तिला पूर्ण मोहून टाकलें. जों जों ती त्या दिशेकडे जाऊं लागली, तों तों तो वंशीनाद स्पष्ट ऐकूं येऊं लागला. वंशी वाजविणारी व्यक्ति त्या कलेंत पूर्ण पारंगत असल्याचें स्पष्ट दिसत होतें. त्या व्यक्तीला आपण केव्हां पाहूं, असें कमलिनीस झालें होतें. ती अति त्वरेनें त्या दिशेकडे चालली होती. वाटेंत तिला किती ठेंचा लागल्या, किती कांटे बोंचले; पण तिकडे तिचें लक्ष नव्हतें. वंशीवादनही अखंड सुरू होतें. अडखळत, ठेंचा खात, आश्चर्य करितच कमलिनी पुढें चालली होती. सुमारें अर्ध्या वाटेंत ती एका निर्झरावर येऊन पोहोंचली व तेथें ती क्षणभर उभी राहिली. तेथून तो वंशीनाद अत्यंत निकट ऐकूं येऊं लागला होता. ती तीक्ष्ण नजरेनें इकडे तिकडे पहाते न पहाते तोंच भीषण सिंहगर्जना तिच्या कानावर आदळली ! त्या सिंहगर्जनेनेंतच तें वंशीवादन विलय पावलें ! सर्व अरण्यभर त्या भीषणगर्जनेचा प्रतिध्वनि घुमूं लागला ! कमलिनी आश्चर्य व भीति या दोन विकारांनीं अगदीं तटस्थ झाली !

दुसरी एखादी स्त्री असती तर भीतीमुळें तेथेंच बेशुद्ध झाली असती. कमलिनी घाबरली नव्हती असें नाहीं; पण तिच्या अंगीं निसर्गतःच थोडेंबहुत धाडस होतें. ती अगदीं स्तब्ध उभी राहिली. पुनः एक गर्जना झाली व तिनें आपल्यापासून सुमारें तीस चाळीस हातांवर एक भयंकर सिंह आपल्याकडे रागानें पहात येत आहे, असें पाहिलें. त्या भयंकर पशूनें क्षणांत तिच्यावर झडप घातली असती; पण इतक्यांत 'वनराज, वनराज, हें काय ? मागें फिर.' असा कोमल स्वरांतील हुकुमी आवाज कमलिनीच्या कानीं आला. कमलिनीस अत्यंत आश्चर्य वाटलें. कारण तो हुकुमी आवाज ऐकतांच तो भयंकर सिंह एखाद्या पाळीव कुत्र्याप्रमाणें तेथल्या तेथेंच थांबला. तात्काळ एक भगवीं वस्त्रें धारण केलेली सुंदर तपस्विनी कमलिनीच्या दृष्टीस पडली. तपस्विनीचें वय सुमारें चाळीस वर्षांचें असावें. तिचा शरीरबांधा सुडौल असून सुंदर होता. चेहऱ्यावर अपूर्व तेज झळकत होतें. भगवीं वस्त्रें तिच्या सुंदर देहास जास्तच खुलत होतीं. तिच्या उजव्या हातांत एक बांसरी होती. आपल्या वंशीनादानें कमलिनीस मुग्ध करणारी हीच होय. ती हलके हलके गंभीर मुद्रेनें कमलिनीकडे येऊं लागली. वनराजही तिच्या पाठोपाठ येत होता.

त्या तपस्विनीचा तो एकंदर थाट पाहून कमलिनी आश्चर्यचकित् झाली. आपण पाहतों हा प्रकार खरा किंवा स्वप्नभास, अशी तिला शंका वाटूं लागली. ही तपस्विनी साक्षात् सिंहवाहिनी दुर्गातर नसेल ? असेंही तिला वाटलें. ती आपल्याकडे कां येत आहे ? ती आपल्यास काय विचारणार ? तिला आपण कोणतें समर्पक उत्तर द्यावें ? तिचा एकान्तभंग झाल्यानें तिला क्रोध तर आला नसेल ? इत्यादि किती तरी प्रकारचे विचार तिच्या मनांत आले. ती गोंधळून गेली व ती तपस्विनी तिच्या अगदीं जवळ येतांच तिनें "देवी, देवी ! क्षमा करा !" असें म्हणतच साष्टांग नमस्कार घातला. क्षणभरच—अगदीं क्षणच—त्या तपस्विनीस तो प्रकार पाहून पुढें काय करावें, याची पंचाईत पडल्याचें दिसलें; पण तात्काळ तिनें 'मुली, उठ—उठ' असें म्हणून किंचित् प्रेमानें कमलिनीस उठविलें. कमलिनी तिचा आवाज ऐकतांच दचकली व तिनें वर तोंड करून तिच्या चेहऱ्याकडे पाहिलें.

तो चेहरा किंचित् प्रौढ दिसत होता येवढेंच. पण तशाच प्रकारचा चेहरा व तशाच प्रकारचा कोमल आवाज आपण पूर्वी कोठें तरी ऐकल्याचें कमलिनीस वाटूं लागलें. ती तपस्विनीच्या दिव्य मुद्रेकडे पाहूं लागली. पण तपस्विनीच्या उज्वल नेत्रांकडे पाहण्याचें तिला फारवेळ धाडस होईना. त्या नेत्रद्वयांत क्रूरता किंवा निर्दयता नव्हती हें खरें; पण त्यांच्या तेजापुढें कमलिनीच्यानें दम धरवेना. ती खालीं पाहूं लागली. तपस्विनी मात्र तिच्या मुद्रेकडे बराच वेळ पाहात राहिली. बराच वेळ दोघींनाही प्रथम कोणीं बोलावें, याचा विचार पडलासा दिसलें.

अखेरीस तपस्विनीनें कांहींशा कठोर, कांहींशा गंभीर आवाजांत प्रश्न केला, " अशाप्रकारें एकटं या निर्जन अरण्यांत तुझ्यासारख्या सुंदर मुलीनं इथें येण्याचं काय कारण बरं ? "

कमलिनीनें तो प्रश्न ऐकतांच भीतभीत वर पाहून ह्मटलें, " मला सध्यां कांहीं सुचत नाहीं; पण आपल्याला जर माझ्याकडून कोणताही त्रास झाला असेल, अगर आपल्या कामांत विघ्न आलं असेल, तर त्याबद्दल मी आपली क्षमा मागत्यें व आपली इच्छा असल्यास मी एक क्षणभरही इथं थांबत नाहीं. "

तिचें हें निष्कपट उत्तर ऐकून तपस्विनीस थोडासा आनंद झाला व एकप्रकारची उत्सुकता तिच्या चेहऱ्यावर दिसूं लागली. तिनें प्रश्न केला, " तुला या सिंहाची भीति कां वाटते ? " असा प्रश्न करीत तिनें आपल्या पाठीमागें दोन पायावर बसलेल्या सिंहाकडे सप्रेम पाहिलें. सिंहही कुत्र्याप्रमाणें आपलें शेंपूट हलवीत तिच्या चेहऱ्याकडे पाहूं लागला. कमलिनीही त्या सिंहाकडे किंचित् भीतियुक्त पण कौतुकानें पाहूं लागली.

तपस्विनी आपल्या हातांतील वेत्रानें त्या सिंहाच्या डोक्यावर थापटीत त्यास उद्देशून ह्मणाली, " वनराज, हिला तुझी भीति वाटते, तर तूं कुटिकेंत जा पाहूं. हाक मारल्यावर ये पाहिजे तर. " आणि ही आज्ञा त्या मृगराजानें अक्षरशः पाळली. वनराज तेथून चालता झाला. त्या सिंहाची ही आज्ञाधारकता पाहून तिच्या आश्चर्यास सीमा राहिली नाहीं. ती चकित मुद्रेनें तपस्विनीच्या तेजस्वी मुद्रेकडे पाहूं लागली.

वनराज दिसेनासा झाल्यावर तपस्विनीनें पुनः कमलिनीस म्हटलें, "हं, सांग पाहूं. आतां तूं इथें येवढ्या सकाळीं कशी आलीस? आतां तुला भीति वाटण्याचं कारण नाहीं." असें म्हणतच ती जवळच्या प्रस्तरावर बसली. व आपल्या जवळच कमलिनीस बसण्यास तिनें सांगितलें. कमलिनी नम्रपणें जवळच्या एका शिळेवर बसली. तपस्विनीच्या प्रश्नाला कसें समर्पक उत्तर द्यावें हेंच तिला कळेना. तिनें त्या तपस्विनीविषयीं पाहिलेला एकंदर प्रकार तिला इतका अनपेक्षित होता कीं, तो पहातांच ती गोंधळून गेली व ती अडखळच उत्तरली, "मला जगाचा कंटाळा आला आहे!"

"तुला जगाचा कंटाळा आला? मोठंच आश्चर्य!" तपस्विनीनें आश्चर्य करीत म्हटलें, "तुझ्यासारख्या तरुण मुलीला या जगाचा कंटाळा वाटावा, हें मोठंच आश्चर्य! बरं कंटाळा येण्याचीं कारणं?" तिनें कांहींशा संशयानें विचारिलें.

तिला आपल्याविषयीं कांहीं संशय आला आहे, हें कमलिनीनें तेव्हांच ताडलें. याकरितां ती तिच्या चेहऱ्याकडे कांहींशा दीन मुद्रेनें पहात म्हणाली, "माझ्याविषयीं आपणांस भलताच संशय येईल; पण देवी, अगदीं खरं तेंच सांगत्यें कीं, कुठेंतरी चार दिवस एकांतांत जाऊन रहावं, अशी माझ्या मनानं अत्यंत उचल खाल्ल्यामुळं मी आज सकाळीं घरांतून बाहेर पडल्यें. वाटेंत चालता चालता आपल्या वंशीचा मधुर नाद ऐकला व त्यामुळं वेडी होऊन मी इकडे आल्यें. इथें झालेला प्रकार पाहून सध्यां मी इतकी गोंधळून गेल्यें आहें कीं, मला कांहींएक सुचत नाहीं. एक घटकाभर मला अगदीं स्वस्थ बसूं द्या व मग आपली ऐकण्याची इच्छा असल्यास मी आपली सर्व हकीकत सांगीन."

कमलिनीचें वरील उत्तर ऐकतांच तपस्विनीची तिच्याविषयीं अगदीं पूर्ण खात्री झाली ती म्हणाली, "तुझं बोलणं आतां मला पूर्ण पटलं आहे. मला तूं कोणी दैवी प्राणी समजूं नकोस. मी तुझ्यासारखीच एक साधारण स्त्री आहें. मात्र तूं संसारी आहेस व मी—मी एक तपस्विनी आहें-इतकेंच. तुझी इच्छा असल्यास तूं आपलं चित्त स्वस्थ करण्यास इथेंच बैस. नसल्यास मजबरोबर माझ्या झोंपडींत चल. मात्र माझं स्थान जरा बिकट व दूर आहे."

" आपली जशी आज्ञा असेल तसं वागण्यास मी तयार आहे. " कमलिनीनें नम्रपूर्वक उत्तर दिलें.

" बरं तर चल. पण संभाळ हो, रस्ता जरा वाईट आहे. " असें ह्मणून तपस्विनी पुढें झाली व तिच्या मागोमाग कमलिनी जाऊं लागली. दोघीही आपआपल्या परीं कांहीं विचार करीत चालल्या होत्या. मध्येंच तपस्विनी मागें वळून कमलिनीकडे पाही व त्याच वेळीं कमलिनी तिच्याकडे पहात असल्यास आपली नजर चटकन् वळवी.

जरी तपस्विनीनें ' मी कोणी दैवी प्राणी नाहीं, ' ह्मणून कमलिनीस सांगितलें होतें तरी तिला तें खरें वाटेना. ही तपस्विनी कोण असावी ? हिच्या जवळ जो पाळीव सिंह कुत्र्याप्रमाणें आहे तो खरा कीं, त्यांत कांहीं लुच्चेगिरी आहे इत्यादि शंकाकुशंका तिच्या मनांत येत. एखादे वेळीं आपण चाललेला प्रकार स्वप्नांत तर पहात नाहीं, असेंही तिला वाटे. कसेंही असो, कमलिनीचे सध्यांचे सर्व विचार त्या तपस्विनी-विषयीं होते, यांत मुळींच शंका नाहीं. आतां तपस्विनीच्या मनांत कोणते विचार सुरू असतील हें कळणें जरा कठीणच होतें. असो.

अशा प्रकारें त्या चालल्या असतां पावलोंपावलीं रस्ता बिकट लागूं लागला. अरण्य घनदाट होऊं लागलें. त्यामुळें प्रकाशही मंद होऊं लागला. खांचखळगे, उंचवटे क्षणोक्षणीं आढळूं लागले. युद्धास सज्ज झालेल्या सेनेप्रमाणें मोठमोठे भव्य वृक्ष एकमेकाला भिडून वाढलेले दिसले. त्यांतच प्रचंड लतांचीं जाळीं विपुलतेनें पसरलीं होतीं. कांहीं लता जमिनीवर दूरवर पसरल्या होत्या. त्यांच्या दाट पानांखालीं खुरटीं, कांटेरी झाडें वाढल्यामुळें त्या कांटेरी झुडुपांचें ज्ञान होत नव्हतें. यामुळें जरा चुकून इकडचा पाय तिकडे पडल्यास कांटे त्या पायाचें यथास्थित स्वागत करण्यास मुळींच मागेंपुढें पहात नव्हते. त्यांतच मधून मधून गवताचीं उंच उंच बेटें वाढलीं होतीं. क्वचित् जलनिर्झर अथवा पल्वल दृष्टीस पडे. असो.

तो रस्ता तपस्विनीच्या पाया खालचा होता; पण कमलिनीस चाल-तांना बराच त्रास पडला. अखेरीस दोघीही कुटिकेजवळ जाऊन पोंहोंचल्या. दाराशींच वनराज कांहींसें पकडून बसला होता. तपस्वि-नीला पाहतांच त्यानें तो जिन्नस तिच्या पायाजवळ आणून टाकिला.

तपस्विनीनें आश्चर्य करीतच त्यास उद्देशून ह्मटलें, "वनराज हें काय आणिलं आहेस?" असें ह्मणत तिनें ती वस्तु हातांत घेतली. ती वस्तु दोन काष्टफलक एका वस्त्रांत लपटलेल्याप्रमाणें दिसत होती. तपस्विनीनें मोठ्या उत्सुकतेनें आंत काय आहे, हें पहाण्याकरितां वस्त्राची गांठ सोडिली. वस्त्र बाजूला केलें; तों दोन काष्टफलकेंच तिच्या दृष्टीस पडलीं. मात्र त्या दोन्हींवर दोन निरानिराळ्या पुरुषव्यक्तींचे चित्रपट होते. कमलिनी हा चाललेला सर्व प्रकार पहात होती. मात्र पहिला चित्रपट पहातांच ती दचकली व आश्चर्यानें उद्गारली, "अगबाई! हा तर माझ्या भावाचा चित्रपट!"

ते तिचे उद्गार ऐकून तपस्विनीसही आश्चर्य वाटलें. ती तिच्याकडे वळून म्हणाली, "हा तुझ्या भावाचा का चित्रपट?" असें म्हणत तिनें वरील काष्टफलक कमलिनीच्या हातीं दिला. कमलिनी तो लक्षपूर्वक पाहूं लागली. तपस्विनीनें दुसरा चित्रफलक हातीं घेतला. त्याकडे तिनें एकवार पाहिलें. तात्काळ तिच्या तोंडून एक अस्फुट हृदयभेदक किंचाळी बाहेर पडली! ती जमिनीवर पडणारच होती; पण कमलिनीनें तिला तात्काळ सांवरून घेतलें. हा प्रकार पाहून तिला व जवळ उभ्या असलेल्या वनराजालाहुद्धां आश्चर्य वाटलेंसें दिसलें.

---

## प्रकरण आठवें.

# शृगालदत्त.

दुष्ट मनुष्याला एखादा मोठा कार्यभाग साधावयाचा असला म्हणजे त्याची तयारी तो आयत्यावेळीं करीत नाहीं. त्याला फार पूर्वीपासून तयारी करावी लागते व आपण अमक्या तमक्या कार्याला हात घातला आहे, हेंही कोणाला न समजूं देण्याविषयीं त्याची अत्यंत इच्छा असते. हें तत्व लक्षांत बाळगूनच तो आपले एकेक धागे जुळवीन असतो.

सावज पकडण्याकरितां वाघ जसा दबा धरून बसतो व त्याचा चाहूल जशी कोणत्याही सावजास ऐकूं येत नाहीं, त्याप्रमाणेंच दुष्टाची गोष्ट आहे. तो आपल्या हातीं घेतलेल्या कामाची दक्षतेनें करीत असतां, बहुधः कोणाचें लक्ष त्याकडे जात नाहीं क्वचित् एखाद्याचें लक्ष गेल्यास तो दुष्ट प्रथम त्याचीच उचलबांगडी करतो. ही उचलबांगडीसुद्धां कोणाच्या लक्षांत येत नाहीं व दुष्टाचें कार्य पार पडतें. मग कुठें जगाचे डोळे उघडतात. मग जो तो " काय दुष्ट मनुष्य हो! त्यानं असं असं भयंकर अन्यायी कृत्य केलंन्!" म्हणतो. पण मागून त्याचा कांहीं-एक उपयोग होत नाहीं. दुष्टांचा महिमाच असा आहे. याकरितांच तर प्रत्येक सज्जन " दुर्जनं प्रथमं वन्दे " हा न्याय अनुसरतो. असो.

विमलचंद्राच्या हातून मंत्रसाधन करविण्यांत शृगालदत्तानें कोणता स्वार्थ साधण्याचा विचार केला होता, हें सध्याच पहाण्याची जरूरी नाहीं. कथानकाच्या ओघाओघानें त्या सर्व गोष्टी समजतीलच. मात्र येथें एवढें खास सांगून ठेवतों कीं, विमलचंद्र मंत्रसाधन करून दुर्गा-पूर (?) निसटला असावा, अशी शंका जशी कोणासही आली नाहीं, तसेंच विमलचंद्राच्या नाहींसें होण्यांत शृगालदत्ताची कांहीं मदत असेल असेंही कोणास वाटलें नाहीं. शृगालदत्तानें सर्व व्यवस्था अशीच केली होती कीं ज्याचें नांव तें. पंधरा वीस दिवसांपूर्वी शृगालदत्त वसंत-पुराधिपतींना विचारून आपल्या मातोश्रीस भेटण्याकरितां गेला होता. तो आजरोजीं पुनः वसंतदुर्गांत आला होता. येतांच त्यानें मोठ्या उत्सुकतेनें आपल्या एका साथ्यास मागील घडलेल्या एकंदर गोष्टी सांगण्यास विनंति केली.

यावेळीं दुपारचे तीन वाजून गेले होते. शृगालदत्त व त्याचे सोबती बुद्धिबळें खेळत होते. खेळतां खेळतां सहज बोलणें निघालें व त्यामुळें खेळ बाजूला राहून त्या दोघांच्या गप्पाच सुरू झाल्या.

" एकंदरींत इतकें डोळ्यांत तेल घालून जपलें तरी विमलचंद्रानें तुरी दिल्याच एकूण!" शृगालदत्तानें आश्चर्य करीत विचारलें, " पण असा कसा हो निसटून गेला?"

" कसा निसटून गेला, हें पाहिलं असतं तर त्याला जाऊंच दिलं नसतं कीं!" त्याच्या सोबत्यानें उत्तर दिलें.

" तें बरोबर; पण मागून कळल्यावर तरी त्याचा शोध करावयाचा होता कीं नाहीं ? "

" पण तें समजण्याइतकी शुद्ध होती कुणाला ? "

" म्हणजे काय ? तुमच्या बोलण्याचा मतलब मी नाहीं समजलों !"

" वा ! इथें मागें केवढा घोटाळा झाला तें तुह्माला कळलेंच नाहीं वाटतें ? " त्याच्या सोबत्यानें आश्चर्यानें विचारिलें.

" कसला घोटाळा बुवा ? " शृगालदत्तानें कावेबाजपणें विचारलें.

" कुमार विक्रमाविषयीं-"

" कुमार विक्रमाविषयीं काय ? " शृगालदत्तानें घाबरल्यासारखें करून मध्येंच विचारिलें.

" तुम्हाला दुर्गांत येऊन इतका वेळ झाला असतां, मागें घडलेला प्रकार मुळींच कळला नाहीं कीं काय ? "

" छे ! कुणाला विचारायला वेळ कुठें मिळाला ? आल्याबरोबर महाराजांकडे गेलों. तिथें चार घटका गेल्या व नंतर जेवण वगैरेंत वेळ गेला. आत्तांच कायतो नाहीं म्हणायला वेळ सांपडला आहे. "

" महाराजांच्या इकडे गेलांत त्यावेळीं त्यांच्या तोंडून कांहीं समजलें नाहीं ? "

" त्यांची प्रकृती बरीच बिघडली आहे. त्यामुळें त्यांच्यानें बोलवत नव्हतें. " शृगालदत्तानें पुढें विचारिलें, " त्यांची प्रकृती इतकी हो कशी बिघडली ? मी गेलों त्यावेळीं तर ते चांगले आनंदांत होते. "

" ते धीराचे म्हणून इतपत तरी स्थिति आहे. त्यांच्यासारखे प्रसंग दुसऱ्यावर येते, तर त्यानें प्राणच सोडला असता. तुह्मी गेल्यावर मागें घडलेले एकंदर प्रकार ऐकलेत तर तुमची छातीच फाटेल. तुम्हाला माहितच आहे कीं, कुमार विक्रमाचें शिक्षण चांगल्या प्रकारें व्हावें, या उद्देशानें महाराजांनीं त्यांना एका चांगल्या सज्जनाच्या हवालीं केलें होतें. व कुमारही रात्रंदिवस आपल्या तातोबा ( गुरुजी ) जवळच रहात. तुह्मी गेलांत त्याच्या दुसऱ्या दिवशीं नित्याप्रमाणें दासी कुमाराला उठविण्याकरितां गेली; पण ती बिछान्यावर पहाते तों काय ? कुमार तिथें नव्हते-"

" कुमार तिथं नव्हते ! " शृगालदत्तानें ढोंगी विस्मयानें विचारिलें.

" कुमार तर तेथें नव्हतेच; पण त्यांच्या गुरुजीचीही कांहीं विलक्षण अवस्था होती– तातोबा बेशुद्धींत अस्ताव्यस्त पडले होते ! "

" अं ? " शृगालदत्तानें आपल्या सोबत्याकडे आश्चर्यानें डोळे फाडून पहात विचारिलें, " म्हणतां तरी काय हें ? "

" खोटं नाहीं सांगत. " सोबती पुढें म्हणाला, " झालं. जिकडे तिकडे कुमार नाहींसे झाल्याचें पसरलें. जिकडे तिकडे रडारड व शोध सुरू झाला; पण व्यर्थ ! कुमाराचा शोध लागला नाहीं ! त्याच दिवशीं विमलचंद्र नाहींसा झाल्याचें समजलें; पण कुमाराच्या शोकांत त्याचा शोध करण्याचें कोणाच्याच लक्षांत आलें नाहीं. आणि त्याचा विशेष उपयोगही पण नव्हता. कारण कुमारी कुमुदिनीस विमलचंद्राच्या कैदेची हकीकत कळवावयाची नव्हती. अर्थात विमलचंद्र नाहींसा झालेला दिसतांच ' पिडा टळली ' असेंच सर्वांस वाटलें. "

" बरें, पुढें कुमाराचें काय झालें ? "

" कुमाराचें काय व्हायचें ! त्या दिवशीं दुर्गांतील कोनाकोपरा-सुद्धां झाडून झाडून पाहिला; पण व्यर्थ ! कुमाराचा शोध लागला नाहीं. लागलींच सगळीकडे तपासाकरितां स्वार पाठविण्यांत आले, पण एक दोन दिवस सर्व स्वार दुर्मुखलेले असे परत आले. कुमार गेले ते गेले ! आतांपर्यंत त्यांचा पत्ता नाहीं. सांगा, म्रातारवयांत अशाप्रकारचा पुत्रशोक कुणाला तरी सहन होईल कां ? "

" खरंच बुवा फार वाईट हें ! " कपटनिपूण शृगालदत्तानें नक्राश्रु गाळीत म्हटलें, " काय हा ईश्वरी कोप ! पण कायहो, कुमाराचें काय झालें असावें अशी सर्वांची कल्पना आहे ? "

" व्यक्ति तितक्या प्रकृती ! प्रत्येकाची निरनिराळी कल्पना आहे; तरीपण बऱ्याचजणांचें असें मत आहे कीं, आनंददुर्गेशानेंच कांहींतरी कपटानें कुमाराला पळवून नेलें असावें आणि मलाही पण तसेंच वाटतें. "

" पण त्यापासून त्यास फायदा काय ? "

" फायदा कसला ? महाराजांस दुःख द्यावें हाच ! दुष्टाला कायहो ! "

" खरेंच ! नाहींतर महाराजांनीं काय कुणाचें वाईट चिंतलें होतें; पण करणार काय ? होणार तें टळतें थोडेंच ! "

नंतर थोडावेळ दोघेही स्तब्ध बसले.

"हे आपल्या इथें नवीन पाहुणे कोण आले आहेत बरें ?" शृगालदत्तानें उत्सुकतेनें विचारिलें.

"मला त्यांची कांहीं विशेषशी माहिती नाहीं-" सोबती उत्तरला, "पण ते उज्जनीहून आले आहेत असें ऐकतों आणि ते आल्यामुळें महाराजांचें नुकसान कांहीं कमी झालें नाहीं."

"त्यांना किती दिवस झाले इथें येऊन ?" शृगालदत्तानें मध्येंच विचारिलें.

"चार एक दिवस झाले असतील; पण या अल्पकालांत बरेच घोंटाळे झाले. तुम्हाला माहितच आहे, राक्षसनाथ ( आनंददुर्गेश ) कशा प्रकारचा मनुष्य आहे. त्याची या पाहुणे महाराजांनीं रस्त्यांत येतां येतां कुणाजवळ निंदा केली. राक्षसनाथाला ती कशी कळली असेल हें देव जाणें; पण त्यानें तेवढाच डाव मनांत धरून आपल्या महाराजांना सांगून पाठविलें कीं, ' तुमच्याकडे आलेला पाहुणा आमच्या स्वाधीन करा. ' महाराजांनीं तरी ही गोष्ट ऐकावी कीं नाहीं. त्यांनीं तें ऐकलें नाहीं व राक्षसनाथानें लागलींच दुर्गावर चढाई केली. आणि आपला मुख्य डाव साधला."

"तो कोणता ?" शृगालदत्तानें आश्चर्यानें विचारिलें.

"कुमारी कुमुदिनीला पळवून नेली ! !"

"खरें कीं काय ?" शृगालदत्त अत्यंत विस्मयानें उद्गारला. त्याच्या चेहऱ्यावर एक प्रकारची कालिमा पसरली. त्यानें एकदम विचारिलें, "मग कुमारी इथें नाहीं तर ? आतां काय उपयोग-" पण येथेंच त्यानें आपली जीभ चावली.

त्याच्या सोबत्याचें लक्ष शेंवटल्या वाक्याकडे गेलें नाहीं. तो म्हणाला, "पण सेनानी वीरदत्त कुमारीची सुटका करण्याकरितां गेले आहेत."

"हंः" शृगालदत्त थोडासा निराशापूर्वक बोलला, "त्याच्या हातून हें काम कसचें होतें ! राक्षसनाथाशीं संबंध आहे हें ध्यानांत आहे ना ?"

"तरीपण सेनानींनाही तुह्मी अगदींच शिळपट समजूं नका. ते किती युद्धकुशल आहेत हें माहित नाहीं वाटतें ?"

"अहो, नुसती युद्धकुशलता काय कामाची ?" शृगालदत्त तिरस्कारानें म्हणाला, "आणि सेनानी कुमारीची सुटका करून घेईपर्यंत

राक्षसनाथ चुप्प बसेल वाटतें ? तोंपर्यंत तो कुमारीला लालचावून अगर अन्य तऱ्हेनें विवाहास तयार करील हें कुठें तुह्माला माहित आहे ? कुमारीला पळवून नेण्यांत हाच तर त्याचा स्वार्थ आहे. "

" पण कुमुदिनी वीरकन्या आहे– "

" अहो, समजलें. बायकांना काय ? दागदागिने, खायला प्यायला, चैन असली कीं त्या तेव्हांच तयार होतात. "

" कुमारी अशा माकडाला मान्य करील, असें मला नाहीं वाटत. तिचें मन कुणावर जडलें आहे, हें तुमच्या ध्यानांत नाहीं वाटतें ? "

" विमलचंद्राविषयीं बोलतां वाटतें ? " शृगालदत्त हंसून म्हणाला, " तो तुमचा निव्वळ भ्रम आहे. त्या भिकाऱ्याला मिठ्या मारून तिला काय फायदा त्यांत ? "

" मग त्या बिचाऱ्याला सहा महिने तुरुंगांत कां ठेविलें होतें ? "

" तीं राजकारणें आहेत. त्याच्याशीं आपल्याला काय करावयाचें आहे. एवढें मात्र खास ध्यानांत ठेवा कीं, कुमुदिनी आतां इथें आली तर राक्षसनाथाची पत्नी बनूनच येणार ! "

" हें कधींच शक्य नाहीं. " सोवंती मध्येंच ह्मणाला, " सेनानी वीरदत्तांनीं सर्वांसमक्ष प्रतिज्ञा करून सांगितलें आहे कीं, ' आठ दिवसांच्या आंत कुमारीची सुटका करीन किंवा पुनः तोंड दाखविणार नाहीं. ' आणि आपल्या पाहुण्यांनीं तर राक्षसनाथाला पकडून इथें आणण्याची कठीण प्रतिज्ञा केली आहे. "

त्याचें हें भाषण ऐकतांच शृगालदत्त धिक्कारपूर्वक मोठमोठ्यानें हंसूं लागला. तो ह्मणाला, " पतंगानें दिव्यावर हल्ला करण्यासारखाच हा प्रकार आहे. बरें, असो. सेनानी सध्यां कुठें आहेत ? "

" तें मला माहित नाहीं. सध्यां ते या दुर्गांत नाहींत हें खास. "

" पाहुणे आपली प्रतिज्ञा केव्हां पार पाडणार आहेत ? " शृगालदत्तानें व्यंगार्थी हंसत विचारिलें.

" ते आहेत इथेंच. पण ते पुढील तयारी करून राहिले आहेत. "

" खरेंच. " शृगालदत्त तिरस्कारानें हंसत ह्मणाला, " राक्षसनाथाला पकडून इथें आणावयाचा तेव्हां त्याकरितां यथास्थित चमचमीत जेवण, दिवसभर झोंपा इत्यादि प्रचंड तयारी पाहिजे खरी ! "

" युद्धाच्या विषयीं तुम्ही त्यांचा पराक्रम पाहिला नाहींत. मी अगदीं खात्रीनें सांगतों कीं, राक्षसनाथ ज्याप्रमाणें आपल्या एका गुप्त सामर्थ्याविषयीं उगीच घमेंड मारतो आहे, ती घमेंड खरी असो वा खोटी असो, राक्षसनाथापेक्षांखुद्धां एक विलक्षण सामर्थ्य या पाहुण्यांत आहे यांत मुळींच शंका नाहीं. "

त्याचें हें निक्षून बोलणें ऐकतांच शृगालदत्त चपापला. आपला सोबती सांगतो ही गोष्ट अगदींच गप्प नसून त्यांत कांहीं सत्यांश आहे, असें त्यास वाटलें. तो आणखी कांहीं त्यासंबंधानें प्रश्न करणार इतक्यांत महाराजा धर्मचंद्राकडून त्यास बोलावणें आल्यावरून तो तिकडे गेला.

---

## प्रकरण नववें.

# नवीनचंद्र व कला.

श्रीरामसेवका ( मारुती ) ची प्रार्थना करण्यांत कला इतकी गढून गेली होती कीं, नवीनचंद्र आंत ( मंदिरांत ) आल्याचें तिला मुळींच समजलें नाहीं. तिची प्रार्थना चाललीच होती. नवीनचंद्रही तिच्याकडे पहात उभा होता.

बराच वेळ नवीनचंद्र प्रार्थना करण्यांत मग्न झालेल्यां कलेकडे पहात राहिला. पण पुढें त्याचें त्यालाच ' आपण इथें आलों, हें चांगलें नव्हे. कोणीं पाहिल्यास नाहीं तसली शंका लोकांत उठेल ' असें वाटूं लागलें. असा विचार करून तो मंदिरांतून बाहेर पडणार इतक्यांत कलेची प्रार्थना संपली व ती परत जाण्याच्या इच्छेनें दाराकडे वळली; पण नवीनचंद्रास पहातांच ती दचकली. तिनें त्यास ओळखलें नाहीं. तिला ' आपल्याला पकडून नेण्याकरितां तर हा आला नाहीं ? ' असें वाटलें व म्हणून तिनें भीतीनें घाबरून ' धावा हो धावा ! ' म्हणत किंकाळी फोडली व ती घाबरून मटकन् खालीं बसली. नवीनचंद्रासही

हा प्रकार पाहून आश्चर्य वाटलें व थोडावेळ पुढें काय करावें हें सुचेना. कलेची किंकाळी ऐकून जर कांहीं मंडळी धांवत आली व त्यांनीं आपणास येथें पाहिलें तर तीं मनांत काय समजतील बरें? त्यापेक्षां आपण तात्काळ निघून गेलों असतों, किंवा कलेसच आपण आंत आल्याचें जाणविलें असतें तर किती चांगलें होतें बरें? आतां तरी आपण इथें रहावें कीं इथून निघून जावें? इत्यादि किंचित् भीतियुक्त विचार नवीनचंद्राच्या मनांत आले; पण तात्काळ त्यानें आपला एक विचार ठरविला व तो किंचित् पुढें जाऊन मोठ्यांदा बोलला, "आपण मला ओळखलें नाहीं! मी नवीनचंद्र."

हें त्याचें बोलणें ऐकतांच कलेनें त्यास ओळखलें व तिनें वर पाहिलें तों नवीनचंद्र. "अगबाई, आपणच कां?" असें अस्फुट स्वरांत म्हणत तिनें पुनः आपली मान खालीं घातली. विनाकारण घाबरून आपण किंचाळी ठोकली, हें कांहीं चांगलें झालें नाहीं, असें तिला वाटलें. तिला अगदीं लाजल्यासारखें झालें. ती मुकाट्यानें खालीं मान घालून उभी राहिली! नवीनचंद्र पुनः कांहीं तिला म्हणणार इतक्यांत कलेची किंचाळी ऐकलेली मंडळी धांवतच त्या मंदिरांत आली! सर्वांपुढें शृगालदत्त होता. त्या मागून किल्ल्यावरील कांहीं शिपाई, कांहीं स्त्रिया, कांहीं मुलें इत्यादि सर्व हातांत हत्यारें घेऊन "काय आहे? कोण आहे बदमाष!" म्हणत देवळांत घुसली! तो प्रकार पहातांच त्या दोघांसही कसेंसेंच वाटलें. कला तर अगदींच गोंधळून गेली. तिनें भीतीनें नवीन-चंद्राकडे पहात म्हटलें "आतां!"

"घाबरूं नका. थोड्यावेळांपूर्वीं ज्याची प्रार्थना केलीत, तो श्रीहनुमान आपला बचाव करील." असें म्हणून नवीनचंद्रानें तिला धीर दिला व तो मंडळींकडे वळला. इकडे शृगालदत्तानें त्या दोघांसही अशा प्रकारें पहातांच शक्य तितकी किळसवाणी शंका घेऊन तिची आपल्या इतर सोबत्यांना सुनावणी करून दिली. सर्वांची तीच अनुमती पडली. सर्वजण आपआपसांत कुजबुजूं लागले. शृगालदत्ताला मनांतून खूप आनंद झाला. कारण दुष्ट मनुष्याचा हा एक स्वभावच आहे. आपण ज्याप्रमाणें दुर्गुणी आहोंत, त्याप्रमाणेंच सर्व जग आहे असें त्यास वाटत असतें. त्यांतून जर कां एखाद्या सुशील मनुष्याचें त्यास व्यंग सांपडलें,

निदान नसा त्यास प्रसंग दिसला, तर तात्काळ घटेल तसला संबंध जोडून त्या सज्जनावर अपराध शाबित करण्यास त्यास दिक्कत वाटत नाहीं. मग जनतेपुढें " अमका तमका नाहीं का, दिसण्यांत मोठा साव आहे बरं ! नुसतं त्याच्या वरच्या दिसण्यावर जाऊं नका. मी त्याला पुरतं जाणतों आहे. महा बिलंदर— " इत्यादि म्हणत डोळे मिचकावत, हंसण्यास व त्या सज्जनाची निंदा करण्यास त्यांना जोर येतो व स्वतःच्या दुष्कर्माबद्दल त्यांचें मन जें त्यांना रात्रंदिवस खात असतें, त्याचें तें कसें तरी शांतवन करतात. असो.

" काय आहे गडबड ? " शृगालदत्तानें किंचित् ऐटींत पण नम्रपणें नवीनचंद्रास विचारिलें.

नवीनचंद्र शांतपणें उत्तरला, " थोड्या वेळापूर्वी मी इकडून जात असतां या मंदिरांत कोणी रुदन करीत आहे, असा मला भास झाला व त्यामुळें मी कोण आहें हें पहाण्याकरितां आंत आलों, तों याच ( कलेकडे बोट दाखवून ) मारुतीची प्रार्थना करीत रुदन करीत होत्या असें आढळलें. कुमारी कुमुदिनीबद्दल यांना दुःख होत असावें, असें मला वाटतें. "

" पण किंचाळी फोडण्याचें कारण ? " शृगालदत्तानें हलकेंच खोचून प्रश्न केला. नवीनचंद्राच्या सांगण्यावर त्याचा विश्वास बसला नाहीं, हें सांगावयास नको आहे. " मी आंत आल्याचें त्यांना समजलें नाहीं, त्यामुळें एकदम दचकून त्यांनीं मला न ओळखतां किंचाळी फोडली. "

" आपणाला पुरतें ओळखलें नाहीं, " शृगालदत्त व्याजोक्तीनें म्हणाला, " त्यामुळें प्रथम असें होणारच. बायका फार भित्र्या बोवा ! प्रथम त्या असेंच करतात; पण पुढें येतात वळणावर. " इत्यादि कांहींसें हंसत, कांहींसें अस्फुट स्वरांत बोलत शृगालदत्त परत फिरला. सर्व मंडळीही आपापल्या ठिकाणीं गेली.

शृगालदत्ताच्या बोलण्यांतील पेंच न समजण्याइतका नवीनचंद्र कांहीं वेडा नव्हता तरीपण शृगादत्ताविषयीं त्याचें मत कांहीं विशेष चांगलें नसल्यामुळें त्यानें तिकडे तितकें लक्ष दिलें नाहीं. तो कलेला घेऊन महालाकडे जाण्याकरितां त्या मंदिरांतून बाहेर पडला.

" आपण इतक्या का भित्र्या आहांत ! " रस्त्यानें जात असतां

नवीनचंद्रानें कांहींशा हिणवण्याच्या स्वरांत कलेला प्रश्न केला. यावर कलेनें कांहींएक उत्तर दिलें नाहीं ती स्तब्धपणें नवीनचंद्राच्या मागें चालली होती. नवीनचंद्र पुढें म्हणाला, " मला आश्चर्य वाटतें कीं, तुमच्यासारख्या स्वरूपसंपन्न, गुणवती तरुणीनें इतकें भित्रें असावें ! छे बोवा, आपल्याला तर हा एक फारच मोठा अवगुण वाटतो. काय ? लहानपणीं तुम्हास यौद्धिक शिक्षण मिळालें नाहीं ? "

वरील बोलणें कलेला लागलें खरें, पण करणार काय ? झालेल्या गोष्टीबद्दल तिला अत्यंत लाज वाटली. तिनें कांहींएक उत्तर दिलें नाहीं.

" आतां जी गोष्ट घडून चुकली, त्याबद्दल तर कांहीं बोलणें नाहीं म्हणा; पण जरका तुमचा खरोखरच भित्रा स्वभाव असेल, तर तो एक मोठा अवगुण आहे असें समजा. तुम्हाला माहित नाहीं, हें तुमचें व्यंग कोणी जाणल्यास तो तुम्हाला पाहिजे तसा त्रास देण्यास कमी करणार नाहीं. बायकांना नेहमींच लढाया मारावयाच्या नसतात हें खरें; पण त्यांनीं धैर्यवान् असावें. कारण त्यांना वीरपत्नी व वीरप्रसूता व्हावयाचें असतें. माझें बोलणें सध्यां आपणास रुचणार नाहीं कदाचित्, पण एखाद्याचा अवगुण दिसल्यास त्यास तो नीट समजावून देण्याची मला संवय आहे. त्यांतुनही आपणास वाईट वाटल्यास मी त्याची क्षमा मागतों. " नवीनचंद्राचें हें भाषण ऐकतांच कलेला मेल्यापेक्षां मेलें झालें. कुठून आपण अविचार केला असें तिला झालें. मात्र तिला त्या बोलण्याचा राग आला नाहीं.

नवीनचंद्र दुर्गांत आल्यापासूनच कलेचा व त्याचा परिचय झाला होता व प्रथम दर्शनींच कलेच्या लावण्यानें त्यास मोहित केलें होतें. जसजसा तो परिचय वाढूं लागला व कलेचे एकेक गुण त्यास समजूं लागले, तसतसा त्याचा तो मोहितपणा प्रेमांत रूपांतर पावला. पण त्यास कलेचा वरील अवगुण समजतांच थोडें वाईट वाटलें व म्हणूनच त्यानें कलेस भित्रेपणा टाकण्याचा उपदेश केला. कारण तो अद्याप प्रेम करीतच होता व तें प्रेम दिनप्रतिदिनीं वाढत होतें. कलेच्या हृदयांत प्रणयबीजारोपण केव्हांच झालें होतें. अर्थात् नवीनचंद्रानें सांगितलेल्या उपदेशाचा राग न मानतां तिनें तो अवगुण टाकण्याचा निश्चय केला. थोड्याच वेळांत तीं दोघेंही महालांत जाऊन पोंहोंचलीं.

अशा प्रकारें तीन दिवस लोटले. नवीनचंद्रानें प्रतिज्ञा केल्याप्रमाणें ती पार पाडण्याच्या खटपटीस तो लागला. त्यानें सेनानी वीरदत्ताकडून योग्य ती माहिती करून घेतली व आपला एकंदर उपक्रम ठरवून एके दिवशीं ( ज्या दिवशीं कमलिनी दुर्गांतून बाहेर पडली त्याच दिवशीं ) दुपारीं भोजनाच्या वेळीं धर्मचंद्राजवळ आपल्या निघण्याची त्यानें गोष्ट काढली. महाराजा धर्मचंद्र व नवीनचंद्र दोघेच जेवावयास बसले होते व कला वाढीत होती.

" केव्हां जाणार म्हटलेंत ? " धर्मचंद्रानें प्रश्न केला.

" आज सूर्यास्त झाल्यानंतर मी इथून नाहींसा होईन. "

" बरें, इथून कुठें जाणार व काय करणार ? " धर्मचंद्रानें सहज विचारिलें.

याच वेळीं कला मागील भात वाढावयास घेऊन आली होती. तिनें त्या दोघांचें वरील बोलणें ऐकलें नसल्यामुळें तिला धर्मचंद्राच्या वरील प्रश्नाचें आश्चर्य वाटलें व ती आश्चर्यानें धर्मचंद्राच्या तोंडाकडे पाहूं लागली. ती भात वाढण्याचें विसरली.

" कले, " धर्मचंद्र तिचा आशय जाणून प्रेमानें म्हणाले, " आपले पाहुणे ( नवीनचंद्र ) आज जाणार आहेत बरें. "

एखाद्या विषारी विंचवानें डंख मारल्याप्रमाणेंच कलेस वाटलें. तिनें अस्फुट स्वरांत विचारिलें, " कुठें ? "

" तेंच मीं त्यांना विचारीत आहें. " धर्मचंद्र उत्तरले. त्यांचें हें उत्तर ऐकून कलेला थोडें समाधान वाटलें. धर्मचंद्र त्यांना जाऊं देणार नाहींत, असें तिला वाटलें. म्हणून भात वाढून ती परत गेली.

" हं ! मग आपण कुठें जाणार ? " धर्मचंद्रानें पुनः प्रश्न केला.

" तें मला सध्याच सांगतां येत नाहीं. आजपासून बरोबर पांच दिवसांनीं प्रतिज्ञा केल्याप्रमाणें राक्षसनाथाला बंधन करून त्याला घेऊन इथें येईन. न आल्यास समजावें कीं, त्या कार्यांत माझें प्राणविसर्जन झालें. "

हें त्याचें उत्तर ऐकून धर्मचंद्र थोडा वेळ स्तब्ध बसला. त्याला किंचित् वाईट वाटत असावें, असें दिसलें. तो थोड्या वेळानें एक सुस्कारा टाकून म्हणाला, " मी आतां खरें सांगूं, त्या दिवशीं क्रोधांत असल्यामुळें मी राक्षसनाथास पकडून आणण्यासंबंधीं बोललों खरा;

पण आतां माझी तशी इच्छा नाहीं. तुम्ही प्रतिज्ञेप्रमाणें करून दाखवाल यांत मला मुळींच शंका नाहीं; पण आतां तुम्ही प्रतिज्ञा पुरी करण्याच्या भानगडींत पडूं नका. माझ्याकरितां उगीच कां त्रास घेतां बरें ? "

धर्मचंद्राचें हें भाषण ऐकतांच नवीनचंद्रास आश्चर्य वाटलें. दुसरा एखादा तापट स्वभावाचा तरुण असतां तर त्यानें धर्मचंद्राची वरील बुळचट भाषणाबद्दल चांगलीच निर्भत्सना केली असती; पण नवीनचंद्र निराळ्या प्रकृतीचा मनुष्य होता. तो प्रत्येक गोष्ट घडल्यानंतर योग्य तो प्रथमच पूर्ण विचार करून प्रत्येक काम करीत असे. यामुळें त्यास पश्चात्ताप करण्याची फारच कमी पाळी येई. त्यानें शांतपणें ह्मटलें, " वीर पुरुष एकवार तोंडांतून जे उद्गार काढतो ते खरे करून दाखविणें हेंच त्याचें मुख्य कर्तव्य आहे. मीं जी प्रतिज्ञा केली आहे, ती पारितोषकाच्या आशेनें किंवा कीर्तीच्या लालसेनें केली नाहीं. दुष्टापासून गरीबाचें रक्षण करणें हें प्रत्येक वीर पुरुषाचें कर्तव्य आहे व तें कर्तव्य बजावणें हेंच मी आपलें ब्रीद समजतों. त्याप्रमाणें मी आपली प्रतिज्ञा पूर्ण केल्याशिवाय कालत्रयीं राहणार नाहीं. त्यांत आपण अडथळा करूं नये अशी आपणास विनंति आहे. "

" वीराला त्याच्या कर्तव्यापासून पराङ्मुख करणें हें कांहीं चांगलें काम नव्हे. बरें, जसें आपल्यास वाटेल तसें करावें. मजकडून शक्य तितकी मदत मिळेल. "

" आपल्या आशिर्वादाशिवाय मी आपणापासून कांहींच चाहत नाहीं. " नवीनचंद्रानें नम्रपणानें उत्तर दिलें.

" खरेंच ! " धर्मचंद्र गहिंवरून ह्मणाला, " मला बोलवल्यावांचून राहवत नाहीं; पण तुह्मी गुणसंपन्न असून इतके विनयशाली आहांत याचेंच मला आश्चर्य वाटतें ! ईश्वर करो व आपल्या सर्व इच्छा पूर्ण होवोत !! "

याच वेळीं एका प्राण्यानें 'तथास्तु !' असें ह्मटलें. तो शब्द ऐकूं आला नाहीं हें खरें; पण तो बोलला गेला हें खास.

तो प्राणी दुसरें कोणी नसून कला होती हें सुज्ञ वाचकांना सांगावयास नको आहे.

" अरे हो, कले, " धर्मचंद्र तिला हांक मारून एकदम ह्मणाला,

" कमलिनी आज कुठें दिसत नाहीं ? " कला काय उत्तर देणार ? ती बराच वेळ स्तब्ध बसली. तिचें हें मौन पाहून धर्मचंद्रास आश्चर्य वाटलें व त्यानें पुनः तोच प्रश्न केला. कलेनें शेवटीं खरी ती हकीकत सांगितली.

" हं ! एकंदरींत सर्वांनींच मला म्हाताऱ्याला सोडून जाण्याचा इरादा केला होय ? " धर्मचंद्र दुःखाचा सुस्कारा टाकून बोलला.

नवीनचंद्रासही आश्चर्य वाटलें. त्यानें विचारिलें, " मग त्या विचारून कां बरें गेल्या नाहींत ? बरें, त्या परत केव्हां येणार आहेत ? "

" चार दिवसांनीं येत्यें म्हणून सांगून गेल्या आहेत. " कलेनें कोमल स्वरांत उत्तर दिलें.

" कुठें गेल्या आहेत ? "

" जवळच दीड कोसावर एक शिवालय आहे, तिथें जाणार म्हणत होती. "

" आणि तूंहि कुठें जाण्याचा विचार केला आहेस कीं नाहींस ? " धर्मचंद्रानें अर्ध्येंच कलेस किंचित् खोचून प्रश्न केला, " काय ? तुमच्या-वर मी कुमुदिनीपेक्षां कमी प्रेम करितों ? कमलिनीला जायचें होतें तर तिनें मला विचारावयाचें तरी होतें ! "

लवकरच दोघांचेंही भोजन आटोपलें. शयनागारांत जातां जातां धर्मचंद्र कलेस म्हणाले, " पाहुण्यांची जाण्याची ते सांगतील ती तयारी करून दे बरें ! " नंतर ते नवीनचंद्रास म्हणाले, " आतां तुम्ही आणि कला आपलें पाहून घ्या. मी कमलिनीच्या शोधाची तजवीज करतों. पोरगी सांगूनसुद्धां गेली नाहीं ! " इत्यादि पुटपुटत धर्मचंद्र तेथून निघून गेला. नवीनचंद्रही तेथून जाऊं लागला ; पण सहज त्यानें कलेकडे पाहिलें तों तिच्या मुद्रेवरून तिला आपल्याशीं बोलावयाचें आहे, असें त्यास वाटलें. म्हणून त्यानें नेत्रानेंच ' काय आहे ' म्हणून प्रश्न केला ; पण कलेनें लाजून खालीं मान घातली. नवीनचंद्रही तेथून निघून गेला.

कला भोजन करण्यास बसली खरी ; पण आज तिला जेवण गोड लागेना. ती थोडेंसें खाऊन पानावरून उठली व हात धुऊन थेट आपल्या निजण्याच्या महालांत जाऊन तिनें आंतून दार लावून घेतलें. ती पलंगावर जाऊन बसली व इतकावेळ तिच्या मनाला होत असलेलें दुःख नेत्रावाटें बाहेर पडूं लागलें. नवीनचंद्राची खरी हकीकत ती मुळींच

जाणत नव्हती ; पण ती त्यावर अनुरक्त झाली होती व म्हणूनच त्याच्या प्रयाणाची गोष्ट ऐकतांच तिला अत्यंत दुःख झालें. ते पुनः परत येतील कीं नाहीं याची तिला शंका वाटूं लागली. एकवार त्यांना आपण परत येण्याविषयीं विनंति करावी, असें तिला वाटूं लागलें. पण आतां त्यांची भेट होईल कीं नाहीं कोण जाणें? ते आपली भेट घेतील कशावरून? अथवा ते आपली विनंति मान्य न करतील तर? इत्यादि शंकाकुशंका घेत तिनें नवीनचंद्रास एक पत्र लिहिण्याचा विचार केला. पण लगेंच पुनः एक शंका आली कीं, पत्र नेऊन कोण देणार? पुनः ती विचार करूं लागली. अखेरीस तिनें लिहिण्याचें सामान तर जवळ घेतलेंच व मोठ्या संकटानें एक लहानसें पत्र तयार केलें. पत्रांत हा मजकूर होताः—

"दासी आपल्या दर्शनाविषयीं फार उत्सुक आहे. तिला पुष्कळ सांगावयाचें आहे. याकरितां आज संध्याकाळीं पुष्पवाटिकेंत दर्शन देण्याची कृपा होईल का? आपला एक मोठा अपराधही मीं केला आहे. त्याची क्षमाही मला मागावयाची आहे. मग ही विनंती मान्य होईल कां? कदाचित् माझा हा पत्र लिहिण्याचा निर्लज्जपणा पाहून तिरस्कार वाटेल, अगर माझ्या मित्रेपणाबद्दल असलेला मनांतील रागही गेला नसेल, तरी पण एकवार दर्शन द्यावंच."

हें एवढेंसें लहानसें पत्र लिहिण्यास कलेला सबंध दोन तास लागले. अखेरीस पत्र तर पुरें झालेंच. आतां तें द्यावयाचें कसें? याची तिला चिंता पडली. सुमारें अर्धा घंटा अशाच विचारांत मोडला. अखेरीस ती निश्चय करून निघाली. तिच्या महालापासून थोड्याच अंतरावर एका बाजूला नवीनचंद्राचा महाल होता. ती तिकडे जाण्यास निघाली. यावेळीं इतर नोकरचाकर मंडळी दुपारचें आपापलें काम आटोपून स्वस्थ एकीकडे पडली होती. अर्थात् कलेला आपणास कोणी पाहील याची धास्ती नव्हती. तरी ती भीतभीतच नवीनचंद्राच्या महालाच्या दाराजवळ गेली. दार उघडेंच होतें. तिनें हलकेंच डोकावून पाहिलें तों नवीनचंद्र पलंगावर पडला होता. कला बराच वेळ बाहेर उभी राहिली. शेवटीं नवीनचंद्र झोपीं गेला असावा, अशी जेव्हां तिची पूर्ण [illegible]ची झाली, तेव्हां ती आंत गेली. झटदिशीं तिनें तें पत्र नवीनचंद्रा[illegible] पलंगावर टाकलें व इकडे तिकडे न पाहतां तेथून पलायन केलें.

ती बाहेर आली व तिला समाधान वाटलें. नवीनचंद्राच्या शयनागाराजवळच थोड्या अंतरावर धर्मचंद्राचें शयनागार होतें. धर्मचंद्र काय करताहेत हें पाहण्याची कलेला अनिवार इच्छा झाली व म्हणून ती सहज तिकडे वळली. तिनें दारांतून आंत डोकावून पाहिलें तों धर्मचंद्र कांहीं लिहीत बसलेले तिला आढळले. पण तिची चाहूल धर्मचंद्रास लागलीच. ते आंतून म्हणाले, " कोण तें ? "

कलेस उत्तर देणें भागच पडलें. ती हलकेंच म्हणाली, " मी—कला. "

" कले ! नवीनचंद्र काय करताहेत पहा बरें ? त्यांना जरा इकडे बोलावून आण पाहूं ! "

झालें ! जें काम करण्यास तिला नको होतें तेंच तिच्या वाट्यास आलें !

महाराजा धर्मचंद्र खरोखरच एक सत्वशील, प्रेमाळू व सरळ मनाचे मनुष्य होते. नवीनचंद्रावर त्यांचें अतोनात प्रेम जडलें होतें. नवीनचंद्र हाही मोकळ्या मनाचा तरुण होता. दुर्गांत आल्यापासून तो नेहमीं कुमुदिनी, कमलिनी व कला यांच्याशीं मोकळ्या मनानें बोलत असे व थट्टा, विनोद करीत असे. कलेवर जरी तो मोहित झाला होता तरी त्यानें तें कधींही बाहेर दर्शविलें नाहीं. कुमुदिनी व कमलिनी याही त्याच्याशीं मोकळ्या मनानें वागत होत्या. कला बरीच लाजत असे इतकेंच. अशी स्थिति असल्यामुळेंच नवीनचंद्रास हाक मारण्याचें कलेला सांगण्यास धर्मचंद्रास कांहीं वाटलें नाहीं. असो.

मोठ्या संकटानें कला पुनः नवीनचंद्राच्या महालाजवळ आली व तिनें दारांतून आंत डोकावलें. नवीनचंद्र अद्यापही जागा झाला नव्हता. तो पहिल्या स्थितींतच निजला होता व त्याच्या वक्षस्थलावर कलेचें पत्र पडलें होतें. ती भीत भीत आंत गेली. काय युक्ति करून त्यांना उठवावें याची तिला पंचाईत पडली ती पलंगापासून दोन हातावर निरिखून नवीनचंद्राकडे मोठ्या प्रेमानें पहात उभी राहिली. अकस्मात् तिची नजर नवीनचंद्राच्या उशाकडे गेली तों उशागती तिला एक पत्र ठेवलेलें दिसलें. दुसऱ्याचें गुप्त पाहूं नये, हें कला चांगल्याप्रकारें जाणत होती; पण तें पत्र पाहण्याची तिला अनिवार इच्छा झाली व हलकेंच तिनें तें तेथून उचललें. उचलतांच तें उलगडलें गेलें व अगदीं प्रथम ओळ " प्रिय कले, " यापासून सुरू झालेली तिच्या दृष्टीस पडली !

आपल्या नांवचें पत्र व तेंहि नवीनचंद्राचें पहातांच तिला जितका आनंद झाला, तितकेंच आश्चर्य वाटलें. तिनें तें पत्र चटदिशीं आपल्या ओ-च्यांत घातलें! पण या गडबडींत तिच्या हातांतील कंकणांचा ध्वनि झाला व त्या ध्वनीनें, तिला ज्या कामाचें एवढें संकट पडलें होतें, तें काम पार पाडलें. नवीनचंद्र तो कंकणध्वनी ऐकून जागा झाला. तो चटकन् उठून बसला. पाहातो तों कला पुढें उभी!! दोघांचें नेत्र-मीलन झालें! व दोघांनाही ज्या गोष्टीचा भ्रम पडला होता त्याचें निरसन झालें! दोघांनाही परस्पर अनुरक्त असल्याचें विदित झालें!!

प्रणयीजनांच्या नेत्रांनों! ज्या गोष्टी प्रणयिनीला बोलतां येत नाहींत अगर बोलतां आल्या तरी पूर्णपणें समजावितां येत नाहींत त्याचा तुम्ही एका क्षणांत निकाल लावतां! प्रणयी व प्रणयिनी परस्पर संवा-दानें आपलें शंकानिरसन करुन घेण्यास कधींही समर्थ होत नाहींत. पण शाबास आहे तुमच्या नेत्रपल्लवी भाषेची कीं, एका पळांत सर्व शंकांचें निरसन होतें.

---

## प्रकरण दहावें.

### प्रेम कीं बलात्कार!

तो चमत्कारिक देखावा पुनः पहावा, या हेतूनें कुमुदिनी त्या पडद्या जवळ गेली खरी; पण पुष्कळवेळ तिला तो पडदा सारण्याचें धैर्यच होईना. वारंवार तिला आपण पाहिलेली कला खरोखरीच कला आहे कीं तो नेत्राभास आहे अशी शंका वाटे. अखेरीस तिनें सर्व धैर्य एकवटून तो पडदा बाजूला सारला तो पुन्हाही तोच चमत्कार! आणि विशेष आश्चर्य हें कीं, ज्या पुरुषाच्या हातांत हात घालून कला उभी होती तो तरुण पुरुष दुसरा कोणी नसून विमलचंद्र होता!! "अगबाई! हें काय?" असें म्हणत ती शून्य दृष्टीनें त्या चमत्काराकडे पहात राहिली. अकस्मात् तिला 'हे पुतळे तर नसतील?' अशी शंका

आली व ह्मणून तिनें त्यास हात लावून पाहिलें तों खरेंच; ती मूर्ति हाताला थंड लागली. आतां कुमुदिनीची अगदीं पूर्ण खात्री झाली कीं, हे दोन्ही पुतळे आहेत. मग ते शाडूचे असोत, दगडाचे असोत किंवा लांकडाचे खोदीव असोत. तिला आतां असेंही वाटूं लागलें कीं, कलेला जें आपण आपल्याकडे पाहातांना पाहिलें तो निव्वळ भास. पण हे पुतळे इथें असे कां? कोणत्या उद्देशानें ते येथें बसविले असावेत, असा विचार करीत ती त्या दोन्ही मूर्तींकडे लक्ष्यपूर्वक पाहूं लागली.

दोन्ही पुतळे साधारण उंचीचे होते. तरुणाचा पुतळा पुरा साडेतीन हात उंच होता व तरुणीचा तीनापेक्षां थोडा कमी. दोन्हीही रंगानें, रूपानें, अंगाच्या ठेवणीनें अगदीं यथातथ्य होते. अगदीं सूक्ष्म दृष्टीनें चूक पाहणारालासुद्धां त्यांत खोड काढणें कठीण होतें, इतकी त्यांना बनविण्यांत शिल्पकारानें कुशलता दाखविली होती. प्रथम दर्शनीं तर हे पुतळे आहेत असें ओळखणेंच कठीण होतें. मात्र त्यांत एक विशेष होता. पुतळ्यांचीं वस्त्रप्रावर्णे जरी खोदीव होतीं, तरी त्यांना घातलेलीं आभूषणें मात्र खरीं होतीं. ह्मणजे त्यांना घातलेले अलंकार खोदीव नसून खऱ्या सुवर्णाचे व रत्नजडित होते. तें पाहून तर कुमुदिनीस फारच आश्चर्य वाटलें! ती लक्षपूर्वक पहात असतां आणखी एक विशेष गोष्ट तिच्या नजरेस आली. पुतळ्यांवरील सर्व भूषणें अगदीं नवीं होतीं. मात्र तरुणाच्या अंगुलीत असलेल्या सुवर्णमुद्रिकेवर हिरा नव्हता. कसलीशी एक काळी चीज तेथें लावलेली होती. तिनें आश्चर्य करीत त्या काळ्या वस्तूस स्पर्श केला. तें लोहकील असावें, असें कुमुदिनीला वाटलें. तिला अत्यंत आश्चर्य वाटलें. कांहीं तरी विशिष्ट उद्देशानेंच हे पुतळे केले आहेत, असें कुमुदिनीस वाटलें; पण तो उद्देश कोणता असावा हें कुमुदिनीला समजेना. अशाप्रकारें ती विचार करीत उभी असतां तिला कोणाची तरी चाहूल लागली, ह्मणून तिनें तो पडदा सोडून दिला व मागें वळून पाहिलें तों काय? ज्याच्या विरहानें ती रात्रंदिवस होरपळत होती, तो तिचा हृदयेश्वर विमलचंद्र तिच्या दृष्टीस पडला! आनंदाचा अस्फुट चीत्कार तिच्या तोंडून बाहेर पडला व ती खालीं पडणारच होती इतक्यांत विमलचंद्रानें तिला सांवरून धरलें. तिनें विमलचंद्रास दृढ आलिंगन दिलें व त्याच्या छातीवर मस्तक ठेवून ती रडूं लागली.

" कुमुद, " विमलचंद्रानें तिचें चुंबन घेऊन विचारिलें, " तूं इथें दुःखांत आहेस ? "

विमलचंद्राचा हा प्रश्न ऐकून कुमुदिनीस मोठेंच आश्चर्य वाटलें. ती त्याच्या चेहऱ्याकडे पहात ह्मणाली, " मी कुठें आहें, हेंच मला माहीत नाहीं ! "

' तूं कुठें आहेस हें तुला माहित नाहीं ! मोठेंच आश्चर्य. " विमलचंद्रानें आश्चर्य करीत प्रश्न केला, " सांग बरें मला पाहिल्यापासून तुला खरेंच कां समाधान वाटलें ? "

या प्रश्नानें कुमुदिनी विस्मित झाली. ती ह्मणाली, " या प्रश्नाचं मी काय आणि कसं उत्तर देऊं बरं ? "

" तुझें माझ्यावर खरेंच कां प्रेम आहे ? " विमलचंद्रानें तिच्याकडे बारकाईनें पहात विचारिलें.

" त्याबद्दल आपल्याला शंकाच कां वाटते ? " कुमुदिनी करुण स्वरांत ह्मणाली.

" शंका नाहीं वाटत पण– "

" पण काय ? शंका जर वाटत असली तर दर्शन कां दिलं बरं ?" कुमुदिनीनें किंचित् दुःखानें विचारिलें.

" पण मीं असं ऐकलं आहे कीं, तुझा विवाह होणार आहे ! " विमलचंद्रानें एकेक शब्द तोलत तोलत विचारिलें.

या प्रश्नावर कुमुदिनीस काय उत्तर द्यावें हें सुचेना. विमलचंद्राचें वर्तन तिला थोडें निराळें भासूं लागलें.

" बोलत कां नाहींस ? " विमलचंद्रानें सरोष विचारिलें.

" काय बोलूं ? " कुमुदिनी करुण वाणीनें म्हणाली, " आपण माझें हृदय जाणत कां नाहीं ? "

" तें जाणतों; पण काल पालटला आहे. "

" काल पालटला, ह्मणून मन तर पालटत नाहींना ? "

" एकूण माझ्यावर तुझें मन आहे–तर ? "

" हें पुनः नव्यानें कां सांगायला पाहिजे ? "

" मग मी सांगेन तें करशील ? "

" योग्य वाटल्यास ! " कुमुदिनीनें किंचित् उद्वेगानें उत्तर दिलें.

कुमुदिनीकडून असें उत्तर येईल, अशी विमलचंद्राची कल्पनासुद्धां नव्हती; पण वरील उत्तर ऐकतांच त्याची ती शंका खोटी ठरली. त्याला त्या उत्तराचा किंचित् रोषही आला व त्यानें ह्मटलें, " असें कां? योग्य वाटल्यास? • ठीक आहे! " असें ह्मणत त्यानें किंचित् गर्वानें किंचित् क्रोधानें कुमुदिनीकडे पाहिलें. त्या पाहण्याचा अर्थ काय होता बरें?

आज सहा सात महिन्यांत विमलचंद्राचें दर्शन न झाल्यामुळें कुमुदिनीचें विमलचंद्राविषयीं प्रेम घटलें होतें व ह्मणून तिनें वरीलप्रमाणें आपल्या हृदयेश्वरास तुसडें उत्तर दिलें, अशी जर वाचकांची कल्पना झाली असेल तर ती अगदीं खोटी आहे. कुमुदिनी अल्लड बालिका नव्हती. प्रेम काय वस्तु आहे व तें कसें करावें या दोन्ही गोष्टी ती पूर्णपणें जाणत होती. अद्यापिही तिचें विमलचंद्रावर तेंच प्रेम कायम होतें. पण अशा दुःखाच्या प्रसंगीं विमलचंद्राचा तिच्याशीं घडलेला व्यवहार जरा विचित्र होता आणि त्यामुळेंच तिला तो प्रकार पाहून वाईट वाटलें व तिनें वर लिहिल्याप्रमाणें तुसडें उत्तर विमलचंद्रास दिलें. बरें, असें तुसडें उत्तर येण्यास आपलेंच वर्तन कारण झालें, हें विमलचंद्रास तरी समजावयास पाहिजे होतें. पण संशयपिशाचानें त्यास पछाडलें होतें, त्यामुळें वरील उत्तर त्याच्या कर्णसंपुटांत शिरतांच संशयपिशाच त्याच्या कानांत पुटपुटलें, " कुमुदिनी तुझ्यावर प्रेम करीत नाहीं! "

" एकंदरींत तुझें माझ्यावर प्रेम नाहीं तर? " विमलचंद्रानें प्रश्न केला. त्या प्रश्नांतील एकंदर आविर्भाव पहातांच कुमुदिनीस अत्यंत आश्चर्य वाटलें व तितकेंच दुःखही झालें. आपला कांहींएक अपराध नसतां उलट आपल्याच प्रेमाविषयीं संशय घेतलेला पहातांच कुमुदिनीस बराच क्रोध आला; पण तिनें तो तसाच दाबून ह्मटलें, " नाथ, आज सात महिन्यांत दर्शन दिलेंत तें एवढ्याचकरितां कां? आपल्याला अशी शंका पुर्वीं कां बरें आली नाहीं? "

" पूर्वींची गोष्ट निराळी होती. " विमलचंद्रानें तिच्या मुद्रेकडे तीक्ष्ण दृष्टीनें पहात झटलें. पण त्या निर्मळ मुद्रेवरील सात्विक प्रेमछटा दिसण्याइतकी विमलचंद्राची दृष्टी शुद्ध नव्हती. त्या कोमल

स्वरांत वहात असलेला प्रेमनिर्झर ग्रहण करण्याइतके त्याचे कान पवित्र नव्हते! तो त्या निर्मल मुद्रेकडे पहात होता इतकेंच. तिच्या सुंदर मुखांतील मधुर वाणी ऐकत होता इतकेंच. त्यांतील पावित्र्य समजण्याइतकें त्याचें अंतःकरण शुद्ध होतें कुठें? •

"पूर्वीच्या आणि आतांच्यांत आपणास काय फरक दिसला बरं?"

"पूर्वी असें तुसडें उत्तर तूं कधींही दिलें नव्हतेंस?"

"पूर्वी आपण तरी असा चमत्कारिक प्रश्न विचारला होता काय?" कुमुदिनीनें किंचित् व्यंगार्थी विचारिलें. तिचा तो प्रश्न ऐकतांच त्याचें सरळ उत्तर देण्याची विमलचंद्रास पंचाईत पडली. त्यास काय उत्तर द्यावें हें सुचेना.

"बरें," बराच वेळ विचार केल्यावर विमलचंद्रानें विचारिलें, "तूं सध्यां कुठें आहेस हें तुला माहित आहे?"

"नाहीं." कुमुदिनीनें सरळपणें म्हटलें; पण असा प्रश्न विचारण्यांत त्याचा काय हेतु असावा हें तिला समजलें नाहीं.

"बरें, मी इथें कसा आलों व कां आलों हें तरी जाणतेंस?" विमलनें सगर्व विचारिलें आणि यावर काय उत्तर येतें, हें तो उत्सुकतेनें पाहूं लागला.

"कसें आलांत," कुमुदिनीनें विस्मयानें म्हटलें कारण असले निरर्थक प्रश्न विचारण्याचा त्याचा हेतु तिला अद्यापि समजला नव्हता. "हें मी जाणत नाहीं; पण कां आलांत हें मात्र मी जाणत्यें."

"मी इथें कसा आलों," विमलचंद्र सगर्व उद्गारला, "हें तूंच काय कोणीही मानव जाणूं शकत नाहीं." पण बोलतां बोलतां तो एकदम थांबला. कुमुदिनीच्या सुंदर मुखाऐवजीं त्याच्या दृष्टीस रक्तानें भरलेलें तिच्या भावाचें मुंडकें दिसूं लागलें. "अद्याप तूं माझी पाठ नाहींका सोडित!" असे भ्रमिष्टपणाचे उद्गार त्याच्या तोंडून बाहेर पडले! ते इतके विचित्र, इतके भीतिप्रद होते कीं, ते ऐकून कुमुदिनीस आश्चर्य वाटलें व ती भीत भीत म्हणाली, "नाथ, हें आपण भलतेंच काय बोलतां? आपल्या पाठीमागं कोण लागलं आहे?"

"माझ्या पाठीमागें?" विमलचंद्र घाबरून म्हणाला, "छे, तो—नव्हेतें नव्हे—कांहीं नाहीं. मला तसें वाटतें इतकेंच! पण तो भासच बरें

कां ? आतां नाहीं मी भिणार ! ये प्रिय कुमुद. अगदीं अगदीं मला बिलगून बैस ! " असें म्हणत त्यानें कुमुदिनीस घट्ट आलिंगन दिलें ! तो पुढें म्हणाला, " हो ! तें तसें दिसतें खरें ? पण तें खरें नव्हे ! नव्हेना खरें, कुमुद, प्रिय कुमुद ! ( हंसून ) पण तूं ती गोष्ट जाणत नाहींस ! नाहींना जाणत ? नाहींच जाणत. मला माहीत आहे तूं तें नाहींच जाणत. आणि म्हणूनच बरें आहे. होय ना कुमुद ? नाहींतर तूं माझ्यावर प्रेम केलें नसतेंस ! नसतेंस ना केलें ? पण खरेंच सांग बरें. तूं माझ्यावर खरेंच कां अद्याप प्रेम करीत आहेस ? "

यावेळची विमलचंद्राची दृष्टी, मुद्रा व वाणी सर्वांतच विलक्षण भ्रमिष्टपणा दिसत होता. त्याची ती एकंदर स्थिति पहातांच कुमुदिनी प्रथम तर घाबरलीच पण थोड्याच वेळांत चित्ताला तिनें सांवरून घेतलें. विमलचंद्र आल्यापासूनचें त्याचें वर्तन तिला फार चमत्कारिक वाटत होतें; पण आतांचा प्रकार पहातांच तिची खात्री झाली कीं, एकतर आपल्या प्रेमाविषयीं संशय आल्यामुळें ह्याची अशी स्थिति झाली असावी, अथवा आपणास एकदम सहा सात महिन्यांत न पाहिल्यामुळें हर्षातिशयानें ह्यास वेडें केलें असावें. असा विचार तिच्या मनांत आला व या करितांच आपल्या मधुर शब्दानें त्याचें शांतवन करावें असें तिनें योजिलें. ती आपले सुधामय ओष्ठद्वय त्याच्या भीतीनें शुष्क झालेल्या ओष्ठद्वयास मिळवून म्हणाली, " नाथ, माझ्या प्रेमाविषयीं आपणास जर यत्किंचितही संशय वाटत असेल तर आपला संशय घालविण्याकरितां आपण सांगाल तें कार्य, जितकें माझ्या आटोक्यांत आहे तितकें करण्यास मी एका क्षणाचाही विलंब लावणार नाहीं. आपल्या तोंडून शब्द निघण्याचा अवकाश. हें करूं कीं नको हें सुद्धां मनांत आणणार नाहीं. आज सहा सात महिन्यांनीं आपलं दर्शन झालं. एवढ्या वेळांत आपलें कधींही विस्मरण पडलें नाहीं. रात्रंदिवस आपली सुंदर मूर्ति—नाथ—या विरहाग्नीनें धगधगणाऱ्या हृदयांत वास करीत आहे. आपल्याच सुंदर मूर्तीनें माझें जीवित रक्षण केलें आहे. आपणच माझे प्राण आहांत. आपलीं शरीरें दोन आहेत; पण प्राण एकच आहे. यापेक्षां जास्त काय सांगूं ! " असें म्हणून निर्मलचित्त कुमुदिनीनें पुनः एकवार आपले अधर त्याच्या अधरास मिळविले ! तिनें त्यास घट्ट आलिंगन दिलें !

पित्याला दुःख देऊन जगांत हंसें करून घेण्यास तयार नाहीं. पित्याची आज्ञा मोडण्यापेक्षां यापेक्षांही कठोर कारागृहवासास व आपल्या विरहदुःखाचें प्रायश्चित घेण्यास मी सुखानें तयार होईन ! म्हणुन मी सांगत्यें कीं, आपण अशी वेडी इच्छा धरून माझ्या प्रेमाची कसोटी पाहूं नका ! मला फसवूं नका ! त्यांत आपलं कल्याण होणार नाहीं. मी आपली आधारभूत प्रेमलता आहें; पण ती आपल्या विश्वासघातानें आपण जाळून टाकूं नका. कारण त्या योगानें आपल्या सुखाची राखरांगोळी होईल ! आपल्याला कधींही सुख मिळणार नाहीं! मग आपण कितीही विद्वान्, धनवान् व बलवान् असा ! पाहिजे तर हा माझा ' प्रणयशाप ' आहे असें समजा ! "

" विश्वासघात केल्यास हा प्रणयशाप शापप्रलय होईल ! " असें कोणीसें पुटपुटलें. कुमुदिनीनें हें ऐकलें नाहीं; पण विमलचंद्रास मात्र तें स्पष्ट ऐकूं आलें.

" मग तूं नाहींना तयार होत!" विमलचंद्रानें ओठ चावीत विचारिलें.

" प्राणनाथ ! माझ्या प्रेमाचे असे धिंडवडे करूं नका ! " कुमुदिनी करुण स्वरानें उत्तरली, " आपण सांगितलेली गोष्ट माझ्या हातुन कधींही होणार नाहीं ! "

" मग बैस तर याच कारागृहांत ! तीन चार दिवसांत आपोआपच येशील वठणीवर ! "

" देवा ! हें प्रेम कीं बलात्कार !! " असें पुटपुटत ती रडूं लागली. थोड्या वेळानें तिनें वर पाहिलें तों विमलचंद्र तिला दिसला नाहीं !

## प्रकरण अकरावें.

## कुटिकेंत.

त्या तपस्वीनीला कमलिनीची फारशी मदत मिळाली नाहीं. तिला आलेली दुःखाची तिरमिरी क्षणांत नाहींशी झाली. तिनें स्वतःस सांवरून घेतलें व लागलींच तो चित्रपट ( ज्याच्याकडे पाहून तिची अशी अवस्था झाली होती तो ) झांकला. कमलिनीला तो विलक्षण चित्रपट पाहण्याची फार इच्छा होती; पण ती पार पडली नाहीं. नंतर तपस्विनी तिजकडे वळून ह्मणाली, " अगदीं पक्कं ध्यानांत धर कीं, जोंपर्यंत तूं इथें माझ्याजवळ आहेस, तोंपर्यंत हा चित्रपट पहाण्याची अगर त्यासंबंधीं कांहीं विचारण्याची इच्छासुद्धां धरूं नकोस ! "

तपस्विनीची तेजस्वी आज्ञा अमान्य करण्याची अगर त्यासंबंधीं अवाक्षर काढण्याची कमलिनीची शक्ति नव्हती. ती नम्रपणें खालीं मान घालून ह्मणाली, " आपली आज्ञा शिरसा वंद्य आहे. "

" लक्षांत ठेव. " तपस्विनीनें गंभीरपणानें तिला बजाविलें, " नुसत्या बोलण्यांतच आज्ञाधारकता उपयोगाची नाहीं. ती कृतींत उतरली पाहिजे. " असें ह्मणत ती झोंपडीच्या दाराकडे वळली. ती पुनः शुद्धीवर आलेली पहातांच वनराजासही आनंद झालासें दिसलें व त्यानें तो शेंपूट हालवून व्यक्तही केला.

तपस्विनीची कुटिका सुमारें दहा हात लांब व चार साडेचार हात रुंद अशी होती. ऊन, वाऱ्यापासून साधारण संरक्षण होण्यापलीकडे त्या झोंपडीचा कांहीं विशेष उपयोग दिसत नव्हता. झोंपडीच्या द्वाराशींच कायती चार पांच हात रिकामी जागा झाडून साफ केलेली दिसत होती. बाकी झोंपडीच्या सभोंवतीं चारी बाजूंस दाट झाडी लागून गेली होती. त्यामुळें सहसा ती झोंपडी बाहेरून कोणाच्याही दृष्टीस पडणें शक्य नव्हतें. असो.

तपस्विनीनें झोंपडीचें द्वार उघडून आंत प्रवेश केला व कमलिनीसही आंत येण्यास सांगितलें. कमलिनी आंत गेली. झोंपडींत कांहींही नव्हतें. कमलिनीस अत्यंत आश्चर्य वाटलें. ती आश्चर्यानें तपस्विनीच्या तोंडाकडे पाहूं लागली.

"हें माझ्या वनराजाचें निवासस्थान आहे." असें ह्मणत तपस्विनी झोंपडीच्या दुसऱ्या कोंपऱ्यांत गेली व तिनें आणखी एक द्वार उघडलें. तेथें एखादें द्वार असावें अशी कमलिनीस शंकासुद्धां आली नाहीं. तपस्विनी तिला उद्देशून पुढें ह्मणाली, " अगदीं बेतानें माझ्या पाठोपाठ ये बरं का ? भिऊं नको. रस्ता जरा कठीण आहे."

" हें दार असं उघडंच राहायचं ? " कमलिनीनें पहिल्या दाराकडे बोट दाखवून आश्चर्यानें विचारिलें.

" आतां तें तसं राहिलं तरी हरकत नाहीं. वनराज आहे आतां पाहरा करण्यास." असें म्हणत ती पुढें झाली. कमलिनी तिच्या पाठोपाठ जाऊं लागली. त्या दारांतून बाहेर पडतांच मोठमोठे गगनचुंबित वृक्ष व लहान लहान झुडपें वाटेच्या दोन्ही बाजूंवर इतकी जवळ जवळ लागलेलीं दिसलीं कीं, त्यांना हातांनीं बाजूला सारूनच त्या दोघींना रस्ता काढावा लागला. त्या दोघी सुमारें पन्नास हात गेल्या असतील इतक्यांत कमलिनीच्या दृष्टीस पुढील बाजूस एक भव्य पण विच्छिन्न प्रासाद दृष्टीस पडला !

त्या प्रासादाच्या चारी बाजूंस उंच उंच टेंकड्या दिसत होत्या. त्यांवर गर्द झाडी लागून गेली होती. बाहेरून दिसण्यांत तरी तो प्रासाद अगदीं पडलेला दिसत होता. सर्व भिंती पावसांनीं भिजल्यामुळें ठिकठिकाणीं पडलेल्या दिसत होत्या व त्यांवर जागजागीं लहानमोठीं झुडपें उगवलेलीं दिसत होतीं. तरी उर्जितावस्थेंत तो चांगला भव्य व मजबूत होता हें कोणीही कबूल केलें असतें. पण सध्या त्याचा उपयोग, जंगली पशुपक्ष्यांना राहण्यासच होत असावा असें कमलिनीस वाटलें. एका मोठ्या करवंदीच्या जाळीआड त्या प्रासादाच्या मजबूत तटाला एक छिद्र पडलें होतें. त्यांतूनच तपस्विनीनें कमलिनीसह आंत प्रवेश केला. आंत अगदीं अंधःकार होता. तपस्विनीनें कमलिनीचा हात धरून पुष्कळ वळणें घेत तिला प्रासादाच्या मुख्य चौकांत आणिलें. तो चौक त्या विच्छिन्न वाड्याला तशा स्थितींतही शोभेसाच होता. मात्र त्याच्या मध्यभागीं उभें राहून चोहोंकडे पाहिल्यास पडकीं भिंताडें, कललेले खांब, मोडलेल्या तुळया, तुटलेल्या खिडक्या इत्यादि खेदजनक प्रकार दृष्टीस पडत असत.

चौक झाडून साफसूफ केलेला दिसत होता. त्याच ठिकाणीं एका कोपऱ्यांत दोन गायी व त्यांचीं दोन गोजिरवाणीं वत्सें बांधलीं होतीं. तपस्विनीला पाहतांच त्या चारीही मूक प्राण्यांना आनंद झालासा दिसलें. चौकाच्या एका बाजूचा सबंध एक भाग शाबूत दिसत होता. त्यांतच तपस्विनी रहात असे. तिनें कमलिनीला तिकडेच नेलें. आपल्या निवासस्थानाचें द्वार उघडतांना तपस्विनी थोडीशी अडखळली. तिनें एकवार कमलिनीकडे पाहिलें व कडीस हात घातला. कडी काढतांना तपस्विनीच्या मुखावर दुःखाची झुळूक आली असावी, असें कमलिनीस वाटलें; पण ती तिची नुसती शंकाही असेल. कारण तपस्विनी तिच्याकडे वळून किंचित् स्मित करून ह्मणाली, " पाहिलास का हा आमचा राजमहाल ! "

पुनः कमलिनीस त्या मंद हास्यांत विलक्षण चित्तोद्वेग दृष्टीस पडला. पण तिनें फार वेळ तपस्विनीकडे पाहिलें नाहीं व ती तिच्या मागोमाग त्या खोलींत शिरली. ती खोली त्या वाड्याच्या उर्जितावस्थेंत कोणत्या कामीं योजली जात असावी हें कमलिनीस ओळखतां आलें नाहीं. सध्या जरी ती साफ केलेली होती व उठण्याबसण्याच्या कामीं तिचा उपयोग होत होता, तरी इतर भागांप्रमाणें तिच्यावरसुद्धां जीर्णावस्थेचा हात फिरलेला स्पष्ट दिसत होता. आंतील बाजूला सर्व भिंतीवर बराच काळेपणा आला होता. ठिकठिकाणीं भिंतींवरील गिलाव्याचा चुना उडून गेल्यामुळें आंत किती दगड बसविले आहेत, हें ओळखण्यास फारसा त्रास पडत नव्हता. त्यांतच कोळशिटांनीं आपलीं शुभ्र घरें करून त्यास शोभा आणिली होती. कोळ्यांच्या जाळ्यांचीही पूर्ण विपुलता दृष्टीस पडत होती. सामान ठेवण्यास केलेल्या कोनाड्यांपैकीं बऱ्याच कोनाड्यांत मूषक महाराजांचीं गृहद्वारें दृग्गोचर होत होतीं व मधून मधून या बिळांतून त्या बिळांत चटकन् जाऊन कौतुक करणाऱ्या मूषकबालकांचेंही दर्शन होत होतें. झुरळें व पाकोळ्या यांनींही आपलें वास्तव्य त्या ठिकाणीं कायमचेंच जमविलेलें दिसत होतें. इतकें जरी होतें, तरी खोली साफ झाडलेली दिसत होती. दाराच्या समोरील कोनाड्यांतच राधाकृष्णाच्या मनोहर मूर्ति ठेविल्या होत्या. त्याच्या जवळच्या कोनाड्यांत पूजेला लागणारीं पूजापात्रें ठेविलीं होतीं. दुसऱ्या

कोनाड्यांत सहाण, चंदनाचें खोड व पुष्पकरंडक इत्यादि वस्तु ठेविल्या होत्या. जमिनीवर बसण्याकरितां एक मोठी चटई हांतरली होती. त्याजवळच एका लहानशा लांकडी चौकीवर दोन तीन पोथ्या दिसत होत्या. जवळच्या कोंपऱ्यांत रात्रीं दिवा लावण्याकरितां ठेवलेली समई दिसत होती. श्रीराधाकृष्णास वाहिलेल्या सुगंधित वनपुष्पांचा सुगंध खोलींत दरवळला होता. त्यामुळें कमलिनीस तशा स्थितींतही फार प्रसन्नता वाटली.

" असंच–असंच एकांतवासिनीचं सुख अनुभविण्याच्या हेतूनें मी घराबाहेर पडलें आहें. " कमलिनी पुटपुटली.

पण तें तपस्विनीनें ऐकिलेंच. ती आश्चर्यानें हंसली व ह्मणाली, " खरंच. अशा प्रकारचं जीवन तुला किती दिवस गोड लागेल बरं ! "

" आपणाला हें आवडतं, " कमलिनी तिच्या चेहऱ्याकडे आदरपूर्वक पहात बोलली, " मग मला कां बरं आवडूं नये ? "

" वेडी आहेस झालं ! " तपस्विनी स्मित करून ह्मणाली, " कोणतीही नवी गोष्ट कांहीं काल अशीच गोड वाटते. प्रत्येकालाच असें आपणास प्राप्त होईल तर काय बहार होईल असं वाटत असतं इतकंच! प्रसंगवशात् तशी स्थिति प्राप्त झाली ह्मणजे मग मात्र त्यांतील खरं मर्म तेव्हांच लक्ष्यांत येतं. "

इतक्यांत बाहेर कोणाचीशी चाहूल लागली. ती ऐकून कमलिनीस आश्चर्य वाटलें; पण तपस्विनीच्या चेहऱ्यावर तसा कांहीं विकार दृष्टीस पडला नाहीं. ' दाई आली वांटतं ' असें ह्मणतच ती बाहेर आली. मागोमाग कमलिनी होतीच. कमलिनीनें पन्नास वर्षांच्या एका वृद्धेस गाईला गोंजारतांना पाहिलें.

ती वृद्धा शरीरानें गोरी पण जरा ठेंगण्यापैकीं होती. कालानें त्या शरीरावर जरी आपला पूर्ण प्रभाव दाखविला होता, तरी एखाद्या जुनाट वृक्षाप्रमाणें ह्मातारीच्या अंगींही पूर्ण कांटकपणा दिसत होता. तिनें आश्चर्यानें कमलिनीकडे पाहिलें व तपस्विनीस उद्देशून म्हटलें, " हंः ! आज इतक्यांतच परत आलीस ? पूजा वगैरे झाली नाहीं वाटतं ? " असें म्हणून तिनें आपली तीक्ष्ण नजर कमलिनीकडे लाविली.

तपस्विनीनें त्या पाहण्याचा आशय ताडला. तिनें, उत्तर दिलें,

" फक्त शिवपूजन राहिलं आहे. बाकी सर्व आटपलं. पण दाई, आज तूंही इतक्यांत कशी परत फिरलीस ? "

" आज गांवांत एक मोठी बातमी ऐकिली, म्हणून मी ती तुला सांगण्याकरितां दूध देऊन तशीच परत आल्यें. पाहिलंस, मी म्हटलं तेंच खरं झालं. अग, असं व्हायचं हें मी पूर्वींच जाणलं होतं. मायाराणीचं म्हणणं–"

पण लागलीच तिनें आपली जीभ चावली. त्या म्हातारीच्या तोंडून 'मायाराणी' हें नांव ऐकतांच कमलिनी आश्चर्यानें स्तब्ध झाली ! काय ? अशाप्रकारचें नांव तिनें पूर्वीं कधीं ऐकिलें होतें ? तिनें एकवार आपल्या केसांवरून हात फिरविला व त्या म्हातारीकडे पाहिलें व काय आश्चर्य ? जिच्याविषयीं तिला संशय आला होता, तीच ती व्यक्ति अशी तिची खात्री झाली. ही व्यक्ति पुनः आपल्या दृष्टीस पडेल, अशी शंका कमलिनीस स्वप्नांतसुद्धां आली नव्हती; पण त्या म्हातारीला पहातांच तिची शंका फिटली. तिच्या मनाला काय वाटलें असेल तें असो, तिचा चेहरा प्रफुल्लित झाला. तिच्या मुद्रेवर आलेली उदासीनता पार नाहींशी झाली, चित्त विलक्षण प्रसन्न झालें व साहजिकपणें तिनें त्या गूढ व तेजस्वी तपस्विनीस नमस्कार केला. तो नमस्कार मानसिक होता; पण पूर्ण भक्तीनें व आदरानें केला गेला होता.

ती म्हातारी पुढें म्हणाली, " पुण्य काय व पाप काय, कोणतंही अति झालं म्हणजे त्याचं फळ मिळालंच पाहिजे. "

" बरें दाई, मी शिवपूजा करून येत्यें तोंपर्यंत हिची ( कमलिनीकडे बोट दाखवीत ) व्यवस्था कर. " म्हातारीचें तें गूढ बोलणें टाळण्याच्या हेतूनें तपस्विनीनें म्हटलें.

यावर म्हातारीनें नंतरच कमलिनीविषयीं पृच्छा केली.

" अशीच एक दुःखी– " असें म्हणत तिनें वळून कमलिनीकडे पाहिलें व तिच्या मुद्रेवर आलेली विलक्षण प्रफुल्लता पाहतांच तिला आश्चर्य वाटलें. तें पाहून ती किंचित् हांसत पुढें म्हणाली, " अग वा ! तुझं मन इथें चांगलंच रमलंसं दिसतं ! बरं झालं ! तुला जर इथेंच आनंद वाटला तर खुशाल रहा ! पण एक अट आहे हां ! त्याचें आतांच काय म्हणा; पण उगीच सुचलं. आतां मी शिवपूजनाला

जातें तोंपर्यंत तूं स्नान वगैरे करून घे. ही तुझी आई न्-( म्हातारीकडे बोट दाखवून )-आईच म्हणायची." असें म्हणून तपस्विनी पूजासाहित्य घेऊन तेथून निघून गेली.

तपस्विनी निघून गेल्यावर त्या म्हतारीनें दोन्ही गायींना थोडा वेळ गोंजारलें व त्यांचीं दावीं सोडलीं. अगदीं शिकविल्याप्रमाणें त्या गाई एका पडक्या द्वारांत शिरून अदृश्य झाल्या. नंतर म्हातारीनें ह्या दोन्हीं वासरांनाही सोडून दिलें. वासरें त्या चौकांतील उन्हांत इकडे तिकडे आनंदानें बागडूं लागलीं. 'खेळा गुलामांनो," असें त्या वासरांना उद्देशून म्हणत म्हातारी कमलिनीजवळ आली. कमलिनीला जवळून पाहतांच म्हातारीला आश्चर्य वाटलेंसें दिसलें. कदाचित् कमलिनीप्रमाणें तिला ही कसली शंका आली असेल.

"मुली, तुझें नांव काय ?" म्हातारीनें प्रेमळ स्वरानें विचारिलें.

"कमलिनी." कमलिनीनें नम्रपणें उत्तर दिलें.

नांव ऐकतांच म्हातारी दचकली व तिनें आश्चर्यानें कमलिनीच्या मुद्रेकडे पाहिलें. तें पाहून कमलिनीसही आश्चर्य वाटलें; पण दोघींनींही आपलें आश्चर्य बाहेर परस्परांस दर्शविलें नाहीं.

"चल, आपण अंग धुऊन येऊं. असें ह्मणून म्हातारीनें दोघींना लागणारीं धूतवस्त्रें व दोन तांबे घेतले व कमलिनीला घेऊन ती तपस्विनीप्रमाणेंच त्या वाड्याच्या अनेक दालनांतून, चौकांतुन, अंधेऱ्या भागांतून जात जात बाहेर पडली. तेथून थोड्याच अंतरावर पाण्याचा स्वच्छ ओढा वहात होता. थोड्याच वेळांत दोघीही स्नानें करून परतल्या. या वेळांत दोघीही परस्परांकडे कांहींशा उत्सुकतेनें, कांहींशा आश्चर्यानें पहात होत्या; पण दोघींनी आपण मुळींच झालें नाहीं.

दोघीही वाड्यांत परत आल्यावर म्हातारीनें ओलीं वस्त्रें वाळत टाकलीं व ती स्वयंपाकाच्या तयारीस लागली. कमलिनीनें तिला मदत करण्याची इच्छा दर्शविली; पण तिनें ती प्रेमळपणानें नाकारली.

स्वयंपाकाची जागा उघड्यावरच होती. म्हातारी स्वयंपाक करूं लागली व कमलिनी बसून कधीं तिच्याकडे तर कधीं वासरांचें बागडणें पहात होती. पुष्कळ म्हातारीं माणसें-निदान स्त्रिया- बडबड्या असतात. ही म्हातारीही त्याप्रमाणेंच बडबडी होती खरी; पण कांहीं

विशेष कारणामुळें म्हणा, अगर त्या दोघीही परस्परांस अपरिचित् असल्या कारणामुळें म्हणा, त्या दोघींत विशेष भाषण मुळींच घडलें नाहीं. तरीही कमलिनीस म्हातारीचें हें वर्तन कठोर वाटलें नाहीं.

म्हातारीचा स्वैंपाक पुरा होतो न होतो तोंच तपस्विनी परत आली. येतांना तिनें जंगलांतून कांहीं वनपुष्पें व कांहीं खाण्याजोगीं फळें आणलीं होतीं तीं कमलिनीस देऊन ती हंसत हंसत प्रेमानें तिला म्हणाली, " हेंच माझं आदरातिथ्य बरं कां ? "

कमलिनी यावर कांहीं उत्तर देणार इतक्यांत म्हातारी म्हणाली, " हं कमल, उठ. भूक लागली असेल ना ? "

" दाई ! " तपस्विनीनें एका फुलाचा वास घेत हंसत विचारिलें, " तूं नांवसुद्धां जाणलंस हिचं एकूण ! मला हिचं नांव विचारायची आठवणसुद्धां झाली नाहीं. "

नित्याप्रमाणें त्या तिघींचीं जेवणें आटपलीं. नंतर त्या बोलत बसल्या.

" हं कमल, " तपस्विनीनें प्रेमानें तिच्या पाठीवर हात फिरवीत म्हटलें, " आतां तरी तुझं मन ठीक आहे ना ? आतां तूं आपली हकीकत सांग. दाई, तूंही ऐक. " असें म्हणून तपस्विनीनें थोडक्यांत आपली व कमलिनीची प्रातःकालीं कशी भेट झाली इत्यादि चित्रपटाच्या गोष्टीशिवाय सर्व सांगितलें. म्हातारीनें तें लक्षपूर्वक ऐकिलें. नंतर दोघीही कमलिनीकडे पाहूं लागल्या.

कमलिनीनें कोणताही आड पडदा न ठेवतां, आपण वसंतदुर्गांत कशा रहात होतों, राक्षसनाथानें कुमुदिनीला कशी पळवून नेली, त्यामुळें आपणास किती वाईट वाटलें व दोन तीन दिवस आपलें मन अति उदास झाल्यामुळें आपण तेथून कशा बाहेर पडलों व नंतर आपली तपस्विनीशीं कशी भेट झाली इत्यादि इत्थंभूत कथा सांगितली. दोघींनाही ती हकीकत खरी वाटली व तिची त्यांना दया आली.

" आपण विधवा आहोंत यावद्दल तुला फार दुःख वाटत असेल नाहीं ? " तपस्विनीनें कमलिनीस उद्देशून म्हटलें, " बरोबर आहे ! अशा अल्पवयांत ईश्वरानं तुला वैधव्यांत लोटावी हा अत्यंत निष्ठुरपणाच आहे ! पण बाईग, त्याबद्दल दुःख करून आपल्या मनाला जास्ती त्रास करून घेण्यापेक्षां आलेल्या स्थितीबद्दल कसेंतरी समाधान मानून ईश्वराची

करुणा भाकणं यांनच कल्याण आहे व यांतच अंतीं सुखही आहे. ईश्वर दयाळू आहे, न्यायी आहे, सत्यप्रिय आहे व सर्वांवर सारखी दया करणारा आहे; पण आपल्या कर्मयोगापुढें त्याचासुद्धां इलाज चालत नाहीं. आपणावर संकट आलें असतां, ईश्वराला दोष देण्यांत कांहीं अर्थ नाहीं. संकट आलें असतां त्याची करुणा भाकावी हें खरं; पण त्याची कृपा लवकर न झाल्यास त्याबद्दल त्या दयाघनाला दोष देऊं नये. कारण आपलं एकट्याचंच दुःख त्याला नाहींसं करावयाचं नसतं. आपणा एकट्याचीच प्रार्थना त्यास ऐकावयाची नसते. आपणावरच फक्त त्यास करुणा दाखवावयाची नसते. या अगाध विश्वांतील प्रत्येक प्राण्याचं सुख, दुःख, प्रार्थना त्यास ऐकावयाची असते. प्रत्येक वस्तूचीं सुत्रें त्यास हलवावयाचीं असतात. ईश्वर सर्वशक्ति आहे हें खरं; पण प्रत्येक गोष्ट क्रमाक्रमानें व्हावी लागते. जगांतील प्रत्येक गोष्ट क्रमाक्रमानं चालली आहे व म्हणूनच जगाचं रहाटगाडगं सुरळीत चाललं आहे. आपली ही प्रार्थना लवकरच ऐकली जाईल, अशी भावना ठेवून सत्कर्म करीत रहावं हेंच योग्य. नाहींतर सुखाचा काल आला असतां ईश्वराकडे ढुंकूनसुद्धां पहावयाचं नाहीं व संकटप्रसंगीं त्याची मदत मागायची हा किती वेडेपणा आहे बरं ?

" मनुष्याची नेहमीं स्वतःला सुख मिळावं अशी इच्छा असते; मग तें खरं सुख मिळविण्याकरितां तो का दरं प्रयत्न करीत नाहीं ? सांसारिक सुख मिळण्याला संपत्ति पाहिजे, पण ती पैदा करण्याकरितां किती मनुष्यें सन्मार्गानं चालतात बरं ? का सन्मार्गानें संपत्ती मिळत नाहीं ! स्वतःला सुख मिळविण्याकरितां दुसऱ्या प्राण्याला दुःख देण्यास जर नेहमीं तयार असायचं तर मग इतर प्राणी तरी आपल्या सुखाविषयीं कां काळजी करतील ? मनुष्याला सुख पाहिजे असल्यास, माझ्यामतें तर त्यानें सर्व प्राण्यावर प्रेम करण्यास शिकावं, हाच उत्तम मार्ग होय. प्रेमामुळें सर्पासारखा विषारी प्राणी व सिंहासारखं क्रूर जनावरही प्रेम करण्यास शिकतं; मग मनुष्य तर शिकेलच शिकेल. अहाहा ! या सृष्टींतील सर्व प्राणी जर एकमेकांवर प्रेम करूं लागले तर काय मौज होईल. पण छे, असं होणं शक्य नाहीं व योग्यही नाहीं. तरी पण मनुष्यांनीं तरी एकमेकांचा विनाकारण द्वेष करूं नये. " अशाप्रकारें

तपस्विनी कमलिनीला प्रेमाचा उपदेश करीत होती. इतक्यांत तिला कसलीशी आठवण झाली. ह्मणून तिनें कमलिनीस थोडीशी वामकुक्षी घेण्यास सांगून ती तेथून निघून गेली. ह्मातारी दाईही आपल्या खोलींत जाऊन पडली. कमलिनी तेथेंच कांहीं विचार करीत बसली. अशाप्रकारें ती किती वेळ विचारांत बसली असेल; तें तिचें तीच जाणें. अकस्मात् एका आवाजानें तिची विचारतंद्रा भंग पावली व तिनें दचकून पाहिलें तों जो चित्रपट पाहण्याविषयीं ती इतकी उत्सुक होती व ज्याबद्दल तपस्विनीनें तिला 'तो पाहण्याची इच्छासुद्धां धरूं नकोस' म्हणून बजाविलें होतें, तोच चित्रपट तिच्यापुढें उताणा पडलेला तिच्या दृष्टीस पडला! आश्चर्य व भीति या दोन विकारांनीं गोंधळून गेलेल्या मनानें ती त्या चित्रपटाकडे पाहूं लागली!

---

प्रकरण बारावें.

## अजसेनाच्या वाड्यांत.

धनाढ्य अजसेन आपल्या वाड्याच्या एका भव्य व शृंगारलेल्या महालांत कांहीं विचार करीत पडले होते. त्यांच्या विचाराची दिशा कोणती होती, हें समजणें मोठें कठीण! कधीं स्वारी उठून मोठमोठ्यांदा हंसूं लागे, कधीं पाठीमागल्या तक्यांत तोंड खुपसून मुसमुसूं लागे, कधीं उभें राहून त्या महालांत पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणें जोरा जोरानें येरझाऱ्या घालीत असे, कधीं क्रोधानें आपलेच ओंठ करकरा चावीत असे, कधीं कांहीं, कधीं कांहीं अशाप्रकारें त्यांचें सारखें सुरूं होतें. त्यांच्या शरीराला व मनाला स्वस्थता म्हणून दिसत नव्हती. हें काय बरें? अजसेनाला वास्तविक काय कमी होतें, ह्मणून त्यांची अशी स्थिति होती? त्यांच्या वयाला फक्त सत्तावीसच वर्षे लोटलेलीं दिसत होतीं. अर्थात् भर तारुण्याचा त्यांचा समय होता. शरीर कोणत्याही प्रकारें दुर्बल नसून चांगलें सशक्त होतें. त्यांच्या अवयवांतही कांहीं व्यंग

दिसत नव्हतें. पहाणारास त्यांचें शरीर सुंदर, मजबूत व निर्व्यंग दिसत होतें. अर्थात् शारीरिक पिडा दिसत नव्हती, मग त्यांची अशी स्थिति कां व्हें ! संपत्तीची त्यांना कोणत्याही प्रकारें वाण नव्हती. उज्जयिनींत जे मोठमोठे उच्चवंशीय धनाढ्य पुरुष म्हणून मानिले जात असत त्या सर्वांत हे अग्रेसर होते. प्रत्यक्ष उज्जयिनीचे तत्कालीन राजपुरुष यांचा आदरसत्कार करीत असत. अशा प्रकारें संपत्ती, तारुण्य, मान, शरीर-सौंदर्य व उच्च कूल इत्यादि सांसारिक सुखाच्या सर्व बाजू पूर्णपणें अनुकूल असतां अजसेनाची अशी अवस्था कां व्हें ? अथवा तारुण्याच्या मदानें व संपत्तीच्या गर्वानें त्यांनीं कांहीं निंद्य कर्म तर केलें नव्हतें ? पण मुद्रेवरून अजसेन एक सज्जन पुरुष दिसत असत. त्यांच्या हातून एखादें दुष्कृत्य घडलें असेल अगर तें करण्याचा त्यांचा विचार असेल, ही शंका घेणेंसुद्धां मूर्खपणा आहे. असें असूनही अजसेनास सुख कां व्हें नसावें ? पण ऐका ! त्यांच्या तोंडूनच कांहीं उद्गार बाहेर पडत आहेत. मनुष्याच्या कृतीनें जरी त्याच्या मानसिक विचारांचा ठाव लागणें कठीण असतें, तरी त्याच्या भाषणानें त्याचा अंतर्गत विचार कळणें शक्य असतें. एका मोठ्या आरशापुढें उभें राहून ते जोरानें डाव्या हातावर उजव्या हाताची मूठ मारून म्हणाले, " अं ! एकंदरींत लोक मला वेडा म्हणतात ! माझा मेंदु बिघडला आहे म्हणतात, पण मी म्हणतों, वेडा, वेडा म्हणजे काय ? काय त्याला दोन शिंगें फुटतात कीं आणखी कांहीं होतें ? मला वाटतें, लोकच वेडे ! होय ना आरशा ? अरे लेका हूं म्हण ! तुझ्या बापाचे काय तीन चव्वल खर्च होतात ' हूं ' म्हणायला ! अरे, पण आरसा ही निर्जिव वस्तु ! ती बोलणें शक्य नाहीं. नाहींतर एखाद्या खुशामती नंदीबैलाप्रमाणें त्यानेंही माझ्या होला हो ठोकून मान डोलाविली असती. ( आरशांत आपलें रूप पहात ) छे, मी तर वेडा दिसत नाहीं ! ( हंसून ) छे, दुनियाच वेडी, म्हणून तर माझ्या पाठीमागें ती लागते. हो हो, मी-मी ( सुरांत ) वेडा-वेडा-नाहीं ! मी शहाणा, मी शहाणा अकलेचा दाणा ! ( थोडा वेळ नाचतो ) अस्सें. ( छाती वर काढून ) हीं वेड्याचीं कां चिन्हें ? छे, आतां जर लोक मला वेडा म्हणतील, तर मी खासा संन्यास घेणार ! बस्स ठरला निश्चय. ( आपली पाठ थोपटून ) शाबास

आहे माझ्या अकलेची ! अकलेचा दाणाच कीं नाहीं मी ? कशी छान युक्ति काढली शोधून ? ( दचकून ) अरे पण, या अशाच माझ्या कृतीला लोक 'वेडा' हे नांव देतात. हें सोडून देऊं ? नको पण. ( इकडे तिकडे पाहून ) अरे, कोणी नोकर चाकर पहात तर नाहीं ? नाहीं, कोणी नाहीं ! अहाहा ! सर्व दुनियेचे डोळे फुटले तर किती बहार होईल ! मला खुशाल नागवें हिंडायला सांपडेल. पण ही आमची नाजुक परी मला नाहीं हिंडूं देणार तसा ! तेव्हां हिचेच डोळे प्रथम फुटले पाहिजेत. नाहीं, आज ती माझ्याजवळ आली कीं नाहीं ह्मणजे खुपसतो हीं दोन्हीं बोटें ! पण नको. ती शहाणी आहे. माझ्यावर तिचें फार प्रेम आहे ! मी असे वेडयासारखे चाळे करतों हें पाहून तिला किती दुःख होतें ! खरेंच ( डोळे पुसून ) इंदु ! मला तुझ्याबद्दल फार वाईट वाटतें ! मी वेडा खराच ! आतां काय बोलतों व दुसऱ्या-वेळीं काय बोलत होतों, हें माझें मलाच समजत नाहीं ! माझें डोकें फिरल्यासारखें वाटतें. ( आरशांत पाहून ) पण छे, तें जिथल्या तिथेंच आहे ! मग मी असा कां बरें ? मला कां दुःख व्हावें ? खरें, खरें ! लोक मला 'वेडा' ह्मणतात, . त्यामुळें मी चिडतों व उगीच आपल्या मनाला त्रास करून घेतों. याला युक्ति काय करावी बरें ? हो, माझी इंदु सांगतें तसंच करावं. मी 'वेडा' हा विचारच सोडून द्यावा. स्वस्थ एकांतांत ईश्वराचें नामस्मरण करीत बसावें. मी अगदीं शहाणा जरी नाहीं तरी अगदीं वेडाही पण नाहीं. माझ्या मनाला नेहमीं कांहीं तरी वेडयासारखें करावें असें वाटतें; पण लोक मला चिडवून त्रास देतात. त्यामुळें त्या रागांत नानाप्रकारचे वेडे चाळे माझ्या हातून घड-तात. यापेक्षां थोडे दिवस एकांतांत काल काढावा हें बरें. ईश्वरा ! मला चांगली बुद्धि दे !" असें ह्मणून स्वारी पुनः लोडाशीं टेकून स्वस्थ पडली.

वरील सर्व भाषण वाचून वांचकांनीं जर अजसेन भ्रमिष्ट होता, अशी कल्पना केली असेल तर ती कांहीं खोटी नव्हती. अजसेनाच्या ह्मणण्याप्रमाणें तो खास शहाणाही नव्हता व वेडाही नव्हता. तो केव्हां केव्हां वेडयासारखें वर्तन करी हें खरें; पण तो थोडया वेळानें शुद्धी-वर येत असे. त्याला जगांत चाललेल्या प्रत्येक गोष्टीचें ज्ञान होत

असे. त्याला सर्व चांगलें वाईट समजत असे; पण दुःखाची गोष्ट ही कीं, दुसऱ्याचें अहित चाहणाऱ्या दुष्ट जनांपैकीं पुष्कळ दुष्ट अजसेनाला जास्त बिघडवीत होते. त्याचा मासलाच पहावयाचा असल्यास वाचकांनीं आमच्या पुढील कथेकडे लक्ष पुरवावें.

दुपारची वेळ होती, पण अजसेनाचें भोजन अद्याप झालें नव्हतें. त्याला चांगली क्षुधा लागली होती ह्मणून त्यानें एका नोकरास हाक मारून भोजनाची तयारी झाली कीं नाहीं ह्मणून विचारिलें. नोकरानें नम्रपणें वेळ लागण्याचें कारण सांगून तेथून गमन केलें. तो गेला इतक्यांत लागलींच अजसेनाचे दोन मित्र महालांत शिरले! अजसेन अर्धवेडा होता ह्मणून म्हणा अगर निष्कपटी होता ह्मणून म्हणा, दुसऱ्याचें कपट त्याच्या लक्ष्यांत क्वचित् येई. आलेले दोन मित्र आपली विशेष थट्टा करतात व आपणाला जास्ती भडकवितात हें त्यास समजत असे; पण त्यांचें येणें बंद करावें, असें त्यास कधींही वाटलें नाहीं. ते दोघे येतांच अजसेनानें उठून सभ्यतेनें त्यांना बसण्यास सांगितलें. यावेळीं त्याचें डोकें खरोखरींच शांत होतें. तो किंचित् हंसून ह्मणाला, "कां शैलोदर, (दुसऱ्याकडे वळून) कसें काय विषकुंभ, आज लवकरसे आलांत?"

यावर त्या दोघांची नेत्रपल्लवी भाषा झाली. पण पुढील हकीगत सांगण्यापूर्वी या दोघा विभूतींचा परिचय करून देणें व परिचय करून घेणें हें आमचें व वाचकांचें मुख्य कर्तव्य होय.

शैलोदराचें थोडक्यांत वर्णन करणें ह्मणजे आमच्या पुण्यनगरस्थ वाचकांनीं पर्वतीलाच लठ्ठ हात पाय व एक लहानसें डोकें आहे, अशी कल्पना करावी. इतर वाचकांनीं आपआपल्या नगराच्या आसपासच्या एखाद्या टेंकडीला डोकें व हात पाय कल्पून शैलोदराचें काल्पनिक दर्शन घ्यावें. ज्यांच्या गांवाला टेंकडीच नाहीं अगर ज्यांनीं टेंकडी पाहिली नाहीं असा वाचक मिळणेंच मुष्कील. कदाचित् असल्यास त्यांना एक सोपी युक्ति सांगून आह्मी आपलें कथानक पुढें चालवितों. त्यांनीं एक मातीचा गोळा तयार करून त्यावर आणखी एक लहान गोळी चिकटवावी व नंतर त्या मोठ्या गोळ्याच्या खालच्या

बाजूस दोन काटक्या व वरच्या दोन्ही बाजूंस दोन काटक्या अशा लावून शैलोदरांच्या मृत्तिकामूर्तीचें दर्शन घ्यावें. अस्तु.

विषकुंभाचें वर्णन आमच्या शक्तीच्या बाहेरचें आहे, तरी पण त्यांचेंच पादवंदन करून यथाशक्ति वर्णन करितों. विषकुंभ निःसंशय एक सुंदर नररत्न असतें; पण— ! त्यांचे केश जर राठ आणि भुरटे नसते तर, त्याचें शिर अयोग्य प्रमाणांत नसतें तर, त्यांचे कान बारीक नसते तर, त्यांचें तोंड आंबोळीसारखें नसतें तर, त्यांचे नेत्र लांडग्यासारखे क्रूर व लाल नसते तर, त्यांची मुद्रा शृगालासारखी कावेबाज नसती तर, ते शरीरानें आंखुड नसते तर; पण पुरे. वरील गोष्टी नसल्या तर विषकुंभ साक्षात् मदनाचेच अवतार असते, हें जन्मांधालासुद्धां कबूल करावें लागतें; पण—पण !

" काय विषकुंभ ? " शैलोदर आपलें बूड टेकीत विचारतात, " हरलाना ? टाका आतां पैजेच्या शंभर मोहरा ! "

' कसली बोवा पैज ? " अजसेनानें आश्चर्यानें विचारिलें.

पण त्याच्या प्रश्नाकडे लक्ष देतो कोण ! शैलोदर मध्येंच विषकुंभाला उद्देशून ओरडले, " हं विषकुंभ, हें दुसरें प्रमाण. झालें, काढा आतां शंभर मोहरा. तरी मी सांगत होतों कीं, पैजेच्या भानगडींत पडूं नका म्हणून ! "

" थांबा, थांबा. असे उतावीळ होऊं नका ! " विषकुंभ शांतपणें उद्गारले.

" अहो, पण कायहो विषकुंभ, " अजसेन गोंधळून म्हणाला, " कसली पैज ? शंभर मोहरा कसल्या ? काय भानगड आहे ही ? कायहो शैलोदर ? "

शैलोदर अजसेनाकडे दुर्लक्ष करून ह्मणाले, " हें तिसरें प्रमाण. शाबास आहे माझ्या अकलेची व धन्य आहे माझ्या भाग्याची. कसें बसल्या बसल्या शंभर मोहरा— "

' तर—तर " विषकुंभ मध्येंच बोललें, " फुकटच्याच आल्या आहेत! "

" फुकटच्याच नाहीं तर काय ? " शैलोदर आपल्या लहानशा पोटावरून हात फिरवीत ह्मणाले, " मी काय कुणाची नोकरी करायला गेलों होतों ! विन श्रमाचें द्रव्य आहे, हें अजसेनसुद्धां कबूल करतील. "

" कसलें द्रव्य ? " अजसेनानें आश्चर्यानें विचारिलें. पण ज्याचें नांव नें. अजसेनाची तृप्ती त्या दोघांपैकीं एकानेंही केली नाहीं.

" पण देतो कोण तुह्माला शंभर मोहरा ? " विषकुंभानें हंसून विचारिलें.

" ह्मणजे ? " शैलोदर किंचित् क्रुद्धित होऊन ह्मणाले, " तुह्मी मला देणार नाहीं ? "

" काय ? " विषकुंभानें मध्येंच हंसून विचारिलें.

" काय ह्मणजे ? मोहरा ! पैजेच्या शंभर मोहरा समजलांत ? " शैलोदर ओरडून म्हणाले, " समजलांत कां ? पैजेच्या शंभर मोहरा ! "

" अरे पण कसली पैज ? " अजसेनानें स्तंभित होऊन प्रश्न केला. पण या प्रश्नाकडे लक्ष देतो कोण !

" हें घ्या पुनः प्रमाण. " शैलोदर पुनः ओरडले.

" अहो, पण कसले प्रमाण ? काय भानगड आहे सांगा तर खरें ? " अजसेनानें किंचित् त्रासून विचारिलें. यावेळीं पुन्हां त्या दोघांची नेत्रपल्लवी झाली.

" हें पहा शैलोदर, " विषकुंभ गंभीरपणें म्हणाले, " उगीच भाराभर प्रमाणें देऊन कां कुठें पैज जिंतली जाते ? त्याला प्रत्यक्ष प्रमाण पाहिजे व तें सत्य पाहिजे समजलांत ! "

" असें काय ? " शैलोदर मुद्दाम क्रोध आणून म्हणले, " एकंदरींत इतकीं प्रमाणें दिलीं तीं सर्व खोटीं ! मला वाटतें तुमचें डोकें बिघडलें आहे ! "

" विचार करा. " विषकुंभ गंभीरपणें बोललें, " कदाचित् तुमच्याबरच तो आरोप बरोबर लागू पडेल. "

" असें, " शैलोदर अजसेनाकडे पहात मान डोलवीत म्हणाले, " आतां मी समजलों खरें कारण ! अरे विषकुंभ, तुझ्याजवळ जर मोहरा नसल्या तर नको देऊं. पण पैज हरल्याचें तर कबूल करशील. "

" काय म्हणून ? " विषकुंभ सगर्व ह्मणाला, " पैज हरलों तर दोनशें मोहरा देईन—दोनशें ! समजलांत ! "

" तुझे डोळे फुटले आहेत असें दिसतें. "

पण विषकुंभानें शैलोदरास बोलूनच दिलें नाहीं. तो मध्येंच रागानें

ओरडला, " शैलोदर, सांभाळा, तोंड आवरून बोला ! नाहींतर पोट पातळ— "

" तूं—तूं करणार होय ? " शैलोदरानें आपलें पोट घुसळीत विचारिलें.

" हो हो. मी ! " विषकुंभ छातीवर हात ठोकून उद्गारला.

" माकडा— " शैलोदर दांत चावीत ओरडले.

" वांदरा— " विषकुंभ कोसळले.

" लब्बाड उंदरा— " शैलोदर उडत ओरडले.

" कायरे, काळ्या मांजरा ! " विषकुंभ उभे राहिले.

" देऊं का ? "

" घेशील का ? " आणि त्या दोघांचे हस्तपादादिक अवयव साभिनय लीला करूं लागले ! बिचारा अजसेन तें पहात स्तब्ध राहिला.

" अहो विषकुंभ, अहो शैलोदर, उठा हें काय ? " अजसेन त्या दोघांना बाजूला सारीत ह्मणाला.

" जिरली ना ? " शैलोदर आपलें पोट सावरीत ओरडले.

" तुझी— "

इतक्यांत नोकरानें येऊन अजसेनास भोजनास चलण्यास सांगितलें. अजसेनानें त्यास ' लवकरच येतों. तूं जा. ' ह्मणून सांगितलें. नोकर निघून गेला.

" थांबा अजसेन. " शैलोदर अजसेनाचा हात धरून ह्मणाला, " आमचा निकाल करून मग जा. "

" कसला निकाल ? " अजसेनानें आश्चर्यानें प्रश्न केला.

" आमच्या पैजेचा. विषकुंभ पैज हारून—"

" अगदीं खोटें ! " विषकुंभ मध्येंच ओरडला, " शैलोदर हरला. "

" कसली पैज ? काय भानगड आहे ? मला कांहीं समजलें नाहीं."

" मी सांगतों. " शैलोदर गंभीरपणें बोलला, " काल रात्रीं विषकुंभाची व माझी एक पैज लागली. "

" कशाबद्दल ? " अजसेनानें प्रश्न केला.

विषकुंभ ह्मणाला, " अद्याप अजसेन भ्रमिष्टच आहेत. "

हा वेळपर्यंत अजसेन खरोखरीच सर्व गोष्टी विसरून गेला होता व त्याचें डोकें थंड होतें; पण ' अजसेन भ्रमिष्ट ' हीं अक्षरें कानीं पडतांच

त्याचें मन चंचल झालें. तो कावऱ्याबावऱ्या दृष्टीनें दोघांकडे पाहूं लागला व त्यानें दोघांसही प्रश्न केला, " खरोच का मी भ्रमिष्ट आहें ?"

यावेळीं पुनः त्या कपटपटूंची सहास्यनेत्रपल्लवी झाली.

" सैच-सैच " विषकुंभ मध्येंच ओरडला. " माझें म्हणणें, तुम्ही भ्रमिष्ट आहांत व शैलोदर म्हणतो, तसें नाहीं. हीच आमची पैज. मग सांगा पाहूं तुम्ही भ्रमिष्ट आहांत कीं नाहीं ? "

" मी म्हणतों, वेडेपणाचें एकही चिन्ह यांच्यात दिसत नाहीं. " शैलोदर गंभीरपणें बोलले.

" मग आतां तुमचेच डोळे फुटले आहेत, असें म्हणणें भाग आहे." विषकुंभ बोलले, " पहा ! जरा यांच्या चेहऱ्याकडे तर पहा ! ती डोळ्यांतील तारवटी, चेहऱ्यावरील कावरेबावरेपणा, मनाची चंचलता, छातीचें धडधडणें इत्यादि पहा तर खरें ! याशिवाय आणखी भ्रमिष्ट-पणाचीं चिन्हें तीं कोणतीं असायचीं ? एखादें लहान मूलसुद्धां यांच्या चेहऱ्यावरून हे पुरे भ्रमिष्ट असल्याचें ओळखील. फार कशाला, मी आरसा आणतों, त्यांत पाहून अजसेन स्वतःच खरें काय तें सांगतील ! कसें हो ? " असें म्हणून त्यानें आरसा आणून अजसेनाच्या तोंडासमोर धरला व त्यास उद्देशून म्हटलें, " अजसेन, आपला चेहरा नीट न्याहा-ळून पहा बरें ! ती डोळ्यांतील विलक्षण लाली पाहिलीत ? माथेफिरू-पणाची ती एक मोठी निशाणी आहे. तसेंच– " इतकें बोलून विषकुंभ थांबले व तीक्ष्ण नजरेनें त्याकडे पाहूं लागले.

अजसेन यावेळीं खराच गोंधळून गेला. एकंदरींत आपण खरोखरीच माथेफिरू आहोंत असें त्यास वाटलें. विषकुंभ खोटें सांगत असेल, असा त्यास संशयसुद्धां आला नाहीं. तो आरशावर हात मारून म्हणाला, " समजलों. मी भ्रमिष्ट आहें. केव्हां केव्हां मला वाटतें मी शहाणा आहें; पण मी वेडाच ! "

" यांत शंका मुळींच बाळगूं नका. " विषकुंभ गंभीरपणें म्हणाले, " नाहींतर तुम्ही ' माथेफिरू ' आहांत असें सांगण्यांत मला फायदा तो काय ? तुम्हाला माझी हिताची सल्ला आहे कीं, तुम्ही लवकरच कांहीं औषधपाणी घेऊन मेंदूला बरें करण्याची व्यवस्था करावी. नाहींतर पुढें रस्त्यानें भागवें हिंडून लोकांना दगड मारीत फिरण्याची तुम्हाला खास

पाळी येईल. तुम्हाला खरें सांगूं कां ? रात्रीं तुह्मी पाहिजेल तिकडे नागवें उघडे हिंडतां ! पुष्कळांनीं तुम्हाला अशा स्थितींत पाहिलें आहे!"

" काय ? मी रात्रीं हिंडतों आणि नागवा ? " अजसेन विस्मित होऊन ह्मणाला, " पण मला तर वाटतें मी घरींच असतों ! "

" मग भ्रमिष्टपणा म्हणायचा तो कशाला ? तुह्मीं करतां एक आणि तुम्हाला वाटतं एक व तुम्ही करीत असतां भलतेंच. आतां आम्ही येण्या-पूर्वीं तुह्मी नागवें होऊन नाचत होता इकडे तिकडे ! आम्ही येऊन तुम्हाला धोतर नेसवून बसविलें. "

वाचकांनो ! सांगा खरें अशा प्रकारच्या विचित्र गप्पा उडवून एखाधा मोठ्या शहाण्या हुरल्या मनुष्यालाहखां घटकाभर भ्रमिष्ट करतां येणार नाहीं काय ! मग अजसेनासारख्या अर्धवटाची काय कथा खरें ?

" खरेंच ! " अजसेन भ्रमिष्टपणानें हंसून म्हणाला, " नागवें होऊन नाचण्यांतच मोठी मौज आहे ! वस्स आनंदी आनंद ! नाचा, तुम्हीही माझ्या बरोबर नाचा ! ओरडूं कां? मोटयांदा ओरडावें, धोतरें फाडावींत यांतच मजा ! इथें मी आहें आणि तिथें तुम्ही ! वाहवा, वाहवा, वाहवा ! ! " असें म्हणून अजसेन खरोखरच नाचूं लागला.

" आतां ? " विषकुंभ डोळे मिचकावून हंसत शैलोदरास म्हणतों, " सांगा पाहूं कोण हरलें तें ? "

पण शैलोदरानें तिकडे लक्ष दिलें नाहीं. तो अजसेनाला थांबवून म्हणतों, " अहो महाराज, माझ्या शंभर मोहरा टाका पाहूं ! कारण मी तुमच्यावर विश्वास टाकून शंभर मोहरा हरलों ! "

" आणि मी मित्रा– " विषकुंभ अजसेनाच्या खांद्यावर हात टाकून म्हणाला, " तुमच्या नांवावर शंभर मिळविल्या. तेव्हां त्याच्या शंभर मोहरापेक्षां माझ्या बक्षिसाच्या शंभर मोहरा प्रथम मोजा पाहूं. मग पाहिजे तर दिवसभर नाचत बसा. "

## प्रकरण तेरावें.

## प्रणयी वाङ्निश्चय.

आपल्या महालांत आपण निद्रावस्थेंत असतां कला कां आली? अशी शंका नवीनचंद्राच्या मनांत आली व त्यास आश्चर्य वाटलें. तो तिच्याकडे कितीवेळ तरी पहात राहिला. कला धर्मचंद्राचा निरोप सांगण्याकरितां तेथें आली होती खरी; पण नवीनचंद्राची व तिची दृष्टा-दृष्ट होतांच व त्या नेत्रमीलनांतील प्रेमभाव समजतांत कलेला इतका आनंद झाला व इतकी लाज वाटली कीं, ती ज्या कामाकरितां तेथें आली होती, तें ती अगदीं विसरून गेली. कितीवेळ तरी ती खालीं मान घालून जमिनीकडे पहात उभी होती. अशाप्रकारें बराच वेळ गेला. इतक्यांत नवीनचंद्रास दुपारच्या प्रसंगाची आठवण झाली. कलेच्या मनांत आपल्यास कांहीं सांगावयाचें आहे; पण लाजेमुळें म्हणा अगर दुसऱ्या कांहीं कारणामुळें म्हणा, तें सांगवलें जात नाहीं असें त्यास वाटलें. म्हणून त्यानें कांहीं गांभिर्यानें, कांहीं प्रेमस्वरानें तिला विचारिलें, "मला वाटतें, आपल्याला मला कांहीं सांगायचें आहे. खरोखरीच जर कांहीं सांगावयाचें असलें तर तें आपण खुशाल सांगा. माझ्याकडून तुमचें काम होण्यासारखें असल्यास मी अवश्य करीन." हें त्याचें भाषण ऐकून कलेला काय वाटलें असेल बरें?

"आज संध्याकाळीं बागेंत--" कला अस्फुट स्वरांत मोठ्या कष्टानें पुटपुटली. इतकेंच पुटपुटून ती चुप्प राहिली. पण इतक्यांत तिला धर्मचंद्राच्या निरोपाचें स्मरण झालें. ती चपापली. आपण हें भलतेंच काय बोलून गेलों असें तिला वाटलें. नवीनचंद्रासही तिच्या अर्धवट बोलण्याचा पूर्ण अर्थ समजला नाहीं. त्यानें किंचित् आश्चर्यानें विचारिलें, "बागेंत काय?"

यावर कला काय उत्तर देणार? ती पुटपुटली, "छे, तसें नव्हे. महाराजांनीं (धर्मचंद्रानीं) आपणास आत्तां बोलाविलें आहे." असेंच कांहींसें पुटपुटत कला नवीनचंद्राकडे एक प्रेमकटाक्ष फेंकून तेथून

घालती झाली. तिचें हें वर्तन पाहून नवीनचंद्रास मोठेंच आश्चर्य वाटलें. इतक्यांत त्याची दृष्टी पुढ्यांत पडलेल्या कलेच्या पत्राकडे गेली. 'हें पत्र कुणाचें ?' असें म्हणत त्यानें त्याची घडी उलगडली व तें पत्र वाचलें तेव्हां त्यास सर्व गोष्टीचा उलगडा पडला. पण कलेनें "महाराज बोलावताहेत" असें कां सांगितलें? कला खोटें तर बोलली नसेल, अशी क्षणिक शंका नवीनचंद्रास आली.

'प्रेम अंध आहे' असें म्हणतात. मनुष्य ज्या वस्तूंवर प्रेम करतो, त्यांतील व्यंगाविषयीं तो फारसा विचार करीत नाहीं हें खरें; पण आमक्या प्रकारचें व्यंग आपल्या वस्तूंत आहे, हें त्यास समजल्यास वाईट वाटतें व तें व्यंग त्या प्रियकर वस्तूंतून नाहींसें करण्याकरितां त्याची खटपट सुरू होते.

नवीनचंद्राचीही अशीच गोष्ट होती. कलेवर त्याचें अकृत्रिम व अक्षय प्रेम जडलें होतें; पण कला भित्री आहे हें समजतांच त्यास किंचित् दुःख झालें व तो अवगुण काढून टाकण्याविषयीं त्यानें तिला उपदेश केला. पण कला खोटेंही बोलत असावी, अशी जेव्हां त्यास शंका आली तेव्हां त्यास फारच वाईट वाटलें. कला मुद्दाम खोटें बोलली नसेल, असें जरी त्यास वाटलें, तरी ती खोटें बोलली हें ठीक नाहीं असें त्यास वाटूं लागलें. अशाप्रकारें तो संदिग्ध विचारांत असतां कोणाची बाहेर चाहूल लागली. म्हणून त्यानें कलेचें पत्र लपवून ठेवलें व तो पलंगावरून खालीं उतरणार इतक्यांत महाराज धर्मचंद्र आंत आले.

"काय निजला होता कीं काय ?" धर्मचंद्रानें प्रश्न केला.

"हो, जरासा डोळा लागला होता."

"मग कलेनें आपणास मुद्दाम जागें केलें कीं काय ?" धर्मचंद्रानें विचारिलें, "तिला मी फक्त आपणास बोलावण्यास सांगितलें होतें. काम कांहीं विशेष महत्वाचें नव्हतें." असें म्हणत धर्मचंद्र जवळच असलेल्या एका खुर्चीवर बसले. नवीनचंद्रही दुसऱ्या एका खुर्चीवर बसला. धर्मचंद्राचें वरील भाषण ऐकतांच कलेविषयीं त्यास आलेली शंका नष्ट झाली व त्यास आनंद झाला.

इकडे कला नवीनचंद्राच्या महालांतून जी निघाली, ती थेट आपल्या महालांत जाऊन बसली व तिनें महालाचें द्वार आंतून घट्ट लावून घेतलें.

नवीनचंद्र आपल्यावर उलट प्रेम करीत आहेत, हें पहातांच कलेस अवर्णनीय आनंद झाला. अर्थात् तो आनंद तिच्या चेहऱ्यावर पूर्ण उमटलेला दिसत होता. आपल्या चेहऱ्यावरून कोणी आपलें मनोगत ताडील या भीतीनें व त्यांत तिला नवीनचंद्राचें पत्रही पहाण्याची अत्युत्कंठा असल्यामुळें ती आपल्या महालांत जाऊन बसली व ओटींतून तें पत्र काढून तिनें तें लक्षपूर्वक वाचण्यास प्रारंभ केला.

बहुतेक सर्वांना दुसऱ्यांचें रहस्य अगर गुप्त गोष्टी पाहूं नयेत, ऐकूं नयेत व त्या पहाण्याबद्दल किंवा ऐकण्याबद्दल खटपट करूं नये इत्यादि वेदांत समजतो; पण तें आपल्यास समजूं नये अशी त्यांची केव्हांही इच्छा नसते. उलट तें समजून घेण्याची त्यांची अत्यंत इच्छा असते. याच न्यायाला अनुसरून आमच्या वाचकांपैकीं बहुतेकांना नवीनचंद्रानें कलेला काय लिहिलें असावें, हें जाणण्याविषयीं अत्यंत इच्छा असेल. त्याकरितां आम्ही तें पत्र जसेंच्या तसेंच खालीं देतों.

" प्रिय कले,

मी तुला ' प्रिय ' हें विशेषण दिलें, म्हणून तुला राग तर येणार नाहीं ? आल्यास त्याबद्दल मी तुझी क्षमा मागतों; पण मी आपल्या हृदयांत तुला प्रियच समजत असल्यामुळें तें सहज लिहिलें गेलें. आतां मी तुला पत्र तरी कां लिहितों ? अशी तुला शंका येईल. पण त्याचें कारण मलासुद्धां सांगतां येणार नाहीं. मग मी तें पत्रांत तरी काय लिहूं ? तुझ्या एकंदर हावभावावरून तूं माझ्यावर अनुरक्त असावीस असें वाटतें; पण ती शंका आहे. खरेंच कले, प्रिय कले, माझी ही शंका निवारण करशील कां ? मी आल्यापासून व तुझी रमणीय मूर्ति पाहिल्यापासून मी तुझ्यावर मोहित झालों आहे. मी तुझ्यावर प्रेम करूं लागलों आहे. तुझी सुंदर छबी दिनरात्र माझ्या अंतःकरणांत वास करीत आहे. खरेंच कले, याचा मोबदला मिळेल कां ? तूं माझ्यावर प्रेम करीत आहेस काय ? मी आज रात्रीं इथून जाणार. कुठें जाणार, कां जाणार व जाऊन काय करणार हें मला आतांच सांगतां येणार नाहीं. तुझ्यावर माझा विश्वास नाहीं म्हणून मी तें तुला कळवीत नाहीं, असें मुळींच समजूं नकोस. पण मीं तें कुणालाच न सांगण्याचा निश्चय केला आहे. म्हणून म्हणा अगर अद्याप पुढें काय करावयाचें हें ठरलें

नाहीं म्हणून म्हणा मला तें कळवितां येत नाहीं. महाराजा धर्मचंद्रांना-सुद्धां मीं तें सांगितलें नाहीं. कसेंही असो, आज रात्रीं मी जाणार हें खास. त्या जाण्यापूर्वी एका गोष्टीचा निकाल करून घ्यावा अशी इच्छा झाली व तुला प्रत्यक्षच विचारावें असा विचार केला; पण संधी मिळेल कीं नाहीं याची शंका वाटते. मग खरेंच सांग पाहूं तुझें माझ्यावर प्रेम आहे का? प्रेम असल्यास आज संध्याकाळीं बागेंत येऊन भेट. जास्त पत्रांत लिहितां येत नाहीं. येशील का बागेंत?

प्रेमोत्सुक नवीनचंद्र. "

एकदां—दोनदां—तीनदां—कितीवेळां तरी कलेनें तें पत्र पुनः पुनः वाचलें. काय तें पत्र इतक्या कठीण भाषेंत होतें? का त्याचें अक्षर गिचमिट होतें? कोणत्या कारणामुळें कलेनें तें इतक्यावेळां वाचलें? तें पत्र तिला नवीनचंद्राचा सुमधूर संदेश सांगत होतें! हेंच त्या पत्राच्या पुनर्वाचनाचें कारण असेल.

संध्याकाळ जवळ येत चालला. सूर्यास्त होण्यास दोन तीन घटकाच अवकाश होता. सूर्य पश्चिम दिग्वधूला भेटण्याकरितां मोठ्या झपाट्यानें आपला रथ हांकीत होता. दिनकरच जर आपल्या प्रिय वस्तूला भेटण्याकरितां इतका उत्सुक असून जगाला कोण प्रकाश देईल याची काळजी न करितां त्याला अंधःकारांत लोटण्यास तयार होता तर मग इतर लहानमोठ्या वस्तूंची काय कथा बरें? उज्वल आकाश सूर्याचा हा विश्वासघात पाहून पूर्वेकडील बाजूनें हळूं हळूं काळें पडूं लागलें होतें. आकाशमार्गी स्वेच्छ विहार करणारे पक्षिगण, ज्या शेतांत त्यांनीं दिवसभर आपलें उदरभरण केलें, त्याला टाकून आपल्या घरट्याकडे धांव घेत होते. मात्र वृक्ष आपले आश्रित ( पक्षी ) पुनः परत येत आहेत हें पाहून आनंदानें डोलूं आगले. पक्षांनींही मंजुळ कलकलाटानें आपला आनंद व्यक्त केला. असो.

अशा रमणीय वेळीं कला पुष्पकरंडक घेऊन बागेंत गेली. तोंडानें कसलेंसें गाणें म्हणत व पुष्पें तोडीत ती इकडे तिकडे हिंडूं लागली. क्षणोक्षणीं ती चोहोंकडे कावऱ्याबावऱ्या दृष्टीनें पण उत्सुकतेनें पहात होती. ती कुणाची वाट पहात होती बरें? नवीनचंद्र येईल कीं नाहीं

याची तिला वारंवार शंका वाटे; पण त्यानेंसुद्धां पत्रांत बागेंत भेटण्याविषयीं लिहिलें आहे. तरीही तो येणार नाहीं काय ?

किनीवेळ झाला तरी नवीनचंद्राचा पत्ता नाहीं. ते विसरले असतील काय ? कीं ते आज जाणार होते, ते परस्पर गेले तर नसतील ? अशीही वेडगळ शंका तिला आली. वेळ कांहीं फार झाला नव्हता; पण कलेस एकेक पळ एक महराहृतके लांबलचक वाटत होतें. ती फुलें तोडतां तोडतां थकली व तिचा पुष्पकरंडकही याचेळीं पूर्ण भरला. तेव्हां तिनें पुष्पें तोडण्याचें बंद करून एका बकुळीच्या झाडाखालीं जाऊन तेथें टाकलेल्या शुभ्र संगमरवरी पाषाणावर बसली. वायूच्या मंद लहरींबरोबर बकुलपुष्पांचा सुमधुर सुवास येत होता. भ्रमरांचा मंजुगुंजारव ऐकूं येत होता. बकुलवृक्ष एकाद दुसरें पुष्प वारंवार कलेच्या अंगावर टाकून तिचें स्वागत करीत होता. कला पुष्पगुच्छ करूं लागली. तिचें मन नवीनचंद्राचे एकेक गुण आठवूं लागलें. "लढाईच्या विरशीं त्यांनीं अतोनात शौर्य गाजिवलं, असं महाराज म्हणत होते. दुर्गांतील लहानमोठी सर्व मंडळी त्यांचे गुण गातात. सर्वांना ते आवडतात व तेही सर्वांशीं तसेंच प्रेमानें वागतात. ते शूर आहेत, रूपवान् आहेत, गुणी आहेत व विनयसंपन्न आहेत. त्यांना शोभेशी मी आहें कां? रूप नाहीं, गुण नाहीं आणि अनाथ अशा मला ते पसंत करतील ? ते वीर आहेत; पण मी वीरपत्नी शोभेन कां ? छे, मी भित्री आहें. मी नाहीं त्यांना शोभणार ! मी त्यांची दासीच होऊन राहीन. वीराला भित्री पत्नी काय कामाची ? " शेवटलें वाक्य ती मोठ्यांदा बोलली.

"पण वीर चहात असेल तर ? " कोणीसें मागून बोललें.

कलेनें दचकून मागें पाहिलें तों नवीनचंद्र उभा ! ती ताडकन् उठून उभी राहिली ! तिच्या हातून नुक्ताच पूर्ण झालेला पुष्पगुच्छ खालीं गळून पडला. तिच्या शरिरास कंप सुटला. हृदय धडधडूं लागलें. कलेला पुष्कळ गोष्टी सांगावयाच्या होत्या, त्या ती सर्व विसरून गेली. लज्जावनत मुखानें खालीं पहात पायाच्या अंगठ्यानें खालची जमीन उकरण्यापलीकडे तिच्याकडून कांहीं झालें नाहीं. नवीनचंद्राची याहून अगदीं निराळी स्थिति होती. कला आपल्यावर अनुरक्त आहे कीं नाहीं याविषयीं त्याला आतां मुळींच शंका राहिली नव्हती. अर्थात्

ती झिडकारील किंवा आपला अपमान करील याची त्यास मुळींच भीति नव्हती. त्या रमणीय मूर्तीकडे पहात तो त्या शिळेवर बसला व तिचा कोमल कर धरून तो तिलाही बसवूं लागला. पण कला फसवी बसते. तिनें चटकन् आपला हात काढून घेतला.

" त्या चोरट्या हाताला " नवीनचंद्र हंसत म्हणाला, " यथायोग्य शिक्षा करण्याचा माझा विचार आहे. दुसऱ्याचीं पत्रें आज्ञेविना तो घेऊन जातो, हें आपल्याला नाहीं बोवा बरें वाटत ! मी त्याला अवश्य शिक्षा ठोठावणार. " असें म्हणत त्यानें पुनः तिचा हात पकडला व तिला आपल्याजवळ बलात्कारानें बसविलें. मांजरापुढें उंदराची काय स्थिति होत असेल, याची यावेळीं कलेला चांगली कल्पना झाली. मात्र उंदराची व तिची स्थिति अगदीं भिन्न होती.

" हं सांग पाहूं. तुला काय काय गोष्टी सांगावयाच्या आहेत ? " नवीनचंद्रानें तिचा उजवा हात आपल्या हातांत धरून विचारिलें.

यावर कलेनें मंदहास्य विलसित लज्जायुक्त मुखानें एकवार नवीनचंद्राकडे पाहिलें व पुनः खालीं मान घातली ! कदाचित् त्याच्या प्रश्नाचें हेंच उत्तर असेल ! तिच्या त्या रमणीय मुखाकडे पाहून नवीनचंद्र मुग्ध झाला ! किती वेळ तरी तो तिच्या अवनत मुखाकडे टक लावून पहात होता !

" हें काय ? " नवीनचंद्रानें तिचें मुख वर करीत म्हटलें, " आच का गोष्टी सांगणार होतीस ? माझ्या कानाला आपल्या मधुर वाणीनें नाहीं का तृप्त करणार ? " यावेळीं कलेची भीति थोड्याबहुत प्रमाणानें कमी झाली होती. ती कांहीं बोलणार होती; पण तिचें मुख तिला तसें करूं देईना. अगदीं ओष्ठावर आलेले शब्द परत गेले. नवीनचंद्रानें तिची ही स्थिति ताडली व त्यानें हंसत हंसत विनोदानें म्हटलें, " आपली आज्ञा असेल तर उत्तरही मीच देतों पाहिजे तर ! "

कलेला आतां बराच धीर आला. ती किंचित् हंसली व पुटपुटली, " पुष्कळ बोलायचं आहे; पण काय करूं आठवतच नाहीं. "

" आणि आठवलं तर सांगावसं वाटत नाहीं असेंच ना ? " नवीनचंद्रानें हंसत प्रश्न केला, ' मी आठवून देऊं कां ? "

कलेची भीति आतां अगदीं मावळली. ज्याच्यावर आपलें प्रेम जडलें

त्याचें प्रेम आपल्यावर आहे कीं नाहीं, ही जी तिच्या मनांत शंका होती ती नष्ट झाली. इतकेंच नव्हे तर त्याच आपल्या प्रियकराजवळ बसून त्याच्या प्रेमकथा ऐकत आहोंत इत्यादि विचार मनांत येतांच तिचें मन पुलकित झालें व प्रथमदर्शनीं वाटलेली भीति आतां अगदीं नाहींशी झाली. अर्थात् तिला आतां बोलण्यास धीर आला. तिनें हंसत प्रश्न केला, " माझ्यावर आपला राग तर नाहीं ! "

" कशाबद्दल ? "

" निर्लेपणाबद्दल. "

" मला मोठा राग आला होता खरा. " नवीनचंद्र हंसत हंसत बोलला, " पण काय करावें, या वदनसूर्यापुढें तो क्षणभरही टिकत नाहीं. बरें पण तें असो. पत्रांत जें आपण लिहिलेंत कीं, पुष्कळ गोष्टी सांगावयाच्या आहेत त्या कोणत्या ? त्यांपैकीं अद्याप एकही बाहेर पडली नाहीं. "

" खरंच, पुष्कळ सांगायचं आहे; पण कुठून आरंभ करावा हेंच समजत नाहीं. त्यामुळं न सांगितलं तर नाहींका चालायचं ? " कलेनें त्याच्या मुद्रेकडे प्रेमदृष्टीनें पहात विचारिलें. त्याच्या मुखाकडे पाहून बोलण्याची कलेची ही पहिलीच वेळ होती.

" छट् ! हें कधींच शक्य नाहीं. त्यांपैकीं एखादी गोष्ट ऐकल्याशिवाय मी इथून मुळींच हलणार नाहीं. "

" हा आपला निश्चय अगदीं खरा आहे ना ? " कलेनें लयाडीनें हंसत विचारिलें.

" यांत काय संशय ? " नवीनचंद्र सहज म्हणाला. त्याच्या लक्षांत तिच्या प्रश्नाचा व्यंगार्थ मुळींच आला नाहीं.

" मग मी माझ्या गोष्टी मुळींच सांगणार नाहीं. " कलेनें लडिवाळपणानें म्हटलें.

" तें का बरें ? " नवीनचंद्रानें आश्चर्यानें विचारिलें. तिच्या बोलण्यांत कांहीं तरी पेंच आहे, हें आतां त्याच्या लक्षांत आलें. मात्र तो पेंच काय असावा हें त्यास मुळींच समजलें नाहीं.

" का म्हणजे ? " कला आपला व्यंगार्थ त्यास समजला नाहीं हें

पहातांच गंभीरपणें म्हणाली, " आपल्यास त्या न सांगण्यांमच माझा फायदा असला तर ? "

" कसा काय घोवा ? " त्यानें आश्चर्यानें प्रश्न केला.

" माझी एक तरी गोष्ट ऐकल्याशिवाय आपण इथून हलणार नाहीं " कला हंसत म्हणाली, " आणि मी एकही गोष्ट सांगणार नाहीं. अर्थात् आज रात्रीं जाण्याचा बेत रहित झालाच कीं ? "

आतां कुठें नवीनचंद्राला तिच्या बोलण्याचा उलगडा पडला; पण तो न समजल्यासारखें करून म्हणाला, " पण त्यापासून तुला फायदा ? "

" मला फायदा ? " असें म्हणून तिनें आपल्या विशाल नेत्रांनीं त्याकडे पाहिलें. पुनः तिची मुद्रा लज्जेनें आरक्त झाली. ओष्टावर मंद हास्य खेळूं लागलें.

" अशी लबाडी करून आपण निसटणार होय ? ठीक आहे. मग पक्कें लक्षांत थाळगा कीं, मी आज जो जाईन तो पुनः जन्मांत इकडे येणार नाहीं. " नवीनचंद्र थट्टेनेंच पण कलेची परीक्षा पहाण्याकरितां गंभीरपणें बोलला.

नवीनचंद्राची ही थट्टा कांहीं कलेच्या लक्षांत आली नाहीं. त्याचा गंभीर स्वर ऐकतांच ती चपापली. तिनें त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलें; पण नवीनचंद्रानें आपला चेहरा मुद्दाम गंभीर केला. हा उसना गंभीरपणा कलेला खरा भासला. तिची घाबरगुंडी उडाली. आपण थट्टा केली हें बरोबर नाहीं असें तिला वाटलें. तिचें हृदय चिंतेनें धडधड उडूं लागलें. नवीनचंद्रानें तिची ही झालेली स्थिति तेव्हांच ताडली; पण त्यास आणखी थोडा विनोद करावा असें वाटलें. म्हणून तो गांभिर्यानें म्हणाला, " ठीक आहे. जातो तर. "

असें म्हणून तो खरोखरीच उठलों ! पण कलेचे इकडे पंचप्राण व्याकूळ झाले. थट्टा करण्याची आपणास कुठून बुद्धि झाली, असें तिला वाटलें. तिनें चटकन् उठून त्याचे पाय धरले व करुणस्वरानें म्हटलें, " छे छे, प्राणनाथ ! मी आपली थट्टा केली; पण त्याबद्दल मी क्षमा मागत्यें ! " तिच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले.

तिची ही स्थिति पहातांच नवीनचंद्रास अत्यंत वाईट वाटलें. आपण इतकी थट्टा करावयाची मऽहती असें त्यास वाटलें व कलेचें आपणावर

इतकें प्रेम आहे, हें पहातांच त्यास अत्यंत आनंद झाला. त्यानें तिला तात्काळ उचललें व आपल्या हृदयाशीं धरून प्रेमानें म्हटलें, " वेडी कुठली, माझी थट्टा तुझ्या लक्षांत नाहीं आली ? "

" खरंना बोलायचं हें ? " कला साश्रु नयनांनीं त्याच्या मुद्रेकडे पहात म्हणाली. प्रियकराच्या आलिंगनापासून तिला अत्यंत सुख झालें हें खरें; पण तिचें हृदय अद्यापं धडधडतच होतें. ती त्याच्या वक्षस्थळावर आपलें शीर ठेवून म्हणाली, " मी वेडी आहें, मी आपल्या योग्यतेची नाहीं, माझ्या अंगांत एकही गुण नाहीं, हें मी सर्व जाणत्यें; पण तरीही आपण मला आपल्या पदरांत नाहीं का घेणार ?

" छे कले, " नवीनचंद्र तिला कुरवाळून म्हणाला, " तूं कशीही अस. या अस्तास जाणाऱ्या सूर्यनारायणाची शपथ घेऊन सांगतों कीं, तुझ्या इतकी प्रिय अशी वस्तु मला या जगांत एकही नाहीं ! तूं माझी हृदयेश्वरी आहेस ! तुझें जसें अकृत्रिम प्रेम माझ्यावर आहे तसेंच माझेंही पण तुझ्यावर आहे. आणि तें या जन्मांत तरी कधींही तुटणें शक्य नाहीं. "

नवीनचंद्राचें हें भाषण ऐकतांच कलेस किती आनंद झाला असेल याची कल्पनाच केली पाहिजे. तिनें आपल्या प्रियकरास गाढ आलिंगन दिलें ! तिच्या लावण्यमय शरिरांतून आनंद उसळूं लागला.

" मला वाटतें– " नवीनचंद्र म्हणाला, " आतां आपण महालांत जावें हें बरें ? "

" आज रात्रीं आपण जाणार तें परत केव्हां येणं होईल ? " कलेनें उत्सुकतेनें विचारिलें.

नवीनचंद्र थोडावेळ विचार करून म्हणाला, " आजपासून बरोबर पांच दिवसांच्या आंत मी इथें परत येईन. त्यावेळीं न आल्यास– "

" काय ? " कलेनें घाबरून प्रश्न केला.

" छे, अशी घाबरूं नकोस. सात्विक प्रेमाचा अखेरीस जय झालाच पाहिजे. ईश्वराची आपणावर पूर्ण कृपा आहे असें समज. त्याची प्रार्थना कर व त्यावरच भरंवसा ठेव. "

" ईश्वर करो आणि सर्व चांगलं होवो ! " असें म्हणून तिनें पुष्प-

करंडक हातांत घेतला व तिच्या हातून खालीं पडलेला पुष्पगुच्छ तिनें नवीनचंद्राच्या हातीं दिला. ती जाण्यास निघाली.

" हे कले ! " नवीनचंद्र तिचा हात धरून ह्मणाला, " पुनः एक-वार हास्यविलसित मुखानें पहा बरें ? या रमणीय चेहऱ्यावर दुःखाची किंचितही छटा दिसतां उपयोगीं नाहीं. "

पुनः कलेचे ओष्ठ हंसूं लागले. लज्जेनें कपोल आरक्त झाले. तिनें आपल्या विलोल नेत्रांनीं आपल्या प्रियकराकडे पाहिलें व त्याची इच्छा पूर्ण केली. नवीनचंद्रानें प्रेमभरानें तिच्या मधुर ओष्ठांचें चुंबन घेतलें. " प्रेमाचा विजयच होईल बरें ! " असें नवीनचंद्रानें तिच्या कानांत सांगितलें व तिला सोडिलें. द्रुत गतीनें, आनंदित चित्तानें कला तेथून निघून गेली.

" वीर पुरुषा, " कला जातांच नवीनचंद्रास कोणीसें ह्मटलें, " एकं-दरींत आपण प्रेमाच्या दुर्दमनीय जाळ्यांत सांपडला आहांत तर ? "

नवीनचंद्रानें दचकून मागें पाहिलें तों ज्या रहस्यमय व्यक्तीनें त्यास दोन वेळां प्राणदान दिलें होतें ती कृष्णव्यक्ति त्याच्या दृष्टीस पडली.

---

## प्रकरण चवदावें.

# पिंजऱ्यांतील पक्षिणी.

कथानकाच्या ओघाप्रमाणें व संविधानकांतील पात्रांच्या वैपुल्यामुळें आह्मास केव्हां केव्हां मागें उलटावें लागत आहे व लागणार आहे. या-करितां वाचकांनीं कृपा करून प्रत्येक प्रकरण वाचते वेळीं त्या प्रकरणां-तील कथाभागाचा ओघ कोणत्या काळापर्यंत येऊन पोंचला आहे त्याचें नीट स्मरण ठेवावें. ह्मणजे कथानक समजण्यास सुलभ जाईल. लेखकाला वाचकांपुढें कथानक मांडण्यापूर्वी तें शक्य तितकें मनोरंजक बठविण्याविषयीं त्याची इच्छा असते. त्याकरितां त्यास केव्हां केव्हां एक कथाभाग पुरा करून दुसरा हातीं घेण्यास अडचण पडते. या-

करितां कांहीं विशेष फेरफार केल्यास वाचक त्या धाटर्चाबद्दल क्षमा करतील अशी आशा आहे. असो.

वाचकांना स्मरत असेलच कीं, कुमुदिनी त्या रहस्यमय महालांत असतां तिची व विमलचंद्राची भेट झाली. ती त्यांची भेट कुमुदिनीच्या बंदिवासांतील पहिल्याच दिवशीं घडून आली होती. आमच्या इतर कथेचा ओघ त्या त्यांच्या भेटीनंतर पुढील तीन दिवसांपर्यंत येऊन पोंचला आहे. याकरितां ज्यावेळीं इकडे या तीन दिवसांत इतर गोष्टी घडत होत्या त्याचवेळीं कुमुदिनीसंबंधीं काय काय घडलें तें आपण पाहूं.

विमलचंद्र आपल्याला सोडून गेलेला पहातांच कुमुदिनीला फारच वाईट वाटलें. ती किती वेळ तरी सारखी रडत होती. ती अश्रु ढाळ-तांना म्हणाली, " देवा, त्यांचं माझ्यावर हेंच का प्रेम ! एखाद्या वेश्ये-प्रमाणें मी त्यांच्याबरोबर बाबांना न विचारतां कां चालतं व्हावं ? अशीच त्यांची इच्छा ना ! होय. असंच त्यांनीं म्हटलं ! अशा संकट-प्रसंगीं त्यांनीं मला अशा प्रकारें आडवावं अं ! ह्याच प्रेमाची का मीं आकांक्षा केली होती ? मग त्यांचं खरं प्रेम माझ्यावर नाहींतर ! खरं प्रेम असतं तर त्यांनीं मला असं आडवलं नसतं. खरंच, मला त्यांनींच आपल्या महालांत आणून बंदीवासांत ठेवलेलं दिसतं ! एकंदरींत त्यांची इच्छा माझं धर्माज्ञेनं पाणिग्रहण न करतां एखाद्या वेश्येप्रमाणें मला आपल्याजवळ ठेवावी अशी दिसते. खरंच. त्या दोन मूर्ति ज्या तिथें आहेत, त्यांपैकीं एक त्यांची आणि दुसरी कलेची आहे. काय, कलेवर त्यांचं खरं प्रेम जडलं आहे ? असंच दिसतं. नाहींतर अशा-प्रकारें हे पुतळे इथें उभे करण्याचं काय कारण बरं ? अगदीं निःसंशय हा त्यांचाच महाल आहे. त्यामुळेंच तर मी निद्रेंत असतां कला इथें येऊन माझ्याकडे पहात उभी होती ! मग मी कलेला जें पाहिलं तें अगदीं खरंच बरं का ! तो कांहीं भास नव्हे. हो; असंच, असंच. पण मी जागी होतांच ती का बरं निघून गेली ? आतां मी सर्व समजल्यें. त्यांचं खरं प्रेम माझ्यावर नसून कलेवर आहे तर ? हो; कलाही कांहीं कमी सुंदर नाहीं. मजपेक्षां थोडी जास्तच सुंदर आहे. मग पुरुषांचं प्रेम सौंदर्यावरच जास्त असतं तर ! देवा, देवा ! मीं ज्यांची मूर्ति रात्रं-दिवस हृदयांत बाळगली, ज्यांचं नामस्मरण करण्यांत मी आपणास

धन्य समजत असे, ज्यांनीं ' माझें तुझ्यावरील प्रेम अक्षय आहे ' म्हणून अनेकदां वचनं दिलीं, त्यांनीं अखेरीस दगा दिला अं ! माझें फक्त सौंदर्यसेवनच त्यांना हवं अं ? " इत्यादि दुःखद विचार करीत ती बसली असतां प्रभातकालची वेळ होत आल्यामुळें, बसल्या बसल्या तेथेंच तिचा डोळा लागला.

अशाप्रकारें किती वेळ तिचा डोळा लागला हें तिला समजलें नाहीं; पण ज्यावेळीं ती जागी झाली त्यावेळीं तिनें पाहिलें तों खिडक्यावरील पडदे बाजूला सारलेले दिसत होते. दिवे मालवून एका बाजूला ठेवले होते व खोलींत सूर्याचा चक्क प्रकाश पडला होता. महालांत झाडून वगैरे साफ केलेलें दिसत होतें. जागीं होतांच, फारच थोडावेळ तिला गतरात्रीं घडलेल्या गोष्टींचा विसर पडला होता व म्हणूनच ती चटकन् उठून बसली व तिनें आपल्या पित्याच्या घरच्या एका दासीचें नांव घेऊन तिला हाक मारली. तात्काळ त्या महालाचें दार उघडलें गेलें. एक दासी आंत आली; पण ती कांहीं कुमुदिनीची दासी नव्हती. तिनें आश्चर्यानें त्या दासीकडे पाहिलें व तिला विचारिलें, " तुझं नांव काय?"

" बकुळी. " दासीनें उत्तर दिलें.

तिचें हें उत्तर ऐकून कुमुदिनीस फार आश्चर्य वाटलें. कारण याच नांवाची तिची एक दासी होती व तिलाच तिनें हाक मारून बोलाविलें होतें. तिनें पुनः आश्चर्यानें विचारिलें, " मी कुठें आहे बरं ? मला इथें कुणी आणली ? "

हा तिचा प्रश्न ऐकून दासी थोडा वेळ स्तब्ध बसली. ती काय उत्तर द्यावें असा विचार करीत असावी, असें कुमुदिनीस वाटलें. बकुळीच्या चेहऱ्यावरून ती दयाळु दिसत होती. तिचें वयही कांहीं फार नव्हतें. कुमुदिनीच्याच वयाची ती होती. ती जरी दासी होती तरी रूपानें कांहीं दासींत मोडत नव्हती. तिच्या दरिद्री वेषांतही ती दासीपेक्षां उच्च दर्जाची दिसत होती. हिची प्रार्थना केल्यास ती वाया जाणार नाहीं, आपली सुटका जरी ही करूं शकली नाहीं तरी आपणास निदान कांहीं तरी माहिती जरूर देईल, असें कुमुदिनीस वाटलें म्हणून ती बकुळीला करुण वाणीनें म्हणाली, " बकुळ, मला इथें कुणीं आणिलं, कशाकरितां आणलं हें तूं नाहीं का सांगणार ? ही पहा पदर पसरून मी तुझ्याजवळ

भिक्षा मागल्यें कीं, मी कुठें आहे तें मला सांग. " असें ह्मणून आमच्या नायिकेनें— धर्मचंद्रासारख्या उच्च, धनाढ्य व शूरसंपन्न सरदाराच्या कन्येनें — त्या यःकश्चित् दासीपुढें पदर पसरला !

तो प्रकार पाहून बकुळीचें हृदय कळवळलें. दुःखानें मुद्रा काळवंडली व ती अस्फुट स्वरांत म्हणाली, " हायरे दैवा ! "

" खरंच कां तुला माझी दया येते ? या अशा अविश्वासांनीही ईश्वरानं मला मदतगार पाठविला एकूण. बकुल, तूं माझं रक्षण करशील ? "

बकुल स्तब्ध उभी राहिली ! तिला यावर काय उत्तर द्यावें हें सुचेना. तिच्या नेत्रांत अश्रु उभे राहिले. ती कांहीं बोलणार इतक्यांत बाहेरून कोणीसें " बकुळी, ए बकुळी. " असें कर्कश आवाजांत ओरडलें. बकुळीनें चटकन् आपले अश्रु पुसले व ती गंभीरपणें कुमुदिनीला ह्मणाली, " आपल्याला मुखमार्जन करावयाचं असेल तर मुकाट्यानं माझ्या मागं या. " असें ह्मणून ती खालीं मान घालून पुढें झाली. कुमुदिनी आश्चर्य, दुःख, निराशा इत्यादि मिश्रित विकारांनीं युक्त मनानें तिच्या मागोमाग चालली. दोघीही त्या महालांतून बाहेर पडल्या. काल रात्रीं जिचें मुस्कट कुमुदिनीनें रंगविलें होतें, ती वृद्धा दाराबाहेर उभी होती. तिनें बकुळीला दुसरें कांहीं काम सांगून कुमुदिनीचा पहारा आपण घेतला. नाइलाजास्तव ती वृद्ध कर्कशा जसें वागवील तसें वागणें कुमुदिनीस भाग पडलें. म्हातारीला पहातांच प्रथम तिला फार भीति वाटली; पण त्या म्हातारीनें रात्रीं घडलेल्या प्रसंगाची मुळींच ओळख दिली नाहीं. रीतीप्रमाणें कुमुदिनीचा मुखमार्जन विधी आटपला. पुनः तिला त्याच महालांत आणून त्या वृद्धेनें सोडलें. मध्यंतरीं त्या महालांत कोणीसें खिडकीजवळ प्रातःकालच्या उपहाराचें सामान मांडून ठेविलें होतें. उपहाराचें साहित्य ताजें व उत्तम प्रकारचें होतें. वृद्धेनें कुमुदिनीला उपहार करण्यास सांगितलें.

मनुष्यावर कसलाही दुःखाचा प्रसंग येवो, पोट कांहीं सुटत नाहीं. कुमुदिनीला क्षुधाही लागलीच होती. तिनें मुळींच आडकाठी न घेतां उपहार केला. कदाचित् तिला असेंही वाटलें असेल कीं, जें होणार असेल तें कांहीं केल्या चुकत नाहीं; मग या म्हातारीला तरी कां खिजवा. ऐनवेळीं हिच्याकडून आपली सुटकाच होण्याचा संभव आहे. असो.

दुपार झाली. दुपारचेंही जेवण कुमुदिनी विननकार जेवली. नंतर ती बातारी तेथून निघून गेली. जातांना तिनें बाहेरून दार लावून घेतलें, हें कांहीं सांगायला नको आहे. कुमुदिनीनें एक खुर्ची खिडकीजवळ नेऊन ठेविली व त्यावर बसून ती आपल्या सुटकेविषयीं विचार करूं लागली. खिडक्यांना शुभ्र काचा लावल्या असल्यामुळें बाहेर काय आहे, हें दिसणें शक्य नव्हतें. अशाप्रकारें तिला बसून फार वेळ झाला नाहीं तोंच महालाचें द्वार खाडदिशीं उघडलें गेलें व एक धिप्पाड काळा पुरुष आंत आला. कुमुदिनीनें त्यास तात्काळ ओळखलें. आनंद-दुर्गेश राक्षसनाथ तो हाच होता !

त्या क्रूर नर राक्षसाकडे पहातांच कुमुदिनी भीतीनें थरथर कापूं लागली. राक्षसनाथाची एकंदर आकृती व चालचलणूकच अशी होती कीं, कोणावरही त्याचें सहज वजन पडे. वीर पुरुषांनासुद्धां एकवार त्याकडे पहातांच धडधडी भरे. मग नाजुक कुमुदिनीची काय कथा घ्यें ? कुमुदिनी पाषाणमूर्तिप्रमाणें खुर्चीवर बसली ! राक्षसनाथानें तिची स्थिति ताडली. तो गंभीरपणें तिच्या पुढें जाऊन उभा राहिला व म्हणाला, " कुमुद ! माझ्याबरोबर विवाहास तयार आहेस कीं नाहींस बोल ? "

कुमुदिनीवर विद्युत्पातच झाला !

ती बोलत नाहीं हें पाहून राक्षसनाथ तिचा हात पकडून त्याला हिसडा देऊन म्हणाला, " नाजुक परी, बोलत नाहींस ? तयार आहेस ना लग्नाला ? "

त्यानें अंगाला हात लावतांच कुमुदिनीस संताप आला व ती आपला हात सोडवून घेऊन जरा क्रोधानें म्हणाली, " आपल्यासारख्या वृद्ध माणसांना एखाद्या अनाथ बालिकेवर असा जुलूम करणं शोभतं का ? "

" यांत जुलूम तो कसला ? उलट तुला अनाथाला सनाथ करण्याचाच माझा विचार आहे. या बलाढ्य राक्षसनाथाची तूं पत्नी झाल्यावर प्रत्यक्ष यमाचीही तुझ्याकडे पहाण्याची छाती नाहीं, समजलीस. तेव्हां सांग पाहूं तुला लग्नाच्यावेळीं कसले कसले दागिने पाहिजेत ? हिऱ्याचे, सोन्याचे, पाचूचे— "

" पण असे रत्नखचित अलंकार मला देण्यापूर्वी माझी एक विनंति ऐकाल कां ? " कुमुदिनीनें तिरस्कारानें पण शांतपणें प्रश्न केला.

" तुझी विनंति ? तुझी आज्ञा ? सांगून टाक ! " राक्षसनाथ सगर्व म्हणाला, " ती पुरी करण्यास हा राक्षसनाथ एका क्षणाचाही विलंब लावणार नाहीं. "

" मग मला आपल्या पित्याच्या घरीं पोहोंचवून द्या. "

" हंः एवढेंच ? तें तर होईलच. लग्न झाल्यावर धर्मचंद्र जावयाला नाहींका बोलावणार ? " राक्षसनाथानें खोंचून विचारिलें, " त्यावेळीं आपण दोघे मिळूनच जाऊं. "

" बरं, मी लग्नाला तयार नाहीं झाल्यें तर ? " कुमुदिनीनें कांहीं विचार करून विचारिलें.

" तें मुळींच शक्य नाहीं. तुला आनंददुर्गेशाची राणी झालेंच पाहिजे. तुझी इच्छा नसल्यास बलात्कारानें तुला करविली जाईल. " राक्षसनाथानें हुकमीपणानें विचारिलें, " मग तूं गुण्यागोविंदानें तयार आहेस कीं नाहींस ? "

" आपण या गोष्टीचा पूर्ण विचार केला आहे काय ? " कुमुदिनीनें शांतपणें विचारिलें, " अशी गोष्ट धर्माच्या विरुद्ध, आपल्या शीलाच्याविरुद्ध आहे. "

" धर्म आणि शील ! " राक्षसनाथ तिरस्कारानें हंसत म्हणाला, " राक्षसनाथ हें कांहीं जाणत नाहीं. माझी इच्छा हाच धर्म होय व ती इच्छा पूर्ण करणें हेंच शील होय. "

" बरं तर. " कुमुदिनी शांतपणें म्हणाली, " मलाही या गोष्टीचा पूर्ण विचार केला पाहिजे विचार करण्याकरितां मला वेळ पाहिजे. "

" ठीक आहे. आज संध्याकाळपर्यंत तूं आपला काय तो विचार करीव. " असें त्यानें म्हटलें व तो तात्काळ तेथून निघून गेला. सामदामानें काम भागत असल्यास दंडाचा प्रयोग करूं नये, असें त्यास वाटलें असावें. कुमुदिनीस त्याचा सहवास नकोसा होता व म्हणूनच तिनें थोडा वेळ का होईना कांहीं युक्ति करून त्यास तेथून घालविलें. पण तो जातांच तिच्या दबलेल्या दुःखाचा वेग एकदम बाहेर पडला. ती रुदन करूं लागली.

राक्षसनाथ गेल्यानंतर थोड्याच वेळानें बकुळी तेथें आली. तिला पाहतांच कुमुदिनीचें दुःख द्विगुणित झालें. तिनें पोटांत जाऊन बकुळीस

पाय धरले व म्हटलें, "बकुळ बकुळ! कांहीं कर पण या संकटांतून मला सोडीव. मला माहित आहे, तूं दयाळू आहेस. माझी सुटका तुझ्याच हातून होईल." तिच्या डोळ्यांतून दोन उष्ण अश्रुबिंदु बकुळीच्या पायावर पडले.

बकुळीनें तात्काळ तिला उठविलें व तिला मिठी मारून म्हटलें, "ताईसाहेब काय हो करूं? मीही तुमच्याप्रमाणेंच एक बंधिनी आहे!"

यावर दोघीही एकमेकींस मिठी मारून रडूं लागल्या! शोकावेग ओसरल्यावर कुमुदिनीनें राक्षसनाथाशीं झालेला सर्व संवाद तिला सांगितला व आतां या संकटांतून कसें पार पडावें, असें बकुळीला तिनें विचारिलें.

"ताईसाहेब," बकुळी दुःखानें म्हणाली. "तुम्हाला मी काय युक्ति सुचवूं? मीही तुमच्याप्रमाणेंच कैदी आहें. मला इकडे तिकडे हिंडण्याची मोकळीक आहे इतकेंच. खरंच ताईसाहेब, नायकांचा जन्मच खोटा! त्यांत हें सौंदर्य तर किती फारच घातक बघा! मी विशेष सुंदर नाहीं; पण रात्रंदिवस या नर राक्षसाची मला भीति असते. कोणत्या वेळीं त्याची पापदृष्टी माझ्यावर वळेल, याची कल्पनाच करवत नाहीं. आणि—" ती खालीं मान घालून पुढें म्हणाली, "मला सांगायला मोठी लाज वाटते; पण काय करूं हो, आज सकाळीं जी म्हातारी तुम्हीं पाहिलीत ती माझी आई असूनही त्या दुष्टाला या बाबतींत पूर्ण अनुकूल आहे."

"ती म्हातारी तुझी आई?" कुमुदिनीनें आश्चर्यानें विचारिलें.

"होय म्हणण्याचीसुद्धां मला लाज वाटते!" बकुळी दुःखानें लाजून खालीं पहात म्हणाली, "त्या दुष्टाची पापी नजर माझ्याकडे वळल्यास माझें शील भ्रष्ट होण्यास एका क्षणाचाही विलंब लागणार नाहीं. मात्र येवढें अगदीं खात्रीनें सांगतें कीं, त्या पूर्वींच माझे प्राण भ्रष्ट होणाऱ्या देहाचा त्याग करतील. हाय हाय! या आनंददुर्गांत कितीतरी सुंदर स्त्रियांचें पातिव्रत्य या दुष्टानें खुशीनें, नाखुशीनें, द्रव्यलोभानें, त्रासानें भ्रष्ट केलें आहे. त्यांपैकीं कांहींनीं आपले प्राण त्याग केले, कांहीं दासी होऊन खितपत आहेत व कांहींनीं आपलं तोंड काळं करून घेतलं तें घेतलं; पण दुसऱ्यांचेंही तसें करण्याच्या इराद्यानें त्या पापिष्टास मदत करीत आहेत.

त्या सर्वांत माझ्या आईचा नंबर पहिला आहे ! मातृनिंदा फार वाईट खरी; पण नाइलाज आहे ! "

बकुळीची वरील हकीगत ऐकतांच कुमुदिनीची चिंता वाढली. " आतां संध्याकाळ झाली कीं, तो दुष्ट इथें येणार मग ? " कुमुदिनीनें घाबरून विचारिलें.

यावर बकुळी कांहीं बोलली नाहीं. ती कांहीं विचार करीत होती. ती ह्मणाली, " तो आज संध्याकाळीं आलाच तर कसेंही करून त्याच्या कडून आणखी तीन दिवसांची मुदत मागून घ्या. "

" आणि त्या वेळांत तूं माझी सुटका करशील ? " कुमुदिनीनें आशेनें विचारिलें.

" तसं खात्रीनं सांगतां येत नाहीं. " ती गंभीरपणें म्हणाली, " तरी एक आपली सुटका करीन किंवा त्यांत आपले प्राण तरी देईन. "

" ईश्वर तुला यशच देईल. " कुमुदिनी तिला आलिंगन देऊन ह्मणाली. " त्यापूर्वी एक काम कर पण— " असें म्हणत तिनें बकुळीच्या कानांत कांहीं हलकेंच सांगितलें. तें ऐकतांच बकुळी दचकली व ती आश्चर्यानें कुमुदिनीकडे पाहूं लागली.

" छे, तूं भलतंच समजूं नकोस: प्रसंगाशिवाय मी त्याचा उपयोग करणार नाहीं; पण रक्षणार्थ कांहीं तरी असावं. "

" जातां जातां मी एक गोष्ट सांगत्यें त्याकडे चांगलं लक्ष द्या. आपल्या बेताचा थोडासुद्धां संशय दुसऱ्याला येतां उपयोगीं नाहीं, तसा आल्यास सर्व नाश होईल. कारण ध्यानांत ठेवा इथें भिंतीलासुद्धां कान आहेत. " असें म्हणून बकुळी तेथून निघून गेली. कुमुदिनीनेंही पुष्कळ वेळ विचार करून काय करावयाचें तें ठरविलें. संध्याकाळीं कुमुदिनीचें भोजन आटपलें नाहीं तोंच राक्षसनाथाची स्वारी तेथें आली.

" ठरला ना विचार ? "

" बहुतेक ठरल्यासारखाच आहे. " कुमुदिनी किंचित् हंसून ह्मणाली, " पण मी ज्या राज्ञीपदावर आरूढ होणार, त्याचा विचार मनांत येऊन मला इतका आनंद झाला आहे कीं, माझं डोकं ठिकाणावर नाहीं. याकरितां मला आणखी आठ दिवसांची तरी निदान मुदत द्यावी."

पुष्कळवेळ विचार केल्यावर राक्षसनाथानें तिला आणखी आठ दिव-

सांची मुदत दिली; पण आतां आतां त्यानें तिला बजाविलें, " ध्यानांत ठेव. आठ दिवसांवर एक घटकाभरही मी तुझें ऐकणार नाहीं. " असें म्हणून तो तेथून निघून गेला.

थोड्यावेळानें बकुळीच्या आईनें येऊन महालांत दिवे लावले व कुमुदिनीला कांहीं हवें नको विचारून महालाबाहेर जाऊन द्वार लावून घेतलें.

" ईश्वरा ! " कुमुदिनी भक्तिपुरस्सर हात जोडून प्रार्थना करूं लागली, " सज्जनांचा त्राता, गरिबांचा कनवाळू तूंच आहेस. आमच्यापेक्षां तुलाच आमचीं दुःखं जास्त समजतात व त्याबद्दल तुला काळजीही असेल. तेव्हां तुझ्यावरच माझा विश्वास आहे. आपल्या या दीन मुलीला या संकटांतून तार. बकुल, तूं माझी सुटका केलीस अगर न केलीस तरी पत्करलें; पण तूं दयाळू आहेस, सत्वशील आहेस. ईश्वर तुला चांगले दिवस दाखवो ! "

दुसरा दिवस उगवला ! कुमुदिनी जागी झाली. तिला रात्रीं चांगलीच झोंप लागली असावी असें तिच्या चेहऱ्यावरून दिसलें. तिचा चेहरा विलक्षण प्रफुल्लित दिसत होता. तें पाहून बकुळीच्या आईलाही फार आश्चर्य वाटलें. तिनें किंचित् हंसत " आपण एकंदरींत आनंददुर्गेशाच्या राणी होणार तर ? ईश्वर आपलं भलं करो ! " असें कुमुदिनीस उद्देशून म्हटलें. पण कुमुदिनीनें तिकडे दुर्लक्ष केलें. नियमानुसार तो दिवसही पार पडला. दुसरा उजाडला व तोही पहिल्याचा अनुगामी झाला ! तिसरा दिवस उजाडला; पण बकुळीचा पत्ता नाहीं, हें पाहून कुमुदिनीस आश्चर्य वाटलें व तिची चिंता वाढली. दुपार उलटली. तिसरा प्रहर झाला. तरी बकुळी आली नाहीं ! हा काय घोंटाळा ? आपला बेत कोणास समजला तर नाहीं ? बकुळीचा त्यांत प्राणनाश तर नाहीं झाला ? इत्यादि कितीतरी कुशंका कुमुदिनीच्या मनांत आल्या. संध्याकाळ झाली ! बकुळी कांहीं आली नाहीं. तिच्या आईला विचारावें तरी पंचाईत. तरी तिनें तिची आई दिवे लावण्याला आली असतां, " बकुळी कुठें आहे ? " म्हणून विचारलेंच.

" कां बरं ? काय काम आहे ? " म्हातारीनें कुत्र्यानें विचारिलें. यावर कुमुदिनी काय बोलणार ? बिचारी मुकाट्यानें चुप्प बसली. म्हातारी महालाचें दार लावून निघून गेली !

रात्रीचे दहा वाजले ! कुमुदिनी चिंताक्रांत बसली होती. तिला झोंप येणें शक्य नव्हतें. अकस्मात् खाडदिशीं द्वार उघडलें गेलें व भीतीनें व दुःखानें पांढऱ्या फिक्कट झालेल्या मुद्रेनें बकुळी धापा टाकीतच आंत शिरली !

“ काय गडबड ? ” कुमुदिनीनें ऊर्ध्व श्वासांत विचारिलें.

“ घात झाला ! ” बकुळी आपल्या पदराखालून एक सुरी काढून ती कुमुदिनीच्या हातीं देत अस्फुट स्वरांत म्हणाली, “ मी इतके दिवस कैदेंत होतें. आपलं बोलणं माझ्या आईनं ऐकलं. आतां दोघींचाही नाश होणार ! ”

“ छे, मुळीं नाहीं. ” कुमुदिनी तिच्या हातून सुरी घेऊन आनंदानें म्हणाली. “ दार लाव—आंतून कडी लाव ! ईश्वरानं आपल्याला रस्ता दाखविला आहे. ”

“ काय ? ” बकुळीनें आश्चर्यानें प्रश्न केला.

कुमुदिनीनें तिला उत्तर दिलें नाहीं. तिनें महालाच्या द्वाराला आंतून पक्की कडी लाविली व स्तंभित झालेल्या बकुळीचा हात धरून तिला ओढीत त्या लाल पडद्याजवळ नेलें. तो पडदा बाजूला सारून त्या पुरुष पुतळ्यांतील हाताच्या आंगठींतील हिऱ्याच्या ऐवजीं असलेली लोहकील तिनें दाबली. क्षणार्धांत एक खटका होऊन दोन्ही पुतळे अलग झाले व भिंतींत एक लहानसा जिना दिसूं लागला.

“ भगवाई ! ” बकुळी आश्चर्यानें उद्गारली.

पण कुमुदिनी आंत शिरली व तिनें बकुळीलाही आंत ओढलें ! लागलींच त्या दोन्ही मूर्ति पूर्ववत् येऊन मिळाल्या !

## प्रकरण पंधरावें.

### चित्रपट.

बराच वेळ कमलिनी आश्चर्यचकित् होऊन तिच्यापुढें पडलेल्या चित्रफलकाकडे पहात बसली. हा कुठून कसा पडला याचें तिला आश्चर्य वाटत होतें. तिनें वर भिंतीकडे पाहिलें तों एका लहानशा कोनाड्यांत दोन उंदीर कांहीं खुजबुज करीत असलेले तिच्या दृष्टीस पडले. पुनः ती चित्रपटाकडे पाहूं लागली. तपस्विनीनें तिला किती गंभीरपणानें तो चित्रपट न पहाण्याची आज्ञा केली होती; पण दैवगति किती विचित्र ? कमलिनीपुढें तो चित्रपट आपोआप येऊन पडला. कमलिनीचा त्यांत कांहीं एक अपराध नव्हता. पण तो येऊन पड-ल्यावर त्यास हातांत घेऊन पहाण्याची इच्छा तिच्यानें दाबली जाईना, तिनें मोठ्या उत्सुकतेनें पण भीत भीत तो चित्रपट हातीं घेतला व त्याकडे ती पाहूं लागली. कितीवेळ तरी ती मुग्ध दृष्टीनें त्या चित्रपटा-कडे पहात होती. शेवटीं तिनें प्रेमभरानें तो आपल्या हृदयाशीं धरला व ती पुटपुटली, " ईश्वरा, हे जिवंत– "

अगदीं याचवेळीं तपस्विनी आंत आली व तिनें कमलिनीच्या हातांत तो चित्रपट पाहिला ! तें पहातांच तिची मुद्रा पालटली. क्रोधानें चेहरा आरक्त झाला व ती कर्कश आवाजांत बोलली, " चांडाळणी, माझी आज्ञा मोडलीस अं ? पण याचं प्रायश्चित्त–माझा अभिशाप–तुला भोगावा लागेल ! असें म्हणून तिनें तो चित्रपट तिच्या हातांतून हिसका-वून घेतला व पुनः म्हटलें, " हा चित्रपट तूं पाहिलास खरा; पण जन्म-भर–विश्वासघातिनी ! जन्मभर तुला रडावं लागेल ! "

तपस्विनी इतकी क्रोधिष्ट असेल, अशी कमलिनीस कल्पनासुद्धां नव्हती; पण काय असेल तें असो, तपस्विनीला यावेळीं फारच क्रोध आला होता. कमलिनीला त्याचें विशेष भय वाटलें नाहीं. तिनें चटकन् तिचें पादवंदन केलें व म्हटलें, " देवी ! आपला अभिशाप–अगर माझ्या विश्वासघाताचें प्रायश्चित्त मी आनंदानं मान्य करीन; पण एक–एकच विनंति आहे, या चित्रपटांतील व्यक्ति जिवंत आहे कां ? "

तपस्विनी आश्चर्यानें थक्क झाली ! ती दोन पावलें मागें सरून कमलिनीकडे डोळे फाडून पहात विस्मयानें म्हणाली, " ही व्यक्ति जिवंत ? छे, मुळींच अशक्य ! पण खरंच, तुला त्याचं काय ? " तपस्विनीनें आश्चर्यानें प्रश्न केला. कमलिनी यावर कांहीं बोलली नाहीं. ती खालीं मान घालून उभी राहिली. इतक्यांत दाई आंत आली.

" काय गडबड आहे ? " दाईनें आश्चर्यानें त्या दोघींकडे पहात विचारिलें.

" आणि तें चित्र कुणाचं ? ' तिचा दुसरा प्रश्न तपस्विनीच्या हातांतील त्या चित्रपटाकडे पाहून होता. तो चित्रपट कोणाच्याच दृष्टीस पडूं नये, त्यांतल्या त्यांत दाईनें तर मुळींच पाहूं नये अशी तपस्विनीची इच्छा होती; पण ती निष्फळ झाली. दाईचा त्या चित्रपटाविषयींचा प्रश्न ऐकून तपस्विनी थोडावेळ घोटाळली. ती निराश झाली. पण तितक्यांत तिला काय वाटलें असेल तें असो, तिनें दाईचा हात धरला व ती तिला तेथून खेंचून दुसरीकडे निघून गेली जातांना तिनें कमलिनीस तेथून न हलण्याविषयीं बजाविलें.

" दाई, " त्या दोघींही एकांतांत गेल्यावर तपस्विनी खालीं मान घालून म्हणाली, " माझा अपराध क्षमा कर. "

" कसला अपराध ? " दाईनें मध्येंच आश्चर्यानें विचारिलें.

" या चित्रपटाची— " तपस्विनी तो चित्रपट दाईच्यापुढें करून म्हणाली, " हकीकत मीं तुझ्यापासून चोरून ठेविली. "

दाईनें तो चित्रपट हातांत घेतला व त्याकडे ती लक्षपूर्वक पाहूं लागली. तें पहाणें झाल्यावर तिनें विचारिलें, " हा कुठें सांपडला ? "

तपस्विनीनें थोडक्यांत प्रातःकालीं घडलेली हकीगत सांगितली.

" दुसरा चित्रपट कुठें आहे ? " दाईनें गंभीरपणें प्रश्न केला, " आणि तो कुणाचा आहे ? "

" तो तिच्याजवळ आहे. ती आपल्या भावाचा म्हणून म्हणाली. "

" हिला (कमलिनीला) तूं ओळखलीस ? " दाईनें गूढपणें प्रश्न केला.

" हिला ? " तपस्विनीनें त्या प्रश्नाचा गूढपणा पाहून विस्मित होऊन विचारिलें.

" नाहीं- कां बरं ? "

" शंभर हिश्शानें– " दाई गूढपणें ह्मणाली, " ही तीच आहे. थोडी उंचीनं मोठी दिसते इतकीच. बाकी तोच हंसरा चेहरा, तेच काळेभोर डोळे, तेंच सरळ नाक, अगदीं तोच तोंडावळा–"

" पण ही कोण ? " तपस्विनीनें आश्चर्यानें विचारिलें, " तूं हिला ओळखलंस ? "

" अगदीं खात्रीनं. " दाई गंभीरपणें इकडे तिकडे पहात हलकेंच बोलली, " ही तीच आहे. " असें म्हणून तिनें अगदीं हलकेंच तपस्विनीच्या कानांत कांहीं सांगितलें. तें ऐकतांच तपस्विनी एकदम दचकली! तिच्या नेत्रांत अश्रु उभे राहिले व ती कंपित स्वरांत पुटपुटली, " माझा शाप–माझा शाप ! "

" तुझा शाप ? " दाईनें विस्मयानें विचारिलें, " कशाबद्दल ? "

पण तिच्या प्रश्नाचें उत्तर देण्यास तपस्विनी तेथें थांबली नाहीं. ती धांवतच कमलिनीकडे गेली. तिच्या गालांवरून अश्रु वहात होते. ती एकदम धांवत आलेली व अश्रु ढाळीत आलेली पहातांच कमलिनीस आश्चर्य वाटलें ! ती चटकन् उभी राहिली. तिची छाती धडधडूं लागली. कांहीं तरी गूढ, कांहींतरी आश्चर्यकारक व एका विलक्षण प्रेमाचा कमलिनीच्या हृदयांत उदय झाला ! तिचे नेत्र भरून आले !

" कमल, कमल ! " तपस्विनी कमलिनीला मिठी मारून ह्मणाली, " माझा शाप– " यापुढें तिच्यानें बोलवेना. तिनें कमलिनीला आपल्या पोटाशीं घट्ट दाबून धरलें ! तिच्या नेत्रांतील ऊष्ण अश्रुबिंदु कमलिनीच्या काळ्याभोर केशकलापावर पडूं लागले !

यावेळीं कमलिनीच्या मनाची मोठी विलक्षण स्थिति झाली होती. जिनें थोड्यावेळांपूर्वी यःकश्चित् बाबतीबद्दल क्रुद्धित होऊन शाप देण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं, तिनेंच धांवत येऊन अश्रु ढाळीत आपल्यास पोटाशीं धरावें ह्याचें कमलिनीला फारच आश्चर्य वाटलें. पण तपस्विनीचें तें आलिंगन मायावीपणाचें असेल, किंवा ते अश्रु नक्राश्रु असतील अशी तिला शंकासुद्धां आली नाहीं. आणि वास्तविक तशी स्थिति नव्हतीही ! तपस्विनीचें तें आलिंगन व ते अश्रु पूर्ण वत्सलतेचे होते. त्यांतील प्रेम उघड उघड दिसत होतें. याचमुळें कमलिनीच्या हृदयांत उत्पन्न झालेलें प्रेम वाढलें. कितीवेळ तरी कमलिनीला आपल्या पोटाशीं

धरून तपस्विनी रुदन करीत होती. दाईही तो प्रकार पहात दारांत उभी होती. तिच्याही नेत्र अश्रूंनीं भरलेले दिसत होते.

" कमल. " तपस्विनी तिला कुरवाळून ह्मणाली, " तूं आपल्याशीं मला किती दुष्ट समजत असशील. विना विचार करतां मीं तुला शाप दिला याचें मला फार वाईट वाटतें; पण— "

— आपला शाप खोटा ठरेल. " कमलिनी नम्रपणें बोलली.

" अगदीं खोटा ठरेल ! " दाई ह्मणाली

" अगदीं—अगदीं खोटा ठरूं दे. " तपस्विनी जोरानें म्हणाली, " ईश्वर करो आणि माझा शाप अगदीं खोटा ठरो ! "

" कमल, " तपस्विनीनें उत्सुकतेनें विचारिलें " माझ्यासंबंधानें तुला काय वाटतें बरें ? "

तो प्रश्न ऐकून कमलिनीनें आश्चर्यानें तिच्याकडे पाहिलें.

" खरंच. " तपस्विनी दुःखानें ह्मणाली, " तूं मला जाणत नाहींस, माझं चरित्र जाणत नाहींस—माझं नांवसुद्धां जाणत नाहींस. हाय हाय! कर्मगति विचित्र आहे. कमल; पण मी तुला जाणत्यें. थोड्या वेळां-पूर्वी जाणत नव्हत्यें; पण माया—नव्हे—दाईनं मला तूं कोण हें सांगितलं. तूं—तूं—माझी—" तपस्विनीचा स्वर कांपूं लागला.

" कोण ? " कमलिनीनें आश्चर्यानें कंपितस्वरांत विचारिलें. इतक्यांत दाई खाकरली !

" तुला माझ्याविषयीं प्रेम वाटतं ? " तपस्विनीनें तो विषय उडवून देण्याच्या हेतूनें विचारिलें.

" तें मला कसं सांगतां येईल बरं ? " कमलिनी करुणस्वरानें ह्मणाली, " तरीपण आपल्याला पाहिल्यापासून आपल्याविषयीं माझ्या मनांत अत्यंत भक्ति उत्पन्न झाली आहे माझं आपल्याकडे मन ओढतं आहे."

" मला तूं दैवी प्राणी समजतेस ? "

" होय. " कमलिनी आदरपूर्वक ह्मणाली, " आपल्या चेहऱ्यावरील विलक्षण तेज पाहिलं ह्मणजे मला तसं वाटतं. "

" मी कोण असावी असं तुला वाटतं ? "

पुनः कमलिनी तिच्याकडे आश्चर्यानें पाहूं लागली.

" तूं मला ओळखुं शकशील ? "

" तें आतांच काय सांगूं : पण देवाची कृपा असल्यास मी आपल्याच-जवळ राहीन. मला खात्री आहे कीं, आतां माझ्यानें आपल्याला सोडून जायवणार नाहीं. "

" कां बरं ? " तपस्विनीनें तिच्याकडे प्रेमानें पहात प्रश्न केला, " वसंतदुर्गांतील मंडळींवर तुझं प्रेम नाहीं—तुझा—तुझा भाऊही आहे तर?"

" होय. " कमलिनी दुःखानें उद्गारली, " पण पुष्कळ दिवस झाले, त्याच्याकडून कांहींच समाचार कळला नाहीं. "

" कमल, तूं माझ्याजवळच रहा ! " तपस्विनी दुःखानें ह्मणाली, " पण मी वनवासिनी आहें, सिंहासारखे वनपशू माझे मित्र आहेत, हा विच्छिन्न प्रासाद ( दुःखाचा सुस्कारा टाकून ) माझं निवासस्थान आहे. इथें तुला कदाचितच सुख मिळेल. तुझ्या जिवाला बरं वाटणार नाहीं, हें सर्व मी जाणत्यें. तरी पण तूं माझ्याजवळ रहा ! या भूतलावर अगदीं जिवाचं—प्रेमाचं असं मनुष्य एक तूंच आहेस. मला दुसऱ्या कोणाची आशा वाटत नाहीं. तूं मला सोडून जाऊं नकोस. नाहींना जाणार ? कारण मी तुझी— " असें ह्मणून तपस्विनी कमलिनीच्या कानांत कांहीं शब्द पुटपुटली..

कमलिनी चकित झाली. ती ह्मणाली, " छे, हें कधींच शक्य नाहीं. मी एक अगदीं नीच कुलांतील. आहे ! आपण-पण—पण मलाही तसंच वाटतं—माझं मन— "

" समजल्यें. प्रेम असंच आहे. " तपस्विनी गंभीरपणानें ह्मणाली, " जगाचें जीवन प्रेमच आहे. या अरण्यांत पहा—सिंहासारखा एक क्रूर प्राणी माझ्यावर अकृत्रिम प्रेम करीत आहे. तो वनपशु माझ्या-करितां आपला प्राण वेंचण्यासही तयार आहे. ये, तुला त्याची मजा दाखवित्यें. " असें ह्मणून तपस्विनी कमलिनीला चौकांत घेऊन आली व एका पायरीवर बसून आपल्या वंशीनें मधुर सुरांत तिनें गायन सुरू केलें दाई आपल्या संध्याकाळच्या स्वयंपाकास लागणाऱ्या सामानाची तयारी करण्यास निघून गेली.

मध्येंच वंशीवादन थांबवून तपस्विनी ह्मणाली. " याच वंशीवादनानें तुझी माझी भेट करून दिली ना ? " पुनः तिचें वंशीवादन सुरूं झालें. कमलिनी आनंदानें डोलूं लागली. सुमारें पाव घटकेंत एखाद्या पाळीव कुत्र्याप्रमाणें उड्या मारीत वनराज तेथें उपस्थित झाला.

" पाहिलंस—" तपस्विनी आपलें वंशिवादन थांबवून हंसत ह्मणाली, " गुलामाला कशी खूण पटली ती. वनराज, जवळ ये पाहूं. " वनराज जवळ आला. तपस्विनीनें त्याच्या आयाळाला हात घालून ह्मटलें, " पुष्कळ पुष्कळ वर्षे झालीं, याची माझी मैत्री झाली आहे. " असें ह्मणत तिनें त्या वनपशूकडून नानाप्रकारच्या चेष्टा करून दाखविल्या. तें पाहून कमलिनीस अत्यंत साश्चर्य कौतुक वाटलें.

अशाचप्रकारें तिसरा प्रहर उलटला. तपस्विनीचें पूर्वीचें वर्तन अगदीं पालटलें होतें. ती कमलिनीवर प्रेम करूं लागली होती. तिनें तिला प्रेमानें म्हटलें, " कमल, आतां तूं इथेंच बैस. इतक्यांत गायी येतील. तुला धार काढायला येत असल्यास त्यांची धार काढ. मी शिवपूजन करून येत्यें. "

" देऊळ कुठें आहे ? " कमलिनीनें उत्सुकतेनें विचारिलें.

" ज्या देवळांत जाण्याच्या हेतूनें तूं वसंतदुर्गाहून बाहेर पडली होतीस त्याच देवळांत मी रोज पूजा करण्यास जात्यें. तें इथून जवळच आहे, पण रस्ता फार विकट आहे. तुला पहायचं असल्यास उद्यां सकाळीं तुला मी तिथें घेऊन जाईन. " असें ह्मणून तपस्विनी उठली. तिनें पूजासाहित्य करून घेतलें व ती पूजनास निघाली. जातां जातां ती कमलिनीला ह्मणाली, " बाळ कमल, हा वाडा अगदीं मोडकळीला आला आहे हें तूं पहातेच आहेस. त्यामुळं इथें विंचू कांटचाचं फार भय आहे. तेव्हां तूं इकडे तिकडे वाडा पहाण्याच्या हेतूनें जाऊं नकोस. या वाडचांत नानाप्रकारच्या चोरवाटा आहेत. तेव्हां तूं इथेंच चौकांत फीर. " असें ह्मणून ती दाईला विचारून निघून गेली. दाईही स्वयंपाकाला लागली.

थोडचाच वेळांत गायी आल्या. वांसरेंही आलीं. गायी अगदीं गरीब होत्या. कमलिनीनें मोठ्या उत्सुकतेनें त्यांची धार काढली व दूध दाईस नेऊन दिलें. " कमल, त्या पलीकडच्या खोलींतील दोन लांकडें तर आण पाहूं. " कमलिनीला दाईनें सांगितलें. कमलिनीनें दिवसा ती लांकडें ठेवलेली खोली पाहिली होती, तेव्हां ती लागलींच लांकडें आणण्यास गेली; पण लागलींच दाईनें तिला हांक मारिली. कारण तिच्या पाठीमागें पुष्कळ लांकडें पडलीं होतीं; पण कमलिनीनें

तिची हांक ऐकिली नाहीं. ती लांकडाच्या खोलीकडे गेलीच. यावेळीं सूर्यास्त झाला असल्यामुळें बाहेर जिकडे तिकडे अंधःकार पडला होता. नियमाप्रमाणें दोन घटका रात्र झाल्यावर तपस्विनी परत आली. येतांच ती दाईकडे गेली. कमलिनी तेथें असेल अशी तिची कल्पना होती; पण कमलिनी तेथें नव्हती. तिला आश्चर्य वाटलें व तिनें त्याबद्दल दाईस प्रश्न केला.

" बाहेर असेल कीं ! " दाईनें निष्काळजीपणानें म्हटलें.

" बाहेर ती नाहीं. " तपस्विनीनें घाबरून म्हटलें.

" नाहीं ? " दाईनें आश्चर्यानें विचारिलें. व ' कमल, कमल ' म्हणून हांका मारिल्या; पण व्यर्थ. कमलिनीनें ' ओ ' दिली नाहीं !

स्वयंपाक तसाच राहिला व दोघीही दिवा घेऊन कमलिनीच्या शोधास निघाल्या. त्या प्रथम लांकडाच्या खोलींत गेल्या पण कमलिनी त्यांना तेथें आढळली नाहीं !

" आतां काय करावं ? " दाई भीतीनें उद्गारली. तपस्विनी तर रडूं लागली. अश्रु ढाळीतच त्या दोघींनीं शक्य तितका त्या विछिन्न वाड्यांत शोध केला; पण कमलिनीचा पत्ता लागला नाहीं. ठिकठिकाणीं त्यांनीं उभें राहून हाका मारून पाहिल्या; पण व्यर्थ. प्रतिध्वनीशिवाय त्यांना कांहींही ऐकूं आलें नाहीं !

हिंडतां हिंडतां दोन प्रहर रात्र लोटली. त्या दुःखित अंतःकरणानें परत फिरणार इतक्यांत त्यांना जवळूनच माणसाच्या कण्हण्याचा आवाज ऐकूं आला, म्हणून त्या दोघी कांहींशा आनंदानें तिकडे वळल्या !

## प्रकरण सोळावें

# आगींत तेल.

भ्रमिष्ठ अजसेन आपल्या मित्रद्वयांचा ( ? ) मोहराबद्दल चाललेला तंटा ऐकून आस्तच भांबावला. तो विचित्र तऱ्हेनें हंसून म्हणाला, ' शंभर मोहरा ? ह्मणजे एक सोन्याचाच गोळा ! तुला शंभर आणि ( शैलोदराकडे वळून ) तुला शंभर. मिळून एकंदर किती झाल्या ? हो. घरोबर अडीचशें ! अबब ! इतक्या मोहरा तुह्मी माझ्याकडून घेणार ? "

" शंभर आणि शंभर मिळून अडीचशें थोडेच होतात ! " शैलोदर ओरडले, " अहो, पांचशें होतात पांचशें ! "

" ह्मणजे, मला अडीचशें आणि शैलोदराला अडीचशें. " विषकुंभानें हिशेब बरोबर करून दाखवीत म्हटलें.

" हो, असेंच. " अजसेन बोटें मोजीत ह्मणतो, " तुला अडीच आणि त्याला अडीच पण तुह्मांला ह्या मोहरा काय म्हणून द्यायच्या? "

' काय ह्मणून ह्मणजे ? " शैलोदर बोलले, " आह्मी तुमचे मित्र नाहीं कां ? पहा, मी जर तुमचा मित्र नसतों तर तुह्मीं दिलेले हे उंची कपडे मी कशाला घातले असते हो. तसेंच परवां त्या गाणारणीचें गाणें तुमच्याकडून कां करविलें असतें ? तुमच्याच पैशावर नानाप्रकारच्या मौजा कां मारल्या असत्या ? तुह्मी खुष होऊन देत असलेलीं नानाप्रकारचीं पारितोषिकें मीं कां घेतलीं असतीं ? या इतक्या गोष्टीपासून मला फायदा थोडाच आहे ! यांत माझा कांहीं स्वार्थ असल्यास सांगा बरें ? केवळ तुमच्या मित्रत्वास्तव मला या सर्व गोष्टी कराव्या लागतात. दुसरा एखादा अशा तुमच्याकरितां खस्ता खायला तयार होईल ? मी आपला चांगला मनुष्य आहें, ह्मणून लोक मला ' उपटया उपटया ' ह्मणतात तरी मी तिकडे लक्ष न देतां तुमच्याकरितां सारखा झटत असतों. यापेक्षां आणखी मैत्रीचें प्रमाण तें कोणतें ? "

' खरेंच. " अजसेन आपल्या मित्राच्या मित्रत्वाविषयीं हीं अगणित खरीं प्रमाणें ऐकून खुष होऊन ह्मणाला, " मी तुला अडीच मोहरा हंसत देईन. "

" अडीच नव्हे अडीचशें ! " शैलोदर गंभीरपणें म्हणाले, " तुम्ही खुष होऊन देतांच आहां तर मी तुम्हाला जास्ती कशाला त्रास देऊं ! हो, अडीच मोहरा मला करायच्या काय ? अडीचशेंच पुष्कळ झाल्या ? "

" पण अडीचशें जास्ती कीं अडीच ? " अजसेनानें घोंटाळून विचारिलें.

" हेंच–हेंच तें. " शैलोदर नाक चढवून म्हणाले, " लोक जें तुम्हाला वेडा म्हणतात त्याचें कारण हेंच. असें पहा, तुम्हाला माहित नाहीं ? मोठें तितकें खोटें-अर्थात लहान ! त्याप्रमाणेंच ' अडीचशें ' ह्या शब्दांत चार अक्षरें असल्यामुळें तो शब्द मोठा आहे अर्थात् खोटा म्हणजे लहान ! तशी ' अडीच ' या शब्दाची गोष्ट नाहीं. ' लहान मूर्ति पण थोर कीर्ति ' या न्यायाला अनुसरून ' अडीच ' हा शब्द लहान असल्यामुळें त्याची किंमत मोठी आहे समजलांत ? तेव्हां मला आपली दिसण्यांत मोठी पण किंमतींत लहान अशीच रक्कम द्या. ' अडीच ' ची दिसण्यांत लहान पण किंमतींत मोठी अशी रक्कम नको. छे बोवा, मुळींच नको. लोक मला चोर म्हणतील. आणि मीही आपल्या मित्राचें जास्ती नुकसान कधींच चहात नाहीं. "

" बरोबर ! " अजसेन मान डोलावून म्हणाले, " ही मुद्रिका घे. ही मोठ्या किंमतीची आहे, असें इंदु ( अजसेनाची स्त्री ) परवां म्हणत होती; पण मोठें तितकें खोटें हेंच खरें. " असें म्हणून त्यानें आपल्या हातांतील एक अमूल्य मुद्रिका काढून शैलोदरास दिली.

" अजसेनापेक्षां– " शैलोदर ती मुद्रिका घेत स्वगत पुटपुटले, " तुला मूर्खसेन हें नांव जास्त शोभेल. "

" छे छे. " अजसेन ओरडला. ( कारण त्यानें शैलोदरानें पुटपुटणें ऐकिलें होतें. ) " मूर्खसेनापेक्षां गर्दभसेन विशेष शोभेल. कारण गाढव अगदीं नीच अर्थात लहान मानलें आहे. आणि त्यामुळेंच तें श्रेष्ठ आहे. बस्स. उद्यांपासून मला सर्वांनीं गर्दभसेन म्हटलें पाहिजे. समजलें रे मूर्खा ! " त्यानें शैलोदराचा कान पकडून जोरानें खेंचून म्हटलें, " मला गर्दभसेन म्हणायचें. "

" आय् " शैलोदर ओरडून म्हणाला, " आपली आज्ञा. " असें म्हणून त्यानें आपला कान सोडवून घेतला.

" हं अजसेन ? " विषकुंभ मध्येंच म्हणाले, " माझ्या मोहरा—"

" मूर्खा ! पुनः अजसेन ! " अजसेन त्याच्या अंगावर धांवून म्हणाला, " गर्दभसेन समजलास ? ( त्याचा कान धरून ) काय म्हणायचें ? गर्दभसेन. आणि जा. तूं आमचा अपमान केलास. आम्ही तुला कांहींएक देत नाहीं " असें म्हणून अजसेनानें विषकुंभाला गचांडी दिली.

विषकुंभ मागें वळून म्हणाला, " अज—नव्हे—मूर्ख—चुकलों, गर्दभसेन—" पण अजसेनानें त्यास बोलूं दिलें नाहीं. " चालता हो नाहींतर नोकराकडून गचांड्या देववीन. " असें म्हणून त्यानें त्याला एक लाथ मारिली. विषकुंभास फार राग आला व तो अजसेनास मारण्यास धांवणार इतक्यांत शैलोदर मध्यें आला व हळूंच त्याच्या कानांत म्हणाला, " आज एवढेंच पुष्कळ झालें. चल, यांतली ( मुद्रिकेंतील ) तुला अर्धी वाटणी देतों. जास्त गडबड केल्यास आतां नोकरचाकर गोळा होतील व सर्वच फिसकटेल. " विषकुंभास त्याची ही युक्ति पटली. थोड्याच वेळांत ते दोघेही तेथून पसार झाले.

ते गेल्यावर अजसेन इकडे तिकडे फेऱ्या घालीत आपल्याशींच चरफडत म्हणाला, " तरी मी या कैदाशिणीला हजारदां सांगितलं कीं, मी वेडा आहें, मी वेडा आहें, मी वेडा आहें; पण ती कुठली ऐकायला. ती म्हणते ' लोक तुम्हाला उगीच चिडवतात. ' मी तिचें तोंडसुद्धां पहाणार नाहीं. छे नको असली खोटें बोलणारी आपल्याजवळ. हिला हकलून देऊं का ? पण नको. माझें तिच्यावर प्रेम आहे. आज मी तिची अगदीं पुरती खात्री करून देतों कीं, मी वेडा आहे म्हणून. तिनें नाहीं ऐकलें तर तिला आज चांगली शिक्षा करणार. पण मला तिच्यापुढें भीति कां वाटते बरें ? समजलों, समजलों. हा हा ! मी वेडा आहे. " असें म्हणून तो खदखदा हंसूं लागला.

इतक्यांत एक दासी भोजनास चलण्याबद्दल सांगण्यास आली.

" झालें जेवायचें ? " अजसेन थोडासा शुद्धीवर येऊन म्हणाला. " खरेंच. मला जेवायचें आहे नाहीं कां ? या सेनानींच्या भानगडींत मी आपली भूकसुद्धां विसरलों. पण कायग, ( दासीला उद्देशून ) इंदु काय करते आहे ? " त्यानें किंचित् भीत भीत विचारिलें.

" आपलीच वाट पहात बसल्या आहेत. " दासीनें उत्तर दिलें.

" ती नाहींका जेवली ? "

" आपण जेवल्याशिवाय त्या कधींतरी जेवतात कां ? "

" खरेंच ती शहाणी आहे. पतीची सेवा कशी करावी हें ती चांगल्या-प्रकारें जाणते. "

" चलायचं ना ? " असें म्हणून दासी पुढें झाली. तिच्या मागोमाग अजसेन गेला.

ज्या ठिकाणीं अजसेन नेहमीं भोजनास बसत असे, तें स्थल चांगला स्वच्छ असा एक महाल होता. महालांत एका वेळीं पन्नास पानें चांगल्या तऱ्हेनें मांडतां येतील अशी जागा होती. प्रकाशही चांगला स्वच्छ पडण्याची व्यवस्था केली होती. अजसेन चांगल्या स्थितींत असतां आपल्याबरोबर बऱ्याच मित्रमंडळींना, इतर ब्राह्मणांना व अतिथि इत्यादिकांना घेऊन तेथें जेवीत असे; पण त्याचे डोळे बिघडल्यापासून हा प्रकार बंद झाला होता. त्याची स्त्री इंदुमती त्यास एकट्यालाच एकांतांत मिष्ट वचनें बोलून जेऊं घालीत असे. असो.

अजसेन भोजनालयांत आला. नेहमींप्रमाणें इंदुमती सर्व तयारी करून उत्सुकतेनें आपल्या पतीची वाट पहात असली होती. इंदुमतीचें वय वीस वर्षांपेक्षां जास्त नव्हतें; पण हाय ! तिच्या सुंदर मुखावर प्रफुल्लितपणा दिसत नव्हता. इंदुमती सर्वांगसुंदर होती; पण तिच्या चेहऱ्यावरील तें विलक्षण गांभिर्य पाहतांच प्रेक्षकाच्या हृदयाला सर्पदंश झाल्यासारखें वाटे. ते कमलाप्रमाणें सुंदर नेत्र चांचल्यानें कोणाचेंही मन हरीत नसत. प्रणयप्रकोपानें काळ्याभोर वक्र भृकुटी कधींही अकुंचित होत नसत. कोमल ओष्ठद्वयांवर हास्यलहर कधींही दिसत नसे. लज्जेनें कपोलद्वय कधींही आरक्त होत नसत. एकंदरींत रमणीय मुख कधींही टवटवीत दिसत नसे. नेत्र आपली चंचलता विसरले होते. भृकुटी प्रणयप्रकोप जाणत नव्हत्या. ओष्ठद्वयांची व हास्याची पुष्कळ-पुष्कळ दिवसांत ताटातूट झाली होती. रमणीय मुखावरील प्रफुल्लितपणा अस्तंगत झालेला दिसत होता. हाय ! हाय !! प्रजापती ! तुझ्या सृष्टिरूपी उद्यानांत अशीं कितीं तरी सुगंधयुक्त सुंदर फुलें दुर्दैवानें कोमेजून गेलीं असतील ! अशीं पुष्पें या उद्यानांत प्रस्फुटित होण्यापूर्वी त्यांचें

भवितव्य तुला समजत नाहीं काय? यापेक्षां तीं अवतीर्णच न झालेलीं बरें नव्हे काय? पण नाहीं! कर्माची गति विचित्र आहे, त्याला तुझा नाइलाज आहे! असो.

अजसेन भ्रमिष्ट होता. भ्रमिष्टपणांत व इतर वेळींही त्याचें इतर माणसांशीं विलक्षण वर्तन घडे; पण आपल्या पत्नीला पाहतांच तो अगदीं नम्र होई. इंदुमतीचा शब्द ऐकतांच अजसेन लागलींच शुद्धीवर येत असे. भ्रमिष्टपणांतसुद्धां इंदुमतीशीं तो कधींही वेडेंवांकडें बोलत नसे. ती जसें सांगलि तसेंच तो करी. इंदुमतीचें आपल्या पतीवर विलक्षण प्रेम असे. आपला पति आपणास भितो हें ती पूर्ण जाणून होती; पण अजसेनावर तिनें कडक प्रयोग कधींही केला नाहीं. ती नेहमीं त्याशीं प्रेमानें, नम्रपणानें व गोड बोलून वागत असे. अजसेन तिचा दास नव्हता. तिच्या सात्विक प्रेमाचा तो गुलाम होता. त्या तिच्या सात्विक प्रेमापुढें त्याचा भ्रमिष्टपणासुद्धां दबून जाई.

अजसेन भोजनालयांत येतांच इंदुमती उठून उभी राहिली व तिनें आदरपूर्वक त्यास पाटावर बसण्यास सांगितलें. शैलोदर व विषकुंभाशीं त्याचा नुकताच जो प्रकार घडला तो इंदुमती सर्व जाणुन होती. एका दासीनें तो सर्व प्रकार पाहून तिला कळविला होता; पण इंदुमतीनें आपणास तो प्रकार माहीत असल्याचें मुळींच दर्शविलें नाहीं. तिनें आपल्या पतीस वाढण्यास आरंभ केला. थोड्याच वेळांत अजसेनाचें भोजन आटपलें. तो पुनः आपल्या महालांत जाऊन बसला. इंदुमतीनें हात धुवून विडा तयार केला व त्याच्या मागोमाग तीही त्यास विडा देण्याकरितां महालांत आली.

"प्राणनाथ!" इंदुमती त्यास विडा देत करुणवाणीनें म्हणाली, "माझी विनंती आपण नाहींना ऐकली?"

अजसेनावर वज्राघातच झाला! आपल्या नायकांस शैलोदर व विषकुंभाशीं घडलेला प्रकार मुळींच माहीत नाहीं असें त्यास वाटत होतें; पण इंदुमतीचें वरील बोलणें ऐकतांच त्याची गाळण उडाली. तो भीत-भीत म्हणाला, "छे छे, मीं नव्हतें त्यांना बोलावलें!"

इंदुमती नम्रपणें बोलूं लागली, "प्राणनाथ, आपण जाणत नाहीं. या जगांत दुसऱ्याच्या सुखांत विष कालविणारीं हजारों नाहीं पण लाखों

माणसं आहेत. दुसऱ्याचं थोडसं छिद्र दृष्टीस पडतांच यांना फावतं! शैलोदर व विषकुंभ आपल्याला मित्र का वाटतात? अशा माणसांनींच आपणास जास्ती भ्रमिष्ट केलं आहे. आपण नीट लक्ष्यपूर्वक पहा. आपली बुद्धी चांगली स्थिर असतां, ते येऊन आपणाला भडकवितात. त्यांची भेट आपण घेऊं जाऊं नये, असं मला वाटतं. आपलं घराणं मोठं आहे. राज्यांत आपला केवढा मान आहे. अशा लोकांच्या संगतीनं नसता नीचपणा आपल्या पदरीं येईल. याचा आपण विचार करीत नाहीं काय? मी पुनः एकवार पदर पसरून सांगत्यें, आपण अशांची मुळींचं भेट घेऊं जाऊं नये. मला माहीत आहे, आपलं माझ्यावर प्रेम आहे. आपण मला पुष्कळ सुख देतां, पण नाथ, आपली निंदा माझ्याच्यानं नाहीं सहन होत! आपण माझी एवढी विनंती नाहीं का मान्य करणार?" तिचे नेत्र अश्रूंनीं भरले.

वरील सात्विक प्रेमोपदेशाचा त्याच्या कानावर वर्षाव होतांच, अजसेनाचा भ्रमिष्टपणा नाहींसा झाला. आपल्या प्रेमळ पत्नीची करुणमूर्ति पाहतांच अजसेनाचें हृदय कळवळलें व आपल्या वर्तनाबद्दल त्यास अत्यंत लाज वाटली. त्यानें तात्काळ आपल्या देवीस्वरूप पत्नीपुढें साष्टांग नमस्कार घातला! इंदुमती हें पाहून चकित् झाली! तिनें त्यास उठविलें व त्याच्या गळ्यास मिठी मारून ह्मटलें, "प्राणनाथ! आपण हें काय आरंभिलं आहेत? माझ्यानं हें नाहीं पहावत!"

'इंदु" अजसेन करुणवाणीनें ह्मणाला, "मी चांगला शुद्धीवर आहें. मी काय करतों आहे, हें मला चांगलं समजतं आहे. माझ्या आयुष्यरूपीं अंधःकारांत तूंच एक ज्ञानदीप मला आहेस. काय करूं? इंदु मला माझ्या वर्तनाबद्दल फार लाज वाटते. तुझा उपदेश मला मान्य आहे. आणि तो सुंदर उपदेश ऐकूनच तूं मला देवीस्वरूप भासतेस. याचकरितां मीं तुला नमस्कार केला. आतां यावेळीं माझं डोकं चांगलं ठिकाणावर आहे व जेव्हां जेव्हां तूं माझ्याजवळ असतेस तेव्हां तेव्हां मी असाच शुद्धीवर असतो. पण तूं दूर गेलीस कीं, माझी अक्कलही तुझ्याबरोबर चालती होते. त्याला मी काय करूं? मी किती निश्चय करतों कीं, कुणाचीही गांठ ह्मणून घेऊं नये; पण तें होत नाहीं व सर्वच बेत फिसकटतो. काय करूं? तुला होत असलेलें दुःख पाहून माझें

अंतःकरण तिळतिळ तुटतें; पण वेळेवर त्याची आठवण होत नाहीं व तुला असह्य दुःख होईल असें वर्तन माझ्या हातून घडून जातें. त्याबद्दल तूं मला क्षमा कर."

अजसेन अगदीं खरें बोलत होता. त्यांत असत्य मुळींच नव्हतें व हें इंदुमती जाणून होती. ती म्हणाली, "नाथ, आपण दोघंहीं त्या करुणानिधान गोपालकृष्णाची प्रार्थना करून क्षमा मागूं या. तोच आपलें संकट निवारण करील."

अजसेनानें भक्तिपूर्वक हात जोडून अनन्यभावें प्रार्थना केली. नंतर त्यानें इंदुमतीस जेवण्यास जाण्यास सांगितलें. इंदुमती निघून गेली. अजसेन घामकुली घेण्याच्या विचारांत होता, इतक्यांत एका नोकरानें येऊन सांगितलें, "वसंतदुर्गाहून एक मनुष्य आला असून तो आपली भेट घेऊं इच्छित आहे."

नोकराचें हें भाषण ऐकतांच अजसेन थोडावेळ स्तब्ध बसला. आले-ल्या मनुष्याची भेट घ्यावी कीं न घ्यावी असा त्यास विचार पडला. "तो कुणाकडून आला आहे तें विचारून ये." अजसेनानें विचार करून म्हटलें.

नोकर जाऊन पुनः परत आला व म्हणाला, "वसंत दुर्गेश धर्म-चंद्र यांजकडून."

"मग बोलाव त्याला आंत."

नोकर निघून गेला. थोड्याच वेळांत तो त्या मनुष्याला घेऊन आला.

"ओहो! शृगालदत्त!" अजसेन आश्चर्यानें म्हणाला व त्यानें शृगालदत्तास उठून ताजीम दिली.

दुर्दैवी इंदुमती! तूं केलेल्या सर्व उपदेशावर विरजण पडलेंसें दिसतें! असो. अजसेनाचा तो साधा प्रश्न व त्याची एकंदर स्थिति पहातांच शृगालदत्त चकित् झाला. अजसेनाच्या प्रकृतींत कांहींतरी सुधारणा झालेली त्यास दिसली. हें पाहून त्याची किंचित् निराशा झाली; पण शृगालदत्त लेचापेचा मनुष्य नव्हता. तो बसतां बसतां हंसत म्हणाला, "आपली तब्येत आतां बरीच सुधारलेली दिसते. बरें झालें बोवा."

"बरें, काय काम आहे?" अजसेनानें शृगालदत्ताच्या वरील

टीकेकडे दुर्लक्ष करून विचारिलें. कारण इंदुमतीच्या उपदेशाची त्यास अद्याप आठवण होती.

त्याचा हा प्रश्न ऐकतांच शृगालदत्त विशेषच चकित् झाला. तो ह्मणाला, " इतकी गडबडशी ? "

" गडबड ? " अजसेनानें त्रासून म्हटलें, " तुम्ही ज्या कामा-करितां आलां आहां, तें काम करून तुम्हीं येथून लवकर जावें अशी माझी इच्छा आहे. "

" अरे वा ! " शृगालदत्त थट्टेनें म्हणाला, " तुम्ही इतके नियमित केव्हांपासून झाला बोवा ? का एखाद्या परीच्या– "

" शृगालदत्त, " अजसेन हुकमीपणानें म्हणाला, " असल्या गोष्टी न बोलण्याविषयीं व न ऐकण्याविषयीं मीं आपल्या बायकोपुढें शपथ घेतली आहे, तेव्हां– "

पण शृगालदत्त मध्येंच खो खो हंसूं लागला. अजसेनानें त्याच्या हसण्याचें कारण ताडलें. त्याला लाज वाटली.

" बरें, " अजसेन मध्येंच म्हणाला, " धर्मचंद्राच्याकडून काय निरोप आहे ? "

" कोण धर्मचंद्र ? " शृगालदत्तानें मुद्दाम आश्चर्यानें विचारिलें.

" म्हणजे ? " अजसेन आश्चर्यानें उद्गारला, " आतां नोकराजवळ तुम्हीं धर्मचंद्राकडून आलों आहे म्हणून कळविलेंत ना ? "

' छे; अगदीं खोटें. "

" खोटें ? " अजसेनानें क्रोधानें विचारिलें, " नोकराला हाक मारून विचारूं ? मला माहित आहे, माझे नोकर निदान मजपाशीं तरी खोटें बोलणार नाहींत. "

आपली आज मुळींच डाळ शिजत नाहीं हें पाहतांच शृगालदत्तास आश्चर्य वाटलें, थोडें दुःख झालें व त्याची निराशा झाली. तरी त्यानें शेवटला प्रयोग करून पाहण्याचा निश्चय केलाच. त्यानें आपल्या अंग-वस्त्राआडून एक चित्रपट काढला व अजसेनापुढें धरला. झालें, गळांत मासा अडकला ! त्या चित्रपटाकडे पाहतांच अजसेन जिभल्या चाटीत म्हणाला, " कुणाचा हा चित्रपट ? " असें म्हणत तो आशापूर्ण दृष्टीनें त्या चित्रपटाकडे पाहूं लागला.

" सापडलासना अखेरीस माझ्या पंजांत ? " शृगालदत्त स्वगत म्हणाला. नंतर तो अजसेनास म्हणतो, " पाहिलंत, सौंदर्य म्हणतात तें याला ! ते काळेभोर केश, ते चंचल नेत्र, तें लाल ओठ, त्यांवरील तें मंद हास्य– "

" अरे पण हा कुणाचा ? " अजसेनानें त्या चित्राचें चुंबन घेत विचारिलें.

" सहस्र मोहरा–कीं ही सुंदरी आपली दासी होईल. " शृगालदत्त त्याच्याकडे तीक्ष्ण नजरेनें पहात म्हणाला. " पहा बोवा ! "

" पण ही कुणाची कोण ? " अजसेनानें त्या चित्रपटास आपल्या हृदयाशीं धरून आश्चर्यानें प्रश्न केला.

शृगालदत्तानें हळूंच म्हटलें, " वसंतदुर्गेशाची मुलगी कुमुदिनी ! "

---

प्रकरण सतरावें.

# युक्ति केली, पण फसली.

ज्या रहस्यमय व्यक्तीनें नवीनचंद्रास दोनदां प्राणदान दिलें होतें, त्या व्यक्तीविषयीं नवीनचंद्र नेहमीं विचार करीत असे. ती व्यक्ति कोण आहे, तिचें नांव काय व तिनें आपणास ऐन प्रसंगीं कां मदत केली ? इत्यादि गोष्टींविषयीं नवीनचंद्र अगदीं अपरिचित होता; पण तिची त्यास आठवण होती. त्या व्यक्तीच्या परिचयाविषयीं तो अत्युत्सुक होता. अर्थात् त्या कृष्ण व्यक्तीला पहातांच नवीनचंद्रास आनंद झाला. तो तिला उद्देशून म्हणाला, " आज तरी आपण आपला परिचय द्याल काय ? "

यावर ती व्यक्ति नुसतें हंसली असावी, असें नवीनचंद्रास वाटलें.

" आपलें नांव नवीनचंद्र आहे, नाहीं ? " त्या व्यक्तीनें हंसत म्हटलें, " कदाचित् आज आपली इच्छा पूर्ण होण्याचा संभव आहे. "

त्या व्यक्तीनें खालपासून वरपर्यंत कृष्णवेश धारण केला होता हें खरें; पण स्वरावरून ती व्यक्ति ' तरुण पुरुष ' असावी, असें नवीनचंद्रास वाटलें. तो आदरपूर्वक म्हणाला. " आज माझें भाग्य कीं, माझ्या प्राणदात्याची व माझी पूर्ण ओळख होणार आहे. आपलें नांव काय बरें ? " त्यानें उत्सुकतेनें प्रश्न केला.

ती व्यक्ति गंभीर स्वरांत उत्तरली, " आपणास माझा परिचय करून देण्याच्या उद्देशानेंच मी आज येथें आलों आहे; पण वसंतदुर्गांत माझा परिचय कदापि मिळणार नाहीं. "

" कां बरें ? " नवीनचंद्रास त्याच्या उत्तराचें आश्चर्य वाटून त्यानें विचारिलें.

" त्याला पुष्कळ कारणें आहेत; पण त्यांच्याशीं आपला कांहीं संबंध नाहीं व तीं आपणास आज तरी कळणार नाहींत. आपण आज इथून जाणार आहांत. मग माझ्याच घरचे पाहुणे होण्यास आपणास कोणती अडचण आहे बरें ? "

त्या व्यक्तीचा हा प्रश्न ऐकतांच नवीनचंद्रास आश्चर्य वाटलें व तो थोडावेळ विचारांत पडला. नंतर त्यानें विचारिलें, " ज्या अर्थी मी इथून जाणार हें आपणास समजलें आहे, त्या अर्थी मी कां जाणार व कोणत्या कामाकरितां जाणार हेंही आपण जाणत असालच. "

" अगदीं उघड गोष्ट आहे. " ती व्यक्ति गंभीरपणें मध्येंच म्हणाली.

" मग मला आपले पाहुणे होता येणें कसें शक्य आहे बरें ? " नवीनचंद्रानें त्यास उत्सुकतेनें विचारिलें.

" वीर पुरुषा. " ती व्यक्ति गंभीरपणें पण किंचित् प्रेमानें म्हणाली, " तूं वीर आहेस, धाडसी आहेस, रूपसंपन्न आहेस, उदार आहेस व गुणवान् आहेस. मी चांगल्या प्रकारें तुला जाणतों. मी आपल्या भावापेक्षांही तुझ्यावर प्रेम करीत आहें व जोंपर्यंत या शरिरांत प्राण आहेत तोंपर्यंत मी आपले प्राण वेंचूनही तुमचें रक्षण करीन. तरी पण मी आपणास खात्रीपूर्वक सांगतों कीं सध्या ज्या कामाकरितां आपण इथून जाणार तें कार्य निदान सध्या तरी आपल्या शक्तिबाहेरचें आहे! "

हें त्याचें बोलणें ऐकतांच नवीनचंद्र चपापला. तो कांहीं बोलणार इतक्यांत ती व्यक्तीच पुढें म्हणाली, " समजलों, तुमच्या मनांतील

मतलब समजलों; पण ध्यानांत ठेवा. सर्वच वेळा सारख्या नसतात. आपलें विलक्षण सामर्थ्य मी कबूल करतों; पण सध्याचें काम तरी आपल्या 'शक्ति' बाहेरचें आहे." ती व्यक्ति शक्ति या शब्दावर विशेष जोर देत म्हणाली. "मी आपणास निराश करीत नाहीं. आपणास प्रतिज्ञाभंग करण्यास सांगत नाहीं! छे छे, ज्याला मी आपल्या तोंडानें भाऊ म्हणून म्हटलें, त्याचें अहित मी कधींही चिंतणार नाहीं. तरी पण--तरी पण! हं, पण हें सांगा पाहूं--तुम्ही माझे पाहुणे होणार कीं नाहीं?" त्या व्यक्तीनें आपलें बोलणें मध्येंच तोडून विचारिलें.

ती व्यक्ति वर जें कांहीं बोलली, त्यांत मायावीपणाचा थोडादेखील अंश नव्हता, हें नवीनचंद्रानें तेव्हांच ताडलें. तो म्हणाला, "मला थोडा वेळ याबद्दल विचार करूं द्या. आपल्याविषयीं माझ्या मनांत कसलीही कुशंका नाहीं; तरी पण मला थोडावेळ विचार केलाच पाहिजे."

"अवश्य." ती व्यक्ति मध्येंच म्हणाली, "विचार केल्याशिवाय काम केल्यानें मागून रडण्याची पाळी हटकून येते!" आणि हें बोलते वेळीं त्या व्यक्तीच्या स्वरांत पूर्ण उद्वेग दिसत होता.

थोडावेळ दोघेही स्तब्ध बसले. नवीनचंद्रानें विचार करून म्हटलें, "ठीक आहे. फक्त एका रात्रींकरितां मी आपला पाहुणा होतों."

"बरें केव्हां चलणार?"

"तुम्हांस एक घटकाभर आपणास थांबावें लागेल!"

'मोठ्या आनंदानें. आपलें सर्व आटपल्यावर आपण सावकाश दुर्गाघाटावर यावें. मी तेथें आपणास खात्रीनें भेटेन. जा, आपल्या तयारीला लागा." हें एकतांच नवीनचंद्र जाऊं लागला; पण त्या व्यक्तीनें त्यास थांबवून म्हटलें, "आपल्या प्रेमालापाचा भंग केल्याबद्दल आपणास माझा राग आला असेल तर त्याबद्दल मी आपली क्षमा मागतों; पण ध्यानांत ठेवा, हा प्रेमभंगच आपलें जन्माचें प्रेम कायम करील." असें म्हणून तिनें त्यास सोडलें.

नवीनचंद्र आश्चर्य करीतच महालांत गेला. कालेनें पुढें जाऊन भोजनाची वगैरे सर्व तयारी केली होती. आजचें नवीनचंद्राचें भोजन किती तरी आनंदांत झालें. भोजनानंतर त्यानें धर्मचंद्राचा निरोप घेतला.

त्या वृद्ध. प्रेमालु सरदारानें साश्रुनयनांनीं त्यास निरोप दिला. नंतर तो कलेकडे गेला. दैवयोगेंकरून ती एकटीच होती. नवीनचंद्राची जाण्याची वेळ जसजशी जवळ येत चालली, तसतशी तिची छाती धडधडूं लागली, नेत्रांतून झरझर अश्रु वाहूं लागले. नवीनचंद्रास पाहतांच तिचें सर्व भान गेलें. तिला कोणाचीही लाज अगर भीति वाटली नाहीं. तिनें धांवत जाऊन त्याच्या गळ्यास मिठी मारिली व कंपितस्वरांत ह्मटलें, " मीही बरोबर येऊं का ? "

तें पाहतांच नवीनचंद्राचें हृदयही व्यथित झालें. त्यानें तिला आलिंगन देऊन कुरवाळीत ह्मटलें, " कले ! तूं वेडी तर नाहींस. वीरपत्नी आपल्या प्रियकराला असाच का निरोप देत असते ? "

" वीरपत्नीचीं कर्तव्यें मी जाणत नाहीं ! " कला मुसमुसत ह्मणाली, " मला आपल्याबरोबर घेऊन जावें. "

" तुला जन्माचीच बरोबर घेण्याचा मीं दृढनिश्चय केला आहे ; पण थोडा काल जाऊंदे. सर्व कांहीं शुभच होईल. ईश्वरावर भरंवसा ठेव. तोच पुनः आपली भेट करील. "

" पुनः केव्हां येणार पण ? "

" शक्य तितक्या लवकर. " नवीनचंद्र ह्मणाला, " हं, दे पाहूं आतां निरोप. "

मोठ्या मुष्किलीनें कलेनें त्यास निरोप दिला. नवीनचंद्र दुर्गाच्या बाहेर पडला. बाहेर पडतांच ती व्यक्ति त्यास दूर उभी असलेली दिसली. दोघांसही परस्परानें आपलें वचन पाळल्याबद्दल आनंद झाला व आश्चर्यही वाटलें.

" आपणाला कोणत्याही तऱ्हेनें धांदल तर झाली नाहीं ? " त्या व्यक्तीनें हलकेंच प्रश्न केला.

" नाहीं. " नवीनचंद्रानें विचारिलें, " आपणास माझ्याकरितां थांबावें तर लागलें नाहीं ? "

" नाहीं. हं चला. " असें ह्मणत ती व्यक्ति झरझर चालूं लागली.

यावेळीं रात्रीची सव्वा प्रहराची वेळ होती. शुक्ल पक्षाचे दिवस असल्यामुळें चांदणें अगदीं पिठासारखें पडलें होतें. दिवसभर थकलेल्या सृष्टिदेवीचें शांत स्वरूप पाहण्यासारखें होतें. असो.

दुर्गापासून सुमारें दोन मैल जाईपर्यंत कोणीही बोललें नाहीं. अखेरीस ती व्यक्ति नवीनचंद्राच्या खांद्यावर हात ठेवून घोगऱ्या आणि किंचित कठोर अशा आवाजांत ह्मणाली, " तें पाहिलेंन, समोर जी झाडी दिसत आहे तेंच माझें निवासस्थान. " असें ह्मणून तिनें कांहींसें पुटपुटत नवीनचंद्राच्या हाताला हिसडा दिला !

त्यावेळीं त्या व्यक्तीचा हात नवीनचंद्रास इतका कठोर भासला व आवाजही कानास इतका कडू लागला कीं, त्यास अगदीं प्रथम त्या व्यक्तीविषयीं कांहीं विपरीत शंका आली व त्यानें आपला एक हात आपल्या तरवारीवर ठेवला.

" हं ! " ती व्यक्ति कठोर स्वरांत ह्मणाली, " कांहीं हरकत नाहीं ! "

क्षणांत नवीनचंद्रास एक चक्कर आलें ! नेत्रापुढें अंधेरी दिसूं लागली ! सर्व शक्ति क्षीण झालेल्या दिसूं लागल्या ! नवीनचंद्राचे नेत्र उघडे होते; पण भोंवतालच्या चिजा त्यास स्पष्टपणें दिसत नव्हत्या. अद्यापीही आपण चालत आहोंत, असें त्यास वाटत होतें, पण पाय हालत नव्हते. त्यानें आपल्या सोबत्याकडे पाहिलें तेव्हां त्यास एखादी फिक्की छाया आपल्याजवळून चालत आहे, असें वाटलें. सर्व दिसत होतें, सर्व समजत होतें, सर्व ऐकूं येत होतें; पण अशी एक शक्ति त्यावर काम करीत होती कीं, त्यामुळें एकाद्या निद्राभ्रमिष्टाप्रमाणें त्याची स्थिति झाली होती ! सुमारें एक घटकाभर त्याची अशी स्थिती होती.

" आपली प्रकृति ठीक कां नाहीं ? " कोणीसें त्याजवळ बोलल्याचा भास झाला. त्यानें आपल्या डोळ्यावरून हात फिरविला. त्यानें आपले नेत्र उघडून चोहोंकडे नजर फेंकली तों त्यास आपण एखाद्या भव्य पुष्पवाटिकेंत आहोंत, असें दिसलें ! जवळच ती व्यक्ति उभी होती ! आणि त्या व्यक्तीनेंच तो प्रश्न केला असावा, असें त्यास वाटलें.

" आपण कुठें आलों बरें ? " नवीनचंद्रानें आश्चर्यानें चोहोंकडे पहात विचारिलें, हळुहळूं त्याची बुद्धि ठिकाणावर येऊं लागली.

" माझ्या बागेंत आपण उभे आहांत ? "

" आपण दुरून पाहिलेली झाडी ती हें उपवनच वाटतें. ह ! आमां

समजलों." तो आश्चर्यानें म्हणाला, "इथें येऊन आपल्याला किती वेळ झाला बरें?"

"आतां इतक्यांतच आपण इथें येऊन पोहोंचलों आहों."

"आपण आतां मला काय विचारलें होतें?" नवीनचंद्रानें आठवीत प्रश्न केला.

"मला वाटतें आपणास आतां घेरी आली असावी." ती व्यक्ति गंभीरपणें म्हणाली, "आपली तब्येत ठीक का नाहीं?" तिनें प्रश्न केला.

"थोडया वेळापूर्वी थोडें चक्कर आलेंसें वाटलें खरें; पण आतां सर्व ठीक आहे." पुनः दोघेही चालूं लागले.

ज्या उपवनांतून ते सध्यां चालले होते, तें चांगलें भव्य होतें. मधुर सुमनसौरभ दशदिशा दरवळलेला भासत होता. समोरच एक भव्य प्रासाद उज्वलतेनें चांदण्यांत चमकत होता. ते दोघेही त्या प्रासादाजवळ जाऊन पोहोंचले. एखाद्या राजप्रासादाप्रमाणें त्या प्रासादांत कोलाहल माजून राहिला होता. प्रासादांत मोठमोठे महाल व दिवाणखाने दिसत होते. त्यांच्या खिडक्या उघडया टाकल्या होत्या व त्यांतून आंतील उज्वल दीपांचा प्रकाश बाहेर येत होता. कृष्ण व्यक्तीला पहातांच थोडावेळ नोकरांचाकरांत गोंधळ उडालेला दिसला व लागलींच सर्वत्र शांत झालें. पण नवीनचंद्रास त्याचें विशेष आश्चर्य वाटलें नाहीं.

त्या व्यक्तीनें त्यास एका उत्तम शृंगारलेल्या महालांत नेलें व तेथें असलेल्या एका उंची कोचावर बसण्यास विनंती केली. नवीनचंद्र बसला; पण त्यास त्या गूढ व्यक्तीचें मुख पाहण्याची फारच लालसा झाली होती. ती व्यक्ति आपला वेष उतरूं लागतांच तो मोठ्या उत्सुकतेनें त्याजकडे पाहूं लागला.

थोड्याच वेळांत त्या व्यक्तीचें वेषपरिवर्तन झालें व नवीनचंद्राच्या समोर एक सुंदर तरुण पुरुष उभा राहिला!

युवकाचें वय पंचवीसाच्या आंत बाहेर होतें. त्याचें शरीर साधारण उंच, सुडौल व सुंदर होतें. त्याचे केश कुरळे व काळेभोर चमकत होते. नेत्र काळेभोर व विशाळ भ्रुकुटी पूर्ण रेखलेल्या, छोटया छोटया पण आंकडेदार मिशा, सरळ नाक व मंद हास्यामुळें किंचित् दिसत असलेले दंत हें सर्व रूपवान् पुरुषास साजेसें होतें. पण त्या त्याच्या

सुंदर मुखमंडळावर वीरश्री चमकत नसून विलासीपणा झळकत होता. याच व्यक्तीनें युद्धाच्या दिवशीं इतका पराक्रम केला असेल, अशी नवीनचंद्रास शंकासुद्धां आली नव्हती. तो आश्चर्यानें व कांहींशा कौतुकानें त्या रूपवान् युवकाकडे पहात बसला. तो युवक त्याच्या समोरच एक खुर्ची टाकून ऐटीनें त्यावर बसला.

दोघेही प्रथम कोणीं बोलावें या विचारांत पडलेले दिसले.

" माझ्या शक्य तितक्या सामर्थ्यानें– " तो युवक किंचित् सगर्व म्हणाला, " मीं आपलें दोनदां रक्षण केलें आहे. मला वाटतें, मी जर आपणास एखादी अल्पशी विनंति केली तर तुम्ही ती नाकारणार नाहीं."

" मुळींच नाहीं. कधींच नाहीं. " नवीनचंद्र बोलला, " मानवी प्राणी करूं शकेल असें कोणतेंही काम असूं द्या; मी तें करण्यास मागें घेणार नाहीं. "

" मलाही माहीत आहे, आपण तें काम करूं शकाल; पण थोडी शंका वाटते कीं, कदाचित् तें काम ऐकल्यावर आपण नाहीं म्हणाल ! " युवक गंभीरपणें म्हणाला.

नवीनचंद्र चपापला व थोडावेळ स्तब्ध बसला. नंतर तो एकदम म्हणतो, " वीराच्या शीलाला बट्टा लागेल, असें एखादें नीच कृत्य माझ्या हातून होणार नाहीं; हें खरें, पण मला वाटतें आपण तशी इच्छाच बाळगणार नाहीं. "

" नाहीं. " युवक जोरानें बोलला, " मी आपल्याला प्रथमच सांगितलें आहे कीं, मी आपणास आपल्या भावापेक्षांही श्रेष्ठ समजतों. तेव्हां मी आपल्या शीलाला बट्टा लागेल अगर आपणास जास्त त्रास पडेल अगर आपलें मन कष्टी होईल अशी एकही गोष्ट मी आपणास सांगणार नाहीं. "

" मग आपण सांगाल तें करण्यास मी आनंदानें तयार आहें. " नवीनचंद्र मध्येंच बोलला. आपल्या उपकारकर्त्याचे उपकार फेडण्याची इतकी लवकर वेळ आली हें पाहून त्यास आनंद झाला.

" मग हा कागद वाचून पहा पाहूं. " तो युवक जवळच्या मेजावरून एक कागद उचलून नवीनचंद्राच्या हातांत देत म्हणाला. " यांत कांहीं चूक तर नाहीं ? "

नवीनचंद्रानें आश्चर्य करीत तो कागद आपल्या हातांत घेतला व वाचण्यास सुरवात केली. त्या कागदावरील प्रत्येक ओळ वाचतेवेळीं त्याचें आश्चर्य वृद्धिंगत होत गेलें. थोडयाच वेळांत त्याचें वाचन संपलें. तो आश्चर्यानें त्या युवकाकडे पाहूं लागला.

" समजलें आपणास सर्व ? " युवक गंभीरपणें म्हणाला. " कृपा करून त्या कागदावर आपली सही करा म्हणजे झालें ! " युवकानें ' सही ' या शब्दावर जोर देऊन म्हटलें.

" छे, " नवीनचंद्र तो कागद खालीं टाकून आपल्या तरवारीवर हात ठेवीत म्हणाला, " हें मुळींच शक्य नाहीं. "

त्याचें हें कृत्य पाहून तो युवक हंसला. तो म्हणाला, " समजलों. पण ध्यानांत आहेना आपण कुठें आहां तें ? "

" अगदीं पूर्णपणें ! " नवीनचंद्र शांतपणें म्हणाला, " ज्यानें माझें दोन वेळां प्राणरक्षण केलें, पण जो सध्या गुप्तपणें मजकडून आपला स्वार्थ साधण्याचा यत्न करीत आहे, त्या व्यक्तीच्या निवासस्थानीं मी आहें. पण सुंदर पुरुषा, " नवीनचंद्र किंचित् हंसून म्हणाला, " अशानें आपला कार्यभाग साधणें शक्य नाहीं. आपण उघडपणें मजशीं व्यवहार करा; नंतर मी योग्य वाटल्यास सही करण्याचें पाहीन. "

नवीनचंद्राच्या निश्चयी भाषणाचें त्या युवकास कौतुक वाटलेंसें दिसलें. त्यानें प्रेमभरानें त्याचा हात आपल्या हातांत घेऊन म्हटलें, " जें पद तुम्हाला प्राप्त झालें आहे, त्याला तुम्ही अगदीं योग्य आहां. मला पूर्ण खात्री आहे कीं, मी आपली योग्य ती हकीगत सांगितल्यावर आपण या कागदावरच काय; पण मी सांगेन त्या कागदावर सही कराल. ऐका. लक्षपूर्वक माझें बोलणें ऐका. " असें म्हणून त्या युवकानें अगदीं धीरे धीरे नवीनचंद्रास कांहीं सांगितलें. नवीनचंद्रानें तें सर्व लक्षपूर्वक ऐकून घेतलें. त्यानें एकवार तीक्ष्ण दृष्टीनें युवकाकडे पाहिलें व म्हटलें, " आपल्या अटी कबूल आहेत. पण या कागदावर मी आतांच सही करणार नाहीं. "

" कां बरें ? " युवकानें किंचित निराशेनें विचारिलें, " अद्यापीही आपली शंका निवारण झाली नाहीं काय ? "

" तसें नव्हे. " नवीनचंद्र मध्येंच बोलला, " तें काम होऊं द्या,

मग पाहूं. आणि मला वाटतें, या कागदावरील सहीचें सध्याच कांहीं नडलें नाहीं ! "

" बरें आपली मर्जी ! " असें म्हणून त्या युवकानें एका नोकरास हाक मारिली व त्यास नवीनचंद्राची निजण्याची वगैरे व्यवस्था करण्यास सांगितलें.

" घर आपलें आहे. सुखानें रात्र काढावी ! " असें ह्मणून त्यानें नवीनचंद्रास निरोप दिला. नवीनचंद्रही कांहीं विचार करीत तेथून निघून गेला.

नवीनचंद्र जातांच युवक सगर्व आपल्याशींच ह्मणाला, " कुमुदिनी, पाहूं आतां तूं माझ्या पंजांतून कशी सुटतेस ती. पण छे, तिचें माझ्यावर प्रेम आहेच. ती स्वतःच कबूल होईल. " असें पुटपुटत त्यानें पर्यंकावर जाऊन शयन केलें.

रात्रीं कांहीं चमत्कार घडतो कीं काय, अशी नवीनचंद्रास काळजी पडली होती; पण कांहीं एक घडलें नाहीं व त्यास सुखानें निद्रा आली. दुसरा दिवस त्यानें त्या सुंदर युवकाच्या घरींच काढला. रात्रीं त्या युवकानें नवीनचंद्रास त्याच्या इच्छितस्थानीं पोहोंचवून दिलें.

तो युवक पुनः आपल्या महालांत आला तों शृगालदत्त तेथें बसलेला त्यास दिसला.

" अहो ! आपली स्वारी इकडे कुणीकडे ? " विमलचंद्रानें ( कारण तो युवक दुसरें कोणी नसून आमचा कथानायकच होता ) आश्चर्यानें विचारिलें.

" आपल्याकडेच जरा काम होतें. " शृगालदत्तानें नम्रपणें ह्मटलें.

विमलचंद्र आतां गरीब नव्हता. वंदिवासांत नव्हता. आपल्या अमानुष पैशाचिक साधनानें मिळविलेल्या संपत्तीनें बांधलेल्या राजप्रासादांत तो रहात होता. शृगालदत्त त्याची शक्ति ओळखून होता. ह्मणूनच शृगालदत्ताचें विमलचंद्राशीं पूर्वीचें नातें आतां राहिलें नव्हतें. असो.

" कसलें काम बोवा ? " विमलचंद्रानें विचारलें.

शृगालदत्तानें त्यास कांहीं सांगितलें व ह्मटलें, " सध्या चांगली संधी आहे. "

" होय, खरी गोष्ट. " विमलचंद्र निराशेनें बोलला " पण तिनें मला नाकारिलें.

" काय ? आपण जाऊन आलांत ? " शृगालदत्तानें आश्चर्यानें विचारिलें.

" होय. ज्या दिवशीं ती आनंददुर्गांत आणिली गेली त्याच दिवशीं तिनें माझें ह्मणणें नाकारिलें. "

" काय ? तिचें आपल्यावर प्रेम नाहीं ? "

" कांहीं सांगतां येत नाहीं. " विमलचंद्रानें निराशेनें ह्मटलें.

" आपल्याला राग न आल्यास मी एक विनंती करूं ? "

" कसली विनंती ? " विमलचंद्रानें आश्चर्यानें प्रश्न केला.

" आनंददुर्गांत प्रवेश करण्याची — " शृगालदत्त दबत दबत त्याच्या मुद्रेकडे बारकाईनें पहात ह्मणाला, " व तिथून परत येण्याची जर आपण कांहीं सोय करून दिलीत तर खात्रीपूर्वक सांगतों कीं, आज मध्यानरात्रीच्या आंत आपली कुमुदिनी आपल्यास आणून देतों आणि तेंही बलात्कारानें नव्हे तर तिला खूष करून. "

" तुला याबद्दल खात्री वाटते ? " विमलचंद्रानें आशेनें विचारलें.

" अगदीं पूर्णपणें. " आपल्या मात्रेचा थोडाबहुत कां होईना पण प्रयोग झालेला पाहून शृगालदत्त मनांत आनंदून ह्मणाला.

पुष्कळ विचार केल्यावर विमलचंद्रानें शृगालदत्तास पैशाचिक साधन देण्याचें कबूल केलें.

शृगालदत्त मनांत हंसून ह्मणाला, " आतां बैस रडत ! त्या नाजुक परीला मी जातों घेऊन कामरूपदेशाला ! "

---

## प्रकरण आठरावें.

# कोण कण्हत होतें ?

ज्या दिशेकडून माणसाच्या कण्हण्याचा क्षीण आवाज त्या दोघींच्या कानीं पडला, त्या दिशेकडे त्या आत असतां तपस्विनीचें हृदय आनंद, दुःख, निराशा व भय इत्यादि विकारांनीं सारखें वर खालीं होत होतें. कमलिनी अशी एकाएकीं कशी नाहींशी झाली, याचें तिला अत्यंत आश्चर्य वाटत होतें व ती पुनः आपणास भेटेल कीं नाहीं, याचीही तिला सारखी चिंता लागून राहिली होती. ज्यावेळीं माणसाच्या कण्हण्याचा स्वर तिच्या कानीं पडला, त्यावेळीं तिला किती तरी आनंद झाला व ती धांवतच तिकडे वळली.

एका अगदीं पडक्या, अंधेऱ्या व कुबट घाण येत असलेल्या तळघरवजा खोलींतून तो तीक्ष्ण स्वर ऐकूं येत होता. दोघीही दाराजवळ गेल्या. दोन्हीं दारें किडून वाटेंत अशीं काटकोन आडवीं पडलीं होतीं कीं, आंत जाण्यास मुळींच रस्ता राहिला नव्हता. हवा जाण्यास एकही छिद्र नसल्यामुळें व जमिनीच्या दमटपणामुळें अति कुबट घाण आंतून येत होती. भिंतीचा चुना निघून गेल्यामुळें पुष्कळ दगड निसटून अस्ताव्यस्त पडले होते व कांहीं पडण्याच्या बेतांत होते. केरकचरा किती सांचला असेल याची कल्पनाच केली पाहिजे. घुशी, उंदीर, मुंगूस इत्यादि प्राण्यांचें तें कायमचें निवासस्थान होऊन गेलें होतें. भक्षशोधार्थ निघालेले प्राणी दाईच्या हातांतील दिव्याचा प्रकाश पडतांच इकडे तिकडे धावूं लागले व त्यामुळें चुना वगैरे पडूं लागला. मोठ्या कष्टानें व काळजीनें त्या दोघीही दाराजवळ गेल्या व एका भोकांतून दिवा आंत घालून दोघीही उत्सुकतेनें पण भीतीनें आंत पाहूं लागल्या तों, आंत अंधारच अंधार दिसूं लागला व किंचित् खालीवर अस्ताव्यस्त पडलेल्या दगडांच्या राशींत एक स्त्री बेशुद्ध होऊन पडलेली त्यांच्या दृष्टीस पडली !

" ही कमलिनी नव्हे. " तपस्विनी दुःखानें म्हणाली.

" पण हिला इथून काढली तर पाहिजे. " ताई आपला दिवा आणखी जरा पुढें करून आंत न्याहाळीत म्हणाली.

' अवश्य. तूं दिवा घेऊन अशी उभी रहा. " तपस्विनी ताईला बाजूला सारून म्हणाली, " मी हीं मोडकीं दारें बाजूला सारत्यें. "

" छे, तूं नको हें करूं. तूं दिवा घेऊन उभी रहा. " असें म्हणून ताईनें तपस्विनीच्या हातांत बळजबरीनें दिवा दिला व ती लक्षपूर्वक तीं दारें पाहूं लागली. " हं. दिवा जरा असा धर पाहूं. हें दार जरा बेतानें काढिलें पाहिजे. " असें म्हणून तिनें मोठ्या युक्तीनें त्या दारास हात घातला. पण ती युक्ति सफळ झाली नाहीं. बराच वेळ ताईनें नानाप्रकारच्या युक्त्या योजून तीं दारें बाजूला करण्याचा प्रयत्न केला; पण व्यर्थ. एकही प्रयत्न सफळ झाला नाहीं.

" कां ? नाहीं निघत ? " तपस्विनीनें प्रश्न केला.

ताई थोडा वेळ विचार करीत त्या दारांकडे पहात उभी राहिली. थोड्याच वेळांत तिला एक युक्ति सुचलीसें दिसलें. तिचा चेहरा प्रफुल्लित झाला. ती तपस्विनीच्या हातांतून दिवा घेऊन म्हणाली, " असं केल्यास पाहूं जमतं कां ? " असें म्हणून ती पुनः दाराजवळ गेली व तिनें दिवा आंत धरून पुनः नीट न्याहाळून पाहिलें.

" तुझा काय विचार आहे ? " तपस्विनीनें आश्चर्यानें विचारिलें.

ताई पुनः तिच्या हातांत दिवा देऊन म्हणाली, " धक्के मारून दारें आंत पाडलीं पाहिजेत. त्याशिवाय काम भागणार नाहीं. "

" पण तीं आंत जाऊन तिच्या अंगावर पडलीं तर ? " तपस्विनीनें भीत भीत म्हटलें, " छे तसं नको करूंस ! "

" नाहीं, तसं केल्याशिवाय इलाज नाहीं. " ताई निश्चयानें म्हणाली, " मीं शक्य तितकं पाहिलं; त्यावरून वाटतं कीं, जरी आंत दारें जाऊन कोसळलीं तरी तीं तिच्या अंगावर जाऊन खास पडणार नाहींत त्यांतून दैवानं होईल तें खरं पण तिला आतां शक्य तितक्या लवकर तिथून बाहेर काढिलीच पाहिजे. " असें म्हणून म्हातारीनें त्या मोडक्या दारावर जोराजोरानें लाथा मारण्यास सुरवात केली. सुमारें दहा पंधरा लाथा खातांच तीं मोडकीं दारें धाडदिशीं खालीं कोसळलीं. मात्र एक तयच्या नेमेंच अडून राहिलें व दुसरें आंत जाऊन आपटलें !

" युक्ति पार पडली म्हणायची ! " असें म्हणत तपस्विनी दिवा घेऊन पुढें झाली.

" बेतानं अं ? " दाई म्हणाली, " पण तो दिवा माझ्याजवळ दे. " असें म्हणून तिनें तो दिवा आपल्या हातीं घेतला व ती उंबऱ्यावर जाऊन उभी राहिली. तपस्विनी तिच्या मागोमाग होतीच.

आंत उतरण्यास बहा पायऱ्या होत्या व ईश्वराच्या कृपेनें तें दार एका बाजूला जाऊन पडलें होतें. दोघींही वेगानें आंत उतरल्या. घाईट हवेमुळें त्या स्त्रीचा जीव घाबरून गेला होता व त्यामुळेंच ती बेशुद्ध झालेली दिसत होती. तिच्या वस्त्राला सर्वत्र धुळधुळ लागलेली दिसत होती. अंगाला ठिकठिकाणीं लागल्यामुळें रक्त निघालेलें दिसत होतें. तिचा श्वास अगदीं धीरे धीरे चालला होता.

" ही कोण बरें ? " तिच्या चेहऱ्यापुढें दाईच्या हातांतील दिवा करून तपस्विनी पुटपुटली.

" कोणी कां असेना " दाई उतावळीनें बोलली, " मग पहातां येईल. सध्यां तिला अलगत उचल आणि वरती घेऊन चल पाहूं. " असें म्हणून दाईनें त्या बेशुद्ध पडलेल्या स्त्रीचें वस्त्र झाडलें. तपस्विनीनें तिला अलगत उचलून घेतलें व त्या तेथून वर आल्या. थोड्याच वेळांत त्या आपल्या जागीं जाऊन पोंचल्या. दाईनें चटकन् बिछाना घातला व तपस्विनीनें अलगत तिला त्यावर ठेविलें. " आतां हिला शुद्धीवर आणण्याचें पहिलें काम. " असें म्हणून दाईनें पाण्याचा तांब्या भरून आणला व दोघींनींही पुष्कळ खटपट करून तिला साधारण सजीव केलें.

" आतां मुलीच्या धोका नाहीं. " दाई त्या स्त्रीकडे पहात उद्गारली. नंतर ती तपस्विनीस म्हणाली, " तूं नीज पाहिजे तर आतां. "

" आणि तूं ? " तपस्विनीनें आश्चर्यानें विचारिलें.

" हिच्याजवळ कोणी तरी जरूर बसलें पाहिजे. मला म्हातारीला कसची झोंप येते. म्हणून तूं नीज. मला झोंप यायला लागल्यास मी तुला हाक मारून जागी करीन पाहिजे तर. "

तपस्विनी अतिशय थकली होती व तिला आतां बराच शीण आला होता म्हणून तिनें विशेष आढेवेढे न घेतां, ती दुसरा बिछाना टाकून

पडली. थोड्याच वेळांत तिला गाढ झोंप लागली. वृद्ध दाई दिव्याच्या मंद प्रकाशांत केव्हां त्या नूतन स्त्रीकडे व केव्हां त्या तपस्विनीकडे पहात बसली. एवढ्या मोठ्या भव्य व विस्तीर्ण वाड्यांत तो एकच प्राणी काय तो जागा होता. मध्यरात्रीचा समय असल्यामुळें जिकडे तिकडे भयंकर शांतता पसरली होती. वृद्ध दाई एकटी बसली होती; पण तिचें चित्त यत्किंचितही विचलीत झालेलें दिसत नव्हतें. ती स्वस्थ मनानें ईश्वराचें नामस्मरण करीत बसली होती.

मनुष्यप्राण्याला जसा प्रसंग पडेल, त्या प्रसंगानुरूप वर्तन करण्यास त्यास प्रथमदर्शनीं जरी कठीण वाटतें तरी संवयीनें त्याला त्या स्थितींतच आनंद वाटूं लागतो. वृद्ध दाईला त्या पडक्या वाड्यांत राहूं लागण्यास पुष्कळ वर्षे लोटलेलीं दिसत होतीं. अर्थात् त्या भीषण वाड्यांत एकटें बसण्यास तिला कोणत्याही प्रकारचें भय वाटलें नाहीं, यांत नवल नाहीं. असो.

' मला कसची झोंप येते ! ' असें वृद्ध दाईनें म्हटलें होतें खरें; पण थोड्याच वेळांत तिलाही पेंग येऊं लागला व ती तेथल्या तेथेंच लवं-डली व लागलींच ती चांगली घोरूंही लागली.

दाईला झोंप लागल्यानंतर थोड्याच वेळानें त्या नूतन स्त्रीस चांगली शुद्ध आली व तिनें पडल्या पडल्याच डोळे उघडून चोंहोंकडे पाहिलें. तिला आश्चर्य वाटलेंसें दिसलें व ती अस्फुट स्वरांत ह्मणाली " अग-बाई ! मी इथें कुठें ! " असें ह्मणून ती उठून बसली; पण तिचें अंग दुखत असल्यामुळें पुन्हां ती खालीं पडली. आतां तिची सुप्तावस्था बिलकूल नाहींशी झाली होती. त्यामुळें पडल्या पडल्या ती एकंदर काय काय गोष्टी घडल्या याची आठवण करूं लागली. एका पुढें एक गोष्ट व ती स्पष्टपणें आठविण्यास तिला किती तरी वेळ लागला. मात्र ज्या ठिकाणीं सध्यां ती होती त्या ठिकाणीं ती कशी आली असावी, याचेंच तिला कोडें पडलेंसें दिसलें. ती स्वगत पुट-पुटली, " त्या भुयारांत आपण शिरल्यावर बराच वेळपर्यंत बकुळी माझ्याबरोबर होती नाहीं ? हा, मला पक्कं आठवतं कीं, बराच वेळ बकुळी आणि मी हातांत हात घालून त्या भुयारांतून अडखळत व ठेंचा खात येत होतों. वाट मेली किती वाईट ! अगदीं अंधार गुडुप !

आणि हवा येण्याला थोडी देखील वाट नसल्यामुळें जीव कसा कासावीस होत होता. ( आश्चर्यानें ) पण त्या तशा भुयारांतही तें कोण माणूस होतं बरं ? माणूस होतें हें खास; कारण श्वासोच्छ्वास सांगला ऐकूं येत होता. पण बकुळीचा नव्हता तो. श्वासोच्छ्वास ऐकूं येऊं लागतांच बकुळी व मी आपला श्वास दाबून धरून अगदीं चुप्प उभ्या राहिलों होतों. कोणी तरी जवळ येत असल्याचं मला वाटलं. मी बकुळीला घट्ट धरलं, इतक्यांत बकुळीशिवाय तिसऱ्या माणसाचा हात माझ्या अंगाला लागलेला मला पक्कं आठवतं ! अग बाई ! त्यावेळीं मला किती पण भीति वाटली ? पण बकुळीनं मला कां सोडलं बरं ? छे, तिनं मला सोडून नाहीं दिलं, यावरून मींच तिला सोडलं असावं ! तें तिसरं माणूसही पण मला धक्का देऊन पुढें चालतं झालंसं मला वाटलं आणि त्याच वेळीं बकुळीचा व माझा हात सुटला वाटतं ! हो. असंच असेल ! पण मग बकुळी कुठें गेली ? त्या माणसानं तर तिला ओढून नेली नाहीं ? देव जाणे ! थोड्या वेळानं कुबट घाणीनं माझं डोकं भणभणलं व त्यापुढं मग काय झालं, हें मला नाहीं आठवत. " इत्यादि पुटपुटतच ती उठली. अद्यापही तिचें अंग ठणकतच होतें; पण कोणत्या कारणामुळें तें दुखत होतें, हें ती पूर्णपणें जाणूं लागली होती. कदाचित् त्याच कारणानें तिला उठायला आतां पहिल्यासारखा त्रास पडला नसेल. ती उठून बसली. जवळच गाढ निद्रिस्त तपस्विनी पडली होती व तिच्या उशागती वृद्ध दाई लवंडली होती. दिव्याच्या अंधुक उजेडांत दोघींचे चेहरे तिला स्पष्टपणें दिसले नाहींत. ती किती वेळ तरी आश्चर्यानें त्या दोघींकडे आळीपाळीनें पहात राहिली.

वाचकांनो, वरील हकीगत वाचतांच ती स्त्री कोण होती, हें पुनः आम्हीं सांगायला पाहिजे काय ?

बऱ्याच वेळानें कुमुदिनीस ( कारण ती स्त्री तीच होती ) त्या दोघी जवळ निजलेल्यापैकीं एखादी बकुळी तर नसेल, अशी शंका आली व तिनें उशागती लवंडलेल्या वृद्ध दाईस हालवून " बकुळी, बकुळी, " म्हणून हाका मारिल्या. वृद्ध दाई लागलीच जागी झाली व उठून बसली. तिनें आश्चर्यानें पहात प्रश्न केला, " कोण बकुळी ?"

ती बकुळी नव्हे, हें पाहून कुमुदिनी निराश झाली; पण तिला आश्चर्यही वाटलें.

दाई व कुमुदिनी बराच वेळ परस्परांकडे चकित् मुद्रेनें पहात स्तब्ध बसल्या. अखेरीस दाई प्रेमानें तिला ह्मणाली, "तुह्मी एकट्याच आह्मांस सांपडला आहांत. तुमच्याबरोबर आणखी कां कुणी होतं ?"

"मी एकटीच सापडल्यें अं ?" कुमुदिनी स्वगत दुःखानें ह्मणाली, "मग बकुळीची काय वाट झाली ?" नंतर ती दाईला ह्मणाली, "मी इथें कुठें आहें ?"

"माझ्या गरीबाच्या झोपडींत." दाईनें उत्तर दिलें.

"आपण कोण ?" कुमुदिनीनें आश्चर्यानें विचारिलें, "मी आपणास कुठें सापडलें ? माझ्याच वयाची आणखी एखादी मुलगी नाहीं का सापडली ?"

"आणि तिचंच नांव बकुळी वाटतं ?" दाईनें पहिल्या दोन प्रश्नांकडे दुर्लक्ष करून विचारिलें.

'होय. पण–" कुमुदिनीनें तपस्विनीकडे अंगुलीनिर्देश करून विचारिलें. "ह्या कोण आहेत मग ?"

"माझी मुलगी." दाईनें कंपित स्वरांत उत्तर दिलें.

"मग बकुळी आपणास नाहीं सांपडली तर !" कुमुदिनीनें दुःखानें विचारिलें

"नाहीं." वृद्ध दाईनें दुःखानें उत्तर दिलें. ती कुमुदिनीला धीर देण्याच्या हेतूनें ह्मणाली, "ईश्वर करील तर बकुळीही आपणास लवकरच भेटेल."

"आपली इच्छा पूर्ण होवो !" कुमुदिनीनें पुढें विचारिलें, "आपलं नांव काय बरं ?"

थोडा वेळ दाई थांबली व नंतर बोलली, "मला ह्मातारी दाई ह्मणतात. आपलं नांव काय बरं ?"

"कुमुदिनी–"

"कुमुदिनी !" दाई आश्चर्यानें उद्गारली, "वसंतदुर्गेशाची मुलगी कीं काय ? मोठंच आश्चर्य !"

दाईला आपल्याबद्दल इतकें आश्चर्य वाटावें, याचें कुमुदिनीस आश्चर्य

वाटलें व तिनें किंचित् विस्मयानें प्रश्न केला, " आपणास इतकं आश्चर्य कां वाटलं बरं ? आपण मला किंवा माझ्या मात्रांना जाणतां ? "

दाई पुनः थोडा वेळ स्तब्ध बसली व म्हणाली, ' आम्ही गरीब माणसं. आम्ही जास्त तें काय जाणणार. पण नांवानं मी आपणाला जाणल्यें. दयाळु धर्मचंद्र महाराजांना तर सर्व जगच जाणतं आहे, मग मी जाणत असेन यांत नवल तें कसलं ? "

म्हातान्या दाईनें धर्मचंद्राविषयीं जे उद्गार काढले होते ते पूर्ण आदरानें काढले गेले होते. अर्थात् ते ऐकून कुमुदिनीस आनंद झाला असेल, यांत नवल नाहीं. बराच वेळ दोघींहि आपापल्याशीं विचार करीत स्तब्ध बसल्या.

थोड्याच वेळानें कुमुदिनीस वसंतदुर्गांत आपल्यामागें काय काय घडलें हें विचारण्याची इच्छा झाली आणि हें सहाजिक होतें. कदाचित् म्हातारीस थोड्याबहुत गोष्टी जरी माहित असल्या तरी पुष्कळ आहे, असा विचार करून कुमुदिनीनें तिला कांहींशा उत्सुकतेनें चिंतायुक्त स्वरांत विचारिलें, " गेल्या आठचार दिवसांत वसंतदुर्गावर काय काय गोष्टी घडल्या हें आपण जाणतां आहां ? "

तिचा तो प्रश्न विचारण्याचा हेतु दाईनें तेव्हांच ताडला;पण तिला उत्तर देण्यास पंचाईत पडलीसें दिसलें. मग ती दुर्गावरील खरी हकीगत जाणत नव्हती, कीं तिचीं तीं न सांगण्यास आणखीं कांहीं कारणें होतीं, हें तिचें तीच जाणे. तरी पण या वेळीं कुमुदिनीच्या मनाची स्थिति कशी असेल, हें तिला पूर्णपणें माहीत होतें. अर्थात् तिला न दुखवितां तिच्या प्रश्नाचें साधारण समर्पक उत्तर देण्यास तिला थोडा विचार करावा लागला. पण तिची ही क्षणिक स्तब्धताही कुमुदिनीस असह्य झाली. तिनें पुनः प्रश्न केला, " माझे बाबा—महाराज धर्मचंद्र तर खुशाल आहेत ना ? "

" होय. "

" मग आतां सावकाश विचार करून सांगा. " कुमुदिनीनें इतकें बोलून खात्री करून घेण्याकरितां पुनः प्रश्न केला, " हें अगदीं खरं ना? "

महाराज धर्मचंद्र खुशाल असल्याबद्दल दाईनें तिची अगदीं पुरी खात्री करून दिली व थोड्या वेळांपुरतें कां होईना तो विषय अगदीं

टाळण्याच्या हेतूनें तिनें कुमुदिनीस विचारिलें, " आपली प्रकृती तर आतां ठीक आहे ना ? "

" साधारण बरी आहे; पण अंग अद्याप थोडं दुखतं आहे. "

" मग आपण पुनः थोडावेळ निजानात बरं. " दाई प्रेमानें म्हणाली, " म्हणजे सकाळीं आपणास चांगली हुषारी येईल. "

कुमुदिनीनें तिची विनंति मान्य केली व ती पुनः बिछान्यावर निजली. लवकरच तिला गाढ झोंप लागली.

प्रभातकाल होण्यास आतां चारपांच घटका अवकाश होता. आतां वृद्ध दाईला झोंप येणें शक्यच नव्हतें. ती उठून कांहीं गृहकृत्याला लागणार होती इतक्यांत तपस्विनी जागी झाली.

" दाई, अद्याप तूं जागीच आहेस ? " तपस्विनीनें आश्चर्यानें विचारिलें, " तुला मुळींच झोंप लागली नाहीं ? "

" थोडावेळ झोंप लागली होती, आतां इतक्यांत थोड्या वेळापूर्वी ( कुमुदिनीकडे बोट दाखवून ) हिनं मला जागं केलं ! "

असें म्हणून दाईनें घडलेली सर्व हकीगत तपस्विनीस सांगितली व अगदीं हलकेंच ती म्हणाली, " मात्र आतां आपणास एक गोष्ट अवश्य केली पाहिजे. "

" ती कोणती ? " तपस्विनीनें उत्सुकतेनें प्रश्न केला.

" कमलिनी इथें आली होती. हें हिला समजतां उपयोगीं नाहीं. "

" कां बरं ? " तपस्विनीनें आश्चर्यानें विचारिलें.

" त्याला पुष्कळ कारणं आहेत. एक तर तिला हें समजतांच ती कमलिनीबद्दल प्रश्न करणार ! आणि ती कुठें गेली याचा आपणास पत्ता नाहीं. दुसरं ज्याअर्थी कमलिनी हिचा वियोग सहन होईना म्हणून वसंतदुर्गांतून बाहेर पडली, त्याअर्थी दोघींचंही आपसांत फार प्रेम दिसतं. ही कोणी ' बकुळी ' या नांवाच्या मुलीविषयींच प्रश्न करीत होती. मग आणखी कमलिनीविषयीं तिला चिंताग्रस्त करणें योग्य नाहीं. "

" बरं, आतां हिची पुढं व्यवस्था काय करायची ? " तपस्विनीनें मध्येंच प्रश्न केला.

" त्याविषयींच मला काळजी पडली आहे. " दाई पुटपुटली.

" एवढं मात्र मला खात्रीनं वाटतं कीं, ' बकुळी ' जी कोणी आहे

तीही पण लवकरच इथें येईल. " तपस्विनी ' वकुळी ' ह्या शब्दावर जोर देऊन म्हणाली.

" हो. दुजा, तिजा झालंच. कदाचित् तिजा होण्याचा संभव आहे." म्हातारी किंचित् हंसून म्हणाली, " पण आज सकाळीं तूं एक अवश्य काम कर. एकदां वाड्याच्या भोंवताल्न चक्कर मारून ये. कदाचित् ' वकुळी ' ही तुला बेशुद्ध स्थितींत मिळण्याचा संभव आहे. "

" मात्र आतां आपलं स्थान माहित पडण्याचा संभव आहे " तपस्विनी कांहीं भीतियुक्त व कांहीं चिंतायुक्त स्वरांत बोलली.

" त्याबद्दल काळजी नको. " दाई निष्काळजीपणानें म्हणाली, " हिच्या मुद्रेकडे पहा—किती सुशीलता दिसते आहे. "

" खरेंच. पोरीच्या चेहऱ्यावर विलक्षण तेज दिसतं खरं. " तपस्विनी निद्रिस्त कुमुदिनीकडे आतुरतेनें पहात म्हणाली, " सारखं पहात बसावंस वाटतं. "

प्रातःकाल झाला. नियमाप्रमाणें तपस्विनी प्रातःकर्में आटपून शिवपूजनार्थ गेली. दाई आपल्या इतर गृहकृत्यांस लागली. कुमुदिनीस सूर्योदय होऊन बराच वेळ झाला तरी जाग आली नाहीं. म्हणून दाईनें जाऊन तिला उठविलें. दाईनें सांगितल्याप्रमाणें कुमुदिनीस आतां बरीच हुशारी वाटत होती. दोघी बाहेर आल्या. कुमुदिनी तो पडका वाडा व त्याचा भव्य चौक पाहून चकित् झाली.

" अगबाई ! " कुमुदिनी आश्चर्यानें ओरडली ' ही पहा वकुळी!" असें म्हणत तिनें समोर हात केला. दाईनें पाहिलें तो खरेंच ! समोरील चौकांत एका मोडक्या खांबाजवळ बकुळी कावऱ्याबावऱ्या दृष्टीनें इकडे तिकडे पहात उभी होती !

———

## प्रकरण एकुणिसावें.

### पण कमलिनीचें काय झालें ?

याबद्दल वाचकांना फार आश्चर्य वाटत असेल व तिची हकीकत ऐकण्यास ते अत्यंत उत्सुकही असतील. तेव्हां आम्ही तिच्याकडेच वळतों.

दाईनें पुनः हाक मारलेली कमलिनीनें ऐकिली नाहीं व ती लांकडें टेंविलेल्या खोलीकडे वळली. बाहेर साधारण रात्र झाल्यामुळें बराच अंधःकार पडला होता व जरी कमलिनीनें दिवसा ती खोली पाहिली होती तरी अंधारांत तिला ती कोणत्या बाजूला आहे हें पक्कें आठवेना व ती डाव्या हाताकडे न वळतां अदमासानें उजव्या हाताकडे वळली; पण तिचा तो अदमास चुकला. खोली डाव्या हाताकडे राहिली ! त्यामुळें बराच वेळ अंधेरांत चाचपत चाचपत ती किती तरी पुढेंपुढेंच गेली; पण तिला लांकडाची खोली आढळली नाहीं. ती आश्चर्यचकित् झाली. आपली वाट चुकली असावी, याची तिला शंकाच आली नाहीं. शंका येण्यासारखी तिच्या मनाची स्थिति नव्हती. तो चित्रपट तिच्यापुढें येऊन पडल्यापासून आतांपर्यंत अशा एकेक गोष्टी घडून आल्या होत्या कीं, त्या पाहून तिचेंच काय, पण कोणाचेंही मन स्थिर राहणें शक्य नव्हतें अर्थात् जरी कमलिनी बाहेरील इतर व्यवहार करीत होती तरी तिचें मन निराळ्याच देखाव्याचें अवलोकन करीत होतें. ज्या सृष्टींत तिचे हस्तपादादि अवयव काम करीत होते, ती सोडून तिचें मन दुसऱ्याच एका सृष्टींत वावरत होतें.

मनुष्याच्या मनाची रचना ईश्वरानें मोठी चमत्कारिक केलेली दिसते. मनुष्याच्या आयुष्यक्रमांत नेहमीं नानाप्रकारचे सुखाचे, दुःखाचे, आश्चर्याचे, भयाचे इत्यादि कितीतरी वेगवेगळे प्रसंग घडत असतात; पण प्रत्येक प्रसंगाचे वेळीं त्यास ' अहाहा ! असा प्रसंग पूर्वीं कधींही आला नाहीं ' असें वाटतें. पण त्याच प्रसंगाला थोडासा काळ गेला कीं, मनुष्याला त्या प्रसंगाचा विसर पडतो व पुनः तसला किंवा त्याहूनही बिकट प्रसंग आल्यास तेच उद्गार त्याच्या तोंडून बाहेर पडतात व

त्यावेळीं त्यास आपल्या गत आयुष्यक्रमांत घडलेल्या सर्व लहान मोठ्या प्रसंगांची आठवण होते. कर्मालिनीचें वय यावेळीं अवघें एकोणीस वर्षांचें होतें. या अल्प आयुष्यांतही तिनें पुष्कळ चांगले वाईट अनुभव अनुभाविले होते व त्यांची थोड्या वेळापूर्वीं आठवणसुद्धां नव्हती; पण मागें वर्णन केलेला तपस्विनीजवळचा प्रसंग वगैरेंच तिच्या गत आयुष्यांतील एकंदर प्रसंग तिच्या डोळ्यापुढें उभे राहिले. मागील आयुष्यांतील सिंहावलोकन करीत असतां तिनें धाव काढली व त्याच देखाव्याचें अवलोकन करीत असतां हाईनें तिला परत हाक मारिलेली तिला ऐकूं गेली नाहीं व ती लांकडाच्या खोलीकडे वळली. अशाप्रकारें द्विधा मनाच्या स्थितींत ती पुष्कळ पुढें गेल्यावर आपण कां आलों, कशाकरितां आलों व कोणीकडे आलों याची तिला आठवण झाली! अशाप्रकारें जेव्हां ती भानावर आली व एका पडक्या सदनांतील विच्छिन्न अशा भागांत रात्रीच्या वेळीं भीषण अंधःकारांत आपण उभ्या आहों, हें जेव्हां तिला समजलें तेव्हां तिला वरीच भीति वाटली व आपण इकडे कशा आलों याचेंही तिला आश्चर्य वाटलें! ती भीत भीतच मागें वळली. फार एक पावलें ती मागें वळली असेल नसेल इतक्यांत ती एका उंचशा भागाला अडखळली व तिचा तोल गेला आणि ती जवळच्या तक्तपोशीवर जाऊन आदळली! तरी तिला विशेष इजा झाली नाहीं. ती उठणार होती; पण इतक्यांत खालची जमीन खालीं खालींच जात असल्याचें तिला वाटलें. ती घाबरून उठली व ती तेथून पळणार तोंच तिचा पाय एका पायरीवरून निसटल्याचें तिला भासलें व ती गडगडत दहापांच पायऱ्या खालीं जाऊन पडली व भीतीनें धक्का बसल्यामुळें, तागलींच बेशुद्ध होऊन पडली!

अशाप्रकारच्या मूर्च्छावस्थेंत ती किती वेळ होती, हें तिला मुळींच समजलें नाहीं. ज्यावेळीं ती शुद्धीवर आली त्यावेळीं तिला थोड्याच वेळांत आपण इथें कशा आलों हें समजलें. कुठल्याशा पायरीवरून आपला पाय निसटला व त्यामुळें आपण इथें आलों हें समजलें. ज्याठिकाणीं ती पडली होती तेथें अंधःकार दाट होता. तिनें चाचपून इकडे तिकडे पाहिलें; पण हाताला कांहीं लागलें नाहीं

ती उठली व तिनें थोडेसें चालून इकडे तिकडे चाचपून पाहिलें तेव्हां-वरून तिला आपण एका रुंदशा बोळासारख्या जागेंत आहोंत, असें समजलें. तिनें पुष्कळ इकडे तिकडे चाचपून, ज्या जिन्याच्या पायरी-वरून ती निसटली होती तो जिना शोधला; पण तो जिना तिला सांप-डला नाहीं ! मग मात्र ती जास्तच घाबरली ! तपस्विनी आतां परत आली असेल व ती आपणास शोधित असेल असें तिला वाटलें. म्हणून तिनें त्या बोळांतून बाहेर निघण्याकरितां एक दिशा धरून ती लवकर लवकर चालूं लागली. अंधेर तर होताच; पण त्या स्थळांत साधारण केरकचरा व एखाददुसरा बारीक धोंडा याशिवाय तिला कांहींएक लागलें नाहीं. तो बोळ लवकरच संपेल या आशेनें ती एक दिशा धरून चालूं लागली होती हें खरें; पण कितीं वेळ झाला तरी त्या बोळाचा शेवट येईना ! मग मात्र तिची चांगलीच गाळण उडाली ! तिनें जोराजोरानें दाईस हाका मारल्या; पण त्यापासून तिला फायदा तर कांहीं झालाच नाहीं. उलट आपण एखाद्या भुयारांत येऊन पडलों आहोंत अशी तिची खात्री झाली. पुनः ती चालूं लागली. पण थोड्याच वेळांत तिला माणसाचा श्वासोछ्वास ऐकूं आला व चाहूलही लागली. ती स्तंभित होऊन थबकली व कान देऊन ऐकूं लागली तों खरेंच कोणी तरी दोन मनुष्यें आपल्या अगदीं जवळ आलीं आहेत असें तिला वाटलें. आपली चाहूल लागल्यामुळें तीं दोन्हीं मनुष्येंही चपा-पलीं असावींत असें कमलिनीस वाटलें ! त्यावेळची तिच्या मनाची स्थिति कल्पनेबाहेरची होती. भीतभीतच तिनें आपले दोन्ही हात पुढें केले तों कोणातरी दोन व्यक्तींच्या अंगास दोन्ही हातांचा स्पर्श झाल्याचें तिला भासलें. आश्चर्य हें कीं, डावा हात एका व्यक्तीनें पकडला ! कमलिनी प्रथम तर घाबरली; पण लागलीच तिनें त्या दोन्ही व्यक्तींना दोन्ही हातांनीं ढकललें व ती पुढें पळत सुटली ! अशा प्रकारें एखाद्या भयचकित हरिणीप्रमाणें ती त्या अंधारांत कितीवेळ तरी पळत होती. अखेरीस तिला समोरील भिंतीचा एकदम धक्का बसला व तिची गति खुंटली. धावणें थांबतांच प्रथम तिनें कान देऊन त्या व्यक्तींपैकीं कोणी आपल्या पाठीमागें येत तर नाहीं, याची खात्री करून घेतली. जेव्हां तिला समजलें कीं, आपल्या पाठीमागें कोणी नाहीं, तेव्हां तिच्या

जिवांत जीव आला. ती थोडा वेळ स्तब्ध उभी राहिली. प्रथम तिला पुढें काय करावें हेंच सुचेना. तपस्विनी आपणास शोधित असेल, आपण जर तिला लवकर सांपडलों नाहीं तर तिला आपल्याबद्दल काय वाटेल, हाच विचार तिला फार त्रास देऊं लागला. कांहीं तरी उपाय करून शक्य तितक्या लौकर या भुयारांतुन बाहेर पडलें पाहिजे. असा विचार करून ती चाचपूं लागली. तों तिला पुढील रस्ता बंद झालेला दिसला. मागें उलटावें तर कदाचित् त्या व्यक्ति आपल्याला पकडण्याकरितां उभ्या असतील अशी तिला भीति वाटली. ती आजूबाजूला कोठें रस्ता आहे कां पहावा या उद्देशानें ती प्रथम उजव्या हाताकडे वळली; पण रस्ता नाहीं. डाव्या हाताकडे वळतांच तिला एक उतरणारी पायरी लागली. पुनः तिनें पायानें चाचपतांच दुसरी पायरी लागली ! क्षणभरच तिला या वाटेनें जावें कीं न जावें याचा विचार पडला, पण विचार तरी काय करणार ? अखेरीस ती त्या पायऱ्या उतरूं लागली.

एक–दोन– तीन करतां करतां ती वीस पंचवीस पायऱ्या उतरली व पायऱ्या संपल्या ! ती पुनः चालूं लागली. पूर्वीपेक्षां आतां तो बोळ किंचित् अरुंद झाला असावा असें तिला वाटलें. दैवावर हवाला ठेवून ती चालूं लागली; पण काय आश्चर्य ! जवळ जवळ ती घटका दोन घटका चालली असेल तरी बोळ संपण्याचें चिन्ह दिसेना. दुःखितांतःकरणानें थोडा वेळ ती तेथेंच त्या अंधारांत बसली. हा बोळ केव्हां संपणार याची तिला चिंता लागली. इतक्यांत हवेचा झोत तिच्या अंगाला लागला. जवळच कोठें तरी दार असावें असें तिला वाटलें व म्हणून मोठ्या उत्सुकतेनें ती पुनः चालूं लागली !

पुनः ती दोन घटका सारखी चालली पण ज्या द्वाराच्या आशेनें ती चालली होती, तें द्वार तिला आढळलें नाहीं ! !

हा बोळ संपणार किंवा याच अंधःकारांत आपलें आयुष्य संपणार ! याची आतां कमलिनीला विशेष भीति वाटूं लागली; पण नुसती भीति वाटून घेऊन किंवा आश्चर्य करून अथवा दुःख करून या बोळांतून थोडीच सुटका होते ! कांहींतरी प्रयत्न केला पाहिजे, असा विचार करून ती पुनः चालूं लागली. पुनः तिची अडीच तीन घटकेची चाल

झाली. पण या वाटचालींत एक विशेष गोष्ट एवढीच होती कीं, रस्ता सरळ व साफ नव्हता. ती थकली व बसणार इतक्यांत तिला ठेंच लागली ! तिनें पायानें चाचपून पाहिलें तों पुन्हा वर चढण्याकरितां जिना असल्याचा तिला भास झाला. तिला हुरूप आला. तिनें बसण्याचा विचार सोडून दिला व ती मोठ्या उत्सुकतेनें तो जिना चढूं लागली. सुमारें तीस पायऱ्या चढल्यावर जिना संपला व पुनः सरळ रस्ता सुरू झाला. पुनः आतांचा रस्ता तिला चांगला बांधीव व रुंद भासला. आतां ती चालतां चालतां अगदीं थकून गेली होती; पण वरील रस्त्याची एकंदर ठेवण पाहतांच बाहेर पडण्यास आतां लवकरच रस्ता सांपडेल या आशेनें ती तशीच रखडत चालली. थोड्या वेळानें तिला पुनः जिना लागला. पण पांच पायऱ्या चढतांच रस्ता बंद झालेला तिला आढळलें. दोन्ही बाजूंच्या भिंतींही अगदीं दोन हातांच्या अंतरावर होत्या. इतका तो बोळ सध्यां अरुंद झाला होता. ती आपल्या समोरील भिंतीवर हातानें चाचपत असतां एक लोहकील तिच्या हाताच्या जोरानें सहज दाबली गेली व एक साधारण जोराचा खटका झाला ! ती भिंत मधोमध फाटली व एका लाल पडद्यांतून पलीकडील दिवे दिसूं लागले !

कमलिनी अगदीं चकित् झाली ! थोडावेळ ती अगदीं स्तब्ध उभी राहिली. नंतर तिनें तो पडदा बाजूला सारून पाहिलें तों एक सुंदर महाल तिच्या दृष्टीस पडला ! ती आश्चर्य करीतच त्या महालांत आली! पण आंत येतांना तिनें जवळच्या भिंतीवर आपला हात जरा जोरानें ठेवल्यामुळें ती आंत येण्याचा अवकाश कीं, तात्काळ पुनः एक खटका झाला व रस्ता बंद झाला ! कमलिनीनें दचकून मागें पाहिलें तों दोन स्त्रीपुरुष हातांत हात घालून उभे असलेले तिच्या दृष्टीस पडले ! !

"अगबाई-! ही–ही–तर कला ! आणि" असें आश्चर्यानें पुटपुटत ती त्या दोन्ही कृत्रीम पुतळ्यांकडे पहात उभी राहिली !

वाचकांनो, कमलिनी कुठें आली होती, हें आपणास समजलें ? पण कोणा एखाद्यास घोंटाळा पडला असल्यास आम्ही सांगतों कीं, ज्या रहस्यमय महालांत तिची सखी कुमुदिनी कैद होती, त्याच महालांत त्या भुयारवाटें कमलिनी येऊन पोंचली होती !

किती वेळ तरी विस्मित चित्तानें कमलिनी त्या पुतळ्यांकडे पहात होती. अखेरीस ते पुतळे आहेत, हेंही तिला समजलें. तिनें तो पडदा त्या पुतळ्यांवर सोडला व ती महालाच्या मध्यभागीं येऊन काबऱ्या-बावऱ्या दृष्टीनें तेथें कोणी आहे कीं काय, हें पाहूं लागली; पण तिला कोणीही आढळलें नाहीं. पण आंत कोणी नसतां त्या महालाच्या दाराला आंतून कडी लावलेली पहातांच तिला आश्चर्य वाटलें. तिनें दाराजवळ जाऊन भीत भीत कडी काढिली व दार उघडण्याचा प्रयत्न केला; पण दार बाहेरून लागलें होतें! तिला अत्यंत आश्चर्य वाटलें. थोडावेळ विस्मित चित्तानें ती तेथेंच उभी राहिली. पण आतां ती अगदीं थकली होती म्हणून तिनें पुनः दाराला कडी लावली व ती खालीं पसरलेल्या गजाम्यावर पडली. क्षणभरांत तिचा डोळा लागला.

अशाप्रकारें तिला बराच वेळ गाढ झोंप लागली. पण कसल्याशा आवाजानें तिची निद्रा भंग पावली. पहाते तों त्या महालांत चक्क प्रकाश पडला होता. तेथें लावून ठेवलेल्या दिव्यांपैकीं एक विझून गेला होता व एक अगदीं विझण्याच्या बेतांत होता. बाहेरून येत असलेल्या प्रकाशावरून उजाडलें असावें, असें कमलिनीस वाटलें व ही तिची कल्पना खरी होती. ज्या आवाजानें तिची निद्रा भंग झाली होती, तो आवाज दुसरा कसला नसून बकुळीची आई कुमुदिनीच्या प्रातःशुश्रूषेकरितां आली होती व ती बाहेरून कडी काढण्याविषयीं कुमुदिनीस सांगत होती. खरी स्थिति तिला बिचारीला काय माहीत? ती सारखें दार खडखडावीत होती.

" कोण आहे ? " कमलिनीनें आश्चर्यानें विचारलें.

" कोण आहे ! " बकुळीची आई आपल्या कर्कश स्वरांत बाहेरून म्हणाली, ' कोण आहे म्हणजे ! मी आहें मी—"

बकुळीच्या आईचें हें उत्तर ऐकतांच कमलिनी चकित झाली. आपण कुठें येऊन पडलों आहोंत, याचें तिला कांहींच समजेना. तिची अगदीं वेड्यासारखी स्थिति झाली. तिला काय करावें हें मुळींच सुचेना. ती मुकाट्यानें उभी राहिली! इकडे बकुळीच्या आईलाही कुमुदिनी दार उघडत नाहीं हें पाहून आश्चर्य वाटलें!

" तुम्ही दार नाहीं ना उघडीत ? " बकुळीची आई म्हणाली,

" आत्तां गड्यांना बोलावून दार फोडणें पहा ! नाहीतर उघडा दार!" असें म्हणून ती जोराजोरानें दाराला धक्के देऊं लागली.

अखेरीस कमलिनीनें दाराची कडी काढण्याचा निश्चय केला. बाहेरून बकुळीच्या आईनें धक्के देणें थांबतांच कमलिनीनें कडी काढली ! कडी काढल्याचा आवाज ऐकतांच बकुळीच्या आईनें रागानें बाहेरून जोरानें लाथ मारिली ! खाडदिशीं दार उघडलें गेलें. कमलिनी कडी काढून चटूकन् मागें सरली होती म्हणून बरें, नाहीं तर तिला चांगलीच इजा झाली असती. बकुळीची आई आंत आली व तिनें कमलिनीकडे पाहिलें. कुमुदिनीच्या ऐवजीं ही भलतीच स्त्री पाहतांच ती भांबावून गेली ! तिनें महालांत इकडे तिकडे पाहिलें; पण कुमुदिनी तिला दिसली नाहीं. पुनः तिनें कमलिनीकडे पाहिलें. तिनें भीतीनें एक किंकाळी ठोकली व " हडळ ग बाई ! ह–ह–ड–डळ ! धावा – धावा ! " म्हणत तेथून धांवत निघून गेली. जातांना तिनें दार बाहेरून लावून घेतलें ! बिचाऱ्या कमलिनीची आश्चर्यानें बेशुद्ध होण्याची पाळी आली !

इकडे बकुळीची आई आपण पाहिलेला चमत्कार सर्वांना सांगत व त्यांत आपलें तिखटमीठ थोडें लावून ती हकीगत राक्षसनाथास सांगण्यास गेली; पण राक्षसनाथ आपल्या स्थानीं नव्हता ! आनंददुर्गात काल्पनिक हडळीच्या कथेनें खूपच मजा उडवून दिली !

कमलिनीस आपण कुठें येऊन पडलों आहोंत याचा कांहींच अंत लागेना. तिनें पुष्कळ विचार केला व पुष्कळ युक्त्या लढविल्या; पण तिच्या कांहीं लक्ष्यांत आलें नाहीं. कोणाला विचारावें तर दिवसभर त्या महालाकडे कोणीही आलें नाहीं. अशाप्रकारें सबंध दिवस कमलिनीनें आश्चर्य करीत व अत्यंत कष्टांत घालविला !

रात्र पडली ! महालांत अंधार पडूं लागला ! दैवयोगानें दिव्याजवळच तेलाचें भांडें व चकमक पडली होती. कमलिनीनें दिव्यांत तेल घातलें व चकमकीनें विस्तव पाडून दिवा लावला ! ती विचार करीत तेथें असलेल्या एका खुर्चीवर बसली. अकस्मात दार उघडलें गेलें व आनंदित होत्साता शृगालदत्त आंत आला !

शृगालदत्तास पाहतांच कमलिनीस थोडें तरी समाधान वाटलें

कारण ती त्यास जाणत होती. पण कमलिनीस पहातांच शृगालदत्ताचा सर्व आनंद मावळला असें दिसलें !

" शृगालदत्त ! " कमलिनी आश्चर्यानें ओरडली !

" अरेच्या ! युक्ति फसली तर ! " शृगालदत्त निराशेनें स्वतःशींच पुटपुटला. तो बराच वेळ तिच्याकडे पहात उभा राहिला.

" शृगालदत्त, " कमलिनीनें विस्मयानें प्रश्न केला, " मी कुठें आहें हो ? "

पण शृगालदत्ताचें तिकडे लक्ष नव्हतें. तो तिच्या रूपाकडे कामदृष्टीनें पहात होता तो स्वगत म्हणाला, " छे. तें पाखरूं आपल्याला लाभत नाहींसें दिसतें ! पण हेंही कांहीं वाईट नाहीं. सरसच आहे. बरें झालं. विमलचंद्राशीं विरोध करावा लागणार नाहीं आणि त्यालाही ही गोष्ट आवडेल. "

---

## प्रकरण विसावें

# पुनः वसंतदुर्गांत.

वकुळीचा व कुमुदिनीचा अगदीं नवीनच परिचय झाला होता हें खरें; तथापि तेवढ्या त्या अल्प परिचयांतही त्या दोघींचें प्रेम चांगलेंच जमलें होतें. अर्थात वकुळीला पहातांच कुमुदिनीस अत्यंत आनंद झाला, हें सांगावयास नको आहे. ती धांवत वकुळीकडे गेली. वकुळीनेंही कुमुदिनीचा स्वर ऐकतांच अत्यानंदित होऊन कुमुदिनीस मिठी मारली ! दाई त्यांचें हें प्रेम पाहून चकित झाली व क्षणमात्र तिच्या मनांत हा विचार आला कीं, यावेळीं कमलिनी येथें असती तर किती चांगलें झालें असतें ? असो.

दाईनें वकुळीचेंही स्वागत केलें रितीप्रमाणें सर्वांचीं प्रातःकर्में व स्नानें झालीं. दाई स्वैपाकास लागली व कुमुदिनी आणि वकुळी एकांत बसून साधारण वार्तालाप करूं लागल्या. रोजच्याप्रमाणें वकुळीचा चेहरा आज तपस्विनी आली. तिचा चेहरा दुःखानें किंचित उदास दिसत होता.

" काय? कांहीं शोध ? " दाईनें तपस्विनी तिच्याकडे येतांच तिला प्रश्न केला.

' कांहीं नाहीं ! " तपस्विनी दुःखानें हलकेंच म्हणाली, " तरी पण ती लवकरच सांपडेल. "

त्यांच्या त्या अल्प संवादाचा अर्थ कुमुदिनी अथवा बकुळी यांपैकीं एकीनेंही जाणला नाहीं. मात्र तपस्विनीला पाहतांच व तिचा स्वर ऐकतांच बकुळी दचकली. तिचें तें दचकणें तपस्विनीच्या लक्ष्यांत आलें असावें असें दिसलें. ती बकुळीकडे एकवार तीक्ष्ण नजरेनें पाहून गालांतल्यागालांत हंसली ! त्या तिच्या दिव्य मुद्रेकडे पाहण्याचें सामर्थ्य बकुळींत नव्हतें. तिनें चटकन् आपली दृष्टी दुसरीकडे वळविली !

' कसं काय ? ' तपस्विनीनें कुमुदिनीकडे कांहीं प्रेमानें, कांहीं गंभीरतेनें पहात प्रश्न केला, " आतां आपली तब्येत तर ठीक आहे ? "

कुमुदिनीनें लाजून योग्य तें उत्तर दिलें.

" आपली मैत्रीण— " तपस्विनी किंचित् हंसत म्हणाली, " आपली बकुळी आपल्यास मिळाली ना ? "

सर्वांचें भोजन होईपर्यंत कांहीं विशेष घडलें नाहीं. भोजन होतांच तपस्विनीनें दाईला एकीकडे नेलें व विचारिलें, ' आतां यांची कशी काय वाट करावयाची ? कारण ह्यांना— निदान या बकुळीला— इथें ठेवणं योग्य नव्हे. पुष्कळ—पुष्कळ अशीं कारणं आहेत कीं, यांना वसंतदुर्गांत लवकर पोंचवलं पाहिजे. एक तर कुमुदिनी आपल्या बापास भेटण्यास अत्यंत उत्सुक असेल, दुसरें तेंही एक कारण आहेच व तिसरें ही बकुळी— "

" समजलं. मीं त्याचा पूर्वींच सर्व विचार करून ठेविला आहे. " असें दाईनें उत्तर दिलें व तिनें कुमुदिनी व बकुळीला बैठकीच्या खोलींत बोलाविलें.

" दाई, खरं सांगूं कां ? " तपस्विनी किंचित् दुःखानें म्हणाली " या कमलिनीला पाहिल्यापासून माझ्या हृदयांत भडका उडून गेला आहे. वाटतं, या दोन्ही मुलींना आपल्याजवळ ठेवून घ्याव्यात, या पोरीकडे सुद्धां माझं मन ओढ खातं आहे; पण काय करूं ? ती राहणार नाहीं आणि मलाही हा प्रेमपाश नकोच ! पण— " तिचे नेत्र भरून आले. तिचें

हें भाषण ऐकून दाईलाही वाईट वाटलें. दाई म्हणाली, " हा एक पूर्व शकुन आहे. शुभ कीं अशुभ? सांगतां येत नाहीं, तरी पण आपल्या आयुष्यांत आतां थोडा तरी फरक पडणार हें खास."

इतक्यांत कुमुदिनी व बकुळी आंत आल्या. दाईनें दोघींसही बसण्यास सांगितलें. तपस्विनीनें दोघींसही आपल्याजवळ एकीला उजव्या हाताला व दुसरीला डाव्या हाताकडे बसविलें. दाईही समोरच बसली.

दाई त्या चकित झालेल्या दोघींकडे पहात गंभीरपणानें म्हणाली, " मुलींनो, तुम्ही पाहतां आहां कीं, मी अरण्यांत या पडक्या वाड्यांत आपल्या या मुलीसह ( तपस्विनीकडे बोट दाखवून ) रहात आहें. मी वनवासिनी आहें. तुमच्या योग्यतेप्रमाणं माझ्या हातून तुमचा सत्कार होणं शक्य नाहीं. तेव्हां माझ्या मुलीची ( तपस्विनीची ) तुम्हाला बरेच दिवस ठेवून घेण्याची इच्छा असूनही मला तसें करतां येत नाहीं. याला पुष्कळ कारणं आहेत. एक तर या पडक्या वाड्यांत तुमचं मन लागणार नाहीं. दुसरं तुमच्या योग्यतेप्रमाणं तुम्हाला खाणं पिणं मिळणं शक्य नाहीं. तिसरं कुमुदिनी आपल्या बापाला भेटण्यास अत्यंत उत्सुक असेल. चवथं—पण असो. तेव्हां इथून तुमची लवकरच रवानगी केली तर मला वाटतं तुम्ही आपल्या मनांत भलतंच समजणार नाहीं. या वनवासांत आमच्या शक्तीप्रमाणं जें कांहीं तुमच्याकरितां करतां आलं, तें केलेलं तुम्ही पाहतांच आहां. तेव्हां सांगा वरं—कुमुदिनी, तुला वसंतदुर्गावर पोंचवण्याची व्यवस्था मी करूं का ? "

कुमुदिनी नम्रपणें म्हणाली, " दाई, तुम्ही अशा वनवासांत कां बरं राहतां ? " ती पुढें म्हणाली, " तुमचं गुप्त विचारावं किंवा तुम्हाला उगीच वरकांती प्रेम दाखवावं या हेतूनं मी हें म्हणत नाहीं. तरी पण मला वाटतं कीं, कांहीं संकटानं म्हणा, कीं कांहीं प्रसंगानं म्हणा तुमच्यावर वनवासी होण्याचा दुःखद समय आला आहे. ही माझी कल्पना कदाचित् चुकीची असेल, तरी पण तुम्हीं आतां तरी वनवासांत राहूं नये, असं वाटतं. "

हां हां म्हणतां तिचे कपोल अश्रूंनीं न्हाऊं लागले. तपस्विनीनें तिचें बोलणें लक्ष्यपूर्वक ऐकिलें होतें. तिचा स्वर, तिची मुद्रा व तिचें बोलणें या प्रत्येकांत तिच्या कोमल अंतःकरणाचें प्रतिबिंब पडलेलें तपस्विनीनें

पाहिलें होतें. त्यामुळें तिचे अश्रुभरित नेत्र पाहतांच तपस्विनीच्या नेत्रांत अश्रु आले.

दाई व बकुळीही त्या दोघींकडे पाहून चकित् झाल्या. त्यांनाही अत्यंत वाईट वाटलें. दाई कंपित स्वरांत ह्मणाली, " कुमुदिनी, तूं प्रेमळ आहेस. तुला तसं वाटनं यांत नवल नाहीं. पण मी किंवा माझी मुलगी संसारांत राहूं इच्छित नाहीं. आमची–आमची एक–एकच इच्छा पूर्ण कर. "

" कोणती ? " कुमुदिनीनें अत्यानंदानें प्रश्न केला.

" कांहीं विशेष नाहीं. " दाई तपस्विनीकडे सांकेतिक नजरेनें पहात ह्मणाली, ' आह्मी या निर्जन अरण्यांत रहातों आहोंत, हें कोणालाही न समजण्याविषयीं आमची इच्छा आहे. याकरितां या राधाकृष्णाच्या ( मूर्तीकडे बोट दाखवून ) पायावर हात ठेवून अशी शपथ वहा कीं, आह्मी इथें रहातों आहोंत हें तूं किंवा तुझी मैत्रीण कोणालाही सांगणार नाहीं. "

दाईचें हें बोलणें ऐकतांच कुमुदिनी व बकुळी तर चकित् झाल्याच पण तपस्विनीलासुद्धां आश्चर्य वाटलें.

दाई पुढें ह्मणाली, " यांत तुला कोणत्याही प्रकारें वाईट वाटण्याचें कारण नाहीं. "

" नाहीं, मुळींच नाहीं. " कुमुदिनी मध्येंच ह्मणाली, ' मी व माझी मैत्रीण दोघीही आनंदानें शपथ घेऊं; पण तुमच्या भेटीला मी येईन–वारंवार येईन–तर त्यावेळीं आपण भेटाल कीं नाहीं याचं वचन द्या. "

कमुदिनीचें हें उत्तर ऐकतांच, दाईस काय उत्तर द्यावें याची पंचाईत पडली व तिनें हेतुपूर्वक तपस्विनीकडे पाहिलें. कमुदिनीनें तिच्या पहाण्याचा अर्थ ताडला. ती तपस्विनीला आदरपूर्वक ह्मणाली, ' आपण मला पुनः नाहीं भेटणार ? " पुनः तिचे नेत्र साश्रु झाले.

बऱ्याच वेळानें दाई ह्मणाली, " अशी भलतीच इच्छा तूं धरूं नको. आह्माला भेटण्यापासून तुला काय लाभ बरं ? "

या प्रश्नावर कुमुदिनी उत्तर देण्यास घुटमळेल,असें दाईला वाटलें;पण ती तिची कल्पना चुकीची ठरली.कुमुदिनी मध्येंच म्हणाली, "आपणाला पुनः भेटल्यापासुन लाभ ? प्रेम ! माझी अंतःकरणपूर्वक अशी इच्छा आहे कीं,

तुम्हीं दोघींनींही वनवासांत राहूं नये. तुम्ही सध्यां त्या गोष्टीला कबूल नाहीं. परंतु मी वारंवार येईन. स्त्रीच्या जातीला प्रेम ही काय वस्तु आहे हें नव्यानं सांगायला नको आहे, शिकवायला नको आहे. मी पुनः पुनः येईन व आपल्या प्रेमानं तुम्हाला मजबरोबर यावयास लावीन. मला आई नाहीं; पण आज मला ही आई ( तपस्विनीकडे बोट दाखवून ) मिळाली आहे. दाई, तूं मला अजीप्रमाणें आहेस. तुम्हां दोघींना मी आपल्याजवळ ठेवून घेणार. आणि जर माझ्या मनांत आपल्याविषयीं खरं प्रेम असेल तर या गोष्टी मुळींच अशक्य नाहींत. जग हें सात्विक प्रेमाच्याच पायावर उभारलेलें आहे ! प्रेमच जगाचं रहाटगाडगं चालवीत आहे. या पृथ्वींतील झाडें, फुलें, पांखरें, पशु, जलनिर्झर, गिरि इत्यादि प्रत्येक वस्तु प्रेमानं बांधिली गेली आहे ! मग मनुष्यप्राणी त्या प्रेमाला वंचित असेल काय ? त्यांतून स्त्रीजाति ! हें शक्यच नाहीं. प्रेम कसं करावं हें स्त्रीजातीनंच शिकविलं आहे. जर तुमच्या हृदयांत त्या प्रेमाचा ओलावा नसतां तर त्या घाणेरड्या तळघरांतून मला काढून कां आणिलं असतं ? "

कुमुदिनीचें हें लांबलचक उत्तर ऐकून सर्वच चकित् झाल्या. तिघींही ( वकुळी, तपस्विनी व दाई ) तिच्याकडे कौतुकानें व प्रेमानें पाहूं लागल्या. तपस्विनी तिचा हात आपल्या हातांत घेऊन म्हणाली, " तुझं म्हणणं खरं आहे. खरं प्रेम हेंच जगाचं मूळ आहे. "

" मग– " कुमुदिनीनें तपस्विनीकडे आदरपूर्वक पहात विचारिलें, " आपण माझ्याबरोबर यायला तयार आहांत तर ? "

" नाहीं, " तपस्विनी गंभीरपणें उत्तरली, " आमचीं अशींच कांहीं कारणं आहेत कीं, त्यामुळं तुझी विनंति मान्य करवत नाहीं, तरी पण-"

" तरी पण तुम्ही वारंवार दर्शन द्याल ना ? " कुमुदिनीनें थोड्या उत्सुकतेनें विचारिलें.

" कुमुदिनी, " तपस्विनी करुण वाणीनें म्हणाली, " या संबंधानं मला खात्रीपूर्वक कांहींच सांगतां येत नाहीं. "

" मग आम्हीं मात्र शपथ वहावी व आपण मात्र वचन देण्यास तयार नाहीं असंच ना ? " कुमुदिनीनें दुःखानें प्रश्न केला.

" असं नाहीं. " तपस्विनी विचार करीत म्हणाली, " पुनः मी

होऊनच मुला भेटण्याचं वचन देल्यें; पण तूं असं सांगत्येस तसं वारंवार शक्य नाहीं. ध्यानांत ठेव. आज माझं मन इथेंच रहावं असं सांगतं आहे; पण कदाचित् असा एखादा समय येईल कीं, ज्या वेळीं मला जगांत यावंसं वाटेल, त्यावेळीं—कुमुद—मी तुझ्याचजवळ खात्रीनं येईन."

" बरं. जशी आपली मर्जी. " कुमुदिनी निराश होऊन म्हणाली, " तरी पण या वचनाची आठवण असूं द्या म्हणजे झालं. " ती पुढें म्हणाली, " मग मीही या गोपालकृष्णाच्या पायाची शपथ घेऊन सांगत्यें कीं, प्राण जाण्याची पाळी आली तरी आपल्या भेटीचें किंवा आपल्या-संबंधीं एक अवाक्षरही माझ्या तोंडून काढणार नाहीं. " असें म्हणून तिनें बकुळीकडे पाहिलें. बकुळी त्या पहाण्याचा अर्थ समजली. तिनें-ही तात्काळ शपथ घेतली. थोडा वेळ सर्वच स्तब्ध बसल्या.

" मग बकुळी, " थोड्या वेळानें दाई म्हणाली, " तुला एक काम केलें पाहिजे. मी तुला वसंतदुर्गाच्या वाटेवर नेऊन पोंचवित्यें. तिथून वसंतदुर्ग जवळच आहे. दुर्गावर जाऊन तूं कांहींतरी जुळवून हकीगत सांग व कुमुदिनी अमक्या ठिकाणीं आहे इत्यादि सांगून हिला नेण्या-करितां मेणा व मंडळी घेऊन ज्या जागीं मी तुला नेऊन सोडीन, तिथेंच परत ये. मी व कुमुदिनी तुला तेथेंच आढळूं. " असें म्हणून दाई बकुळीच्या चेहऱ्याकडे पाहूं लागली.

बकुळीला वसंतदुर्गावरील कांहींच माहिती नव्हती तरी कुमुदिनीनें तिला ' हो ' म्हणण्यास खुणविलें. बकुळीनें हो म्हटलें. तात्काल दाई तिला वसंतदुर्गाकडे पोंचविण्यास निघाली! जातांना तिनें एकवार चमत्कारिक नजरेनें तपस्विनीकडे पाहिलें. तपस्विनी तिच्या पाहण्याचा अर्थ उमजली. ती चटकन् उठली व बकुळीला एकीकडे नेऊन म्हणाली, " बकुळी, तूं दुःखांत आहेस नाहीं? मग माझ्याकडे अशी कां पाह-तेस? तुझ्या मनांत चाललेले विचार खरे आहेत. लक्ष्यांत ठेव. पुनः मुझी व माझी खात्रीनं गांठ पडेल. " असें म्हणून किंचित् दुःखानें तप-स्विनीनें तिला निरोप दिला. बकुळीही आश्चर्य करीत व दुःखित चित्तानें दाईबरोबर निघून गेली. त्या गेल्यावर तपस्विनी कुमुदिनीला म्हणाली, " प्रेमानं पशुसुद्धां प्रेमाळु बनतात, असं तुझं म्हणणं ना? तें अगदीं खरं आहे पहा. मी आतांच तुला त्याचं एक उदाहरण दाखवित्यें. "

असें म्हणून तपस्विनीनें आपली आवडती बासरी काढून ती वाजविण्यास सुरवात केली.

× × × × × × ×

चार घटका दिवस उरला होता. सूर्यकिरणांनीं ज्या सुंदर सृष्टीपृष्ठावर दिवसभर यथेच्छ नृत्य केलें होतें, त्या भूपृष्ठास हळुं हळुं त्यागण्यास सुरवात केली होती. अशा वेळीं एका ओढ्याच्या कांठीं दोन गृहस्थ कांहीं गोष्टी बोलत बसले होते. त्यांच्या चाललेल्या गोष्टी फारच महत्वाच्या दिसत होत्या. दोघांचेही चेहरे पूर्ण गंभीर दिसत होते. ते गृहस्थ दुसरे कोणी नसून सेनानी वीरदत्त व नवीनचंद्र हे होते.

" छे दोवा, " सेनानी वीरदत्त जरा उद्वेगानें बोलले, " मला अगदीं सुचेनासें झालें आहे. पुष्कळ खटपट केली; पण कुमारी कुमुदिनीला कोणत्या ठिकाणीं कैदेंत ठेविलें आहे याचा पत्ता लागत नाहीं. प्रतिज्ञापूर्तीला आतां फक्त चारच दिवस राहिले आहेत. "

" सेनानी, " नवीनचंद्र गंभीरपणें पण निष्काळजीपणें म्हणाला, " ईश्वर आपला वाली आहे. मला अगदीं खात्री वाटते कीं, आपली प्रतिज्ञा पार पडेल. सज्जनांना सत्कार्यांत यश मिळणार नाहीं, तर मग मिळणार तरी कोणाला ? "

" तें खरें; " सेनानीनें आश्चर्यानें प्रश्न केला, " पण कायहो, तुमच्या प्रतिज्ञेची काय वाट ? "

" अद्याप मी त्याचें बरोबर उत्तर देऊं शकत नाहीं. "

" पण मला वाटतें, आपल्या प्रतिज्ञेलाही चार दिवस लोटून गेले आहेत. " सेनानी किंचित् आश्चर्यानें म्हणाले. याची प्रतिज्ञा इतकी कठीण असून हा इतका निष्काळजी कसा, याचें त्यास आश्चर्य वाटलें व नवीनचंद्राची प्रतिज्ञा भंग तर होणार नाहीं, अशी त्यास ( सेनानीस ) चिंता वाटूं लागली.

नवीनचंद्रानें त्याच्या मनांतील हे विचार अदमासानें ताडले व तो म्हणाला, " कांहीं अत्यंत गूढ कारणामुळें ' मला ' आपली प्रतिज्ञा पूर्ण करतां येत नाहीं. " नवीनचंद्र ' मला ' या शब्दावर जोर देऊन म्हणाले.

" हं ? मोठेंच आश्चर्य ? प्रतिज्ञाभंग ? काय नवीनचंद्र ? " सेनानी आश्चर्यानें उद्गारले ! " शिव ! शिव ! वीराच्या शीलाला बट्टा ! "

"छे, तसें होणें अशक्य. पण त्याचें आतांच काय ?" नवीनचंद्र मध्येंच ह्मणाला.

त्या वेळीं त्याचा स्वर व मुद्रा इतकी निष्काळजी दिसत होती कीं, सेनानीस तें पाहून आश्चर्य वाटलें. ते ह्मणाले, "तुमचें तुह्मांला माहित; पण आपण कांहीं कुमारी कुमुदिनीला घेतल्याशिवाय दुर्गावर जाणार नाहीं. आपल्या हांतून प्रतिज्ञाभंग कधींही होणार नाहीं."

ते दोघेही आपल्या भाषणांत इतके दंग झाले होते कीं, त्यांच्या पाठीमागच्या झाडींत दोन व्यक्ति त्यांच्या गोष्टी ऐकत होत्या, त्यांची त्यांस चाहूलसुद्धां लागली नाहीं. पण त्यांचें भाषण थांबतांच त्या दोन्ही व्यक्ति त्यांच्यापुढें आल्या. त्यांपैकीं एक बकुळी व दुसरी दाई होती.

"आह्मी कुमारीला आणून दिली तर ? दाईनें एकदम त्यांच्यापुढें जाऊन प्रश्न केला. तिचा तो प्रश्न ऐकतांच ते दोघेही चकित मुद्रेनें तिच्या तोंडाकडे पाहूं लागले.

बराच वेळ पाहिल्यावर सेनानी ह्मणाले, "काय म्हटलेंत ?"

यावर दाईनें योग्य तितकीच व त्यांचें समाधान होण्याजोगी हकीगत सांगितली. दोघांनाही ती पटली. दाई कुमुदिनीस आणण्याकरितां गेली. सेनानी कुमुदिनीसाठीं मेणा तयार करण्याकरितां दुसरीकडे गेले.

थोड्याच वेळांत दाई कुमुदिनीला घेऊन आली. सेनानी सर्व तयारी करून होतेच. मोठ्या आनंदानें कुमुदिनीला व बकुळीला घेऊन सेनानी वसंतदुर्गाकडे वळले. जातांना त्यांनीं दाईस पुष्कळ बक्षीस देऊं केलें; पण दाईनें तें नम्रपूर्वक नाकारिलें. बकुळी व कुमुदिनी या दोघींनींही दाईचा मोठ्या दुःखानें निरोप घेतला व त्या मेण्यांत बसल्या.

सर्व मंडळी दुर्गाकडे वळली. दाई आपल्या निवासस्थानाकडे गेली!

---

## प्रकरण एकविसावें.

# प्रतिज्ञा पार पडल्या.

सेनानी वीरदत्तांनीं कुमारी कुमुदिनीला आणली, ही बातमी ऐकतांच वसंतदुर्गांत एकच आनंदाचा गोंधळ उडाला. जिकडे तिकडे सेनानीच्या पराक्रमाविषयीं चर्चा होऊं लागली. त्यासंबंधीं प्रथम ज्यांनीं 'वीरदत्त हरतील' अशी पैज मारिली होती, ते स्वतःच हरले. जे वीरदत्ताच्या पक्षाचे होते त्यांना अत्यानंद झाला. कुमुदिनीस आपल्या पित्याला व धर्मचंद्रास आपल्या कन्येला भेटतांना किती आनंद झाला असेल, याची कल्पनाच केली पाहिजे. असो.

पण वरील मजकूर वाचून वाचक चकित होतील! कला? खरेंच, कला यावेळीं काय करीत होती? तिच्यासंबंधीं आह्मी कांहींच उद्गार काढला नाहीं हें कसें? काय ती वसंतदुर्गांत नव्हती? कां ती कुमुदिनीच्या आगमनोत्सवांत सामील नव्हती? कां वसंतदुर्गांवर चाललेल्या आनंदोत्सवाचें वर्णन करतांना आह्मीच तिला विसरलों? कां कादंबरीकाराच्या कल्पनाशक्तीनें तिला आणखी कोठें नेऊन टाकिलें होतें? इत्यादि कितीतरी प्रश्न वाचकांच्या मनांत उभे राहतील. या सर्वांला उत्तर ह्मटलें ह्मणजे कला दुर्गांतच होती व ती चाललेल्या आनंदांत सामील होती हेंच होय. आतां फक्त यावेळीं तिच्या मनाची स्थिति कशी होती व ती काय करीत होती हेंच पाहणें आहे.

कुमुदिनी सुखरूप आलेली ऐकतांच कलेला अत्यानंद झाला; पण त्याच वेळीं एक अगदीं कठोर असा वज्राघात तिच्या हृदयावर झाला. असें कां बरें? काय तिच्या मनांत कुमुदिनीविषयीं असूया उत्पन्न झाली? कां कुमुदिनी नवीनचंद्रावर मोहित असेल अशी शंका आली? नाहीं, तिचें मन निदान या वेळीं तरी नवीनचंद्राच्या प्रेमाविषयीं साशंक नव्हतें. मग तिच्या हृदयावर कसला वज्राघात झाला? सुज्ञ वाचकांना आठवत असेल कीं, सेनानी वीरदत्त व नवीनचंद्र या दोघांनीं एकाच दिवशीं प्रतिज्ञा केल्या होत्या. सेनानी वीरदत्तांची प्रतिज्ञा पार पडली. नवीनचंद्राची काय वाट? नवीनचंद्र यावेळीं

दुर्गांतही नव्हता व सेनानीबरोबर तो आला नव्हता. नवीनचंद्राची प्रतिज्ञा अशीच पार पडेल काय? न पडल्यास ते वीर आहेत, ते कांहीं पुनः परत येणार नाहींत! मग? ह्याच-ह्याच विचारानें कलेच्या हृदयावर विद्युत्पात झाला होता. ती व्यथितांतःकरणानें कुमुदिनीच्या महालांत तिचीच वाट पहात बसली होती. यावेळीं रात्र पडली असल्यामुळें महालांत दिवे लावले होते. दिव्याच्या उज्वल प्रकाशांत बसून कला नानाप्रकारचे चांगले वाईट विचार करीत होती.

थोड्याच वेळांत कुमुदिनी आपल्या पित्याला भेटून आपल्या महालांत आली. तिला कमलिनी दुर्गांत नसल्याचें मुळींच माहित झालें नव्हतें. त्यामुळें तिला त्या दोघी आपल्या महालांत आपलीच वाट पहात बसल्या असतील, असें वाटलें व ती मोठ्या उत्सुकतेनें तेथें आली! कला आपल्याच विचारांत असल्यामुळें कुमुदिनी तेथें आलेली तिला मुळींच समजलें नाहीं. अशाप्रकारें कलेस एकटेंच व विचारांत पहातांच कुमुदिनीस आश्चर्य वाटलें.

"कला," कुमुदिनीनें सप्रेम हाक मारिली.

कलेची विचारतंद्रा भंग पावली. दुसऱ्या क्षणांत तिनें कुमुदिनीस आलिंगन दिलें,

"कमलिनी," कुमुदिनीनें उतावळीनें प्रश्न केला, "कमलिनी कुठें आहे?"

दुःखित स्वरानें कलेनें कुमुदिनी गेल्यानंतर वसंतदुर्गावर घडलेली हकीगत सांगितली.

"मग–" कुमुदिनीनें दुःखानें विचारिलें, "अद्याप ती परत नाहीं आली? तिचा शोधही लागला नाहीं?"

"महाराजांनीं नोकर पाठवून आसपासच्या अरण्यांत व त्या महादेवाच्या देवळांत पुष्कळ शोध केला; पण तिचा शोध लागला नाहीं." कलेनें दुःखानें उत्तर दिलें.

कुमुदिनी थोडा वेळ स्तब्ध बसली. अखेरीस ती अत्यंत करुण वाणीनें म्हणाली, "दैवापुढें कोणाचं चालत नाहीं. देव करो आणि ती लवकरच आम्हाला भेटो. पहा, एकेक चांगलं मनुष्य मिळतं आणि दुरावं नाहींसं होतं. (रडून) खरंच बकुळी कुठें गेली?" असें

म्हणत कुमुदिनीनें ' बकुळी, बकुळी ' म्हणून हाका मारिल्या. बकुळी दाराबाहेरच उभी होती. ती नम्रपणें आंत आली.

" ही पाहिलीस ! " कुमुदिनीनें तिला जवळ बोलावून तिचा हात धरून म्हटलें. " त्या कारागृहवासांतील संकटांत ही देवी मला भेटली. " असें म्हणून कुमुदिनीनें घडलेली एकंदर हकीगत तपस्विनीच्या भेटी-शिवाय सांगितली.

" त्या भुयारांत तिसरं कोण होतं बरं ? " कलेनें उत्सुकतेनें विचारिलें.

" देव जाणे. पण आम्हांस कांहीं त्यानं त्रास दिला नाहीं. उलट एक फायदाच झाला. "

" तो कोणता ? "

" त्यानं आम्हांस धक्का देतांच बकुळीची व माझी ताटातूट झाली. पुढें बकुळी एका वाटेनं बाहेर पडली व मी एका वाटेनं बाहेर आल्यें. बकुळी सेनानीस भेटली. सेनानीला तिनें सज्जन समजून सर्व हकीगत सांगितली. तिनें व सेनानींनीं माझा शोध केला व आम्ही सर्व इकडे आलों. " असें म्हणून कुमुदिनीनें बकुळीकडे अर्थपूर्ण दृष्टीनें पाहिलें. बकुळीनें त्या पहाण्याचा अर्थ ताडला. तिनेंही कुमुदिनीच्या वरील बोलण्यास पुष्टी दिली.

" बरं, नवीनचंद्र कुठें आहेत ? " कुमुदिनीनें सहज विचारिलें.

कलेस या प्रश्नाला काय उत्तर द्यावें याची मोठी पंचाईत पडली. पण तिची ती चिंता लागलीच निवारण झाली. त्याच वेळीं एक दासी महालांत आली व कुमुदिनीस उद्देशून हलकेंच म्हणाली, " राक्षस-नाथाला नवीनचंद्रांनीं पकडून आणिला आहे. "

" खरं कीं काय ? " तिघींनीं ( कला, कुमुदिनी व बकुळी ) एक-दम विचारिलें. कला तर घटकाभर स्वतःला विसरून गेली. तिनें मनांतल्या मनांत देवाचे किती तरी आभार मानले.

" महाराज कुठें आहेत ? " कलेनें विचारिलें.

" महाराज, वीरदत्त, नवीनचंद्र व हात बांधलेला राक्षसनाथ सर्व महाराणीसाहेब महालांत बसले आहेत. "

" मग चला तर. " कुमुदिनी म्हणाली. " आपण जाळीच्या महालांत

बसून काय काय होतें तें जाळींतून पाहूं. " असें म्हणून त्या सर्व तेथून निघाल्या. पण कुमुदिनी मध्येंच थांबून म्हणाली, ' कला, तूं बकुळीला घेऊन तिथें जाऊन बस. मी आतां इतक्यांत सर्वांना भेटून येत्यें. " असें म्हणून कुमुदिनी तेथून निघून गेली. कुमुदिनी प्रेमाळू होती. सर्व नोकरांचाकरांवर ती प्रेम करीत असे. तिनें प्रत्येकाला हाक मारून कुशल प्रश्न विचारिले व त्यांची भेट घेतली. त्यामुळें सर्वांना अत्यानंद झाला हें सांगावयास नको आहे.

इकडे कला बकुळीला घेऊन त्या महालांत जाऊन बसली. नवीनचंद्राचा विजयी चेहरा पहाण्याविषयीं ती उत्सुक झाली होती; पण तिनें जाळींतून पाहिलें तों त्याचा चेहरा बराच गंभीर दिसत होता. प्रतिज्ञापूर्तीमुळें होणारा आनंद त्याच्या मुद्रेवर दिसत नव्हता. कलेसही हें पाहून किंचित् आश्चर्य वाटलें. थोड्याच वेळांत कुमुदिनी त्यांना येऊन मिळाली.

आपणही महालांत काय प्रकार चालेला आहे, तें पाहूं.

राक्षसनाथानें धर्मचंद्रास पुष्कळ त्रास दिला होता व त्यामुळें धर्मचंद्राचा त्यावर बराच दात होता; आणि म्हणूनच तर त्यानें ' राक्षसनाथास जो कोणी पकडून आणील, त्यास कुमुदिनी प्रदान करीन. ' असे उद्गार काढिले होते; पण बंधयुक्त राक्षसनाथाला पहातांच त्याचा तो राग मावळला. त्यानें राक्षसनाथास आदरानें बसण्यास सांगितलें. राक्षसनाथ उभाच राहिला. क्रोधानें व दुःखानें त्याचें काळें तोंड जास्तच काळें झालें होतें; पण त्याच्या शक्तीचा, संपत्तीचा किंवा अकलेचा या वेळीं कांहीं उपयोग झाला नव्हता. एका गूढ सामर्थ्यानें त्याचें सामर्थ्य लयाला गेलें होतें.

" राक्षसनाथ ! " धर्मचंद्र गंभीरपणें म्हणाले, " आम्हीं आपण पुष्कळ-पुष्कळ नुकसान केलें आहे हें खरें; तरी पण जर आपण पुढें कधींही त्रास न देण्याबद्दल वचन देत असाल तर मी आपणाला बंधमुक्त करण्यास तयार आहें. "

राक्षसनाथ क्रोधानें थरथर कापूं लागला; पण तो कैदी होता. त्याचा क्रोध निष्फळ आहे, हें तोही पूर्णपणें जाणून होता. तो गर्विष्ठपणानें उत्तरला, " अशा याचनेनें राक्षसनाथ आपली मुक्तता चहात नाहीं,

समजलांत ? अशाप्रकारें गुप्तपणें कपट करून शत्रूला बंधन करणें नेभळटाचें काम आहे. युद्धांत माझ्यापुढें या म्हणजे दाखवूं ! "

त्याचें हें उत्तर ऐकतांच सर्वांसच राग आला. नवीनचंद्र त्याच्याजवळ गेला व हलकेंच म्हणाला. " गर्विष्ठ दुर्गेश ! तुम्हाला यावेळीं तरी निदान शरण आलेंच पाहिजे. "

" नाहीं—कदापि नाहीं ! " राक्षसनाथ जोरानें म्हणाला.

" छे ! आपल्याला शरण जावें लागेल. ". नवीनचंद्र क्रुद्धित होऊन म्हणाला, " मी आज्ञा करतों कीं, तुम्ही धर्मचंद्राचें म्हणणें मान्य करा." असें म्हणून त्यानें राक्षसनाथाच्या कानांत कांहीं सांगितलें. राक्षसनाथ दचकला !

" मी धर्मचंद्राच्या म्हणण्याला मान्य आहे. " असें म्हणून राक्षसनाथानें आपलें मस्तक नम्र केलें.

" मग धर्मचंद्रही तुम्हाला मागचे सर्व अपराध माफ करून तुमची मुक्तता करीत आहे. पण — ध्यानांत ठेवा, सन्मार्गानें वागा. आपल्या प्रजेला सुखानें नांदवा, यांतच तुम्हाला सुख आहे. प्रजेवर अत्याचार करून तिला लुबाडण्यांत अर्थ नाहीं. ' प्रजा हाच कीं वत्स भू धेनुकेचा ' राक्षसनाथ, ' नृपा तूं करी फार सांभाळ त्याचा. ' हें ध्यानांत ठेवा. "

राक्षसनाथानें क्रोधानें आपला ओंठ चावला. धर्मचंद्रानें नोकरास हाक मारून राक्षसनाथास बंधमुक्त केलें व त्याला घोडा देऊन दुर्गांतून त्याची त्याच वेळीं रवानगी करून दिली.

" नवीनचंद्र ! " धर्मचंद्र राक्षसनाथ गेल्यावर म्हणाले, " आतां आपल्या म्हणण्याप्रमाणें मी आपणास कुमुदिनी— "

पण नवीनचंद्र मध्येंच म्हणाला, " छे, कुमुदिनीला मी आपल्या बहिणीप्रमाणें मानतों. दुसरें, ज्या कामाकरितां आपण मला पारितोषक देऊं इच्छिता, तें काम मीं केलें नसून दुसऱ्या एका सुयोग्य व्यक्तीनें केलें आहे. याकरितां कृपा करून कुमारी कुमुदिनीस त्यासच अर्पण करावी. "

नवीनचंद्राचें हें बोलणें ऐकतांच सर्वचजण चकित झाले. इकडे कुमुदिनीस नवीनच संकट उत्पन्न झालें. कारण विमलचंद्राला ती विसरली नव्हती. कलेला एका गोष्टीचा आनंद झाला. सुंदरी कुमुदिनीला

नवीनचंद्रानीं नाकारिलें, हें पाहून तिला कितीतरी आनंद झाला व नवीनचंद्रावरील तिचें प्रेम वाढलें. असो.

" ती कोण व्यक्ति ? " धर्मचंद्रानें आश्चर्यानें विचारिलें.

" ती व्यक्ति ! " नवीनचंद्र गंभीरपणें म्हणाला, " पण आपण तिला एका गोष्टीची क्षमा कराल तर मी त्या व्यक्तीला आतांच बोलावतों. "

" क्षमा ? " धर्मचंद्रानें आश्चर्यानें विचारिलें, " कोणत्या गोष्टीची? "

" तें ती व्यक्ति सांगेल. " असें म्हणून नवीनचंद्र बाहेर गेला.

थोड्या वेळानें तो एका तोंड आच्छादिलेल्या व्यक्तीला घेऊन आंत आला.

" ही ती व्यक्ति. " नवीनचंद्र त्या व्यक्तीला पुढें करून म्हणाला.

" महाराज धर्मचंद्र ! " ती व्यक्ति आपलें मुख उघडून म्हणाली, " हा तुमचा अपराधी विमलचंद्र ! "

" विमलचंद्र ! " धर्मचंद्र बोलतां बोलतां तटस्थ झाला !

सेनानी आश्चर्यचकित् झाले.

" ते तेच तर— " असें म्हणतच इकडे महालांत कुमुदिनी कलेच्या बाहुंत हर्षातिशयानें बेशुद्ध झाली.

धर्मचंद्राचा सर्व संशय दूर झाला. विमलचंद्रास त्यानें प्रेमानें आलिंगन दिलें.

त्यांना आणखीही पुष्कळ गोष्टी बोलावयाच्या असल्यामुळें नवीनचंद्र सेनानीस घेऊन बाहेर आला. सेनानी आश्चर्य करीत आपल्या स्थानीं निघून गेला. नवीनचंद्र आपल्या महालांत जाऊन कांहीं विचार करीत बसला.

इकडे कुमुदिनीस लवकर शुद्धि आली नाहीं. कलेनें व बकुळीनें तिला तेथील एका पलंगावर निजविलें. बकुळी कुमुदिनीजवळ बसली व कला पुढें काय होतें तें पहाण्याच्या उद्देशानें तेथून बाहेर आली. जातां जातां सहज तिनें नवीनचंद्राच्या महालांत डोकाविलें.

" हं आंत-आंत या. " नवीनचंद्रानें दारापुढें येत विनोदानें म्हटलें.

कला तेथल्यातेथेंच थबकली.

नवीनचंद्र गंभीरपणें तिला म्हणाला, " कला, माझ्याशीं विवाह करण्याची तुझी खरीच का इच्छा आहे ? कारण तूं जाणत आहेस कीं,

माझ्याजवळ एका तरवारीशिवाय कांहीं नाहीं. रहाण्याला घर नाहीं, द्रव्य नाहीं, खाण्याला अन्नसुद्धां वेळेवर मिळणें अशक्य ! अशी माझी स्थिति आहे. याउपरही माझ्याशीं विवाह करण्याची तुझी इच्छाच असेल तर तसें सांग. म्हणजे महाराजांना तसें कळवावयास बरें. पूर्ण विचार करून काय तें सांग. " असें म्हणून तो तीक्ष्ण दृष्टीनें तिच्या मुद्रेकडे पाहूं लागला.

" दासी आपणास सर्व कांहीं देऊन चुकली आहे. यापेक्षां— " असें म्हणून तिनें एकवार त्याकडे पाहिलें व तेथून हर्षित चित्तानें पलायन केलें.

थोड्याच दिवसांत कलेचा नवीनचंद्राशीं व कुमुदिनीचा निमलचंद्राशीं मोठ्या थाटानें विवाह झाला. आमच्या अद्भुत कथेचा पूर्वार्ध येथें आटपला !

---

## प्रकरण बाविसावें.

## मंत्रसाधन.

भयंकर दृश्य ! अमावास्येचा काळा कभिन्न अंधःकार ! खालीं, वर, आजुबाजूंस, सगळीकडे भीषण अंधःकार! जणूं काय, जगाच्या उत्पत्तीपासूनच या अंधःकाराचें साम्राज्य अव्याहत सुरू आहे !कोणी-कडेही नजर फेंका, प्रकाशाचें नांव नाहीं ! यापूर्वी जगावर कधीं सूर्यप्रकाश पडला होता काय ? अशी शंका या गंभीर अंधःकाराकडे पाहिलें म्हणजे मनांत येते ! सूर्य अस्तास गेला ! चंद्रोदय होणें शक्य नाहीं ! आणि या काळयाभोर अंधःकाराचा कोण प्रतिकार करणार ? हा ! हा ! हा ! ! असा आवाज करीत गगनचुंबित वृक्षांच्या शाखा-प्रशाखांतून झंझावात वहात होता ! जणूं काय, भीषण अंधःकार ' आतां माझा कोण पराजय करणार ! सृष्टिदेवी, आज तुझे ते रक्षक, तो उज्वल सूर्य, तो क्षय व वृद्धि पावणारा चंद्र कोठें आहे ? ' असेंच वायुरूपें विकट हास्य करून तिला धिक्कारीत होता ! भूदेवी भीतीनें

गतप्राण झालेली दिसत होती ! आज प्रकाशपटावर क्षीण प्रकाशी तारे देखील दिसत नव्हते. काळेभोर मेघावडंबर भयंकर गंभीर गर्जना करीत, आकाशपटावर अस्थिरतेनें तांडव नृत्य करीत होतें ! हत्तीसारखें मेघखंड प्रचंड समुद्रलहरींप्रमाणें एकमेकांवर आदळत, आपटत, गडगडत वारंवार एखाद्या डवचलेल्या कृष्णसर्पाप्रमाणें आपल्या हळहळीत जिव्हा ( विद्युत ) काढीत इतस्ततः फिरत होते ! सजातीय भूदेवीचें अंधःकारापासून रक्षण करावें, या हेतूनें उज्वलतर चपला मधून मधून चमके खरी; पण भीषण अंधःकाराचें विकट स्वरूप पहातांच कृष्णघन मेघांत ती तात्काळ लुप्त होई ! चपलेसारख्या सुंदर व चंचल स्त्रीसही आपल्यापुढें येण्याची भीति वाटते, हें पाहूनच कीं काय, त्याच वेळीं अंधःकार मेघगर्जनाद्वारें आपला विजयानंद प्रकट करीत असे !

क्षणोक्षणीं झंझावात लहानमोठ्या सर्व वृक्षवेलींना समूळ कांपवीत ' सों, सों ' वहात होता ! मेघावडंबर जास्त जास्त काळेभोर होत चाललें होतें ! अंधःकार मी म्हणत होता ! जणूं काय तिघांही राक्षसांनीं सुंदर सृष्टीचें निकृंतन करण्याचा आज अगदीं निश्चय केला होता ! सृष्टिसुंदरी अगदीं स्तब्ध होती. पक्षीगणांच्या पंखांचा खडखडाट ऐकूं येत नव्हता कीं, वनपशूंचे चीत्कार मुळींच ऐकूं येत नव्हते ! मानवी प्राण्यांचा कोलाहल बंद होता ! अरे, पण हा भीषण घूत्कार कोणाचा बरें ? पशु, पक्षी, मानव व प्रकाश इत्यादिकांनीं तिरस्कृत रात्रींचर दिवाभिताचा तर नसेल ? असेंच दिसतें ! वायूच्या सोसाट्यांत, मेघांच्या गडगडाटांत आपला भीषण, कर्णकटु घूत्कार मिसळवून तो त्या तिघां महाभुतांस उत्तेजन देत आहे व सृष्टीच्या बालकांना भिववीत आहे असें वाटतें. पण झंझावाताच्या सोसाट्यासही न जुमानणारा, मेघांच्या गडगडाटास भीक न घालणारा, भीषण अंधःकारास तुच्छ समजणारा व दिवाभिताचा कर्णकटु घूत्कार ऐकून विचलित न होणारा कोणी प्राणी यावेळीं आहे काय ? होय ! हें पहा ! सिप्रेच्या तीरीं असणाऱ्या या स्मशानभूमींत ही सुंदर स्त्री कोण बरें आहे ? अशा भीतिप्रदवेळीं ती या ठिकाणीं कोणत्या हेतूनें आली आहे बरें ? काय ? तिला त्या विकट स्मशानभूमीचें भय वाटत नाहीं ? देव जाणे !

क्षिप्रेच्या काळ्याभोर विस्तीर्ण पात्रावर मोठमोठ्या लहरी उठून

तटाकीं असणाऱ्या वृक्षांच्या पायथ्यांशीं जाऊन धाड धाड आपटत होत्या! वृक्षांनींही आपल्या शाखांचा खडखडाट त्यांत मिळविला होता! स्मशानांत एखाददुसरी चिता जळत होती! तिचीं प्रतिबिंबें नदीपृष्ठावरील लहरींसमूहावर नाचत होतीं! प्रज्वलित चितेचा प्रकाश अंधःकाराचा नाश यथाशक्ति करीत होता, हें खरें; पण त्यापासून चालू असलेल्या बिकट, हृदयकंपन करणाऱ्या दृश्यांत जास्तच भर पडली होती! चितेच्या ज्वाला हलल्यानें जवळपास असलेल्या वृक्षांच्या छाया पिशाचाप्रमाणें चंचलतेनें नाचत होत्या! त्या स्मशानांतील प्रत्येक वस्तु भीतिप्रद दिसत होती; पण त्या सुंदर स्त्रीच्या हृदयावर त्याचा कांहीं परिणाम झालेला दिसत होता काय? तिची मुद्रा शांत दिसत होती! चितेच्या मंद प्रकाशांत ती धीरे धीरे नदीपृष्ठाकडे पहात चालली होती! वाळलेल्या पानांच्या खजबजाटानें ती क्वचित् वेळीं दचकून थांबत असे; पण तिच्या चित्ताची विचलता दिसत नव्हती. वारंवार ती आपल्या हातांतील तीक्ष्ण व चकचकित जंबियाकडे पहात होती! ती साक्षात् स्मशान भूदेवी तर नसेल? पण तिचा चेहरा इतका शांत कसा बरें दिसत आहे?

चालतां चालतां अकस्मात् तिला कसलासा आवाज ऐकूं आला. ती थबकली. तिनें आपल्या जंबियास हात दिला. तिनें निरखून इकडे तिकडे पाहिलें तों एका झुडपाच्या आड दोन शृगाल एका वस्तूची ओढाताण करीत असलेले तिच्या दृष्टीस पडलें! तें पाहून तिचें हृदय किंचित् कंपित झालेलें दिसलें. ती ती वस्तु पहाण्याकरितां किंचित् पुढें झाली. तिला पहातांच शृगाल पळून गेले. ती वस्तु तिच्या दृष्टीस पडली. एक अस्फुट चीत्कार तिच्या तोंडून बाहेर पडला! अजू-बाजूंच्या भयानक दृश्यानें जिच्या हृदयावर कांहींएक परिणाम केला नव्हता, तरी ती त्या वस्तूकडे पहातांच भयभीत झाली! ती खालींच पडणार होती; पण तिनें आपणास सावरून धरलें. पुनः तिची दृष्टी त्या वस्तूवर पडली पुनः तिचें शरीर कंपित झालें. ती वस्तु काय होती बरें? हाय! एका सुंदर बालकाचें शिरविहीन कलेवर होतें! तिनें पुनः त्याकडे पाहिलें नाहीं. ती त्या कलेवराकडे पाठ करून पुढें चालूं लागली. लवकरच ती नदीतीरावर आली. नदीच्या पृष्ठाकडे एकवार

तिनें नजर फेंकली व तिनें काय पाहिलें? एक नरराक्षस नदी-मध्यें छातीइतक्या पाण्यांत दक्षिणाभिमुख उभा राहून कांहीं मंत्रसाधन करीत आहे! पण त्याच्या हातांत काय होतें? बालकाचें एक सुंदर रक्तानें भरलेलें शीर त्यानें उलटें आपल्या हातांत धरलें होतें! त्यांत एक पेटलेला काकडा खोंवला होता! त्याकडे पहात तो नरराक्षस तोंडानें कांहीं पुटपुटत होता! तो पुरुष विलक्षण सुंदर होता हें खरें; पण यावेळीं त्याचा चेहरा क्रोधानें आरक्त झालेला दिसत होता! त्याच्या नेत्रापुढें कांहीं विलक्षण व भीषण दृश्य दिसत असावें, असें त्याच्या मुद्रेवर वारंवार पालटणाऱ्या विकारांवरून वाटत होतें! हा भीषण देखावा पहातांच ती स्त्री भीतीनें जागच्याजागीं पुतळ्याप्रमाणें उभी राहिली! तटस्थ मुद्रेनें ती त्याकडे पहात राहिली. अकस्मात् त्या पुरुषानें एक भयंकर किंकाळी ठोकली! त्या किंकाळीचा प्रतिध्वनी स्मशानभूमींत घुमूं लागला! याचवेळीं एक भीषण मेघ-गर्जना झाली! त्या स्त्रीच्या नेत्रापुढें अंधःकार दिसूं लागला! ती धाड-दिशीं खालीं पडली व बेशुद्ध झाली!

× × × × × × ×

स्मशानभूमीच्या दुसऱ्या भागांत काळा पोषाख केलेल्या तीन व्यक्ति कोण बरें आहेत? तिघांनींही खालपासून वरपर्यंत काळीं वस्त्रें धारण केलीं आहेत! पुढें चाललेल्या दोघांपैकीं एकाच्या हातांत एक दिवटी आहे व दुसरा त्या दिवटी घेतलेल्याचा हात धरून चालत आहे. तिसरा त्या दोघांमागून खांद्यावर कांहीसें टाकून त्याला दोन्ही हातांनीं धरून धीरे धीरे चालला आहे. तिघांचेही चेहेरे झांकलेले आहेत; तरी पण त्या तिघांपैकीं दिवटी घेतलेल्याचा हात धरून चालणारा स्मशा-नांतील भयंकर दृश्य पाहून घाबरलेला दिसत आहे.

"अरे बापरे!!" तो दिवटीवाल्याचा हात घट्ट धरून म्हणाला. "शृगालदत्त! काय हो विलक्षण अंधःकार! डोळे असून नसून सारखे आहेत! अबबब!! वर पहा! आभाळ कसें काळेभोर होऊन गेलें आहे! मला वाटतें, आज अंधाराचा भयंकर पाऊस यांठिकाणीं पडलेला दिसतो! पाहिलेंत, कसें जिकडे तिकडे काळेंच काळें दिसतें तें? (मधेंच दचकून शृगालदत्तास बिलगत) अग आईग! हें–हें काय नाचतें बरें!"

" हे अजसेन, हें काय ? " शृगालदत्त त्यास जरा दूर ढकलून ह्मणाला, " झाडांच्या फांद्यांच्या आवाजाला भितां ? मग मंत्र कसा साधणार आणि मग तुह्माला ती वश कशी होणार ? "

" छे छे ! " अजसेन त्यास पुनः बिलगून ह्मणाला, " मी—मी भीत नाहीं कांहीं ! पण खरंच—खरंच, जर मीं मंत्र साध्य केला तर ती वश होईल ? "

" वश ! " शृगालदत्त त्यास तिरस्कारानें दूर सारीत ह्मणाला, " तुमच्या पायाशीं येऊन नाक घाशील नाक ! "

" लोक ह्मणतात— " अजसेन भीतीनें चोहोंकडे पहात ह्मणाला, " मंत्र साधायच्या वेळीं फार भीति वाटते. सापत्र आल्यासारखें वाटतात, डोळ्यापुढें तऱ्हतऱ्हेचे भयंकर प्राणी दिसूं लागतात, भयंकर आरोळ्या ऐकूं येतात असं लोक ह्मणतात, हें खरं कारे ? आणि ह्मगे, मंत्र नाहीं साध्य झाला तर तें भूत ह्मगे मानेवर बसतं खरं कारे हें ? अन् ह्मणे, वेडही लागतं ! हें सर्व खरं कारे ? जर खरें असेल तर आपण नाहीं बोवा मंत्र साध्य करणार ? हो, मी वेडा झालों ह्मणजे मग ? हें पाहिलंस आभाळ कसं गडगडतय् ! मला वाटतं हें मला ओरडून सांगतय् कीं तूं पाप करूं नकोस—अरे बापरे ! हा वारा पहा कसा जोरजोरानं वाहूं लागला आहे. दिवटी नीट धरहो; नाहींतर विझली ह्मणजे—( दचकून ) अग आई ग ! हें घुबड टेकाचं पाहिलंस कसं ओरडतय् ! घुबड ओरडलं ह्मणजे वाईट ह्मणतात. त्याचा शब्द ऐकूं नये ह्मणतात, हें खरं कारे शृगालदत्त ? मी भीत नाहीं खरा; पण मला वाटतं, तें मला भिवपण्याकरितांच ओरडतय् ! पण मी—मी होय मी कसचा भितों ? अशीं हजार घुबडं — मेलों ! मेलों ! ! पकडलं ! भु—त—भु—ता—त—ता—नं प पु— " असें ओरडत अजसेनानें शृगालदत्ताचा हात पकडला. त्याच्या भीतीचें कारण दुसरें कांहीं नसून त्याच्या अंगावरील वस्त्र एका कांटेरी झुडपाला अडकलें होतें.

" ए भ्याडा ! " शृगालदत्त त्यास दूर ढकलून ह्मणाला, " काय मनुष्य आहात हो ! कांटेरी झुडपाला तुमचं वस्त्र आडकलं आहे तें दिसत नाहीं वाटतं ? उगीच ओरडून— "

" झुडूप ? झुडूपच कां ? " अजसेनाच्या जिवांत जीव आला व

त्यानें भीत भीत मागें वळून पहात म्हटलें, " छे छे शृगालदत्त नीट-नीट पहा ! कोणी तेथें बसलं आहेसं दिसतं ! "

" हें पहा, पहा कोण बसलंय ! " असें म्हणत शृगालदत्तानें दिवटी पुढें केली. अजसेनानें भीत भीतच आपल्या वक्षास हिसडा दिला. वस्त्र सुटलें. आपल्यावरील प्राणांतिक संकट टळलें असें त्यास वाटलें.

" झुडपाला मी इतका भ्यालों अं ? " अजसेन म्हणाला, " शृगालदत्त, तूं एक गोष्ट चुकलास ! इथें येण्यापूर्वी मह्याकडून हीं झुडपं काढून टाकलीं असतीं तर बरं झालं नसतं ? म्हणजे मग मी कशाला भ्यालों असतों ? छे बोवा मला जर मंत्र साध्य झाला तर अगदीं प्रथम मी मंत्रसामर्थ्यानें हीं मला भिवविणारीं झुडपं नाहींशीं करीन बरं कां शृगालदत्त, मला याची आठवण दे. अरेच्या ! पण माझी छाती अशीच कां बरं धडधडते आहे ? हां समजलों. आभाळ गडगडतय् ना ? त्याचा प्रतिध्वनी माझ्या छातींत होतोय वाटतं ! असंच ना शृगालदत्त ? "

" छे छे, " शृगालदत्त तिरस्कारानें हंसत म्हणाला. " तसं नव्हे, मंत्र-साध्य झाल्यावर ती वश होणार या गोष्टीच्या आनंदाच्या लाटा उठत असतील-लाटा ! "

" तसं असेल ! मंत्र साध्य झाला कीं नाहीं-पण नाहीं झाला तर मी वेडा होईन कारे ? तें भुत माझ्या मानगुटीवर बसेल ? अग आईग ! भुत जर माझ्या मानगुटीवर बसलं तर मी काय करणार बरं ? "

" तुम्ही त्याच्या मानगुटीवर बसा ! " शृगालदत्त हंसत म्हणाला.

" भुताचे पाय म्हणे उलटे असतात आणि तें फार-फारच भयंकर असतं म्हणतात ! शृगालदत्त, तूं पाहिलं आहेस कारे भुत ? "

" हो. हें पहा ( अजसेनाकडे बोट दाखवून ) माझ्याजवळच उभं आहे. " शृगालदत्त हंसून म्हणाला.

पण अजसेनाला त्याच्या बोलण्याचा अर्थ थोडाच कळणार ! तो इचकून इकडे तिकडे पहात भीत भीत हलकेंच म्हणाला, " अग आईग ! खरं कीं काय ? कु-कुठें आहे ? "

" हें बोलतय् हें ! "

" हं ! " अजसेनानें घाबरून विचारिलें, " बोलतय् ? भुत बोलतय् ? खरंच कांहींसं ऐकूं येतंय् खरं ! " तो जास्त घाबरून पुढें म्हणाला, " हं

शृगालदत्त, दिवटी विझव–विझव–विझव जलदी ! म्हणजे तें आपणास पहाणार नाहीं व आपणासही तें दिसणार नाहीं ! "

" आणि अंधारांत त्यानं तुम्हाला पकडलं म्हणजे मग ? "

" मला ? " अजसेन शृगालदत्तास बिलगून म्हणाला, " मला भूत पकडणार ? अग आईग ! आणि मग ? तें मला आडवं खाईल कीं उभं ? "

" तें काय सांगावं ? भूतच तें ! आणि तेंही भुताला खाणार ! " शृगालदत्त व्याजोक्तीनें म्हणाला, " तें कशा तऱ्हेनं खाईल तें मला काय बरं माहित ? "

" काय तुला कधीं भुतानं खाल्लं नाहीं ? " अजसेनानें आश्चर्यानें प्रश्न केला.

" नाहीं बोवा ! " शृगालदत्त हंसत उत्तरला.

" हं ! म्हणूनच तुला तें माहीत नाहीं. "

" पण आतां मला माहीत होऊन जाईल ? "

" हं ! काय माहीत होईल ? "

" भूत माणसांना कसं खातं तें ! "

" तें कसं ? " अजसेनानें घाबरून प्रश्न केला.

" तुम्हाला पकडून खातांना– "

" छे, छे, असं मला शिकवूं नकोस गड्या ! " अजसेनानें विनंतिपूर्वक म्हटलें.

" काय लेको हो ! " शृगालदत्तानें तिरस्कारानें म्हटलें, " असंच कां मंत्रसाधन करणार ? तुमच्या हातून कसचा मंत्र साध्य होतो ! "

" कां बरं ? " अजसेनानें दचकून विचारिलें.

अशाप्रकारें बोलतां बोलतां ते तिघे आपल्या अपेक्षित स्थळीं आलेसें दिसलें. ते तिघेही नदीतीरावरलि एका खडकावर जाऊन उभे राहिले. नदीपात्रावर अद्यापीही मोठमोठ्या लाटा उसळत होत्या ! सोसाट्याच्या वाऱ्यामुळें वृक्ष समूळ हलत असून कर कर वाजत होते ! मेघगर्जनाही पहिल्याप्रमाणेंच सुरू होती ! एकंदर दृश्य हृदयास कांपविणारें होतें ! शृगालदत्त व ती दुसरी व्यक्ति यत्किंचितही घाबरलेली दिसत नव्हती. अजसेन मात्र थरथर कांपत होता.

" हं अजसेन. आतां सर्व भय सोडा. अगदीं सर्व शौर्य एकत्र करा व आपल्या तयारीला लागा. ही पहा मध्यान्ह होत आली. हं अटपा. "

असें म्हणून शृगालदत्त त्या व्यक्तीकडे वळला व त्यास त्यानें खुणेनें त्याच्या हातांतील गाठोडें खालीं ठेवण्यास सांगितलें! वाचकांनो, तें काय होतें जाणलेंत? बालक! एक सुंदर बालक!! शृगालदत्तानें आपल्या हातांतील दिवटी एका उंच ठिकाणीं खोंचून ठेवली.

" याला—याला " अजसेन त्या दुर्दैवी, निद्रिस्त व आच्छादित-कदाचित् बेशुद्ध—बालकाकडे बोट दाखवून म्हणाला, " मारलंच पाहिजे कां?"

शृगालदत्तानें एकवार त्या आच्छादित प्राण्याकडे पाहिलें व अकस्मात् त्याच्या हृदयांत एका विलक्षण विकाराचा धक्का बसला! तो थोडावेळ त्याकडे पहात राहिला! त्यानें त्यावरील वस्त्र काढण्याचा निश्चय केला; पण अजसेनानें त्याचा हात धरला व म्हटलें, " छे छे, त्याचं तोंड नको उघडूं! त्याच्याकडे पाहिल्यावर माझ्याच्यानं मारवणार नाहीं. "

शृगालदत्ताचें हृदय धाड धाड उडूं लागलें! त्याबद्दल त्याचें त्यालाच आश्चर्य वाटलें. तो स्वतःशींच म्हणाला, " मला कां बरें भीति वाटते? होय, यांत पाप आहे; पण—पण! ज्याचं हें बालक असेल त्याची काय अवस्था होईल? माझं—माझंही असंच एक मूल आहे. देवाला हें आवडेल कां? "

" शृगालदत्त, कसला विचार चालला आहे? " अजसेनानें घाबरून प्रश्न केला, " याला न मारतां काम नाहीं कां होणार? "

शृगालदत्त भानावर आला. भीतिप्रद विचार मावळले. तो म्हणाला, " बळी घेतल्याशिवाय भूत वश होणं अशक्य! हं झालं, तुझं मन तयार? " असें विचारीत त्यानें आपल्या कमरेची तलवार काढली.

" शृगालदत्त! शृगालदत्त!! " अजसेन उद्वेगानें म्हणाला, " नको, नको हें मंत्रसाधन! चल—चल! माझ्यानं हें नाहीं होणार! " असें म्हणून अजसेन तेथून जाऊं लागला.

पण शृगालदत्तानें त्याचा हात धरला व घोगऱ्या स्वरांत म्हटलें, " छे, छे, हें मुळींच होणं नाहीं, तुम्हाला हें केलंच पाहिजे. " असें म्हणत त्यानें तलवार नागवी केली व अजसेनाच्या लटलट कांपणाऱ्या हातांत ती दिली!

" छे छे, " अजसेन ती तलवार खालीं टाकून ह्मणाला, " हें पाहिलंस, माझ्या कानांत कोणीसं ह्मणतंय् ' बालहत्या ! महत्पाप महत्पाप!!' मला वाटतं हा इंदुमतीचा शब्द आहे ! हीं पहा, हीं झाडं आपल्या फांद्या हलवून मला हें पाप न करण्याविषयीं सुचवीत आहेत ! 'आकाश गडगड करून हें पाप करण्यास मी तयार झाल्याबद्दल माझ्यावर गुर-गुरत आहे ! हा झंझावात पहा ! सो सो करून माझा धिक्कार करीत आहे ! हें घुबड पाहिलंस, घू घू करून मला अपशकुन करीत आहे ! ही क्षिप्रा पहा ! कशी जोराजोरानें उसळत आहे ! ही मला आपल्या पाण्यांत मंत्रसाधन करण्यास उभं तरी राहूं देईल ? छे छे, पाहिलंस या जवळ असलेल्या चिता किती भयंकर दृष्टीनें माझ्याकडे पहात आहेत ! वाटतं कीं, आमच्या समोर-प्रकाशांत-तरी असलं पातक करूं नको असंच त्या ह्मणत आहेत ! छे, शृगाल-दत्त, माझ्या हातून हें काम कधींही होणार नाहीं ! मला माहीत आहे, मी वेडा आहें. त्यामुळेंच तूं मला फूस लावून इथें आणलंस ! पण नाहीं, सध्या माझी बुद्धि देवाच्या दयेनें ठिकाणावर आली आहे. त्या सद्बुद्धीवर ह्या बालहत्येचें काजळ मी फासूं इच्छित नाहीं. तूं इथून जा ! कर आपलें काळें ! तूं नरराक्षस आहेस ! " '

वरील गोष्टी अजसेन इतक्या जलदी जलदी बोलला कीं शृगालद-त्तास बोलण्यास वेळ मिळाला नाहीं. पण स्वतःला नरराक्षस ह्मटलेलें ऐकतांच व अजसेन आपल्या हातांतून निसटतो हें पाहतांच त्यास राग आला. त्यानें चटकन् अजसेनाचें मानगुट पकडलें व कठोर स्वरांत ह्मटलें, " तूं करीत नाहींस कां ? मला शास्त्रार्थ सांग-तोस ! ठीक आहे. हें, पहा, मीच या कारट्याचे तुकडे करतों व तुझ्यावर घालतो आळ ! कीं उद्यां सकाळच्या आंत उज्जयिनीच्या तुरुंगांत अजसेन महाराज ! " असें ह्मणून त्यानें तें खड्ग हातांत घेतलें. अजसेनाच्या जिवाचा थरकांप झाला.

" छे छे, शृगालदत्त ! " अजसेनानें त्यास मिठी मारून ह्मटलं. " मी त्या बालकास वांचविणार ! "

" वाचव ! " शृगालदत्त त्यास दूर ढकलून ह्मणाला, " वाचव-ये-वाचव ! " असें ह्मणून त्यानें त्या दुर्दैवी बालकावर आघात केला !

त्याच वेळीं शृगालदत्ताच्या हृदयांतही जोराचा आघात झाला ! तो मागें कोसळणारच होता; पण त्यानें आपणास सावरलें. अजसेन तटस्थ झाला. अजसेनावर बालहत्येचा आरोप आणण्याचा शृगालदत्ताचा विचार होता. त्यानें त्या मृत बालकावरील वस्त्र बाजूला सारलें ! त्या बालकाची मुद्रा शृगालदत्तास दिसली ! तो भीतीनें किंचित् मागें सरला ! इतक्यांत तिसरी व्यक्ति ' हडळरे हडळ ! ' म्हणत पळत सुटली ! शृगालदत्तानें मागें पाहिलें तों खरेंच एक सुंदर स्त्री धांवतच त्याच्याकडे येत होती ! शृगालदत्तानेंही धावून पलायन केलें ! अजसेन तेथल्यातेथेंच बेशुद्ध होऊन पडला ! ती स्त्री जवळ आली. तिनें त्या मृत बालकाकडे पाहिलें !

" घात झाला ! " असें अस्फुट उद्गार तिच्या तोंडून बाहेर पडले व ती बेशुद्ध होऊन खालीं पडली !

---

## प्रकरण तेविसावें.

## सुगृहिणी.

विवाह होण्यापूर्वीं नवीनचंद्रानें कलेला आपल्या दारिद्र्याविषयीं वजावलें होतें, त्याची वाचकांना आठवण असेलच. विवाह होतांच नवीनचंद्र आपल्या पत्नीला घेऊन वसंतदुर्गांतून निघाला व तो उज्जयिनीस आला. उज्जयिनींत जाऊन राजसेनेंत एखादी नोकरी पहावी या विचारानें तो तेथें आला होता; पण त्यास तेथें येऊन जवळ जवळ सहा महिने झाले तरी नोकरी मिळण्याचें चिन्ह दिसेना. अर्थात् कलेच्या संसाराचा अद्याप जम बसला नव्हता.

क्षिप्रेच्या तीरीं असलेल्या एका लहानशा शेतांतील झोंपडींत नवीनचंद्र कलेसह रहात होता. शेत फार मोठें नव्हतें; पण तें टुमदार होतें. दुरून पहाणारास तें एखाद्या रमणीय पुष्पवाटिकेप्रमाणें वाटे, आणि जरी त्यांत पुष्पवाटिकेस लागणाऱ्या वस्तु दिसत नव्हत्या, तरी त्यानें

एकंदर दृश्य पुष्पवाटिकेपेक्षांही चित्ताल्हादक होतें. त्याच्या चारी बाजूस साधारण उंच असा मातीचा बांध घातला होता. बांधावर चांगलें दाट कुंपण घातलें होतें. मधून मधून आंबा, जांभूळ, भाभूळ इत्यादि प्रकारचीं गर्द छायेचीं झाडें हारीनें लागलीं होतीं. शेताच्या एका कोपऱ्यांत दोन चार माणसांना सुखानें रहातां येईल, अशी झोंपडी बांधलेली दिसत होती. झोंपडीपासून जवळच उजव्या हाताकडे शेतांत प्रवेश करण्याकरितां दार ठेविलें होतें. झोंपडीच्या दोन्ही बाजूंस दोन गगनचुंबित व गर्द छायेचे आम्रवृक्ष होते, त्यामुळें झोंपडींत रहाणारास उन्हाच्या ताप होत नसे. त्याच आम्रवृक्षाखालीं एकीकडे एक गाय व एक म्हैस आणि दुसऱ्या झाडाखालीं दोन बैल व त्या गाय, म्हशीचीं दोन वासरें बांधलेलीं दिसत होतीं. झोंपडीपुढें बरीच मोठी जागा हिंडण्याफिरण्याकरितां ठेवली असून, एक दोन मोठ्या पाषाणशिला बसण्याकरितां ठेवल्या होत्या. शेताला पाण्याचा पुरवठा जवळूनच जाणाऱ्या एका ओढ्याच्या पाण्यानें केला जात असे. शेतांत सर्व प्रकारचा भाजीपाला लावलेला दिसत होता. एका बाजूला वांग्याचा फड लावलेला दिसत होता तर दुसरीकडे गाजराचा. त्या पलीकडे कांदे व लसूण यांचा. एका बाजूला बटाण्याचे वेल पसरलेले दिसत होते तर दुसरीकडे श्रावणघेवडा, पावटा, वाल इत्यादींचे वेल पसरलेले दिसत होते. एके ठिकाणीं चुका, चाकवत, चंदनबटवा, राजगिरा, तांदुळजा इत्यादि पालेभाजी वैपुल्यानें वाढलेली दिसत होती. मधून मधून मोठमोठे मंडप घातले असून त्यावर काकडी, दोडका, घोसाळी, पडवळ, काशीफळ इत्यादींचे फळभरित वेल पसरलेले दिसत होते. क्वचित् ठिकाणीं लाल भोपळ्याचेही वेल दिसत होते एका दलदलीच्या ठिकाणीं आळूची सुरी लावलेली होती. त्या फडाच्या मधील लहान लहान बांधावर झेंडू, मखमल, सदाबहार व तुळस इत्यादींचीं झाडें दिसत होतीं. एखादें रुईचें झाडही मधून मधून नैसर्गिक रीतीनें उगवलेलें दिसत होतें. शेताच्या कुंपणामध्यें गजगा, बोर, हिवाभूळ व इतर कांटेरी झुडपें खूप वाढलेलीं दिसत होतीं व त्यावर इतर रानटी वेल इतस्ततः पसरलेले दिसत होते. त्यामुळें कुंपणांतून कोणाचाही आंत प्रवेश होणें शक्य नव्हतें. असो.

वर वर्णन केल्याप्रमाणें असलेल्या शेतांतील झोंपडींत कला रहात होती. वसंतदुर्गांतील मोठमोठ्या भव्य महालांत विलास भोगलेल्या कलेस त्या शेतांतील गवताच्या झोंपडींत रहाणें बरें वाटत होतें काय ? तिच्या मुद्रेवर कांहीं विकार दिसत नव्हता. वसंतदुर्गांतील विलासी महालांत असतांना तिची जशी आनंदी मुद्रा होती, तशीच यावेळींही पण होती. आपल्या पतीसह त्या झोंपडींत ती आनंदानें कालक्रमणा करीत असलेली दिसत होती. दुपारच्या वेळीं नवीनचंद्रास कोठें जावयाचें नसलें म्हणजे दोघेही झोंपडीसमोरील मोकळ्या जागेंत आम्रवृक्षाखालीं टाकलेल्या शिळांवर बसून इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलत. आजही नवीनचंद्रास कोठें जावयाचें नव्हतें. दोघांचेंही भोजन वगैरे आटपतांच दोघेही शिळेवर येऊन बोलत बसलीं.

" कले, " नवीनचंद्र तिच्याकडे पहात हंसत म्हणाला, " तुला आतां या शेतांत रहाण्याचा कंटाळा आला असेल नाहीं ? "

" का बरं ? " कला सस्मित बोलली, " इथं काय कमी आहे म्हणून मला कंटाळा येईल बरं ! "

" नाहीं; म्हटलें, मोठमोठ्या सुशोभित महालांत तूं लहानपणापासून राहिली आहेस, तेव्हां तुला अशा ठिकाणीं एकांतांत रहाण्याचा ( आणि तेंही दरिद्रावस्थेंत ) कंटाळा येणें शक्य आहे. "

" कंटाळा ? " कलेनें म्हटलें, " मला वाटतं मनुष्याला एखाद्या गोष्टीचा कंटाळा जो येतो तो येण्यास कांहीं विशेष कारणं घडलीं पाहिजेत. "

" तीं कोणतीं कारणें बरें ? " नवीनचंद्रानें मध्येंच उत्सुकतेनें प्रश्न केला.

" त्याचीं नेमकीं कारणं काय सांगावीं ? " कला थोडीशी लाजून म्हणाली, " तरी पण मनुष्याचं मन अस्वस्थ असणं, एखाद्या गोष्टीची वाण असून ती वेळेवर पुरी न पडणं संकटप्रसंगीं एखादं प्रेमाचं मनुष्य जवळ नसणं इत्यादि कारणानं मनुष्याला एखाद्या गोष्टीचा कंटाळा येणं साहजिक आहे, पण मला इथं राहण्यास त्रास येण्याला अद्याप असं एखादं कारण मुळींच घडलं नाहीं "

" कां बरें ? आपण गरीब नाहीं का ? " नवीनचंद्रानें कौतुकानें विचारिलें.

" गरीब ? आपण गरीब ? " कला आश्चर्यानें म्हणाली, " आपण गरीब आहोंत, अशी वेडी कल्पना माझ्या मनांत देखील येत नाहीं. " ती थोडा वेळ थांबून पुढें म्हणाली, " आणि जगांत श्रीमंत कोण आहे ? ज्यांना जग श्रीमंत म्हणून म्हणतं ते मला गरीबांपेक्षां गरीब दिसतात. "

" तें कसें काय बोवा ? " नवीनचंद्रानें आश्चर्यानें विचारिलें.

" त्यांत विशेष तें काय आहे ? " कला बोलूं लागली. " ज्यांना जग धनाढ्य म्हणून म्हणतं, त्यांचा पैशाविषयींचा विलक्षण हव्यास पाहिला, तो मिळविण्याकरितां त्यांचीं नानाप्रकारचीं बरीं वाईट कृत्यं पाहिलीं व त्या कृत्यांमुळं उत्पन्न होणारी त्यांच्या मनाची अस्वस्थता पाहिली म्हणजे तेव्हांच खात्री होते. ज्या संपत्तीनं मनाला कधींही स्वस्थता मिळत नाहीं, अन्न गोड लागत नाहीं, रात्रीं गाढ झोंप येत नाहीं, अशी संपत्ति पुष्कळ जवळ असली, तरी काय उपयोग ? त्यापेक्षां—"

" अरे वा ! तूं एक तत्त्वज्ञानीच आहेस. " नवीनचंद्रानें हंसत विचारिलें, " बरें, मग श्रीमंत कोणी राहिलाच नाहीं तर ? "

कला किंचित लाजली. ती खालीं मान घालून म्हणाली, " माझ्या बोलण्याचा असा उलट अर्थ घेऊं नये. पण माझी आपली समजूत आहे कीं, सत्कार्यानं जी कांहीं अल्पस्वल्प संपत्ति मिळेल, त्यांतच सुख मानणारे खरे श्रीमंत ! "

" ठीक, ठीक ! " नवीनचंद्र हंसत म्हणाला, " एकंदरींत आपल्या बोलण्याचा मतलब आपण कांहीं गरीब नाहीं, असाच ना ? ठीक ! खायची भ्रांत असली, झोंपटांत रहावं लागलं, अंग झांकायला वस्त्र नसलं, लोकांत मान नसला व लोकांनीं दरिद्री म्हटलं तरी आपण आपल्याला गरीब कशाला समजावं ? असंच ना ? खरंच, ही युक्ति तूं फारच छान शोधून काढलीस बोवा ! बरं झालं, माझी काळजी सुटली. लोक कांहीं का म्हणेनात, आपण आपलं स्वतःस श्रीमंत समजून झोंकांत असावं ! खायला मिळो अगर न मिळो ! "

" इश्श ! " कला किंचित लाजून म्हणाली, " आपल्याला खायला का मिळत नाहीं. देवाच्या दयेनं पुष्कळ आहे ! "

खरंच. पुष्कळ आहे खरंच. बरं आतां हें सांग पाहूं " नवीन-

चंद्रानें उत्सुकतेनें विचारिलें. " कल्पना कर, उद्यां मला उज्जयिनीच्या राजानें बोलावलें व पुष्कळ धन दिलें तर त्याची काय वाट करायची ? "

" कल्पनेनंच त्याचा खर्च करावा म्हणजे झालें. " कलेनें हंसत उत्तर दिलें, " कल्पनेनं मिळणाऱ्या धनाविषयीं इतकी काळजी कर-ण्याचं कारण नाहीं कांहीं ! "

" माझ्या म्हणण्याचा अर्थ नाहीं समजलीस ! " नवीनचंद्र मध्येंच म्हणाला, " मी मनोराज्य करीत नाहीं कांहीं. माझें म्हणणें असें आहे कीं, कदाचित् उद्यां राजाच्या दरबारीं जर आपला मानमरातब वाढला व धनाची मामी झाली तर त्या मिळालेल्या धनाचा कसा उप-योग करावा किंवा तूं कसा करशील ? "

" असं होणं अशक्य आहे असं नाहींच म्हणणं नाहीं कांहीं. " कला नवीनचंद्राकडे आदरपूर्वक पहात म्हणाली, " रत्नाची परीक्षा झालीच पाहिजे; पण मला जर या बाबतींत खरंच विचारायचं असेल, तर मोठमोठ्या वाड्यांत रहाण्यापेक्षां या अशा झोंपडींत रहाणं मला फार आवडेल. "

" तें कां बरें ? " नवीनचंद्रानें उत्सुकतेनें म्हटलें, " कारण, तूं लहानपणापासून मोठमोठ्या वाड्यांतच रहात आली आहेस. मग तुला संपन्नस्थितीचा इतका का वीट यावा ? "

" याचं जरं कारण सांगितलं तर थट्टा तर नाहीं होणार ? " कलेनें सस्मित प्रश्न केला.

" छे छे, " नवीनचंद्रानें सप्रेम म्हटलें, " तुझे एकंदर विचार ऐकून मला फार आनंदच होईल. मला अशाच प्रकारचें मनुष्य जास्त आवडतें. "

कलेनें थोडावेळ विचार करून म्हटलें, " जरी मला वसंतदुर्गांत राहून बरींच वर्षें झालीं आहेत, तरी लहानपणीं बाबांच्या झोंपडींत जो काल मीं घालविला त्याची आठवण मी कधींही विसरणार नाहीं. मला समजूं लागल्यापासून मी बारा तेरा वर्षांची होईपर्यंत मी आपल्या बाबांच्याजवळच रहात होते. माझे बाबा वसंतदुर्गापासून जवळच असलेल्या एका खेड्यांत रहात असत. त्या खेड्यांत त्यांचें असेंच एक लहानसें शेत होतें. त्याच शेतांत एक टुमदारशी झोंपडी बांधून ते त्यांत माझ्यासह रहात असत. या संसारांत त्यांना प्रेमाचं असं मनुष्य

काय तें नीच व मलाही प्रेमाचा आधार काय तो बाबांचाच. माझी आई केव्हां वारली त्याचं मला कांहींच स्मरण नाहीं. मला समजूं लागल्यावर लोकांच्या सांगण्यावरून मी कधीं कधीं बाबांना आपल्या आईसंबंधानं विचारी; पण त्यांनीं डोळ्यांत पाणी आणून 'बाळ, अद्याप तूं लहान आहेस, तुला काय सांगूं ?' असं ह्मणावं. त्यामुळं मीं पुढें पुढें त्यांना विचारण्याचं सोडून दिलं. मला आपल्या आईबद्दल विशेष आईटही वाटत नसे. बाबांच्या सहवासांत माझं बालपण फारच आनंदांत गेलं. बाबांनीं माझ्याकरितां एक गाय पाळली होती. ती गाय अगदीं गरीब असल्यामुळं, मी बरीच लहान असल्यापासून तिची धार काढीत असे. दोन्हीवेळां धार काढणं हेंच माझं काम होतं. त्यावेळीं सगळ्यांत मला थंडीचे दिवस फार आवडत. त्यावेळीं धान्याच्या हंगामाचे दिवस असत. त्या दिवसांत शेतांत मोठी गडबड असे. आमचे बाबा वृद्ध असल्यामुळं व आसपासचे इतर शेतकरी त्यांना फार मान देत असल्यामुळं आमच्या चिमुकल्या शेतांतील सर्व काम आसपासचे शेतकरी येऊन करत. संध्याकाळ झाली कीं, आमच्या झोंपडीसमोर बाबा मोठी आगटी करीत व मग इतर शेतकरीही गप्पा गोष्टी करण्याकरितां शेकोटीजवळ जमत. त्यावेळीं त्यांच्या नन्हतन्हेच्या गोष्टी ऐकण्यांत किती मजा वाटे पण ! खरंच, दिवसभर शेतांत काम करून भूमातेनं दिलेल्या अल्पस्वल्प अन्नावर उदरभरण करून रहाणारे शेतकरी किती आनंदांत असतात, हें त्यावेळीं चांगलं दृष्टोत्पत्तीस येई. त्यांची साधी रहाणी, साधे विचार, विलक्षण संतोषी स्वभाव, देवावरील अढळ भक्ति व एकमेकावरला विश्वास पाहिला ह्मणजे मोठी धन्यता वाटे. किती ते सुखी असतील ? त्यांचा तो आयुष्यक्रम पाहिला ह्मणजे एखाद्या श्रीमंतालाहुद्धां त्यांच्या सुखाचा हेवा वाटेल. अशाप्रकारें मी किती दिवस तरी त्या लोकांत बाबांच्याबरोबर दिवस काढले. बाबा नेहमीं वसंतदुर्गावर जात येत असत. धर्मचंद्र-महाराज त्यांना चांगला मान देत असत. कधीं कधीं बाबांच्याबरोबर मीही वसंतदुर्गावर जात असे. कुमारी कुमुदिनी व मी जवळ जवळ एकाच वयाच्या असल्यामुळं तिचं व माझं चांगलंच प्रेम जुळलं. मी एखाददुसरा दिवस वसंतदुर्गावर रहात असे; पण त्या भव्य वाड्यांत

रहाण्यपेक्षां मला बाबांच्या झोंपडींत रहाणेंच विशेष आवडे. नाहीं तर वसंतदुर्गांत कुमुदिनीप्रमाणंच मलाही खायला, प्यायला मिळत असे. धर्मचंद्रमहाराज माझ्यावरही प्रेम करीत; पण काय असेल तें असो, वसंतदुर्ग एवढा मोठा होता, मोठाल्या भव्य वाड्यांत मी रहात होतें, चांगलं खायलाप्यायला मिळत होतं, सर्व कांहीं होतं; पण तिथें मीं एक गोष्ट पाहिली, नोकराचाकरापासून तें थेट महाराजापर्यंत सर्वांचीं मनं अस्वस्थ. रोज कांहींना कांहीं कारणानं त्यांना चिंता ही लागलेली असायचीच. त्यामुळं मला तिथें रहाणं आवडत नसे. तिथं गेल्यावर मी पुनः बाबांच्या झोंपडींत जाऊन शेकोटीभोंवतीं असलेल्या गरीब शेतकऱ्यांच्या चित्रविचित्र कहाण्या केव्हां ऐकीन असं मला होई; पण पुढें लवकरच माझे बाबा वारले व मला वसंतदुर्गांतच रहावं लागलं. तेव्हांपासून पांच सहा महिन्यापूर्वीपर्यंत मी तिथें रहात असे हें खरं; पण बालपणचं मला कधींही विस्मरण झालं नाहीं. ईश्वरकृपेनं मला जसं रहावंसं वाटतं तसंच रहावयास एकांत स्थान मिळालं, त्यामुळं मला फारच आनंद वाटतो. इथें आपल्या सहवासांत मी जें सुख अनुभवीत आहे, तसं दुसरीकडं क्वचित् मिळेल. एक आशा पुरी पडली असतांना पुनः दुसऱ्या आशापूर्तीची वाट पहात असून मनाची अस्वस्थता करणाऱ्या संपन्न स्थितीपेक्षां ही स्थिति मला हजार हिश्शानं बरी वाटते."

इतकें बोलून कला स्वस्थ बसली. नवीनचंद्र किती वेळ तरी तिच्या सस्मित मुद्रेकडे पहात बसला. आपल्या पत्नीचें भाषण ऐकून त्याला कौतुक वाटलें, आश्चर्य वाटलें व आनंदही झाला. तो आनंदानें म्हणाला, "समजलों. तुझ्या बोलण्याचा मतलब मी पूर्णपणें समजलों. मलाही असेंच मनुष्य आवडतें व अशाच साध्या स्थितींत आयुष्यक्रम कंठावासा वाटतो. तरी पण कले, सुदैवानें किंवा उद्योगानें जर संपत्ति प्राप्त झाली तर काय करावें बरें? मोठमोठ्या वाड्यांत संपन्न स्थितींत राहून अशा प्रकारचें साधें व सन्मार्गाचें आयुष्य कंठण्यास येणार नाहीं काय?" असें म्हणून नवीनचंद्र उत्सुकतेनें कलेकडे पाहूं लागला.

कलेनें एकवार नवीनचंद्राकडे पाहिलें. आपल्या पतीनें वरील प्रश्न कां केला असावा, याचें कारण तिनें ताडलें असें दिसलें.

ती नम्रपणें म्हणाली, " अवश्य येईल. प्राप्त मनावर आपलं पूर्ण जरी नाहीं तरी थोडं बहुत तरी स्वामित्व असलं पाहिजे. मूळ साध्या स्थितींत असलेल्या मनुष्याला नेहमीं आपली अशी स्थिति झाली कीं, आपण सुखी होऊं असं वाटत असतं. ती त्याची आशा कांहीं विशेष मोठी नसते. आपल्या स्थितीच्या मानानंच तो ती आशा करतो. जर सुदैवानं त्याची ती आशा पूर्ण झालीच व उंचा स्थितीची तो इच्छा करितो. ती प्राप्त झालीच तर त्या आशेलाच फाटे फुटूं लागतात. तें होतां उपयोगी नाहीं. आशा ही एक कधींही पुरा न होणारा जिना आहे. एकेक पायरी चढत जातांच मनुष्य न थकतां त्यास आणखी वर चढण्याची शक्ति येते; पण केव्हांना केव्हां एखाद्या पायरीवरून त्याचा पाय निसटतोच व पाय निसटला कीं पुनः तो मुळच्या पायरीवर-सुद्धां थांबूं शकत नाहीं ! "

" खरें आहे, तुझें म्हणणें अक्षरशः खरें आहे. आशेनें आशा वाढते खरी; तरी पण काळें, दैवानें, उद्योग केल्यावांचून आपोआप जर उंच स्थिति तुला किंवा मला सहज प्राप्त झालीच. तर तूं काय करशील बरें ? " नवीनचंद्रानें मध्येंच विचारिलें. आपल्या पत्नीचे एकेक उदात्त विचार ऐकून त्यास आनंद वाटला.

" आपल्याबरोबर जशी स्थिति मला प्राप्त होईल, ती मी आनंदानं मान्य करीन. " कला साश्चर्य उद्गारली, " मग ती वाईट असो कीं चांगली असो. "

" बरं मग ? " नवीनचंद्रानें तिच्याकडे बारकाईनें पहात विचारिलें, " समज, मी एक मोठा मनुष्य आहें— घटकाभर कल्पना कर— केवळ तुझी परीक्षा पाहण्याकरितां मीं तुला अशा झोपडींत आणून ठेवली असेल. आतां मी तुला आपलें खरें नांव सांगून घेऊन घरीं जाऊं इच्छितों — अशी कल्पना करहो — तर तूं काय करशील बरं ? एक-दम मोठी स्थिति प्राप्त झाल्याबद्दल तुला आनंद वाटणार नाहीं काय ? "

आपल्या पतीचें भाषण ऐकतांच कला चकित् झाली. ती आश्चर्यानें त्याच्या चेहऱ्याकडे पाहूं लागली. बराच वेळ तिला काय बोलावें हें सुचेना.

कलेला घोंटाळा पडलेला पहातांच नवीनचंद्रास किंचित् हंसूं आलें. तो म्हणाला, " तुला एवढा घोंटाळा कसला पडलाय ? "

कलेच्या मनांत क्षणभरच एक विलक्षण शंका आली कीं, आपला पति ह्मणतो त्याप्रमाणें तो खरोखरीच एखादा मोठा मनुष्य असेल काय ? असें तिला वाटलें म्हणून तिनें त्यास किंचित् उत्सुकतेनें हंसत पुसलें, " मी त्या मोठ्या पदाला साजेशी आहें का ? "

नवीनचंद्रासही वरील प्रश्नाचें समर्पक उत्तर देण्यास पंचाईत पडली; पण लागलीच तो हंसत बोलला, " त्या काल्पनिक पदाला तूं साजशील कीं नाहीं, हें मी नाहीं सांगूं शकत. तरी पण तूं मला योग्य पत्नी आहेस यांत काडीमात्र शंका नाहीं. "

" मग मलाही आतां विशेष काळजी करायला नको. " कलेनें लज्जेनें खालीं मान घालून म्हटलें, " आपण मोठे झालांत ह्मणजे मलाही मोठेपणा येईलच. "

" पण तो मोठेपणा प्राप्त झाल्यावर या झोंपडींत रहायला मिळणार नाहीं. "

पण आतां कलेला तो विषय पुरे वाटला म्हणूनच कीं काय कोण जाणें. ती ह्मणाली, " त्याचं आतांच काय ? पुढंपुढं पहातां येईल. खरंच इंदुमतीकडे जाणं झालं होतं का ? "

" परवां गेलों होतों. गरीब बिचारी– "

" खरंच, काय बिचारीचं नशीब पहा ! " कला दुःखानें म्हणाली, " दुर्दैवानं सर्व कांहीं चांगलं मिळून न मिळाल्यासारखं आहे. अजसेन कसे आहेत ? "

" आज मी पुनः जाणार आहें; पण अद्याप कांहीं विशेष सुधारणा दिसत नाहीं. त्यांच्या पोटांत त्या रात्रीची विलक्षण भीति बसली आहे. ती जेव्हां कमी होईल तेव्हां त्यांची प्रकृति कांहीं तरी सुधारण्याची आशा. इंदुमतीनं तुलाही एकवार बोलाविलें आहे. कदाचित् बोलावणं आल्यास एकवार जाऊन ये पाहिजे तर. "

" खरंच माझ्याही मनांत येत होतं. "

अशाप्रकारें आणखीही तीं बराच वेळ बोलत बसलीं. ऊन टळल्यावर नवीनचंद्र कांहीं कामाकरितां बाहेर निघून गेला. कलाही आपल्या चिमुकल्या मळ्यांत इकडे तिकडे हिंडूं लागली.

नवीनचंद्र गेल्यावर सुमारें एक घटकेनें एक वृद्ध स्त्री कलेच्या

शेताच्या द्वाराशीं आली व रात्रीच्यारात्र रहाण्याविषयीं कलेस जागा मागूं लागली. कलेनें थोडावेळ त्या म्हातारीकडे निरखून पाहिलें. तिला तिची दया आली. तिनें तिला आंत बोलाविलें. म्हातारी अगदीं थकून गेली होती. थोडावेळ विश्रांति घेतल्यावर म्हातारी इकडच्या तिकडच्या गोष्टी करूं लागली.

"आपलं नांव काय बरं ?" कलेनें मध्येंच विचारिलें.

"माझं नांव होय ?" म्हातारी हेल काढून म्हणाली "माझं नांव मायाराणी."

नांव ऐकतांच कला चपापली. हें नांव तिला परिचित् होतें काय ?

---

## प्रकरण चाविसावें.

# स्मशानांत.

त्या मृत बालकाकडे पाहून बेशुद्ध झालेली ती स्त्री कोण होती ? अशाप्रकारच्या भयंकर रात्रीं कीं, ज्यावेळचें दृश्य पाहून एखाद्या धाडसी वीराचेंही ह्रदयकंपन व्हावें. त्यावेळीं ती सुंदर स्त्री तेथें—त्या भीषण स्मशानभूमींत—कशास येंरें आली होती ? काय तें मृत बालक तिचें अपत्य होतें ? जर तें तिचें अपत्य होतें तर तें शृगालकुत्रे वगैरे कुत्र्यांच्या हातीं कसें लागलें ? अशाप्रकारचे कितीतरी विचार वाचकांच्या मनांत येतील व त्या स्त्रीचा परिचय करून घेण्यास त अत्यंत उत्सुक असतील; पण वाचकांना त्या स्त्रीचा परिचय आम्हीं पूर्वीच करून दिला आहे. वाचकांना तिचें नांव समजतांच ती त्या स्मशानभूमींत कां आली होती हें केव्हांच समजेल.

दुर्दैवी इंदुमती ! हाय ! वाचकवृंद, ती स्त्री दुसरें कोणी नसून पतिभक्ता इंदुमती होती ! आपला पति अर्धवट असून शिवाय भोळा आहे. हें इंदुमती पूर्णपणें जाणून होती व त्याकरितां ती त्यास लुच्चे लोकांच्या संगतीपासून दूर ठेवण्याकरितां शिकस्त मेहनत घेत असे;

पण दुर्दैव तिचें असें कीं, या बाबतींत तिला अद्यापपर्यंत तरी फारच थोडें यश आलें होतें. या गोष्टीस तिचा इलाज नव्हता. अद्याप ती अल्पवयी होती. तिला या गोष्टींत पोक्त सल्ला देण्यास दुसरें कोणीही प्रेमाचें मनुष्य नव्हतें. या भूपृष्ठावर तिला पति हेंच काय तें एक स्थान होतें. दया नांवाची एक वृद्ध दासी तिच्याजवळ होती. ती दासी तिच्यावर फार प्रेम करी. नाहीं ह्मणायला आपल्या दुःखाला वाट करून देण्यास इंदुमतीला हेंच एक स्थळ होतें; पण दया किती झालें तरी एक दासी. ती असल्या नाजुक गोष्टींत काय सल्ला देणार ? फार झालें ह्मणजे इंदुमतीला आपल्या पोटाशीं धरून तीही रुदन करूं लागे एवढेंच. पण कसें कां होईना; घटकाभर रुदन करून आपलें दुःख हलकें करण्यास इंदुमतीला तें तरी एक स्थळ होतें. असो.

उज्जयिनीचे सद्यःकालीन सम्राट महाराज विक्रमार्क एक न्याय-परायण पुरुष असून प्रजावत्सल भूपति होते. ही गोष्ट इंदुमती जाणून होती. एकवार आपण जाऊन त्यांची मदत मागावी, असें कितीदां तरी तिच्या मनांत आलें; पण करणार काय ? अल्पवयामुळें तिला तसें करण्याचें धाडस होईना. अशा नानाप्रकारच्या संकटांमुळें, आपल्या दुर्दैवाला दोष देत बसण्यापलीकडे इंदुमतीला दुसरा इलाज नव्हता. पण त्यामुळें ती आपल्या नवऱ्याच्या वर्तनावर नजर ठेव-ण्यास किंवा दुष्ट संगतीपासून त्यास बचावण्यास थोडासुद्धां काना-डोळा करीत नसे. विषकुंभ, शैलोदयासारखे नीच आपल्या वाड्यांत येऊं शकूं नयेत ह्मणून ती नानाप्रकारचे उपाय योजी; पण त्यांच्या-सारख्यांच्या युक्तीपुढें तिचें काय चालणार ? तिनें योजलेले सर्व उपाय निष्फळ होत. पण एका गोष्टीचें इंदुमतीस समाधान वाटे. अजसेन खुळा होता हें खरें; पण तो दुर्व्यसनी नव्हता. त्यानें आपण होऊन कधीं इंदुमतीला त्रास दिला नव्हता. कुमार्गानें जाण्याची त्यास स्वतः कधींही इच्छा झाली नव्हती. जें कांहीं बरें वाईट त्याच्या हातून होई त्यास त्याच्या बुद्धीपेक्षां इतरच विशेष कारण होत. आणि याच एका गोष्टीचें इंदुमतीस समाधान होतें; पण हाय ! ज्यावेळीं तिनें शृगालद-त्ताच्या नादानें आपला पति मंत्रसाधन करूं इच्छितो, हें पाहिलें, त्यावेळीं मात्र तिचें सर्व धैर्य खचलें. पुढें अजसेनानें गुप्तपणें एका मोकळ्यास

लालुच दाऊन त्याच्याकडून एक सुंदर मूल आणण्याचें जेव्हां तिनें आइून ऐकलें, तेव्हां तर तिचे पंचप्राण व्याकुळ झाले. एकंदरींत आपला पति बालहत्या करणार ? हे भगवन् ! इंदुमतीसारख्या साध्वीला यापेक्षां प्राणांतिक यातना देणारी चिंता ती कोणती ? अजसेनाला तरी या बाबतींत ती काय सांगणार व कसें सांगणार ? मग काय ? आपल्या पतीच्या हातुन बालहत्या घडवून द्यावयाची ? त्याच्या निष्कलंक चारित्र्यावर बालहत्येचा डाग लागूं द्यावयाचा ? परलोकसुखाला अंतरवणारें बालहत्येसारखें महत्पाप आपल्या पतीकडून होऊं द्यावयाचें ? छे छे ! अशी गोष्ट इंदुमतीकडून तरी होणें शक्य नव्हतें ! आपल्या पतीला अशा निर्घृण कार्यापासून परावृत्त करण्यास आपला प्राण जरी वेंचावा लागला तरी बेहेत्तर; पण त्याच्या हातून हें अमानुष्य कृत्य होऊं द्यावयाचें नाहीं, असा इंदुमतीनें अगदीं निश्चय केला. असा निश्चय केल्यानंतर हें कार्य आपल्या एकटीकडून पार पडेल कीं नाहीं ? किंवा कोणा दुसऱ्याची यांत मदत घ्यावी असा एक क्षणभरच इंदुमतीला विचार पडला; पण तात्काळ तिला ही गोष्ट दुसऱ्याला सांगणें परिणामीं हितकर होणार नाहीं, असें वाटलें. यदाकदाचित् जर आपला निश्चय पार न पडतां आपल्या पतीच्या हातून तें पापकर्म घडलेंच तर परलोकांत त्याला त्याबद्दल काय प्रायश्चित्त मिळावयाचें असेल तें मिळो; पण निदान इहलोकांत तरी त्याचा दुर्लौकिक न व्हावा अशी तिनें इच्छा केली. म्हणून तिनें आपल्याला कळलेली ही गोष्ट दयेलासुद्धां न सांगण्याचा निश्चय केला ! आर्यगृहिणींनो ! पातिव्रत्य कसें आचरावें, हें तुम्हांस नव्यानें सांगावयास नको आहे. आम्ही जाणतों आहोंत कीं, तुम्ही त्याच प्रातःस्मरणीय साध्वी स्त्रियांच्या वंशज आहांत ! सीता, तारा, मंदोदरीसारख्या पतिव्रतांनीं आपल्या धवलयशानें सर्व स्त्रीजातीला भूषित केलें आहे, त्याच सतींच्या तुम्हीं अनुगामिनी आहांत, तरी पण भगिनींनो ! इंदुमतीच्या सच्चरिताचें तुम्ही लक्षपूर्वक मनन करणार नाहीं काय ? असो.

गुप्त शोधाअंतीं इंदुमतीस आपला पती येत्या अमावास्येस मंत्रसाधन करणार असल्याचें समजलें. तें स्मशानांत होणार हेंही तिला स्पष्ट कळलें; पण कोणत्या स्थानीं हें मात्र तिला समजलें नाहीं. तरी

पण तिनें त्याबद्दल विशेष काळजी केली नाहीं. आणि ती अमावास्या येतांच आपल्या पतीप्रमाणेंच तीही गुप्तपणें आपल्या वाड्याबाहेर पडली. ती रात्र किती भयंकर होती, हें पुनः सांगावयास नको आहे. त्या भयंकर रात्रीची मुळींच परवा न करतां ती स्मशानांत येऊन पोहोंचली! हिंडतां हिंडतां तिला प्रथम एका बालकाचें शिरविहीन कलेवर आढळलें! तें पहातांच तिच्या कोमल हृदयावर विद्युत्पातच झाला! क्षणभरच, एकंदरींत आपला उपाय निष्फळ झाला तर! असें तिला वाटलें; पण पुनः तिनें तसेंच धैर्य धरून आणखी शोध करण्याचा विचार केला! ती नदीजवळ आली व तिला एक सुंदर पुरुष— ( वाचकांनीं ध्यानांत ठेवावें हा विमलचंद्र होता ) नदींत उभा राहून मंत्र-साध्य करीत असल्याचें दिसलें. तें भीषण दृश्य पहातांच ती घाबरली! त्याचवेळीं विमलचंद्रानें बळी घेण्याकरितां पिशाचास मारलेली भयंकर आरोळी ऐकतांच ती बेशुद्ध होऊन खालीं पडली! सुमारें घटकाभर ती तशा स्थितींत होती. तिला शुद्धी येतांच तिनें नदीपृष्ठाकडे न पहातां तेथून ऊर्ध्वश्वासांत पलायन केलें! त्या गंभीर अंधःकारांत ती सारखी ठेंचा खात, अडखळत पळत होती! थोड्याच वेळांत ती स्मशानाच्या दुसऱ्या भागांत आली व तिनें, आपल्यापासून थोड्याच अंतरावर शृगालदत्त, अजसेन वगैरे तिघांस पाहिलें. त्या तिघांनीं जरी काळे पोषाख केले होते तरी इंदुमतीनें त्यांना ओळखलें. दिवटीच्या प्रकाशांत चाललेला प्रकार तिला दुरून चांगल्याप्रकारें दिसत नव्हता. मात्र शृगालदत्तानें त्या निद्रिस्त बालकाच्या वधार्थ उचललेली तलवार चमकलेली तिला दिसली! ती धांवतच त्यांच्याकडे आली; पण तिच्या येण्यापूर्वीच बालकाचा वध झाला! शृगालदत्त व तो नोकर दोघेही तिला भिऊन पळाले! अजसेन बेशुद्ध तेथेंच पडला! इंदुमती जवळ आली. त्या मृत बालकाकडे तिनें पाहिलें! आपल्या पतीच्या हातून हें पापकर्म झालें अं? असेंच तिला वाटलें. तिला खरी स्थिति समजली नाहीं व आपल्या पतीनें बालहत्या केली, हा विचार तिला असह्य झाला! ती बेशुद्ध होऊन खालीं पडली!

वरील प्रकार घडल्यानंतर थोड्याच वेळानें विमलचंद्र त्याठिकाणीं आला! शृगालदत्त व तो नोकर यांना पळतांना त्यानें पाहिलें होतें!

त्यामुळें त्या दोघांस तशाप्रकारें बेशुद्ध पडलेले व त्यांच्याजवळच तें मृत बालक पडलेलें पहातांच त्यानें कांहीं निराळीच कल्पना केली! तें मृत बालक या दोघांचें अपत्य असावें असें वाटलें व त्या दोन व्यक्ति पळतानें आपण जें पाहिलें त्यांनींच हें घोरकर्म केलें असावें, अशी विमलचंद्राची कल्पना झाली! आणि कोणाचीही तो प्रकार पाहून तशीच कल्पना झाली असती. थोडाच वेळ तो त्या दोघांकडे पहात उभा राहिला. पण हे दोघे आपल्या लहान मुलासह येथें आले कसे? याचेंच त्याला आश्चर्य वाटत होतें. कुऱ्हाडीनें त्या बालकाला मारलेलें दिसत नव्हतें. कारण त्या तिघांच्याही अंगावर असलेलीं भूषणें तशींच होतीं. तो आश्चर्य करीतच अजसेनाजवळ बसला. दिवटी अद्याप जळत होती. तिच्या प्रकाशांत त्यास अजसेनाचा चेहरा दिसला. त्याकडे न्याहाळून पहातांच तो दचकला. पुनः त्यानें निरखून पाहिलें. अजसेनास तो अगदीं जाणत नव्हता, तरीपण त्यास कांहीं शंका आली. त्यानें उठून दिवटी आणिली व अजसेनाच्या चेहऱ्याजवळ नेऊन पुनः त्याची मुद्रा निरखून पाहिली. बराच वेळ तो पहात होता; पण त्याची खात्री होईना. अखेरीस त्यानें त्याचे पाय तपासले, तों अजसेनाच्या उजव्या पायास सहा बोटें असलेलीं त्यास दिसलीं. तो जास्तच चकित झाला! "हें खरें असेल काय?" असें पुटपुटतच त्यानें त्याचें सर्व शरीर तपासलें. इकडे अजसेनास मध्यंतरी थोडी शुद्धी आली व त्यानें डोळे उघडून पाहिलें तों एक मनुष्य–अर्थात् विमलचंद्र–आपले पाय धरून कांहीं पहातो आहे, असें त्यास दिसलें. बिचारा भित्रा अजसेन! भुतें व हडळी आपल्या भोंवतीं जमून त्यांनीं आपणास पायाकडून खाण्यास सुरवात केली आहे असें त्यास वाटलें. भोळा बिचारा! "बाबांनो! जरा धीरे धीरे खा अं!" असें अडखळत स्वारी पुटपुटली. विमलचंद्र त्याचें शरीर तपासण्यांत व एका विशेष आश्चर्यांत गुंग असल्यामुळें त्यास अजसेनाची वरील विनंती ऐकूं गेली कीं नाहीं कोण जाणें? अजसेन भीतीनें पुनः बेहोष झाला! बऱ्याच वेळानें विमलचंद्राची तपासणी संपली! त्याचें समाधान झालेलें दिसलें नाहीं. त्यानें दिवटी जागच्याजागीं खोंचली. त्यानें इकडे तिकडे पाहिलें! सभोंवतीं चाललेलें वादळ

मुळींच शांत नव्हतें. विमलचंद्रास त्याची क्षिती नव्हती; पण त्या दोघांना कोठें तरी निवाऱ्यास नेलें पाहिजे, असें त्यास वाटलें. त्या दोघांविषयीं त्याला विशेष प्रेम वाटूं लागलें होतें. त्यानें एका काटकीनें त्या दोघांभोंवतीं दोन वर्तुळें काढलीं व तेथून प्रयाण केलें. कदाचित् आपण गेल्यावर मागून त्या दोघांस कसलाही त्रास होऊं नये या हेतूनें त्यानें तीं मांत्रिक वर्तुळें काढलीं असावीत. मात्र त्या मृतबाळकाच्या शवाभोंवतीं वर्तुळ काढण्यास तो विसरला! त्यामुळें तो तेथून जातांच थोड्याच वेळानें चार पांच शृगालांनीं तेथें येऊन त्या शवास तेथून खेंचत दुसरीकडे नेलें!

इकडे विमलचंद्र दुसऱ्या कोणास मदतीस आणण्याकरितां तेथून निघाला. त्या दोघांसही एकाच वेळीं तेथून घेऊन जाण्यास विमलचंद्र एकटा समर्थ होता; पण त्यास तें बरें वाटलें नाहीं. म्हणून जवळच्या शेतांतून एखाद्या शेतकऱ्यास आपल्या मदतीस आणावें असा विचार करून तो निघाला. सुमारें एका हाकेवर असलेल्या एका शेतांतील झोंपडींत दिवा जळत असलेला त्यानें पाहिला. तो त्या झोंपडीजवळ गेला. ही झोंपडी नवीनचंद्राची होती. झोंपडींत दोघेही पतिपत्नी बाहेर चाललेल्या वादळांत आपली झोंपडी कशी वाचते, ही चिंता करीत बसलीं होतीं. विमलचंद्राची हाक ऐकतांच नवीनचंद्र बाहेर आला. बाहेर अगदीं काळाकिट्ट अंधःकार पडला होता. मात्र वारा आतां अगदीं बंद होता. नवीनचंद्रानें कलेस दिवा बाहेर आणण्यास सांगितलें. कलेनें आश्चर्य करीत दिवा बाहेर आणिला. प्रकाशांत नवीनचंद्रानें विमलचंद्रास तेव्हांच ओळखलें. त्यानें येऊन आपल्या शेताचें फाटक उघडलें व आश्चर्यानें म्हटलें, "आपण अशा वेळीं इकडे कोणीकडे?"

"मग समजेल; पण सध्या माझ्याबरोबर जरा स्मशानांत चला! एक स्त्री व पुरुष मोठ्या संकटांत पडलीं आहेत त्यांना मदत पाहिजे." असें म्हणून विमलचंद्र चालूं लागला. नवीनचंद्रानें त्याच्याबरोबर चलण्याचें आश्वासन दिलें. त्यानें आंत येऊन कलेस काय सांगावयाचें तें सांगितलें व आपली तलवार घेऊन तो विमलचंद्रास येऊन मिळाला. व दोघेही स्मशानाकडे वळले.

कला आतां पूर्वीप्रमाणें भित्री नव्हती. नवीनचंद्रानें तिला चांगली

धीट केली होती. पुढें काय होतें हें पहाण्याकरितां ती मोठ्या उत्सुकतेनें वाट पाहूं लागली. थोड्याच वेळांत नवीनचंद्र इंदुमतीस व विमलचंद्र अजसेनास घेऊन झोंपडींत येऊन दाखल झाले. नवीनचंद्रानें कलेस तात्काळ संक्षिप्त हकीगत सांगून शुश्रुषा करण्यास सांगितलें. कला त्या दोघांही पतिपत्नींच्या शुश्रुषेस लागली! विमलचंद्रही थोडावेळ तेथें बसून नंतर निघून गेला. विमलचंद्र निघून गेल्यावर नवीनचंद्रही कलेच्या मदतीस आला. त्या दोघांनाही—अजसेन व इंदुमती यांना— त्यांनीं निरनिराळ्या बिछान्यावर निजविलें. थोड्या वेळांत तीं दोघेही कलेच्या परिश्रमानें थोडीबहुत शुद्धीवर आलीं. आतां त्यांच्या प्रकृतीविषयीं विशेष काळजी नव्हती. कलेनें आपल्या पतीस झोंप घेण्याविषयीं विनंति केली. नवीनचंद्रानें शेताचें फाटक बंद केलें व आंत येऊन अजसेनाजवळच जमिनीवर शयन केलें! कला इंदुमतीजवळ बसली.

विमलचंद्रानें त्या दोघांविषयीं— अजसेन इंदुमतीविषयीं— जी कल्पना केली होती तीच त्यानें नवीनचंद्रास सांगितली होती. नवीनचंद्रासही ती खरी वाटली व त्यानें तीच गोष्ट कलेला सांगितली होती. त्यामुळें इंदुमतीविषयीं तिला फारच वाईट वाटत होतें. ती दैवाच्या विचित्र लीलेचें कौतुक करीत इंदुमतीकडे पहात तिच्याजवळ बसली असतां, इंदुमतीनें डोळे उघडले व तिच्याकडे पाहिलें! ती पूर्ण शुद्धींत आलेली पहातांच कलेस अत्यानंद झाला. इंदुमतीनें तिच्याकडे एकवार पाहिलें व पुनः तिनें डोळे मिटले. ती आतां पूर्ण शुद्धींत आली होती. तिनें आपले सर्व विचार जुळवले. आपण त्या मृत बालकाकडे पाहून बेशुद्ध झालों असा विचार तिच्या मनांत येताच तिला भीति वाटली. भीतीनें तिचें शरीर कांपूं लागलें. आपण स्मशानांत आहोंत कीं कुठें हें पहाण्याकरितां तिनें पुनः डोळे उघडले. कला तिच्याजवळ बसलीच होती. ती उठून बसली! तिनें भीतिप्रद दृष्टीनें इकडे तिकडे पाहिलें! पुनः कदाचित् तो भयंकर देखावा दिसेल, असें तिला वाटलें. तिनें बोलण्याचा प्रयत्न केला; पण कांहीं केल्या शब्द उमटेना. तिची ही स्थिति पाहून कलेनें प्रेमानें मंद स्वरांत विचारिलें, " आपण काय पहातां ? "

" मी कुठं आहें ? आणि ते कोठें आहेत ? त्यांना प्रथम वाचवा. " इंदुमतीनें क्षीणस्वरांत ह्मटलें, " त्यांचा कांहीं अपराध नाहीं. तें किनी मीं–मीं केलं. "

" आपण अगदीं काळजी करूं नका. " कला प्रेमानें ह्मणाली, " सर्व कांहीं ठीक आहे. आपण चांगल्या सुरक्षित जागीं आहां. आपण स्वस्थ पडा. "

कलेचा प्रेमाचा स्वर व मुद्रा पाहतांच इंदुमतीस आपलें दुःख आंवरून धरवेना. तिनें उठून तिच्या गळ्यास मिठी मारिली व स्फुंदत ह्मटलें, " मला आतां स्वस्थता कुठली हो. व्हायला नको होतं तें झालं. " असें ह्मणून ती कलेच्या वक्षस्थलावर आपलें मस्तक ठेवून रुदन करूं लागली. कलेच्याही नेत्रांतून टपटप अश्रु गळूं लागले. इंदुमतीचें वरील भाषण ऐकतांच कलेला वाटलें ही आपल्या पुत्राविषयीं बोलते आहे, ह्मणून ती तिचें शांतवन करण्याच्या हेतूनें ह्मणाली, " देवापुढं कुणाचं चालणार बरं ? झाल्या गेल्याबद्दल कितीही — " तिच्यानें पुढें बोलवेना.

इंदुमतीला कलेचें वरील बोलणें ऐकुन जास्तच वाईट वाटलें. आपल्या पतीनें बालहत्या केली, हें जगास समजूं नये अशी तिची अत्यंत इच्छा होती; पण कलेच्या भाषणानें तिला आपल्या पतीचें पापकर्म समजलें, असेंच इंदुमतीला वाटलें. त्या दोघींनाही एकमेकींची खरी हकीगत माहीत नसल्यामुळें दोघींची निरनिराळी कल्पना झाली. इंदुमति रुदन करीत ह्मणाली " एकंदरींत तुह्माला समजलं तर ? पण मी खात्रीनं सांगत्यें, त्यांनीं तें नाहीं केलं. त्याला कीं नाहीं मींच–मींच मारलं ! "

आतां मात्र कला चपापली. तिनें चकित् होऊन विचारिलें, " आपण हें काय बोलतां ? आपलं बोलणं मी समजल्यें नाहीं. "

" नाहीं ? " इंदुमती किंचित आनंदून ह्मणाली, " तुह्मी नाहीं जाणत ? खरी हकीगत नाहीं जाणत ? मग बरं झालं तर ! कुणालाही ती गोष्ट समजूं नये अशीच माझी इच्छा आहे. "

तिचें हें भाषण ऐकतांच कलेला क्षणभरच हिला वेड तर लागलें नाहीं अशी शंका आली. ह्मणून तिनें खात्री करून घेण्याकरितां शांतपणें

विचारिलें, ' आपण काय बोलतां हें खरोखर मला कांहीं समजत नाहीं. आपण हें शुद्धींतच बोलतां आहां काय ? "

कोमल हृदयाची परीक्षा कोमल हृदयालाच होत असते. कलेचा तो निष्कपट व प्रेमाचा प्रश्न ऐकतांच इंदुमतीला एकप्रकारचें समाधान वाटलें. आपल्या अश्रूला अश्रु देणारी व्यक्ति हीच एक आहे, असें तिला वाटलें. तिनें करुण वाणीनें विचारिलें, " आपण माझी कांहींच हकीगत जाणत नाहीं का ? "

" नाहीं. " कलेनें उत्तर दिलें.

" मग मी ती आपणास अवश्य सांगेन. मला माहीत आहे—माझं मन मला सांगत आहे कीं, तूं आपल्या बहिणीजवळ बसली आहेस. खरंच सांग बरं ? मला अभागिनीला आपली बहीण मानशील ? " तिनें करुण वाणीनें विचारिलें.

" बहिणीपेक्षां जास्त. " कलेनें साश्रुनयनांनीं तिच्याकडे पहात उत्तर दिलें.

" मग माझं सर्व दुःख मी आपणाजवळ ओकून टाकतें; पण मीं सांगितलेली सर्व हकीगत कुणाला न सांगण्याबद्दल वचन दे. "

" एका मनुष्याला मी जरूर सांगेन. तशी आपली इच्छा नसल्यास मी आपली हकीगत ऐकूं इच्छित नाहीं. "

" तें कोण मनुष्य ? "

" माझे पति ! " कलेनें गंभीरपणें उत्तर दिलें.

तिचें हें उत्तर ऐकतांच साध्वी इंदुमतीला गहींवरून आलें. तिनें कलेला घट्ट आलिंगन दिलें. ती म्हणाली, " मग तर मी आपली हकीगत तुला जरूर सांगेन. मग माझं हृदय जाणण्याला तुला मुळींच वेळ लागणार नाहीं. "

असें म्हणून तिनें आपली दुर्दैवी कथा सांगितली व अखेरीस ती करुण वाणीनें तिच्याकडे पहात म्हणाली, " स्त्रीला पति किती प्रिय असतो हें आपण जाणतां आहांत. मी अगदीं खात्रीपूर्वक सांगत्यें कीं, त्यांच्या हातून तसलें पाप घडणें शक्य नाहीं. त्यांच्या हातून तें दुष्टांनीं करविलें आहे. आपल्या पतीची निंदा झालेली मला कधींही सहन होणार नाहीं . "

" नाहीं, आपल्या पतीची निंदा मुळींच होणार नाहीं !" कला प्रेमानें म्हणाली, " मी खात्रीपूर्वक सांगत्यें कीं, आपल्या पतीच्या हातून तें पाप मुळींच घडलें नसलें पाहिजे. माझं मन मला पूर्ण साक्ष देत आहे. आणि जरी यदाकदाचित् दुर्दैवानं ती गोष्ट खरी असली तरी साध्वी ! तुझी किंवा तुझ्या पतीची निंदा मुळींच होणार नाहीं, असेंच मी करीन."

कलेच्या या भाषणानें इंदुमतीला बराच धीर आला. बोलतां बोलतां दोघींचाही डोळा लागला.

प्रातःकालीं उठतांच कलेनें आपणास समजलेली सर्व हकीगत आपल्या पतीस सांगितली. नवीनचंद्रानें कांहीं गंभीरपणानें व कांहीं आश्चर्य करीत ती सर्व ऐकिली.

अजसेनाची तब्येत जरा बिघडलेली होती. नवीनचंद्रानें डोली व मेणा आणवून त्या दोघां पतिपत्नीस त्यांच्या वाड्यांत पोंचविलें.

यानंतर नवीनचंद्र रोज संध्याकाळीं अजसेनाच्या भेटीला जात असे. क्वचित् वेळीं विमलचंद्रही जात येत असे.

---

## प्रकरण पंचविसावें.

### झाली तयास तदनंतर भूतबाधा
### चेष्टा वदूं मग किती कपिच्या अगाधा.

मागील प्रकरणांत सांगितलेल्या गोष्टीला दहा बारा दिवस लोटले. अजसेनाची तब्येत आतां बरी होती; पण त्या रात्रीं त्यास वाटलेली भीति त्याच्या हृदयांतून अद्यापि नाहींशी झाली नव्हती. आपल्या स्वतःच्या वाड्यांतील भव्य महालांतील पलंगावर तो पडला असतांही त्यास वारंवार आपल्याला भुतांनीं वेताळ महाराजांच्या महालांत आणलें आहे असें वाटे. तो आपल्या पत्नीसही क्वचित् वेळीं ओळखे. इंदुमतीला तो हडळच समजे व ती जवळ आली असतां तोंडावरून पांघरूण घेऊन अगदीं चुपचाप पडे. त्याचें पांघरूण वगैरे सरळ

करण्याकरितां इंदुमती जेव्हां त्याच्या अंगाला हात लावी, त्यावेळीं भ्रमिष्ट अजसेनास आतां आपणास ही पायाकडून खाणार, असें वाटे व त्याची अगदीं घाबरगुंडी उडे. असो.

दुपारची वेळ होती. इंदुमती आपल्या पतीला जेवायला घालून, त्याला पलंगावर निजवून मुद्दामच गेली होती. इंदुमती जवळ असतां अजसेन बहुतक सर्व कामें डोळे मिटूनच करी. अर्थात् इंदुमती गेली अशी जेव्हां पक्की खात्री झाली तेव्हां त्यानें आपले डोळे उघडले व तो भीतभीत पलंगावर उठून बसला. त्यानें एकवार इकडे तिकडे पाहून महालांत कोणी नाहीं. अशी आपली पक्की खातरी करून घेतली. त्याचा जीव खालीं पडला. तो किंचित् हंसून आपल्याशींच ह्मणाला, " गेली एकदाची पिडा ! मी तर ऐकलं होतं कीं, हडळी फार भयंकर असतात; पण ही तशी नाहीं कांहीं. ही लेकाची चांगली सुंदर आहे. पण मला तिनं अद्याप खाल्लं कसं नाहीं बरं ? उलट मला चांगलं चांगलं खायला घालते. ( थोडावेळ विचार करून ) समजलों रे समजलों ! मला ती चांगलं लठ्ठ करून मग खाणार असं दिसतं. असंच असलं पाहिजे. नाहीं तर उगीच कोण कुणाला खायला देणार ? अरेच्या ! एकंदरींत ही सुंदर हडळ मह्य लुची दिसते. खायला घालतांना कसं गोड गोड बोलते; पण आतां समजलों, मी तिच्या गोड बोलण्याचा मतलब ! लुची कुठली ! तिच्या गोड बोलण्यावर भुलून मी पुष्कळ खावं आणि लवकर लठ्ठ व्हावं, असं तिला वाटतं ! ह्मणूनच गोड गोड बोलते बरं कां ! ठीक आहे. आतां संध्याकाळीं ती जेवायला घेऊन येऊं द्या तर खरी ! एक शीतसुद्धां खाणार नाहीं ! कधीं खाईन आणि कधीं मुळींच खाणार नाहीं ह्मणजे मग पाहूं मी कसा लठ्ठ होतों तो ! ( दचकून कानोसा घेऊन ) आली-आली वाटतं ! निजा-निजा लवकर ! नाहींतर- " असें म्हणून स्वारी पांघरुण आपल्या सर्वांगास लपेटून घेऊन चुपचाप पडून राहिली; पण बराच वेळ झाला तरी महालांत कोणी आलें नाहीं तेव्हां स्वारीनें भीत भीत आपलें तोंड पांघरुणाच्या बाहेर काढलें व इकडे तिकडे पाहिलें. कोणी नाहीं अशी खात्री होतांच पुनः स्वारी उठून बसली व बडबडूं लागली, " नाहीं आली बरं कां ! मला नुसता भासच झाला. पण ती आज

लवकरच पुनः येईल. आज मी विशेष खाल्लं नाहीं, त्यामुळं पुनः ती कांहीं तरी निराळा पदार्थ घेऊन येईल. किती लुच्ची पण ! रोज लेकाची माझं हात पाय चाचपते ! मी खाण्यायोग्य लठ्ठ झालों कीं नाहीं. हेंच पहात असावी बरं कां ! पण आतां मीही दिवसेंदिवस रोड होण्याचा निश्चय करतों, म्हणजे पाहूं कशी खाते ती ? ( आठवून ) हो ! आरशांत पाहूं बरं मी किती लठ्ठ झालों आहे ? ( इकडे तिकडे पहात ) इथं कोणी नाहींना ? नाहीं, कोणी दिसत नाहीं. पण हीं भुतं म्हणे एखादे वेळीं दिसत नाहींत. जर कां ती सुंदर हडळ इथं गुप्त रूपानं असेल व जर तिनं माझं बोलणं ऐकलं असेल, तर लेकाची ती माझं नाक पकडून माझ्या तोंडांत अन्न कोंबेल. मग काय करावं बरं ? हो ! असंच–असंच करतों. आतां जें कांहीं बोलणार तें मनांतच बोलेन म्हणजे पाहूं मग कसं माझं बोलणं ती ऐकेल ? पण हीं भुतं मनांतलं तर जाणत नसतील ? छे बोवा, चहूंकडून पंचाईत. ( मान डोलावून ) हा ! हा ! ! मनांतसुद्धां बोलूं नये म्हणजे झालं. ( हंसून ) युक्ति पण युक्ति ! ( मिशीवर ताव देऊन ) पहातों आतां. त्या सुंदर हडळीला अशी चकवतों पण ! तीसुद्धां पहातच राहील; पण शिंची तीसुद्धां फार लुच्ची आहे. बोलतांना कसं पण ' प्राणनाथ ' ' प्राणनाथ ' म्हणते. आणि लेकाची म्हणते काय ' मी म्हणे तुमची इंदुमती आहे. ' लुच्ची कुठली ! तिला वाटतं अज्ञानं मी फसेन; पण मीही कांहीं इतका खुळा नाहीं ! मी तिचा कावा ओळखला ! माझी इंदुमती कांहीं अशी नाहीं ! ( आठवून ) खरंच ! माझी इंदुमती कुठं गेली बरं ? घरीं ती माझी वाट पहात असेल नाहीं ? ( मध्येंच संतापून ) ह्या शृगालदत्ताच्या नादानं मी स्मशानांत गेलों नसतों तर किती बरं होतं ? हरामखोर कुठला. लेकानं मला फसवून अमावास्येच्या दिवशीं रात्रीं त्या भयंकर जागीं नेलंन् ! म्हणे मंत्रसाधन केलं म्हणजे ती वश होईल ! मरो ती आणि तो शृगालदत्त ! अरे बापरे ! काय त्या रात्रीचा तो भयंकर अंधःकार ! त्या अंधःकाराकडे पाहून असं वाटत होतं, जसं कांहीं सगळ्या जगाला काळ्याभोर शाईंत बुचकळून काढलं आहे ! अरे राम ! वारंही पण भणभण करीत वहात होतं. आभाळ गडगडत होतं, त्याचा गडगडाट अद्याप माझ्या कानांत

घुमतो आहे! पण अखेरीस त्या पोराला त्यानं मारलंच! हो, त्यानंच मारलं; मला पक्कं आठवतं! मी नाहीं अगदीं खरोखरीं– मी नाहीं मारलं! मला पक्कं आठवतं! त्या चांडाळानंच त्या बालकाला मारलं! शृगालदत्त कुठें गेला बरं? कां त्यालाही एखाद्या भुतानं खाऊन टाकलं? त्या लेकाला खाऊन टाकलं असलं तर बरं झालं! एक ब्याद टळली! आणि त्या तिसऱ्याला– त्यालाही एखाद्या हडळीनं पकडलं असेल! आणि तो होता चांगला गलेलठ्ठ! त्याची तर तेव्हांच चटणी उडाली असेल! आतां माझं भरीत व्हायचं राहिलंय! (आठवून) मी काय करणार होतों बरं? हं हं आठवलं–आठवलं! आरशांत पहाणार होतों. चला त्या समोरल्या मोठ्या आरशांत पाहूं. आपण पहिल्यापेक्षां लठ्ठ झालों आहोंत कीं रोड? रोड असलों तर लठ्ठ व्हायचं नाहीं; पण जर का लठ्ठ झालों असलों तर मात्र आली पंचाईत!"

असें म्हणत स्वारी हलकेंच पलंगावरून उतरली व अगदीं धीरे धीरे आरशाजवळ जाऊन आपलें रूप पाहूं लागली. तोंड बडबडण्याचें काम करीतच होतें. "(आरशांत न्याहाळून) लेकाचं कांहीं समजतच नाहीं बरं कां! एकदां वाटतं लठ्ठ झालों, एकदां वाटतं आहों तसेच आहोंत, एकदां वाटतं थोडे जास्तच रोड झालों. छे, हे गाल– (गालाला हात लावून) फुगलेले दिसतात नाहीं? (भिऊन) मग लठ्ठ होत चाललों कीं काय? छे, आज रात्रीपासून आतां कमी अन्न खाल्लं पाहिजे. (पुनः न्याहाळून) पण नाहीं, हे दंड पहा अगदीं रोड दिसतात! छे, कांहीं समजत नाहीं. रोड कीं लठ्ठ! लठ्ठ कीं रोड? सगळाच घोटाळा. (थोडावेळ विचार करून) अरे तिच्या! तरी म्हटलं असं कां होतं? आतां समजलों. हा आरसा या हडळीन्या इथला आहे. तेव्हां त्यांत मला आपलं खरं रूप थोडच दिसणार! आपल्या मालकिणीप्रमाणं हाही लेकाचा लुच्चा आहे! बरं लेका– आतां मी तुझ्याकडं पहातच नाहीं."

असें म्हणत स्वारी पुनः पलंगाकडे वळली. पण स्वारीला जरा इकडे तिकडे हिंडावेंसें वाटलें म्हणून, तोंडानें कांहीं बडबडत स्वारी त्या महालांत इकडे तिकडे हिंडूं लागली. त्या अमावास्येपासून आजपर्यंत स्वारी अगदीं पलंगावर पडून होती. अर्थात् आपल्या महालांत

हिंडण्याचा हा त्याचा प्रथमच दिवस होता. इकडे तिकडे हिंडतांना आपल्या परिचयांतल्या सर्व चिजा जेव्हां त्यानें तेथें पाहिल्या, तेव्हां त्याच्या टाळक्यांत थोडा थोडा प्रकाश पडूं लागला. स्वारी आश्चर्यानें म्हणाली, " अरे ! हा तर माझ्या महालासारखा महाल दिसतो अगदीं तोच म्हटलं तरी चालेल. ही—ही तसबीर— माझ्या महालांतही अशीच एक तसबीर लावली होती. ही खुर्ची, हा कोच, हे खालचे गालिचे—छे, सर्व कांहीं अगदीं माझ्या महालांतील जिनसांप्रमाणं ! आश्चर्य आहे. ( इकडे तिकडे पाहून ) छे, अगदीं खात्रीनं मी आपल्या महालांतच आहे बरं कां ! पण इथें कुणी आणलं बरं ! कां त्या लुच्च्या हडळीनं मला फसवण्याकरितां माझ्या महालासारखा महाल तयार केला आहे, असंच वाटतं. महा लुच्ची बरं का ! "

इतक्यांत महालाचें दार हलकेंच उघडलें गेलें व इंदुमती एका हातांत कांहीं फळें व दुसऱ्या हातांत तीं कापण्याकरितां सुरी घेऊन आंत आली !

अजसेनानें तिला पाहिली मात्र. भीतीनें तो तियल्यातिथेंच थवकला व अगदीं अगदीं अस्फुट स्वरांत पुटपुटला, " आली शिंची ! अग आईग ! तिच्या त्या हातांत— काय सुरी ? अरे राम ! आज ती माझ्या अंगाचे थोडे तरी लचके तोडणारसं दिसतं ! असें म्हणून स्वारीनें डोळे मिटून धरले.

इंदुमती आंत आली. आपला पति हिंडूं फिरूं लागला हें पाहून त्या साध्वीला आनंद झाला. ती त्याच्याजवळ आली व सौम्य स्वरांत किंचित् हंसून म्हणाली, " आतां प्रकृति बरी दिसते ! "

तिची सौम्य मुद्रा पाहून अजसेनाची भीति जरा कमी झाली. तरी तो स्वगत पुटपुटला, " प्रकृति बरी दिसते, असं म्हणते नाहींका ? लुच्ची कुठली ! असं म्हणून म्हणून माझे लचके तोडून खाणार ! "

आपला पती आतां आपल्याशीं कांहीं तरी बोलेल, अशी इंदुमतीला किती तरी आशा होती; पण अजसेनानें डोळे मिटून धरलेले पहातांच तिला अत्यंत वाईट वाटलें. ती करुण वाणीनें त्यास उद्देशून म्हणाली, " प्राणनाथ, माझ्याशीं नाहीं कां बोलायचं ? अद्याप आपण मला नाहीं कां ओळखली ? "

अजसेन हलकेंच पुटपुटला, " तुला होय ! पुरती ओळखली बरं कां ! चांगलं खायला घालघालून मला लठ्ठ केलंन् आणि मला विचारीते, म्हणे माझ्याशीं नाहीं कां बोलायचं ! नाहीं बोलत जा. " असें पुटपुटून त्यानें किलकिल्या डोळ्यांनीं इंदुमतीकडे पाहिलें. त्याचें भय कमी होऊन त्यास थोडा थोडा धीर येत चालला. इंदुमतीनें त्याचें पुटपुटणें ऐकलें. तें ऐकून तिला किती वाईट वाटलें असेल याची कल्पनाच केली पाहिजे. तिचा दुःखावेग अनावर झाला. ती रडत रडत म्हणाली, " प्राणनाथ—प्राणनाथ, माझ्याकडे पहा तरी ! आपल्या इंदुलासुद्धां विसरला का ? "

अजसेनाला आणखी थोडें धैर्य आलें. तो स्वगतच बोलला, " लेकाच्या हडळीसुद्धां रडतात बरं कां ! पण लहानपणीं मी ऐकलं होतं कीं, भुतं, हडळी फार विलक्षण तऱ्हेनं रडतात आणि ओरडतात ! ही हडळ जशी सुंदर आहे, तशीच रडतेही पण कसं छान ! रड—अशीच मुळुमुळु रड बरं कां ! "

इंदुमतीच्यानें आतां राहवेना. तिनें आपल्या हातांतील वस्तु जवळच्या कोनावर ठेवल्या व धांवत जाऊन अजसेनाचे पाय धरले व रडत रडत म्हटलें, " प्राणनाथ. मी रडावं अशीच आपली इच्छा आहे का ? "

अजसेनानें आपले नेत्र पूर्णपणें उघडले. तशा भ्रमिष्ट स्थितींतही त्यास तो प्रकार पाहून चमत्कारिक वाटलें; तो किंचित् मागें सरून म्हणाला, " ही माझे पाय का पकडते ? मला आपल्या घरीं आणल्याबद्दल हिला वाईट वाटतंय् बरं का. हिला क्षमा करून आपण आपली सुटका करून घ्यावी. ( इंदुमतीस उद्देशून ) ए सुंदर हडळी ! ( भिऊन मागें सरत ) हडळी म्हटलं म्हणून रागावूं नकोस कांहीं. मी तुला क्षमा करतों पण — "

इंदुमती उठून उभी राहिली. तिनें आपले अश्रु पुसले. आपला पति अद्याप आपल्यास ओळखत नाहीं, हें पाहून तिला कितीतरी वाईट वाटलें; पण तिनें आपलें दुःख तसेंच दाबलें. शक्य तितके प्रयत्न करून आपली ओळख याला पटविली पाहिजे म्हणजे याची भीतीही कमी होईल व याचा भ्रमिष्टपणाही वाढणार नाहीं. असा विचार करून ती सौम्य मुद्रेनें त्याकडे पहात म्हणाली, " मी हडळ कां आहे ? "

अजसेन स्वगत पुटपुटला, "चोर तें चोर अन् शिरजोर! मलाच विचारते कीं, मी हडळ कां आहे? नाहींतर काय देवी आहेस? लुच्ची कुठली. (उघड) मला आपल्या घरीं पोंचवून दे—मग तूं हडळ आस कीं जखीण आस!"

"आपण मला पुरती ओळखली कां?" इंदुमतीनें प्रश्न केला.

"न ओळखायला काय झालं!" अजसेनानें तिच्याकडे बारकाईनें पहात म्हटलें.

"मग मी कोण सांगा बरं?"

"तूं होय! पण तूं रागावणार तर नाहींस."

"नाहीं रागावणार!"

"मग तूं कीं नाहीं—" अजसेन दबत दबत बोलला, "तुझी पदवी काय आहे, हें मला माहीत नाहीं, पण तुला हडळ म्हणतात—हडळ!"

इंदुमती आपल्या कर्माला हात लावून निराशेनें म्हणाली, "नशीब माझं!"

हें पाहून अजसेन स्वगत पुटपुटला. "ही आपल्या नशीबावर कां हात टाकते. हां समजलों! मी लठ्ठ झालों नाहींना! इतके दिवस खायला घातलं; पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं म्हणून हिला वाईट वाटतं बरं का! ठीक आहे. आपल्या इंदुला सांगून हिला मला खाऊं घालायला लागलेला खर्च देऊन टाकूं; पण हिनें मला सोडलं पाहिजे. नाहींतर पैसे घेऊनच्या घेऊन पुनः मला अडकवून ठेवायची! हो हडळीचा काय भरंवसा? (उघड) अग ए! एक काम करशील तर मी तुला चांगलं इनाम देईन."

"काय काम करूं?"

"तूं विनी मला माझ्या इंदुमतीकडे घेऊन चल."

अशा प्रकारच्या भ्रमिष्टपणांतही अजसेनास आपली आठवण आहे, हें पाहून इंदुमतीस आनंद झाला; पण तात्काळ अद्याप हा आपणास ओळखत नाहीं याचें तिला फार वाईट वाटलें. काय युक्ति करून यास आपली ओळख पटवावी याची तिला पंचाईत पडली. बराच वेळ तिनें विचार केला. अखेरीस तिला एक युक्ति सुचली. ती त्यास

म्हणाली, " आपल्या घरचा पत्ता मला सांगा म्हणजे मी तुमच्या इंदू-कडे तुम्हाला घेऊन चलते. "

अजसेनाच्या आनंदास पारावार राहिला नाहीं. तो हुरळून म्हणाला, " अगदीं खरं ! "

" अगदीं खरं ? " इंदुमती गंभीरपणें बोलली, " पण एक अट आहे. "

" ती कोणती ? " अजसेनानें किंचित् घाबरून विचारिलें, " एखादें मूल वगैरे मागूं नकोस हो ! तसं असेल तर साफ सांगतों मलाच खाऊन टाक ! एका मुलाला मारण्याची इच्छा केली तर तुझ्या तडा-क्यांत सांपडलों ! "

अकस्मात् इंदुमतीला एक कल्पना सुचली. आपल्या पतीनें बाल-हत्या केली असेल काय ? ही चिंता रात्रंदिवस तिला जाळीत होती. त्याबद्दल त्याला विचारून एकदां पक्की खात्री करून घ्यावी, असें तिला वाटलें. हा समयही अगदीं योग्य होता. अजसेन यावेळीं खरें सांगेल कीं नाहीं याची तिला मुळींच शंका नव्हती. काल्पनिक हडळीच्या कैदेतून सुटण्याकरितां त्यानें पाहिजे तें केलें असतें.

" मग तें मूल कुणी मारलं बरं ? " इंदुमतीनें गंभीरपणें विचारिलें, " अगदीं खरं-खरं सांगायचं बरं कां. "

" अगदीं खरं-खरं तें सांगतों. " अजसेनानें म्हटलें, " पण मग मला माझ्या इंदूकडे पोचवलं पाहिजे. "

" कबूल. " इंदुमती किंचित् स्मित करून बोलली.

" मग अगदीं खरं तें सांगतों. मी कांहीं तें मूल मारलं नाहीं. "

एखाद्या जन्मांधास जसे एकदम डोळे प्राप्त व्हावेत, तशीच इंदु-मतीची स्थिति झाली. आपला पती खोटें सांगत असेल, अशी शंका-सुद्धां तिला आली नाहीं. आणि अजसेनाच्या मनाची स्थितीच अशी होती कीं, तो खोटें बोलण्यास समर्थ नव्हता. तो जें कांहीं बोलत होता तें सर्व खरें होतें. हें कोणासही त्याच्या मुद्रेकडे पाहून सांगतां आलें असतें.

" मग तें कोणी मारलं बरं ? " इंदुमतीनें प्रश्न केला.

" त्या चांडाळानं-ज्यानं मला फसवलं-त्या शृगालदत्तानं ! "

" तें मूल कुणाचं होतं ? "

" मला माहीत नाहीं. अन्नेतनाला ( त्या गड्याचें नांव. त्याला द्रव्य देऊन अजसेनानें तें मूल आणविलें होतें. तोच त्या दिवशीं त्या मुलाला घेऊन स्मशानांतही गेला होता. ) कांहीं पैसे देऊन त्याच्या-कडून मी तें आणवलं होतं ! "

" याचं पाप आतां कुणाला लागेल ? " इंदुमतीनें त्याकडे तीक्ष्ण दृष्टीनें पहात विचारिलें.

" पण मी त्याला वांचवण्याचा शक्य तितका प्रयत्न केला होता. त्या दुष्टानं माझं ऐकलं नाहीं व मला ढकलून त्यानं त्याला मारलंन्. इतक्यांत तूं धांवत आलीस--बरं पण आतां मला पोचीव ना ! "

" पोचवतें; पण माझं एक काम केलं पाहिजे. मी मूल वगैरे मागत नाहीं. तुमच्याच हिताची एक गोष्ट सांगतें. विषकुंभ, शैलोदर यांच्या बिलकूल नादीं लागूं नका. मृणालदत्ताची पुनः कधींही भेट घेऊं नका."

" अगदीं--अगदीं नाहीं. पाहिजे तर वचन देतों. " अजसेन दना-वळीनें म्हणाला.

" पहा बरं. नीट ध्यानांत ठेवा. जर यांत थोडेसं चुकलांत तर पुनः मी तुम्हाला आपल्या इथं आणीन. "

" छे छे, मी मुळीं त्यांना आपल्या वाड्यांतच येऊं देणार नाहीं. " अजसेनानें मध्येंच म्हटलें, " पण काय ग हडळी ! त्या वाईट लोकांना तूं पकडून आणून झाडून कां टाकित नाहींस ? तो शैलोदर तर चांगला लठ्ठ आहे बघ. दोन चार दिवसांची तुला बेगमी--बरं पण मला पोच-वतेस ना ? "

" थांबा जरा. मी आपला बाहेर जाण्याचा पोषाख घालून येतें. " असें म्हणून इंदुमती दुसरीकडे गेली व काळी चंद्रकळा नेसून व आपलें सर्व अंग एका काळ्या वस्त्रानें लपेटून ती पुनः महालांत आली.

" पण तुमचे डोळे बांधले पाहिजेत. " इंदुमतीनें एक रुमाल पुढें करून म्हटलें.

" तें कशाला ? " अजसेनानें घाबरून विचारिलें.

" आपणाला इतर भुतं पाहून भय वाटेल. "

" मग--मग बांध तर ! " अजसेनानें उतावळीनें घाबरून म्हटलें. इंदुमतीनें त्याचे डोळे बांधले व त्याचा हात धरून ती त्यास इकडे

तिकडे हिंडवूं लागली. नंतर ती त्यास बाहेर घेऊन गेली. बराच वेळ तिनें वाड्यांतील बऱ्याच भागांत त्यास डोळे बांधूनच हिंडविलें, त्यामुळें अजसेनासही आपण कोठें तरी जात आहोंत असें वाटलें. अशा स्थितींत बराच वेळ गेला.

“ अजून नाहीं कां आलं घर ? ” अजसेनानें हलकेंच विचारिलें.

“ आलं, जवळ आलं. ” असें म्हणून तिनें एका ठिकाणीं त्यास बराच वेळ हिंडवलें व म्हटलें, “ सोडतें हं. हे पहा, तुम्ही तुमच्या वाड्यांतच आहांत. ” असें म्हणून तिनें त्याचे डोळे सोडले. अजसेनानें पाहिलें तों खरेंच. त्यास आपण आपल्या वाड्यांतील एका महालांत उभे आहोंत असें वाटलें. ज्या काल्पनिक हडळीनें त्यास त्या ठिकाणीं आणिलें होतें ती गेली कां आहे हें पहाण्याकरितां त्यानें मागें वळून पाहिलें तों ती तेथेंच होती. तो घाबरून आश्चर्यानें म्हणाला, “ अद्याप तूं आहेसच कां इथें ? ”

“ आलांत ना तुम्ही आपल्या वाड्यांत ? ” इंदुमतीनें त्याच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून विचारिलें, “ पहा, हा तुमचा कधीं कधीं बसण्याउठण्याचा महाल. या इकडे. ” असें म्हणून तिनें पुनः त्याला प्रत्येक स्थळ दाखवीत हिंडविलें. “ तुम्ही आपल्या वाड्यांत आलांत ना ? ”

“ होय आलों. पण आतां तूं केव्हां जाणार ? ” अजसेनानें घाबरून विचारिलें.

“ मीही जातेंच; पण हें पहा, आपले डोळे झांका. मी गेल्यावर डोळे उघडून आपल्या भोजनालयांत जा. तुमची इंदु तिथें वाट पहात बसली आहे. मागें मुळींच पाहूं नका. आणि पक्कें ध्यानांत ठेवा—विषकुंभ व शीलोदर यांच्यासारख्यांच्या नादीं लागूं नका. हं मिटा डोळे ! ”

तिच्या सांगण्याप्रमाणें त्यानें डोळे मिटतांच ती तेथून निघून गेली. त्यानंतर बऱ्याच वेळानें अजसेनानें आपले डोळे उघडले. पाठीमागें न पहाण्याबद्दल त्या काल्पनिक हडळीनें बजाविलें असल्यामुळें तो अगदीं समोर पाहून चालूं लागला; पण वारंवार त्याला आपल्या मागून ती येत तर नसेल, अशी शंका यावे. बराच वेळ तो मागें न पहातां चालत होता; पण अखेरीस त्याच्यानें राहवेना. भीत भीत त्यानें मागें पाहिलें तों कोणी नव्हतें. त्याला किती तरी आनंद झाला. आनंदानें

तो आपले हात चोळीत म्हणाला, "गेली–गेली डेंकाची वरं कां ! मला आपल्या वाड्यांत पोंचवून गेली. चांगली हडळ आहे. बरें आतां इंदुकडे जाऊं. ती आपली काळजी करीत असेल. आपल्याला पाहून तिला किती तरी आनंद होईल. ती माझ्यावर फार प्रेम करते." असें पुटपुटत स्वारी काल्पनिक हडळीच्या आज्ञेप्रमाणें भोजनालयांत गेली, तों जी इंदु त्याला इतके दिवस ओळखली गेली नाहीं व त्या इंदुच्या चातुर्यानेंच तो पुनः तिला भेटला, ती इंदु तेथें बसलेली आढळली. अजसेनास अपरिमित आनंद झाला. उड्या मारीतच तो तिच्याकडे धांवला. इंदुमतीही पुढें काय होणार व आपणही कसें वागलें पाहिजे हें पूर्ण जाणत होती. अजसेनानें तिला आपल्या हृदयाशीं घट्ट धरलें व तिला कुरवाळीत म्हटलें, "इंदु–इंदु, मी पुनः तुझ्याजवळ आलों."

आपल्या पतीनें अखेरीस आपणास ओळखलें हें पाहून कोमलहृदया इंदुमतीला किती तरी आनंद झाला. तिनेंही त्यास आलिंगन दिलें. लागलीच अजसेनानें आपली सर्व हकीगत सांगितली व इंदुमतीनेंही ती लक्षपूर्वक ऐकल्याचा बहाणा केला; पण तिनें त्यास मध्यंतरीं अगर नंतर कांहींच प्रश्न केला नाहीं. त्याची हकीगत संपतांच तिनें त्यास म्हटलें, "बरं चला. झालं तें ठीक झालं." असें म्हणून तिनें त्यास कांहीं खाण्याविषयीं विनंती केली. अजसेनालाही भूक लागलीच होती. तो पोट भरून जेवला. हो ! आतां त्याला हडळीची किंवा डाकण लग्न झाल्यावर ती आपणास खाईल याची भीति नव्हती. इंदुमतीच्या चातुर्यानें त्याच्या डोक्यांतील भुनासेनाविषयींचा भ्रमिष्टपणा पार नाहींसा झाला. पुनः त्याचा दिनक्रम नेहमींप्रमाणें चालू लागला. नवीनचंद्र व विमलचंद्र त्यास नेहमीं भेटण्यास येत. नवीनचंद्राकडे पाहिलें म्हणजे त्यास या गृहस्थाला आपण कोठें तरी पाहिलें आहे, असें वाटे. विमलचंद्राविषयीं त्यास एक साहजिक प्रेम उत्पन्न झालें होतें. इंदुमतीप्रमाणें तेही जवळ असले म्हणजे त्याचें डोकें ठीक असे व त्याचा काल आनंदांत जाई.

एके दिवशीं तिसऱ्या प्रहरीं विमलचंद्र अजसेनाकडे आला. बराच वेळ इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर विमलचंद्र अजसेनास

म्हणाला, " आपण संध्याकाळीं थोडें बागेंत वगैरे फिरून येऊ या. म्हणजे जरा बरें वाटेल. "

" आपणही आलें पाहिजे. " अजसेन म्हणाला, " माझ्याही मनांत तीच गोष्ट आली होती. मला आपल्या त्या बागेंत जाऊन बरेच दिवस झाले आहेत. आज माझ्या मनांत तिकडेच जाण्याचं होतं. चलत असल्यास चला. आपणाला तिथें एक मौज दाखवतों. "

विमलचंद्रालाही दुसरें कांहीं काम नसल्यामुळें त्यानें चलण्याचें कबूल केलें. लागलींच दोघेही गाडींत बसून बाहेर निघाले. थोड्या वेळानें ते त्या बागेंत जाऊन पोहोंचले. बाग लहानच होती. त्यांत एक टुमदार घर बांधलें होतें. बागेंत एक म्हातारा माळी काम करीत होता. अजसेनाची गाडी पहातांच त्यानें धांवत येऊन मुजरा केला.

" सर्व कांहीं ठीक आहे रे ? " अजसेनानें विचारिलें, " मथुरा कुठें आहे ? "

इतक्यांत एक वृद्ध बाई तेथें आली. अजसेनानें तिच्याकडे पाहून म्हटलें, " कसं काय मथुराबाई, सर्व ठीक आहे ? "

" ठीकच आहे ! " मथुरा विमलचंद्राकडे साशंक पहात म्हणाली, " आपल्या मागं मृगालदत्त एकदां येथें आले होते. "

" मग घेऊन गेला कीं काय ? " अजसेनानें घाबरून विचारिलें.

" नाहीं. त्यांचा तोच विचार होता; पण मीं नाकारलं. असेरीस ते गेले. "

" बरं काय करीत आहे ? " अजसेनानें सांकेतिक स्वरांत प्रश्न केला. मथुरेनें एकवार विमलचंद्राकडे पाहिलें. ती घोटाळली. विमलचंद्रासही हा काय घोटाळा आहे हें समजेना. अजसेन मध्येंच बोलला, " कांहीं हरकत नाहीं. हे आपल्यापैकींच आहेत. चल घेऊन. "

म्हातारी मथुरा पुढें निघाली. तिघेही त्या घरांत आले. म्हातारीनें कुलूप काढलें व ती बाजूला झाली.

" या -- " अजसेनानें विमलचंद्राचा हात धरून म्हटलें, " आपल्यास एक फूल दाखवितों. " असें म्हणत त्यानें दार उघडलें. दोघेही आंत शिरले. आंत चांगला शृंगारलेला महाल होता. तेथें

एका खुर्चीवर एक तरुणी बसली होती. दाराच्या आवाजानें ती उठून उभी राहिली. तिनें वर पाहिलें. ती चकित झाली.

" हायरे सौंदर्य ! " विमलचंद्र त्या तरुणीकडे पहात मोहित होऊन पुटपुटला.

" आहेना सौंदर्य ? " अजसेनानें विचारिलें.

ती तरुणी दुसरें कोणी नसून कमलिनी होती, एवढेंच येथें सुचवितों.

---

## प्रकरण सविसावें.

# आनंददुर्गांत.

कथानकांतील इतर पात्रांची कथा सांगतां सांगतां आम्ही बरेच पुढें आलों, व त्यामुळें आमचें एका अत्यंत महत्वाच्या पात्राकडे अगदींच दुर्लक्ष्य झालें. तेव्हां प्रथम तिकडे वळणें अवश्य आहे. सहासात महिन्यापूर्वी राक्षसनाथाला बंधयुक्त करून वसंतदुर्गावर नेण्यांत आलें होतें व तेथें धर्मचंद्रानें त्यास कांहीं सदुपदेश करून तात्काल बंधमुक्तहि केलें होतें, इत्यादि गोष्टी वाचकांच्या स्मरणांत असतीलच. त्याप्रमाणें त्याच्या पश्चात् कुमुदिनी व बकुळी या दोघीही एकाएकीं नाहींशा झाल्या व त्याजागीं कमलिनी कशी आली व त्यामुळें बकुळीच्या आईनें ' हडळ हडळ ' म्हणून किल्ल्यावर कसा गोंधळ उडवून दिला इत्यादि वाचलेला कथाभागही ते विसरले नसतील. तेव्हां या सहा-सात महिन्यांत आनंददुर्गावर काय काय गोष्टी घडल्या आहेत तें आपण पाहूं म्हणजे पुढील कथानकाचें सूत्र समजण्यास ठीक पडेल.

धर्मचंद्रासारख्या एका यःकश्चित् मनुष्यानें आपल्यासारख्या बलाढ्य मनुष्यास कैद करून वसंतदुर्गांत न्यावें ही गोष्ट राक्षसनाथाच्या मनाला फारच झोंबली; पण आपणास कसें बंधयुक्त केलें, याचें त्याला एक मोठें कोडेंच पडलें होतें. आणि तें कोडें त्यास सहज सुटणें शक्य

नव्हतें. त्या दिवशीं कुमुदिनीला विचार करण्याकरितां आठ दिवसांची मुदत देऊन राक्षसनाथ त्या महालांतुन बाहेर पडला; पण तो बाहेर पडतांच त्याला एकप्रकारची गुंगी आल्यासारखें वाटूं लागलें. क्षणांत त्याच्या सर्व शक्ति गलित झाल्या व त्यास आपणास कोणी तरी बांधून कोठें तरी घेऊन जात आहे, असें वाटलें. पण त्याला बांधणारें अगर त्रास देणारें मनुष्य त्यास दिसेना. त्याला आश्चर्य वाटलें. त्यानें सुटण्याकरितां पुष्कळ धडपड केली; पण व्यर्थ. मग मात्र त्याला फारच भीति वाटूं लागली. त्यानें ओरडून नोकरांना हाक मारण्याचा प्रयत्न केला; पण त्याच्या तोंडून शब्द उमटेना! त्याच्या आसपास त्यास कोणी दिसत नव्हतें; पण त्याच्या शरीरावर एक अमानुष शक्ति काम करीत होती. एवढा धाडसी व बलवान् राक्षसनाथ खरा; पण तोसुद्धां घाबरून बेशुद्ध झाला! ज्यावेळीं तो पुनः शुद्धीवर आला, त्यावेळीं त्यानें स्वतःस चांगल्या मजबूत दोरांनीं एका खांबाला बांधलेलें पाहिलें. समोरच नवीनचंद्र इकडे तिकडे फिरत होता. अशी स्थिति पहातांच राक्षसनाथ मनांत जळून भस्म झाला! क्रोधामुळें त्याच्या तोंडून एक शब्दही उमटेना. पण स्वतःचेच दांत ओंठ खाण्यापलीकडे त्याच्या हातीं कांहीं नव्हतें. अशाप्रकारें तो चारपांच दिवस सारखा कठोर कैदेत होता. पुढें त्यास वसंतदुर्गावर नेण्यांत आलें व तेथें गेल्यावर थोड्याच वेळानें धर्मचंद्रानें त्याची मुक्तता करून त्यास जाण्यास सांगितलें. राक्षसनाथ घोड्यावर बसून आनंददुर्गाकडे वळला. या घडलेल्या अपमानाचा योग्य मोबदला घेतल्याशिवाय राक्षसनाथाचें मन शांत होणार नव्हतें. वसंतदुर्गातून बाहेर पडतांच त्यानें आपल्या अपमानास कारणीभूत झालेल्या प्रत्येक लहान मोठ्या व्यक्तीचीं पाळेंमुळें खणून काढण्याची दृढ प्रतिज्ञा केली! क्रोधानें संतप्त झालेल्या मनानें आपल्या घोड्याला पिटाळीत तो आनंददुर्गात येऊन पोहोंचला!

दुर्गाच्या दरवाजांत येऊन पोहोंचतांच सर्व पहारेकऱ्यांचीं तोंडें दुःखानें काळीं पडलेलीं राक्षसनाथानें पाहिलीं. तो मनांत चरकला. त्यानें कठोर आवाजांत एका पहारेकऱ्याला विचारिलें, "कपाळकरंट्यांनो! कां, रडतां कां?"

राक्षसनाथ आपल्या नोकरांचाकरांशीं हमेशा अशाच सभ्यतेनें वागत असे. त्यामुळें प्रत्येक नोकराचें मन त्याच्याविषयीं कलुषित झालें होतें; पण पोटापुढें बिचारे सर्व अपमान सहन करीत. त्याचा वरील कुफमी प्रश्न ऐकतांच सर्व शिपायांना अत्यंत राग आला; पण करतात काय ? बिचारे चुप्प बसले.

" वाचा बंद झाली कारे ? कां प्राण निघून गेला ? " राक्षसनाथानें पुनः दरडावलें.

यावर एक म्हातारा शिपाई भीत भीत म्हणाला, " बालसिंह– "

" हं काय ?–बालसिंह–मेला कीं काय ? " राक्षसनाथानें मध्येंच विचारिलें.

" बालसिंह निसटला ! " शिपायानें भीत भीत उत्तर दिलें.

" बालसिंह निसटला ! काय बालसिंह निसटला ? गाढवांनो ! बोला, बालसिंह निसटला ! " राक्षसनाथ चवताळून म्हणाला, " त्यावेळीं तुमचे हात कुठें गेले होते ? बोला, माझ्यापुढें येऊन असे शब्द सांगायला तुम्हाला लाज नाहीं वाटत ! थांबा, या अपराधाबद्दल तुम्हाला योग्य शिक्षा झालीच पाहिजे ! " असें म्हणत त्यानें घोड्याखालीं उडी मारिली व ज्या वृद्धानें त्यास बालसिंह निसटल्याचें सांगितलें होतें, त्याच्या कान-शिलांत मुस्कटांत दिली ! बिचारा वृद्ध शिपाई धाडदिशीं कोलमडून खालीं पडला ! सर्व शिपाई भीतीनें तटस्थ झाले. राक्षसनाथाला त्या वृद्धाची मुळींच दया आली नाहीं. त्यानें त्यास पुनः लाथ मारून म्हटलें, " पुनः सांग ! थेरड्या ! बालसिंह निसटला ? "

वृद्धाचा राग अनावर झाला ! त्यानें धडपडत उठून आपल्या कांपत असलेल्या हातानें राक्षसनाथाच्या मुस्कटांत देऊन म्हटलें, " क्रूरा ! नरपशो ! होय, पुनः ऐक ! बालसिंह निसटला व थोड्याच दिवसांत आतां तो तुझा पुरा–पुरा सूड उगवील ! "

एका यःकश्चित् शिपायानें इतर सर्व शिपायांच्या समोर आपल्या तोंडांत थापी, हें राक्षसनाथास कधींतरी सहन होईल ? त्यानें तात्काळ एका शिपायाच्या हातांतील नागवी तलवार हिसकावून घेतली व त्या वृद्ध शिपायाचें शिरच्छेदन केलें ! नंतर त्यानें त्या मृत देहावर थुंकून इतरांस उद्देशून म्हटलें, ' पहा. इकडे पहा ! माझा अपमान करणा-

राचा असला शेवट होतो ! " असें म्हणून त्यानें ती तलवार त्या शिपा-याकडे फेकून दिली व त्या मृत देहास पुनः लाथ मारून तो तेथून चालता झाला. नंतर तो कैदखान्याकडे गेला व बाळसिंह निसटला किंवा काय याची त्यानें चवकशी केली, तों खरेंच. ज्यादिवशीं त्यास बंधन करून नेलें होतें, त्याच दिवशीं बाळसिंह नाहींसा झाल्याचें त्यास समजलें. मात्र इतक्या बंदोबस्तानें ठेवलेला कैदी कसा निसटला याचें त्यास नवल वाटलें; पण तो कसा निसटला हें कोणासच समजलें नव्हतें. अखेरीस आपल्या कर्मावर हात मारून तो आपल्या महालांत गेला. पण तेथेंही त्याच्या भडकलेल्या आगींत तेल टाकण्यास बकुळीची आई तयार होतीच !

महालांत पाय ठेवतांच राक्षसनाथानें कुब्जेस—बकुळीच्या आईचें नांव—दुःखयुक्त मुद्रेनें बसलेली पाहिलें. तीही राक्षसनाथास पहातांच भीत भीत पुढें आली. तें पाहून राक्षसनाथास जास्तच संताप आला. तो कर्कश स्वरांत ओरडला, " हं सटवे ! तूं कां रडतेस ? "

कुब्जेनें आपल्या शोकाचें कारण—अर्थात् कुमुदिनी व बकुळी नाहींशा झाल्याचें—सांगितलें. राक्षसनाथावर वज्रपातच झाला ! वसंतदुर्गांतून बाहेर पडतांना राक्षसनाथानें धर्मचंद्राचा अन्य तऱ्हेनें सूड उगविण्याची केवढी भयंकर प्रतिज्ञा केली होती; पण हाय ! ती सर्वस्वीं निष्फळ झाली !

" * * ! हें खरं सांगतेस ? " राक्षसनाथानें करकरा दांत खात विचारिलें. बिचारी कुब्जा थर थर कांपूं लागली ! तिच्या तोंडून शब्द उमटेना ! राक्षसनाथानें पुनः त्याच स्वरांत तोच प्रश्न केला.

" होय ! " कुब्जा कांपत कांपत म्हणाली, " चूक झाली खरी. क्षमा—"

" क्षमा ? " राक्षसनाथ गर्जना करीत तिचें मानगूट पकडून म्हणाला, " * * ! तुला कल्पना नाहीं आहे, तूं केवढा भयंकर अपराध केला आहेस तो ? अगे दुष्टे ! माझ्या सर्व—सर्व अपमानाचा सूड त्या कारटीचे राईराईएवढे तुकडे करून उगविणार होतों ! एवढेंच नव्हे, तर तेच तुकडे एका पेटींत भरून ती पेटी त्या माझ्या लाडक्या—त्या—त्या नराधमाच्या—नजर करणार होतों; पण हाय ! + + ! तुझ्या—तुझ्या

हलगर्जीपणामुळें माझ्या सर्व आशा-सर्व प्रतिज्ञा नाहींशा झाल्या ! बोल ! मला तुला कधींतरी क्षमा करतां येईल काय ? चुप ! अगदीं बोलूं नको ! त्या दुष्टाला आपल्या कारटीचे असंख्यात तुकडे पाहून होणारें दुःख पाहण्याचा माझा आनंद तूंच-तूंच नष्ट केलास !" असें म्हणत त्या राक्षसानें कुब्जेला गदगदा हलविलें. बिचारी कुब्जा ! तिचीं हाडेंनहाडें खिळखिळीं झालीं ! तो तिचा कान पिळून पुढें म्हणाला- ओरडला, " बोल ! तुझा अपराध क्षमा करण्यासारखा आहे ? "

राक्षसनाथानें कुब्जेचें सतीत्व नष्ट केल्यापासून ती त्याच्या प्रत्येक कृष्णकृत्यांत त्याची पूर्ण मदतगार असे. राक्षसनाथ तिला अगदीं कस्पटाप्रमाणें मानी; तरी आजपावेतों कुब्जेस त्याचा कधींही राग आला नव्हता, पण आज राक्षसनाथानें तिच्याशीं जें वर्तन केलें, त्यामुळें तिला असह्य त्रास झाला व ती क्रोधानें संतप्त झाली ! यापूर्वी तिला राक्षसनाथाची एकप्रकारची भीति वाटत असे; पण आज तिची सर्व भीति नष्ट झाली. याला एक कारण होतें. आजच्या गोष्टींत खरें पाहिलें तर तिचा कांहींच दोष नव्हता; पण राक्षसनाथास त्याचें काय होय ! कुब्जा म्हणजे त्याला आपल्या हातांतील एक खेळणें वाटे; पण आज कुब्जेनें आपलें उग्र स्वरूप प्रगट केलें. तिनें त्याच्या दंडाला कडकडून चावा घेतला. तेव्हां लागलींच राक्षसनाथानें तिला सोडली ! ती दूर जाऊन उभी राहिली व म्हणाली, " खबरदार ! एक पाऊल पुढें टाकशील तर ! चांडाळा ! तुझ्याकरितां मीं काय अनन्वित कृत्यें केलीं याची आठवण विसरलास ? !"

तिचें तें उग्र स्वरूप पाहतांच राक्षसनाथ प्रथमदर्शनीं दचकलाच; पण तो महा धूर्त होता. यावेळीं आपण भ्याल्याचें दर्शविल्यास ही जास्तच शेफारण्याचा संभव आहे, असें त्यास वाटलें. त्यानें आपल्या दंडास चोळीत म्हटलें, " कां ? फार शेफारलीस ? "

कुब्जाही मनुष्यच होती. आज तिचा स्वाभिमान जागृत झाला होता ती त्याच्या क्रोधास अगर दरडावण्यास भीक घालणारी नव्हती. आज तिच्या हृदयांत पूर्ण प्रकाश पडला होता. ज्याच्याकरितां आपण सतीपदापासून भ्रष्ट झालों ज्याच्या सांगण्यावरून आपण नानाप्रकारचीं दुष्कृत्यें केलीं. ज्याच्या विषयसौख्यार्थ आपण आपला देह विकला,

त्यानेंच आपणास एखाद्या कस्पटाप्रमाणें मानून आपल्याशीं असह्य वर्तन करावें व आपणासच दरडवावें हें केवढें आश्चर्य ! एकंदरींत मनुष्य सच्चरितापासून भ्रष्ट झाल्यानें अत्यंत दुर्जनही त्याचा मान ठेवीत नाहीं, हें तत्त्व तिला पूर्णपणें समजलें. आणि त्याचमुळें राक्षसनाथ आपणास पाहिजे तसा त्रास देईल तर त्याचा प्रतिकार करावयाचा असा तिनें पूर्ण निश्चय केला.

तिनें आपला ओंठ चावून उत्तर दिलें, "एखाद्या लहान पोराला असं जाऊन दरडाव ! समजलास ! जिला तुझीं प्रत्येक वाईट कामं माहीत आहेत तिच्यापुढें तुझं कांहीं चालणार नाहीं."

वरील उत्तर ऐकतांच राक्षसनाथाच्या अंगाची लाही लाही झाली ! कुब्जेकडून असें उत्तर येईल, ही त्यास स्वप्नांतसुद्धां कल्पना नव्हती. त्यानें आपला ओंठ चावीत विचारिलें, "तूं काय करशील ?"

"आणि तूं तरी मला असं भिववून काय करशील ?" कुब्जेनें मध्येंच विचारिलें. आणि यावर कांहीं आतिप्रसंग घडल्यास त्याचा पूर्ण प्रतिकार करण्याच्या तयारीनें ती उभी राहिली.

"दाखवूं का काय करीन तें ?" असें म्हणत त्यानें धांवत जाऊन तिचें नरडें पकडलें.

"खबरदार मला त्रास दिलास तर !" कुब्जा धडपड करीत त्याच्या हातांतून सुटण्याकरितां म्हणाली, "उद्यां सगळ्या जगाला राक्षसनाथ कोण हें–"

"बोल–बोल !" असें म्हणत त्या नरराक्षसानें तिचें नरडें जोरानें दाबलें.

"बे ऽ ऽ !" कुब्जेच्या तोंडून अखेरचा शब्द बाहेर पडला ! कुब्जा या जगांतून नाहींशी झाली !

क्रोधावेशांत राक्षसनाथ कितीवेळ तरी तिचें–असें म्हणण्यापेक्षां त्या शवाचें म्हटलें असतां विशेष शोभेल–नरडें दाबीत होता. जेव्हां कांहीं हालचाल दिसेना, तेव्हां राक्षसनाथानें तिच्याकडे पाहिलें ! ती गतप्राण झालेली त्यास दिसली ! क्षणभरच त्याचें हृदय कंपित झालें ! त्यानें त्या शवास खालीं टाकलें. बराच वेळ तो त्याकडे पहात राहिला ! नंतर त्यानें त्या महालांतील एक चोरदार उघडलें व तें शव उचलून

त्यांत नेऊन टाकलें! दुसरे दिवशीं नोकरांकडून तें दार विटा, मातीनें चिणून टाकण्यांत आलें! कुमुदिनी व बकुळी एकाएकीं गूढ तऱ्हेनें नाहींशा झाल्या असल्यामुळें कुब्जेचा खून कोणासच समजला नाहीं! हळूं हळूं राक्षसनाथास आपल्या पाठीमागें काय काय गोष्टी घडल्या तें समजलें. क्रोधातिरेकामुळें केलेल्या कुब्जेच्या खुनामुळें बरेच दिवस राक्षसनाथाचें डोकें अगदीं फिरून गेलें होतें! त्यास काय करूं नू काय न करूं असें झालें. अशाप्रकारें महिना दीड महिना लोटला.

दीड दोन महिने लोटल्यावर राक्षसनाथाचें मन जरा ताळ्यावर आलें व त्यानें दोन गोष्टी पार पाडण्याचा निश्चय केला. पहिली गोष्ट आपल्याला बंधन करून नेण्यास कारणीभूत झालेल्या व्यक्तींचा सूड घ्यावयाचा व दुसरी गोष्ट कुमुदिनी व बकुळी एकाएकीं कशा नाहींशा झाल्या याचा तपास करावयाचा. या दोन गोष्टी पार पाडण्याचा त्यानें निश्चय केला. पहिल्या गोष्टीवर त्यानें आपले विश्वासू हस्तक नेमिले व वारकाईनें शोध करण्यास प्रारंभ केला. या बाबतींतच त्यास दुसऱ्या गोष्टीचा थोडा विसर पडला!

आणखी दोन महिने लोटले! राक्षसनाथास किंवा त्याच्या हस्तकांस अद्याप ह्मणण्यासारखें यश आलें नव्हतें. याचविषयीं चिंता करीत राक्षसनाथ एके दिवशीं दुपारीं आपल्या एका महालांत बसला असतां एक नोकर आंत आला व ह्मणाला, " बाहेर एक मनुष्य आपली भेट घेऊं इच्छित आहे. "

" आंत बोलाव! " राक्षसनाथानें कठोर स्वरांत ह्मटलें. थोडयाच वेळांत नोकरानें एका मनुष्यास आंत आणून सोडलें.

" ओहो, हलाहल! काय बातमी? " राक्षसनाथानें आनंदित होऊन ह्मटलें.

" फत्ते! ज्यानें आपणास बंधन करून नेलें—"

" त्याचा शोध लागला? " राक्षसनाथानें मध्येंच विचारिलें.

" अलबत् " हलाहल ह्मणाला, " मी गेल्यावर काम फत्ते होत नाहीं ह्मणजे काय? "

" कोण तो? " राक्षसनाथानें आपला ओंठ चावून विचारिलें.

" तो मनुष्य? " हलाहल हलक्या स्वरांत ह्मणाला, " त्याचं नांव— विमलचंद्र! "

" विमलचंद्र ? " राक्षसनाथानें आश्चर्यानें विचारिलें, " कोण विमलचंद्र ? "

" आपल्याला माहित नाहीं ? " हलाहलानें किंचित् हंसून विचारिलें.

" हें नांवसुद्धां मीं आजच ऐकलें. "

हलाहलानें हलकेंच त्याच्या कानांत कांहीं सांगितलें !

काळोख्या रात्रीं एखाद्या पिशाचाला पाहून भित्रा मनुष्यसुद्धां इतका दचकणार नाहीं, इतका राक्षसनाथ हलाहलाचा कानमंत्र ऐकून दचकला ! बराच वेळ तो तटस्थ नजरेनें हलाहलाकडे पहात राहिला !

" मग आतां मी त्याला खास्रीनें जिवंत ठेवणार नाहीं ! " बऱ्याच वेळानें राक्षसनाथ त्रासून ह्मणाला. नंतर त्यानें विचारिलें, " सध्या तो कुठें आहे ? "

" कुठें आहे ? " हलाहल हलकेंच ह्मणाला, " उज्जयिनींत ! "

" उज्जयिनींत ? " राक्षसनाथ आश्चर्यानें ह्मणाला, " ठीक आहे. आजच त्यांना लिहितों ह्मणजे आठ दिवसांत त्याचा निकाल होईल ! "

" या गोष्टीचा पूर्ण विचार करा ! " हलाहल गंभीरपणें ह्मणाला, " उतावळीनें कदाचित् आपलेंच नुकसान होण्याचा संभव आहे. "

हलाहलाची ही गंभीरता पहातांच राक्षसनाथ दचकला ! तो त्याकडे पहात ह्मणाला, " विचार ? तुमच्या बोलण्याचा अर्थ मी समजलों नाहीं ! "

" माहित असूं द्या ! " हलाहलानें त्यास बजाविलें, " त्यास पिशाच साध्य आहे. "

" पिशाच ! " राक्षसनाथ धिक्कारपूर्वक ह्मणाला, " मूर्खांच्या दंतकथेला तूं भितोस ? मोठेंच आश्चर्य ! "

" मला वाटलें तें मीं सांगितलें ! "

" त्याला पिशाच साध्य आहे तर मी स्वतःच मुळीं महापिशाच आहे समजलास ! मी त्याचा निकाल केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाहीं. " असें ह्मणून राक्षसनाथ दुसरीकडे गेला. हलाहलही तेथून निघून गेला.

त्याच दिवशीं राक्षसनाथानें आपल्या उज्जयिनींतील हस्तकांस पत्र लिहून एका स्वारावरोबर पाठवून दिलें व मोठ्या उत्सुकतेनें तो

पत्रोत्तराची वाट पहात बसला. पण दोन महिने झाले तरी तो स्वार आला नाहीं व त्याच्या पत्राचें उत्तरही आलें नाहीं! राक्षसनाथ चकित झाला. त्यानें पुनः एक स्वार पाठविला. या गडबडींत त्यास कुमुदिनी व बकुळी कशा नाहींशा झाल्यां, याचा तपास करण्याचें स्मरणही झालें नाहीं.

अखेरीस दुसरा स्वार पत्रोत्तर घेऊन आला! पत्र वाचतांच राक्षसनाथानें आपल्या कपाळावर हात मारून घेतला व मोठ्या उद्वेगानें म्हटलें, "माझी सद्दी उलटली असें दिसतें! कुब्जा गेली, कुमुदिनी नाहींशी झाली, बालसिंह निसटला व शत्रु बळावत चालले. तरी पण कांहीं हरकत नाहीं. ज्या कारस्थानानें हें वैभव मिळविलें, त्याच कपटाच्या जोरावर मी आपलें हें वैभव सांभाळीन." असें ह्मणून त्यानें तें पत्र फाडून फेंकून दिलें.

वाचकांच्या जिज्ञासातृप्तीकरितां आह्मी तें पत्र जसेंच्या तसेंच खालीं देतों.

" मित्रवर!

आपली एकंदर हकीगत वाचून मनास मोठें वाईट वाटलें, तरी पण केव्हां केव्हां असे प्रसंग येणें शक्य आहे. याकरितां न घाबरतां आपण आपलें काम चालूं ठेवावें व प्राणांतींही मिळालेलें वैभव घालवूं नये! त्या करितां पाहिजेल तें करण्यास मुळींच मागें पुढें पाहूं नये. आपण आपली प्रतिज्ञा विसरलां नसालच. असो. आतां आपण ... विषयीं लिहिलेंत; पण आह्मी स्पष्ट व आपल्या हिताचें सांगतों कीं, असल्या भानगडींत चुकूनसुद्धां पडूं नका! त्याच्याशीं विरोध केल्यानें आपला सर्वस्वीं नाश होईल! मैत्री ठेवण्यांतच हित आहे. त्याच्याशीं विरोध करणें ह्मणजे त्याला खऱ्या गोष्टी सांगून जागें करणें आहे व जर कां त्याला मागच्या गोष्टी आठवल्या तर तो एका क्षणांत आपणा सर्वांचा नाश करील! त्यापेक्षां त्याच्याशीं सलोखा ठेवून त्याला खऱ्या गोष्टींची आठवण न होईल, असें करणें हेंच आपणास श्रेयस्कर आहे. असो. विशेष लिहिण्यासारखें कांहीं नाहीं. पुनः बजावतों, त्याला डवचूं नका!"

आपले सुहृद
विषकुंभ व शैलोदर."

वरील पत्र वाचल्यावर राक्षसनाथ निराश झाला असेल, हें सांगाव-यास नको आहे. अखेरीस कांहीं दिवसापुरता तो विचार त्यानें बाजूला ठेविला. अकस्मात् त्यास दुसऱ्या गोष्टीचा शोध करण्याची इच्छा झाली. नोकरांकडून त्यानें तो महाल—ज्यांत कुमुदिनीला ठेविली होती, तो—पाडविला! राक्षसनाथासही त्या दोन पुतळ्यांचा उलगडा इतके दिवस पडला नव्हता; आज महाल खोदतांच त्यास त्या पुतळ्यांची खुबी समजली व तें भुयार सांपडलें! कुमुदिनी व बकुळी कशा नाहींशा झाल्या, त्याचाही त्याला उलगडा झाला. राक्षसनाथानें स्वतः भुयारांत शिरून तें भुयार पाहिलें. तें त्या विछिन्न वाड्यांत येऊन पोचलें होतें. तो गुप्त मार्ग सांपडल्यामुळें राक्षसनाथास मागील पुष्कळच गोष्टींचा उलगडा पडला. त्यानें त्या पडक्या वाड्यांत जाऊन तो वाडाही सर्वत्र धुंडाळला; पण त्यास तेथें कोणीही आढळलें नाहीं!

मग तपस्विनी वगैरे मंडळी कोठें होती बरें?

---

## प्रकरण सत्ताविसावें.

# दया व माया.

आपलें नांव ऐकून हिला—कलेला—इतकें आश्चर्य कां वाटावें? याचें मायाराणीस मोठें नवल वाटलें व तिनें वारकाईनें कलेच्या तोंडाकडे पाहिलें.

"आतां ओळखलें?" म्हातारीनें हनुवटीवर हात ठेवून कलेकडे पहात विचारिलें, "आपलं नांव कला आहे नाहीं?"

मायाराणीचा हा प्रश्न ऐकतांच कलेची अगदीं खात्री झाली कीं, या वृद्ध स्त्रीला आपण ओळखतों आहों; पण कुठें याची तिला आठवण होईना. बराच वेळ तिनें मायाराणीकडे वारकाईनें पाहिलें. नंतर तिला ओळख पटली व ती एकदम त्या वृद्धेचा हात धरून म्हणाली, "हं आतां ओळखलं! दाई—"

म्हातारीनें तिला पुढें बोलूं दिलें नाहीं. तिनें कलेला आपल्या पोटाशीं धरलें.

कला आपले अश्रु पुसून पुढें म्हणाली, " लहानपणीं मी बाबांच्या-जवळ असतां तूं कधीं कधीं त्या झोंपडींत बाबांना व मला भेटायला येत होतीस नाहीं ? मला आतां अगदीं पक्कं आठवतं– माझे बाबा तुझे दूरचे नातेवाईक होते असं तूं मला एके दिवशीं सांगितलेलं आठवतं, होय ना ? बाबा वारलेले तुला समजलं असेल नाहीं ? "

" होय. " मायेनें आपले अश्रु पुसून म्हटलें.

" इतक्या दिवस तूं कुठें होतीस बरं ? " कलेनें प्रश्न केला.

" मी– " माया थोडा विचार करून म्हणाली, " अशीच दैवाच्या पाठीमागं हिंडत होतें. बाळ, तूं खुशाल आहेस ना ? " म्हातारीनें आपल्यासंबंधींचा विषय उडवून देण्याच्या हेतूनें म्हटलें.

" ईश्वराच्या कृपेनं व बाबांच्या अशीर्वादानं मी पूर्ण आनंदांत आहे; पण दाई, बाबांच्या मरणाच्या वेळीं तूं त्यांच्याजवळ होतीस ? त्यांची व तुझी अखेरची भेट झाली होती काय ? " कलेनें हुंदका दाबून विचारिलें.

" म्हणजे ? " मायाराणीनें आश्चर्यानें विचारिलें, " त्यावेळीं तूं कुठं होतीस ? "

" मी त्यावेळीं वसंतदुर्गावर होतें ! " कलेनें उत्तर दिलें, " ते वारल्यानंतर पांच सहा दिवसांनीं मला ते वारल्याचें समजलें ! शेवटचं दर्शनसुद्धां झालं नाहीं. "

" माझंसुद्धां असंच झालं. " माया म्हणाली. " बऱ्याच दिवसांनीं मी त्या ठिकाणीं गेलें तर त्याठिकाणीं मला तुमची झोंपडीसुद्धां आढळली नाहीं. शेजाऱ्यापाजाऱ्यांना विचारतां त्यांनीं बाबांच्या मरणाची हकीगत सांगितली. तुझ्यासंबंधानं विचारलं तर त्यांनीं आपणास कांहीं माहीत नसल्याचं सांगितलं. मला फार वाईट वाटलं ! नंतर आसपासच्या इतर खेडेगांवीं मीं तुझा पुष्कळ तपास केला पण पत्ता लागला नाहीं ! "

" बरं आतां तर तूं मला सोडून जाणार नाहींस ?" कलेनें प्रश्न केला.

" मला थोडंसं पाणी प्यायला दे पाहूं. " मायेनें मध्येंच म्हटलें.

कलेनें उठून तिला पाणी आणून दिलें. इतक्यांत नवीनचंद्र आला.

कलेनें तात्काल मायाराणीची हकीगत त्यास सांगितली. नवीनचंद्रासही अत्यानंद झाला. दोघांनींही मायेस आपल्याजवळ राहण्याविषयीं विनंति केली.

मायेनें गंभीरपणानें ह्मटलें, " तुह्मी दोघंही सुखांत असा. तुह्माला वाईट वाटूं देऊं नका, पण उद्यां सकाळीं मी येथून जाणारच. मला इथें राहतां येत नाहीं. "

" कां बरं ? " कलेनें किंचित् दुःखानें विचारलें.

" मी आतां ह्मातारी झालें ! " मायाराणी गंभीरपणें ह्मणाली, " मला आतांशा एकांत फार आवडतो. तरी पण मी केव्हां केव्हां तुला भेटायला येईन. "

" बरं तुझी मर्जी ! " कलेनें दुःखाचा सुस्कारा टाकून ह्मटलें.

त्या रात्रीं कलेला नीट झोंपसुद्धां आली नाहीं. मायेनें आपल्याजवळ रहावें अशी तिची इच्छा होती; पण मायेची तशी इच्छा नव्हती. प्रातःकाल होतांच तिनें आपलें सामान बांधलें व ती जाण्यास निघाली.

" रात्रीं ह्मटल्याप्रमाणें केव्हां केव्हां खरोखरच ये हो ! " असें म्हणून कलेनें मायाराणीला मोठ्या दुःखानें निरोप दिला. मायाराणी निघून गेली !

वरील गोष्टीला चार पांच दिवस लोटले. प्रथम दोन दिवस माया गेल्याबद्दल तिला वाईट वाटलें; पण पुढें कालानुरूप तिला त्या गोष्टीचा विसर पडत चालला ! आणि त्या गोष्टीचा विसर पडत जाण्याचें दुसरें एक कारण होतें. नवीनचन्द्रानें तिला कुमुदिनी, महाराजा धर्मचंद्र वगैरे मंडळी वसंतदुर्गाहून उज्जयिनीला लवकरच येणार असल्याचें सांगितलें होतें. कारण त्या दोघींचा विवाह झाल्यानंतर कला; आपल्या पतीसह उज्जयिनीस आली होती. कुमुदिनी नुक्तीच आपल्या पित्यास पुनः भेटल्यामुळें पुनः तिला तात्काल विमलचंद्राबरोबर उज्जयिनीस पाठविणें धर्मचंद्रास बरें वाटेना म्हणून त्यानें विमलचंद्रास सांगून आपल्या कन्येला पांच सहा महिने आपल्याजवळ ठेवण्याचें ठरविलें होतें. त्यामुळें कलेला कुमुदिनीस भेटून जवळ जवळ सहा महिने झाले होते. अर्थात् आपल्या प्रियकर भगिनीला भेटण्याचा लवकरच प्रसंग येणार, हें पाहून कलेला आनंद झाला असेल यांत नवल

नें काय ? पण वाचकांनो ! या गडबडींत ती कमलिनीला विसरली होती काय ? छे छे, कदापि काय, पण ज्यांना ज्यांना म्हणून कमलिनीचा परिचय होता, त्यांना त्यांना तिची पूर्ण आठवण होती. पण वसंतदुर्गांतून ती बाहेर पडल्यानंतर तिचें पुढें काय झालें, याचें कोणास कांहींच समजलें नाहीं. धर्मचंद्रानें तिचा शक्य तितका शोध केला पण दैवगती विचित्र ! त्यास कमलिनीचा शोध लागला नाहीं ! तिचें कांहीं बरें वाईट झालें असेंच समजून सर्वजण निराश झाले ! असो.

नेहमीप्रमाणें कळा व नवीनचंद्र दोघेंही आपल्या झोंपडीसमोर आम्रवृक्षाच्या छायेंत बोलत बसलीं होतीं. बोलण्याचा विषय कुमुदिनीच्या आगमनाविषयीं होता.

" तूं आपल्या मैत्रिणीस भेटण्याविषयीं इतकी उत्सुक आहेस—" नवीनचंद्र हंसत हंसत म्हणाला, " पण सांभाळ हो, तूं एका गरीब शेतकऱ्याची बायको आहेस हें ध्यानांत ठेव. "

" म्हणजे ? या बोलण्याचा अर्थ ? " कळेनें आश्चर्यानें पुसलें.

" माझ्या म्हणण्याचा मतलब असा कीं, कुमुदिनीशीं आतां तूं बेतानं वागलं पाहिजेस. ती इथल्या एका वरिष्ठ सरदाराची पत्नी झाली आहे. "

" म्हणून काय झालं ? " कळेनें हंसत म्हटलें, " पूर्वीचं प्रेम कां नाहींसं होईल ? "

" पूर्वीची गोष्टच निराळी होती. किती झालं तरी ती एका धनाढ्य सरदाराची बायको आहे. तिची भेट होण्याचीच पंचाईत. मग इतर गोष्टींची आशाच नको. तुला वाटतं कां कीं, कुमुदिनी पहिल्याप्रमाणंच तुझ्यावर प्रेम करीत असेल ? "

" आपल्यालाही कुमुदिनीचा स्वभाव माहीत आहेच. आपल्याला वाटतं कां कीं, ती आपल्याला विसरेल ? "

" त्याचा काय नियम सांगावा. संपत्तीचा मद येण्याला उशीर लागत नाहीं. " नवीनचंद्रानें म्हटलें.

" पण ही गोष्ट कुणाची ? ज्याच्याजवळ संपत्ति नाहीं, त्याला एकाएकीं ती भाग्यानं मिळाल्यास व तो हलक्या मनाचा असल्यास त्यास तसा गर्व वाटणं साहजिक आहे;पण कुमुदिनीची गोष्ट तशी नाहीं कांहीं. तीहि एका लहानशा राजाची कन्याच आहे. माझी अगदीं खात्री आहे कीं—"

" समजलें तुझें ह्मणणें. " नवीनचंद्र मध्येंच म्हणाला. " घटकाभर आपण असेंच समजूं कीं, कुमुदिनी आपणास विसरली नसेल. "

" पण घटकाभरच कां ?" कलेनें मध्येंच विचारिलें, " तिचा स्वभाव पालटणें कालत्रयीं शक्य नाहीं. "

" बरं बोवा ! तुझें ह्मणणेंच कबूल. ती आपणास विसरली नसेल, असेंच आपण धरून चालूं; पुढें ती इथें आल्यावर ती आपल्या इथें येईलच, त्यावेळीं तुझा हा महाल-( झोंपडीकडे बोट दाखवून ) पाहून तिला तुझा तिरस्कार वाटणार नाहीं कां ? आणि तुलाही त्याबद्दल वाईट वाटेल. "

" या दोन्ही गोष्टी मुळींच शक्य नाहींत. " कलेनें मध्येंच म्हटलें, " कुमुदिनी माझा काय ह्मणून तिरस्कार करील व मलाही त्याबद्दल काय म्हणून वाईट वाटेल ? मीं मागेंच कळवलं आहे कीं, मी झोंपडींत राहतें याबद्दल मला कधींही वाईट वाटत नाहीं ह्मणून. "

" पण ज्यावेळीं कुमुदिनी व तिची नोकरमंडळी इथें येतील, त्यावेळीं निदान आपल्या झोंपडीबद्दल तुला लाज तरी वाटेल ? " असें विचारून नवीनचंद्र उठून इकडे तिकडे फिरूं लागला.

याप्रमाणें आपल्या पत्नीला प्रश्न विचारण्यांत नवीनचंद्राचा विनोद करण्याशिवाय दुसरा कसलाही हेतु नव्हता. कलाही तें जाणत होती. ती हंसत हंसत उत्तरली, " पण माझा हा महालच थंडीवाऱ्यापासून माझं रक्षण करतो आहे आणि कदाचित् मला वाईट वाटलें असतेंही—"

" कदाचित् केव्हां ? " नवीनचंद्रानें मध्येंच विचारिलें.

" मी एकटी असतें तर. " कलेनें उत्तर दिलें.

" बरें समजा. कुमुदिनी इथें आली व तुझी अशी गरीबी पाहून—"

" जगांत गरीब कोण आहे हें मी पूर्वींच सांगितलं आहे बरं का. " कलेनें मध्येंच म्हटलें.

नवीनचंद्र हें ऐकून हंसला व पुढें ह्मणाला, " तिला तुझी कींव आली तर ती तुला आपल्याजवळ—आपल्या वाड्यांत रहाण्यास घेऊन जाईल मग तुला आनंद नाहीं का होणार ? हो, कुमुदिनी तुला सहज पासूं शकेल. "

" कुमुदिनी मला तर हें मुळींच म्हणणार नाहीं. आपणाला ह्मणेल कदाचित् "

" अहाग वेडे ! मला बी काय म्हणून म्हणेल? तूं एक तिची मैत्रीण आहेस. "

" ती नाहीं म्हणणार तर विमलचंद्र तर खास म्हणतील. कुमुदिनी जशी माझी मैत्रीण आहे, तसेच विमलचंद्रही पण इकडचे मित्र आहेत."

" अहाहा ! काय पण त्याची मैत्री ! " नवीनचंद्र मध्येंच बोलला, " गृहस्थ कधीं भेटायलासुद्धां येत नाहीं ! नाहीं म्हणायला आजसेनाळा आणलं त्याविषयीं आला होता आणि किती वेळ बसला तें तूं पाहिलेंसच."

इतक्यांत एक वृद्ध म्हातारी काखेंत कांहींसें घेऊन शेताच्या फाटकाजवळ आली. नवीनचंद्रानें तिच्याकडे पाहिलें व म्हटलें, " ही पहा दया आली. इंदुमतीकडून तुला कांहीं तरी निरोप आला आहे असें वाटतें. " असें म्हणत त्यानें शेताचें फाटक उघडलें. दया आंत आली. नवीनचंद्रानें तिला साधारण कुशल प्रश्न विचारून तेथून प्रयाण केलें. त्यानें आपला पोषाख वानला व तो शेताच्या बाहेर पडला. असो.

मनुष्याला या जगांत खरें सुख प्राप्त करून घेण्याला जे कांहीं सद्‌गुण लागतात त्यांत विनयशीलतेला मुख्य स्थान दिलें पाहिजे. अंगीं विनय असल्यानें दुष्टापेक्षां दुष्ट व नीचापेक्षां नीच मनुष्याला वळवितां येतें. नाहींतर श्रीमंतांच्या येथील नोकर चाकर मंडळी एखाद्या गरीबाच्या घरीं गेलीं म्हणजे किती सभ्यतेनें वागतात, याचा सर्वांना अनुभव असेलच. दयाही या नियमाला अपवाद नव्हती; पण कला अशी गोड स्वभावाची होती कीं, दयेची व तिची एकदोन वेळांच भेट झाली होती; पण तेवढ्या भेटीनेंच कलेनें दयेला आपलेंसें करून घेतलें होतें आणि याला म्हणजे तिनें विशेष कांहीं केलें होतें अशांतली गोष्ट नाहीं. फक्त विनय. कलेचा स्वभावच असा होता कीं, लहानापासून थोरापर्यंत ती प्रेमानें, आदरानें व विनयानें वागे त्यामुळें सर्वांनाच तिच्याविषयीं प्रेम वाटे. आणि त्यामुळेंच ती आनंदमूर्ति होती !

दया येतांच कलेनें तिला आदरपूर्वक बसविलें, व विनयानें तिच्याशीं बोलण्यास सुरुवात केली ती हंसत हंसत म्हणाली, " तुम्हाला पाहिलं कीं नाहीं म्हणजे मला माझ्या दाईची ( अर्थात् मायाराणीची ) आठवण होते बघा. अगदीं तुमच्यासारखीच ती आहे. मला तिची वारंवार आठवण होते.

" अन् माझी ? " दयेनें हंसून प्रश्न केला, " अन् माझीही कधीं होते कां ? "

हा प्रश्न ऐकून कला किंचित् लाजली. तिनें त्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून म्हटलें, " अर्जुनसेन बरे आहेत ? "

" हो. हें इंदुमतीनें तुला पत्र दिलं आहे त्यावरून तुला सर्व कळेल." असें म्हणून दयेनें आपल्या पदराखालून एक आटपसर बोचकें काढिलें व तें सोडून त्यांतून एक पत्र काढून कलेच्या हातांत दिलें. कलेनें तें पत्र उघडून वाचण्यास प्रारंभ केला.

" मलाही वाचून दाखीव. " दया जरा पुढें सरून पत्राकडे पहात म्हणाली, " तुझ्या मैत्रिणीनं तुला काय लिहिलं आहे, तें मला म्हातारीलाही कळूंदे. पण तुमचं कांहीं गुपित त्यांत नाहीं ना ? " दयेनें किंचित् हंसून विचारिलें.

कलाही किंचित् हंसली व ती तें पत्र मोठ्यानें वाचूं लागली.

" प्रिय भगिनी कले,

मीच जर तुझ्या भेटीला येऊं शकलें असतें, तर मला किती आनंद झाला असता म्हणून सांगूं; पण काय करूं ? मी कां येऊं शकलें नाहीं हें तुला लिहायला कां पाहिजे ? खरंच कले, तूं स्वतः येऊन नाहीं कां भेटणार ? अगदीं मनापासून सांगतें तूं एकवार तरी इथं येऊन दर्शन देच. मी आलें नाहीं म्हणून तूं रागावूं नकोस. मला क्षमा कर. पण हें मी तुला सांगायला नको आहे. खरंच कले, तूं एक सौख्यमूर्ति आहेस. एकवार तुला कडकडून भेटावं, तुझं तें आनंदी मुख पहावं अशी माझी फार फार इच्छा आहे. ती तूं नाहीं कां पूर्ण करणार ? कले, माझी एक विनंति तूं नाहीं कां मान्य करणार ? तूं त्या झोंपडींत कां बरें राहतेस ? माझ्याजवळ रहायला तुला संकोच कां वाटतो ? अगदीं खरं सांगतें कले, तूं झोंपडींत राहते आहेस ही गोष्ट मला वारंवार खात असते. तुझ्या शरीरावरून तूं कांहीं काबाडकष्ट करणारी एखादी दासी आहेस, असं वाटत नाहीं. खरंच कले, अगदीं खरं सांग. तूं खरोखरच गरीब आहेस कां ? आपल्या भगिनीला तूं आपली खरी हकीगत नाहीं कां सांगणार ? जगांत जिव्हाळ्याचीं माणसं कशाला हवीं असतात बरं ? पुनः पुनः कले, मी हात जोडून विनंति करतें कीं, ज्या योगानें तूं सुखी होशील तें करण्यास

मी कधींही मागं येणार नाहीं. मग तूं माझ्याजवळ येऊन नाहीं कां राहणार ? मर्जी तुझी ! दया सर्व सांगेलच. पण तूं एकवार जरूर येच.

इंदुमती. ”

पत्र लिहितांना त्या पत्रावर इंदुमतीचे अश्रु पडलेले दिसत होते. त्याच अश्रूंना कलेचे अश्रु जाऊन मिळाले ! दयाही तें पत्र ऐकून विरघळली !

कलेनें पत्र वाचून झाल्यावर त्याची घडी केली व ती दयेकडे पाहूं लागली.

दया थोडा वेळ स्तब्ध बसली व नंतर तिनें आपलें बोचकें उलगडलें. त्यांतून ती हळुं हळूं एक एक जिन्नस काढूं लागली.

एक उत्तम गर्द रेशमी लुगडें, एका उंची खणाची चोळी, सोन्याचे दागिने व इतरही मौल्यवान् हिऱ्यामोत्यांचीं भूषणें इत्यादि किंमतीच्या जिनसा दयेनें त्या बोचक्यांतून काढून कलेपुढें ठेवल्या. कला आश्चर्यानें दयेकडे पाहूं लागली.

दया गंभीरपणें तिला ह्मणाली, “ इंदूनें ही तुला भेट पाठविली आहे. तुझे तिच्यावर जे उपकार झाले आहेत, ते फेडण्याकरितां तिनें हे जिन्नस दिले आहेत, असं तूं समजूं नकोस; तिनं आपल्या सहज पाठविल्या आहेत. ” असें ह्मणून दया कलेकडे पाहूं लागली. या जिनसा आपणास मिळणार हें पाहून कलेस मोठा आनंद होईल, अशी दयेनें वाड्यांतून बाहेर पडतांना कल्पना केली होती; पण ही तिची कल्पना खोटी ठरली.

कला गंभीरपणानें तिला ह्मणाली, “ कोणत्याही हेतूनें कां होईना, इंदुमतीनं हे जिन्नस मला पाठविले, असूंदे; पण मला ते नकोत. ”

“ नकोत ? कां ! ” म्हातारी आश्चर्यानें ह्मणाली, “ अहाग वेडे ! ते पहा तरी किती किंमतीचे आहेत ते– जवळ जवळ दहा हजार– ”

कलेला दयेची कींव आली. ती म्हणाली, “ पण मला हे करायचे काय ? मला हे शोभणार नाहींत. ”

‘ वेडी नाहीं तर ! ” दया तिला धिक्कारून म्हणाली, “ एकदां अंगावर घालून तर पहा कशी राजाची राणी दिसशील. ” असें ह्मणून वृद्धेनें स्वतः कलेला दागिने घालण्यास सुरवात केली.

" पण मी राजाची राणी नाहींना ? " कलेनें आपला हात सोडवून हंसत म्हटलें, " मी एका गरीब शेतकऱ्याची बायको आहें.

" म्हणूनच म्हणतें. तूं हे जिन्नस घे. म्हणजे श्रीमंत होशील. " दयेनें ते सर्व जिन्नस तिच्यापुढें करीत म्हटलें.

तें पाहून कलेला फार हंसूं आलें;पण तिनें तें तसेंच दाबलें व गंभीरपणानें म्हटलें, " पुष्कळ-पुष्कळ कारणांनीं मी ते घेत नाहीं. मला ते घेतां येत नाहींत. जा. तुम्ही ते परत घेऊन जा आणि इंदुमतीला सांगा कीं. मला क्षमा कर. " असें म्हणून कलेनें ते सर्व जिन्नस बोचक्यांत बांधण्यास सुरवात केली.

तें पाहून दयेला वाटलें कीं, कदाचित् आतां ती बोचकें बांधून झोंपडींत नेऊन ठेवून देईल. कारण तिनें असे प्रकार-प्रथम 'नाहीं-नाहीं' म्हणून पुनः जिनसा घेण्यांत आलेले प्रकार-पुष्कळ पाहिले होते. तेव्हां तिनें कलेविषयींहि तीच कल्पना केली असल्यास नवल नाहीं; पण हीसुद्धां तिची कल्पना चुकीची ठरली. तें बोचकें बांधुन कलेनें तिच्यापुढें ठेविलें.

" मग तूं खरंच कां नाहीं घेत ? " म्हातारीनें किंचित् रागानें विचारिलें.

" नाहीं. ते मला नकोत. " कलेनें निश्चयानें म्हटलें.

दयेला बराच राग आला. ती स्वगत म्हणाली, " म्हणतात ना देव देतो आणि कर्म नेतं तें असंच ! दळभद्री कुठली ! " पण कला तिच्या या रागाला भीक घालणारी नव्हती. दया जाण्याच्या तयारीनें उठली. तिनें विचारिलें, " मग मी इंदुला काय निरोप सांगूं ? "

कलेनें योग्य तो निरोप सांगितला. दया तेथुन निघुन गेली. ती गेल्यावर किंचित्काल कलेला वृद्ध दयेला नाराज केल्याबद्दल वाईट वाटलें. इतक्यांत मायाराणी तेथें आली ! कलेला अत्यानंद झाला. तिनें तिचें योग्य स्वागत केलें.

" आतां इथुन कोण बाई गेली बरं ? " मायेनें उत्सुकतेनें विचारिलें.

" कां बरं ? " कलेनें आश्चर्यानें विचारिलें.

' ती माझ्या ओळखीची वाटते- तिचं नांव काय ? " मायेनें साशंक होऊन पुसलें.

" तिचं नांव? तिला दया म्हणतात. "

" दया? दया? खरंच का ती दया? मग मी आतांच तिच्या पाठोपाठ जाऊन तिला गांठतें. " असें म्हणून माया पद्धतीनें तेथून जाऊं लागली.

" पण ती कोण? " कलेनें आश्चर्यानें विचारिलें.

" ती माझी सख्खी बहीण आहे. " असें म्हणत माया तेथून नाहींशी झाली!

' दया व माया! खरंच या बहिणीच असाव्यात! " कला आपल्याशींच आश्चर्यानें पुटपुटली व ती दूरवर लगबगीनें जात असलेल्या मायेच्या आकृतीकडे पहात राहिली.

---

## प्रकरण अठ्ठाविसावें.

# कुसुमकलिका व भ्रमर.

आम्हांस वाटतें, पापबीज हें एक फार सूक्ष्म बीज आहे व पापमार्ग आचरण्यास सदा तयार असलेल्या मानवाच्या हृदयभूमीनें त्याचें रोप होण्यास त्यास फारच थोडा काल लागत असला पाहिजे. तेथें त्यास अंकूर फुटण्यास मध्यंतरी थोडा काल लागतो; पण एकदां का त्याला अंकूर फुटले, मग मात्र त्याचा नाश होणें अशक्य होतें. मग हृदय-भूमीचा नाश होण्यास फार वेळ लागत नाहीं. उदाहरणार्थ, आपण विमलचंद्राचें चरित्र पाहूं.

विमलचंद्रानें विवाहाच्या वेळीं आपल्या पत्नीस—सुंदरी कुमुदिनीस आपल्या अकृत्रिम प्रेमाचीं केवढी मोठमोठीं वचनें दिलीं होतीं; पण कमलिनीची लावण्यमयी मूर्ती पहातांच त्यास आपल्या पत्नीस दिलेल्या वचनांचा पूर्ण विसर पडला. इतकेंच नव्हे, तर कुमुदिनीसारखी सुंदर स्त्री आपली पत्नी आहे, ही गोष्टही तो पार विसरून गेला! आणि शक्य ती खटपट करून ही अनुपम सुंदरी आपल्या हस्तगत करून घ्यावयाची असा त्यानें निश्चय केला. तो अजंसेनाकडे वळून म्हणतो,

" सौंदर्य पण सौंदर्य ! पण हें तुमच्या हातीं कसें आलें ? मोठे भाग्यवान् आहांत बोवा ! " असें हलकेंच म्हणत त्यानें खालीं मान घालून उभी असलेल्या कमलिनीकडे पाहिलें.

अजसेनासारख्या अर्धवटाकडून कमलिनीला हस्तगत करून घेण्यास विमलचंद्रास कांहीं विशेष खटपट करावी लागली नाहीं. त्याचें कमलिनीविषयींचें स्तुतिपर भाषण ऐकतांच अजसेन म्हणाला, " भाग्यवान् म्हणून आश्चर्य करूं नका. ज्याप्रमाणें मी भाग्यवान् आहें, त्याप्रमाणेंच मी उदारही पण आहें. "

विमलचंद्र स्वगत पुटपुटला, " आणि मूर्खही पण तितकाच आहेस. " नंतर तो अजसेनास म्हणाला, " आपल्या भाग्याचा जसा मला परिचय झाला आहे. तसाच औदार्याचा करून द्याल तर बरें ! "

अजसेन हुरळून म्हणाले, " मग त्याचाही परिचय मी आतांच करून देतों ! "

" मोठे उपकार होतील. " विमलचंद्र आनंदून म्हणाला. अजसेन आपलें औदार्य कसें प्रगट करणार, याची त्यानें केव्हांच अटकळ बांधिली!

" मग जिच्यावर तुम्ही इतके मोहित झालां आहांत, ती मी तुम्हालाच अर्पण करतों. सांगा बरें ? दानवीर कर्णाला तरी असें औदार्य प्रगट करतां आलें असतें काय ? " अजसेनानें सगर्व विचारिलें.

" छे छे ! कुणीकडे कर्ण आणि कुणीकडे तुम्ही ! आज तुम्ही मला देत असलेलें हें अपूर्व दान पाहून कर्ण विचारा लज्जितच झाला असता. " विमलचंद्र सहर्ष पुढें म्हणाला, " मला जर कुणी प्रख्यात दानी कोण म्हणून विचारील, तर प्रथम मी आपलें नांव घेईन. "

" पण बोवा, एक अट आहे. " अजसेनानें मध्येंच म्हटलें.

" ती कसली ? " विमलचंद्रानें किंचित् चमकून विचारिलें.

" ही सुंदरी तर तुम्हाला दिलीच आहे; पण तिला येथून लवकरच घेऊन जाण्याचें करा व कोणी विचारल्यास माझें नांव सांगूं नका. "

" हंः " विमलचंद्र निश्चिंत होऊन बोलला, " त्याबद्दल तुम्हाला काळजी नको. दानवीर उघड दान मुळींच करीत नाहींत हें मला माहीत आहे. "

" हो. हें माझें गुप्त दान समजा; पण ही तुमच्याबरोबर येईल कां ? " अजसेनानें विचारिलें.

" त्याबद्दल तुम्ही काळजी करूं नका. तुम्ही जरा बाहेर जा. मी तात्काळ तिला माझ्याबरोबर चलण्याबद्दल तयार करतों; पण काय हो? याबद्दल तुम्हाला मागून वाईट तर वाटणार नाहीं ? "

" कशाबद्दल ? " अजसेनानें आश्चर्यानें विचारिलें.

" ही सुंदरी मला दिल्याबद्दल. " विमलचंद्र बारकाईनें त्याच्याकडे पहात म्हणाला, " कारण ही अनुपम सुंदरी आहे. "

" ती सुंदर आहे खरी; पण—पण— " अजसेन कमलिनीकडे पहात म्हणाला, " माझी इंदुच मला जास्त सुंदर वाटते ! "

वाचकांनो ! ऐकलेंत वेड्या अजसेनाचें उत्तर ? अजसेन ! सर्व जग तुला वेडा समजो ! तुला जाणणारे सर्व जन तुला किंवा तुझ्या अशिष्टपणाला हंसोत ! तुझें वरील सत्य, अनुकरणीय व स्तुत्य उत्तर ऐकतांच आम्हांस जो आनंद झाला आहे तो आम्ही येथें वर्णन करूं शकत नाहीं. पण अजसेन ! आम्ही एवढें मात्र खात्रीपूर्वक सांगतों कीं, तुझें आपल्या पत्नीवर असलेलें अकृत्रिम, सात्विक प्रेमच तुझा भाग्योदय करील !

विमलचंद्र ! हाय ! तुझ्याविषयीं आम्हीं आणखी काय लिहावें ? तुझें चरित्र रेखाटण्याकरितांच तर आम्हीं आपल्या लेखणीला तसदी दिली आहे ! असो.

अजसेनाचें वरील उत्तर ऐकतांच विमलचंद्र आपल्या स्वतःच्या वर्तनाबद्दल किंचित्काल ओशाळला; पण ती स्थिति फार वेळ राहिली नाहीं.

" मग मी जरा बागेंत फिरून येतों तर " असें म्हणून अजसेन तेथून निघून गेला.

अजसेन गेल्यानंतर थोडा वेळ विमलचंद्रास घोंटाळा पडला ! तो विचार करीत उभा राहिला. कमलिनीशीं कशाप्रकारें बोलण्यास प्रारंभ करावा याची त्यास पंचाईत पडली.

इकडे कमलिनीची काय स्थिति होती ? दाराचा आवाज ऐकतांच ती दचकून खुर्चीवरून उठून उभी राहिली व तिनें वर पाहिलें तों अजसेन एका सुंदर पुरुषाला—अर्थात् विमलचंद्राला—घेऊन आंत आलेला तिच्या दृष्टीस पडला ! ती चकित् झाली; पण विमलचंद्राच्या तोंडचें

" हायरे सौंदर्य " हें वाक्य ऐकतांच व तिच्या नेत्राचें त्याच्या नेत्राशीं मीलन होतांच कमलिनीवर लज्जेचा पगडा बसला व ती खालीं पाहूं लागली ! अजसेनाचें व विमलचंद्राचें वरील भाषण तिनें थोडेंबहुत ऐकलें. आतां आणखी आपल्या नशिबांत काय आहे तें पाहण्याकरितां ती उभी राहिली. तिनें एकवार वर पाहिलें तों अजसेन गेलला दिसलें व विमलचंद्र कांहीं विचार करीत उभा असलेला तिनें पाहिलें. पुनः विमलचंद्राच्या नेत्राचें व तिच्या नेत्राचें मीलन झालें. दोघांचेही नेत्र हंसले ! कमलिनी खालीं पाहूं लागली. विमलचंद्राच्या सौंदर्यानें व नेत्र-मीलनानें तिच्या मनांत एक विलक्षण विकार उत्पन्न झाला ! विमलचंद्राचा एकांत तिला भयप्रद न वाटतां कांहींसा सुखकर वाटूं लागला ! आणि या विकाराचें लज्जायुक्त प्रतिबिम्ब तिच्या मुद्रेवर दिसूं लागलें! प्रेमशास्त्रपारंगत विमलचंद्रानें तें ताडलें व त्याला केवढा तरी आनंद झाला. तो तिच्या अगदीं जवळ आला व आपल्या मधुर शब्दानें ह्मणाला, " कमलिनी ! "

आपलें नांव ऐकतांच कमलिनी दचकली. या तरुणाला आपण जाणत नसतां हा आपणास कसें जाणतो यांचें तिला आश्चर्य वाटलें. तिनें आश्चर्यानें त्याच्याकडे पाहिलें. विमलचंद्रानें या तिच्या पाहण्याचा अर्थ ताडला. तो अत्यंत मधुर व सलगीच्या भाषेंत बोलूं लागला, " कमल! तूं मला जाणत नाहींस; पण मी तुला जाणतों. या कैदखान्यांतून तुझी सुटका करावी याच हेतूनें मी इथें आलों आहे ! " इतकें बोलून विमलचंद्र चुप्प बसला. आपल्या या बोलण्याचा कमलिनीवर कसा काय परिणाम होतो, हें पाहण्याची त्याची इच्छा होती. कमलिनीनेंही त्याचें सर्व बोलणें ऐकलें होतें; पण त्याचा अर्थ समजण्याइतकें तिचें मन ठिकाणावर नव्हतें. तिच्या हृदयपटावर विमलचंद्राची प्रतिमा गाढ उमटली होती तिचें ती निरीक्षण करीत होती. विमलचंद्र थांबतांच तिनें पुनः एकवार त्याच्याकडे पाहिलें. प्रेमानुरागानें तिची मुद्रा प्रफुल्लित व रमणीय दिसत होती.

विमलचंद्र पुढें ह्मणाला, " आज सहा महिने तुझा पत्ता नाहीं, त्यामुळें तुझी मैत्रीण फार काळजी करीत आहे. "

" कोण ? " कमलिनीनें कंपित स्वरानें प्रश्न केला.

" वसंतदुर्गावरील आपल्या हितचिंतकांना तूं अद्याप विसरली नसशील ! " विमलचंद्रानें जवळच्या खुर्चीवर बसत म्हटलें, " तुझ्या मैत्रिणी तुला पहाण्याकरितां कितीतरी उत्सुक आहेत. तूं त्यांना भेटायला नाहीं कां चलणार ? "

कमलिनी या गोष्टीला कधींतरी नाहीं म्हणेल ? आजपावेतों तिला आपल्यामागें वसंतदुर्गावर काय काय गोष्टी घडल्या याचा तिळमात्रहि पत्ता नव्हता. वसंतदुर्गावरील हकीगत ऐकण्यास व आपली स्थिति वसंतदुर्गावर कळविण्यास ती किती दिवसांपासून तरी उत्सुक होती; पण आजपर्यंत तिची इच्छा पूर्ण होण्याचा योग आला नाहीं. अर्थात् विमलचंद्राच्या तोंडून वसंतदुर्गाचें नांव ऐकतांच तिला कितीतरी आनंद झाला व तेथील मंडळींची आठवण होऊन तिच्या डोळ्यांत अश्रु आले. ती साश्रुनयनांनीं विमलचंद्राकडे पहात म्हणाली, " माझ्यामागं तेथें काय काय घडलं तें सांगायचं होईल कां ? "

विमलचंद्र बोलूं लागला, " वसंतदुर्गांतून तूं महाराजांना न सांगतां गेलीस, हें पाहून महाराजांना फार दुःख झालें व त्यांनीं तात्काळ तुझ्या शोधार्थ माणसें पाठविलीं; पण तुझा शोध लागला नाहीं. "

" कुमारी कुमुदिनीची सुटका झाली कां ? "

" हो ! तूं गेल्यानंतर पांच कीं सहा दिवसांनींच ती दुर्गांत आली. पुढें लवकरच तिचा विवाह माझ्याशीं झाला. "

" आपल्याशीं ? " कमलिनीनें दचकून विचारिलें, " आपल्याशीं ? तिचें प्रेम तर विमलचंद्रावर होतें. "

" मीच तो विमलचंद्र ! " विमलचंद्र आपल्या वक्षस्थलावर हात ठेवून ऐटीनें उत्तरला.

कमलिनी चकित् झाली; पण तात्काळ तिच्या मुद्रेवर दुःखाची कालिमा पसरली. तिनें आपली मान खालीं घातली.

विमलचंद्रानें याचें कारण ताडलें. तो स्वगत पुटपुटला, " कमल ! प्रिय कमल ! आतां तूं खात्रीनें माझी आहेस. " असें म्हणत त्यानें आपला फेटा काढून आपल्या गुडघ्यावर ठेविला. कमलिनी स्तब्ध उभी राहिली ! किती वेळ तरी ती कांहीं विचार करीत होती. अखेरीस तिनें पुनः एकवार विमलचंद्राकडे पाहिलें ! विमलचंद्राची नजर आपल्या

फेटयाकडे होती. त्यामुळें तिला त्याचा चेहरा बराच वेळ न्याहाळतां आला. अकस्मात् कमलिनीच्या तोंडून एक चीत्कार बाहेर पडला ! ती धाडदिशीं खालीं पडली व बेशुद्ध झाली ! ही गोष्ट इतक्या अल्पावकाशांत घडली कीं, तें पाहून विमलचंद्र अत्यंत चकित् झाला व तो त्याच्या पायाजवळ बेशुद्ध होऊन पडलेल्या कमलिनीकडे डोळे फाडून पहात ...ला ! कमलिनीची अशी स्थिति होण्यास काय कारण घडलें असावें, याचा फार वेळ विचार न करतां विमलचंद्र तिला शुद्धीवर आणण्याच्या खटपटीस लागला ! त्यानें जवळच्या सुरईंतील पाणी घेऊन तिच्या नेत्रास लावलें व तिचें मस्तक आपल्या मांडीवर घेऊन आपल्या शेल्यानें हळुं हळुं वारा घालण्यास प्रारंभ केला. थोड्याच वेळांत कमलिनीनें शुद्धीवर येऊन आपले डोळे उघडले.

" कमल ! " विमलचंद्र तिच्या हनुवटीस हात लावून प्रेमानें ह्मणाला. दोघांचीही गात्रें हर्षरोमांचित झाली. पण ही स्थिति फारच थोडा वेळ राहिली. कमलिनीच्या मनाला विचार करण्याची शक्ति येतांच तिनें हलकेंच विमलचंद्राचा हात बाजूला केला व ती चटकन् उठून एका बाजूला जाऊन उभी राहिली. विमलचंद्रास याचा अर्थ मुळींच समजला नाहीं. तो आश्चर्यानें तिच्याकडे पाहूं लागला.

" आपली अशी स्थिति कशानें झाली ? " विमलचंद्रानें प्रश्न केला.

कमलिनी थोडा वेळ स्तब्ध बसली व नंतर तिनें एकदम विचारिलें, " आपलं नांव विमलचंद्रच कां ? "

हा तिचा प्रश्न ऐकतांच विमलचंद्र स्तंभित झाला ! आपल्या प्रश्नाचें उत्तर न देतां आपल्यालाच उलट ही आपल्या नांवाबद्दल विलक्षण प्रश्न करते हें पाहून विमलचंद्रास अत्यंत आश्चर्य वाटलें. तरी पण तो कचरत उत्तरला " होय. कां बरें ? "

" अगदीं खरं सांगायचं ! " कमलिनीनें निक्षून विचारिलें.

यावेळीं मात्र विमलचंद्रास पंचाईत पडली. तो थोडा वेळ विचार करून ह्मणाला, " माझ्या नांवाशीं आपला कांहीं संबंध आहे ? "

कमलिनीनें एकवार त्याच्या मुद्रेकडे तीक्ष्ण नजरेनें पाहिलें; पण विमलचंद्राच्या दृष्टीला दृष्टी देण्याचें सामर्थ्य कमलिनींत नव्हतें. ती लाजून पुनः खालीं पाहूं लागली.

बराच वेळ दोघेंही स्तब्ध होतीं. कमलिनी खालीं पहात, कांहीं विचार करीत उभी होती व विमलचंद्र तिच्याकडे पहात उभा होता.

" कमल !" बऱ्याच वेळानें विमलचंद्र म्हणाला, " मग तूं मजबरोबर येणार कीं नाहीं ? "

कमलिनीकडून उत्तर मिळालें नाहीं.

" माझ्याविषयीं तुला कांहीं शंका का आहे ? " विमलचंद्रानें विचारिलें. तरीही कमलिनी चुप्पच !

" आणखी तुला कांहीं विचारायचें का आहे ? " विमलचंद्रानें पुनः प्रश्न केला. कमलिनीनें वर पाहिलें नाहीं कीं उत्तरही दिलें नाहीं. पदराच्या दशांना पीळ घालण्याचें काम तिचे हात करीत होते.

" या तुझ्या मुकेपणानें मी काय समजावें बरें ? " विमलचंद्रानें किंचित् निराशायुक्त स्वरांत प्रश्न केला. तो पुढें काकुळतेनें म्हणाला, " नुकताच तुझा शोध लागला तेव्हां तुला इथून सोडवून तुझ्या मैत्रिणींकडे घेऊन चलावें, या इराद्यानें मी आज इथें आलों. त्याकरितां अजसेनासारख्या खुळचटाशीं कसें नाटक करावें लागलें तें तूं पाहिलेंसच. सध्यां त्यानें वेडाच्या लहरींत तुला नेण्यास सांगितलें आहे; पण ही त्याची लहर पालटण्यास फार वेळ लागणार नाहीं. मग तुझी सुटका करण्यास मी कदाचितच समर्थ होईन. म्हणून म्हणतों, तुझ्या मनांत चलण्याचें असल्यास तसें सांग. नाहीं तर तुझी मर्जी ! "

विमलचंद्राचें वरील भाषण अक्षरशः खोटें होतें ही गोष्ट नव्यानें सांगावयास नको आहे; पण पुष्कळ कारणांनीं तें कमलिनीस खरें वाटलें.

" कुमुदिनी सध्यां कुठें आहे ? " कमलिनीनें हलकेंच विचारिलें.

" तुझ्याशीं खोटें बोलण्यांत कांहीं फायदा नाहीं. ती सध्या वसंतदुर्गांतच आहे; पण ती एकदोन दिवसांत इथें येणार आहे. महाराजा धर्मचंद्रांचें नुकतेंच पत्र आलें आहे. ती सर्व मंडळी लवकरच इकडे येणार आहेत. "

" खरेंच ? " कमलिनीनें मध्येंच विचारिलें, " कला—कला कुठें आहे ? "

" काला ? " विमलचंद्र कांहीं विचार करून म्हणाला, " कलेचेंही लग्न झालें असून ती आपल्या पतीबरोबर आहे. "

" कलेचेंही लग्न झालें ? सध्यां ती कुठें आहे ? "

" तीही तुला लवकरच भेटेल; पण हें पहा-संध्याकाळ होत आली. आपणाला लवकर चढलें पाहिजे. " असें ह्मणून विमलचंद्र कमलिनी-कडे हेतुपूर्वक पाहूं लागला. कमलिनी जाण्यास तयार झाली !

आतां विमलचंद्राच्या आनंदास पारावार राहिला नाहीं. कमलिनी आपल्यावर अनुरक्त झाली आहे ही गोष्ट त्यानें तेव्हांच ताडली. आणि ही गोष्ट खोटी नव्हती. कुमुदिनीला भेटण्याच्या इच्छेनें तर ती विमलचंद्राबरोबर जाण्यास तयार झालीच होती; पण विशेषेंकरून विमलचंद्राच्या सौंदर्यानेंच कमलिनीस बद्ध केलें होतें. कमलिनी गतधवा होती, याचेंहि वाचकांनीं स्मरण ठेवावें. असो.

विमलचंद्राजवळ द्रव्याचा तोटा नव्हता. अर्थात् कमलिनीची त्यानें काय व्यवस्था केली असेल हें सांगण्याची जरूरी नाहीं. एवढें मात्र येथें अवश्य सांगितलें पाहिजे कीं, उज्जयिनीनगरापासून सुमारें दोन तीन कोसांवर असलेल्या एका टुमदार खेड्यांत क्षिप्रा नदीच्या तीरीं विमलचंद्राची एक बाग होती. त्याच बागेंतील रम्य प्रासादांत-( हा प्रासाद विमलचंद्राचा नेहेमींचा राहण्याचा नव्हता ) विमलचंद्रानें आपल्या नूतन प्रणयिनीला नेऊन ठेविलें. कमलिनीही तेथें सुखांत राहूं लागली ! रोज कुमुदिनी केव्हां येणार याबद्दल ती विमलचंद्रास प्रश्न करी व तोही आपल्या मिष्ट भाषेंत तिला योग्य वाटतील अशीं उत्तरें देऊन गप्प करी. असो.

आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांनीं सरड्याच्या एका विशेष गुणाबद्दल ऐकिलें असेल, पाहिलें असेल, किंवा वाचलेंही असेल कीं, सरडा हा प्राणी ज्या भूमींत राहील, त्या भूमीची जशी परिस्थिति असेल, तसा त्याचा शरीरवर्ण असतो. अर्थात् हिरवळ असल्यास त्याचा वर्ण हिरवा, लाल माती असल्यास त्याचा रंग लाल, काळी जमीन असल्यास काळा व भुरी जागा असल्यास भुरा असे सरडाचे रंग पालटत असतात. आह्मांस वाटतें, मनुष्याच्या मनाचीही कांहीं अंशीं अशीच स्थिति आहे. मनुष्यप्राणी ज्या स्थितींत असेल, त्या स्थित्यनुरूपच त्याच्या मनाची स्थिति असणार आणि त्याच स्थितीला अनुसरून त्याच्या हातून चांगलीं, वाईट कृत्येंही पण घडणार हें उघड आहे. मनुष्य सज्जनसंगतींत

असेल, जर रात्रंदिन तो सत्य ऐकील, ईशनाम स्मरण श्रवण करील, परोपकाराचीं लहान मोठीं कृत्यें पाहील, अर्थातच याचा परिणाम असा होईल कीं, तो स्वतः तेंच करूं लागेल. तोच तो दुर्जनांच्या घोळक्यांत असेल तर चोरी, चहाडी, असत्य वचन व नानाप्रकारचीं दुष्कृत्यें पाहील व तोही त्याचप्रमाणें बनेल यांत मुळींच शंका नाहीं. आणि याचकरितां जगांतील सर्व नररत्नांनीं सज्जन संगतींत रहावें असा उपदेश केला आहे. त्याचप्रमाणें विषयसुखांत मग्न असलेला एखादा मनुष्यप्राणी जर हिमालयांतील एखाद्या रमणीय कंदरेंत जाईल तर तेथील स्वच्छ नदीप्रवाह, निसर्गतेनें वाढलेले हिरवेगार वृक्ष, स्वच्छंदी पक्षिगण इत्यादि पवित्र वस्तु पाहून ईश्वराच्या अगाध करणीचें त्याला कौतुक वाटेल व हळुंहळुं त्याच्या मनांत ईशभक्ति उत्पन्न होईल व अखेरीस विषयवासनेपासून त्याचें मन परावृत्त होऊन तें ईशचरणीं लीन होईल हें शक्य आहे. त्याच्या उलट एखादा वैरागी जर संसारी विलासांत येऊन पडेल तर त्याचें चारित्र्य पुष्कळ दिशांनीं भ्रष्ट होण्यास काल लागणार नाहीं. आणि याचकरितां विश्वामित्राला तपोभ्रष्ट करण्याकरितां मेनकेला पाठविण्यापूर्वी इंद्राला विश्वामित्राच्या आश्रमाला प्रथम विलासी स्वरूप देण्याकरितां मदनास पाठवावें लागलें. ही पौराणिक कथा खरी असो, अगर खोटी असो; पण ती आमच्या वरील सिद्धांतास लागूं पडते यांत मुळींच शंका नाहीं. यापेक्षांही व्यवहारिक उदाहरण पाहिजे असल्यास स्मशानवैराग्याचें. आपण कितीही आनंदांत असूं; पण ज्यावेळीं एखादें शव आपण खांद्यावर घेऊन जातों, अगर नुसतें दुसऱ्यांनीं नेतांना पाहतों, त्यावेळीं आपल्या मनाची काय स्थिति असते बरें ? ती स्थिति प्राप्त होण्यास काय कारण बरें ? अर्थात् त्यावेळची परिस्थिति. आतां तें स्मशानवैराग्य फार थोडा वेळ असतें ही गोष्ट निराळी. पण थोड्या वेळांपुरतें कां होईना आपलें मन वैराग्यपूर्ण होतें यांत शंका नाहीं.

वरील गोष्ट लिहिण्याचें कारण एवढेंच कीं, यापुढें आम्ही कमलिनीचें जें वर्णन करणार आहोंत, तें वाचून वाचकांना घोंटाळा पडूं नये हेंच होय.

कमलिनी यावेळीं आपल्या ऐन तारुण्यांत होती. चांगलीं चांगलीं मिष्टान्नें खावयास मिळूं लागलीं उंचीं उंचीं वस्त्रप्रावरणें व आभूषणें

धारण करण्यास मिळूं लागलीं, शृंगारलेल्या महालांत हिंडायला फिरायला मिळूं लागलें, पुष्कळ नोकरचाकर सेवेंत हजर राहूं लागले. अशाप्रकारें कमलिनीची परिस्थिति पालटली. वसंतदुर्गांत असतांनासुद्धां तिची पुष्कळ अंशानें अशी स्थिति होती; पण तेथें धर्मचंद्राचा दबदबा होता. ती स्वतः एकप्रकारें दासीच होती व परतंत्र होती तरी तिच्या आसपास बरीच सज्जन मंडळी होती. अर्थात् कमलिनीचें मन चंचल होण्यास तेथें विशेष कारणें घडलीं नाहींत; पण आतां तसा प्रकार नव्हता. ती पूर्ण स्वतंत्र होती व सगळ्यांत वाईट गोष्ट म्हणजे विमलचंद्रासारखा सुंदर व तरुण पुरुष आपल्या मधुर भाषेंत तिच्याभोंवतीं गुंजारव करीत होता. त्यामुळें हळूंहळूं कमलिनींत फरक पडूं लागला. यापूर्वी जी कमलिनी संसाराविषयीं साधारणपणें उदास रहात असे व जी मनानें पुष्कळ पवित्र होती, तीच कमलिनी शनैः शनैः विलासिनी बनूं लागली. तिला आपला सुंदर देह आभूषणानीं आलंकृत करावासा वाटूं लागला. बोलण्यांत नखरेपणा वाढूं लागला! नेत्रांत चंचलता विशेष दिसूं लागली व लज्जेनें वारंवार तिचे कपोल आरक्त होऊं लागले आणि अखेरची गोष्ट म्हणजे विमलचंद्राविषयींचा अनुराग पूर्णत्वाला पोंचला. इतक्यावर गोष्टी आल्या होत्या तरी कमलिनी फार पुढें गेली नव्हती. विमलचंद्राशीं ती फारशी बोलत नसे! धूर्त विमलचंद्रास हें सर्व समजून चुकलें होतें; पण कमलिनीच्या हृदयांत पेटलेल्या ज्योतीला वारा घालून प्रज्वलीत करण्याची संधी तो पहात होता! कमलिनीच्या वर्तनांत पडत चाललेला फरक तो बारकाईनें पहात होता; तरी पण त्याला वारंवार शंका वाटे आणि म्हणूनच त्यानें अद्यापपर्यंत आपला खरा हेतु तिच्याजवळ प्रगट केला नव्हता.

पण आज तो दिवस आला! बागेंतील माळ्यानें कमलिनीकडून कांहीं इनाम उपटण्याच्या उद्देशानें आज पुष्कळ चांगलीं चांगलीं सुगंधित पुष्पें भरलेल्या चार पांच करंड्या भरून पाठविल्या. तें पाहून कमलिनी खुष झाली. माळ्याला इनाम मिळालें. एका मोठ्या आरशापुढें बसून कमलिनी पुष्पालंकार धारण करूं लागली. थोड्याच वेळांत शंकराला मोहित करणाऱ्या भिल्लिणीचें मनोहर स्वरूप कमलिनीस प्राप्त झालें. अगदीं त्याच वेळीं विमलचंद्रानें तेथें पदार्पण केलें!

---

## प्रकरण एकोणतिसावें.

## खोट्याच्या कपाळीं गोटा !

आमच्या या अद्भुत कथानकांतील एका पात्राच्या आयुष्यक्रमांत परिस्थित्यनुरूप कसा विलक्षण फरक पडला, त्याचें वर्णन वाचकांनीं गतप्रकरणांत वाचलेंच आहे. आतां या प्रकरणांत आणखी एका पात्राचा जीवनक्रम एकदम कसा पालटला तें आम्ही दाखविणार आहोंत. आमचे सुज्ञ वाचक आपल्या शृगालदत्ताला विसरले नसतीलच. तेव्हां त्याकडेच आम्ही वळतों.

आपला तळीराम गार करून घेण्याकरितां स्वतः वाईट कामें न करतां जगांतील इतर भोळ्या लोकांकडून तशीं कृत्यें करवणारे हरीचे लाल या भूपृष्ठावर पुष्कळ आहेत. त्यापैकींच आमचे शृगालदत्त होते. अजसेनासारख्या भित्र्या व अर्धवट मनुष्याकडून मंत्रसाधन होणें शक्य नाहीं, ही गोष्ट शृगालदत्तास स्पष्टपणें अवगत होती. तरी पण त्याच्याकडुन बालहत्या करवून त्यास आपल्या मुठींत ठेवण्याचें त्या नीचानें योजिलें होतें; पण ऐनप्रसंगीं तो बेत फसला ! बालहत्या शृगालदत्तालाच करावी लागली ! त्यापुढें तो सर्व आळ बिचाऱ्या निर्दोषी अजसेनावर घालण्याचा त्यानें विचार केला होता; पण मध्येंच इंदुमती आली व त्यामुळें अचेतनानें—त्या तिसऱ्या व्यक्तिनें—" हडळ ! हडळ आली रे ! " म्हणून भीतीनें ओरडून पलायन केलें. शृगालदत्ता-सही भीति वाटली व तोही तेथुन पळाला इत्यादि गोष्टी वाचलेल्या वाचकांस आठवत असतीलच. त्यापुढें शृगालदत्तानें काय काय केलें अगर त्याविषयीं आणखी काय काय गोष्टी घडल्या तें आपण पाहूं.

शृगालदत्तानें भीतीनें त्या गाढ अंधःकारांत ऊर्ध्व श्वासांत पलायन केलें ! किती वेळ तरी तो अशाप्रकारें धापा टाकीत, त्या अंधारांत ठेंचा खात, झुडपांना धडके देत, कांटेरी झुडपांत अडकत सारखा पळत होता. शृगालदत्त दुष्ट होता खरा, पण तरात भित्रा होता. आजपर्यंत त्यानें लहानमोठीं बरींच पापकृत्यें केलीं होतीं; पण त्याची मजल

एखाद्याचा प्राण घेण्यापर्यंत पोंचली नव्हती. त्यामुळें त्या निरपराध बाल-कालाचा आनंदांत त्याच्या हृदयांत विलक्षण धक्का बसला ! त्यानें त्या बालकानें कुठली पाहिलें नव्हतें. ज्यावेळीं शृगालदत्त पळतां पळतां थबकून थांबला, त्यावेळीं त्याच्या नेत्रापुढें तें रक्तानें भरलेलें मुंडकें त्यानें पाहिलें तों काय ? आपल्या स्वतःच्याच लहानग्या मुलाचें तें मुंडकें आहे असें त्याला दिसलें ! शृगालदत्तानें एक हृदयद्रावक किंकाळी टाकली व तो धाडदिशीं खालीं पडला आणि बेशुद्ध झाला ! ही त्याची मूर्च्छावस्था फार वेळ नव्हती ! तो पुनः शुद्धींत आला; पण त्याची मानसिक स्थिति बिघडली होती. त्या भीषण रात्रीच्या देखाव्याची भीति, बालहत्येसारख्या पातकाचें हाय व काल्पनिक हडळीचें येणें इत्यादि प्रकार एकामागून एक घडल्यामुळें भित्र्या शृगालदत्ताचें डोकें बिघडलें. तो उठून उभा राहिला ! नंतर किती वेळ तरी तो इकडे तिकडे पहात होता ! अखेरीस तो मोठ्यांदा खदखदा हंसला ! तो स्वगत बडबडूं लागला, " हा ! हा ! हा ! ! पाहतों तो वेडगळ माझ्या हातांतून कसा जातो ! त्या दळभद्र्या विमलचंद्राला एक भूत वश झालें, म्हणून याला थोडेंच होणार आहे ! या वेडयाच्या तडाक्यांत तें भूत कसचें सांपडतें ! ( हंसून ) आतां पाहतों ! यापुढें अजसेनाच्या घरचा सर्व कारभार मी पाहणार ! ती त्याची बायको फार खट्याळ आहे. तिला लावतों प्रथम काढून. दुष्ट कुठली- ( टाळी वाजवून ) बस्स्, आतां अजसेन राजा व मी त्याचा वजीर, प्रधान, कारभारी काय वाटेल तें ! एखाद्या गाढव राजाला ज्याप्रमाणें त्याचा धूर्त मंत्री, पाहिजे तसा वळवितो तसाच मीही पण या अजसेनाला—बेट्याचें नांव गर्दभसेन असतें तर बरें होतें ! हंः पण त्याची नको काळजी ! अजसेनाच्या राजवाड्यांत एखादा भव्य दरबार भरवूं व टाकूं अजसेनाचें नांव बदलून ! पाहिजे त्यानें पाहिजे त्याला पाहिजे ती पदवी देण्याचें हें कलियुग आहेच ! मग आपल्या या राजसाहेबांचें दुसरें नामकरण करण्यांत अडचण मी करतों ! पण हां; या नामसंस्करणाच्या वेळीं एखादें काव्यही पण वाचलें गेलें पाहिजे—( आठवून ) ठीक—ठीक ! मी स्वतःच कवि आहें कीं—बस्स आपण एखादें गोडसें काव्य रचावें म्हणजे त्या प्रसंगीं आपणही—कप्रथम—के, काय म्हटलें कवी—क—क—के, बेटे आठवणारें च

झालें ! ( आठवून ) हो–हो पक्षीश्वर पक्षीश्वर ! पण हें लोकांचें कानाला बरें नाहीं वाटत ! मग कविता करणाराला काय म्हणतात बरें ? कपीश्वर कपीच म्हणतात वाटतं ! कां पक्षी म्हणतात ? ही एक मोठीच अडचण आली. कपी कीं पक्षी ? ( मान हलवून ) छे, सगळा घोंटाळा ! पण असो, घटकाभर हा प्रश्न बाजूला ठेवूं ! आमच्या त्या भव्य दरबारांत पंडितांनाही बोलवूं आणि करवूं त्यांकडून या 'कपी व पक्षी' चा वादविवाद ! छे, आमचा हा दरबार म्हणजे एक अपूर्व होणार बुवा ! हं ( आठवून ) मघाशीं मी काय म्हणत होतों बरं ? हो, आठवलें. मी कविता करणार होतों ! पण कविता करायला काव्याची व मात्रांची मोठी भानगड असते ! पण आपण कवि आहोंत 'निरंकुशाः कवयः !' मात्रांना राहूं दे वैद्यांच्या पोतडींत. हं मग कविता प्रारंभ करायची ! पण काय कल्पना करावी बरें ! हो, हो, 'आमचे राजेसाहेब निजले आहेत, व प्रातःकालीं त्यांना भूपाळी गाऊन कवि उठवत आहे' ( हंसून ) छान ! उत्तम कल्पना ! हं मग पहिला चरण–( गुणगुणत ):–

" उठी उठीरे गईअसेना दिवस फार झाला,
दारि उभा हा भृत्य घेउनी दारूचा पेला ! "

( आनंदानें हात चोळून ) छे बोवा, मी समजत होतों मी नुसता कपीच आहें; पण पाहतों तर मी कवी पेक्षांही वर आहे. हां हां म्हणतां दोन चरण जुळले ! आणि त्यांतील मजेदार अनुप्रास, विलक्षण अलंकार व गोड अर्थ पाहून मी तर दंग झालों बावा ! हं–आतां पुढें–( गुणगुणत )

" निशामधीं मग धुंद होऊनी धन झुंकवावी
सेवकवर्गा गालीदानें यथाशक्ति द्यावीं ! "

राजाचें हें किती योग्य वर्णन आहे पण ! गाणें रचण्यांत हा एक मोठा फायदा आहे कीं, कुठेंही यतिभंगामुळें ठेंच लागल्यास जरा लांब सूर काढावा कीं बेमालूम काम ! "

शृगालदत्ताच्या काव्यरचनेचेंच वर्णन करून वाचकांना कंटाळविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. एवढेंच सांगितलें असतां बस्स होईल कीं, अखेरीस त्या कपीश्वरानें–नव्हे–कवीश्वरानें एक दहा पांच ओळींचें गाणें रचलें व स्वतःच्या काव्यशक्तीचें अगाध कौतुक करीत ती स्वारी दुसऱ्या काव्याला प्रारंभ करणार होती. इतक्यांत जगुं काय. काव्य

मारून ओरडला, " अरेरे ! नराधमा ! आपल्या आईलाही मारलीस ! " असें म्हणून शृगालदत्त रडूं लागला !

वरील गोष्टी एका अगदीं एकांत भागांत घडत होत्या म्हणून बरें नाहींतर दोघांनाही कैदी व्हावें लागतें. असो.

किती वेळ तरी शृगालदत्त आपल्या कर्मावर हात मारून रडत होता. अचेतनही आश्चर्यानें त्याकडे पहात उभा होता. त्याला अद्याप पुरा उलगडा पडला नव्हता. तो सहज म्हणाला, " झाल्या गोष्टीबद्दल!"

" चांडाळा ! " शृगालदत्त दुःखानें घबरोळून म्हणाला, " माझा घात केलास तो केलास आणखी— गप्प बस. नाहींतर नरडीचा घोंट घेईन ! " असें म्हणून त्यानें आपला ओंठ चावला.

अचेतनाला ती धमकावणी ऐकतांच राग आला. तो कांहीं शृगालदत्ताला दबेंगीरा नव्हता. तो एकदम खेंकसून म्हणाला, " तूंच आपल्या हातानं त्या पोरट्याला मारलंस आणि माझ्या नांवानं कां वाजवतोस ? "

" पण त्याला आणलंस तर तूंच ना ? " शृगालदत्तानें चिडून म्हटलें, " हें करतांना तुझे हात कां झडले नाहींत ? "

" त्या पोरावर तलवारीचा घाव करतांना तुझ्या हाताचे तुकडे कसे पडले नाहींत ? याचें मला आश्चर्य वाटतें ! " अचेतन संगर्व उद्गारला.

" माझ्या म्हाताऱ्या आईला मारून त्या मुलाला आणण्यांत तूं काय फायदा पाहिलास ? " शृगालदत्तानें कांहीं तरी प्रश्न विचारला.

" आणि वेड्या अजसेनाला स्मशानांत आणून त्याकडून तें मूल मारविण्याचा तुझा जो उद्देश होता, त्यापासून तूं काय फायदा करून घेतलास ? " अचेतनानें जशास तसा प्रश्न केला.

अखेरीस अचेतनापुढें आपलें कांहीं चालत नाहीं, हें पाहून शृगालदत्त जरा नरम पडला. तो विनयभावानें म्हणाला, " अपसांत झगडण्यांत कांहीं अर्थ नाहीं; पण, खरं सांग, हें काम तूं कशाकरितां केलंस ? "

" पैशाच्या आशेनें ! " अचेतनानें सरळ उत्तर दिलें.

शृगालदत्ताला स्वतःचें भान राहिलें नाहीं. तो त्यास धिक्कारून म्हणाला " अरेरे ! एकंदरींत थोड्याशा द्रव्याकरितां तूं मनुष्यहत्या-सुद्धां करण्यास मागेंपुढें पाहिलें नाहींस अं ? "

अचेतनाला हंसूं आलें. तो म्हणाला, " वारे सज्जन ! आपलें चरित्र कांहीं मोठें पवित्र नाहीं ? तो वेडा बिचारा--त्यानेंसुद्धां त्या पोराला मारूं नकोस म्हणून तुझी प्रार्थना केली; पण त्यावेळीं आपली अक्कल कुठें गेली होती ? उलट स्वतः हत्या करून त्यावर आळ घालण्याचा आपला स्तुत्य विचार होता. "

शृगालदत्त चुप्प बसला. अचेतनाला दूषण देण्यास तो समर्थ नव्हता. त्यानें आपल्या कपाळावर हात मारून म्हटलें, " खरें आहे–अचेतन ! तुला दोष देतां येत नाहीं. या विलक्षण लोभाच्या तडाक्यांत सांपडून मीं काय काय अनन्वित कृत्यें केलीं ! आज आपल्या स्वतःच्या मुलाची हत्या करून मीं आपल्या पापमंदिरावर कळस चढविला ! हाय ! हाय !! जातीनें विप्र असून मी आपल्या कर्मांनीं चांडाळापेक्षांही नीच बनलों ! आपल्या दुष्कृत्यांनीं मीं सर्व ब्राह्मण जातीला कालिमा लाविली ! ब्राह्मण हे उपदेशक होत; पण–पण मीं काय केलें. विमलचंद्राकडून पिशाच्चसाधन करवून त्यास हरेक अमावास्येस बालहत्या करण्यास शिकविलें. कुमुदिनीच्या आशेनें कमलिनीला आणून इयें कैदेंत टाकिली ! धर्मचंद्रासारख्या पुण्यात्मा धन्याशीं विश्वासघात करून त्याच्या पुत्राची हत्या करविली ! आणि इतक्या सर्वांचा फायदा काय ? कांहीं नाहीं ! माझ्या खोपटाचा राजवाडा झाला नाहीं कीं, दरिद्रतेनें मला सोडलें नाहीं ! उलट आपल्याच कर्मामुळें आपल्या वृद्धमातेच्या हत्येला कारण झालों व स्वतःच आपल्या पुत्रास मारिलें !! हाय रे अधम ! पापी ! चांडाळ ! " असें उद्वेगानें म्हणत त्यानें आपला ऊर बडवून घेतला !

अचेतन स्वगत पुटपुटला, " आतां लेका ऊर बडवून काय होतें ? "

शृगालदत्त कितीतरी वेळ तरी स्तब्धपणें खालीं मान घालून बसला होता. काय करावें, कोठें जावें, काय बोलावें, कांहीं कांहीं त्यास सुचेना. इतकेंच काय; पण अचेतनाप्रमाणें आपण भ्रमिष्ट तर होणार नाहीं अशीही त्यास भीति वाटूं लागली.

अखेरीस तो उठला. तो म्हणाला " अचेतन ! आतां पुनः आपली कधींही भेट होणार नाहीं ! मी जें कांहीं वाईट बोललों असेन तें विसरून जा. आणि अखेरची विनंति करतों कीं, हा दुर्मार्ग अगदीं अगदीं

रचून भडकलेल्या शृगालदत्ताच्या मेंदूला शांत करण्याकरितांच कीं, काय ? आकाशपटावरील गाढ मेघावडंबर भूपृष्ठावर कोसळूं लागलें ! निवाऱ्याची जागा पाहण्याकरितां शृगालदत्तास पुनः सैरावैरां धावावें लागलें, पण कोठेंही आसरा मिळाला नाहीं. अखेरीस एका दाटशा वृक्षाखालींच शृगालदत्त जाऊन बसला ! मेघाचा जोराजोरानें वर्षाव होतच होता ! अखेरीस पहाटेच्या सुमारास पाऊसही थांबला व इतका वेळ पावसाचा मारा खाल्ल्यामुळें गारठून गेलेल्या शृगालदत्तासही एक प्रकारची ग्लानी आली !

ज्यावेळीं शृगालदत्त जागा झाला, त्यावेळीं त्यानें पाहिलें तों सर्वत्र स्वच्छ सूर्यप्रकाश पडला होता ! आकाश अगदीं निरभ्र झालें होतें. शृगालदत्त उठून उभा राहिला. त्याचीं वस्त्रें सर्व भिजलेलीं होतीं व ठिकठिकाणीं फाटलीं होतीं. सारें अंग मातीनें भरलें होतें. ठिक-ठिकाणीं ओरखाडे निघालेले दिसत होते. शृगालदत्त आतां चांगला शुद्धीवर आला होता. थोडावेळ विचार करतांच आपली अशी स्थिति कशानें झाली, हें त्यानें तेव्हांच ताडलें. रात्रीं घडलेल्या गोष्टी त्याला स्पष्टपणें आठवूं लागल्या व त्या बालकाची आठवण होतांच शृगाल-दत्ताच्या हृदयांत एक जोराचा धक्का बसला. तो स्वगत पुटपुटला, " खात्रीपूर्वक मीं आपल्याच मुलाची हत्या केली, असें मला वाटतें. मीं त्याची मुद्रा स्पष्टपणें पाहिली होती. अगदीं ती माझ्या मुलासारखी होती ! हाय ! हाय ! ! हे ईश्वरा ! माझ्या पापानें मला फार चांगलें प्रायश्चित्त दिलेंस ! अजसेनाला बिघडवून इंदुमतीच्या संसाराचें वाटोळें करण्याचें मीं योजलें ! तें माझेंच वाटोळें झालें ! " तो थोडावेळ विचार करून पुढें म्हणाला, " कदाचित् तो मला भास तर नसेल ? नाहींतर माझें मूल अचेतनाला कसें सांपडणार ? पण पापाचें प्रायश्चित्त देण्याकरितां ईश्वरानें कदाचित् ही गोष्ट घडवून आणिली असेल. नाहीं—नाहीं मी पुत्रहत्या करणारा नाहीं ! " पुनः थोडा वेळ तो विचार करूं लागला. पुनः तो स्वगत म्हणाला, " अचे-तनाला गांठून विचारिलें पाहिजे. त्याशिवाय खरी गोष्ट समजणें अशक्य! पण अचेतन आतां कुठें आढळेल ? " असें पुटपुटत उद्वेगजनक स्थितींत विचार करीत शृगालदत्त नगराकडे वळला ! अकस्मात् वाटेंतच त्याला अचेतन येतांना दिसला !

" अचेतन ? " शृगालदत्त आश्चर्यानें उद्गारला.

" शृगालदत्त ? " अचेतनानें म्हटलें.

" इकडे कुणीकडे ? " शृगालदत्तानें चालतां चालतां विचारिलें.

" आपल्यालाच पाहण्याकरितां. "

" अचेतन– अचेतन ! " शृगालदत्त हलकेंच करुणस्वरांत म्हणाला, " तुला एक गोष्ट विचारावयाची आहे. अगदीं खरं सांगशील ? "

अचेतन आश्चर्यानें शृगालदत्ताकडे पाहूं लागला. त्यानें विचारिलें, " अजसेनासंबंधीं ? "

" नव्हे–नव्हे. " शृगालदत्तानें मध्येंच म्हटलें, " त्या–त्या मुला...."

" ज्याला तुम्ही काल मोक्ष दिलांत ? " अचेतनानें डोळे मिचकावून म्हटलें. शृगालदत्त जळून खाक झाला ! पण करतो काय ?

" तें मूल कुणाचें होतें ? " शृगालदत्तानें आतुरतेनें विचारिलें.

" हः ! " अचेतन हंसून म्हणाला. " ज्यावेळीं मीं तें आणिलें त्यावेळीं त्याच्या आईबापाचें नांव विचारायला मी विसरलों बोवा ! पण त्यावेळीं एक मोठी मजा झाली ! त्या पोराची आजी होती वाटतं ! ती लागली गडबड करायला ! मग काय ? " असें म्हणून त्यानें आपल्या गळ्यावर हात ठेवून म्हटलें, " हं ! "

" मारलीस कीं काय गळा दाबून ? " शृगालदत्तानें घाबरून विचारिलें, " पण ही गोष्ट कुठें घडली ? "

" हें जवळ खेडें आहेना ? "

" हं– " शृगालदत्त दुःखानें छातीवर हात मारून म्हणाला, " पुढें. "

" इकडून जातांना अगदीं रस्त्यावरच एक घर आहे–घर कसलं, एक खोपटें आहे– "

शृगालदत्तानें मध्येंच विचारिलें, " त्याजवळ एक विहीर आहे आणि एक वडाचें झाड ? "

" अगदीं बरोबर ताडलेंत ! "

" चांडाळा ! घात केलास रे घात ! " असें म्हणून शृगालदत्तानें हंबरडा फोडला. हें पाहून अचेतन आश्चर्यचकित झाला.

" माझें–माझें तें खोपटें ! " शृगालदत्त आपल्या कपाळावर हात

सोडून दे. अगदीं अखेरीस खोट्याच्या कपाळीं गोटाच असतो हें माझ्याच गोष्टीवरून जाणून घे." असें म्हणून शृगालदत्त तेथून तडक चालता झाला. अचेतन कुठें जातो हें सुद्धां त्यानें पाहिलें नाहीं. अचेतनही कांहीं विचार करीत दुसरीकडे निघून गेला.

शृगालदत्त आपल्या घरीं आला. पाहतो तों आपल्या झोंपडीभोंवतीं पुष्कळ लोक जमलेले त्यानें पाहिले. आपल्या पत्नीचें रडणेंही त्यानें ऐकलें. शृगालदत्ताला सर्व समजून चुकलें. त्याचा दुःखातिरेक झाला! तो झोंपडीजवळ आला! कांहीं लोक त्याच्या आईचें शव घेऊन जाण्याच्या तयारीला लागले होते. शृगालदत्तास पाहतांच एकानें पुढें येऊन पुढील हकीगत सांगितली.

" काल संध्याकाळीं दिवे लागणीच्या सुमारास एक राक्षस शृगालदत्ताच्या झोंपडींत शिरला! शृगालदत्ताची आई आपल्या नातवाला खेळवीत एका मिणमिणीत दिव्यापुढें बसली होती! त्या राक्षसानें एकदम आंत येऊन दिवा मालविला व म्हातारीच्या हातांतून त्या मुलाला घेऊन जाऊं लागला! पोर किंचाळ्या फोडूं लागलें; पण त्या राक्षसानें काय केलें ईश्वर जाणे. त्याचें ओरडणें बंद झालें; पण म्हातारी "चोर चोर!" म्हणून ओरडली. त्या नराधमानें तिचें नरडें दाबलें! आणि तेथून मुलासह पलायन केलें! इतक्यांत शृगालदत्ताची स्त्री बाहेरून आली. इत्यादि इत्यादि— "

वरील हकीगतींतील प्रत्येक शब्द तापलेल्या शिसाप्रमाणें शृगालदत्ताच्या कानांत शिरत होते. त्यानें अखेरचें वाक्य ऐकलें व एक किंचाळी टाकली! "पुत्रहत्या!" एवढें तो पुटपुटला व त्यानें आपलें अंग टाकलें!

त्या दिवशीं त्या गांवांत शृगालदत्ताच्या आईचें दहन झालें. दुसरे दिवशीं पुनः लोक शृगालदत्ताच्या झोंपडीसमोर एकत्र झाले! शृगालदत्तानें आत्महत्या करून घेतली होती! त्या दिवशीं शृगालदत्ताचें पापी शरीरही पंचत्वास पोंचलें! तिसऱ्या दिवशीं शृगालदत्ताची पत्नी चौघांच्या खांद्यावरून जातांना दिसली!

अशा प्रकारें आमच्या या नाटकांतील एक मुख्य पात्र पडद्याआड झालें!

## प्रकरण तिसावें.

# राजप्रासादांत.

जगाची रहाटी कांहीं विलक्षण आहे. एके ठिकाणीं गायनवादन चाललें आहे, हास्यरस उसळून राहिला आहे, सर्व प्राणी आपलें कसलेंही दुःख क्षणमात्र विसरून आनंदांत पूर्ण निमग्न आहेत असें दिसून येईल, तर दुसऱ्या ठिकाणीं रडारडी, हाहाःकार इत्यादि उद्वेगजनक प्रकार श्रवणपथावर येतील. तोच प्रकार जर आमच्या या कल्पनासृष्टींत दृग्गोचर होईल, तर आह्मास वाटतें, त्याबद्दल कोणाला आश्चर्य वाटणार नाहीं. अथवा असेंही समजावें कीं, काळ्यापुढें पांढरें ठेवल्यानें पांढरें विशेष खुलतें आणि त्याचमुळें गत प्रकरणापुढें हें प्रकरण लिहिलें आहे.

या, वाचकांनो ! आपण सद्गुणी कलेच्या झोंपडींत जाऊं.

प्रातःकालचा समय. सूर्यनारायण आपल्या कामावर रुजूं होऊन बराच वेळ झाला होता. कलाही आपल्या गृहकृत्यांत पूर्ण निमग्न होती. नवीनचंद्र कांहीं कामाकरितां नगरांत गेला होता. कला अंग धुऊन स्वयंपाकाच्या तयारीस लागणार इतक्यांत दया आली. कलेनें यथायोग्य तिचा आदरसत्कार केला. तिनें हंसत म्हटलें, " त्या दिवशीं मीं ते जिन्नस घेतले नाहींत ह्मणून आपल्याला बराच राग आला होता नाहीं ? मला वाटलं तुह्मी पुनः येणार नाहीं. " यावर दयेनेंहि हंसत उत्तर दिलें " नाहीं तरी मी येणार नव्हतेंच; पण ह्मटलं जाऊंया. "

" खरंच, " कलेनें मध्येंच स्मरण करीत विचारिलें, " आमची दाई तुह्माला ते दिवशीं भेटली कां ? "

" दाई ? " ह्मातारीनें आश्चर्यानें विचारिलें, " माया कीं काय ? "

" तीच. ती तुमची बहीण ह्मणे ! "

" बहीणच नव्हे सख्खी बहीण. "

" ती सध्यां कुठं आहे ? " कलेनें उत्सुकतेनें प्रश्न केला.

" इथेंच आहे. "

" तुमच्याचजवळ राहते ? "

" छे, पण तें राहूं दे." दया मध्येंच ह्मणाली, " मी कां त्या कामाकरितां आलें आहे, तें तर ऐकून घे. मला पुनः लवकर परत जायचें आहे."

" आतां आमच्या इथली मीठभाकर खाल्ल्याशिवाय मी जाऊं देणार नाहीं." कलेनें हंसत मध्येंच ह्मटलें.

" आज नगरांत मोठी मौज आहे. इंदूनें तुला आज आवश्य बोलावलें आहे."

" आज कसली मौज आहे शहरांत ?" कलेनें सहज विचारिलें.

" मौजही मोठी मजेची आहे बघ. आमचे महाराज ह्मणे कुठें गुप्तपणें प्रवासाला गेले होते. ते परत आले आहेत आणि त्यांची मिरवणूक आज निघणार आहे."

" अस्सं. तेव्हां आज मोठीच गडबड असेल नाहीं ?"

" छे, तें कांहीं विचारूं नकोस. आणखी तुला एक मजा सांगतें. आमचे महाराज ह्मणे आपल्याला एक राणीही घेऊन आले आहेत !" असें ह्मणत ह्मातारी दया खदा खदा हंसली.

कलेला तिच्या बोलण्याचा अर्थ समजला नाहीं. ती आश्चर्यानें बोलली, " मी तुमच्या बोलण्याचा अर्थ नाहीं समजलें."

" अग, त्यांत न समजण्यासारखें काय आहे !" ह्मातारी दया हंसत ह्मणाली, " प्रवासांहून परत येतांना त्यांनीं आपल्याकरितां एक नवरीही करून आणिली आहे."

" त्यांचें वय किती आहे ?" कलेनें आश्चर्य करीत विचारिलें.

" मीं कांहीं त्यांना पाहिलें नाहीं; पण ह्मणे तरुणच आहेत ते."

इतक्यांत नवीनचंद्र तेथें आला.

" ओहो ! आज सकाळींच इकडे कुठें ?" त्यानें हंसत प्रश्न केला.

" इंदूनें हिला बोलावली आहे."

" हिला एकटीलाच बोलावली आहे कीं ?" नवीनचंद्रानें मध्येंच थट्टेनें ह्मटलें. " बरोबर, आम्हाला कोण बोलावणार ? पण आपण नर न बोलावतांच येणार. हं स्वयंपाक जलदी होऊं दे हं !" अर्थात् हें वाक्य कलेला उद्देशून होतें. " आपणा सर्वांनाच आज शहरांत जावयाचें आहे."

अखेरीस दोघांनींही म्हातान्या दाईस जेवावयास ठेवून घेतलें. थोड्याच वेळांत स्वयंपाक आटपला व मागून सर्वांचीं जेवणीं आटपलीं. थोड्याच वेळांत तिघेही शहरांत जाण्यास निघालीं. बाहेर एक गाडी उभी होती. नवीनचंद्रानें ती आज मुद्दामच आणली होती. तिघेही येऊन गाडींत बसलीं. गाडीवानानें घोड्यास चाबूक चमकावला.

तेथून उज्जयिनी शहर कांहीं विशेष दूर नव्हतें. नवीनचंद्र तर नेहमीं शहरांत येत जात असे; पण कधीं कधीं संध्याकाळच्या वेळीं तो कलेलाही शहरांतील मोठमोठ्या मंदिरांत देवदर्शनास नेत असे. पण त्या वेळीं संध्याकाळच्या अंधारांत त्या नगराचें खरें स्वरूप कलेला दिसलें नव्हतें. दिवसा शहरांत जाण्याचा हा तिचा पहिलाच प्रसंग होता. त्यामुळें ज्यावेळीं गाडी शहरांतील राजरस्त्यावरून जाऊं लागली, त्यावेळीं ती खिडकींतून मोठ्या उत्सुकतेनें त्या भव्य व प्राचीन नगराची शोभा पाहूं लागली.

कथेचा ओघ ऐन रंगांत आला असतां एखादें कंटाळवाणें वर्णन करीत बसणें ह्मणजे वाचकांचा विरस करणें होय, अशी आमची समजूत आहे आणि दुसरें तसें वर्णन केलेंच तरी तें पुष्कळ वाचक अगदीं सोडून देतात याचाही आह्माला अनुभव आहे. तेव्हां ज्या भव्य नगरीची भव्य शोभा पहाण्यांत कला अगदीं गढून गेली होती, तिचें उगीच लांबलचक वर्णन न करतां येवढेंच सुचवितों कीं, आमच्या कथानकाच्या वेळीं उज्जयिनी आपल्या पूर्ण भरभराटींत होती. असो. अखेरीस गाडी एका भव्य वाड्यापुढें थांबली!

"हाच तुझ्या इंदूचा वाडा." दया कलेच्या कानांत पुटपुटली.

लागलीच तिघेही खालीं उतरलीं व वाड्यांत शिरलीं. गाडी पुढें चालती झाली. सर्वांपुढें नवीनचंद्र, त्याच्या मागून कला व तिच्या पाठीमागें दया अशाप्रकारें तिघेही वाड्यांत गेलीं. अजसेनाच्या दासी व इतर नोकरचाकर, नवीनचंद्र व दया यांना चांगल्याप्रकारें जाणत होते. कारण दया तर तेथेंच रहात असे व अलीकडे नवीनचंद्रही अजसेनाकडे जात येत असे. पण आज कलेला पहातांच वाड्यांत बरीच गडबड उडाली व त्यामुळें नवीनचंद्र आल्याची बातमी अजसेन व इंदूस तेव्हांच कळली. अजसेन नुकताच भोजन करून

उठला होता. त्याला ही बातमी समजतांच किती तरी आनंद झाला. इंदुमती तर कलेला भेटण्याकरितां अत्यंत उत्सुक होती; पण सध्यां ती सोंवळ्यांत होती.

" जायचं गडे, त्यांना इकडेच आणायचं. " इंदुमतीनें अजसेनास प्रार्थना केली.

इतक्यांत दयाच त्या दोघांना घेऊन तेथें आली व किंचित् लज्जित झालेल्या कलेला इंदुमतीच्यापुढें ढकलून म्हणाली, " ही तुझी मैत्रीण ! मार आतां गळ्याला मिठ्या. "

कलेला पाहतांच इंदुमतीला कसलेंही भान राहिलें नाहीं. ती सोंवळ्यांत होती तरी तिनें एकदम कलेच्या गळ्याला मिठी मारिली ! दोघींच्याही नेत्रांतून आनंदाश्रु वाहूं लागले. नवीनचंद्राचें हृदयही तो प्रकार पाहून व्यथित झालें. तो अजसेनास घेऊन तेथून निघून गेला.

दोन प्रेमळ अंतःकरणें एके ठिकाणीं मिळालीं असतां तो दृश्य किती हृदयद्रावक व तितकाच सुखकारक असतो, हें कल्पनेनें रेखाटतां येईल काय ! असो.

अखेरीस इंदुमतीनें हंसत हंसत थट्टेनें म्हटलें, " एकंदरींत बाईसाहेबांनीं येऊन दर्शन दिलं म्हणायचं. " असें म्हणून तिनें आपल्या एका दासीला हाक मारून जेवणाचीं ताटें मांडण्यास सांगितलें. कला व दया जेवाव-याच्या असतील अशी तिची कल्पना झाली व म्हणून ती म्हणाली, " हं–मग पाय धुवा तर–आपण जेऊन घेऊं आणि मग बोलत बसूं. "

" पण मग बोलत बसायला वेळ कुठें आहे ? " दया मध्येंच म्हणाली, " आज आपणांस राजवाड्यांत जायचं आहे. "

" समजलं. आज नाहीं उद्यां जातां येईल. " इंदुमती आनंदानें म्हणाली, " आतां मी यांना ( कलेला ) लवकर थोडीच जाऊं देणार ! आहे हं उठा आतां गडे. "

" पण मी जेऊन आलें आहें. " कलेनें उत्तर दिलें.

कलेचें उत्तर ऐकतांच इंदुमतीला अत्यंत आश्चर्य वाटलें व तितकेंच दुःखही पण झालें. कला जेवणखाण करून येईल, अशी तिची मुळींच कल्पना नव्हती. ती दुःखानें म्हणाली, " आपण जेऊन आलांत अं ? हें कांहीं आपलं घर नाहीं असंच ना ? बरोबर आहे. " आणि तिच्या

डोळ्यांत अश्रु आले. इंदुमतीचें हें बोलणें इतकें कारुण्यजनक होतें कीं, कलेला तिला काय उत्तर द्यावें हेंच सुचेना. तिनें इंदुमतीचा हात आपल्या हातांत घेऊन प्रेमानें म्हटलें, " असं आपण कां बरं वाईट वाटून घेतां ? मी आपल्याला परकी कां समजतें ! पण ज्यावेळीं दया आली त्यावेळीं मी स्वयंपाकाला लागलें होतें. "

यावर दयेनेंही इंदुमतीला तेंच कारण सांगून म्हटलें, " आज मलाही हिच्या पंक्तीचा लाभ झाला. "

तरीही इंदुमतीचें म्हणण्यासारखें समाधान झालें नाहीं. ती म्हणाली, " तुमची मर्जी पण आज संध्याकाळीं मात्र मी सोडणार नाहीं बरं कां ? " कलेनें संध्याकाळीं राहण्याबद्दल अभिवचन दिलें.

उज्जयिनींत जीं कांहीं प्रतिष्ठित घराणीं होतीं, त्यांत अजसेनाचें घराणें प्रमुख होतें. त्यामुळें राजवाड्यांतून नेहमीं इंदुमतीला थोरल्या राणी-साहेबांकडून व अजसेनास दरबारकडून वारंवार लहानमोठ्या प्रसंगीं हटकून बोलावणें येई. आजही दरबार होणार होता. अर्थात् दोघांही पतिपत्नींना आदरपूर्वक निमंत्रण देण्यांत आलें असून आपल्या इष्ट-मित्रांनाही घेऊन येण्याविषयीं विनंती केली होती. त्यामुळें इंदुमतीनें कलेला आज राजदरबारांतील समारंभ दाखवून आणण्याचें योजलें होतें. म्हणून तिनें सकाळींच दयेला कलेकडे पाठविलें. असो.

इंदुमतीचें भोजन आटपतांच दासदासी मंडळी राजवाड्यांत जा-ण्याच्या तयारीस लागली. इंदुमतीनें कलेला एकीकडे नेऊन प्रेमानें म्हटलें, " माझी एक विनंति आहे ऐकाल कां ? "

" काय ? " कलेनें आश्चर्यानें विचारिलें.

" माझ्या मनांत आज तुम्हाला वाड्यांत चांगल्या थाटांत न्यायचं आहे. खरं सांगूं, तुम्ही खरोखरच फार सुंदर आहांत. दागिने वगैरे घातल्यावर अशा शोभाल कीं, जशा राजाच्या राणीच. "

कलेला हंसूं आलें. तिनें स्पष्टपणें ती गोष्ट नाकारली !

" कां बरें ? इंदुमतीनें दुःखानें प्रश्न केला. "

कला गंभीरपणें उत्तरली, " पुष्कळ–पुष्कळ कारणांनीं दागिने वगैरे घालणं मला आवडत नाहीं. खरं सांगूं तुम्हाला, आम्ही अगदीं गरीब असूनही तुम्ही दोघंही नवराबायको आम्हां दोघांवर जें प्रेम करतां व

आमच्याशीं जें बरोबरीच्या नात्यानें वागतां, तेंच आम्हांला पुष्कळ आहे. मी जास्त कांहीं इच्छित नाहीं. "

इंदूनें पुष्कळ आग्रह केला; पण कलेनें ती गोष्ट मान्य केली नाहीं. थोडयाच वेळांत निघण्याची सर्व तयारी झाली. अजसेन व नवीनचंद्र घोडयाच्या गाडींत बसून पुढें निघाले. इंदुमती व कला मेण्यांत बसून त्यांच्या मागोमाग चालल्या. इतर इतमाम मागें पुढें चालला होता.

थोडयांच वेळांत ही लहानशी स्वारी राजप्रासादांत जाऊन पोहोंचली. त्यावेळीं राजवाड्यांत मारे धामधूम उडून राहिली होती. अजसेन नवीनचंद्रासह गाडींतून खालीं उतरला. इंदुमती व कला मेण्यांतून बाहेर पडल्या बाहेर पडतांच नवीनचंद्रानें कलेला एकीकडे बोलावून हलकेंच म्हटलें, " आतां आपण यांच्यापासून दूर झालेलें बरें. कारण—पण तें तुला सांगायला नको आहे. आज राजवाडा पहाण्याची सर्वांस पूर्ण मोकळीक आहे. आपण राजवाड्यांतच जाऊं. या बड्या मंडळींबरोबर राहण्यानें आपला निभाव लागणार नाहीं. "

कलेला हें भाषण पूर्ण पटलें; पण असें केल्यास इंदुमतीला फार वाईट वाटेल, म्हणून ती म्हणाली, " पण इंदुमतीला हें आवडणार नाहीं ! "

" हंः त्याची नको काळजी. मी करतों सर्व व्यवस्था. " असें म्हणून तो अजसेनाजवळ आला व म्हणाला, " आतां आम्हा दोघांनाही इथें एका ठिकाणीं भेटायला जायचंय् तेव्हां तुमच्या बरोबर आतां आम्हांला येतां येत नाहीं. " असें म्हणून नवीनचंद्र तेथून कलेकडे आला व तीं दोघेंही गर्दीत इंदुमतीस दिसेनाशीं झालीं.

" हंः ? हें काय ? ते कुठें गेले ? " इंदुमतीनें अत्यंत विस्मयानें आपल्या पतीस विचारिलें. नवीनचंद्रानें जें कारण अजसेनाला सांगितलें होतें, तेंच इंदुमतीला सांगितलें. इंदुमतीला किती दुःख झालें असेल याची कल्पनाच केली पाहिजे. आपलें दुःख तसेंच दाबून ती आपल्या दासीसह अंतःपुरांत गेली. अजसेन दरबारांत पोहोंचला.

इकडे नवीनचंद्र व कला गर्दीत गेल्यावर कला म्हणाली, " आपण आलों आहोंत खरें, पण इंदुमतीला किती वाईट वाटेल ! "

' वाटेना कां ? " नवीनचंद्र कांहींशा हेतुपूर्वक स्वरांत म्हणाला, " आपण तिला लवकरच खुश करूं. "

आपल्या पतीचें हें भाषण ऐकून कलेला बरेंच आश्चर्य वाटलें. तिनें त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलें, तो आज विशेष प्रफुल्लित दिसत होता.

" आज एवढा कसला बरं आनंद झाला आहे ? " कलेनें उत्सुकतेनें विचारिलें. यावर नवीनचंद्रानें तिचा हात प्रेमानें दाबून म्हटलें, " आनंद ? आज इथें कोण बरें दुःखी आहे ? पण हें पहा, आपण आतां राजवाडा पाहूं. " असें ह्मणून नवीनचंद्र त्या प्रासादांतून आपल्या पत्नीला एकेक भाग दाखवीत घेऊन जाऊं लागला. त्याच्या जाण्याला कोणींही अडथळा केला नाहीं व तोही एखाद्या ओळखीच्या मनुष्याप्रमाणें एका दालनांतून दुसऱ्या दालनांत एका दिवाणखान्यांतून दुसऱ्या दिवाणखान्यांत जात होता. कलाही तेथील वैभव गंभीरपणें पहात आपल्या पतीचा हात धरून चालली होती.

अशा प्रकारें फिरतां फिरतां तें जोडपें एका मोठ्या भव्य दिवाणखान्यांत आलें. तेथें मध्यभागीं एका मोठ्या वर्तुळाकार मेजावर कांहीं वस्त्रें ठेविलीं होतीं. दोघेंही त्या मेजाजवळ गेलीं.

" हा राजा राणीचा पोषाक दिसतो नाहीं ? " नवीनचंद्रानें कलेकडे पहात विचारिलें.

" असेल कदाचित्. " कलेनें उत्तर दिलें.

" किती सुंदर आहे ? " नवीन चंद्रानें त्या पोशाकाकडे पहात म्हटलें.

" राजाचाच जर तो पोषाख, तर सुंदर कां असणार नाहीं ? " कलेनें म्हटलें.

" कले, " नवीनचंद्रानें तिच्याकडे पहात म्हटलें, " माझ्या मनांत एक विलक्षण कल्पना आली आहे. "

" कसली ? " कलेनें स्तिमित होऊन प्रश्न केला.

" हा राणीचा पोषाख— या पोषाखांत तूं कशी बरं दिसशील ? "

" इश्श ! हें काय भलतंच ! " कलेनें किंचित् लाजून म्हटलें.

" हे बोला, माझी तर अत्यंत इच्छा आहे कीं, तुला या पोषाखांत पहावी. " असें म्हणून नवीनचंद्रानें त्या पोषाखास हात घातला.

" हें काय ? " कला जरा घाबरून ह्मणाली, " कुणी पाहील तर काय ह्मणेल ? हात लावूं नये गडे. " असें ह्मणून तिनें नवीनचंद्रास मागें खेंचलें.

---

## प्रकरण एकतिसावें.

## सद्‌गुणविजय.

पण नवीनचंद्र कसचा ऐकतो ? त्यानें त्या पोषाखांतील कांहीं अमूल्य भूषणें उचलून तीं कलेला दाखवीत म्हटलें, " या रत्नखचित् अलंकारांनीं तूं किती चांगली दिसशील ? "

त्याचें हें वर्तन पहातांच कला आश्चर्यानें भांबावून गेली. आपल्या पतीच्या डोक्यांत हें असलें विचित्र वेड कसें शिरलें याचें तिला अत्यंत आश्चर्य वाटलें. जर तेथील एखाद्या राजसेवकानें हें पाहिलें, तर तो आपल्याविषयीं काय शंका घेईल, याची कलेस भीति वाटली व ती भीतभीत चोहोंकडे पहात म्हणाली, " हें काय हें ? कुणीं एखाद्या नोकरानं पाहिलं तर आपणाला तो सभ्य समजेल कां ? चलावं गडे, आपण दुसरीकडे जाऊं ! हें पहा कुणी आलं वाटतं ! ठेवा—ठेवा ते जिन्नस ! " कला अगदीं हलक्या स्वरांत घाबरून म्हणाली.

" हंः " नवीनचंद्र निष्काळजीपणें म्हणाला, " त्याची नको काळजी. इकडे अद्याप कोणी आलं नाहीं आणि आलंच तर काय करील ? पण मी हीं येण्याजाण्याचीं दारेंच बंद करतों ! " असें म्हणून नवीनचंद्रानें ते जिन्नस जागच्या जागीं ठेवले व त्यानें जाऊन खरोखरच दोन येण्याजाण्यास उघडीं असलेलीं दारें लावलीं. आणखीही दोन दारें त्या महालाला होतीं; पण तीं पलीकडून बंद केलेलीं दिसत होतीं. नवीनचंद्रानें सर्व बंदोबस्त ठीक झालेला पाहून कलेजवळ येऊन म्हटलें, " हं आटप, आतां कुणाचीही भीति नाहीं. "

" चांगलं. " कला एकंदर प्रकार पाहून घाबरून म्हणाली. " भीति कसलीही नाहीं; पण आपल्या डोक्यांत आज हें काय वेड शिरलं आहे ? "

" एकदां तुला राणीच्या पोषाखांत पहावी. " नवीनचंद्रानें हंसत हंसत म्हटलें.

" हें कांहीं चांगलं नाहीं गडे ! " कला दुःखानें म्हणाली, " कुणीं पाहिलं तर फुकट अब्रु मात्र जायची ! "

" अग, पुढचं पुढें पहातां येईल. हं आटप. इतक्या वेळांत तूं सजून तयार सुद्धां झाली असतीस. " नवीनचंद्रानें कांहींसें गंभीरपणें म्हटलें.

इतका वेळ कलेला आपला पती आपली थट्टा करीत असावा, असें वाटलें होतें; पण आतांचें त्याचें सांगणें त्याच्या मुद्रेवरून खरें भासत होतें. ती आश्चर्यानें बोलली, " अगदीं खरंच कां बोलायचं हें ? "

" नाहीं तर तुला काय वाटलें ? " नवीनचंद्र गंभीरपणेंच पुढें म्हणाला, " मी अगदीं खरं तेंच सांगतों कीं, आज तूं हा राणीचा पोषाख करावास. "

कला आश्चर्यानें थक्क होऊन आपल्या पतीकडे कितीवेळ तरी पहात राहिली.

" हं आटप. माझ्याकडे पहात उभी राहूं नकोस. " असें म्हणून त्यानें तिला आपल्याजवळ खेंचली व त्या पोषाखांत असलेली उंची चंद्रकळा नेसण्याकरितां कलेच्या हातांत दिली. मोठ्या कष्टानें तिनें ती आपल्या हातांत घेतली व पुटपुटत म्हटलें, " आपली आज्ञा मी मोडूं इच्छित नाहीं; पण याचा परिणाम कांहीं चांगला होणार नाहीं. "

यावर नवीनचंद्र हंसला. अखेरीस लाजत, भीत, मोठ्या कष्टानें कलेनें राणीचा पोषाख करण्यास सुरवात केली. नवीनचंद्र चोरून तिच्याकडे पहात, हंसत, इकडे तिकडे फिरूं लागला.

थोड्याच वेळांत कला हलकेंच म्हणाली, " हं हें पहा झालं. "

" वा ! " नवीनचंद्र तिच्याजवळ येऊन म्हणाला, " अद्याप हे दागिने, हा शालू, हा पुष्पहार सर्व तसेंच राहिले कीं ! " असें म्हणून नवीनचंद्र स्वतः तिच्या अंगावर एकेक भूषण चढवूं लागला. यावेळीं कलेची मानसिक अवस्था काय झाली असेल, याची ज्याची त्यानें आपणांशींच कल्पना करावी. अल्प कालांत नवीनचंद्रानें आपल्या पत्नीस सर्वप्रकारें सजवून तयार केली. तो चार पांच पावलें मागें हटून तिला नखशिखांत कांहीं प्रेमानें, कांहीं कौतुकानें पहात हंसत म्हणाला " अः! आतां तुला कोण राणी नाहीं म्हणणार ? हें पहा, या मोठ्या आरशांत आपलें रूप पहा ! " असें म्हणून त्यानें जवळच्या एका मोठ्या आरशा-वरला लाल पडदा बाजूला सारीत पुढें म्हटलें, " कां आहेना ? "

कलेनें लाजत लाजत आरशांत आपलें रूप पाहिलें. खरोखरीच कला यावेळीं एक रूपसंपन्न अप्सराच दिसत होती! अगोदरच कला लावण्यखनी आणि त्यांत राणीसारखा शृंगार!

" हं झालं ना! चलायचं आतां! मी काढतें आतां सर्व. " कलेनें उतावळीनें म्हटलें.

पण नवीनचंद्र मध्येंच तिला म्हणाला, " हं हं हें काय? मला पाहूं दे तर खरं. इतकी गडबड कां? "

" जसं कांहीं हें आपलंच घर आहे नाहीं! " कलेनें कांहीं थट्टेनें, कांहीं थोडें उद्वेगानें म्हटलें.

" हं: त्यांत काय आहे? " नवीनचंद्र निष्काळजीपणें म्हणाला, " घटकाभर हें आपलें मानलें म्हणून काय झालें? "

" आतां ही थट्टा पुरे गडे! " कलेनें अगदीं रडकुंडीला येऊन म्हटलें. आपल्याला इतकी भीति वाटते आणि आपला पती इतका निष्काळजी कसा, याचें कलेस राहून राहून आश्चर्य वाटत होतें.

" खरेंच. कले, या राणीच्या पोषाखांत कीं नाहीं तूं फारच शोभ-तेस बघ. " नवीनचंद्र तिच्याकडे पहात म्हणाला.

इकडे कलेला आपण इथून केव्हां जाऊं असें झालें होतें. पण नवीनचंद्राला कांहीं तेथून जाण्याची उत्सुकता दिसत नव्हती. त्यानें जवळच पडलेल्या खुर्चीवर बसत म्हटलें, " कला, तूं एक अनुपम सुंदरी आहेस नाहीं? इथला राजा जर तुला पाहील, तर खात्रीनें मला कैदेंत टाकून तुला माझ्यापासून उपटून घेऊन जाईल. "

"काय ही थट्टा "! कलेला आतां राहवेना. ती क्रुद्धित होऊन आपल्या पतीला म्हणाली, " हें काय योजलं आहे आज? असली थट्टा करून माझा प्राण कां घ्यायचा आहे! "

" छे छे, " तरीही नवीनचंद्र निष्काळजीपणें म्हणाला, " तसं नाहीं कांहीं म्हटलं—तुला— "

इतक्यांत जवळचें एक बंद असलेलें द्वार उघडलें गेलें व एक सुंदर तरुणी आंत आली!

भीतीनें कला पांढरी फट्ट झाली! नवीनचंद्रही घाबरून उठला!

" कोण तुम्ही? " ती तरुणी क्रोधाविर्भावानें त्या दोघांस उद्देशून

म्हणाली, " काय ग ए, राणीचा पोषाख घालावासा वाटतो नाहीं कां! थांब हं! चोर कुठले! आतां पकडून पाठवितें!"

कलेला दुसरें कांहीं सुचलें नाहीं. तिनें त्या तरुणीपुढें साष्टांग प्रणिपात घातला व म्हटलें, " क्षमा-क्षमा!"

हा प्रकार पहातांच ती तरुणी चमकून मागें सरली व तिनें अर्थपूर्ण दृष्टीनें नवीनचंद्राकडे पाहिलें. नवीनचंद्रानें कसलासा इषारा केला.

ती कलेला उठवीत म्हणाली, " उठ-उठ! तुला हें कुणीं सांगितलं?"

कला आपल्या पतीचें नांव थोडेंच सांगणार? ती खालीं मान घालून अस्फुट स्वरांत म्हणाली, " मला वाटलं- "

" राणीचा पोषाख करावा?" त्या तरुणीनें किंचित् स्मित करून विचारिलें.

नवीनचंद्र मध्येंच भ्यालल्यासारखें करून म्हणाला, " छे छे, ही खोटें बोलते. मींच तिला तो पोषाख घालण्यास सांगितलें- "

" असंच वाटतं. ही-ही मित्री आहे. हें तुझंच काम दिसतं." ती तरुणी मुद्दाम गंभीरपणा आणून म्हणाली, " पण याबद्दल आतां काय शिक्षा भोगावी लागेल माहीत आहे?" आणि त्या तरुणीनें आपली हास्याची उकळी मोठ्या मुष्किलीनें दाबली. यावेळीं कलेनें जर वर पाहिलें असतें तर चाललेल्या प्रकारांत कांहीं तरी गूढ भेद आहे, असें तिला वाटलें असतें; पण ती इतकी लाजली, इतकी घाबरली कीं, तिनें मुळींच वर पाहिलें नाहीं.

" काय बरं शिक्षा आहे?" नवीनचंद्रानें आपलें हंसें दाबित विचारिलें.

" मोठी कडक शिक्षा आहे! पण कायरे, तुम्ही दोघं नवराबायको दिसतां नाहीं?"

" होय सरकार." नवीनचंद्रानें उत्तर दिलें.

" मग आतां तुला शिक्षा तर होणारच!" ती तरुणी नवीनचंद्रास म्हणाली, " आणि ती फार कडक होईल. तेव्हां त्यापूर्वी मी तुला एक शिक्षा करते. तुझी बायको तर राणी बनलीच. तूंही हा दुसरा पोषाख घालून राजा बन पाहूं!"

" मग मला एखादं लहान मोठं राज्य द्यावं लागेल."

आपला पती अशा वेळींही थट्टा करतो हें पाहून कलेस अत्याश्चर्य वाटलें. पण तिनें वर कांहीं पाहिलें नाहीं.

" हं आटप ! पाहूं–या आमच्या राणीसाहेबांना– " ती तरुणी आमच्या लज्जित कलेला हलवीत म्हणाली, ' आपण कसें काय शोभतां तें ? "

" आणि जर नाहीं शोभलों तर ? "

" मग मी ही राणी इथेंच ठेवून घेईन. तुला वेडगळाला असली सुंदर राणी काय करायची ? "

" आणि जर शोभलों तर मात्र राजा करावं लागेल हो ! "

यावेळीं मात्र कलेनें विस्मयानें आपल्या पतीकडे पाहिलें. नवीनचंद्र पोषाख घालूं लागला होता. ती तरुणी त्याच्याकडे स्मित वदनानें पहात होती. तिनें मध्येंच कलेकडे पाहिलें. कला पुनः खालीं पाहूं लागली. लवकरच नवीनचंद्र पोषाख करून तयार झाला.

" कां शोभतो कां नाहीं आतां राजा ? " नवीनचंद्रानें त्या तरुणीस विचारिलें.

" पहा पहा ! वहिनीसाहेब, आपल्या पतीराजाकडे पहा हो ! " ती तरुणी कलेचें मुख वर करीत एकदम म्हणाली आणि हंसूं लागली.

" हं: हें काय ग ताई ! सर्व मजा बिघडविलीस." नवीनचंद्र मध्येंच बोलला.

" काय करावं दादा, आतां राहवेना गडे "

आणि दोघेही आश्चर्यचकित् झालेल्या कलेकडे पाहून खदा खदा हंसूं लागलीं ! कला त्या दोघांकडे आळीपाळीनें पहात राहिली. तों काय नवीनचंद्राच्या व त्या तरुणीच्या चर्येंत विलक्षण साम्य तिनें पाहिलें ! त्यावेळीं कलेला किती आश्चर्य वाटलें, तें कल्पने बाहेर आहे. " हें मी काय पहातें ! " असें म्हणत ती अत्याश्चर्यानें भोंवळ येऊन खालीं पडणारच होती; पण लागलींच नवीनचंद्रानें तिला सांवरलें व हलकेंच तिच्या कानांत म्हटलें, ' हा सद्गुण विजय आहे ! आज तूं या उज्जयिनीच्या महाराजाधिराजा बलाढ्य विक्रमार्काची पट्टराणी आहेस."

" काय म्हटलें ? " असें म्हणून कलेनें विक्रमार्काकडे– आतां आपण नवीनचंद्राला याच नांवानें ओळखूं– पाहिलें. ती अगदीं गोंधळून

गेली ! विक्रमार्कानें तिला एका खुर्चीवर बसविलें. मी म्हणजे विक्रमार्काची बहीण असून तिचें नांव उषा होतें. ती कलेच्या जवळच दुसरी एक खुर्ची ओढून त्यावर बसली. विक्रमार्कही एक खुर्ची जवळ करून त्यावर बसला.

" कले, तूं शांत झालीस ? " विक्रमार्कानें प्रेमानें विचारिलें.

कलेला अद्यापपर्यंत कांहींच उमज पडला नव्हता. ती आळीपाळीनें आपल्या पतीकडे व नणदेकडे— अर्थात् उषेकडे पहात होती.

वरील प्रकार इतका आश्चर्यकारक व अनपेक्षित होता कीं, तो पाहून कोणीही मनुष्य आश्चर्यानें सहज घाबरून गेला असता. मग कलेसारख्या अबलेची स्थिति काय ? कितो वेळ तरी कला त्या दोघां-कडे शून्य दृष्टीनें पहात होती. तिच्या नेत्रांस बाहेर चाललेलें सर्व कांहीं दिसत होतें. कानांस सर्व कांहीं ऐकूं येत होतें; पण त्याचें पूर्ण ज्ञान तिला होत नव्हतें. अखेरीस उषेनें तिच्या टाळूवर थोडें गुलाब-पाणी शिंपडलें.

" दादा, " उषा विक्रमार्काला उद्देशून म्हणाली, " आतां इथें फार वेळ घोटाळतां उपयोगीं नाहीं. दरबारांत लोक तुमची वाट पहात आहेत. आई वगैरे मंडळी तिकडे वाट पहात आहेत. "

" हिला जरा शुद्धीवर येऊं दे. " विक्रमार्क कलेकडे पाहून म्हणाला.

आतां कुठें कलेला विचार करण्याची शक्ति थोडी थोडी येऊं लागली. " हा काय घोटाळा आहे, मला नीट समजावून सांगा. " असें कलेनें केविलवाण्या स्वरांत म्हटलें. ती तिची विनंति त्या दोघांनाही होती.

विक्रमार्कानें आपली खुर्ची कलेच्या खुर्चीजवळ आणिली व तिचा हात आपल्या हातांत घेऊन प्रेमळ स्वरांत म्हटलें, " कले, झोंपडींत असतांना एके दिवशीं मीं तुला काय म्हटलें होतें त्याची आठवण आहे ? मी तुला सहज थट्टेनें त्या दिवशीं म्हटलें होतें कीं, ' कले, मी जर कोणी मोठा मनुष्य असलों व तुझी परीक्षा पहाण्याकरितां तुला या झोंपडींत आणून ठेविलें असें ' इत्यादि म्हटलेलें तुला आठवतें ?"

कलेला त्या दिवशींची पूर्ण आठवण झाली. त्यादिवशीं तिला ती एक प्रकारची थट्टा वाटली; पण आजचा प्रकार कांहीं भलताच निघाला. त्यावेळीं क्षणमात्र कलेला इतकेंच वाटलें होतें कीं, आपला पती म्हणतो;

त्याप्रमाणें तो जर खराच कोणी मोठा असेल, तर फार झालें तर एखादा मोठा सावकार असेल, अगर एखादा सरदार असेल, इत्यादि. पण तो राजा उज्जयिनीचा महाराजाधिराज बलाढ्य विक्रमार्क असेल, अशी तिला कल्पनासुद्धां नव्हती.

" मग चाललेला हा प्रकार खरा कीं थट्टा ? " कलेनें आपल्या नेत्रांवरून हात फिरवून विचारिलें.

" अगदीं खरा आहे. आज मी एक गरीब नवीनचंद्र नसून राजा विक्रमार्क आहें. तूं यःकिंचित् कला नसून माझी पट्टाभिषिक्त राणी प्रभावती आहेस. ही तुझ्याजवळ बसलेली तुझी नणंद आहे व तुझी सासू तुला प्रेमालिंगन देण्याकरितां, तुझी मैत्रीण कुमुदिनी व बकुळी, पितृतुल्य महाराजा धर्मचंद्र, बंधुवत विमलचंद्र, अजसेन, इंदुमती इत्यादि सर्व मंडळी तुझी भेट घेण्याकरितां पलीकडच्या महालांत तिष्ठत आहेत. आतां तरी तुला सर्व उलगडा पडला ? "

कलेला आतां सर्व समजलें ! तिनें दोघांकडेही साश्रु नयनांनीं पाहिलें व ती खुर्चीवरून उठत ह्मणाली, " महाराज ! राणी शोभण्यासारखी मी नाहीं. आपण माझा हा उगीच मान करतां आहां. "

" छे छे, प्रभावती, " विक्रमार्कानें तिला खुर्चीवर बसवीत म्हटलें, " त्याविषयीं तूं मला वचन दिलें आहेस कीं, जें थोर पद प्राप्त होईल त्याला अनुरूप अशीच मी वागेन. आज तूं राज्ञी पदावर आरूढ आहेस ! तुला हें केलेंच पाहिजे. "

" पण-पण-" कलेनें मध्येंच म्हटलें.

" पण-पण कांहीं नाहीं. उठ आतां. तुला सर्व समजलें. आतां आपण आपल्या वडील मंडळींचा आशीर्वाद घेण्यास जाऊं व उज्जयिनीची सर्व प्रजा आपल्या राजा राणीचें दर्शन घेण्यास उत्सुक आहेत तेव्हां त्यांची इच्छा पूर्ण करणें आपलें कर्तव्य आहे. " असें ह्मणून त्यानें प्रभावतीचा ( कलेलाही आपण यापुढें प्रभावती या नांवानें ओळखली पाहिजे. ) हात धरून तिला उठविलें. प्रभावतीच्या शरीरांत एक नवजीवन प्राप्त झालें. राज्ञीपदाला शोभण्यासारखी एक विलक्षण प्रभा तिच्या चेहऱ्यावर झळकूं लागली. आपल्या पतीच्या मागोमाग ती गंभीर मुद्रेनें चालूं लागली. उषा त्यांच्या मागून जाऊं लागली.

त्या तिघांनीही दुसऱ्या महालांत प्रवेश केला. विक्रमार्कानें सांगितल्याप्रमाणें तेथें सर्व मंडळी मोठ्या उत्सुकतेनें उभी असलेली तिच्या दृष्टीस पडली ! विक्रमार्क व प्रभावती आंत येतांच—

" महाराजा विक्रमार्क व राणी प्रभावती चिरायु राहो ! ! ! "
अशी आनंदाची आरोळी वातावरणांत घुमूं लागली.

राजमाता एका भव्य खुर्चीवर बसली होती. तिच्या पाठीमागें कुमुदिनी, इंदुमती व बकुळी नम्रतापूर्वक उभ्या होत्या. थोड्या अंतरावर इतर दासी उभ्या होत्या. पुढच्या बाजूस महाराजा धर्मचंद्र, विमलचंद्र व अजसेन इत्यादि मंडळी उभी होती.

महाराजा विक्रमार्क व प्रभावती राजमातेपुढें जाऊन खालीं मान घालून उभी राहिली ! राजमातेनें उठून दोघांच्या मस्तकार हात ठेवला व योग्य तो आशीर्वाद दिला. नंतर तिनें आपल्या सुनेला—( लज्जित प्रभावतीला ) दृढ आलिंगन दिलें व तिचें मस्तक अवघ्राण केलें. नंतर विक्रमार्कानें प्रभावतीसह धर्मचंद्रास आदरपूर्वक नमन केलें. वृद्ध धर्मचंद्रानें साश्रु नयनांनीं त्या दोघांस अशीर्वाद दिला. नंतर तो प्रभावतीला आपल्या पोटाशीं धरून म्हणाला, " पोरी कले—नव्हे—प्रभावती, तुझ्याविषयीं मला फार काळजी होती. ईश्वर कृपेनें तूं आज आमची राणी झाली आहेस ! ईश्वर तुला सुखी राखो ! " नंतर प्रभावतीनें अजसेन व विमलचन्द्र यांनाही नमस्कार केला. त्या दोघांनींही तिला आशीर्वाद दिला. त्यांच्या मनांत तिच्याविषयीं एक साहजिक प्रेम उत्पन्न झालें होतें. प्रभावतीलाही त्या दोघांविषयीं अत्यंत प्रेम वाटत होतें.

आपल्या घरीं येणारा नवीनचंद्र महाराजा विक्रमार्क आहे, हें आतां कुठें वेड्या अजसेनाला कळलें. विमलचंद्राला तें पूर्वीपासूनच माहीत होतें. ज्यावेळीं विक्रमार्क अजसेनाला भेटला, त्यावेळीं अजसेनास बरील भीति वाटली. कारण तो नवीनचंद्राबरोबर बऱ्याच सलगीनें वागला होता.

" मला माहीत नसतां, आपल्याशीं मी बऱ्याच सलगीनें वागलों याबद्दल मला क्षमा कराल काय ? " अजसेन पुटपुटला.

" छे छे, अजसेन, " विक्रमार्क प्रेमानें म्हणाला, " माझें नांव पाल-

टलें म्हणून माझा स्वभाव पालटणार नाहीं. मी आतां राजा झालों तरी मागच्या प्रमाणें मी वारंवार तुमच्या घरीं येणारच. बरें आतां दरबारांत चलायचें ना ? " असें त्यानें धर्मचंद्र वगैरेस उद्देशून म्हटलें. लागलींच विक्रमार्क, अजसेन, विमलचंद्र, धर्मचंद्र वगैरे पुरुष मंडळी दरबारांत गेली.

पण वरील प्रकार घडत असतांना विमलचंद्राचें मन कुठें घोंटाळत होतें, माहीत आहे ? बकुळीच्या सौंदर्यांत ! तेथून जातां जातां तो बकुळीकडे प्रेमभरानें पहात पुटपुटला. " जगांत सुंदर स्त्रिया आहेत तरी किती ? किती कोमल सौंदर्य आहे हें ! "

पुरुष मंडळी निघून गेल्यावर राजमाताही तेथून उठून गेली. कारण आपल्या समक्ष प्रभावतीशीं, कुमुदिनी, बकुळी, इंदुमती वगैरे तिच्या मैत्रिणींना मन मोकळें करून बोलतां येणार नाहीं, असें तिला वाटलें व ती तिची कल्पना खोटी नव्हती. ती तेथून निघून गेली. उषा मात्र तेथेंच राहिली.

---

## प्रकरण बात्तिसावें.

## राणीप्रभावती व तिच्या सख्या.

आतां त्या महालांत प्रभावती, कुमुदिनी, इंदुमती, बकुळी, उषा, इत्यादि मैत्रिणीच राहिल्या. त्यापैकीं प्रभावती, कुमुदिनी व बकुळी या एका वयाच्या म्हणजे अठरा एकोणिसाव्या दरम्यान होत्या व इंदुमती आणि उषा वीस वर्षें मागें टाकून एकविसाव्या वर्षाकडे धांव घेत होत्या. सर्व तरुण होत्या, सर्व एकापेक्षां एक किंवा आपआपल्या परी सुंदरी होत्या. प्रभावती व बकुळी आपल्या कोमल लावण्यानें चित्तहरण करीत होत्या तर कुमुदिनी व उषा आपल्या रसरशीत सौंदर्यानें हृदयास चटका लावणाऱ्या होत्या. इंदुमती आपल्या गंभीर सुंदरतेनें शोभायमान होती. एक बकुळी शिवाय सर्वांचा नुकताच विवाह झाला होता.

प्रभावती तर एका बलाढ्य राजाची पत्नी होती, कुमुदिनी एका मांडलिक राजाची कन्या व विमलचंद्रासारख्या अत्यंत धनाढ्याची धर्मपत्नी होती. इंदुमती अजसेनासारख्या सावकाराची स्त्री होती. राहिली उषा–ती विक्रमार्काची बहीण व उज्जयिनीच्या दरबारांतील प्रमुख मंत्र्याची सून असून तेथील उपसेनापतीची सहधर्मिणी होती. अशाप्रकारें तेथें असलेल्या सर्वजणी समानशीलाच्या व गुणाच्या असल्यामुळें त्यांच्यांत परस्परांत दाट मैत्री होण्यास कशाचाही अडथळा नव्हता. असो. परिचय समारंभ तर आटपलाच. आतां आपण कथानकाकडे वळूं.

थोड्या वेळापूर्वी कला ही एक मोठ्या योग्यतेची असेल, अशी कोणासही कल्पना नव्हती. त्यामुळें ज्यावेळीं त्यांना (कुमुदिनी बकुळी व इंदुमती यांना) कलेची खरी योग्यता समजली, त्यावेळीं तिच्या विषयीं कोणासही वैषम्य न वाटतां प्रत्येकीला ती तशा पदाला योग्य आहे, असेंच वाटलें व सर्व तिला भेटण्याकरितां अत्यंत उत्सुक झाल्या. पण राजमाता उठून जाईपर्यंत त्यांना प्रभावतीला कडकडून भेटण्याची इच्छा दाबून ठेवणें भाग पडलें. राजमाता गेली मात्र, प्रभावतीनें कुमुदिनीला व तिनें तिला घट्ट आलिंगन दिलें. कुमुदिनी कंपित स्वरांत प्रभावतीच्या कानांत पुटपुटली, "कले–कले," या दोनदां नांव घेण्यांतच प्रभावतीनें कुमुदिनीचा सर्व हेतु ताडला. तिनें पुनः एकवार कुमुदिनीस आलिंगन दिलें. त्या दोघींनीं परस्परांचे आनंदाश्रु पुशीत एकमेकींस सोडिलें.

नंतर इंदुमती तिला आलिंगन देत म्हणाली, "मला पूर्वीपासूनच माहीत होतें कीं, तुम्ही त्या झोंपडींत राहण्याच्या योग्यतेच्या नव्हत. एखाद्या अमूल्य रत्नाला मातींत टाकण्याइतका देव निष्ठुर नाहीं कांहीं!"

आतां प्रभावती आपल्या नणंदेकडे वळली. उषेचे बाहु तयारच होते उषा तिच्या कानांत बोलली. "वहिनी, तुझी थट्टा केली, म्हणून तूं रागावली तर नाहींस." प्रभावतीनें सस्मित मुद्रेनें तिच्याकडे पाहिलें व तिनें तिला सोडिलें. प्रभावती नें पुन्हा इकडे तिकडे पाहिलें. एक अत्यंत प्रेमळ हृदय आपलें स्वागत करण्याकरितां तयार आहे हें प्रभावती जाणून होती ती बकुळीला विसरली नव्हती. म्हणूनच तिनें

तिला पाहण्याकरितां इकडे तिकडे पाहिलें. बकुळी कुमुदिनीच्या पाठीमागें थोड्या अंतरावर उभी राहून चाललेला सर्व प्रकार साश्रुनयनांनीं पहात होती. ती पुढें कां आली नाहीं ? काय ती प्रभावतीला ओळखत नव्हती, अथवा तिचें तिच्यावर प्रेम नव्हतें ? कीं प्रभावतीची एकदम योग्यता वाढलेली पाहून तिला तिच्या वैभवाविषयीं वैषम्य वाटूं लागलें होतें ? या सर्वांचें उत्तर एकच आहे. बकुळी गरीब होती ! तेथें असलेल्या तरुणींत तीच काय ती कमी दर्जाची होती. किंबहुना दासीपेक्षां तिची जास्त योग्यता सध्यां तरी नव्हती. अर्थात् याच गोष्टीमुळें तिला पुढें येण्यास बराच संकोच वाटूं लागला. नाहीं तर इतरांप्रमाणें तीही प्रभावतीला भेटण्याकरितां, तिच्या वैभवाबद्दल मनःपूर्वक स्वागत करण्याकरितां उत्सुक होती. पण तिच्या सांपत्तिक योग्यतेनें तिला मागें खेचून धरलें होतें. प्रभावतीनें एकवार बकुळीकडे पाहिलें. तशा त्या गोंधळलेल्या स्थितींतही तिनें बकुळीपुढें कां आली नाहीं, याचें कारण ताडलें. तिनें तिच्याकडे जात म्हटलें, " बकुळी तूं मला विसरलीस ? " आणि दुसऱ्या क्षणांत दोघींहि एकमेकांच्या बाहुपाशांत बद्ध झाल्या.

प्रेमाचा प्रताप किती विलक्षण आहे ? एक एका बलाढ्य भूपतीची पट्टराणी तर दुसरी एक यःकिंचित् दासी ! पण प्रेमाला भेदभाव नाहीं कांहीं ! प्रेम हें निरंकुश आहे. त्याच्या आड कोणतीही वस्तु येत नाहीं व तेंही कोणाला जुमानीत नाहीं. असें जर नसतें, तर अशोकवनांत बंधिनी सीतेवर त्रिजटेसारखी राक्षसीण कां प्रेम करूं लागती ? पंपासरोवरावर श्रीरामलक्ष्मणाला पाहून श्रीहनुमानाच्या हृदयांत मैत्राप्रेम कां उपजतें ? दुष्यंताला पाहतांच अरण्यवासिनी शकुंतलेच्या हृदयांत प्रेमरोपण कां होतें ? स्वप्नदर्शनीं उषा अनुरुद्धावर कां अनुरक्त होती ?

किती वेळ तरी प्रभावती व बकुळी एकमेकींना आलिंगन देऊन उभ्या होत्या. बकुळी प्रभावतीच्या वक्षःस्थलावर मस्तक टेकून रुदन करीत होती. तिला एवढें कसलें दुःख होत होतें हें तिचें तीच जाणें, पण प्रभावतीनें तिला प्रेमानें आपल्या पोटाशीं धरल्यापासून तिला जे हुंदक्यावर हुंदके येऊं लागले तें कांहीं विलक्षणच. प्रभावतीलाही तें पाहून आश्चर्य वाटलें. किती वेळ झाला तरी तिचें दुःख कांहीं हलकें

होईना. सर्वांसच विस्मय वाटूं लागला. प्रभावतीलाही अत्यंत दुःख वाटूं लागलें. बकुळीला इतकें कसलें दुःख होतें आहे, हें जरी ती जाणत नव्हती, तरी बकुळीचें तें ढोंग असेल किंवा बकुळी आपला अविनय करते असें तिच्या मनांत मुळींच आलें नाहीं. बकुळी ही आपली स्थिति जाणून होती. आपण आतां उगीच दुःख करीत बसल्यास सर्वजण नानाप्रकारच्या शंका घेतील व कदाचित् प्रभावतीही आपला अपमान समजेल, असें तिला समजून चुकलें; पण तिच्या हृदयास होत असलेल्या असह्य यातनांपुढें तिचा नाइलाज होता. याला एकदोन कारणेंही होतीं. प्रभावतीसारख्या राजमहिषीनें तिला प्रेमानें आपल्या पोटाशीं धरावें, हेंच अगोदर किती हृदयभेदन करणारें होतें.

ती स्फुंदत ह्मणाली, " राणीसाहेब—राणीसाहेब ! मला माहीत आहे कीं, मी तुमचा अपमान करीत आहे; पण काय करूं हो ! हृदयाच्या आगी पुढें कांहीं सुचत नाहीं. आपण राणी आहांत, मी एक दासी आहें. " हें तिचें बोलणें इतकें कारुण्यजनक होतें कीं, तेथें उभी असलेल्या प्रत्येकीचें अंतःकरण कळवळलें.

राज्ञी प्रभावती तिला कुरवाळून ह्मणाली, " छे छे, बकुळी, मी तुझी बहीण आहें. "

" तरीही—तरीही " बकुळी आपलें दुःख मोठ्या कष्टानें दाबून ह्मणाली, " मला आपली व माझी योग्यता विसरली न पाहिजे. "

प्रभावतीनें तिचे नेत्र पुसले. व त्या अलग झाल्या. प्रभावतीनें बकुळीला सोडलें मात्र, अकस्मात् तिला कमलिनीची आठवण झाली. ती आपला दुःखावेग दाबून कुमुदिनीला ह्मणाली, " ताईसाहेब ! हाय ! कमलिनी यावेळीं असती तर किती बहार झाली असती. " बोलतां बोलतां तिचा कंठ दाटून आला. कुमुदिनीलाही कमलिनीची आठवण होऊन फारच दुःख झालें.

दैवाची गति किती विचित्र आहे ? कुमुदिनी आपला इच्छित पति वरून तृप्त झाली ! संतुष्ट कला पट्टराणी झाली व कमलिनी गतधवा असूनहि विमलचंद्राची प्रणयिनी बनून उज्जयिनींतच होती; पण त्या तिघी मैत्रिणींचा एके ठिकाणीं मिळण्याचा योग नव्हता. इतकेंच काय? पण कुमुदिनी व प्रभावती यांना कमलिनी जिवंत असून उज्जयिनींतच

आहे याची वार्ता सुद्धां नव्हती. कमलिनीला विमलचंद्राकडून सर्व कळलें असेलच; पण कमलिनी त्यांना भेटण्यास कां आली नाहीं, याचें कारण पुढें कळेल. असो.

" वहिनी, " उषा प्रभावतीला ह्मणाली, 'दरबार पहायला नाहीं कां चलायचं ? "

" आतांच नको गडे वन्स, " प्रभावती बसत ह्मणाली, " सध्यां माझं मन इतकं गोंधळून गेलं आहे कीं, मला घटकाभर स्वस्थ वसूं द्या. "

" बरं तुझी इच्छा. " उषा हंसत हंसत पुढें ह्मणाली, " आतां आपण राणीसाहेब आहांत, आतां आपला हुकूम ऐकलाच पाहिजे. " असें ह्मणत ती प्रभावतीजवळ बसली. कुमुदिनी व इंदुमतीही बसल्या. प्रभावतीनें वकुळीला आपल्याजवळ बसवून घेतलें.

" खरंच " प्रभावती मध्येंच आठवल्यासारखें करून बोलली, " दया-इंदुमती बाई, दया कुठें आहे हो ? "

इंदुमतीनें किंचित् हंसून ह्मटलें, " इथें तिची एक मैत्रीण आहे तिच्याबरोबर बसली असेल बोलत. बोलावूं कां तिला ? ह्मातारीची थोडी मजा करूं या. "

इंदुमतीच्या गंभीर चेहऱ्यावर हास्य खेळूं लागलें. यापूर्वी इंदुमतीनें पुष्कळ आनंदाचे प्रकार पाहिले होते; पण कधींहि तिच्या चेहऱ्यावरील गंभीर उदासिनता गेली नाहीं. आजचा प्रकार पाहून मात्र तिला स्वस्थितीचा थोडाबहुत विसर पडला आणि त्यामुळेंच ह्मातान्या दयेची थट्टा करण्याचें तिच्या मनांत आलें.

" खरंच " प्रभावती हंसत ह्मणाली, " दयेला किती तरी आनंद होईल ? " असें ह्मणत तिनें जवळच उभी असलेल्या एका दासीकडे पाहिलें. प्रभावती आतां आपली योग्यता पूर्ण जाणून होती. तिनें त्या दासीला खूण करून आपल्याजवळ बोलाविलें. दासी जवळ आली.

प्रभावतीनें गंभीरपणें तिला विचारिलें, " दयेला आणतेस ? "

दासीनें नम्रपणें अनुकूल जवाब दिला.

" जा तर, तिला इथें घेऊन ये. "

दासी निघून गेली.

" ही दया कोण ? " कुमुदिनीनें उत्सुकतेनें प्रश्न केला.

" आहे एक भावडी म्हातारी. " प्रभावतीनें उत्तर दिलें.

" वहिनीसाहेब, " उषा हंसत हंसत ह्मणाली, " आपला पूर्वीचा राजवाडा मोठा पाहण्यासारखा आहे असं दादा सांगत होता. आह्माला तो दाखवायला कधीं न्याल कां ? "

" खोटं नाहीं सांगत वत्स, तें स्थल फारच रमणीय आहे. " प्रभावती स्मित करून म्हणाली, " एके दिवशीं आपण सर्वच तें पाहण्याला जाऊं. "

" पण तिथें आपल्या वाड्यांत आल्यावर जेवणाचा बेत काय कराल ? " इंदुमती हंसून बोलली, " आंबील, कण्या ! "

" तेंच किती तरी गोड लागेल. " कुमुदिनी मध्येंच म्हणाली.

इतक्यांत दयेला घेऊन ती दासी आंत आली. सर्व चुप्प बसल्या. म्हातारी दया त्यांच्याजवळ आली. सर्वांच्या चेहऱ्यावर हास्य खेळूं लागलें. राणीच्या पोषाखांत असलेल्या कलेला—प्रभावतीला दयेनें ओळखलें नाहीं. एवढेंच नव्हे तर अमूल्य वस्त्राभूषणालंकृत रमणीय प्रभावतीला पाहतांच म्हातारीला एक प्रकारची भीति वाटली. ती चकित् होऊन स्तब्ध उभी राहिली.

" दया, कला तुझी आठवण करीत होती. " इंदुमतीनें किंचित् हंसून म्हटलें.

" कुठें आहे ती ? " ह्मातारीनें आश्चर्यानें ह्मटलें, " मला तर ती एक वेडीच दिसते. आपण तिला मजा पाहण्याकरितां बोलावून आणिलं आणि ती एकदम कुठें निघून गेली. वेडी कुठली ! "

ह्मातारीचें हें भाषण ऐकतांच सर्वजणी खो खो हंसूं लागल्या.

" खरंच—" प्रभावती आपलें हंसें दाबित ह्मणाली, " कला फारच वेडी !"

प्रभावतीचा स्वर ऐकतांच म्हातारी दचकली. ती डोळे फाडून प्रभावतीकडे पाहूं लागली. पुनः सर्वजणी खो खो हंसूं लागल्या. हें पाहून ह्मातारी बिचारी भांबावून गेली.

" ही काय भानगड आहे ! " ह्मातारीनें आश्चर्यानें स्वगत ह्मटलें.

" ही सर्व भानगड वेड्या कलेचीच आहे. " प्रभावतीनें हंसत ह्मटलें.

" खरंच वेडी कला एकदम राणी झाली, हें पाहून सगळं जग एकदां तरी आश्चर्यानें वेडं होईलच होईल. " कुमुदिनीनें हंसन ह्मटलें.

म्हातारीनें आतां प्रभावतीकडे टक लाविली. प्रभावतीच्या जागीं तिला नटलेली कला दिसूं लागली.

“ हं: कला ? ” म्हातारी आश्चर्यानें म्हणाली, “ तुला दागदागिने आवडत नव्हते ना ? आज तुला ही कोणीं नटवली ? ”

“ या तुझ्या इंदुमतीलाच विचार. ” प्रभावती हंसत बोलली, “ नाहीं नाहीं म्हणतां, यांनीं बळजबरीनें मला राणी केली. ”

“ नाहीं तरी तूं राणी सारखीच शोभते आहेस ! किती ग तूं सुंदर आहेस ! ” म्हातारी दया पुढें म्हणाली, “ आज संध्याकाळीं घरीं गेल्यावर मला तुझी दृष्ट काढिली पाहिजे. ” भोळी बिचारी ! कलेमध्यें केवढें स्थित्यंतर झालें आहे. याचा तिला पत्ता सुद्धां नव्हता.

अखेरीस इंदुमती उठली व तिनें दयेला एकीकडे नेऊन सर्व समजाऊन सांगितलें. म्हातारी आश्चर्यानें डोळे वासून इंदुमतीकडे पहात म्हणाली, “ खरं कीं काय ? आणि आतां—पण मी त्यांची माफी मागेन ! ”

इंदुमती पुनः प्रभावतीजवळ येऊन बसली. म्हातारी भीतीनें दबत दबत प्रभावतीपुढें आली. तिनें भीत भीत प्रभावतीच्या चेहऱ्याकडे पाहिलें. राज्ञीपदाला योग्य अशा तेजानें प्रभावतीची मुद्रा तळपत होती. म्हातारी आपल्या गुडघ्यावर पडली व जमीनीवर नाक घासत म्हणाली, “ राणीसाहेब, राणीसाहेब, मला माहीत नसतां मीं आपली थट्टा केली; पण मला तो अपराध क्षमा करा ! ”

प्रभावती आपल्या जागेवरून उठली. तिनें दयेजवळ येऊन तिला उठविलें व तिच्या कानांत म्हटलें, “ जरी मी राणी झालें आहें, तरी कला जसं तुझ्यावर प्रेम करीत होती, तसंच मीही पण करीन. ”

म्हातारीचें सांत्वन झालें. ती उठून उभी राहिली व साश्रुनयनांनीं आपल्यापुढें उभी असलेल्या आपल्या राज्ञीकडे पहात म्हणाली, “ देव तुझं कल्याण करो ! ”

इतक्यांत एक दासी धावऱ्या धावऱ्या तेथें आली व उषेला एकीकडे नेऊन म्हणाली, “ ताईसाहेब, आज दरबारांत मोठं भांडण झालं ”

‘ कुणाकुणाचं ? ’ उषेनें कांहींसें आश्चर्यानें विचारिलें.

“ महाराजांचं आणि त्यांचं—” दासीनें घाबरत म्हटलें, “ फारच कडाक्याचं झालं हो ! ”

" अग हें अलीकडे तर रोजचं झालंय ! " उषेनें निष्काळजीपणें म्हटलें, " तुला माहीत नाहीं, तिकडचा स्वभाव किती तापट आहे तो ? "

" पण महाराजही आज फारच रागावले आहेत ! "

" चालूं द्या. आज भांडतील व उद्यां पुनः दोघंही होतील एक. "

" छे ताईसाहेब, त्यांनीं तर प्रतिज्ञा केली आहे कीं, पुनः राजवाड्यांत पाऊल टाकणार नाहीं म्हणून ! "

" त्यावर दादा काय म्हणाला ? " उषेनें घाबरून विचारिलें.

" महाराज म्हणाले, ' बरं झालं, म्हणजे रोज असा वाद नको व्हायला ! " दासी पुढें म्हणाली. " आणि त्यावर ते चालते झाले ! "

" दरबारांतून ते निघून गेले ? " उषेनें आश्चर्यानें विचारिलें.

" होय तर. "

" आईला समजलं का हें ? "

" समजलंच असेल बहुतेक. "

" चल आपण तिकडेच जाऊं. " असें म्हणून उषा दासीसह तेथून निघून गेली. त्यांचा संवाद प्रभावती वगैरेंना ऐकूं गेला नसल्यामुळें उषा एकदम कां निघून गेली, याचें सर्वांनाच आश्चर्य वाटलें.

उषा व दासी या दोघींमध्यें जें भाषण झालें, तें कांहीं विशेष महत्वाचें नव्हतें. उषेचा पति मित्रगुप्त हा जरा तापट स्वभावी होता. त्याचें व विक्रमार्काचें नेहमीं थोड्या थोड्या कारणावरून भांडण होई. पण आजचें भांडण जरा विकोपाला गेलें होतें असें दिसतें. असो.

उषा गेल्यावर सर्वजणी बराच वेळ चुप्प बसल्या. नंतर प्रभावती सर्वांना उद्देशून म्हणाली, " आतां सर्वांनीं निदान आठ दिवस तरी येथेंच राहिलें पाहिजे. "

सर्वांनीं ती गोष्ट आनंदानें मान्य केली. रात्रीं ज्यावेळीं विक्रमार्काची व प्रभावतीची भेट झाली, त्यावेळीं प्रभावती आपल्याला फसविल्याबद्दल आपल्या पतिवर केवढी रागावली, त्यावर विक्रमार्कानें नानाप्रकारें मनधरणी करून तिला पुनः कशी वश केली, इत्यादि गोष्टी आम्ही वाचकांच्या कल्पनेवर सोडून देतों. हें प्रकरण पुर्ण करण्यापूर्वी एवढेंच सांगतों कीं, त्यापुढें आठ दिवस उज्जयिनींत मोठी धामधुम चालू होती.

---

## प्रकरण तेहतिसावें.

# पतित कमलिनी.

शिशिरऋतूंत पर्णहीन झालेल्या लतेला भावी वसंतकालांत नवपल्लव येण्याचा संभव असतो; ग्रीष्म ऋतूमध्यें शुष्क झालेल्या सरितेच्या वाळवंटांत वर्षाकालीं पुनः जलप्रवाह वाहूं लागण्याची आशा असते, अमावास्येस निर्मूळ झालेली चंद्रिका पुनः दृगोचर होत असते, पण स्त्रीचें नष्ट झालेलें सतीत्व पुनः प्राप्त होणें कालत्रयीं शक्य नसतें. वनितेचें सतीत्व हें एक अमूल्य रत्न आहे. या रत्नापुढें हिरा, माणिक, लाल, पाच, पुष्कराज, नील इत्यादि इत्यादि रत्नें कस्पटाप्रमाणें होत. ज्या स्त्रीजवळ सतीत्वरत्न आहे, ती या रत्नांवांचूनही शोभेल; पण जिच्याजवळ हें रत्न नाहीं, तिनें वरील सांसारिक रत्नें कितीही धारण केलीं, तरी त्यांची कांहींही शोभा नाहीं. असा या सतीत्वरत्नाचा प्रभाव आहे. आणि या रत्नाचा सांभाळ करण्याकरितां पूज्य ललनांनीं आपल्या प्राणाकडे सुद्धां पाहिलें नाहीं, याची साक्ष इतिहास देतोच आहे. असो.

आज दोन तीन महिने झाले ! कमलिनी आपलें अमूल्य रत्न विमलचंद्राच्या हस्तगत करून निष्प्रभ झाली ! कमलिनीचें नांव बदललें नव्हतें, सौंदर्य घटलें नव्हतें, भोजनांत फरक पडला नव्हता किंवा वस्त्राप्रावर्णांत बदल झाला नव्हता. कमलिनीचें नांव तेंच्या तेंच होतें. ती अद्यापिही रमणी होती. भोजनही ती नेहमींप्रमाणें करीत होती. तिचे सर्व व्यवहार नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें चालले होते. इतर कशांतही यत्किंचितही फरक पडला नव्हता; पण कमलिनी आतां सती नव्हती ! ! कमलिनी त्या उच्च पदापासून आतां सर्वस्वीं भ्रष्ट झाली होती ! पण याबद्दल तिला स्वतःला कधीं दुःख झालें होतें काय ?

होय. याबद्दल तिला अत्यंत दुःख झालें असलें पाहिजे. मानवी मनाची रचनाच अशी आहे कीं, अविचाराच्या भरीं पडून एखादें पापकर्म केल्यास किंचित् कालांतरानें मनाला त्या कृत्याबद्दल लाज वाटूं लागतें, अत्यंत दुःख होतें व पश्चात्तापानें हृदय जळूं लागतें.

मात्र ही स्थिति नव्यानें पापमार्ग आचरण्यास प्रवृत्त झालेल्या मनाची असते; पण पापाचरण केल्यावर तात्पुरत्या पश्चातापानें होणाऱ्या मानसिक वेदनांपासून मन हटत नाहीं. तें पुनः पाप करण्यास प्रवृत्त होतें. असें होता होता पश्चातापाची तीव्रता कमी होत जाते, सदसद्विवेकबुद्धि बोथट होऊं लागते, दुर्मतीचा विजय होऊं लागतो व अखेरीस मनुष्य या पापपंकांत इतका खोल–खोल रुतला जातो कीं, मग त्यांतून निघणें त्याच्या शक्तीबाहेरचें होतें. अर्थात् केलेल्या कर्मांचीं फळें त्यास चाखावीं लागतात. पण आतां वर्णन केल्याप्रमाणेंच कांहीं अगदीं बरोबर कमलिनीची स्थिति नव्हती. सांगितलेल्या स्थितींत व तिच्या स्थितींत पुष्कळच अंतर होतें. विमलचंद्रासारख्या विलासी मनुष्याच्या संगतीला राहून अविचारानें आपलें अमूल्य सतीत्व ती हरून बसली होती हें खरें, तरी ज्यावेळीं अविचाराची लहर निघून गेली, आपल्या स्थितिविषयीं विचार करण्याइतकी तिच्या मनाची तयारी झाली, त्या वेळीं तिला आपल्या हातून घडलेल्या अविचाराबद्दल कितीतरी असह्य दुःख झालें. तिनें आपल्या अपराधाबद्दल कितीतरी दुःखानें जळजळीत असे अश्रु ढाळले. पण आतां दुःख केल्यानें अथवा अश्रु ढाळल्यानें घडलेली गोष्ट परत येणें शक्य नव्हतें, हेंही कमलिनी जाणून होती. मग आतां काय करावयाचें ? पुनः तोच मार्ग आक्रमावयाचा ? अशक्य ! कमलिनीकडून तरी ही गोष्ट शक्य नव्हती यापुढें विमलचंद्राची भेट घ्यावयाची नाहीं, असा तिनें पक्का निश्चय केला.

इकडे विमलचंद्राची कशी काय स्थिति होती ? त्याला या गोष्टीबद्दल वाईट वाटत असे काय ? मुळींच नाहीं. असल्या गोष्टी त्याच्या अंगवळणीं पडून गेल्या होत्या. त्याला असल्या गोष्टीबद्दल काय वाटणार? कमलिनीवर तो पूर्ण जय मिळविण्याची संधि पहात होता. तशी संधि त्याला मिळाली. कमलिनी पूर्णपणें त्याची झाली. आतां त्याला कशाचीही पर्वा नव्हती. कमलिनीचें मनसोक्त सेवन करण्यास आतां तो पूर्ण मुखत्यार होता, असें त्याला वाटूं लागलें होतें. पण दुसऱ्या दिवशीं तो कमलिनीकडे जातांच कमलिनीनें त्याची भेट घेण्याचें साफ नाकारिलें विमलचन्द्र चकित् झाला. तरी तो दासीच्या तोंडचा निरोप ऐकतांच किंचित हंसला व तेथून गुकाटचानें चालता झाला.

सुमारें आठ दिवस लोटले. पुनः विमलचन्द्र कमलिनीकडे आला; पण पुनः तेंच. कमलिनीनें त्याची भेट घेतली नाहीं.

" काय ग मथुरे ? " विमलचंद्रानें त्या दासीला विचारिलें. ( कमलिनी अजसेनाच्या बागेंत असतां तिच्या सेवेंत जी मथुरा नांवाची दासी होती; तीच ही होय. कमलिनीप्रमाणें विमलचन्द्रानें तिलाही आपल्या-दरोबर आणून कमलिनीच्या सेवेंत ठेविलें होतें. ) " ती काय करीत असते ? "

" त्या दिवसापासून ती सारखी रडते आहे. " मथुरेनें हेतुपूर्वक म्हटलें.

" तिची प्रकृति तर चांगली आहे ? "

" तें सर्व कांहीं ठीक आहे; पण—पण— "

" समजलों. पण मथुरे, तूं तिला समजाव. मला माहित आहे, तिचें माझ्यावर प्रेम आहे. माझी तिची एक क्षणभर जरी भेट झाली तरी मी तिला—पण हें घे—तूंच हें काम कर. " असें म्हणत विमलचंद्रानें मथुरेच्या हातांत कांहीं द्रव्य ठेविलें व तो तेथून चालता झाला.

मथुरा कमलिनीजवळ आली. विमलचन्द्राच्या तर्फे तिनें कमलिनीजवळ खूपच वकिली केली. कमलिनीनेंही मथुरेचें सर्व म्हणणें मुकाट्यानें ऐकून घेतलें. कारण अद्यापीहि ती विमलचंद्रावर प्रेम करीत होती. तरीपण तिनें विमलचन्द्राची भेट घेण्याचें साफ नाकारिलें.

पुनः आठ दिवस लोटले. आज विमलचंद्र मोठ्या आशेनें आला; पण त्याची पूर्ण निराशा झाली. कमलिनी अद्यापपर्यंत त्याची भेट घेण्याचें साफ नाकारीत होती. मथुरेच्या तोंडचा निरोप ऐकतांच विमलचंद्र थोडा वेळ थांबला. नंतर त्यानें आपल्या खिशांतून एक पत्र काढून मथुरेच्या हातांत देत म्हटलें, " मथुरे, हें तिला नेऊन दे. उद्यां मी पुनः येथें येईन. मला खात्री आहे, आतां कमलिनी माझी भेट घेण्यास नाकारणार नाहीं. " एवढें बोलून विमलचन्द्र निघून गेला. मथुरेनें तें पत्र नेऊन कमलिनीला दिलें व ती तेथून निघून गेली.

कितीवेळ तरी तें पत्र आपल्या हातांत घेऊन कमलिनी त्याकडे पहात बसली होती. तें वाचावें कीं न वाचावें याचाच ती विचार करीत होती. आपल्या हातून घडलेल्या अक्षम्य अपराधाबद्दल तिला अत्यंत वाईट वाटत होतें. त्यामुळें तिनें विमलचन्द्रांची भेटही घेण्याचें साफ

नाकारिलें होतें. या सर्व गोष्टी खऱ्या; पण कमलिनी विमलचन्द्रावर अद्यापीहि प्रेम करीत होतीच. ज्यानें आपणास फसवून मातीमोल करून सोडिलें, त्याचें पत्र वाचूं नये, असा विचार तिच्या मनांत मुळींच आला नाहीं व तिनें कंपित हस्तानें तें पत्र उलगडून वाचण्यास आरंभ केला.

तें पत्र जसेंच्या तसेंच खालीं देण्याचा आमचा मानस आहे, त्यामुळें त्या पत्रांत काय होतें हेंही वाचकांना समजेल व विमलचन्द्रासारखा मनुष्य स्वतःच्या इच्छित लालसा पूर्ण करण्याकरितां कशा प्रकारचें आचरण करतो याचाही त्यांना परिचय होईल. अस्तु.

तें पत्र येणें प्रमाणें होतें:--

" प्रिय कमल,

' काय ही तुझी निष्ठुरता ! अगे, ज्याचें हृदय तुझ्या विरहाग्नीनें जळत असतां त्याला आपल्या हृदयाशीं आलिंगून त्याचें हृदय शांत केलेंस, ज्याला आपलें प्रेमामृत पाजून त्याच्या शरीरांत नवजीवन उत्पन्न केलेंस, ज्याला आपल्या कोमल हृदयांत स्थान देऊन सुखाच्या अत्युच्च शिखरावर नेऊन ठेविलेंस, त्याच्याशीं--त्या तुझ्या प्रेमलोलुप सेवकाशीं तुझें हें असें निष्ठुर वर्तन ! कठोर हृदया ! त्यापेक्षां बेहेत्तर आहे कीं, या सेवकाला आपल्याजवळ बोलाव व ज्या नेत्र कटाक्षांनीं त्यास प्रेमानें निरीक्षण केलेंस, त्याच नेत्रांनीं क्रोधभरीत त्याकडे पहा व ज्या बाहुलतांनीं त्यास आलिंगन देऊन आपलें प्रेम वद्ध केलें होतेंस, त्याच हातांत तीक्ष्ण खंजीर घेऊन अलिकडे ज्याला तूं विरहाग्नींत लोटलें आहेस, त्याचें शीर छेदन कर ! कोमलांगीं पाषाणहृदयी कमले, तुझ्या हातून या जळत असलेल्या हृदयांत तीक्ष्ण धारेचा जंबिआ घुसलेला बरा; पण हा तुझा विरह नको ! हाय ! हाय ! ! कमल, तुला माझ्या प्रेमाचा संशय कां आला ? अजसेनाच्या बागेंत तुझी व माझी पहिली भेट झाली असतां मी तुला कुमुदिनीशीं माझा विवाह झाल्याचें सांगितलेलें मला आठवतें; पण खरोखर मी तुझें मन पहाण्याकरितां तें बोललों ! अगदीं खरें--खरें सांगतों कीं, माझ्या प्रेमाचें या जगांत एक--एकच ठिकाण आहे व तें ठिकाण तूंच होय ! कमल, तूंच आपल्या मनांत विचार करून पहा- मी हें खोटें कां लिहीत आहे ? मला माहित

आहे आणि त्याबद्दल मला वाईटही पण वाटतें, तूं विधवा आहेस! याबद्दल जग तुला हंसेल, धर्म या गोष्टीला प्रतिबंध करतो आहे; पण कमल, सांग बरें धर्म कशाला म्हणतात? एखाद्यानें एखाद्यावर प्रेम करूं नये असें कां धर्म सांगतो आहे! उलट प्रेम हेंच धर्माचें मूलतत्व आहे. दिव्यावर झडप घालण्यापूर्वी पतंगाला आपण जळून जाऊं याची कल्पना नसते काय? आवश्य असली पाहिजे. आपल्या मूर्ख-पणाला जग हंसेल, याची यत्किंचितूही पर्वा न करतां विचारा पतंग दीपराजाला कडकडून भेटून मरून जातो! कमल, तूं मनुष्य आहेस, तुला विचार करण्याची शक्ति आहे. अगे, ज्याच्या हृदयाला तुझ्या विरहानें असह्य वेदना लागल्या आहेत, त्याच्या सुखाकरितां तुला थोडासाही आत्मत्याग करतां येऊं नये काय? जग हंसेल, हंसूं दे! धर्म प्रतिबंध करील, करूं दे, पण हृदयेश्वरी, एकवार तुझ्या या तळ-मळणाऱ्या दासाला आपल्या हृदयाशीं धरून शांत कर. नाहीं तर ज्या धर्माला तूं भिने आहेस, त्याच्याच दृष्टीनें तूं महान् पातकी ठर-शील. तुझ्यावांचून हा विमलचंद्र या जगांत रहाणें कालत्रयीं शक्य नाहीं. यावेळींही जर तूं मला नाकारशील तर थोड्याच काळांत हा प्राण तुझ्या विरहाग्नींत दहन करून मी कीर्तिमान होईन. पण कमल, तूं खरीच कां इतकी निष्ठुर असशील? शक्य तितकें मी आपलें हृदय या लहानशा पत्रांत तुला चिरून दाखविलें आहे. या उपरही जर तूं भेट घेण्याचें नाकारलेस तर या जगांत जर कोणी दुर्दैवी प्राणी असेल, तर मीच—

तुझा विरही विमलचंद्र."

कमलिनीचें पत्रवाचन संपलें. तिनें एक दीर्घ निश्वास सोडला. तिनें तें पत्र आपल्या हृदयाशीं धरलें व ती रुदन करूं लागली.

या वेळीं कमलिनीची मोठी परीक्षेची वेळ होती. एकीकडे तिच्या मनास विमलचन्द्राचें प्रेम ओढीत होतें तर दुसरीकडे सदसद्विवेक-बुद्धि तिच्या मनास टोंचण्या देत होती. किती वेळ तरी सुमतीचा व कुम-तीचा झगडा तिच्या मनांत चालला होता. पण अखेरीस सुमतीचाच विजय झाला. तात्काळ तिनें तें पत्र फाडून फेंकून दिलें. फाडतेवेळीं क्षणमात्रच तिचें मन घोंटाळलें. तें पत्र नाहींसें होतांच कमलिनीस एक-

प्रकारें बरें वाटलें. तिनें त्याच रात्रीं तेथून कोठें तरी निघून जाण्याचा निश्चय केला. विमलचंद्राच्या कक्षेंत राहिल्यास आपण पुनः फसल्या जाऊं, त्यापेक्षां इथून निघून गेलेलें बरें, असा तिनें विचार केला. आपल्या निघून जाण्याबद्दल तिनें कोणासही कळविलें नाहीं ना तिनें चिटोरें लिहून ठेवण्याचें योजलें. रात्र पडतांच उपयोगी वस्तु बरोबर घेऊन एथून चालतें व्हायचें. मात्र कोठें जावयाचें हें तिनें मुळींच ठरविलें नाहीं. कदाचित् त्या जागेंत आतां एक क्षणभरही राहणें तिला गोड वाटत नसल्यामुळें, रात्र केव्हां होते या चिंतेंत मग्न झाल्यामुळें, तिला तेवढें सुचलें नसेल. तेथून निघून जाणेंही कांहीं विशेष अवघड नव्हतें. ज्या बागेंत ती रहात असे, ती लहानशीच होती. बागेची राखण करण्यास व फाटकाजवळ पाहरा देण्यास एकच मनुष्य होता. तो म्हातारा होता. कमलिनीजवळ मथुरेशिवाय आणखी एक नोकर व दोन दासी हींच काय तीं सर्व माणसें. अर्थात् या सर्वांना चकवून तेथून बाहेर पडणें कांहीं विशेष अवघड नव्हतें. असो.

अखेरीस कमलिनीची अपेक्षित रात्र आली. प्रहर रात्र लोटली. जिकडे तिकडे सामसूम झालें. कमलिनी अगदीं साधा पोषाख करून योग्य व आवश्यक अशा वस्तु आपल्या बरोबर घेऊन त्या महालाच्या बाहेर पडली. बाहेर स्वच्छ चांदणें पडलें होतें. मधून मधून वायु आपलें अस्तित्व दर्शवीत होता. बागेंतील सुगंधित निशिगंधाचा मधुर सुवास चोहोंकडे दरवळला होता. कमलिनी बाहेर पडली व क्षणमात्रच आपण कुठें जाणार याचा विचार करण्याकरितां थांबली. ती दाराशींच उभी राहून विचार करीत होती. थोडया अंतरावर एक आम्रवृक्ष असल्यामुळें त्याची घनदाट छाया आसपास पसरली होती. कमलिनी त्या अंधेरांत—अथवा छायेंत—उभी राहून समोर असलेल्या बागेकडे पहात कोठें जावयाचें याचा विचार करीत होती. आपण उज्जयिनीच्या आसपास असणाऱ्या एका बागेंत आहोंत, इतकें ती जाणत होती; पण उज्जयिनी कोणत्या बाजूस आहे व तेथून तें नगर किती दूर आहे, हें ती मुळींच जाणत नव्हती. ती कोठें जावें, या विचारांत होती; पण एथून जाऊं नये, हा विचार तिच्या मनांत आला नाहीं. तेथील

प्रत्येक वस्तूचा तिला वीट आला होता. कारण त्यांच्याच मोहजालांत फसून तिनें आपलें सतीत्व गमाविलें होतें.

अखेरीस तिनें आपला एक निश्चय ठरविला व ती तेथून पुढें पाऊल टाकणार इतक्यांत जवळच कोणी तरी दोन मनुष्यें आपसांत बोलत असल्याचा तिला भास झाला. ती दचकली. यावेळीं तिला काय करावें, हें सुचेना. ती स्तंभित होऊन तेथेंच उभी राहिली. तिच्या कानावर पुढील संवाद पडला.

" एकूण अखेरीस या पांखरावर विमलचंद्रानें जय मिळविला म्हणतां ! " एक बोलत होता. " मात्र आहे ती सुंदर बरं कां ? "

यावर दुसरा मोठ्यांदा हंसला व म्हणाला, " आणखीही तुला तिच्याविषयीं मजा सांगूं कां ? यः मोठीच मजा बोवा ! दुनियेंत काय काय चमत्कार घडतात ! "

" कसली मौज बुवा ? " पहिल्यानें मोठ्या उत्सुकतेनें प्रश्न केला.

" तुला माहीत आहे, " दुसऱ्यानें म्हटलें, " ही कोण आहे ती ? "

" कोण बुवा ? "

" तुला माहीत नाहीं ? मोठंच आश्चर्य ! " दुसरा संकेतानें म्हणाला, " अरे, ही राक्षसनाथ–ती–चंद्रपाल–हं समजलं ? "

पहिला आश्चर्यानें म्हणाला, " नीट सांग बोवा ! आपल्याला कांहीं नाहीं समजलं. "

दुसरा धिक्कारून म्हणाला, " शैलोदर ! तूं लेका दिसण्यांतच मोठा भव्य बघ ! अकलेचें आणि तुझें कितींरे वांकडें ? अद्याप सांकेतिक भाषा समजत नाहींस, याला काय म्हणावें ? "

पहिला जरा रागानें म्हणाला, " माझें व अकलेचें किती वांकडें आहे याची मीमांसा करण्याला नाहीं मीं सांगितलें ! "

दुसरा उत्तरला, " बरं बुवा, जाऊं दे. आपण आपसांत भांडायचं नाहीं कांहीं. मला याबद्दल फार भीति वाटते बुवा. हो–दुसऱ्या दोघांचा कलह लावून देऊन, त्या दोघांनाहि निस्सत्व करून आपल्या मुठींत ठेवण्याचें आपलें ब्रीद सोडून जर आपण आपसांतच भांडलों तर चालणार कसं ? " ।

पहिला किंचित् हंसून म्हणाला, " अरे पण अकलेच्या खंदका ! तूं सांगत असलेली गोष्ट अगदींच विसरलास ! "

" हो खरेंच काय सांगत होतों बरं मी–हं आठवलं. ही पोरगी कीं नाहीं, ती तीच आहे बघ. राक्षसनाथानें पाहिलेली व पुढं लग्न झालं न् !"

" समजलों रे समजलों. आतां सर्व समजलों. एकूण मोठाच चमत्कार म्हणायचा. पण कायरे तिला हें माहित आहे कां ? "

" तिला तसा संशय आल्याचें विमलचंद्र सांगत होता. "

अगदीं याचवेळीं कमलिनी अस्फुट स्वरांत उद्गारली, " मग माझा संशय खोटा नाहीं तर ! आतां मी एथून जाऊं ? छे छे, खरंच–खरंच त्यांचं माझ्यावर प्रेम आहे तर अद्याप. आणि ते मला ओळखतात. " इत्यादि पुटपुटत ती पुनः कान देऊन ऐकूं लागली.

पहिल्यानें विचारिलें, " विमलचंद्राचा काय विचार आहे ? "

" बहुतेक तो तिला खरी हकीगत लवकरच सांगेल. अरे पण, अद्याप तो इथें कसा बरं आला नाहीं ? रात्र बरीच झाली. आतां तो येत नाहींसें दिसतें. "

" पण मला त्याची भेट घ्यावयाची होती. " पहिला पुढें म्हणाला, " अजसेन सुटला म्हणून यालाही सोडतां उपयोगीं नाहीं. एकतर–तें कारण आणि एक तें–बरं चला. उद्यांच भेटूं. "

त्यांच्या चालण्याची चाहूल कमलिनीला ऐकूं आली. थोड्याच वेळांत बागेच्या फाटकांतून दोन आकृती बाहेर पडतांना तिला दिसल्या.

त्या संवादापासून कमलिनीस काय बोध झाला असेल तिचें तीच जाणें; पण त्याचा परिणाम असा झाला कीं, तिनें तेथून निघून जाण्याचा विचार रद्द केला. ती आली त्याप्रमाणेंच पुनः आपल्या महालांत चुपचापपणें गेली. अद्याप तेथें दिवा जळतच होता. ती एका आरशापुढें जाऊन उभी राहिली व त्यांत आपलें रूप पहात पुटपुटली. " एकंदरींत मी पापी नाहीं तर ? " आणि ती विचार करीत पलंगावर पडली. पुष्कळ प्रकारचे आशा निराशेचे विचार करतां करतां तिला निद्रा आली.

प्रातःकाल झाला ! पूर्व दिशेप्रमाणेंच कमलिनीचें मुख विलक्षण प्रफुल्लित झालेलें दिसत होतें. तें पाहून मथुरेला आश्चर्य वाटलें. रात्रीं काय प्रकार घडला याची तिला काय–कोणालाही–कल्पना नव्हती. मथुरेला

कमलिनीची प्रफुल्लित मुद्रा होण्याचें कारण विमलचंद्राचें पत्रच वाटलें. एकवार तिनेंही हास्यमुद्रेनें कमलिनीस लाजविलें.

थोड्याच वेळांत विमलचन्द्र आला. मथुरेनें मोठ्या आनंदानें त्यास कमलिनीच्या महालांत नेऊन सोडिलें व ती तेथून निघून गेली. मथुरा निघून गेल्यावर दोघांनींही एकमेकांकडे पाहिलें. कमलिनी लज्जित होऊन खालीं पाहूं लागली.

" कमल ! " विमलचन्द्र पुढें येत ह्मणाला " एकंदरींत तूं अद्यापही माझ्यावर प्रेम करतेस तर ? " असें ह्मणत त्यानें आलिंगन देण्याकरितां आपले बाहू पसरले.

कमलिनी किंचित् मागें सरली. तिनें गंभीरपणें विचारिलें, " आपलं माझ्यावर खरंच प्रेम आहे का ? "

" तुला याबद्दल संशय कां आहे ? " विमलचन्द्र दुःखित मुद्रेनें ह्मणाला, " असं जर आहे तर ही छुरी घे आणि हा तुझा विमलचन्द्र-" असें ह्मणून त्यानें आपल्या जवळील एक छुरी काढून तिच्या पाया-जवळ ठेविली. त्यानें आपले गुडघे टेकले व आपली छाती उघडी करून म्हटलें, " कमल. एका क्षणांत सर्व निकाल लाव ! "

कमलिनीनें एकवार त्याच्या उघड्या वक्षस्थलाकडे पाहिलें.

" प्राणनाथ—प्राणनाथ, " कमलिनी विमलचन्द्राच्या बाहूंत पडत ह्मणाली, " आपलं नांव खरंच कां विमलचन्द्र आहे ? "

पतित कमलिनी ! तूं पुनः फसलीस ना ?

## प्रकरण चौतिसावें

# आगींतून फोपाट्यांत कीं फोपाट्यांतून आगींत.

उज्जयिनींत चाललेला उत्सव आटपला व सर्व मंडळी आपापल्या स्थानीं गेली. अजसेन इंदुमतीसह आपल्या वाड्यांत येऊन राहूं लागला. कुमुदिनी आपल्या पित्यासह आपल्या पतीच्या वाड्यांत आली. बकुळी तिच्या बरोबरच होती. असो.

विमलचन्द्राची अवाढव्य संपत्ति, टोलेजंग वाडा, त्या भोंवतालची भव्य बाग इत्यादि आपल्या जावयाचें विपूल वैभव पाहून धर्मचंद्र अगदीं गार होऊन गेला. त्याशिवाय विमलचंद्र उज्जयिनीच्या राजदरबारांत एक श्रेष्ठ प्रतीचा सरदार गणला जात असे. एके काळीं विमलचन्द्रासारख्या एका नीच मनुष्यानें आपल्या कन्येवर प्रेम करावें, याबद्दल क्रोध येऊनच महाराजा धर्मचंद्रानें त्यास कैदेंत घातलें होतें. आज तोच धर्मचंद्र आपल्या जावयाचें प्रचंड वैभव पाहून स्वतःच्या कन्येला योग्य वर मिळाला म्हणून धन्यता मानूं लागला. हें अतुल वैभव विमलचन्द्रास कसें प्राप्त झालें आहे, हें जर धर्मचंद्रास समजतें, तर त्यानें तात्काळ प्राणत्यागच केला असता. पण विमलचन्द्रानें सर्व व्यवस्थाच अशी केली होती कीं, कोणास कसलीही शंका येणें शक्य नव्हतें. प्रस्तुत कथानकाच्या प्रारंभीं विमलचन्द्रानें नवीनचंद्रास—अर्थात् वेषपरिवर्तीत विक्रमार्कास— जें दोनदां प्राणसंकटांतून वांचविलें होतें, त्याचें कारण हेंच कीं, विमलचन्द्र एखाद्या बलाढ्य राजाशीं मित्रता करूं इच्छित होता. त्याला तशी संधि मिळतांच त्यानें महाराजा विक्रमार्काशीं आपली मैत्री जुळविली. महाराजा विक्रमार्क प्रजाहितैकतत्पर असल्यामुळें क्वचित् वेळीं तो वेश परिवर्तन करून आपल्या राज्यांत हिंडत असे. कांहीं वर्षांपूर्वीं त्यानें आनंददुर्गेश राक्षसनाथासंबंधीं बरीच वाईट हकीगत ऐकली होती. आनंददुर्ग व वसंतदुर्ग हीं लहान संस्थानें ना पूर्ण तऱ्हेनें स्वतंत्र होतीं ना उज्जयिनीच्या राजाधिराजाचीं हस्तगत होतीं, तरी उज्जयिनीच्या राजांचा त्यांच्यावर थोडाबहुत

अख़त्यार होता. त्यामुळें राक्षसनाथाची बरीचशी दुष्कीर्ति ऐक-ल्यावर महाराजा विक्रमार्कानें स्वतः एक वेळ त्या प्रांतांत जाऊन खरी स्थिति पहाण्याचा निश्चय केला. त्याप्रमाणें नवीनचंद्र या नांवाखालीं तो त्या प्रदेशांतून हिंडत असतां पुढें विमलचन्द्रानें त्याचा प्राण दोनदां कसा वांचविला व एकंदर काय काय गोष्टी घडल्या तें वाचकांना माहित आहेच. त्याप्रमाणेंच संधि साधून विमलचंद्रानें नवीन-चंद्राशीं कसा परिचय केला हें वाचकांनीं सतराव्या प्रकरणांत वाच-लेंच आहे. महाराजा विक्रमार्कानें आपल्यावर झालेल्या उपकाराची फेड करण्याकरितां विमलचंद्रास आपल्या दरबारचा एक मुख्य सर-दार केलें. विमलचंद्रानें आपल्या संपत्तीचा उगम कुठें आहे, हें विक्र-मार्कासही कळविलें नव्हतें आणि गुणानें विमलचंद्र कशाही प्रकारचा मनुष्य असो, बाहेरून तो चांगला सज्जन दिसे त्यामुळें विक्रमार्कानें विशेष चवकशी केली नाहीं. अशाप्रकारें विमलचंद्रानें सर्व गोष्टी फार सावधगिरीनें व चातुर्यानें पार पाडून धर्मचंद्रावर जय मिळविला व कुमुदिनीस आपली पत्नी करून घेतली. त्याचप्रमाणें धर्मचंद्रासारखा मनुष्य त्याचा सासरा असल्यामुळें व विक्रमार्कासारखा बलाढ्य राजा त्याचा मित्र जाहल्यामुळें त्या कपटपटूस आपलीं नानाप्रकारचीं कृष्ण कृत्यें करण्यास कसलीही आडकाठी अथवा भय नव्हतें.

महाराजा धर्मचंद्र थोडे दिवस कुमुदिनीजवळ राहिले व नंतर मोठ्या दुःखानें सर्वांचा निरोप घेऊन ते वसंतदुर्गाकडे गेले. कुमुदिनी बकुळीला आपल्या जवळच ठेवून आनंदानें राहूं लागली. विमलचंद्राची आपल्यावरच पूर्ण प्रीति आहे, अशी तिची भावडी समजूत होती; पण सध्यां आपणास कुमुदिनीविषयीं पहावयाचें नसून बकुळीचा इतिहास पाहिला पाहिजे. याकरितां आम्हीं तिच्याकडे वळतों.

या वेळीं बकुळीचें वय अठरा वर्षांचें होतें. ती निसर्ग रीतीनेंच सुंदर असल्यामुळें जरी ती साधी रहात असे, तरी ती सुंदर दिसे. आनंददुर्गांत असतां क्षणोक्षणीं राक्षसनाथ आपणावर केव्हां झडप घालील, याचा मुळींच नेम नसल्यामुळें ती फार भीत असे व रात्रंदिवस आनंददुर्गां-तून सोडविण्याबद्दल ती परमेश्वराची प्रार्थना करी. अखेरीस कुमुदिनी-बरोबर तेथून निसटून जाण्याची संधि मिळतांच ती कुमुदिनीबरोबर

मोठ्या आनंदानें निसटून गेली. कुमुदिनी तिला फार प्रेमानें वागवी. दोघींचेंही एकमेकींवर फार प्रेम होतें. कुमुदिनी तिला एक क्षणभरही आपल्या डोळ्याआड ठेवीत नसे. बकुळी आपल्या आईबद्दल विशेष काळजी करीत नसे. अखेरीस कुमुदिनीच्या प्रयत्नांनीं तिची आई वारल्याचें समजलें. बकुळीला त्याबद्दल किंचित् आनंदच झाला. असो.

पण बकुळी कधींही अलंकार अथवा चांगलीं वस्त्राभरणें धारण करीत नसे, याचें कुमुदिनीला फार वाईट वाटे. ती नेहमीं अगदीं साधें वस्त्र नेसून रहात असे. कुमुदिनीजवळ राहाण्यांत ती कोणत्याही प्रकारें दुःखी नव्हती. मात्र ती संसाराविषयीं साधारणपणें उदास राही ! वेळीं ती चिंताक्रांत अशी बसलेली कुमुदिनीच्या दृष्टीस पडे ! त्यावेळीं कुमुदिनी तिला मोठ्या प्रेमानें तिच्या चिंतेचें कारण विचारी; पण ती हंसण्यावारीं ती गोष्ट उडवून देई. अलीकडे तर ती वरीच अस्वस्थ असे. पण ती शक्य तितकी खटपट करून कुमुदिनीला आपली अस्वस्थता समजूं देत नसे. बकुळीला येवढी कसली बरें चिंता होती ?

विमलचन्द्रानें तिला पाहिल्यापासून त्याचें मन त्याच्या स्वाधीन राहिलें नव्हतें. बकुळीला शक्य ती खटपट करून आपली केलीच पाहिजे, असा त्यानें निश्चय केला व गुप्तपणें तो त्या खटपटीस लागला. कुमुदिनीकडून त्यानें तिची सर्व हकीगत विचारून घेतली व ज्यावेळीं त्याला बकुळी ही एक अनाथ तरुणी आहे व ती आपल्याच पत्नीच्या आश्रयावर अवलंबून आहे असें समजलें, त्यावेळीं त्याला कितीतरी आनंद झाला. हळूंहळूं त्यानें दृष्टिक्षेपानें, अंगविक्षेपांनीं व कधीं कधीं बोलण्यानें बकुळीपुढें आपला भाव प्रगट करण्यास सुरवात केली. वरील गोष्ट तो इतक्या सावधपणें करी कीं, त्याचें असें वर्तन पाहून बकुळी वारंवार बुचकळ्यांत पडे. विमलचन्द्राची आपल्यावर पापदृष्टी असेल काय ? असा प्रश्न वारंवार तिच्या मनांत उभा राही; पण या शंकेस दृढ करण्यास तिला अद्याप एकही सबळ पुरावा मिळाला नव्हता आणि तसा पुरावा मिळणें शक्यही पण नव्हतें. कारण कुमुदिनी स्वतः तिच्यापेक्षां कितीतरी सुंदर होती. शिवाय कुमुदिनी आपल्या पतीचें आपल्यावर फार प्रेम असल्याचें तिला वारंवार सांगत असे. स्वतः विमलचंद्र

वरून तरी कुमुदिनीवर अतिच प्रेम दाखवी. असा प्रकार असल्यामुळें विमलचन्द्राच्या दृष्टिक्षेपाचा तिला वारंवार भ्रम पडे. याच गोष्टीमुळें बकुळी अलीकडे विशेष उदास रहात असे. या तिच्या अस्वस्थतेबद्दल कुमुदिनीला काय शंका वाटे ? बकुळी अद्याप अविवाहिता आहे. आपणासर्वांचें संसारसुख पाहून तिला वाईट वाटणें साहजिक आहे. अशी तिला शंका वाटूं लागली म्हणून तिनें संधि साधून एके दिवशीं दुपारीं त्या दोघी बोलत बसल्या असतां बकुळीजवळ सहज गोष्ट काढली.

कुमुदिनीनें प्रेमानें पुसलें, " बकुळी, मला तूं आपली अगदीं सख्खी बहीण समजतेस ना ? "

हा तिचा प्रश्न ऐकतांच बकुळीस आश्चर्य वाटलें. तिनें म्हटलें, " हें आज आपण काय विचारतां ? "

कुमुदिनीनें किंचित् दुःखानें प्रश्न केला, " मग तूं आपल्या चिंतेचें कारण मला कां सांगत नाहींस ? आमच्याप्रमाणें तूंही आतां संसारांत पडावेंस अशी माझी इच्छा आहे. "

कुमुदिनीची इच्छा ऐकतांच बकुळीनें एक दीर्घ निश्वास सोडला व ती निराशेनें किंचित् हंसली व म्हणाली, " माझा कसचा संसार आणि कशाचं काय ! "

तिचें तें नैराश्यजनक हास्य पाहून कुमुदिनीस अत्यंत दुःख झालें. ती साश्रुनयनांनीं बकुळीकडे पहात म्हणाली, " तुला असं निराश होण्याचं काय कारण बरं ? संसाराविषयीं तूं इतकी उदास कां ? "

" कुणाकडे पाहून संसार करायचा ? " बकुळीनें निराशेनें म्हटलें व तिनें लज्जेनें खालीं मान घातली.

कुमुदिनीला या तिच्या बोलण्याचा मुळींच उमज पडला नाहीं. तिनें म्हटलें, " तुझ्या बोलण्याचा अर्थ मी नाहीं समजल्यें. "

" मग मला आतां जास्त विचारूंही पण नका ! " बकुळी खालीं पहात म्हणाली.

अकस्मात् कुमुदिनीला एक शंका आली. तिनें दुःखानें म्हटलें, " बकुळी, मग तुझ्या दुःखाचें कारण मला नाहींच कां समजणार ? "

" ताईसाहेब, तुम्ही माझ्या दुःखाबद्दल उगीच कां वाईट वाटून घेतां? असो, जें माझ्या दैवांत होतं तें होऊन गेलं, आतां त्याबद्दल तुम्ही काय

करणार ? तुमच्याजवळ मी पुष्कळ आनंदांत आहें. माझा संसार केव्हांच आटपला म्हणायला कांहीं हरकत नाहीं. "

कुमुदिनी मध्येंच म्हणाली, " बकुळी. आतां समजल्यें. खरं सांग. ज्याच्यावर तुझं प्रेम जडलं आहे, त्यानं तुझा त्याग का केला आहे ? कीं तो कुठें निघून गेला आहे ! मी त्या तरुणाचा अवश्य शोध लावीन."

बकुळीच्या नेत्रांतून टपटप अश्रु गळूं लागले. ती कंपित स्वरांत म्हणाली, " नाईसाहेब, जाऊं द्या या गोष्टी ! "

" नाहीं. जोपर्यंत तुला सुख मिळणार नाहीं, तोंपर्यंत मला बरं वाटणार नाहीं. " कुमुदिनी मध्येंच म्हणाली, " सांग. ज्या तरुणावर तुझं मन जडलं आहे, तो कुठें आहे ? "

बकुळीनें एक दीर्घ निश्वास सोडला. ती अस्फुट स्वरांत म्हणाली, " राक्षसनाथाच्या कैदेंत---आनंददुर्गांत-- "

" काय म्हटलेंस ? " कुमुदिनीनें चमकून विचारिलें.

बकुळीनें फक्त आपल्या नशिबाला हात लावला.

कुमुदिनीनें तिला आपल्याजवळ ओढलें व हलकेंच रुद्ध कंठानें म्हटलें, " बकुळी, आज नाहीं उद्यां तुझा भाग्योदय होईलच होईल. "

इतक्यांत इंदुमतीकडून दया कमुदिनीला बोलावण्याला आली. इंदुमतीचा व कमुदिनीचा नवीनच परिचय होता तरी त्यांचें आपसांत प्रेम असलें होतें. ती जाण्यास निघाली. बकुळीलाही ती नेणार होती; पण बकुळीनें चित्ताच्या अस्वस्थतेमुळें जाण्याचें नाकारिलें. कमुदिनीनें विचार करून तिला विशेष आग्रह केला नाहीं व ती एकटीच मेण्यांत बसून इंदुमतीकडे गेली.

ती गेल्यावर थोडा वेळ बकुळी कांहीं विचार करीत बसली होती. अकस्मात् विमलचंद्र तेथें आला. बकुळीला एकटें पाहतांच त्याला फार आनंद झाला. त्यानें तिच्याकडे आतुरतेनें पहात तिला विचारिलें, " बकुळी, तुझी मैत्रीण कुठें आहे ? "

त्याचा त्या वेळचा स्वर व नजर पाहतांच बकुळी घाबरली, ती उठून उभी राहिली व खालीं मान घालून म्हणाली, " इंदुमतीबाईकडे गेल्या आहेत. "

तिचें तें उत्तर ऐकतांच विमलचंद्रास किती तरी आनंद झाला.

किती दिवस तरी तो असली अमूल्य संधि पाहात होता. आज ती संधि आली. बकुळीशीं विशेष सलगी केल्यास ती आपल्याबद्दल कुमुदिनीजवळ तक्रार करणें शक्य नाहीं अशी त्याची पूर्ण खात्री होती.

बकुळी तेथून जाऊं लागली; पण विमलचंद्र तिचा रस्ता आडवून ह्मणाला, " हं थांब. इतक्यांतच जाऊं नकोस. मला तुला पुष्कळ गोष्टी विचारायच्या आहेत. "

त्याचें हें भाषण ऐकतांच बकुळीचें हृदय धाड धाड उडूं लागलें. तरी पण विमलचंद्राबद्दल अद्याप तिला थोडासा आदर होता. कांहीं कारण नसतां आपण उगीच त्याच्या विषयीं शंका घेतों, असें तिला वाटलें ह्मणून ती तेथेंच थांबली.

ती थांबली हें पाहतांच विमलचंद्रास बराच आनंद झाला. तो किंचित् पुढें सरकून ह्मणाला, " बकुळी, तूं फार दुःखांत आहेस, असं ती सांगत होती. "

" छे छे, " बकुळी मध्येंच थोडा धीर धरून ह्मणाली, " आपल्या इथें मला काय कमी आहे ? "

" मग तूं अशी साधी कां रहातेस ? " विमलचंद्रानें पुनः किंचित् पुढें सरून ह्मटलें, " तूं फार सुंदर आहेस. "

बकुळीनें किंचित् भीतीनें एकवार विमलचंद्राकडे पाहिलें. त्याची पापी दृष्टी पाहतांच ती दचकली ! ती मागें सरली व जरा गंभीरपणें ह्मणाली, " मला जाऊं द्या. ताईसाहेबांचें मला एक काम करावयाचें आहे. " बकुळी अगदीं खोटें बोलली; पण त्याला तिचा इलाज नव्हता.

" काम ? " विमलचंद्रानें आश्चर्यानें म्हटलें, " इतके नोकरचाकर असतां ती तुला काम सांगते ? तूं कांहीं नोकर नाहींस ! "

" मी आपली दासीच आहें, नाहीं तर काय ? "

" छे छे प्राणेश्वरी ! " विमलचंद्रानें एकदम आवेशानें तिचा कोमल हात पकडून म्हटलें, " तूं या विमलचंद्राची प्राणेश्वरी आहेस ! "

झंझावातांत सांपडलेल्या कर्दलीप्रमाणें बकुळी थरथर कांपूं लागली ! तिच्या सर्वांगास दरदरून घाम सुटला. इतके दिवस विमलचंद्राविषयीं तिला नुसती शंकाच वाटत होती; पण आज विमलचंद्राचें खरें स्वरूप तिला

कळलें. यावेळीं तिची स्थिति किती विकट होती, याची कल्पनाच केली पाहिजे. यावेळीं जरी ती मदतीकरितां ओरडती, तरी काय होतें? ती विमलचन्द्राच्या घरची आश्रित होती. पापी विमलचन्द्रानें पाहिजेल त्या खोटयानाटया आरोपानें तिलाच उलटें दटावलें असतें व सगळ्यांना पण विमलचन्द्राचेंच बोलणें खरें वाटलें असतें. बरें, जर या वेळीं ती चुप्प बसती तर त्या मौन्याचा त्या नराधमानें भलताच अर्थ घेतला असता व तिचें सतीत्व भ्रष्ट करण्यास त्यास जोर येता.

अखेरीस ती केविलवाणीनें ह्मणाली, " आज आपण हें काय मनांत आणिलं आहे? सोडा–सोडा माझा हात!"

पण त्या तिच्या करुणावचनानें त्या कामांधाचें हृदय थोडेंच बदलणार होतें. तो तिच्या हनुवटीला हात लावून आतुरतेनें ह्मणाला, " छे छे, प्राणेश्वरी, सुंदरी– "

पण एखाद्या नागिणीप्रमाणें बकुळी उसळली. तिला तो अपमान सहन झाला नाहीं. ती दूर जाऊन क्रुद्धित मुद्रेनें त्याकडे पहात ह्मणाली, " आपल्या मनांत हें पाप भरलं आहे, हें मला माहित असतं तर एक क्षणभरही मी इथें राहिलें नसतें."

तिचें हें भाषण ऐकतांच क्षणमात्र विमलचन्द्र दचकला. पण त्याला यापूर्वी असे पुष्कळ अनुभव आले होते. तो कांहींशा त्वेषानें म्हणाला, " वेडे, आपली स्थिति नीट पहा आणि मग काय तें बोल. माझं अन्न तूं खाल्लं आहेस. तूं माझी आहेस. आणि मी अशाप्रकारें तुला वठणीवर आणीन कीं, तुलाही चांगलंच समजेल. तूं माझ्यासंबंधानं कोणाजवळही तक्रार करूं शकत नाहींस; पण जर कां केलीस तर तुझ्यावर नाहीं तसले आरोप आणून मी तुलाच कुलटा ठरवीन. त्यापेक्षां चल ये. वश हो. सर्व कांहीं ठीक जमेल." असें ह्मणून तो तिच्याकडे जाऊं लागला.

बकुळीला 'दे माय धरणी ठाव' असें झालें. ज्या भीतीनें आपण आनंददुर्ग सोडला, तेंच-संकट आपल्यास अशाप्रकारें अगदीं अनपेक्षित ठिकाणीं प्राप्त व्हावें, हें पाहून ती अगदीं घाबरून गेली. आज आपली पतिव्रता लुटली जाणार! अशी तिची अगदीं खात्री होऊन चुकली!

इतक्यांत बाहेर कसलीशी गडबड ऐकूं आली. विमलचन्द्रानें दचकून मागें पाहिलें तों दाराबाहेर राणी प्रभावतीचा त्यानें आवाज ऐकिला. विमलचन्द्र काळाठिक्कर पडला. तो तेथें एक क्षणभरही थांबला नाहीं. तो तेथून नाहींसा झाला. बकुळीच्या आनंदास सीमा राहिली नाहीं. तिनें ईश्वराच्या कृपेबद्दल त्याचे कितीतरी आभार मानले. पण तात्काळ आतां आपली या वाड्यांत धडगत नाहीं, हें तिला साफ कळून चुकलें. पण बकुळी निराश्रित. जाणार कोठें? इतक्यांत राणी प्रभावती आंत आली. बकुळीचें दुःख असह्य होतें. 'तोंड बांधून बुक्क्यांचा मार' अशी तिची स्थिति होती. राणी प्रभावतीला पाहतांच तिचें दुःख अनावर झालें. तिनें धावत जाऊन प्रभावतीच्या गळ्यास मिठी मारिली व ती धाय धाय रडूं लागली. प्रभावतीच्या आश्चर्यास सीमा राहिली नाहीं. तथापि प्रभावती मोठी सुज्ञ स्त्री होती. बकुळीच्या शोकाचें तसेंच कांहीं तरी मोठें कारण असलें पाहिजे अशी तिनें कल्पना केली व त्यामुळें तिनें बकुळीला पुष्कळ वेळ रडूं दिलें.

अखेरीस बकुळीचें दुःख थोडें थोडें कमी होत चाललें. ती करुण वाणीनें स्फुंदत स्फुंदत ह्मणाली, "राणी साहेब मला यांतून वांचवा हो!"

प्रभावतीला कांहीं उलगडा पडला नाहीं. पण ती ह्मणाली, 'बकुळ, तूं थोडी शांत हो! मग सांग काय तें."

बऱ्याच वेळानें बकुळी शांत झाली. ती निराशेनें हुंदका देत ह्मणाली, "मी या सौंदर्याला काय हो करूं? जिथें तिथें त्यामुळें संकट येतं—"

अद्यापिहि प्रभावतीला कांहींच उलगडा पडला नव्हता. ह्मणून तिनें विचारिलें, "तूं हें काय म्हणतेस? मला तुझं हें बोलणं कांहीं समजलं नाहीं. नीट समजावून सांग."

बकुळी आपले अश्रु पुसून ह्मणाली, "काय सांगूं आणि कसं सांगूं? त्यावर कुणा कुणाचा विश्वास असणार नाहीं. माझंच कर्म खोटं त्याला कोण काय करणार?"

बकुळीच्या एकंदर संदिग्ध भाषणावरून कांहीं तरी चमत्कारिक गोष्ट घडली असली पाहिजे अशी प्रभावतीनें अटकळ बांधिली. तिनें प्रमानें तिच्याशीं बोलून दुःखाचें कारण काढून घेण्यास सुरुवात केली.

बकुळीनेंहि एकंदर हकीगत मोठ्या कष्टानें प्रभावतीस निवेदन केली. सर्व हकीगत ऐकतांच क्षणमात्र प्रभावती पाषाणमूर्तीप्रमाणें स्तब्ध बसली. बकुळीशिवाय दुसऱ्या एखाद्यानें ही हकीगत तिला सांगितली असती, तर तिनें ती अक्षरशः खोटी ठरविली असती; पण बकुळीवर तिचा पूर्ण विश्वास होता. तरीहि तिनें एकवार तिच्या मुद्रे-कडे तीक्ष्ण नजरेनें पाहिलें व थोडावेळ खालीं मान घालून विचार केला. बराच वेळ विचार केलों तरी तिचें मन द्विधाच राहिलें. पण बकुळी-चीच हकीगत तिला विशेष खरी वाटली. तिनें प्रेमानें व कांहीं गंभीर-पणें बकुळीला म्हटलें, " बाईग ! आपला हा बायकांचा जन्मच असा आहे. तूं जें सांगितेस तें खोटें असेल, असें मी कधींहि म्हणणार नाहीं; पण तें खरें असेल, असेंही प्रथम वाटत नाहीं. मोठी कठीण स्थिति आहे खरी; तरी पण तूं माझ्याबरोबर राजवाड्यांत चल. तुला इथं रहाणं आवडत नसल्यास माझ्याजवळ रहा; पण एक गोष्ट सांगतें, ही हकीगत कोणालाहि कळवूं नकोस. मी गुप्तपणें याचा तपास करतें. पापाचं प्रायश्चित हें ज्याचं त्याला मिळालंच पाहिजे. बरं कुमु-दिनी कुठं आहे ? "

" इंदुमती बाईकडे. " बकुळीनें शांत होऊन उत्तर दिलें.

" बरं तर. चल आपण राजवाड्यांत जाऊं. "

दोघीही राजवाड्यांत जाऊन पोहोंचल्या.

---

## प्रकरण पसतिसावें.

# सुखदुःखाचा काल.

मनुष्याच्या आयुष्यक्रमांत सर्वच वेळा सारख्याच नसतात. कधीं सुख असतें, कधीं दुःख असतें, कधीं मोठमोठे चमत्कार घडतात, कधीं मोठे आणीबाणीचे प्रसंग येतात व कधीं अगदीं शांततेचे दिवस येतात. याकरितां आमच्या या कथानकांतील सर्वच पात्रांच्या आयुष्याचीं पांच वर्षे कांहींशीं शांततेंत लोटलीं असें समजूं व या कालांत मुख्य मुख्य पात्रांविषयीं कांहीं महत्वाच्या गोष्टी घडल्या असल्यास त्याचा गोषवारा या प्रकरणांत देऊन एकप्रकारें आपण या अद्भुत कथेचा हा उपसंहारच समजूं. कारण पुढें राहिलेल्या पंधरा प्रकरणांत उपसंहाराला स्थळ नाहीं.

पांच वर्षे लोटलीं. हीं पांच वर्षे कुमुदिनीनें मोठ्या आनंदानें काढलीं. मात्र आतां ती एकटी नसून आतां तिच्या मांडीवर एक चार साडेचार वर्षांचा सुंदर मुलगा खेळत असलेला दृष्टीस पडत होता. आपल्या मुलाचें बोबडें बोलणें व नानाप्रकारच्या बालक्रीडा ऐकण्यांत व पाहण्यांत कुमुदिनी आपला काल मोठ्या आनंदानें घालवीत होती. विमलचंद्रानें तिला मागें एके वेळीं सांगितलें होतें कीं, " कुमुद, ज्या गोष्टीची आपण अत्यंत इच्छा करीत होतों ती पूर्ण झाली आहे. तुझ्या मनाला दुःख होईल, असें वर्तन एके वेळीं माझ्या हातून घडलें होतें; त्याबद्दल मी तुझी क्षमा मागतों; पण तुला संसारांत सुखी राहण्याचा एक मार्ग सांगतों व त्या मार्गानें तूं चालल्यास तुला खात्रीनें सुख होईल. प्रत्येक पतिपत्नीची इच्छा आपला संसार मोठ्या आनंदांत चालावा अशी असते. तर ती पूर्ण करण्याकरितां प्रत्येक पतीपत्नीचें मुख्य कर्तव्य हें आहे कीं, त्यांनीं परस्परांविषयीं आपल्या मनांत कसल्याहि प्रकारचा संशय बाळगूं नये. कदाचित् एखादें संशय येण्यासारखें कारण घडलेंच तर त्याबद्दल परस्परांनीं परस्परांस त्यासंबंधीं स्पष्ट खुलासा विचारावा. मात्र उगीच मनांत कुढूं नये! एखाद्या यःकश्चित् कारणावरून आपल्या

पतीविषयीं मलताच संशय घेऊन पुष्कळ-पुष्कळ स्त्रिया मनांत कुढून कुढून अखेरीस आपल्या संसारसुखाला आंचवतात. हें मीं पाहिलें आहे. कुमुद, या गोष्टीचें तूं स्मरण ठेव. बायकांचीं व पुरुषांचीं कर्तव्यें अगदीं भिन्न आहेत. तेव्हां जर मी तुझ्याशीं एखादे दिवशीं मनाच्या अस्वस्थतेमुळें नीट बोललों नाहीं, अथवा तशाच कांहीं कामामुळें मला एखादे वेळीं बाहेर रहावें लागलें, अथवा दहा पंधरा दिवस मी तुला न सांगतां कोठें निघून गेलों; अशा गोष्टी जर पुढें मागें कदाचित् घडल्या तर त्याबद्दल तूं मनांत उगीच कुढूं नयेस. तुला माहित आहे, आपण प्रेमबद्ध आहोंत तुला मांझ्यावांचून करमणार नाहीं व मी तुझ्यावांचून राहूं शकणार नाहीं. तरी पण प्रसंग आहे. कदाचित् आपल्याला कांहीं दिवस एकमेकांच्या विरहांत काढण्याचे प्रसंग येतील, तर त्यावेळीं कोणत्याही प्रकारें चित्ताची अस्वस्थता न होऊं देतां सर्वदिवस आपल्या गाढ प्रेमाची आठवण ठेव. तेंच प्रेम आपणांस सुख देईल. यापेक्षां जास्त काय सांगूं ? मी अगदीं शपथ घेऊन सांगतों कीं, तुझ्याशिवाय या जगांत मला कोणीही प्रिय नाहीं. याकरितां तूं माझ्याविषयीं कसलाही संशय मनांत बाळगूं नकोस व माझाही तुझ्यावर पूर्ण विश्वास व प्रेम आहे."

आपल्या पतीच्या वरील भाषणावर पूर्ण विश्वास ठेवूनच कुमुदिनी संसार करीत होती. विमलचन्द्र कधीं तिच्याशीं बोलत नसे, कधीं दहा दहा पंधरा पंधरा दिवस घरीं येत नसे, तरी त्याचें कुमुदिनीस विशेष वाटत नसे. आपल्या पतीच्या प्रेमाविषयीं तिला पूर्ण विश्वास असे व मधून मधून विमलचन्द्रही आपल्या अगाध प्रेमाचें असें प्रदर्शन करी कीं, यदाकदाचित् कुमुदिनीच्या मनांत कसली शंका आली असल्यास ती साफ नष्ट होई. अशाप्रकारें कुमुदिनीचा आयुष्यक्रम चालला होता.

आतां आपण विमलचन्द्राविषयीं पाहूं. विमलचन्द्राचें काय ? दिवसेंदिवस द्रव्यसहाय्यानें तो आपली कामेच्छा तृप्त करून घेण्याकरितां नानाप्रकारचीं पापें करीत होता. पिशाचाच्या आज्ञेप्रमाणें तो प्रत्येक अमावास्येस एक एक सुंदर मूल भुताला बळी देऊन बालहत्येसारखें घोर पातक करून नरकांत पडण्याची तयारी करीत होता. हीं पापें करतां करतां त्याचें मन इतकें निष्ठूर झालें होतें, त्याची सदसद्विवेक बुद्धि

इतकी नष्ट झाली होती कीं, चुकूनसुद्धां त्यास तो करीत असलेल्या पापाबद्दल वाईट वाटत नसे अगर त्याला पश्चात्ताप होत नसे. पैशाचिक मदतीनें तो करीत असलेलीं पापें एका ईश्वराखेरीज दुसऱ्या कोणाच्याही नजरेस येत नसत. यामुळें विमलचन्द्र एक अत्यंत दुष्ट मनुष्य असूनही पुनः तो जगाच्या दृष्टीनें सज्जनच होता.

पण ज्यावेळीं आह्मी राज्ञी प्रभावती व विक्रमार्क यांच्या चरित्राकडे पाहतों त्यावेळीं मनाला किती आनंद वाटतो. ईश्वराच्या कृपेनें प्रभावतीला एक सुंदर कन्या जाहली असून तिच्या बालक्रीडेनें सर्व राजवाड्यांत आनंदीआनंद उसळून राहिला होता. प्रभावती आपल्या योग्यतेप्रमाणें दानपुण्य करून आपल्या पतीवर अढळ प्रेम ठेऊन स्वर्गसुख अनुभवीत होता. ज्यावेळीं तीं दोघें पतिपत्नी आपल्या लहानग्या प्रमोदिनीच्या बालक्रीडा पहात बसलेलीं आढळत, त्यावेळीं पहाणारास किती तरी आनंद होत होता. राजा विक्रमार्क आपल्या प्रजेचें यथायोग्य पालन करीत होता. त्याला अन्याय अगदीं खपत नसे. अलीकडे त्याच्या दरबारांत एक महत्त्वाची गोष्ट घडली होती, तेवढी सांगतों.

विक्रमार्काला उषा नांवाची एक बहीण होती, हें वाचकांना माहीत आहेच. तिचा पती मित्रगुप्त हा विक्रमार्काचा उपसेनापती होता. त्याचें व विक्रमार्काचें वारंवार भांडण होत असे. अखेरीस तें भांडण अगदीं विकोपाला गेलें. मित्रगुप्तानें क्रोधाच्या तडाक्यांत विक्रमार्कावर तलवार उपसली. झालें ! विक्रमार्काचा क्रोधही अनिवार अनावर झाला व त्यानेंही कांहींएक विचार न करितां आपल्या मेहुण्यास आपल्या राज्यांतून हद्दपार केलें ! मित्रगुप्तही कोठें निघून गेला. उषेनें, राजमातेनें व प्रभावतीनें आपआपल्यापरी विक्रमार्कास कितीतरी विनविलें; पण विक्रमार्काचा राग शांत झाला नाहीं. त्यानें मित्रगुप्ताला पुनः बोलावण्याचें मनांतसुद्धां आणिलें नाहीं. मित्रगुप्तही कोठें निघून गेला, याचा कोणासच पत्ता लागला नाहीं. बिचारी उषा आपल्या दैवाला हात लावून रुदन करण्यांत आपला काळ घालवूं लागली. क्वचित् वेळीं विक्रमार्क तिचें सांत्वन करून मित्रगुप्ताला परत बोलावण्याचें वचन देई.

× × × × × × ×

" प्राणनाथ ! " कमलिनीनें करुण वाणीनें विमलचन्द्रास विचारिलें, " आपण आपला खरा इतिहास नाहींना सांगणार ? कमलिनीनें मगावं अशीच ना आपली इच्छा ? दुर्दैव माझं ! "

" पण मागच्या गोष्टी विचारून अगर त्या ऐकून तुला कांहीं फायदा कां आहे ? " विमलचंद्रानें कांहींशा निष्काळजीपणानें म्हटलें.

" प्राणनाथ ! आपण असं कसं बरं म्हणतां ? " कमलिनी दुःखानें पुढें म्हणाली, " त्यावर तर माझं जीवनसर्वस्व आहे. "

" बरं समज. तूं म्हणतेस त्याप्रमाणें मी आहे. पुढें ? "

" पुढें-प्राणनाथ-आतां मीं सांगितलंच पाहिजे कां ? " कमलिनी आपले अश्रु पुसून म्हणाली, " जगांत मी विधवा गणली जात आहे. "

" आणि जरी मीं तूं सांगतेस त्याप्रमाणें केलें, तरी तूं कांहीं विशेष शुद्ध नाहींस. " विमलचंद्रानें कठोर स्वरांत म्हटलें.

" अस्सं-अस्सं प्राणनाथ ! प्रथम आपण कोणती शपथ वाहिली आहे, त्याची आठवण विसरलांत वाटतें ? "

" आपली इच्छा पुरी होईपर्यंत मी खोटें बोललों असेन तर ! "

विमलचंद्राचें हें उत्तर ऐकतांच कमलिनी दचकली. ती कठोर स्वरांत म्हणाली, " एकूण जगांत न्यायच नाहीं, असं म्हटलं पाहिजे. बरं प्राणनाथ ! जसं आपल्याला बरं वाटेल, तसं आचरण करण्यास आपण समर्थ आहांत; पण अगदीं अखेरचें आपणास सांगतें-हात जोडून विनंति करतें- " कमलिनी गंभीरपणें पुढें म्हणाली, " जरी आपण मला ओळखलें नाहींत अथवा आपण तसं दर्शवितां आहांत, तरी मी आपणास पुरतं ओळखलं आहे. तसंच जरी आपण म्हणतां त्याप्रमाणें मी पवित्र नसेन तरी मी विधवा नाहीं याचाच मला आनंद आहे. आणि या बाबतींत आतां जो कांहीं परिणाम होईल, त्याचं सर्व-सर्व पातक आपल्या माथीं लागेल यांत मुळींच शंका नाहीं. मी माझ्या लवचिक मनामुळें आपल्या कपटजाळ्यांत येऊन फसलें खरी, तरी यापुढें आपणास परस्त्रीला भ्रष्ट करण्याच्या बाबतींत कधींही यश येणार नाहीं हें पक्कं ध्यानांत असूं द्या. प्राणनाथ ! आपण मला खुशाल झिडकारा; पण आपणांला वाईट मार्गापासून परतवणं मी अद्यापीहि आपलं कर्तव्य समजतें. माझी विनंति आहे कीं, आपण

हा असला मार्ग सोडून द्या. ईश्वराला भ्या व सन्मार्गानें चाला. नाहीं-तर माझ्याप्रमाणें जर दुसऱ्या एखाद्या स्त्रीला भ्रष्ट करूं इच्छाल, तर त्याचा परिणाम चांगला होणार नाहीं, हें पक्कें लक्षांत बाळगा. हा माझा शाप फार वाईट आहे. पुनः आपणाला विचारत्यें—आपण माझी विनंति ऐकाल काय ? "

" कोणती ? " विमलचन्द्रानें मुद्दाम विचारिलें. कमलिनीनें वर जें व्याख्यान दिलें तें त्याला रुचलें नाहीं.

" एकंदरींत ज्या कमलिनीवर आपलें प्राणापत्नीकडे प्रेम होतें, ती कमलिनी आतां या जगांत राहूं नये अशी आपली इच्छा. बरं मी मेल्यानं तरी आपणास सुख लागो. मग काय नाहींना ? "

या वेळीं मात्र विमलचन्द्र दचकला. तो उठला. त्यानें कमलिनीस आलिंगन देण्याकरितां आपले हात पुढें केले. पण कमलिनीनें तें नाकारिलें.

" कमल ! " विमलचन्द्र थोडा निराश होऊन म्हणाला, " तूं म्हण-तेस त्याप्रमाणें मी आहें, ही गोष्ट अगदीं खरी; पण— "

" पण काय ? आपलं माझ्यावर प्रेम नाहीं असंच ना ? " कम-लिनीनें आशेनें विचारिलें, " प्राणनाथ ! जर यावेळीं आपण नाकारलंत तर मी क्षणभरसुद्धां जिवंत राहणार नाहीं. "

" छे छे कमल, पण—पण तूं माझी स्त्री आहेस—धर्मपत्नी आहेस, हें मी कबूल करतों. "

" जगापुढें ? " कमलिनीनें अत्यंत हर्षानें प्रश्न केला.

विमलचन्द्र थोडावेळ स्तब्ध बसला. नंतर तो म्हणाला, " होय ! पण त्याला पुरावा गोळा केला पाहिजे. त्याशिवाय जगाची खात्री होणार नाहीं. "

" पुरावा आपण प्रयत्न केल्यास नाहीं कां मिळणार ? "

" मिळेल कदाचित् . "

" कदाचित् कां ? " कमलिनीनें मध्येंच म्हटलें, " विपकुंभ आणि शैलोदर अद्याप जिवंत आहेत. "

" हें तुला कसें समजलें ? " विमलचंद्रानें अत्याश्चर्यानें दचकून विचारिलें.

" समजलें असेंच. बरं मग आपण केव्हां प्रयत्न करणार. "

कमलिनीच्या या प्रश्नाकडे विमलचंद्राचें क्वचितच लक्ष असेल. त्यानें बराच वेळ विचार करून म्हटलें, " आजपासूनच. पण तूं मात्र जिवाला कांहीं अपाय करून घेऊं नकोस हो. " इतकें बोलून विमलचंद्र तेथून निघून गेला. लागलींच कमलिनीनें मथुरेस बोलावून तिच्या कानांत कांहीं सांगितलें. मथुराही विमलचंद्राच्या मागोमाग गुप्तपणें निघाली.

एक दिवस गेला. दुसरा दिवस उलटला. अद्याप ना विमलचंद्र आला ना मथुरेनें दर्शन दिलें. तिसरा दिवस उजाडला. मथुरा आली.

" हं काय बातमी ? " कमलिनीनें अत्यंत उत्सुकतेनें घाबरून विचारिलें.

मथुरेची मुद्रा काळवंडली. ती खालीं बसली. कमलिनीलाहि तिनें आपल्याजवळ बसविलें. मथुरा दुःखित मुद्रेनें म्हणाली, " कमल ! तुझें माझ्यावर फार प्रेम आहे व माझेंही तुझ्यावर आहे. मी आतां जी कांहीं हकीगत सांगणार आहे, ती स्वस्थ चित्तानें ऐकून घे. नशिबांत जें असतें तें कांहीं टळत नाहीं. तुला विमलचंद्रानें अगदीं फसविलें. "

कमलिनीवर विद्युत्पातच झाला ! ती खालीं मान घालून अस्फुट स्वरांत म्हणाली, " तें तर मला केव्हांच समजून चुकलें आहे. तूं काय बातमी आणिली आहेस ती लवकर सांग. "

" ऐक तर. विमलचंद्रानं तुला जी हकीगत सांगितली आहे ती अगदीं खोटी आहे. त्यानं अगदीं प्रथम म्हटल्याप्रमाणं कुमुदिनीशीं त्यानें खरोखरच विवाह केला आहे. शहराजवळ एका उत्तम वाड्यांत विमलचंद्र आपल्या बायकोसह रहात आहे. आजकाल कुमुदिनी गरोदर असल्यामुळं वाड्यांत डोहाळे जेवणाचा मोठा थाट उडून राहिला आहे. "

" बरं पुढें ? " कमलिनीनें अत्यंत उद्वेगानें विचारलें.

" वसंतदुर्गांत असतांना तुझी दुसरी एक मैत्रीण होतीना ? काय तिचं नांव ? "

" कला " कमलिनीनें सुचविलें.

" ती तर फारच थोर नशिबाची. ती उज्जनीच्या राजाची राणी झाली आहे. "

" खरं कीं काय ?" कमलिनीनें अत्याश्चर्यानें म्हटलें, " बरं झालं. ती तशाच योग्यतेची होती."

कमलिनीस खरोखरच मनापासून आनंद झाला. कमलिनीनें मथुरेला विमलचंद्राविषयीं खरी हकीगत पाहून देण्याकरितां पाठविलें होतें. चतुर मथुरेनें तीन दिवस उज्जयिनींत राहून एका बड-बड्या बाईकडून सर्व हकीगत काढून आणली. तिनें ती कमलिनीस इत्थंभूत सांगितली.

सर्व हकीगत ऐकल्यावर कमलिनीनें विचारिलें, " बरं, ही हकीगत तूं कोणाकडून ऐकलीस ?"

" शृगालदत्तानें तुला ज्यांच्या बागेंत आनंददुर्गाहून आणून ठेविली होती त्यांच्या घरीं एक बया नांवाची दासी आहे. तिनें मला हें सर्व सांगितलें. आणखी तुला एक महत्वाची गोष्ट सांगूं कां ? ती ऐकून तुला खात्रीनं आनंद होईल."

" ती कोणती ?" कमलिनीनें आश्चर्यानें विचारिलें.

" सिंहवाहिनी तपस्विनीची तुला आठवण आहे ?"

" हो—हो कां बरं ?" कमलिनीनें उत्सुकतेनें विचारिलें.

" ती इथं आली आहे. "

" खरं कीं काय ? कुठं आहे ?" कमलिनीनें उत्सुकतेनें प्रश्न केला

" क्षिप्रा नदीच्या कांठीं एका झोपडींत राहते आहे."

" मग आपण तिला भेटायला गेलं पाहिजे. या संकटसमयीं ती माझं खात्रीनं रक्षण करील." असें म्हणून कमलिनी उठली.

थोड्याच वेळांत त्या तपस्विनीकडे जाण्यास निघाल्या.

कमलिनी यावेळीं मोठ्या संकटांत होती. ज्यावेळीं मथुरेच्या तोंडून कुमुदिनी गरोदर आहे, असें तिनें ऐकिलें. त्यावेळीं तिला किती तरी वाईट वाटलें. कुमुदिनीविषयीं तिला हेवा मुळींच वाटला नाहीं. इतक्या हलक्या मनाची ती मुळींच नव्हती; पण कुमुदिनीप्रमाणें तीही यावेळीं गरोदर होती. तिच्या स्थितींत व कुमुदिनीच्या स्थितींत किती जमीन अस्मानीचा फरक होता ? यावेळीं तिला एखाद्या सहृदय मनुष्याची मदत पाहिजे होती. तेव्हां मथुरेच्या तोंडून तपस्विनी इथें आली आहे, हे ऐकतांच तिला अत्यंत आनंद झाला व तात्काळ ती तिच्याकडे

जाण्यास निघाली यांत नवल तें काय ? पण जितक्या उत्सुकतेनें कमलिनी तपस्विनीला भेटण्याकरितां गेली, तितकीच ती त्या झोंपडीजवळ जाऊन पोंचतांच तिची निराशा झाली. तपस्विनी थोड्याच वेळांपूर्वी यात्रा करण्याकरितां तेथून निघून गेल्याचें त्यांना समजलें. कमलिनीची किती निराशा झाली असेल, याची कल्पनाच केली पाहिजे.

" आतां मी जगणं मुळींच शक्य नाहीं. " कमलिनी निराश होऊन म्हणाली.

" छे छे " मथुरा तिला धीर देऊन म्हणाली. " अशी घाबरून निराश होऊं नकोस. आपल्या पोटांतील मुलाची आठवण ठेव. विमलचन्द्र इतका कांहीं निठुर होणार नाहीं. तो पुनः येईल. " असें म्हणून मथुरेनें तिला बराच धीर दिला. व तिला परत घरीं आणिलें.

मथुरा एक यःकिंचित् दासी होती हें खरें; पण ती मनुष्य होती. तिला थोडेंबहुत अंतःकरण होतें. कमलिनीनें ज्यावेळीं तिला आपली खरी हकीगत सांगितली, त्यावेळीं तिला तिच्याबद्दल फारच करुणा आली. ती कमलिनीवर फारच प्रेम करूं लागली व कदाचित् अविचारानें कमलिनी आपला प्राणत्याग करील, या भीतीनें ती तिच्यावर विशेष लक्ष पुरवूं लागली.

" कमल ! " मथुरा रडत असलेल्या कमलिनीस आपल्या पोटाशीं धरून म्हणाली. " सगळ्या जगानं जरी तुला पापी म्हणून टाकून दिलं, तरी मी तुझी खरी हकीगत जाणतें आहे. मी तुझा कधींही त्याग करणार नाहीं. "

अशाप्रकारें विमलचंद्राची वाट पहातां पहातां दिवसांमागून आठवडे व आठवड्यांमागून महिने, होतां होतां सहा महिने लोटले. विमलचंद्रानें एकदांही येऊन कमलिनी जिवंत आहे किंवा नाहीं याची चौकशी केली नाहीं. अखेरीस कमलिनीचे नऊ मास नऊ दिवस पूर्ण झाले व एकेदिवशीं पूर्वादिशा दिनकर प्रसवत असतांच कमलिनीनें एका सुंदर पुत्ररत्नास जन्म दिला ! मथुरेनें शक्य तितकी कमलिनीची सेवा केली व मधुर शब्दानें तिनें सांत्वन केलें. आणखी कांहीं काल लोटला.

कमलिनीला आपल्या पुत्राकडे पाहून वारंवार रडूं कोसळें ! तिला अलीकडे जेवण गोड लागत नसे, झोंप येत नसे, आल्यास नाना-

प्रकारचीं भयंकर स्वप्नें पडत. केव्हां केव्हां रात्रीं मध्यान्हीला ती दचकून जागी होई व निद्रा उत्तरीय करीत स्वस्थ निद्रासुख अनुभवीत असलेल्या आपल्या बालकाकडे पाहून ती रडूं लागे ! ती त्याचें चुंबन घेऊन त्याच्या निद्रिस्त मुद्रेकडे पहात पुटपुटे, " बाळा ! तुझ्या आईची किती केविलवाणी स्थिति आहे, याची तुला कल्पना तरी आहे काय ? नको— माझ्या बाळाला हें समजत नाहीं हाणूनच बरें आहे. " इत्यादि पुटपुटत ती आपल्या अश्रूंनीं आपल्या मुलास न्हाऊं घाली.

× × × × × × ×

अशा प्रकारें गत पांच वर्षांत निरनिराळ्या पात्रांचे निरनिराळे प्रकार घडले. बकुळीच्या आयुष्यांत कांहीं विशेष घडलें नाहीं. ती त्या दिवसापासून राजवाड्यांतच राहत असे. धर्मचंद्र आपल्या नातवाचें मुख व खेळणें पाहून सुखानें मृत्यु पावला. वसंतदुर्गाचा सर्व अधिकार विमलचंद्राकडे आला. कुमुदिनीच्या इच्छेनें विमलचंद्र वसंतदुर्गांतच राहूं लागला.

इकडे राजमालाही आपल्या नातीचें मुख पाहून पंचत्वास पोहोंचली! वाचकगण ! कथानकांतील हा आमचा दुसरा टप्पा आहे. आणखी पंधरा प्रकरणें सांगून आम्ही आपली रजा घेणार.

---

प्रकरण छत्तिसावें.

## पुनः एकवार तपस्विनी.

ग्रीष्म ऋतु सुरू झाल्यामुळें क्षिप्रा नदी कृष होत चालली होती. तरीही ज्याठिकाणीं आपणास जावयाचें आहे त्याठिकाणीं फारच रमणीयता दृष्टीस पडत होती. नदीपात्राच्या किनाऱ्याला दाट झाडी लागली होती. त्यांत झाडींतून मंजुळ कलरव करीत एक निर्झर मंदगतीनें कृष शिप्रेकडे वाहत होता. झाडीच्या पुढें विस्तीर्ण माळरान लागतें पडलें होतें.

गर्द झाडांच्या झालांतून जरा पलीकडे नजर पोहोंचविल्यास एक टुमदार झोंपडी दृष्टिगोचर येत होती. जवळच एक जुनाट वटवृक्ष असून त्याच्या जवळच एक पडकें देवालय दिसत होतें. देवालयाच्या पाठीमागूनच जलनिर्झर वहात होता. या ओढ्याच्या कांठाशीं असलेल्या एका गर्द झाडाच्या पायथ्याशीं एक लांबरुंद खडकावर वनराज पसरला होता. जवळच एक पांच वर्षांचा सुंदर मुलगा पाण्यांत डुंबत, पाण्यावर टिचक्या मारीत खेळत होता.

" ए वनराज, " तो सुंदर मुलगा त्या सिंहाच्या तोंडावर पाणी उडवीत म्हणाला, " ही पाहिलीस कां मजा ? "

पाण्याचे शिंतोडे तोंडावर पडतांच वनराज आपली मान वर उचलून त्यानें त्या सुंदर मुलाकडे पाहिलें व पंजानें आपल्या तोंडावरील पाणी पुसत, जिभल्या चाटीत त्यानें पुनः आपली मान खडकावर ठेवली.

" हेरे काय गड्या ! " तो सुंदर मुलगा पुनः वनराजाच्या अंगावर पाणी उडवीत म्हणाला, " तूं पुनः निजलास. आम्ही नाहीं जा. तुझ्याशीं नाहीं खेळत. "

वनराजाला आपल्या बालमित्राचा क्रोधाविर्भाव समजलासें दिसलें. त्यानें पडल्या पडल्या आपली मान लांब करून प्रसन्न मुद्रेनें त्या मुलाकडे पाहिलें.

" उठून बैस गड्या ! " त्या मुलानें त्याच्याजवळ येत म्हटलें.

वनराजानें आपलें शेंपूट हालवून आपणास त्रास न देण्याबद्दल विनविलें; पण तो मुलगा तिकडे कसचा लक्ष देतो. त्यानें निर्भयपणें त्याच्या मानेखालीं आपला चिमुकला हात घातला व दुसऱ्या हातानें त्याच्या मानेस विळखा घालून त्या सिंहास उठविण्याचा प्रयत्न केला. वनराजही लीलेनें आपणास बळपूर्वक उठविणाऱ्या आपल्या बालमित्राकडे पाहूं लागला. कितीवेळ तरी त्या मुलानें वनराजाची मान उचलण्याकरितां खटपट केली, पण व्यर्थ.

" थांब अं. मी आईला जाऊन सांगतों, वनराज माझ्याशीं खेळत नाहीं म्हणून. "

असें म्हणून तो मुलगा रागानें वनराजाकडे पहात तेथून जाऊं लागला. वनराजानें हलकेंच आपली मान वर उचलली. तो मुलगा तेथेंच थबकला व म्हणाला, " पुरता उठून बैस, तेव्हांच मी येईन खेळायला. "

इतक्यांत " बालार्क-ए बाळ ! अद्याप आंघोळ नाहीं कां झाली ? " असा आवाज ऐकूं आला.

" आलों ग आई, " बालार्कानें जोरानें ओरडून उत्तर दिलें व वनराजाजवळ येऊन म्हटलें, " चलरे, आई हाक मारते आहे. "

इतक्यांत तपस्विनी तेथें आली व त्या मुलाला उद्देशून म्हणाली, " कायरे गुलामा, अद्याप आंघोळ नाहीं झाली ? " असें म्हणत तिनें जवळ येऊन बालार्कास उचलून कडेवर घेतलें.

" गुलामा ! फारच खोडकर झालास बघ ! " असें म्हणत तपस्विनीनें प्रेमानें त्याचें चुंबन घेतलें.

बालार्क तिच्या गळ्याभोंवतीं आपले हात टाकून म्हणाला, " आई, हा वनराज माझ्याशीं खेळत नाहीं बघ. "

" त्याला आपण ठोक देऊं बरं कां ! " असें म्हणत ती झोंपडी-कडे वळली. वनराज तेथेंच पडून राहिला.

" आई, दाई आली कां ग ? " बालार्कानें तपस्विनीकडे प्रेमानें पहात विचारिलें, " आज ती माझ्याकरितां खाऊ आणणार आहे होयना ? "

" होय. " तपस्विनी त्याचे कुरळे केश बाजूला सारीत म्हणाली.

" ती केव्हां येईल बरं ? "

" येईल आतां इतक्यांत. " असें म्हणत ती आपल्या झोंपडींत येऊन पोहोंचली.

" हं उतर. तुला जेवायला देत्यें. " असें म्हणत तिनें एका लहानशा पाटावर त्यास बसविलें.

थोड्याच वेळांत तिनें त्याच्यापुढें एका ताटलींत भात, तूप, मीठ, कस-लेसें वाटलेलें तिखट व एका वाटींत दूध इत्यादि आणून ठेवलें. तिनें त्याचा भात कालवून दिला व बालार्क आपल्या हातानें जेवूं लागला.

" आई, तुला एक गोष्ट विचारूं कां ग ? " बालार्कानें कांहींसें आठवीत प्रश्न केला.

" कसली गोष्ट बाळ ? " तपस्विनीनें कांहींसें आश्चर्यानें विचारिलें.

" तूं रागावणार तर नाहींस ? "

" नाहीं बाळ. "

" मग काल रात्रीं किनी मी जागा झालों होतों, त्यावेळीं तुला मी

रडतानं पाहिलं—तूं कां बरं रडत होतीस ?" बालार्कानें किंचित् भीत भीत विचारिलें.

मुलांना कोणती गोष्ट कोणत्या वेळीं आठवेल, याचा नेम नाहीं. बालार्कानें म्हटल्याप्रमाणें ती गोष्ट अक्षरशः घडली होती. तपस्विनीच्या नेत्रांतून अश्रु गळतांना त्यानें पुष्कळ वेळां पाहिलें होतें. आतां सहज त्याला त्या गोष्टीची आठवण झाली व सहजासहजींच त्यानें तपस्विनीला त्याबद्दल विचारिलें. त्याचा तो प्रश्न ऐकतांच तपस्विनी आश्चर्यचकित् झाली. आपलें गुप्त रडणं बालार्कानें पाहिलें असेल, याची तिला कल्पनासुद्धां नव्हती.

तपस्विनी पराच वेळ स्तब्ध बसली.

" माझ्या बोलण्याचा तुला राग आला होय ?" बालार्कानें दुःखित स्वरांत विचारिलें.

" नाहीं बाळ." तपस्विनीनें प्रेमानें त्याकडे पहात उत्तर दिलें. तिच्या नेत्रांत अश्रु आले. चटकन् आपल्या पदरानें तिनें ते पुसले.

इतक्यांत माया काखेंत एक गांठोडें घेऊन तेथें आली.

" दाई, माझ्याकरितां राघू आणलास ?" बालार्क उष्ट्या हातानें पाटावरून उडी मारून तिच्याजवळ येऊन म्हणाला.

" गुलामा," माया त्याला दरडावून म्हणाली, " उष्ट्या हातानं मधेंच. जा हात धू." असें म्हणून ती खालीं बसली व गांठोडें सोडूं लागली.

बालार्काच्या आनंदास पारावार राहिला नाहीं. मग त्याला जेवण कसचें सुचतें. तो तपस्विनीला म्हणाला, " आई, आतां पोट भरलं गडे. हात धू."

" तेवढा भात खा नू मग—"

" हें बघ पोट अगदीं गच्च भरलं." बालार्क ताट बाजूला सारीत म्हणाला.

" आतां कुठलं जेवण सुचायला ?" माया मध्येंच म्हणाली.

अखेरीस नाइलाजास्तव तपस्विनीनें त्याचे हात तोंड धुतलें.

हात धुतले मात्र, बालार्क धांवतच मायेजवळ आला व त्यानें उत्सुकतेनें विचारिलें, " माझा राघू कुठं आहे ?"

" हा घे. जा आतां बाहेर खेळ जा." असें म्हणून मायेनें लांकडाचा एक सुंदर राघू गांठोड्यांतून काढून बालार्काच्या हातांत दिला.

यालार्क उडचा मारीतच " अहारे माझा सुंदर राघू ! " म्हणत झोप-डीबाहेर गेला.

यालार्क गेला मात्र, मायेनें गांठोडें बाजूला सारीत तपस्विनीला उद्देशून म्हटलें, " इंदिरे ! तुझे वाईट दिवस संपले असें समज. "

तपस्विनी आश्चर्यानें मायेकडे पाहूं लागली.

" खोटं नाहीं सांगत—तुझीं मुलं जिवंत आहेत. "

" काय ? " तपस्विनी मटकन् खालीं बसत म्हणाली. ती डोळे फाडून मायेकडे पाहूं लागली.

" तुझ्या चंद्रपालला तर मी प्रत्यक्ष पाहून आलें आहे. "

" दाई—दाई—तूं हें काय बोलते आहेस ? " तपस्विनी दाईच्या गळ्याला मिठी मारून म्हणाली, " हें कधीं तरी शक्य आहे काय ? "

" अगदीं शक्य आहे आणि तुला तो भेटेलही. मी खात्रीनं सांगत्यें कीं, कृष्णसेन, बालसिंह व स्वयंप्रभा हींही जिवंत आहेत व तीं तुला लवकरच भेटतील. " मायेनें तपस्विनीला कुरवाळीत म्हटलें.

" दाई—दाई—तुला मी खोटं म्हणत नाहीं; पण—पण असं कुठून व्हायला. त्यानं माझं निसंतान केलं ग ! "

" त्यानंही त्याला लवकरच प्रायश्चित मिळेल. "

" खरंच का तूं चंद्रपालसिंहाला पाहिलं होतंस ? " तपस्विनीनें केविलवाण्या स्वरांत प्रश्न केला.

" अगदीं खरं सांगत्यें—मीं आपल्या या डोळ्यांनीं पाहिला. "

" आणि कृष्णसेन, बालसिंह व स्वयंप्रभा यांनासुद्धां ? "

" नाहीं, यांना मीं पाहिलं नाहीं; पण मी त्यांचाही शोध लावीन. "

" तीं जिवंत आहेत हें कशावरून ? "

" घाबरूं नकोस. माझ्या म्हातारीच्या बोलण्यावर विश्वास ठेव. बरं, मग तूं चंद्रपालसिंहाकडे केव्हां जाणार ? "

" दाई—तूं रागावूं नकोस; पण अद्यापही मला या गोष्टीचा विश्वास नाहीं वाटत. ईश्वर असं कुठून करायला ? "

" नाहीं इंदिरे ! नाहीं—ईश्वर तुला विसरला नाहीं. तुझ्या भाग्योदयास सुरवात झाली, असें समज. "

" तो कुठं राहतो आहे. "

" सध्यां इथंच उज्जयिनींतच आहे. "

" इतके दिवस तो कुठं होता ? "

" त्याची बरीच लांबलचक कथा आहे. त्यानं आपलं नांव बदललं असल्यामुळें इतके दिवस त्याचा पत्ता लागला नाहीं. "

" आज तुला त्याचा पत्ता कसा लागला ? "

" सुमारें चार पांच वर्षांपूर्वी आपण इथं आलों होतों ना, त्याच वेळीं मी त्याला एकदां गाडींतून बसून जातांना पाहिलं होतं. पुढं आपण इथून यात्रा करण्याकरितां निघून गेलों. पुढें आज महिना झाला आपण इथें आलों आहोंत. मी शहरांत जातां येतां त्याला चार पांच वेळां पाहिलें. इथून जवळच एक मोठी बाग आहे. त्यांतच अलीकडे मीं त्याला पाहिलें आहे. मला तो तोच असावा असा संशय वाटे; पण काल संध्याकाळीं अगदीं जवळून त्याला पाहिलं. तो चंद्रपालसिंहच होता. "

" मग मला ही गोष्ट कालच कां सांगितली नाहींस ? "

" माझी तरी ही खात्री नव्हती. आज माझी शंका समूळ नाहींशी झाली. आज मी आतां इकडे येत असतां, त्याला त्या बागेच्या फाटकापाशीं पाठमोरा उभा असतांना पाहिलं. तो एकटाच होता. मी हळूंच त्याच्याजवळ गेल्यें व त्यास ' चंद्रपालसिंह ' म्हणून हाक मारिली. "

" मग ?" तपस्विनीनें आश्चर्यानें विचारिलें, " त्यानें तुला ओळखलें ?"

" हो तर. " माया पुढें म्हणाली, " त्यानं दचकून मागं पाहिलं व एकदम म्हटलं " ओहो ! दाई, तूं इकडे कुणीकडे ? "

" त्यावर तूं काय म्हटलेंस ? "

" इतक्यांत त्याला काय वाटलें कोण जाणें ! तो तेथून एकदम निघून गेला. "

" कुठं ? " तपस्विनीनें घाबरून विचारिलें.

" त्या बागेंत एक महाल आहे तिकडे. " माया पुढें म्हणाली, " घाबरूं नकोस. तो तिथंच राहतो. मी तिथल्या माळ्याला सर्व विचारून आल्यें आहे. "

" दाई-दाई- " तपस्विनी दाईला मिठी मारून म्हणाली, " तुझे हे उपकार मी कुठं फेडूं. दाई ! तूं यःकिंचित् दासी; पण माझ्या-

सारख्या वनवासिनीबरोबर हिंडतांना ऊन म्हटलें नाहींस थंडी, वारा, पाऊस, भूक, कशा-कशाचा तूं विचार केला नाहींस. दाई, तुझे हे उपकार मी कसे फेडूं ? तुझी सेवासुद्धां तूं करूं देत नाहींस. " असें म्हणून तपस्विनी रडूं लागली. म्हातारी दाईही रडूं लागली.

इतक्यांत बालार्क धांवतच आंत आला ! तपस्विनी व दाई एकमेकीस मिठी मारून रडतांना पाहतांच तो अगदीं चकित झाला. बालार्काला पाहतांच त्या दोघींनीं आपले नेत्र पुसले व त्या अलग झाल्या.

" काय गडबड आहे ? " तपस्विनीनें बालार्काच्या गालावर हलकेच थप्पड देऊन हंसत विचारिलें.

" किनी आई ! " बालार्क तपस्विनीला बिलगत म्हणाला, " बाहेर एक बाई आणि दोन चार बोवा आले आहेत. "

" कोण बाई आणि बोवा ? " तपस्विनी मायेकडे वळून म्हणाली, " दाई, पहा बरं कोण आलं आहे ? "

माया बाहेर आली. तिनें पाहिलें तों थोड्या अंतरावर दया एका सुंदर मुलाला कडेवर घेऊन इंदुमतीसह मेण्यांतून नुक्तीच उतरलेली तिच्या दृष्टीस पडली. माया त्यांचें स्वागत करण्याकरितां पुढें गेली.

" आज इकडे कुणीकडे ? " मायेनें आपल्या बहिणीला आश्चर्यानें विचारिलें.

" तुझ्या तपस्विनीला ही-( इंदुमती ) भेटायला आली आहे. " नंतर ती आपल्या कडेवरील मुलाला मायेच्या हातांत देऊन म्हणाली, " हा हिचा मुलगा. " मायेनें प्रेमानें त्या मुलाला आपल्या कडेवर घेतलें व ती पुढें झाली.

दयेनें भोयांना तेथेंच मेण्याजवळ बसण्यास सांगितलें. नंतर ती इंदुमतीसह मायेच्या मागून चालूं लागली.

मायेनें पुढें जाऊन तपस्विनीस सर्व सांगितलें व मुलाला तपस्विनीजवळ दिलें. त्या लहानग्या मुलाला पाहतांच बालार्कास फारच आनंद झाला. तपस्विनी त्या मुलाला आपल्या मांडीवर घेऊन बसली व त्याकडे प्रेमानें पाहूं लागली. बालार्कालाही फार कौतुक वाटलें. त्यानें हळूंच वाकून त्या मुलाचें चुंबन घेत म्हटलें, " पाहिलंस आई, कसा हंसतोय् गुलाम. माझ्या मांडीवर दे गडे त्याला. " असें म्हणून

त्यानें मांडी ठोकली व तो आपल्या मांडीवर थापटी मारीत म्हणाला, " हं दे गडे. "

" नको बाळ ! तूं पाडशील त्याला. "

" अगदीं हलकें घेतों मी बघ—दे—दे गडे, तो पहा माझ्याकडे येण्याकरितां हात बाहेर काढतोय् . "

" तर—तर. " असें म्हणत तिनें एकवार त्या मुलाला बालार्काच्या मांडीवर टेकल्यासारखें केलें व म्हटलें, " बस्स—पुरे आतां. " असें म्हणून तिनें पुनः त्यास आपल्या मांडीवर घेतलें. इतक्यांत माया इंदुमती व दया यांना घेऊन आंत आली.

इंदुमतीनें आंत येतांच भक्तिपूर्वक तपस्विनीस नमस्कार केला. तपस्विनीनें योग्य आशीरवाद देऊन तिला आपल्याजवळ बसण्यास सांगितलें. दया व मायाही जवळच बसल्या.

" आई, या कोणग ? " बालार्कानें हलकेंच इंदुमतीकडे बोट दाखवून विचारिलें.

तपस्विनीनें किंचित् हंसून इंदुमतीकडे पाहून पुनः त्याच्याकडे पहात म्हटलें, " तुझी आई बाळ. "

" कायरे गुलामा ? " माया त्यास उद्देशून म्हणाली, " काय विचारतो आहेस ? "

इंदुमतीला तपस्विनीस पाहून फारच आनंद वाटला. तिच्याविषयीं एकप्रकारची भक्ति तिच्या मनांत उत्पन्न झाली. बालार्काला पाहून तर तिला फारच कौतुक वाटलें. तिनें प्रेमानें त्यास आपल्याजवळ बोलावलें. बालार्कही मुकाट्यानें तिच्याजवळ येऊन बसला.

" तुझं नांव काय बाळ ? " तिनें त्यास कुरवाळून विचारिलें.

" बालार्क. " बालार्कानें तिच्या मुखाकडे आश्चर्यानें पहात उत्तर दिलें.

अशाप्रकारें इंदुमतीची व बालार्काची परस्परांस ओळख होत असतां दयेनें आपल्या येण्याचें कारण सांगितलें. तिनें प्रथम इंदुमती कोण वगैरे सर्व हकीगत सांगून पुढें म्हटलें, " आपण थोर आहांत. तिच्या मनाला शांती प्राप्त होईल, असें कांहीं करा. तिचा मुलगा नेहमीं दचकतो. त्याला कांहीं भूतबाधा किंवा काय झालें आहे, तें

पाहून कांहीं योग्य औषध वगैरे सांगितल्यास उपकार होतील. " असें म्हणून दया मायेला घेऊन तेथून बाहेर गेली.

इकडे तोंपर्यंत इंदुमती व बालार्क यांची चांगलीच गट्टी जमली.

दया व माया निघून गेल्यावर तपस्विनी थोडा वेळ सहानुभूतिपूर्वक इंदुमतीकडे पहात राहिली. नंतर ती तिला म्हणाली, " इंदुबाई ! तुमच्या स्थितीबद्दल मला खरोखरच फार वाईट वाटतें; तुमचें दुःख कमी होण्याकरितां मी तुम्ही सांगाल तें करीन. मी तुमच्याकरितां काय करूं ? "

तिचा हा प्रश्न ऐकतांच इंदुमतीनें एकवार भक्तिपूर्वक तपस्विनीच्या तेजोमय मुद्रेकडे पाहिलें व म्हटलें, ' माझ्या मनाला शांति मिळेल, असा कांहीं उपदेश मला हवा आहे. "

तपस्विनी किंचित् हंसली. ती म्हणाली, " दुसऱ्याला उपदेश देण्याकरितां जी योग्यता अंगीं लागते ती माझ्यांत नाहीं, तरी पण बाई ! तुला एक मंत्र सांगतें. ज्या ज्या वेळीं आपल्या स्थितीबद्दल तुला वाईट वाटेल, त्या त्या वेळीं हें ध्यानांत आण कीं या जगावर आपल्यापेक्षांही दुःखी प्राणी पुष्कळ आहेत. फार कशाला—तूं या बाळाकडे ( बालार्काकडे ) पहा, याच्या आईनें याला तीन महिन्याचा असतां जंगलांत टाकून दिलें ! "

" काय म्हटलें ? " इंदुमतीनें एकवार बालार्काकडे व एकवार तपस्विनीकडे पहात दचकून विचारिलें.

" होय ! पहा बिचाऱ्याचें नशीब ! तसंच माझ्याकडे पहा ! मी कोण ? हें आजपर्यंत एक मायेखेरीज करून कोणीही जाणत नाहीं; पण माझ्याकडे पहा. मी तुला तपस्विनी कां वाटतें ? "

इंदुमती आश्चर्यानें तपस्विनीकडे पाहूं लागली बालार्कास त्यांच्या बोलण्याचा जरी अर्थ समजला नाहीं तरी तोही आश्चर्यानें तिच्याकडे पाहूं लागला.

" नाहीं मी तपस्विनी नाहीं. एका बलाढ्य राजाची पत्नी आज तुझ्यापुढें तपस्विनीच्या वेषांत बसली आहे. दुर्दैवानें मला हा वेष धारण करावयास लाविलें आहे "

इंदुमती वरील बोलणें ऐकतांच स्तंभित झाली.

" माझं बोलणं तुला खोटं वाटतं ? "

" नाहीं नाहीं " इंदुमतीनें ह्मटलें, " हें कसं घडलं ? याचं मला आश्चर्य वाटतं ! "

" अग, हा दैवाचा विचित्र खेळ आहे." तपस्विनीनें गंभीरपणें ह्मटलें. आणखीही त्यांच्या बऱ्याच गोष्टी झाल्या.

---

## प्रकरण अडतिसावें

## रंगांत भंग.

" रोज रोज हा कोण मेला त्रास ? मी आत्तां जाऊन राणीसाहेबांना सांगतें. मी कांहीं आतां या वाड्यांत राहणार नाहीं. " चंडिका रागारागानें फुलें तोडीत फुसफुसली.

" अग, त्या बिचाऱ्या झाडावर कां तुझा राग ? " त्राटिकेनें मध्येंच हळूंच विचारिलें, " खरंच चंडिके, कायग झालं ? "

" काय माझं टाळकं सांगूं ? न सांगण्यासारखं, न ऐकण्यासारखं—"

" अग पण इलकें हो— हें पहा कळ्या कशा तोडल्यास त्या—च्—च् " त्राटिका परडींत फुलें टाकीत ह्मणाली, " उगीच कां जळफळते आहेस आज ? "

" अग, काय सांगुं—या आमच्या नव्या ताईसाहेब— "

" ह्मणजे ती बकुळी कीं काय ? " त्राटिकेनें मध्येंच तिरस्कारानें म्हटलें.

" होय. त्याच बकुळाबाई. काय त्यांचा डौल पण ! राणीसाहेबांना असं झालंय् कीं, हिला कुठं ठेवूं, आणि कुठं न ठेवूं; पण बया अशी वस्ताद आहे—दिवसा ढवळ्या सगळ्यांच्या डोळ्यांत धूळ टाकते."

" कांहीं नवीन पत्र वगैरे सांपडलं आहे कीं काय ? " त्राटिकेनें उत्सुकतेनें विचारिलें.

" अग तें तर रोजचंच चाललंय; पण आमच्या राणीसाहेबांना एक तरी खरं वाटतं कां ? उलट—पण आपण बाई कशाला बोला. "

" घाबरूं नकोस. अग पाप हें कुठवर झांकळं जाणार ? " त्राटिका हलकेंच म्हणाली, " एखाद्या दिवशीं प्रत्यक्ष राणीसाहेबच जेव्हां तिच्या खोलींतून एखादा बाहेर पडतांना पाहतील, तेव्हां त्यांची आपोआपच खात्री होईल. "

" अग, तो दिवस येईपर्यंत ही बया राहते कशाला ? कालच हिच्या हातचं पत्र चमेलीला मिळालं आहे. त्यांत तिनं आपल्या प्रियकराला स्पष्ट लिहिलं आहे कीं, लवकरच दहापांच लाखांचा ऐवज घेऊन येत्यें म्हणून. आणि त्याप्रमाणं ताईसाहेबांचा चंद्रहार नाहींसा झालाच ! "

" पण कायग ? " त्राटिकेनें सहज विचारिलें, " इतक्या बंदोबस्तांत अगदीं कडक पाहऱ्याच्या अंतःपुरांत या गोष्टी घडतात कशा ? याचं तुला आश्चर्य नाहीं कां वाटत ? काय हिनं चेटुक तर नाहीं केलं ? "

" देव जाणे ! " चंडिका कानावर हात ठेवून गंभीरपणें म्हणाली, " मला एवढंच भय वाटतं कीं, इथं चोऱ्या करील ही बया- आणि आळ येईल फुकटाफाकट तुझ्या माझ्यासारखींवर- "

" हें मात्र खरंग बाई ! " त्राटिकेनें अनुमति दिली.

" म्हणूनच मीं विचार केला आहे. बाईसाहेबांना जाऊन मी साफ सांगणार- "

इतक्यांत त्या दोघींना कोणी हाका मारल्या म्हणून त्या महालांत गेल्या.

वर सांगितल्याप्रमाणें अलीकडे दोन तीन महिन्यांपासून राणी प्रभावतीच्या दासीगणांत नेहेमीं वकुळीच्या वर्तनासंबंधीं अशी कुजबुज चाले. आणि त्यांत त्या दासींचा कांहीं विशेष अपराध नव्हता. याला दोन कारणें होतीं. पहिलें कारण थोरामोठ्यांच्या घरीं ज्या दासी असतात, त्यांपैकीं बहुतेकींना ' पराचा कावळा ' करण्याचा रोग जडलेला असतो. चंडिका व त्राटिका त्या नियमाला अपवाद नव्हत्या. दुसरें कारण ज्या गोष्टीसंबंधानें वर त्यांचें संभाषण झालें, ती गोष्ट अगदींच खोटी नव्हती.

अलीकडे अलीकडे वकुळीच्या वर्तनासंबंधानें नानाप्रकारचे संशया-

स्पष्ट चमत्कार घडूं लागले. अंतःपुरांतील दासीगणांपैकीं पुष्कळांनीं बकुळीच्या वर्तनासंबंधीं चमत्कार पाहिले होते. अगदीं प्रथम प्रथम कोठें तरी सांदीं कोंपऱ्यांत खोंचलेलीं अगर गुप्तपणें ठेवलेलीं बकुळीच्या नांवचीं प्रणयपत्रें आढळूं लागलीं. कधीं बकुळीकडून लिहिलेलीं पत्रें तिच्याच कपड्यांत सांपडूं लागलीं. अर्थातच तीं सर्व पत्रें प्रभावतीपुढें गेलीं; पण प्रभावतीनें तिकडे विशेष लक्ष्य दिलें नाहीं. ती शुद्ध मनाची, तिनें तीं सर्व पत्रें बकुळीला दाखविलीं. तीं पत्रें पाहतांच बकुळीला 'हे माय धरणी ठाय' असें झालें. ती या गोष्टीविषयीं अगदीं अनभिज्ञ होती. बकुळीच्या शुद्धाचरणाविषयीं प्रभावतीला पक्की खात्री होती. प्रभावतीनें तिचें सांत्वन केलें व तीं सर्व पत्रें जाळून टाकिलीं. अशाप्रकारें एक आठवडा गेला.

दुसऱ्या आठवड्यांत त्यापेक्षांही जास्त संशय येईल असा चमत्कार घडूं लागला. रात्रीं बेरात्रीं बकुळीच्या खोलींत कोणी पुरुष तिच्याशीं कुजबुजत आहे, असें पुष्कळ दासींनीं ऐकलें. कधीं बकुळी व कोणी परपुरुष खूब आनंदांत गप्पागोष्टी करीत आहेत असेंही मंडळींनीं पाहिलें होतें. कधीं तिच्या खोलींत एखाद्या पुरुषाला शिरतांना अगर बाहेर पडतांना कित्येकांना भास झाला होता इतकेंच काय? पण एखाद्या चांदण्या रात्रीं बकुळी एका पुरुषाच्या खांद्यावर हात टाकून राजवाड्याच्या पाठीमागील बागेंत फिरत असल्याचेंही एकदोघींनीं पाहिलें होतें. याही गोष्टी प्रभावतीच्या कानावर गेल्या. आतां मात्र प्रभावती व उषा यांना किंचित् पंचाईत पडली. त्यांना बकुळीच्या पावित्र्याविषयीं पक्की खात्री होती तरी बहुतेक सर्व दासी वर सांगितलेले प्रकार आपण पाहिले, म्हणून अगदीं निक्षून सांगत. राणी प्रभावतीला त्या सर्वच खोटें सांगत असतील हें मुळींच शक्य वाटेना व ज्या वेळीं ती बकुळीच्या तेजस्वी (पण अलीकडे सुरूं झालेल्या नवीन उपाधीनें किंचित् चिंतातुर असलेल्या) मुद्रेकडे पाही, त्यावेळीं तिला मोठी पंचाईत पडे. कारण सर्वच दासी कांहीं खोटें बोलणाऱ्या अगर दुष्ट नव्हत्या. या गोष्टीची शहानिशा करण्याकरितां तिनें एका सुशील दासीला एका बाजूला बोलावून विचारिलें. त्यावेळीं त्या दासीनें नेत्रांत अश्रु आणून म्हटलें,' राणीसाहेब बकुळीबाईसंबंधानें ज्या कांहीं गोष्टी आपण ऐकल्या

आहेत. त्या सर्वच खोट्या आहेत, असं मी ह्मणत नाहीं. कारण त्यां- पैकीं पुष्कळ प्रकार मीं स्वतः पाहिले आहेत; पण बकुळीबाईच्यासंबंधानं अशी शंका घेणं मला मुळींच योग्य वाटत नाहीं. मी आपल्याला सांगावं असं नाहीं; पण आज आपण विचारलं म्हणून सहज सांगतें- आपल्या इथं किती कडक बंदोबस्त आहे बरं ? इथें कोणीतरी परका पुरुष येऊं शकेल काय ? मग आपण त्या साध्वीविषयीं कसा संशय घ्यावा ? मला तर खास वाटतं- त्यांचे ग्रह सध्या फिरलेले दिसतात. या वेळीं त्यांच्याविषयीं प्रत्येक गोष्ट फार जपून केली पाहिजे. नाहीं- तर मागून पश्चात्ताप करण्याची पाळी येईल. मी अगदीं खात्रीपूर्वक सांगत्यें कीं, प्रत्यक्ष त्याच आपल्या कुवर्तनाविषयीं स्पष्टपणें सांगतील तरच मला तें खरं वाटेल, तोंपर्यंत पाहिलेल्या चमत्कारापेक्षांही जास्त संशय येणारा प्रकार पाहिला तरी मी त्यांच्या वर्तनाविषयीं शंका घेणार नाहीं. "

दासीचें वरील भाषण प्रभावतीनें शांतपणें ऐकून घेतलें. नंतर दासी निघून गेली. या एकाच दासीनें तिला हें सांगितलें नव्हतें, तर आणखी दोन तीन दासींनीं आपल्या राणीला बकुळीच्या सद्वर्तनाविषयीं खात्री दिली होती. दुसरें स्वतः प्रभावतीनें कधींही सांगितलेल्या प्रकारांपैकीं एकही प्रकार पाहिला नव्हता. स्वतः सेवेचेंही तिच्याविषयीं फार चांगलें मत होतें. इत्यादि गोष्टींचा विचार करून तिनें त्या गोष्टीकडे दुर्लक्ष केलें.

यावेळीं बकुळीची मात्र मोठी विलक्षण स्थिति होती ! विमलच- न्द्राच्या भीतीनें ती कुमुदिनीला सोडून प्रभावतीजवळ येऊन राहिली होती. पुढें चारपांच वर्षें तिची मोठ्या शांततेंत गेलीं आतां ती तेवीस वर्षांची ऐन तारुण्यांत होती; पण एखाद्या योगिनीप्रमाणें ती आपला सर्व काल ईश्वरभजनपूजनांत घालवून मोठ्या आनंदांत होती. परंतु दैवाला हें तिचें सुख पाहवलें नाहीं. त्यानें अलीकडे हा भयंकर शनिमिरा तिच्या पाठीमागें लाविला ! राणी प्रभावतीला अद्याप आपल्याबद्दल आदर व प्रेम वाटतें; पण जर वारंवार या गोष्टी घडल्या तर हा तिचा विश्वास किती दिवस टिकणार ? मग पुढें याचा काय परिणाम होणार बरं ? हा विचार रात्रंदिवस तिच्या हृदयाला जाळूं लागला.

जर बकुळी सच्छील होती, तर वर सांगितलेले चमत्कार मग कसे घडत होते? सुज्ञ वाचकांनो! या प्रश्नाच्या उत्तराकरितां जर आम्ही विमलचन्द्राकडे बोट दाखविलें, तर राज्ञी प्रभावतीप्रमाणें आपल्याला ही शंका वाटेल काय?

सुमारें पांच वर्षांपूर्वी विमलचन्द्रानें बकुळीशीं अतिप्रसंग करण्याचा घाट घातला होता; पण राज्ञी प्रभावतीच्या येण्यानें तो त्याचा दुष्ट हेतु कसा फसला हें वाचकांना माहीत आहेच. त्यानंतर ज्यावेळीं विमलचंद्रानें विचार केला कीं जरी बकुळी आपल्या बायकोजवळ झालेली गोष्ट सांगण्यास कचरली, तरी ती राज्ञी प्रभावतीजवळ ही गोष्ट खात्रीनें सांगेल व प्रभावती या गोष्टीचा छडा लावल्याखेरीज राहणार नाहीं. तेव्हां निदान पांच सहा महिने तरी आतां चुप्प बसले पाहिजे. असा विचार करून तो अगदीं स्तब्ध राहिला. पुढें ज्या वेळीं त्या गोष्टीचा त्याला विसर पडलासा वाटलें, तेव्हां तो पुनः कांहीं प्रयत्न करणार होता; पण पुष्कळ कारणांमुळें त्यास आपला बेत सफळ करतां येईना. कारण बकुळी प्रभावतीजवळ राहूं लागली होती. अशाप्रकारें दोन वर्षें लोटलीं. पुढें धर्मचंद्र वारल्यामुळें वसंतदुर्गाचा अधिकार आपल्या ताब्यांत घेण्यांत आणखी दोन तीन वर्षें गेलीं. अशाप्रकारें विमलचन्द्राचीं गेलीं पांच वर्षें इकडे तिकडे गेल्यामुळें बकुळीला स्वस्थता मिळाली व तिला मागें घडलेल्या प्रसंगाचें बहुतेक विस्मरण पडलें. बकुळी त्या गोष्टीला विसरली होती; पण विमलचन्द्र कांहीं ती गोष्ट विसरला नव्हता. त्यानें पुनः स्वस्थता मिळतांच बकुळीला आपल्या जाळ्यांत ओढण्याचा निश्चय केला. भुताच्या सहाय्यानें तो बकुळीला एका क्षणांत राजवाड्यांतून हुसकून नेता; पण तसें केल्यास राज्ञी प्रभावती आकाशपाताळ एक करील व कदाचित् ती मागची गोष्ट आठवून आपलाच संशय घेईल, असें त्यास भय पडलें म्हणून त्यानें बकुळीच्या आचरणाविषयीं सर्वांना संशय येईल अशाप्रकारचे पैशाचिक चमत्कार सुरू केले. असो.

या सर्व गोष्टींचा सूत्रधार धूर्त विमलचन्द्र असतां कोणालाही त्याचा संशय आला नाहीं. बकुळीलाही आपल्या पाठीमागें विमलचन्द्र लागला असेल, याची शंकासुद्धां आली नाहीं. आणि विमलचन्द्रही

कांहीं कमी-पुर्ते नव्हता. ज्या वेळीं तो राजवाड्यांत जाई, त्या वेळीं विक्रमार्कोबरोबर या गोष्टीविषयीं बोलतां बोलतां मोठें आश्चर्य वाटल्या-सारखें दाखवी. महाराज विक्रमार्कही या गोष्टीकडे विशेष लक्ष देत नसे. एक तर राणी प्रभावती असल्या गोष्टी त्याच्या कानावर न जातील, याची खबरदारी घेत असे. दुसरें विक्रमार्काची व मित्रगुप्ताची थोड्याच दिवसांपूर्वी झटपट उडून त्यानें मित्रगुप्ताला हद्दपार केलें होतें व आणखी दुसरीं पुष्कळ राजकारणें होतीं.

हें सर्व ठीक होतें. राणी प्रभावती, उषा वगैरे मंडळी अद्यापीहि बकुळीवर प्रेम करीत होती; पण हें चालणार कुठवर व या गोष्टीचा परिणाम काय होणार, या चिंतेनें बकुळी मनांतल्या मनांत झुरूं लागली. प्रहराच्या प्रहर ती याच चिंतेंत घालवी. या तिच्या अस्वस्थ मनाला शांती देणारी व्यक्ति होती काय? 'अहाहा! ज्याची मूर्ति बकुळीच्या हृदयावर खोदली गेली होती, त्या मूर्तीनें येऊन जर सध्या दर्शन दिलें असतें, अथवा त्या आपल्या प्राणेश्वराबरोबर जर आपला विवाह झाला असता, तर आपल्या इतर मैत्रिणींप्रमाणें आपणही आज संसार करूं लागलों असतों. मग आजच्यासारखा भयंकर प्रसंगही आपल्या-वर न येता.' इत्यादि चिंतातुर विचार करीत एके दिवशीं ती बसली असतां चमेली नांवाची दासी तिच्याजवळ आली.

"चमेली!" बकुळी अत्यंत निराशेनें तिला म्हणाली, "चाल-लेल्या प्रकाराचा कायग परिणाम होणार? मला नाहीं वाटत, मी आतां जिवंत राहीन असं!"

"ताईसाहेब!" चमेली आदरपूर्वक म्हणाली, "मी काय सांगूं? पण ताईसाहेब, जपा हो जपा! काल प्रत्यक्ष राणीसाहेबांनीं आपल्या-विषयीं—"

"कांहीं संशय घेण्यासारखं पाहिलंना? नशीब माझं!" असें म्हणून अत्यंत उद्वेगानें तिनें आपल्या कपाळावर हात मारून घेतला.

"ताईसाहेब मला वाटतं आतां इथुन तुम्ही कुठं तरी जावं."

"अग, आतां एकदांच जायच!" बकुळी निराशेनें हंसून म्हणाली, "यमराज केव्हां कृपा करील ती खरी."

हाय! बकुळीचें तें मंदहास्य किती हृदयभेदक होतें! बकुळी आपली

मान घालून कांहीं विचार करूं लागली. चमेली दुःखित मुद्रेनें तिच्याकडे पहात तेथून निघून गेली.

दुर्दैवी बकुळी ! काय बिचारीचें दैव ! !

ती आपल्या कपाळावर हात मारून ह्मणाली, " एकंदरींत मला सुख लागूं नये, अशीच दैवाची इच्छा दिसते ! आनंददुर्ग मी याचकरितां कां सोडला ? हाय ! एकंदरींत स्त्रियांचा जन्मच खोटा ! त्यांतून हें सौंदर्य तर फारच वाईट ! जगांत खऱ्याला मान नाहीं, किंमत नाहीं आणि उत्कर्षही पण नाहीं, असंच समजायचं. मग ईश्वराचा न्याय कुठं आहे ? पण ईश्वराला मी कसा दोष देऊं ? प्रभावती आपल्या सत्कर्माचें फळ भोगते आहे. मग मलाच असं दुःख कां ? माझीं खोटीं कर्म. खरंच, मी काय चांगली वागल्यें. फक्त आपल्या जिवाच्या भीतीनं मी त्यांना तिथं त्या कैदेंत सोडून आल्यें ! त्या दुष्टानं त्यांची काय वाट केली असेल भगवान् जाणें ! त्यांची काय स्थिति असेल बरं ? त्यांना मी दुःखांत सोडून आलें ह्मणूनच त्यांचा शाप मला सुख भोगूं देत नाहीं. प्रभावतीच्या सहाय्यानं मी त्या कारागृहांतून त्यांची सुटका कां बरं केली नाहीं ? मनांतल्या मनांत मीं त्यांचं पुष्कळ चिंतन केलं; पण त्यांना कैदेंतून सोडविण्याकरितां मी कां बरं खटपट केली नाहीं ? कदाचित् त्यांत मला यश आलं असतं अगर न येतं. त्यांना सोडविण्याकरितां मी गेल्यें असल्यें तर माझी कीर्तीच नसती कां झाली ? स्त्रीचं हें कर्तव्य नव्हे कांहीं. प्राणनाथ ! आपल्याला मीं दुःखांत ठेवलं, त्याचं तर फळ मी भोगतेंच आहें; पण मरणापूर्वी आपण एकवार दर्शन द्याल काय ? आज जवळ जवळ सहा वर्षं होत आलीं. आपली सुटका झाली असेल काय ? कां त्या राक्षसानं आपलं कांहीं बरं वाईट केलं ? देवा ! मी आतां मरणार हें ठरलेलं ! माझ्या दैवांत हे जसे नानाप्रकारचे खेळ घडताहेत, तसंच त्यांची भेट होण्याचा योग तूं नाहीं कां घडवून आणणार ? पण अशा चांगल्या इच्छा जर पार पडल्या तर मनुष्याला आणखी काय पाहिजे होतं ? " इत्यादि उद्वेगजनक विचार करतां करतां तिचें डोकें दुखूं लागलें. म्हणून ती बागेंत हिंडण्यास गेली.

तिसऱ्या प्रहरची वेळ. अद्यापीहि ऊन चटचटत होतें. बकुळी

आपला मनस्ताप थंड करण्याकरितां वृक्षांच्या गर्द छायेंतून शून्य दृष्टीनें इकडे तिकडे पहात फिरत होती. बराच वेळ ती फिरली. अखेरीस थकून गेल्यामुळें तिनें एका कुंजांत जाऊन बसण्याचा विचार केला. फिरतां फिरतां ती अगदीं बागेच्या एकीकडच्या टोंकाला आली. जवळच तिला मधुमालतीचा एक कुंज दृष्टीस पडला. याच कुंजांत जाऊन बसण्याचा तिनें विचार केला. ती मंद मंद पावलें टाकीत त्या कुंजांत गेली. अकस्मात् " कोण ? बकुळी ? " असें कोणीतरी एकदम आश्चर्यानें बोललें.

बकुळीनें दचकून समोर पाहिलें तों काय ? पंचवीस सव्वीस वर्षांचा एक सुंदर तरुण आश्चर्यानें तिच्याकडे पहात असलेला तिच्या दृष्टीस पडला !

" अगबाई ! प्राणनाथ ! " येवढेंच बकुळी बोलली. तिला घेरी आली व ती मटकन् खालीं बसली. तरुण तिला सांवरण्याकरितां पुढें होणार होता; पण तात्काळ तो मागेंच थबकला.

तो तरुण वयानें पंचवीस वर्षांचा होता. अंगकांठी चांगली कणखर दिसत होती. त्यानें आपला उजवा हात धोतराखालीं झांकून ठेवला होता. घेरी येऊन खालीं बसलेल्या बकुळीकडे तो किती वेळ तरी केविलवाण्या दृष्टीनें पहात होता.

" बकुळ ! " तरुणानें प्रेमानें हाक मारिली.

बकुळीला आलेली क्षणिक मूर्च्छा गेली. तिनें साश्रुनयनांनीं आपल्या पुढें उभ्या असलेल्या तरुणाकडे पाहिलें.

" बकुळ, तूं मला ओळखलेंस ? " त्या तरुणानें प्रश्न केला.

" दासी आपल्याला कशी विसरेल ? " बकुळीनें त्याच्याकडे पहात म्हटलें.

" तूं अद्यापीहि माझ्यावर प्रेम करते आहेस ? " त्या तरुणानें आतुरतेनें प्रश्न केला. बकुळीनें त्याच्याकडे पाहून किंचित् स्मित केलें.

" बकुळी ! तुझा पूर्वींचा बालसिंह मी राहिलों नाहीं. " त्या तरुणानें दुःखानें म्हटलें. बकुळीनें आश्चर्यानें त्याच्या मुद्रेकडे पाहिलें.

" हें पहा ! " असें म्हणून त्यानें आपला वस्त्राखालीं झांकलेला उजवा हात पुढें केला ! तरुणाचा पंजा मनगटापासून तुटलेला होता

बकुळीनें भीतीनें एक अस्फुट चीत्कार तोंडावाटे काढला. ती पडणारच होती. तिनें आश्रयाकरितां आपले बाहू वर केले; पण तरुणानें दुःखानें मान हालविली ! बकुळीनें दुःखानें जवळच्या एका लांकडास धरलें !

" दासी प्रेमाला अपात्र झाली काय ? " बकुळीनें त्या तरुणास दुःखानें प्रश्न केला.

" नाहीं—नाहीं. " तो तरुण मध्येंच आवेशानें म्हणाला, " तूं अद्यापीहि माझ्यावर प्रेम करीत आहेस, हें पाहून मी किती आनंदानें तुला आलिंगन दिलें असतें; पण बकुल, त्याबद्दल मला तूं क्षमा कर. मी तें करूं शकत नाहीं. "

" असं कां बरं ? " बकुळीनें दुःखानें प्रश्न केला, " मी त्या योग्य कां नाहीं ? "

" बकुल—बकुल, आतां तूं जास्त बोलूं नकोस. माझी प्रतिज्ञा भंग करवूं नकोस. "

" कसली प्रतिज्ञा ? " बकुळीनें आश्चर्यानें विचारिलें.

" माझ्या हाताकडे पहा- ज्या दुष्टानें हा माझा हात तोडला आहे, त्याचें शिरच्छेदन केल्याशिवाय मी प्रेमालापांत पडणार नाहीं. अशी माझी प्रतिज्ञा आहे. "

" कोणी दुष्टानं हा डाव साधला ? "

" अग तोच—तोच तो ! " तो तरुण करकरा दांत खाऊन म्हणाला, " ज्यानें माझ्या आईला छळलें, बापाला ठार केलें, भावाला वेडें व विलासी बनविलें, तोच—तो नराधम—त्याचेंच हें कृत्य ! पण त्यालाही म्हणावें ध्यानांत ठेव ! खऱ्या वीराचा जर बच्चा असेन तर त्याचे राई-राई येवढे तुकडे करीन. " हां हां म्हणतां क्रोधानें त्याचे नेत्र इंगळा-प्रमाणें लाल झाले.

" प्राणनाथ ! " बकुळी मंजुळ स्वरांत म्हणाली, " उगीच कां बरं संताप करून घ्यावयाचा. पापाचं फल त्याला मिळेलच. "

" नाहीं मिळालें तरी मी तें देणार; तें असो. तूं सुखांत आहेस ना ? "

बकुळीच्या नेत्रांत अश्रु उभे राहिले.

" असें कां बरें ? " बालसिंहानें प्रेमानें विचारिलें.

बकुळीनें हलके हलके आपली सर्व हकीगत सांगितली, व म्हटलें, " प्राणनाथ ! आपल्या दर्शनाची इच्छा होती, तीही पूर्ण झाली. आतां मी खात्रीनं मरणार. आजकाल जे प्रकार होताहेत, हे माझ्यानं आतां नाहीं सहन होत. "

" बकुल ! या तुझ्या स्थितीबद्दल मला फार वाईट वाटतें; पण मी माझी प्रतिज्ञा पूर्ण करीपर्यंत तूं माझ्याकरितां नाहीं का दम धरणार ? माझी प्रतिज्ञा पार पडल्यावर मी तुला एक क्षणभरही दुःखांत ठेवणार नाहीं. एक सहा महिने आणखी त्याच ईश्वरावर भरंवसा ठेऊन काढ. "

" आपली आज्ञा मान्य आहे. आपल्याकरितांच मीं हा प्राण ठेवला होता व आतांही सहा महिन्याकरितां ठेवतें. मात्र सहा महिन्यानंतर आपलं दर्शन न झाल्यास बकुळी या जगांत राहणार नाहीं. "

वालसिंहानें एकवार तिच्याकडे प्रेमानें पाहिलें. तो तेथून निघून गेला.

बकुळी दुःखानें व्याकुळ होऊन तेथेंच बेहोष होऊन पडली.

एकंदर घडलेल्या प्रकारानें तिचें मन गोंधळून गेलें व त्यामुळें ती बेशुद्ध झाली.

अशाप्रकारें ती किती वेळ बेशुद्ध स्थितींत पडली होती, हें तिला समजलें नाहीं; पण ज्यावेळीं ती जागी झाली, त्यावेळीं तिनें स्वतःस एका अगदीं अपरिचित् महालांतील एका पलंगावर पडलेलें पाहिलें. जवळच एक वृद्ध बाई तिला हलके हलके वारा घालीत बसली होती. बकुळीला मोठें आश्चर्य वाटलें व ती चटकन् पलंगावर उठून बसली.

" मी कुठं आहें ? " तिनें आश्चर्यानें त्या वृद्धेस विचारिलें.

" आपल्या नवऱ्याच्या घरीं. " वृद्धेनें गंभीरपणें उत्तर दिलें.

तिचें तें विचित्र उत्तर ऐकतांच बकुळी चपापली. ती पलंगावरून खालीं उडी टाकून म्हणाली, " काय म्हटलंत ? "

त्या म्हातारीलाही यावर काय उत्तर द्यावें हें सुचेना. ती घुटमळत म्हणाली, " आतां इतक्यांत तुझा नवरा येईल त्याला विचार. "

बकुळी आश्चर्यानें स्तंभित झाली. आपण स्वप्नांत तर नाहीं, असें तिला वाटलें. म्हणून तिनें आपल्या नेत्रावरून हात फिरवून इकडे तिकडे पाहिलें. सकाळची वेळ असल्यामुळें जिकडे तिकडे चकचकून पडलें होतें. खिडक्यांतून बाहेरील बागेची अपूर्व शोभा दिसत होती.

बकुळीनें सगळीकडे लक्षपूर्वक पाहिलें व तिची खात्री झाली कीं, आपण अगदीं अपरिचित ठिकाणीं येऊन पडलों आहों. पण आपणास येथें कोणीं आणिलें ? बालसिंहानें तर आपणास आणलें नसेल अशी क्षणमात्रच तिला शंका आली; पण ती क्षणमात्रच. जर बालसिंहाच्या मनांत तिला आणावयाचें होतें, तर त्यानें तिला बेशुद्ध स्थितींत कधींही आणिलें नसतें. ती आश्चर्य करीत उभी होती. इतक्यांत विमलचंद्र तेथें आला. त्यास पाहतांच बकुळी मनांत चरकली. विमलचंद्र आंत येतांच म्हातारी तेथून सटकली. पुनः विमलचंद्रास एकांत मिळाला. बकुळी सर्व समजून चुकली ! ती भीतीनें थरथर कांपूं लागली.

" बकुळ ! आतां तूं माझ्या ताब्यांत आहेस. राजवाड्यांत तुझें सर्वत्र बदनाम झालें आहे. बोल, आतां तुझी काय मर्जी आहे ? "

" एकंदरींत माझ्या सर्व दुःखाला आपण कारण आहांत तर ? बकुळीनें क्रुद्धित होऊन विचारिलें.

" नाहीं. तुझ्यासारख्या रमणीला दुःख देण्याची माझी मुळींच इच्छा नाहीं. तूं माझी प्राणेश्वरी आहेस. मी तुझा दास आहें. "

" कुमुदिनीला हें समजलं तर ती काय म्हणेल बरं ? " बकुळीनें त्याच्याकडे तिरस्कारानें पहात विचारिलें. पण तिच्या या प्रश्नाचा उलटा अर्थ विमलचंद्रानें घेतला. तो निष्काळजीपणें म्हणाला, " त्याची नको काळजी. माझ्या सर्वस्वाची खरी मालकीण तूंच आहेस. "

" विमलचंद्र ! " बकुळी गंभीरपणें म्हणाली, " आपल्यासारख्यानं हें कृत्य करणं खरोखर लाजेची गोष्ट आहे. "

" मला तुझ्या सौंदर्यानें वेडें केलें आहे. "

" कुमुदिनीशीं आपण विश्वासघात करतां आहां ! "

" पण तूं माझा प्राणघात करीत आहेस. " विमलचंद्र पुढें म्हणाला, " प्राणेश्वरी, तूं या गोष्टीचा विचार कर. यांत तुझाच फायदा आहे. " असें म्हणून विमलचंद्र तेथून निघून गेला.

बकुळी विमलचंद्राची बंधिनी होती !

एक दिवस-दुसरा दिवस करतां करतां आठवडा गेला, पंधरवडा झाला. विमलचंद्रानें रोज येऊन बकुळीची मनधरणी करावी तिला धमकवावें, नानाप्रकार करावे; पण बकुळी कांहीं त्याच्या जाळ्यांत

येईना. आणि जसजशी ती झिडकारी, तसतशी तिच्याविषयींची विमल-चंद्राची लालसा जास्त जास्त वाढूं लागली. पण तिच्यावर बलात्कार करण्याचें धाडस त्याच्यानें करवेना.

पण बकुळीला आणून कोठें ठेविली होती ? ज्या बागेंतील महालांत पूर्वी कमलिनी रहात होती, त्याच महालांत बकुळी कैद होती. कम-लिनी व मथुरा कोठें नाहींशा झाल्या याचा त्यानें कधींही तपास केला नाहीं.

बकुळीला कैदेंत टाकून महिना झाला ! कांहीं केल्या ती दुष्ट ( ! ) विमलचन्द्राच्या सदुपदेशास ( ! ) मान्य होईना. अखेरीस एके दिवशीं 'आज तिला वश तरी करावयाची किंवा तिच्यावर बलात्कार तरी करावयाचा.' असा अगदीं निश्चय करून विमलचन्द्र तेथें आला.

" हें पहा बकुळ ! " विमलचन्द्र एक जंबिया काढून, आपल्या छातीवर रोखून म्हणाला, " आतां जर तूं एकवार आलिंगन देऊन माझ्या ह्या हृदयांतल्या अग्नीला थंड करणार नाहींस, तर हाच जंबिया आपल्या छातींत खुपसून मी तुझ्या पायाजवळ प्राणत्याग करीन. "

बकुळीला त्या धमकीचें कांहींच वाटलें नाहीं. ती गंभीरपणें म्हणाली, " खुशाल प्राणत्याग करा. तेवढाच भूमीला भार हलका होईल. "

हें तिचें खोंचक उत्तर जंबियाप्रमाणेंच त्याच्या हृदयाला जाऊन भिनलें.

" अग दुष्टे ! " विमलचन्द्र ओंठ चावून म्हणाला, " नाहींना तूं कबूल होत ? "

" नाहीं—नाहीं—नाहीं. " बकुळीनें निक्षून म्हटलें.

" मीं बलात्कार केला तर ? "

" माझा प्राण त्यापूर्वीच निघून जाईल. "

" तूं मला अशी कां बरं छळतेस ? " विमलचन्द्रानें किंचित् शांत होऊन विचारिलें.

" तुम्ही महामूर्ख आहांत. कुमुदिनीला जाऊन विचारा. " बकु-ळीनें निर्भयपणें म्हटलें, " जा— व्हा चालते इथून. "

" एकंदरींत तूं वश होत नाहींस अं ? " विमलचन्द्र जंबिया एकी-कडे फेंकून तिच्याजवळ जात म्हणाला, " पहा, अद्यापीहि विचार कर."

" आपण जरा शुद्धीवर या ! " बकुळी उठून बाजूला सरत ह्मणाली.

" मग आतां तुला कोण सोडवितो पाहूं ! " असें म्हणून त्यानें एकदम तिच्यावर झडप घातली. इतक्यांत खाडदिशीं दार उघडलें व वृद्ध दासी आंत आली.

" काय आहेग ? " विमलचन्द्रानें निराशेनें मागें वळून क्रोधानें विचारिलें.

" ती तपस्विनी पुनः आली आहे. " दासीनें भीत भीत म्हटलें.

" तपस्विनी ? कोण तपस्विनी ? टाक तिला एखादा तुकडा—जा माझ्याकडे कशाला आलीस—हो चालती. "

" पण ती आपली भेट घेऊं चाहते. " दासीनें मध्येंच म्हटलें.

" माझी भेट ? ही पुष्कळदां आली व मलाच भेटूं इच्छिते आहे. कोण आहे ही ? " असें म्हणत विमलचन्द्र बाहेर आला.

विमलचन्द्र दरवाजांत येऊन उभा राहिला. झाडाखालीं तपस्विनी उभी होती. विमलचन्द्राला पाहतांच ती धांवतच त्याच्याकडे आली. विमलचन्द्र तिला पाहून दचकला. तो मागें सरला.

" चंद्रपालसिंह—चंद्रपालसिंह ! " आमची तपस्विनी अश्रु ढाळीत ह्मणाली, " अरे, तूं आपल्या आईलाही विसरलास कारे ? "

विमलचन्द्र क्षणमात्र स्तब्ध उभा राहिला !

" बाळ येरे. " असें ह्मणून तपस्विनीनें प्रेमानें आपले हात पुढें केले.

विमलचन्द्र पुनः मागें सरला. त्यानें तिरस्कारानें तिला म्हटलें, " कुणाला तूं हें बोलतेस ? "

" नशीब माझं ! " तपस्विनी खालीं बसून रडत ह्मणाली, " बाळ चंद्रपाल, अरे, अरे आपल्या गरीब आईला तुंसुद्धां विसरलास अं ? "

" जा—जा इथें नको बसूंस रडत. चांडाळणीला आतांच यायला फावलं होतं. सगळा रंग बिघडवून टाकलान् आणि पुनः आपणच रडते. " असें म्हणत त्यानें दारांतून तपस्विनीला ढकललें व खाडदिशीं दार लावून घेतलें.

बिचारी तपस्विनी अश्रु ढाळीत तेथून चालती झाली !

———

## प्रकरण अडतिसावें.

# आनंदमय जीवन.

तपस्विनीला भेटल्यापासून आपल्यास कांहीं विशेष लाभ होईल, अशी इंदुमतीस मुळींच आशा नव्हती. दयेच्या आग्रहामुळेंच ती तपस्विनीला भेटण्याकरितां गेली; पण ज्या वेळीं तिनें त्या तेजस्वी तपस्विनीकडे पाहिलें. तेव्हां तिला खरोखर मनापासून समाधान वाटलें. तपस्विनीनें तिला जो कांहीं उपदेश केला, तो तिला अत्यंत आवडला. तो ऐकून तिच्या मनाला समाधान वाटूं लागलें. तिनें त्यांचे उपदेशाप्रमाणें वागण्याचा निश्चय केला. तपस्विनीनें तिला पुढीलप्रमाणें सांगितलें होतें.

" बाई ! जगांत आपण एकटेच दुःखी नाहीं, हें अवश्य लक्षांत बाळग. तुला आपल्या पतीच्या भ्रमिष्टपणाबद्दलच चिंता वाटते; पण वेडे ! ज्या कित्येक वैधव्याग्नींत होरपळत पडल्या आहेत, त्यांची वाट काय ? आपल्या पतीप्रमाणेंच आपलें मूल वेडें निघेल कीं काय ? अशी तूं फुकट काळजी कां करतेस ? दुसऱ्या क्षणीं काय घडेल याचा जर आपणास थांग लागत नाहीं तर पुढची फुकट चिंता कां करावी ? तुला सुख पाहिजे असेल तर आहे या स्थितींतच सुख मान. ईश्वराचे उपकार मान. त्याला रात्रंदिवस भक्तिपूर्वक आळीव. मात्र त्याला आळवितांना आपलीं दुःखेंच सांगूं नकोस. कारण तूं सांगण्यापूर्वींच तो तीं जाणत असतो. त्याला आळवितांना, त्याची प्रार्थना करितांना व त्याचे गुणानुवाद गातांना त्याची कृपा माग. तो परमेश्वर करुणाघन आहे. सर्व त्याला सारखे आहेत. तो कोणालाही विसरत नाहीं आपल्या पतीच्या भ्रमिष्टपणाबद्दल उगीच काळजी न करितां त्याला श्री कृष्णाची सेवा करण्यास लाव. ज्याप्रमाणें स्त्रीला सन्मार्गाला लावणें पतीचें कर्तव्य आहे, त्याचप्रमाणें स्त्रीचें कर्तव्य पतीला सन्मार्गाला लावण्याचें आहे हें ध्यानांत ठेव. एखाद्या अगदीं एकांत नदीतीरीं असलेल्या शेतांत झोपडी बांधून रहा. तेथें रोजची नवराबायको

ईशनामस्मरणांत काल घालवा. त्यायोगें तुमचें सहज कल्याण होईल. आपणावर कसलेंही लहानमोठें संकट आलें असतां. त्याबद्दल ईश्वराच्या नांवानें टाहो न फोडतां तें सहन करावें व कोणत्याही स्थितींत परमेश्वराचा विसर न पडेल, अशाप्रकारचा मनाचा समभाव ठेवावा. "

अशाप्रकारचा सुंदर उपदेश घेऊन इंदुमतीनें तपस्विनी, चित्रकला बालार्क व माया यांचा निरोप घेतला व वारंवार येण्याविषयींचें अभिवचन देऊन ती आपल्या गृहाकडे वळली. घरीं येतांच तिनें घडलेली सर्व हकीगत आपल्या पतीला सांगितली. अजसेनालाही तपस्विनीचा सुंदर उपदेश पटला. कारण अजसेन आतां पूर्वीसारखा अगदींच अनिष्ट नव्हता. राजा विक्रमार्काला त्याची सर्व कथा कळली होती. इंदुमतीविषयीं त्याला फार आदर वाटत असे. अर्थात् त्यानें अजसेनाच्या घरचा सर्व कारभार आपल्या देखरेखीखालीं ठेविला. चांगल्या चांगल्या सज्जन मंडळींत अजसेनाचें बसणेंउठणें होईल, अशी त्यानें व्यवस्था केली. वारंवार तो स्वतः अजसेनाला सुंदर उपदेश करीत असे. त्याला दरबारांतील एखादें काम करण्यासही तो सांगत असे. या सर्व गोष्टी तो अजसेनाशीं फार प्रेमानें व आदरानें करीत असे. त्यामुळें अजसेन आपोआपच सुधारत चालला. हळूंहळूं त्याला आपली स्थिति कळूं लागली. एखाद्या वेळीं तो विक्रमार्कानें सोंपविलेलें काम इतक्या चोख रीतीनें करी कीं, सर्व दरबार थक्क होऊन जात असे. अशा वेळीं विक्रमार्क त्याची विशेष वाहवा करून त्याला उत्तेजन देत असे. अशाप्रकारें जो अजसेन कांहीं कालापूर्वीं वेंधळा, अनिष्ट, निरुपयोगी म्हणून गणला जात असे, त्याचीच सर्व जण वाहवा करूं लागले. अजसेनाच्या सुधारण्याबद्दल कोणीं आश्चर्य केल्यास विक्रमार्क त्यास म्हणे, ' अहो, याबद्दलच तुम्हाला आश्चर्य वाटावयाला नको आहे. हे तर मनुष्य आहेत; पण एखादा क्रूर पशूही याच रीतीनें तयार करतां येईल. एखाद्या सर्वगुणसंपन्न मनुष्याला शहाणें करणें किंवा त्याच्या हातून मोठमोठीं कामें करविणें यांत कांहीं विशेष नाहीं; पण एखाद्या मूर्खाला शहाणें करून योग्यतेला चढविणें यांतच खरें भूषण आहे. उत्तम चिकण मातीची मूर्ति सहज बनविली जाईल; पण एखाद्या काळ्या पाषाणाला घडवून त्याची मूर्ति करणें यांतच खरें कौशल्य नाहीं का ? मात्र

अशा गोष्टीला सतत परिश्रम केले पाहिजेत. नाहींतर दगड फार कठीण आहे, हाताला वारंवार लागतें, असें म्हणून जर मूर्तिकार स्वस्थ बसेल तर चालणार कसें ? या जगांत पुष्कळ माणसें अशीं आहेत कीं, त्यांना कोणी वळण लावावयास नसल्यामुळें तीं मागें पडलीं आहेत. एखाद्या नीच मनुष्याला सन्मार्गाला लावतांना त्याचा तिरस्कार करून, अनादर करून अथवा ताडण करून त्याला सरळ रस्त्यावर ये म्हणणें, हा महामूर्खपणा आहे. जितका जितका मनुष्य नीच असेल, कुत्सित असेल, व्यसनी असेल अथवा मूढ असेल, तितका तितका त्याचा जास्त आदर केला पाहिजे, त्याच्यावर प्रेम केलें पाहिजे, आपली योग्यता फार मोठी आहे असें त्याच्या वारंवार निदर्शनास आणून दिलें पाहिजे. हें करतांना मात्र स्वतःचा मानापमान अथवा योग्यता याचा विचार कधींहि करूं नये. सर्वांविषयीं प्रेम व आदर नेहमीं मनांत बाळगावा म्हणजे सर्व आपोआप सुधारतात. "

राजा विक्रमार्काच्या प्रयत्नानें आपला पती सुधारला हें पाहून इंदुमतीला कितीतरी धन्यता वाटूं लागली. ती विक्रमार्कावर बंधूपेक्षांही जास्त प्रेम करूं लागली. राणी प्रभावतीचें व तिचें अत्यंत प्रेम होतें. ती नेहमीं प्रभावतीकडे जाई अथवा प्रभावतीला आपल्याकडे बोलावी. तपस्विनीला भेटून आल्यापासून इंदुमतीला असा आनंद झाला होता कीं, दुसरे दिवशीं तिनें प्रभावतीला आपल्या घरीं बोलाविलें व तपस्विनीच्या भेटीची सर्व हकीगत सांगून म्हटलें, " आपणही एकवार त्यांच्या दर्शनाला चलाच. त्यांना पाहून तुम्हाला खरोखरच फार आनंद होईल. "

" तिकडे विचारून चलूं एखादे वेळीं. " प्रभावती हंसत हंसत पुढें म्हणाली. " पण आतां कोणत्या झोंपडींत जाऊन आपण रहाणार ? "

" खरं सांगूं, माझ्या मनांत कुठें तरी चार दिवस एकांतांत रहायचं आहेच. मी तर तुमच्या पूर्वीच्या राजवाड्यांत जाऊन रहायचा विचार केला आहे. " इंदुमतीनें थट्टेनें पुढें म्हटलें, " चार दिवस आम्हाला तो भाड्यानें द्याल का ? "

" हो–हो न द्यायला काय झालं ? " प्रभावतीही हंसून म्हणाली. " आणि आपण भाडंही देणार म्हणतां ! तेवढाच आमचा तेलमिठाचा खर्च भागेल ! "

अशाप्रकारें त्यांचा पुष्कळ विनोद झाला. प्रभावती स्वभावतःच विनोदी स्वभावाची होती, त्यांत इंदुमती हंसली म्हणजे तिला फार आनंद वाटे.. याकरितां इंदुमती व ती बसल्या असतां खूपच विनोद चाले.

अखेरीस प्रभावतीनें आपलें पूर्वीचें झोंपडें– ( अर्थात् ती कला या नांवाखालीं ज्या झोंपड्यांत रहात होती तें ) आपल्या पतीला सांगून अजसेन व इंदुमती यांना राहण्यास देवविलें. इंदुमती व अजसेन एक नोकर, एक दासी व दया एवढ्या सरंजामासह त्या झोंपडींत जाऊन राहूं लागलीं. मागें वर्णन केल्याप्रमाणें अद्यापीहि ती झोंपडी व तें शेत रमणीय होतें. कारण जरी कला राणी झाली होती, तरी ती वारंवार आपल्या या पूर्वीच्या शेतांत येऊन थोडे दिवस राहून जात असे.

एखाद्या खुशवख्तु शेतकऱ्याप्रमाणें अजसेन आपल्या पत्नीसह त्या झोंपडींत राहूं लागला. नगरांतील कोलाहलमय जीवनापेक्षां क्षिप्रेच्या तीरीं या एकांत वासांत चाललेलें शांतिमय आयुष्य अजसेनास लाभदायक झालें. दोघेंही पतिपत्नी सूर्योदयापूर्वी उठत. प्रातर्विधी, स्नानध्यान होईपर्यंत सूर्योदय होत असे. नंतर अजसेन शेतांत कांहीं काम करण्यास जात असे. शेतकीसंबंधानें त्याला कांहीं विशेष माहिती नव्हती, तरी पण त्यानें जवळपासच्या एखाद्या शेतकऱ्याला बोलावून आणावें व त्याच्याकडून सर्व माहिती लक्षपूर्वक ऐकून घ्यावी. शेतकरी लोक साधारणपणें मोठे प्रेमळ असतात. अजसेनासारखा धनाढ्य मनुष्य आपल्यांत येऊन बसतो, बोलतो, हें पाहून त्या शेतकऱ्यांना फार आनंद वाटे. अजसेनानें कोणतीहि माहिती विचारिली असतां ते मोठ्या आनंदानें त्यास सर्व हकीगत सांगत. अजसेनास त्या गरीब शेतकऱ्यांचें आनंदमय व शांतिमय जीवन पाहून कितीतरी आनंद वाटला. त्यानें हळूंहळूं उत्तमप्रकारचा शेतकरी बनण्याचा निश्चय केला. त्याचा स्वभाव पूर्वीपासूनच साधा असल्यामुळें स्वतः कुदळ घेऊन शेतांत खणण्यांत अगर हातांत खुरपें घेऊन शेतांतून हिंडण्यांत त्यास कांहींच वाटत नसे. इतर शेतकऱ्यांना तें पाहून फार धन्यता वाटे. ते मोठ्या आदरानें अजसेनाशीं वागत. त्यांच्या संगतीनें अजसेन नांगरण्यास, कुळव लावण्यास, खुरपी चालविण्यास, कुरी फिरविण्यास, धान्यांत कोळपण्यास, कापणी करण्यास वगैरे वगैरे सर्व उत्तम प्रकारें

शिकला. राजा विक्रमार्कही केव्हां केव्हां त्याच्याकडे येई व त्या वेळीं विक्रमार्क एखाद्या साध्या मनुष्याप्रमाणें एखा धोंड्यावर बसून असलेल्या शेतकऱ्यांशीं प्रेमानें मन मोकळें करून हास्यविनोद करतांना अगर त्यांच्या सुखदुःखाच्या गोष्टी ऐकतांना पाहिलें असतां, तो देखावा किती हृदयंगम दिसत असेल, याची कल्पनाच केली पाहिजे. आपला राजा आपल्यामध्यें येऊन एखाद्या साध्या मित्राप्रमाणें गोष्टी करतांना पाहून त्या शेतकऱ्यांना किती आनंद वाटत असेल बरें ? आपल्या राजाविषयीं त्यांना किती प्रेम, किती अभिमान वाटत असेल बरें ? धन्य तो विक्रमार्क व ते शेतकरी कीं, जे प्रेमानें एकेठिकाणीं बसून गोष्टी करीत असत ! !

ज्याप्रमाणें अजसेन एक उत्तम शेतकरी होऊं पहात होता, त्याप्रमाणें त्याला अगदीं तंतोतंत शोभेल अशाप्रकारें इंदुमती वागत होती. तिनेंही दोन गाई, दोन म्हशी बाळगल्या होत्या. त्यांची धार काढावी, त्यांच्या खालचें झाडून काढावें, शेणाच्या गोऱ्या थापाव्यात, इतकेंच काय पण गाईम्हशींना ओढ्यावर नेऊन, धुऊनसुद्धां आणण्यास तिला लाज वाटत नसे. अजसेनाप्रमाणें तीही शेतकऱ्यांच्या नायकांत मिळून मिसळून असे. त्यांच्या सुखदुःखांच्या गोष्टी ती ऐकून घेई व शक्य तितकी मदत करण्यास ती मुळींच मागेंपुढें पहात नसे. अजसेन व इंदुमती यांना द्रव्याचा मुळींच तोटा नव्हता. त्यांनीं सध्या जो मार्ग पत्करला होता तो स्वखुषीनें पत्करला होता. त्यांना त्याबद्दल ना संकट वाटे ना कंटाळा येई. त्यांनीं एक दासी व एक नोकर नेला होता हें खरें; पण बहुतेक सर्व कामें तीं दोघेंही स्वतः करीत. दया इंदुमतीच्या मुलाला सांभाळीत असे.

या सर्वांचा अजसेनाच्या प्रकृतीवर विलक्षण परिणाम झाला. दिवसभर आनंदानें सपाटून परिश्रम करावेत व रात्रीं शांतीनें निद्रा घ्यावी. परिश्रमानें वेळेवर चांगली कडकडून भूक लागे. वेळेवर खाणें, वेळेवर परिश्रम करणें व वेळेवर आपल्या पत्नीच्या सहवासांत आनंदानें रहाणें व शांतीनें गाढ झोंप घेणें; मग अजसेनाचें शरीर निरोगी झालें असल्यास नवल तें काय ? आतां नगरांतील कोलाहल ऐकूं येत नव्हता व आळसांत आयुष्य जात नव्हतें. चाकरनोकर नसल्यामुळें त्यांच्यावर

संतापुन मस्तक तापण्याचें भय नव्हतें. गडबडीचें, त्रासाचें, आळसाचें आतां कामच नव्हतें. जें कांहीं चाललें होतें, तें सर्व आनंदांत, सुखांत, उद्योगांत व शांतींत चाललें होतें; मग अजसेन वेडा कसा राहील? इंदुमती काळजी कां करील? त्यामोगें तिच्या मुलाची प्रकृति कां बिघडेल! सर्वच पालटलें. अजसेन वेडा होता कीं नव्हता याचा भ्रम पडेल, इतका तो उत्तमप्रकारें वागूं लागला. जी इंदुमती सदा उदास, गंभीर व चिंतेनें भासलेली दिसे, तिचीही प्रकृति सुदृढ झाली. चेहऱ्यावर हास्य खेळूं लागलें. तिचा मुलगाही आतां फारच चांगला झाला. इंदुमती संसारानें खरें सुख भोगूं लागली आणि या सर्वांचें यश ती तपस्विनीकडेच देत होती. तिच्या झोंपडीपासुन तपस्विनीची कुटिका सुमारें एका कोसावर होती, तरी इंदुमती इयेसह तिच्या भेटीला वारंवार जात असे. बालार्काची व तिची तर फारच गट्टी जमली. मधून मधून ती त्याला आपल्याबरोबर घेऊन येई, एकदोन दिवस ठेवून घेई व पुनः त्याला तपस्विनीकडे पाठवून देई. बालार्क फार प्रेमाळु व गोड मुलगा होता. अजसेन, विक्रमार्क, प्रभावती वगैरे सर्व मंडळींना तो इतका प्रिय झाला होता कीं, इंदुमतीनें त्याला आपल्या झोंपडींत बोलावुन -आजनांच विक्रमार्क, प्रभावती मुद्दाम येत. आणि त्या वेळीं सर्व मंडळी बसली असतां, प्रभावतीची मुलगी प्रमोदिनी, इंदुमतीचा मुलगा आनंद व बालार्क ज्या वेळीं आपसांत खेळत, त्या वेळीं तो देखावा पाहून मंडळींना स्वर्गसुखाचा आनंद होत असे. सर्व मंडळींची तपस्विनीच्या दर्शनास जाण्याची फार उत्सुकता होती; पण तपस्विनीनें इंदुमतीला त्या बाबतींत स्पष्टपणें नकार दिला, त्यामुळें नाइलाज झाला.

तपस्विनीनें इंदुमतीस सांगितलें होतें, "राजाराणी मला पाहूं इच्छितात हें ठीक आहे, पण मला तें बरें वाटत नाहीं. सर्वांनीं माझ्या भेटीस यावें, जिकडे तिकडे माझी कीर्ति व्हावी, या उद्देशानें मी या एकांतवासांत येऊन राहिल्यें नाहीं. जर सर्वांची मला पहाण्याची इतकी उत्कंठाच आहे, तर एखादे वेळीं असा सहजच प्रसंग येईल कीं, आपण सर्वजण एकेठिकाणीं भेटूं. मात्र सध्यां तूं कोणालाही माझ्याकडे आणूं

नकोस. आणि हट्टानें ती गोष्ट केलीस तर हें ठिकाण सोडून मी दुसरी-कडे कोठें निघून जाईन, याचा पत्तासुद्धां लागणार नाहीं. "

अशाप्रकारें आमच्या सुशील इंदुमतीचा काल मोठ्या आनंदांत जाऊं लागला. एके रात्रीं स्वच्छ चांदणें पडलें असतां, दोघेंही पतिपत्नी आपल्या शेतांतून इकडे तिकडे फिरत होती. दया मुलाला घेऊन झोंपडींत बसली होती.

" इंदु ! आपला सध्यांचा आनंद पाहून इंद्रालासुद्धां असूया वाटेल नाहीं ? " अजसेनानें प्रेमानें आपल्या पत्नीकडे पहात म्हटलें.

आजचा दिवस इंदुमती कधींही विसरणार नाहीं. आकाशांत चंद्रमा हंसत होता. कुसुमसौरभयुक्त वायु हलके हलके मागेंपुढें झोके खात आपला आनंद दर्शवीत होता. वृक्ष, लता, झुडपें प्रेमानें डोलत होतीं. दशदिशा आनंदमय स्निग्ध चंद्रिकेनें भूषित होत्या. इंदुमती आपल्या प्रियकर पतीच्या प्रेमकथा ऐकत होती.

अशाप्रकारें आनंदानें परस्परांचा प्रेमालाप करण्याचा हा पहिलाच दिवस होता. तिनें हलकेंच आपला हात आपल्या पतीच्या स्कंधावर ठेवला व प्रेमभरानें त्याकडे पहात ती म्हणाली, " प्राणनाथ ! या आपल्या आनंदाला तपस्विनीच कारण नाहींत काय ? त्यांच्याच आशीर्वादाचें फळ आज आपण चाखतों आहोंत. "

" खरेंच. तपस्विनीचे हे उपकार आपल्याकडून फिटणें शक्य नाहीं. अहाहा ! तिचें जर दर्शन घडेल, तर किती बहार झाली असती. "

" त्यांची इच्छा सध्यां तशी नाहीं; तरीपण पुढें मागें केव्हांतरी आपण त्यांना भेटण्यास जाऊंच. त्या किती प्रेमाळू आहेत. आप-ल्याला अशाप्रकारें हातांत हात घालून हिंडतांना जर त्यांनीं पाहिलें तर त्यांना किती आनंद वाटेल ! "

" आतां हा आनंद कधींही मावळणार नाहीं. " असें म्हणून अज-सेनानें आपल्या पत्नीस प्रेमानें आपल्याजवळ ओढून आलिंगन दिलें.

" खरंच, परमेश्वरा, हा आनंद कधींही न मावळूं दे. "

अशाप्रकारें तीं दोघेंही एकमेकांच्या खांद्यावर हात टाकून स्वच्छ चांदण्यांत फिरत असतां इंदुमती मध्येंच दचकली. तिला शेताच्या कुंपणापलीकडे कोणी कण्हत असल्याचा भास झाला.

"हें ऐकलं ? कुंपणापलीकडे कोणीतरी कण्हतम खास !" इंदुमती आपल्या पतीला थांबवून कानोसा घेत म्हणाली.

कोणीतरी खरोखरीच कण्हत होतें. रात्रींची शांत वेळ असल्यामुळें तें कण्हणें स्पष्ट ऐकूं येत होतें.

"खरेंच. कुणीतरी आहे. चल, पाहूं आपण कोण आहे तें !" अजसेनानें म्हटलें.

दोघेंही पतिपत्नी शेताच्या बाहेर आली तों बांधाच्या कडेला एक पंचवीस वर्षांची तरुण स्त्री कण्हत पडलेली त्यांच्या दृष्टीस पडली.

---

## प्रकरण एकुणचाळिसावें.

# पुत्रदर्शन.

दुर्दैवी तपस्विनी ! विमलचन्द्रानें तिला ढकलून दार लावून घेतांच तिच्या दुःखाचा अतिरेक झाला व ती बराच वेळ रुदन करीत तेथेंच बसली. अखेरीस दुःखाचा उमाळा थोडा कमी झाल्यावर ती त्या बागेंतून बाहेर पडली व आपल्या रस्त्याला लागली. सुमारें अर्धा मैल गेल्यावर माया एका झाडाखालीं बसलेली तिला दिसली. माया खालीं मान घालून कांहीं विचार करीत होती. त्यामुळें तपस्विनी जवळ येई-पर्यंत तिला कांहींच समजलें नाहीं. चाहूल लागतांच तिनें वर पाहिलें तों रुदन करीत असलेली तपस्विनी तिच्या दृष्टीस पडली. ती उठून उभी राहिली.

"हें काय ? काय झालं ?" मायेनें अत्यंत उतावळीनें विचारिलें.

तपस्विनीनें धांवत येऊन मायेच्या गळ्यास मिठी मारिली व स्फुंदत म्हटलें, "ताई–ताई, त्यानं मला ओळखलं नाहींग ! तो मला विस-रला !" तपस्विनी धाय धाय रडूं लागली.

तपस्विनीचें दुःख थोडें शांत झाल्यावर मायेनें विचारिलें, "चंद्र-पालसिंह तुला भेटला होता ?"

" होय. मोठ्या मुष्किलीनें तिवल्या दासीकडून त्याला बाहेर बोलाविलें; पण– "

" पण काय ? तो बाहेर आला नाहीं ? "

" बाहेर आलाग– " तपस्विनी आपले अश्रु पुसत ह्मणाली, " पण त्यानं मला ओळखली नाहीं ! "

" असं कसं होईल बरं ? " मायेनें आश्चर्यानें म्हटलें.

" अग, माझं नशीबच फुटकं ! त्याला तूं तरी काय करणार ? "

" तो तुझ्याशीं मुळींच बोलला नाहीं ? " मायेनें उद्वेगानें प्रश्न केला.

" हो. फारच छान बोलला. ह्मणाला 'चांडाळणी चालती हो इथून' ! "

मायेनें दचकून आश्चर्य करीत म्हटलें, " ह्मणतेस तरी काय ? चंद्रपालानं तुला असं ह्मटलं ? "

" अग, नुसतं बोललाच नाहीं, तर त्यानं मला धक्का देऊन दारांतून बाहेर ढकलं व दार लावून घेतलं ! "

बाई आश्चर्यानें तपस्विनीकडे पाहूं लागली.

" खोटं नाहीं सांगत. जें कांहीं घडलं तें सर्व तुला सांगितलं. एक–एकच आशा धरून मी आजवर जिवंत राहिल्यें होत्यें. तीही आज समूळ नष्ट झाली ! आतां जगणं दुष्काळ झालं. चंद्रपाल जिवंत आहे, हें एकून मला मोठी आशा वाटत होती; पण तीही आज त्यानं नष्ट करून टाकली. नशीब माझं ! तो तरी सुखांत असो ह्मणजे झालं. " तपस्विनीनें निराश होऊन म्हटलें, " दाई, मी तुला पूर्वीपासूनच सांगत होत्यें कीं, माझे सुखाचे दिवस संपले ह्मणून. त्याचा तुला अनुभव आलाच आहे. "

' इतकी निराश कां बरें होतेस ? बालसिंह, कृष्णसेन यांचाही त्याच शोध लागण्याचा संभव आहे–"

" चंद्रपालसिंहानं भेटून काय सार्थक केलं, तेंच आतां बालसिंह वगैरे करणार ! "

' छे छे, आई– आपल्या आईचें दुःख दूर करण्याकरितां बालसिंह आपले प्राणसुद्धां अर्पण करील. " झाडावरून कोणीतें बोललें.

दोघींनींही दचकून वर पाहिलें. तात्काल एक तरुण झाडावरून उतरून तपस्विनीपुढें आला व त्यानें तिच्या पायावर मस्तक ठेविलें.

" बालसिंह ! " तपस्विनीनें एकदम म्हटलें व त्या तरुणाला आपल्या पोटाशीं धरलें. दोघेंही मातापुत्र अश्रु ढाळूं लागलीं.

" भगवाई खरंच हा बालसिंह ! " असें म्हणून मायाही साश्रु नयनांनीं त्या दोघांकडे पाहूं लागली.

अकस्मात् तपस्विनीची नजर बालसिंहाच्या तुटक्या हाताकडे गेली. तिनें दचकून त्याचा तुटका हात आपल्या हातांत घेऊन विचारिलें, " बाळ. हें काय ? "

बालसिंहानें आपल्या मातेकडे आदरपूर्वक पहात म्हटलें, " हें सुडाचें एक मोठें चिन्ह आहे. आई, मी आपली सविस्तर हकीगत तुला सांगतोंच; पण प्रथम तुझी हकीगत ऐकण्याची माझी फार इच्छा आहे. "

" पण इथें रस्त्यावरच आपल्या गोष्टी नकोत. " माया मध्येंच म्हणाली, " आपल्या झोंपडींत चला. "

मायेच्या म्हणण्याप्रमाणें तिघेही झोंपडीकडे जाण्यास निघालीं

वाटेनें चालतां चालतां त्यांच्या कांहीं विशेष गोष्टी झाल्या नाहींत. माया आपल्या परीं कांहीं विचार करीत होती, बालसिंह व तपस्विनी कधीं एकमेकांकडे पहात कांहीं दुःखाचे व कांहीं उद्वेगाचे विचार करीत चाललीं होतीं. सुमारें दोन तीन घटकांनीं तीं तिघेंही झोंपडीजवळ जाऊन पोंहोंचली. झोंपडीच्या द्वाराजवळच पाळीव कुत्र्याप्रमाणें वनराज बसला होता. त्याकडे पाहतांच बालसिंहास मोठें आश्चर्य वाटून त्यानें आपल्या मातेकडे पाहिलें.

" जेव्हां माझ्या सर्व सिंहबालकांनीं मला सोडलं, " तपस्विनी वनराजाकडे बोट दाखवून म्हणाली, ' त्यावेळीं या जंगली सिंहानंच माझं रक्षण केलं व पशु असूनही पुत्राप्रमाणें माझी सेवा केली. "

तपस्विनीला पहातांच वनराज प्रसन्न मुद्रेनें तिच्याजवळ आला.

" वनराज ! आज तुला एकटं करमलं नसेल ना ! " तपस्विनी त्याच्या डोक्यावर हळूच थापटी मारून म्हणाली.

" इंदुमती बालार्काला केव्हां पाठवून देणार आहे ? " मायेनें झोंपडीचें द्वार उघडीत विचारिलें. " गुलाम नसला म्हणजे किती ओकं ओकं वाटतं ! "

" कोण बालार्क ? " बालसिंहानें आश्चर्यानें विचारिलें.

" तुझा पुतण्या ! खरंच, तुझा तो आतां ' काका काका ' ह्मणून भंडावून सोडीले पण. " माया हंसत म्हणाली

मायेनें द्वार उघडून एक चटई बाहेर आणून झोंपडीसमोर आंथरली. तिघेही त्यावर बसलीं. वनराजही मोठ्या सभ्यतेनें जवळच गंभीरपणें बसला.

सर्व ठीक ठाक होतांच बालसिंहानें आपल्या मातेला आपली हकीगत सांगण्याविषयीं विनंति केली. तपस्विनीनें थोडा वेळ खालीं मान घालून आठवल्यासारखें केलें व नंतर कांहीं गंभीरपणें व कांहीं दुःखानें आपली हकीगत सांगण्यास सुरवात केली.

" हाय ! बाळ, " ती एक दीर्घ निश्वास सोडून ह्मणाली, " आज बरोबर बारा वर्षांनीं मी तुला पुनः आपल्याजवळ बसलेला पाहत्यें अं ? दैवाची काय विचित्र गति आहे ? बारा वर्षांपूर्वी मी राणी या नात्यानें आनंददुर्गांत वास करीत होतें ! मोठमोठ्या भव्य महालांत बसून आपल्या मुलांलेंकरांचें खेळणें बागडणें पहात होतें ! त्या वेळचा माझा पोषाक, माझं खाणं, रहाणं अन् आजचा हा तपस्विनीचा वेष व जंगली कंदमुळं खाऊन रहाणं ! किती किती हा फरक ? पण या फरकाचं कारण काय ? तोच ! तोच कृष्ण सर्प बरं ! त्याचा पाय त्या माझ्या दुर्गांत शिरल्यापासूनच माझ्या सर्वस्वाचा ऱ्हास होत चालला व अखेरीस मी एकीकडे, माझीं बाळें एकीकडे ! धन नाहीं—वेळेवर खायला नाहीं—अंगावर वस्त्र नाहीं, अशी माझी स्थिति झाली ! ज्या वेळीं त्या दुष्टाला आश्रय दिला, त्यावेळीं हा पुढें असा कृतघ्न निघून माझं वाटोळं करील, अशी मला मुळींच कल्पना नव्हती. पण मेल्याचा पायगुणच वाईट ! त्याला येऊन पुरते जहा महिने झाले नाहींत तोंच मेल्यानं मला दुःख देण्यास सुरवात केली. त्यानं माझ्या स्वयंप्रभेला—त्या दोन वर्षांच्या पोरीला कुठें नेऊन टाकलीन याचा पत्तासुद्धां लागला नाहीं. प्रथम त्या दुष्टाचंच हें कृत्य काढं असेल; असं तिकडेसुद्धां वाटलं नाहीं. बालसिंह, त्या वेळीं तूं सात कीं आठ वर्षांचा होतास. तुला आतां त्या वेळची कदाचित् आठवण नसेल पण त्या पोरीबद्दल तिकडे किती दुःख झालं ह्मणून सांगूं ! चंद्रपालसिंह व कृष्णसेन हेही दोघे लहानच होते. त्या पोरीचं दुःख मी सहन करत्यें न करत्यें इतक्यांत वर्षा दोन वर्षांत निकराचा अंत झाला !

त्यानें हें मला सांगितलंन् व सर्व जग असंच समजतें आहे कीं, आनंद-दुर्गेश लढाईंत मारले! पण मागून मला सर्व कळलें. त्यांच्या मृत्यूलाही पण तोच कारण! त्यानंच विश्वासघातानं तिकडचा घात केला! पण त्यावेळीं मला हें मुळींच समजलं नाहीं. तिकडचा अंत झाल्यावर सुमारें चार कीं पांच वर्सेंच तो माझ्याशीं फारच चांगलं वागला. तुलासुद्धां आठवत असेल, तो तुमच्याशीं किती प्रेमानें वागत होता. पण तें सारं कपट होतं बरं! हळूं हळूं आपल्या ताब्यांत सर्व कारभार यावा, या हेतूनं त्यानं पूर्वीचे चांगले विश्वासु नोकर काढून त्या जागीं आपल्याचा गुचे दगलबाज लोक भरण्यास सुरवात केली. पण हें त्यानं अशा खुबीनं केलं कीं, तें कुणाच्याच समजण्यांत आलं नाहीं. अखेरीस त्याच्या इच्छे-प्रमाणें सर्व झाल्यावर त्यानं आपलं खरं रूप प्रगट करण्यास सुरवात केली. मी बायको माणूस आणि तुम्ही पोरं लहान! एके दिवशीं तो दुष्ट मजजवळ आला व कांहीं दुःखानं व कांहीं गंभीरपणें म्हणाला, ' इंदिरा-बाई, झाल्या गेल्या गोष्टीचा आतां कितीही शोक केला तरी काय फायदा बरं! आतां तुम्हीं पुनः संसाराला लागावं हें बरं! "

त्याचा अर्थ मला न समजून मी आश्चर्यानें त्याच्या तोंडाकडे पाहूं लागल्यें. मला त्याच्या म्हणण्याचा मतलब नीट समजला नाहीं.

तो पुढें म्हणाला, " आतांपासूनच तुम्हाला विरक्त होण्याचें कांहीं कारण नाहीं. "

त्याचें हें बोलणें ऐकतांच मला त्याचा थोडासा संशय आला व मी म्हटलें, " आपल्या बोलण्याचा मी मतलब नाहीं समजलें! "

" नाहीं, म्हटलें– " तो माझ्याकडे तीक्ष्ण दृष्टीनें पहात म्हणाला, "तुमचं वय कांहीं अद्याप फार नाहीं. पुनः तुम्ही संसारांत पडूं शकता?"

त्याचा नीच हेतु मीं तेव्हांच ताडला. पण मीं त्यास तसें दर्शविलें नाहीं. मीं म्हटलें, " ज्यांच्याकडे पाहून मीं आनंद मानायचा, ते तर गेलेच! –"

असें म्हणून मीं तो विषय अगदीं उडवून देण्याचा विचार केला; पण त्या दुष्टाचा तसा विचार दिसेना. त्यानें स्पष्टपणें आपला विचार जाहीर केला. कारण त्यास आतां कोणाचीच भीति नव्हती. तो पूर्ण स्वतंत्र होता. आतां माझे नेत्र उघडले. मी ती आपली स्थिति

लक्षपूर्वक अवलोकन केली. त्या वेळीं माझी स्थिति फार भयंकर होती. मी सर्व प्रकारें त्याच्या मुठींत होतें. तुम्ही मजजवळ नव्हता. सर्व नोकरचाकर त्याच्याचकडचे. या एक मायेशिवाय माझें असें कोणी नव्हतें. मला मोठीच काळजी वाटूं लागली. त्या वेळेपुरतें मीं कसें तरी त्या दुष्टाचें निवारण केलें व त्याच्या पंजांतून निसटण्याच्या तजविजीस लागल्यें; पण त्या दुष्टाला माझा संशय होताच. त्यानें माझ्यावर उघडपणें जरी नाहीं तरी आंतून कडक नजर ठेविली होती. माझ्याच वाड्यांत मला इकडे तिकडे हिंडण्याची मनाई झाली. त्या वेळीं मला किती वाईट वाटलं व किती क्रोध आला म्हणून सांगूं ! पण काय करणार. झक मारीत मला त्या दुष्टाची वरकांती कां होईना खुशामत करणें भाग पडलें. मायेनें त्याची कांहीं खुबीनें समजूत घातली. मला इकडे तिकडे हिंडण्यास सांपडूं लागलें. तुला माहीत आहे, आपल्या त्या वाड्यांत एक पुतळ्यांचा महाल आहे. त्या पुतळ्यांत माझी व तिकडची अशा दोन मूर्ति खोदल्या असून कांहीं यांत्रिक प्रयोगानें त्या एके ठिकाणीं जोडल्या आहेत. त्यांतून एक भुयार आहे, त्याच भुयारावाटें मीं एके दिवशीं संधि साधून मायेसह पलायन केलें. आपल्या आनंददुर्गाच्या पश्चिमेच्या बाजूस ज्या टेकड्या दिसतात त्यांतच एक जुनाट वाडा आहे. त्याच वाड्यांत आम्ही दोघीजणीं त्या भुयारावाटें जाऊन पोहोंचलों व तपस्विनीचा वेष धारण करून राहूं लागलों. त्या यांत्रिक पुतळ्यांची खुबी कोणासच माहित नसल्यामुळें आम्ही एकाएकीं नाहींशा झालेल्या पहातांच दुर्गांत मोठाच गोंधळ उडाला; पण खरें कारण कोणासच समजलें नाहीं. त्यामुळं आम्ही त्या वाड्यांत स्वस्थपणानं राहूं लागलों. मध्यंतरीं केव्हां केव्हां मी त्या भुयारावाटें दुर्गांत जाई व एकंदर चाललेला प्रकार पाही. नोकरांचाकरांच्या बोलण्यावरून मला पुष्कळच गोष्टी समजत; पण मला तुमचं कांहींच वर्तमान कळलं नाहीं." असें म्हणून तपस्विनी थोडावेळ थांबली.

बालसिंह कांहींसें दुःखानें म्हणाला, "अरेरे ! आई, आम्ही तुझीं तीन मुलं असून तुझी अशी स्थिति व्हावीना ! दुर्दैवाचे खेळ तरी काय विलक्षण आहेत !"

तपस्विनी आपली हकीगत पुढें सांगूं लागली, "त्या तशा स्थितींतही

मी आनंद मानला असता; पण रात्रंदिवस मला तुमच्याबद्दल हुरहुर लागली होती ! त्या दुष्टानं तुमचं कांहीं तरी बरं वाईट केलं असं मला वाटे ! "

" नाहीं तरी त्यानं आम्हाला छळायला कांहीं कमी केलं नाहीं. " बालसिंह मध्येंच म्हणाला, " त्यामध्यें आम्ही मेलों नाहीं एवढेंच ! "

" तुमच्या शोधाकरितां मीं पुष्कळच खटपट केली; पण व्यर्थ. अखेरीस मी [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] वाटं लागलें; पण माया मला धीर देत असे. एके दिवशीं मी दुर्गाचें [illegible] करण्याकरितां म्हणून जी गेली ती गेली ! मायेवांचून सुमारें तीन वर्से मीं देवाचं भजन पूजन करण्यांतच आपला वेळ घालविला एक मायेचा आसरा होता; पण तीही कोठें निघून गेली. त्याच काळांत या वनराजाची व माझी मैत्री जमली. अखेरीस अकस्मात् एके दिवशीं माया परत आली व जे कांहीं प्रकार घडले ते तिनें सांगितले. तीही एक मोठी कथा आहे. ती तुला आणखी एखादे वेळीं सांगेन. एके दिवशीं मी दुर्गांत काय चाललें आहे, हें पाहण्याकरितां आलें तों त्या दुष्टानं वसंतदुर्गेशाची मुलगी पकडून आणलेली आहे, असें मला समजलें. त्या मुलीलाही मीं पलंगावर निजली असतांना पाहिली. पुढें तिनें डोळे उघडून पहातांच मी तेथें थांबलें नाहीं. पण या गोष्टीशीं माझा कांहीं विशेष संबंध नाहीं. त्याच सुमारास एक कमलिनी नांवाची मुलगी अरण्यांत मला भेटली. मायेनें त्या मुलीला ओळखलें. ती माझी सून होती. "

" म्हणजे काय ? " बालसिंहानें अगदीं प्रथम आश्चर्यानें विचारिलें.

" चंद्रपालसिंहाची ती बायको होती ! ती एक मोठीच कथा आहे; पण दुसरेच दिवशीं ती जी कुठें गुप्त झाली, तिचा पुढें पत्तासुद्धां लागला नाहीं. बिचारीचें काय झालें, देव जाणे. इकडे त्या दुष्टानं वसंतदुर्गेशाच्या त्या मुलीस पकडून आणून ठेविली होती ना ? तिला ती चोरवाट कशी माहीत झाली असेल तें असो. ती त्या चोरवाटेनें आपल्या एका बकुळी नांवाच्या मैत्रिणीसह त्या जुन्या वाड्यांत आली.

" बकुळी ? " बालसिंहानें चमकून म्हटलें.

" होय. बकुळीच तिचं नांव. फार चांगली मुलगी आहे. पण त्या

दोघी किल्यांतून एकदम नाहींशा झालेल्या पहातांच त्या राक्षसाला कांहीं संशय आला व अखेरीस त्यानें ज्या महालांत ती चोरवाट होती तो महाल साफ पाडण्याचें ठरविलें. मीं ही गोष्ट आडून ऐकली व आतां माझी खात्री झाली कीं, हा महाल पाडल्यावर त्या दुष्टाला तो रस्ता समजणार. मग आपली त्या जुन्या वाड्यांत धडगत नाहीं. मी तो वाडा सोडण्याच्या विचारांत होतें, त्याच वेळीं मायेच्या मनांत निराळे विचार सुरू होते. उज्जयिनीचे महाराजा विक्रमार्क फार न्यायी आहेत अशी तिनें त्यांची कीर्ति ऐकली होती. तिनें उज्जयिनीला चलून विक्रमार्काजवळ न्याय मागण्याचें ठरविलें होतें. मीं तिला वाडा सोडण्याचा बेत कारणासुद्धां कळवितांच तिनें उज्जयिनीस चलण्याबद्दल हट्ट घेतला. अखेरीस आम्ही इथें येऊन याच झोंपडींत राहिलों. बिचारी माया महाराजांची भेट व्हावी म्हणून पुष्कळ तडफडली; पण दैवगति विचित्र. कांहीं केल्या राजाची भेट होण्याचें लक्षण दिसेना. अखेरीस इथेंहीं माझें लक्ष्य लागेना म्हणून मीं तीर्थयात्रेंत आयुष्य घालविण्याचा बेत केला व तो मायेला कळविला. पण मायेची इच्छा इथेंच राहण्याची दिसली. मी तिला पुष्कळ सांगितलें कीं, आतां आपलं नशीब फिरलेलं आहे. पाहिजे तर आपण यात्रा करून येऊन पुनः इथें येऊं; पण सध्यां तूं चल. मोठ्या कष्टानें माया या गोष्टीला कबूल झाली व आम्ही यात्रेस निघालों. गोकुळ, वृंदावनाकडे आम्ही फिरत असतां एकेदिवशीं जमनेच्या ( यमुनेच्या ) किनारीं एक पांच सहा महिन्याचें बालक पडलेलें मला आढळलें. तात्काळ मीं त्याला आपल्याबरोबर घेतलें. आतां थोड्या वेळांपूर्वी तूं 'बालार्क' म्हणून जें नांव ऐकलंस तें त्याचंच. आतां तो गुलाम चांगला पांच वर्षांचा झाला आहे. अशाप्रकारें त्या लहान बालकाला घेऊन आम्ही चारपांच वर्षें यात्रा करीत फिरत होतों. अखेरीस महिन्या दीड महिन्यापूर्वीं आम्ही इथें येऊन पुनः राहूं लागलों. माया पुनः महाराजांची भेट घेण्याच्या खटपटीस लागली; पण अद्यापपर्यंत कांहीं तिची इच्छा पूर्ण झाली नाहीं. सुमारें आठ दिवसांपूर्वीं मायेनें येऊन मला 'चंद्रपाळसिंह जिवंत आहे,' ही आनंदाची बातमी कळविली. तो कुठें राहतो याचा पक्का तपास करून आज मी त्याच्या भेटीस गेल्यें; पण दुर्दैव माझं कीं, त्यानं मला ओळ खलें नाहीं!"

" तुलाच काय तो कुणालाच ओळखीत नाहीं. " बालसिंह उद्वेगानें मध्येंच म्हणाला, " मीही त्याला भेटलों; पण त्यानं माझा धिक्कारच केलान्!"

" मर्जी त्याची ! " तपस्विनी–अथवा आतां इंदिराबाई म्हणूं पाहिजे तर–निराशेनें म्हणाली, " तूं भेटलास यांतच मला आनंद आहे. कसंही असो, या मायेची व या वनराजाची धन्य आहे कीं, माझ्या संकट-कालांत त्यांनीं माझा एक क्षणभरही त्याग केला नाहीं. आणि पुढंसुद्धां एक मृत्युच आमची ताटातूट करूं शकेल. " इतकें बोलून ती प्रेमपूर्वक केव्हां मायेकडे व कधीं वनराजाकडे पाहूं लागली.

आपल्या आईची कर्मकहाणी ऐकतांना बालसिंहानें आपलें लक्ष शांतपणें तिच्या गोष्टीकडे दिलें होतें. राक्षसनाथानें तिला दिलेलीं दुःखें ऐकून बालसिंहास पुष्कळ क्रोध आला, तरी पण त्यानें शांतपणें सर्व हकीगत ऐकून घेतली. नंतर त्यानें विचारिलें, ' आई, त्या दुष्टाला कृताप-राधाबद्दल कठोर दंड मिळावा, अशी तुझी इच्छा आहे कीं नाहीं ? "

"अगदीं अवश्य मिळाला पाहिजे. " माया मध्येंच आवेशानें म्हणाली.

इंदिराबाईनीं आपल्या पुत्राच्या मुद्रेकडे पाहिलें. त्याची मुद्रा अगदीं शांत दिसत होती.

" बोल, आई, त्यानं आम्हां सर्वांना छळलें, त्याचा सूड मी घेऊं कीं नको ? " बालसिंहानें पुनः शांतपणें प्रश्न केला.

" मी सांगतेंना–अगदीं मेल्याचीं पाळेंमुळें खणून काढ ! " माया बोटें मोडीत म्हणाली.

" बाळ, तुझी काय इच्छा आहे ?" इंदिराबाईनीं जिज्ञासेनें विचारलें.

" माझी इच्छा ! " बालसिंह शांतपणें उत्तरला, " त्या नीचानें ज्याप्रमाणें कपटानें डाव साधला, त्याचप्रमाणें मीही कपटाला कपटच लढविणार. "

" बोलल्याप्रमाणें अगदीं कर ! " माया मध्येंच आवेशानें म्हणाली. " मला जर वेळ मिळतां तर मी त्याचं खाशीनं टाळकंच फोडण्याचा विचार केला होता; पण काय करूं–"

" काय म्हटलंस ? " बालसिंहानें आश्चर्यानें विचारिलें.

" म्हणायचं काय ? " माया बोलूं लागली, ' ही मध्यें जी तीन वर्षं नाहींशी झाल्यें होतें, तें तेवढ्याचकरितां ! मी तुमचा शोध लावण्या–

करितां म्हणून आनंदकुंगांत गेलें. तिथें त्या दुष्टानं मला ओळखून कैदेंत ठेवलं; पण मीही त्याला चांगलंच फशिवलं. एके दिवशीं त्याच्या मनांत काय आलं कुणास ठाऊक, तो माझ्याकडे येऊन म्हणाला, 'चंद्रपालसिंहाचें लग्न करण्याचा माझा विचार आहे. चन्द्रपालसिंहाला या गोष्टीला तयार कर. मी तुला चांगलं इनाम देईन.' चंद्रपालसिंहाचा विवाह करण्यांत त्याचा काय हेतु होता हें मला माहित नाहीं; पण कदाचित् संधि सांपडल्यास त्याचा सूड घ्यावा असा विचार करून मी त्यास त्या गोष्टीला कबूल झालें व अखेरीस आम्ही सर्वजण आयोध्येकडे गेलों. तेथें चंद्रपालसिंहाचा विवाह कमलिनी नांवाच्या एका सुंदर मुलीशीं झाला. पण त्या वेळीं आम्ही शरयू नदींतून पलीकडे जात असतां आमची नांव बुडाली! आमच्या नांवेंत मी, चन्द्रपालसिंह, त्याची बायको व दोन वल्हवणारे इतकी माणसं होतीं. नांव बुडाल्यावर कुणाकुणाची कशी वाट लागली, तें मला माहित नाहीं. बुडाल्यानंतर मी दोन तीन दिवस बेशुद्ध होतें. मला एका शेतकऱ्यानें काढून आपल्या घरीं नेलें होतें. अखेरीस नानाप्रकारच्या हालअपेष्टा भोगत, फिरत फिरत मी पुनः हिच्याजवळ (इंदिराबाईजवळ) आल्यें. थोड्याच दिवसांत कमलिनी इथें आली होती; मी तिला सर्व गोष्टी सवडीप्रमाणं विचारणार होतें; पण ती दुसऱ्याच दिवशीं एकाएकीं कोठें नाहींशी झाली. मी त्या दुष्टाजवळ कांहीं दिवस होतें; पण तेवढ्या वेळांत मला पाहिजे तसा वेळ मिळाला नाहीं. नाहीं तर त्याचं नरडं दाबायला मी मुळींच मागं पुढं पाहिलं नसतं." इतकें आवेशानें बोलून माया थांबली.

इंदिराबाई व बालसिंह दोघेही तिच्याकडे कांहीं आश्चर्यानें, कांहीं भक्तीनें व कांहीं प्रेमानें पहात होतीं.

---

## प्रकरण चाळिसावें.

### पुनः शत्रूंच्या जाळ्यांत.

प्रथम दर्शनींच बालसिंहाची व बालार्काची गाढ मैत्री जमली. बालसिंहानें बसल्या बसल्या बालार्कास कसरत वगैरे करण्यास शिकविलें. त्यानें त्यास कळकाच्या कांबीचें एक धनुष्य करून दिलें व सरनाक्याचे बाण करून नेम मारण्यासही शिकविलें. ज्या दिवशीं बालसिंहानें त्यास तें धनुष्य करून दिलें व नेम मारण्यास शिकविलें, त्याच वेळेस तो तपस्विनीकडे आला व मोठ्या वीरतापूर्वक म्हणाला, "आई ! पाहिलंस हें माझं धनुष्य. मला हें काकानं करून दिलं बघ."

"याचं तूं काय करणार रे गुलामा ?" जवळच बसलेल्या मायेनें विचारिलें.

"यानं किनी मी अस्सा नेम मारायला शिकणार." बालार्कानें धनुष्याची दोरी कानापर्यंत ओढून किंचित् वाकून म्हटलें.

"अहाहा ! काय पण नेम धरतय बाळ !" माया त्यास चिडविण्याच्या हेतूनें म्हणाली.

"मला येत नाहीं होय ? हें पहा– हं सांग पाहूं कुठं बाण मारूं ?" बालार्क आपल्या धनुष्यावर बाण चढवून ऐटीनें उभा राहून म्हणाला.

"पहा, गुलाम किनी ऐटीनं उभा राहिला आहे तो !" तपस्विनी त्याजवळ येऊन त्याचें चुंबन घेत म्हणाली.

"आईग ! हें पहा अं ! त्या झाडाला बाण मारतों." असें म्हणत बालार्कानें खूप खेंचून बाण सोडला. बाण त्या झाडाला लागून खालीं पडला.

"आहा ! पाहिलंस आई !" बालार्क धनुष्य खालीं टाकून आनंदानें टाळ्या पिटीत ओरडला, "पाहिलंसना आई ! आहा ! कसा पण नेमका मारला ! ओहो !"

"माझं शहाणं बाळ तें !" तपस्विनीनें त्यास कुरवाळून आपल्या कडेवर घेत म्हटलें, "बाळ तूं हें शिकून काय करणार ?"

" काका म्हणाला कीं, मी तुला आपल्याबरोबर लढाईंत नेईन म्हणून. तिथें असेच बाण मारावे लागतात असं काका म्हणाला. खरं काग आई हें ? "

इतक्यांत बालसिंह तेथें आला. त्यास पहातांच बालार्क तपस्विनीच्या कडेवरून खालीं उतरला व त्यानें आपल्या धनुष्याला उचलून बालसिंहास उद्देशून म्हटलें, " काका ! आतां मीं कसा छान नेम मारला. आईला विचारा. "

" तूं हुषारच आहेस. " बालसिंहानें कौतुकानें त्याच्या गालावर चापटी मारीत म्हटलें.

" आणखी मारून दाखविनों बघा अं. " असें ह्मणुन त्यानें पुनः एक सरनाळा लावून धनुष्याची दोरी खेंचली; पण तें धनुष्य मध्येंच काडदिशीं मोडलें ! त्या बालधनुर्धारीची मोठी निराशा झाली !

" काका, हें मोडलं किरे ! " बालार्क अगदीं रडक्या आवाजांत बोलला.

" तुला दुसरें करून देऊं बरें. " बालसिंहानें त्याचें शांतवन करीत म्हटलें.

संध्याकाळ झाला. लहानगा बालार्क दिवसभर खेळून थकल्यामुळें जेऊन लवकरच झोंपी गेला. माया, तपस्विनी व बालसिंह यांचेंही भोजन लवकरच आटपलं. बोलतां बोलतां मायेनें बालसिंहास मागील सर्व इतिहास सांगितला.

" पण तो चित्रपट ( ज्याबद्दल तपस्विनीनें कमलिनीस अभिशाप दिला होता, तो-प्रकरण पंधरावें. ) कुणाचा होता बरें ? " बालसिंहानें कांहींसें आश्चर्यानें विचारिलें, " कमलिनीचा त्या चित्रपटाशीं काय संबंध ? "

' तो चित्रपट ? " माया गंभीरपणें सांगूं लागली " चित्रकारानें कोणत्या व्यक्तीला पाहून काढिला होता हें सांगतां येत नाहीं; पण तुझ्या आईला वाटलें, तो तुझ्या पित्याचा असावा. "

" पण मग कमलिनीनें जें विचारिलें कीं, 'या चित्रपटावरील व्यक्ति जिवंत आहे काय ? ' तें काय ह्मणून ? " बालसिंहानें पुनः प्रश्न केला.

" तुला माहित नाहीं, चंद्रपालसिंह अगदीं आपल्या बापासारखा आहे. कमलिनीला वाटलें, हा आपल्या पतीचाच चित्रपट असावा. "

" खरेंच–खरेंच. " बालसिंह मान डोलवून ह्मणाला, " दादा अगदीं बाबांच्यासारखा आहे खरा. "

" एकंदरींत दैवाचे खेळ मोठे विचित्र आहेत ! " तपस्विनी बोलली.

" कमलिनीची पुढें काय स्थिति झाली, हें तुला मुळींच माहीत नाहीं ? " बालार्कानें मायेस प्रश्न केला.

" त्या दिवशीं ती एकाएकीं नाहींशी झाल्यापासून आतांपर्यंत तिची काय अवस्था झाली, हें आह्मांला मुळींच माहीत नाहीं ! हं, एवढं खरं कीं, केव्हां केव्हां मला असं वाटतं, ती जिवंत आहे. "

" हें कशावरून ? " बालसिंहानें विचारिलें.

" लहानग्या बालार्काच्या मुद्रेकडे नीट पहा ह्मणजे कमलिनीची पूर्ण ओळख पटते. मला आपलं असं वाटतं. " माया म्हणाली, " पण कायरे बालसिंह, तूं आपली हकीगत अद्याप मुळींच सांगितली नाहींस."

" माझी हकीगत नवी ती काय असणार ? " बालसिंह दुःखानें ह्मणाला. " तुमच्याप्रमाणें मलाही त्या दुष्टानें फसविण्याचा विचार केला होता, पण त्याबद्दल मी त्यास चांगलेंच तासडलें. झालें. त्यानें मला धाकदपटशा दाखविला; पण मी कसचा ऐकतों. त्याच दिवसापासून मी त्याचा कैदी झालों. एखाद्या साध्या कैद्याप्रमाणें त्यानें मला एका कैद्याच्या कोठडींत ठेविलें. त्या कैदेंत मी जवळ जवळ चार वर्षें होतों ! "

" काय म्हणतोस हें ? " दोघींनींही आश्चर्यानें विचारिलें.

" अगदीं खरं. त्या कठोर कैदेंत मी चार वर्षें होतों; पण तशा स्थितींतही माझें सांत्वन करणारी एक व्यक्ति त्या किल्ल्यांत होती. "

" तें कोण बरं ? " तपस्विनीनें उत्सुकतेनें विचारिलें.

" बकुळी नांवाची एक सतरा आठरा वर्षांची तरुण मुलगी मला भोजन आणून देत असे. ती माझें सांत्वन करी. "

" आपल्या त्या वाड्यांत कुमुदिनीबरोबर आलेली तर ही बकुळी नव्हे ? " मायेनें तपस्विनीला उद्देशून विचारिलें.

" तीच असावी. तिचें माझ्यावर फार प्रेम असे. संधि सांपडतांच

माझी सुटका करण्याचें तिनें मला वचन दिलें होतें. आणि ती गोष्ट तिनें– "

" आपलं वचन तिनं पुरं केलंन् तर ? " तपस्विनीनें कौतुकानें विचारिलें.

" आपलें वचन तिनें पूर्ण केलें असतें यांत मुळींच शंका नाहीं; पण काय असेल तें असो, त्या नीचानें तिलाही कैदेंत टाकल्याचें मीं आपल्या पहारेकऱ्याच्या तोंडून ऐकलें ! खरोखर आई, त्या वेळीं माझी किती निराशा झाली ह्मणून सांगूं ! मला वाटलें, आपला सर्व जन्म या कैदें-तच जाणार; पण नाहीं. ईश्वर मला विसरला नव्हता. त्यानें मला एका विलक्षण प्रकारानें त्या बंदिवासांतून पळून जाण्याची संधि दिली. "

" तें कसं काय ? " मायेनें उत्सुकतेनें विचारिलें.

" एके दिवशीं संध्याकाळीं मला भोजन देणाऱ्या मनुष्यानें माझें भोजन आणून ठेवलें व जातांना तो बाहेरून दार लावण्यास विसरला. मी रोजच संधि पहात होतों. आज बाहेरून दार लागलें नाहीं हें पहातांच मला मोठा आनंद झाला. त्या दिवशीं मी जेवलोंसुद्धां नाहीं. दार उघडून हलकेंच जर पळून जाण्यास सांपडेल तर काय बहार होईल, अशा विचारांत मी होतों व एकवार दार उघडून प्रयत्न तर करून पहावा, असा मीं विचार केला व हलकेंच दार उघडलें ! दार साफ उघडलें. पहारेकरी बाहेरच उभा होता; त्यानें दाराचा आवाज ऐकला कीं नाहीं कोण जाणें ? तो स्वस्थपणें आपल्या जाग्यावर बसला होता. मला मोठें आश्चर्य वाटलें व मी हलकेंच बाहेर आलों ! तरीही तो पहारेकरी चुपचच. मग मीं कसलाही विचार केला नाहीं व दर-वाजाकडे पळत सुटलों. सर्वांत आश्चर्याची गोष्ट ही कीं, जागजागीं शिपाई, नोकरचाकर व इतर माणसें उभीं होतीं; पण सर्व अगदीं तटस्थ. जणुं काय त्यांच्यावर कोणी मोहिनीमंत्रच घातला होता. मी सारखा पळत होतों. वाटेंत तो दुष्ट संथपणें चालतांना दिसला; पण त्याचीही शिपायाप्रमाणेंच अवस्था. मी अगदीं त्याच्याजवळून गेलों; पण तो कांहीं एक बोलला नाहीं. अखेरीस मी सुखरूपपणें दुर्गा-बाहेर पडलों. "

" पण तुला कुणीच कसें आडविलें नाहीं रे ? मोठी आश्चर्याची गोष्ट खरी. "

" त्याचें कारण मला मागून समजलें ! "

" तें काय ? " मायेनें उत्सुकतेनें प्रश्न केला.

" त्या दिवशीं एक दोन घटकेपुरता दुर्गावर कोणीसा मांत्रिक प्रयोग केला होता. "

" काय म्हणतोस ? मांत्रिक प्रयोग ? आणि तो कशाकरितां ? " तपस्विनीनें विचारिलें.

" तो कुणी केला होता आणि कशाकरितां केला होता, याचें मलाही कोडेंच आहे; पण मीं अशी गुणगुण ऐकली आहे कीं, त्याच दिवशीं राक्षसनायाला कोठेंसें पकडून नेलें होतें. "

" हें काय ? ' दोघींनींही दचकून विचारिलें.

" अशी अफवा आहे. आणि ती पुष्कळ अंशीं खरी आहे. "

" मग त्या मेल्याला जर कुणी पकडूनच नेलें होतें– " माया म्हणाली, " तर त्याच वेळीं ठार कां केलं नाहीं ? "

" त्याचें एक कोडेंच आहे. " बालसिंह पुढें म्हणाला, " पण तें कसें कां असेना. माझी सुटका झाली येवढें मात्र खरें. "

" त्या कैदेंतून सुटल्याबद्दल तुला किती आनंद झाला असेल पण ? " मायेनें उत्साहानें म्हटलें.

" तें कांहीं मला विचारूं नकोस. दुर्गांतून बाहेर पडल्यावर कितीवेळ तरी मी हर्षातिशयानें तेथेंच घोंटाळलों. बऱ्याच वेळानें मी शुद्धीवर आलों. पण मग मला एक नवीनच चिंता उत्पन्न झाली ! "

" ती कसली ? " तपस्विनीनें उत्सुकतेनें विचारिलें.

" मी त्या नरकवासांतून सुटलों खरा; पण मी जाणार कुठें ? खाणार काय ? राहणार कुठें ? व पुढें करणार काय ? इत्यादि विचार माझ्या डोळ्यांपुढें उभे राहिले. त्या वेळीं माझ्याजवळ अंग झाकायला पुरतें वस्त्रसुद्धां नव्हतें. दुसरी गोष्ट मला आतां जपूनच वागायला पाहिजे होतें. कारण मी निसटून गेलेला त्या राक्षसास समजतांच तो पुनः मला पकडून कैद करण्यास मुळींच विसरला नसता. अखेरीस एक विचार ठरवून त्याच रात्रीं मी जवळच्या एका खेड्यांत गेलों व एका

गरीब शेतकऱ्याच्या घरीं उतरलों. तो शेतकरी फारच चांगला होता. त्यानें मला खाण्यास दिलें व रात्रभर निजण्यास जागा दिली. दुसरा दिवस उजाडला ! पुढें काय करावें हा प्रश्न पुनः होताच. अखेरीस विचार करतां करतां मीं नोकरी करण्याचें ठरविलें; पण नोकरी तरी मला कोण देणार ? सरतेशेवटीं त्या शेतकऱ्यालाच मीं नोकरीबद्दल विनंति केली. तो शेतकरी फारच दयाळू होता. त्यानें एकवार बारकाईनें माझ्याकडे पाहिलें व म्हटलें, " तुम्ही नोकरी करणार ? "

" होय. " मीं गंभीरपणें उत्तर दिलें.

" पण तुमची योग्यता तशी दिसत नाहीं. मजुराप्रमाणें मेहनतीचीं कामें तुमच्या हातून होणार नाहींत. " त्यानें माझ्याकडे पहात म्हटलें. मीं त्यास उत्तर दिलें, " तसें जरी असलें, तरी मी प्रयत्न करीन. संवयीनें मी चांगला तयार होईन. " यावर तो शेतकरी हंसला व म्हणाला, " बरं तर तुम्ही माझ्या इथेंच रहा. "

" अखेरीस कांहीं दिवस तरी या शेतकऱ्याच्याच घरीं रहावें, असा विचार करून मीं त्याच्या घरीं राहूं लागलों. तो शेतकरी चांगला कुटुंबी मनुष्य होता. त्याच्या कुटुंबांतील सर्वच मंडळी माझ्यावर प्रेम करीत होती. ती मंडळी मला फारसें काम सांगत नसत. शेतांतील पांखरें हांकण्याचें, गुरांना पाणी पाजायचें व फार फार झालें म्हणजे कडबा तोडण्याचें काम माझ्या वांट्याला येई. मी तीं सर्व कामें मोठ्या आनंदानें करीत असे. "

" दुर्दैव दुसरं काय ? " तपस्विनी आपले नेत्र पुसून म्हणाली.

खरेंच ! या भूतलावर नेहमीं किती तरी विचित्र गोष्टी एक अद्भुत शक्ति करीत असते. पहावें तो समुद्राच्या शांत वक्षस्थलावर एखादें जहाज मोठ्या आनंदानें आपलें पाल हवेंत डोलवीत जात असतें, खालीं विस्तृत नील सलील प्रदेश पसरलेला असतो, वर अनंत आकाश नील वर्णानें रंजित झालेलें असतें. खलाशी लोक मोठ्या आनंदानें गायनाद्वारें आपला आनंद व्यक्त करीत असतात. इतक्यांत हें काय ? लहान लहरींना प्रचंड उर्मीचें स्वरूप प्राप्त होतें, झंझावात सुटतो, दशदिशा धुंद होतात व जहाजमहाराजांची स्वारी त्या गडबडींत ' समुद्रस्तृप्यंतु ' होते. या जगावर चाललेल्या आनंदजनक गोष्टींत

नेहमीं हीच स्थिति असते. कोणत्या वेळीं त्या आनंदाला दुःखाचें स्वरूप प्राप्त होईल याचा नेम नाहीं! बालसिंह राजपुत्र खरा; पण आज एका शेतकऱ्याच्या घरीं नोकर होता! हें कोणाचें कृत्य बरें? याला कोणी दुर्दैव म्हणतो, कोणी योगायोगाची सांगड घालतो, कोणी ईश्वरकरणी म्हणून ईश्वराकडे बोट दाखवितो! यांपैकीं खरें काय असेल तें असो; पण आम्हां मानवांना पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे.

"पण माझा हा आनंद फार दिवस टिकला नाहीं. त्या राक्षसानें माझें निवासस्थान धुंडाळलें व पुनः मी त्याच्या हातांत सांपडलों!"

"चांडाळाचा सत्यनाश होवो!" माया बोटें मोडीत म्हणाली.

"मला पूर्वीपेक्षांही असह्य त्रास होऊं लागला. त्याची ही एक खूण आहे." असें म्हणून बालसिंहानें आपला तुटका हात पुढें केला.

"देवा! देवा!!" तपस्विनी आपल्या डोळ्यांवर हात ठेवून म्हणाली.

"पण हात तुटल्यानंतर—" बालसिंहानें पुढें म्हटलें, "मी पुनः त्याच्या पंजांतून निसटलों."

"त्यानंतर पुनः जर तूं त्याच्या तडाक्यांत सांपडलास तर आतां पुढची हकीगत नको सांगूस." तपस्विनी दुःखानें म्हणाली.

"नाहीं. त्यानंतर मी इकडेच भटकतों आहे."

"दुसऱ्यावेळीं तूं कसा निसटलास बरं?" मायेनें उत्सुकतेनें विचारिलें.

"माझ्या पहारेकऱ्यानें मला संधि दिली. त्या दुष्टानें माझा हात तोडल्यापासून दुर्गावरील सर्व शिपायांनाच माझी दया आली. त्यांनीं मला निसटून जाण्याची संधि दिली व म्हटलें, "महाराज! पुनः तुम्ही तयारी करा. उज्जयिनीला जाऊन तेथील राजाची मदत मागा. आम्हीही तुम्हाला आयत्या वेळीं खात्रीनें मदत करूं." मला पुनः हुरूप आला व मी इकडे आलों."

"पण इथल्या राजानं तर तुला मदत करण्याचं नाकारलं ना? आतां तूं काय करणार?" तपस्विनीनें चिंतातुर प्रश्न केला.

"हं: त्याची चिंता नको. वारंवार काहीं अपेशा येत नाहीं. या वेळीं माझें मन मला पूर्ण खात्री देत आहे कीं, आतां माझाच जय होणार."

"ईश्वर कृपा करो." तपस्विनीनें म्हटलें.

नंतर सर्व झोंपीं गेलीं.

बालसिंहास आपल्या मातेजवळ राहून आठ दिवस लोटले व त्यानें ठरविल्याप्रमाणें सर्वांचा मोठ्या दुःखानें निरोप घेऊन त्या दिवशींच्या संध्याकाळीं तो तेथून आनंददुर्गाकडे जाण्यास निघाला.

वाटेनें जात असतां पुढें कशाप्रकारें आपला डाव साधून राक्षसनाथास पालथा पाडावा याच विचारांत गुंग होऊन बालसिंह आपला मार्ग काढीत होता; पण तो आपल्या आईच्या झोंपडीपासून सुमारें दोन कोसही गेला नसेल तोंच त्यास दोन घोडेस्वारांनीं मध्येंच आडवलें.

" शैलोदर, पक्षि सांपडला ! " विषकुंभ आपला घोडा बालसिंहास आडवा आणून म्हणाला—ओरडला.

" कोण ? बालसिंह ? फार दिवसानें चोर सांपडला एकूण. " शैलोदर ओरडले व दोघांनीं घोड्याखालीं उड्या टाकून बालसिंहास पकडलें.

" बच्चाजी ! आतां कुठें जाल ? "

असें म्हणून दोघांनींही बालसिंहास पकडलें.

" दुर्दैव ! आई, आतां पुनः तुला मी कसचा भेटतों ! " बालसिंह अत्यंत निराशेनें पुटपुटला.

विषकुंभानें त्यास आपल्या घोड्यावर चढविलें. घोडे आपटलें, म्हणण्यास हरकत नाहीं व त्यांनीं आपले घोडे पिटाळले.

---

प्रकरण एकोणचाळिसावें.

## शेवटचें मातृचुंबन.

त्या कण्हत पडलेल्या स्त्रीकडे पाहून इंदुमतीला व अजसेनाला फारच आश्चर्य वाटलें. तीं दोघेंही पतिपत्नी तिच्याजवळ बसलीं. त्या स्त्रीची एकंदर स्थिति पाहतांच कोमलहृदया इंदुमतीला फार वाईट वाटलें. ती आपले नेत्र पुसत पुटपुटली, " एकंदरींत दुःखानें कोणालाही सोडलें नाहीं, हेंच खरें ! " असें म्हणून तिनें त्या पडलेल्या स्त्रीच्या फिकट चेहऱ्याकडे पाहिलें.

" ओहो ! " अजसेन त्या स्त्रीच्या मुद्रेकडे पाहतांच आश्चर्यानें उद्गारला. " ही—ही इथें आणि अशा स्थितींत कशी ? " असें आश्चर्यानें बोलून त्यानें त्यां स्त्रीकडे न्याहाळून पाहिलें.

" हिला ओळखायचं का ? " इंदुमतीनें अजसेनाचें बोलणें ऐकून आश्चर्यानें विचारिलें. " ही कोण ? "

" ही—ही— " अजसेन किंचित् गोंधळून म्हणाला, " पण हिला आपण घरांत नेऊं चल. "

आपल्या पतीच्या वरील अडखळत बोलण्याचें इंदुमतीस किंचित् आश्चर्य वाटलें. तरी पण तिनें त्या वेळीं तिकडे विशेष लक्ष दिलें नाहीं. दोघांनीं त्या आजारी स्त्रीस हलकेंच उचलून आपल्या झोंपडींत आणिलें. झोंपडींत दया, दासी व नोकर बसलीं होतीं. अजसेन व इंदुमतीनें त्या स्त्रीला आंत आणतांच सर्वांनाच आश्चर्य वाटलें.

" हें कोण ? " दयेनें इंदुमतीच्या कानांत हलकेंच विचारिलें.

" एक दुर्दैवी प्राणी ! दया, बिछाना घाल पाहूं. " इंदुमतीनें गंभीरपणें म्हटलें.

लागलींच दयेनें एक मऊसा बिछाना घातला. त्यावर त्या स्त्रीला हलकेंच निजविण्यांत आलें. अजसेनानें नोकरास शहरांतून वैद्यास आणण्याकरितां पाठविलें. इंदुमती व दासी त्या स्त्रीच्या शुश्रूषेस लागल्या. दया मुलाला घेऊन जवळच बसली.

त्या स्त्रीला बिछान्यावर चांगल्या तऱ्हेनें निजविल्यावर इंदुमतीनें तिच्या नेत्रांस पाणी लावलें व ती तिला एका पंख्यानें हलकें हलकें वारा घालूं लागली. थोड्या वेळानें त्या स्त्रीनें आपले नेत्र उघडले व केविलवाण्या दृष्टीनें इंदुमतीकडे पाहिलें.

" आतां आपल्याला बरं वाटतं ? " इंदुमतीनें प्रेमानें विचारिलें, " आतां इतक्यांत वैद्यबुवा येतीलच. आपण आतां अगदीं चिंता करूं नका. "

" माझा मुलगा— " त्या स्त्रीनें अगदीं क्षीणस्वरांत म्हटलें.

ते शब्द इंदुमतीनें ऐकले. तिला किंचित् आश्चर्य वाटलें व ती आश्चर्यानें त्या स्त्रीकडे पाहूं लागली.

" माझा प्राण—माझा मुलगा कुठें आहे ? " त्या स्त्रीनें क्षीणस्वरांत विचारिलें.

इंदुमतीला मोठी पंचाईत पडली. ती द्विधा दृष्टीनें त्या स्त्रीकडे पाहूं लागली.

" आपण त्याला जाणत नाहीं ? " ती स्त्री क्षीणस्वरांत म्हणाली, " नसाल जाणत. नाहीं; या पृथ्वीच्या पाठीवर त्याला कोणीही जाणत नसेल; पण मीं तर त्याच्याचकरितां प्राण ठेविला आहे. माझा प्राण मला मिळाल्याशिवाय मी जगणं शक्यच नाहीं. माझ्या पाडसाला—माझ्या प्राणाला—माझ्या विसाव्याला—माझ्या मुलाला आपण नाहीं कां आणणार ? "

त्या स्त्रीनें शेवटचा प्रश्न इतक्या करुणाजनक स्वरांत केला कीं, तो ऐकतांच इंदुमतीच्या नेत्रांत अश्रु उभे राहिले.

" एकंदरींत माझ्या दुःखाबद्दल अश्रु ढाळणारं एखादं माणूस या जगांत आहे तर ! " असें बोलत असतां त्या स्त्रीच्याही नेत्रांतून अश्रु वाहूं लागले.

" आपलं दुःख कमी करण्याकरितां मी काय करूं ? " इंदुमतीनें त्या स्त्रीच्या अंगावरून प्रेमानें हात फिरवीत विचारिलें.

" माझा मुलगा— " त्या स्त्रीनें हलक्या स्वरांत म्हटलें.

" तो कुठें आहे ? " इंदुमतीनें आपले नेत्र पुशीत विचारिलें.

इतक्यांत वैद्यराज आले. नियमानुसार स्वागत वगैरे झाल्यावर वैद्यराजांनीं त्या स्त्रीची प्रकृति पाहिली व त्यांचा चेहरा गंभीर झाला.

" ठीक आहे ! " वैद्यराज इंदुमतीकडे वळून म्हणाले, " यांना जरा गाढ निद्रा लागली पाहिजे म्हणजे आपोआपच हुशारी वाटेल. या दोन गोळ्या त्यांना पाण्याच्या घोंटाबरोबर द्या. त्यामुळें पाव घटकेंत त्यांना छान निद्रा येईल. प्रातःकालीं मी पुनः येईनच. " असें म्हणून वैद्यराजांनीं दोन गोळ्या इंदुमतीच्या हातावर ठेविल्या व अजसेनाला घेऊन ते बाहेर आले.

" या कोण आहेत बरें ? " वैद्यराजांनीं झोंपडीबाहेर आल्यावर अजसेनास विचारिलें.

" कां ? " अजसेनानें साशंक प्रश्न केला.

" त्यांच्या प्रकृतीसंबंधानें— "

" काय ? " अजसेनानें किंचित् घाबरून मध्येंच विचारिलें.

" असाध्य ! " वैद्यराजांनीं हलकेंच म्हटलें.

" असाध्य ? " अजसेनानें एकदम विचारिलें, " असें कां बरें ? "

" यांची वाचण्याची आशा फार थोडी आहे. " वैद्यबुवांनीं गंभीरपणें म्हटलें, " यांना क्षयाचा विकार आहे. "

" क्षय ? " अजसेनानें निराश होऊन म्हटलें, " मग कांहीं उपायच नाहीं म्हणायचा ! "

" ईश्वराची इच्छा ! " वैद्यबुवांनीं एवढें बोलून जातां जातां म्हटलें. " यांना नगरांत घेऊन चलाल तर बरें ! " असें म्हणून वैद्यराजांनीं रजा घेतली.

वैद्यराज गेल्यावर अजसेन इकडे तिकडे फिरत पुटपुटला, " ही आहे तीच. मग ही जगणार नाहीं तर ! ईशइच्छा ! पण इंदुला हें सांगून उपयोगीं नाहीं. काय होईल तें होईल ! दैवाची गति तरी किती विचित्र आहे ? "

अजसेन आंत आला. इंदुमती त्याच्याजवळ येऊन म्हणाली, " आतां त्यांना झोंप लागली आहे. वैद्यबुवा काय म्हणत होते ? "

" आतां उद्यां आपण नगरांतच चललों तर कसें होईल बरें ? " अजसेनानें तो विषय टाळण्याच्या हेतूनें म्हटलें, " कारण तिथें असल्यावर यांची प्रकृति बरी राहील. आपल्यालाही त्यांची शुश्रूषा करण्यास कोणत्याही प्रकारची अडचण राहणार नाहीं. "

" वैद्यबुवांनीं काय सांगितलं ? " इंदुमतीनें पुनः विचारिलें.

" नगरांत नेण्यास सांगितलें आहे. " अजसेनानें गंभीरपणें उत्तर दिलें.

दुसऱ्या दिवशीं त्या स्त्रीसह सर्व मंडळी शहरांत राहण्यास गेली. आठ दिवस लोटले. इंदुमती मनःपूर्वक त्या स्त्रीची सेवाशुश्रूषा करीत होती. वैद्यराज रोज येऊन तिची प्रकृति पाहून जात असत. औषधपाणी सुरू होतें; पण त्या स्त्रीची प्रकृति सुधारण्याचें चिन्ह दिसेना. ती खंगत चालली ! तिची मुद्रा दिवसेंदिवस फिक्कट दिसूं लागली !

" आपण माझ्याकरितां इतक्या खस्ता खाता आहां ! " ती स्त्री इंदुमतीला हलकेंच म्हणाली, " पण मी आतां फारच थोड्या दिवसांची

सोबतीण आहें. पण मरणापूर्वी मी आपल्याला एक गुप्त गोष्ट सांगत्यें. माझी हकीगत आपण जाणत नसाल नाहीं ? "

" नाहीं ! " इंदुमतीनें उत्तर दिलें.

" मग माझी कथा आपण ऐकाल कां ? ऐकाच. माझ्या हृदयावर तें एवढं मोठं दडपण आहे कीं, माझ्यानं आतां तें सहन नाहीं होत ! "

" आपल्याला त्रास होणार नसल्यास मी ऐकायला तयार आहें. " इंदुमती प्रेमानें पुढें म्हणाली, " आपली जी इच्छा असेल ती मला सांगा. माझ्या इथें द्रव्याला मुळींच कमी नाहीं. "

" माझ्या मुलाला पाहण्याची माझी फार इच्छा आहे. " ती स्त्री दुःखानें म्हणाली, " पण आपल्याला तो कुठें सांपडणार ? मींच—मींच राक्षसिणीनं त्याला सोडून दिलं ! "

" त्याचा पत्ता मिळाल्यास मी त्याला इथें बोलावण्याचा प्रयत्न करीन. " इंदुमतीचें हें बोलणें ऐकतांच ती स्त्री हंसली.

ती बोलली, " माझी कथाच मी आपणाला सांगत्यें; पण ती ऐकून आपण माझा तिरस्कार तर नाहींना करणार ? कारण मी पापिणी आहें. "

" मी आपणाला बहिणीपेक्षांही जास्त मानत्यें. " इंदुमतीनें साश्रुनयनांनीं तिच्या मुखाकडे पहात म्हटलें, " ज्या गोष्टीनं आपणास सुख होईल ती करण्यास मी मुळींच मागंपुढं पहाणार नाहीं. "

" त्याबद्दल मला पूर्ण खात्री आहे. पण माझी गोष्ट आपण कुण्णा-कुण्णालाही सांगूं नये "

" कां बरं ? माझ्या कांहीं मैत्रिणी अशा आहेत कीं, ज्या आपल्यावर फारच प्रेम करतील. आज त्या दोघीतिघी आपणास पहायला येणार आहेत. मीं त्यांना सांगून पाठविलं आहे. माझी एक मैत्रीण कालच वसंतदुर्गाहून आली आहे. "

" वसंतदुर्गाहून ? " त्या स्त्रीनें चमकून आश्चर्यानें विचारिलें.

" होय. मीं तिला इकडेच बोलाविली आहे. "

" तिचं नांव काय आहे बरं ? " तिनें कंपित स्वरांत विचारिलें.

" तिचं नांव ? कुमुदिनी. "

" कुमुदिनी ? काय म्हणतां कुमुदिनी ? " तिनें घाबरून म्हटलें, " कुमुदिनी ! तिला मी आपलं तोंड दाखवूं शकत नाहीं. "

" हं: " इंदुमतीनें आश्चर्यानें ह्मटलें, ' तें कां ? "

" तिच्या तोंडुन आपण कमलिनीचें नांव कधीं ऐकलें आहे ? " तिनें विचारिलें.

" होय. कमलिनीवर त्यांचें फार प्रेम होतें. तिची आठवण काढून त्या वारंवार फार दुःख करतात. "

" कुमुदिनी माझ्याकरितां दुःख करते तर ! " त्या स्त्रीनें एकदम ह्मटलें.

" ह्मणजे याचा अर्थ काय ? " इंदुमतीनें आश्चर्यानें विचारिलें.

" ज्या कमलिनीविषयीं कुमुदिनी फार दुःख करतें ती कमलिनी-मीच होय ! "

कमलिनीनें खालीं मान घालून ह्मटलें. इंदुमती आश्चर्यानें थक्क झाली. किती वेळ तरी ती आश्चर्यानें कमलिनीकडे पहात होती. अखेरीस तिनें कमलिनीच्या गळ्यास प्रेमानें मिठी मारिली व ह्मटलें, " कमलिनीबाई, कुमुदिनीबाईना किती किती आनंद होईल पण ? मी आतांच त्यांना बोलावणं पाठवित्यें. "

" छे छे; नको नको ! " कमलिनी मध्येंच ह्मणाली, " मीं तिच्याशीं फार विश्वासघात केला आहे ! मी अत्यंत दुष्ट आहें ! " कमलिनीच्या नेत्रांतून टपटप अश्रु गळूं लागले. तें पाहून इंदुमतीस आश्चर्य वाटलें व दुःखहि झालें. तिच्या डोळ्यांतील उष्ण अश्रुबिंदु कमलिनीच्या निस्तेज हातावर पडले. कमलिनीनें इंदुमतीकडे पाहून ह्मटलें, " माझ्याकरितां आपण कां दुःख करतां बरं ? जशीं कर्में मीं केलीं, तसंच फळ मी भोगत्यें आहें ! "

" आपण आपली कथा सांगाल का ? " इंदुमतीनें आपले नेत्र पुसून ह्मटलें.

" आपण माझा तिरस्कार करणार नाहीं असं वचन द्या. मी फार दुष्ट आहें—पापी आहें. "

" छे छे; आपल्या मुद्रेवरून तसं वाटत नाहीं. अन् लहान मोठे अपराध हरेक मनुष्याकडून होतातच. त्याबद्दल आपण उगीच दुःख कां करता ? " इंदुमती तिचें सांत्वन करण्याच्या हेतुनें म्हणाली.

" अहाहा ! आपण किती देवस्वभावी आहां. देव आपल्यास सदा सुखांत ठेवो ! " कमलिनी पुढें म्हणाली, " अयोध्या नगरीचं नांव आपण ऐकिलं असेल नाहीं ? "

' श्री रामचंद्राची जन्मभूमी. " इंदुमतीनें आदरपूर्वक म्हटलें.

" होय. त्याच पुण्यभूमींत माझा जन्म झाला. त्याच नगरींत माझे वडील आईसह रहात असत. मला एक वडील भाऊ होता. मी दहा वर्षांची असतांना माझे वडील वारले. माझा भाऊ लहान होता, तरी बाबांच्या पाठीमागें त्यानेंच माझें व आमच्या आईचें पालण केलें. बाबा वारल्यानंतर चार वर्षं आम्ही तिघंही–मी–भाऊ व आमची आई फार आनंदांत राहिलों. माझ्या आईला माझ्या लग्नाची चिंता उत्पन्न झाली. पण देवानें तिला फार वेळ चिंतेंत ठेविली नाहीं. एके दिवशीं भाऊ एका मोठ्या सरदाराला घरीं घेऊन आला. त्या सरदाराचा एक पुतण्या होता व तो आपल्या पुतण्याकरितां एखादी सुस्वरूप मुलगी पाहण्यासाठीं गुप्त वेषांत हिंडत होता. भाऊची व त्याची अकस्मात गांठ पडली. भाऊनें त्यास आपली सर्व हकीगत सांगितली. त्या सरदारानें मला पाहण्याची इच्छा केली व त्याचकरितां भाऊ त्यास घरीं घेऊन आला. त्या सरदाराचं रूप काय पण अगदीं पहाण्यासारखं होतं. त्याच्याचसारखा जर त्याचा पुतण्या असला तर मात्र माझं नशीब फुटलं असं मला वाटलं. मला पाहतांच त्यास फार आनंद झाला व दुसऱ्या दिवशीं त्यानें आईला आपल्या पुतण्यास दाखविण्यास आणलं. काकांत आणि पुतण्यांत जमीन अस्मानचा फरक. आईला सर्व पसंत पडलें व लवकरच माझें लग्न झालें. पण आश्चर्य हें कीं, एवढा मोठा सरदार; पण माझें लग्न झालं कीं नाहीं, हें आमच्या घरच्या मंडळीशिवाय दुसऱ्या कोणासच समजलं नाहीं. हा असा गुप्तरीतीचा प्रकार कां झाला व तो आमच्या आईला व भावाला कसा पसंत पडला हें मला मुळींच समजलें नाहीं. लग्न झाल्यानंतर पंधरा दिवसांनीं मला सासरीं नेण्याचें व एके दिवशीं अगदीं संध्याकाळच्या वेळीं मी, माझी आई, माझा भाऊ वगैरे मंडळी शरयूतीरीं आलों. नदीपलीकडे गेल्यावर गाड्या तयार आहेत असें कोणीसें म्हटलें. नदीकिनाऱ्याला दोन नावा दिसत होत्या. एकांत मी, ते ( अर्थात् कमलिनीचा पती ), एक म्हातारी दासी

व दोन वल्हवणारे असे बसलों. दुसऱ्या नावेंत माझा भाऊ, माझे चुलत सासरे, आणखी एकदोन मंडळी व दोन वल्हवणारे असे बसले. आईनें मोठ्या दुःखानें मला निरोप दिला व नावा चालूं झाल्या !

"पण हा सगळा प्रकार गुढपणें झाला ! मला मोठें आश्चर्य वाटलें. मीं त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिलें तर तो बराच उदास दिसत होता. ते माझ्याजवळच बसले होते. त्यांचें वय एकोणिस–वीस वर्षांचें होतें. त्यांची मूर्ति अत्यंत सुंदर होती; पण लग्न झाल्यापासून त्यांना कांहीं विशेष आनंद झालेला दिसत नव्हता. मी त्यांना पसंत नव्हतें कीं काय कोण जाणें ? पण ज्या वेळीं ते माझ्याकडे पहात त्या वेळीं त्यांच्या नेत्रांत माझ्याबद्दल तिरस्कार न दिसतां प्रेम व एकप्रकारचें दुःख दिसत होतें. मग त्यांच्या दुःखाचें कारण काय होतें ? खालीं मान घालून मी कितीवेळ तरी विचार करीत होतें ! या वेळीं सगळीकडे चांगला काळोख पडला होता. आकाशपटावर पुष्कळ नक्षत्रें चमकत होतीं, नदी अगदीं शांतपणें वहात होती. वल्ह्याचे पाण्यावर बसणारे तडाखे व त्यायोगें होणारा खळखळाट व नावेचा सरसर शब्द एवढेंच काय तें ऐकूं येत होतें. बाकी सर्वत्र शांत होतें. दोन्हीं नावेंतील माणसें अगदीं चुप्प होतीं. हा सर्व प्रकार पाहून मला फारच आश्चर्य वाटलें. माझें मन अत्यंत उदास झालें व मला थोडें भयही वाटूं लागलें. मी केव्हां केव्हां त्यांच्या चेहऱ्याकडे तर केव्हां जवळ बसलेल्या त्या म्हाताऱ्या दासीकडे पहात विचार करीत बसलें होतें. अकस्मात् ते अगदीं हलकेंच माझ्याजवळ आले. मीं दचकून त्यांच्या मुद्रेकडे पाहिलें. ते माझ्या अगदीं जवळ येऊन बसले व प्रेमानें माझा हात आपल्या हातांत घेऊन माझ्या कानांत पुटपुटले, 'कमल ! तुम्हां सर्वांना या दुष्टानें फसविलें आहे !

"मला मोठें आश्चर्य वाटलें. मी त्यांच्या मुद्रेकडे पाहूं लागलें ते आणखी कांहीं सांगणार इतक्यांत 'घात ! घात !! नाव बुडते आहे !' अशी आरोळी ऐकूं आली. आम्हीं दोघांनीं इकडे तिकडे पाहिलें तों ती दुसरी नाव किनाऱ्याकडे जात होती; पण आमची नाव खालीं खालींच पाण्यांत जाऊं लागली होती. नावेला केव्हां भोंक पडलें, हें कोणाच्याच समजण्यांत आलें नव्हतें. पाणी झपाट्यानें आंत येत होतें. ती दुसरी

नाव आमच्या नावेकडे झपाट्यानें येत होती; पण सर्व व्यर्थ झालें व वरच्या सर्व मंडळींसह आमची नाव नदीच्या तळाला गेली ! ! नाव बुडतांच मी भीतीनें बेशुद्ध झाल्यें ! पुढें काय झालें तें मला मुळींच माहीत नाहीं ! पण ज्या वेळीं मी शुद्धींत आलें, त्या वेळीं मी आपल्या सभोंवतीं पुष्कळ नोकर चाकरांना माझी सेवा शुश्रूषा करतांना मीं पाहिलें. माझ्या उशाशीं अकरा बारा वर्षांची एक सुंदर मुलगी बसली होती. तिनें मी शुद्धींत आलेली पाहतांच हलकेच कोणालासें म्हटलें, " बाबा ! ही पहा जागी झाली. ' मी आश्चर्यानें त्या मुलीकडे पाहूं लागलें. इतक्यांत एक पोक्त वयाचा गृहस्थ माझ्याजवळ आला व माझ्या अंगावरून हात फिरवीत म्हणाला, ' बाळ, घाबरूं नकोस हो. तूं आपल्याच मंडळींत आहेस. ' ही मुलगी– "

" कुमुदिनीबाई तर नव्हत्या ? " इंदुमतीनें मध्येंच उत्सुकतेनें विचारिलें. कमलिनीची कथा ती लक्ष्यपूर्वक ऐकत होती.

" ती मुलगी कुमुदिनीच होती व तो गृहस्थ तिचे वडील महाराजा धर्मचंद्र होते. अहाहा ! त्या दोघांचेंही माझ्यावर किती प्रेम होतें पण ! महाराजा धर्मचंद्र सध्यां वसंतदुर्गालाच आहेत काय ? " कमलिनीनें मध्येंच प्रश्न केला.

इंदुमतीनें दुःखित मुद्रेनें म्हटलें, " दोन तीन वर्षांपूर्वी ते वारले ! "

कमलिनीच्या नेत्रांत अश्रु आले. ती आपले अश्रु पुसून पुढें बोलूं लागली, " पुढें ते मला वसंतदुर्गाकडे घेऊन गेले "

" पण त्यांना तुम्ही कुठें सांपडलात ? " इंदुमतीनें विचारिलें.

" महाराजा धर्मचंद्र आपल्या मुलीसह यात्रा करण्याकरितां आयोध्येकडे आले होते. ज्या वेळीं आम्ही सर्व नावेंत बसून चाललों होतों त्याच वेळीं तेही पण नावेंतून पलीकडे जात होते. नदींतून मी वहात असतांना त्यांनीं पाहिलें व मला बाहेर काढण्यांत आलें. मला घेऊन ते वसंतदुर्गावर आले. तेथें आल्यावर मी पुष्कळ दिवस आजारी होतें. मी चांगली झाल्यें त्यानंतर एके दिवशीं त्यांनीं मला आपली हकीगत विचारिली. ते माझ्यावर बापाप्रमाणें प्रेम करीत असत. मीं त्यांना मोकळ्या मनानें आपली सर्व हकीगत सांगितली. ती त्यांनीं लक्षपूर्वक ऐकून घेतली व प्रेमानें मला म्हटलें,

" बाळ कमल, तूं अगदीं काळजी करूं नकोस बरं ! मी आतां थोड्याच दिवसांत तुझ्या नवऱ्याचा आणि तुझ्या घरच्या मंडळींचा सर्वांचा शोध लावतों. " असें म्हणून त्यांनीं त्याच दिवशीं पत्र देऊन आपलीं माणसें आयोध्येकडे पाठविलीं पण माझें नशीब फुटकें त्याला ते तरी काय करणार ? शोधाकरितां पाठविलेलीं माणसें थोड्याच दिवसांत परत आलीं. त्यांनीं येऊन पुढीलप्रमाणें हकीगत सांगितली. " त्याच रात्रीं माझ्या भावानें माझा पुष्कळ शोध केला; पण मी किंवा आमच्या नावेंतील कोणीही सांपडलें नाहीं. तो दुःख करीतच घरीं गेला व घडलेली सर्व हकीगत त्यानें आईला सांगितली. आईला माझ्या विरहाचें दुःख असह्य झालें व थोड्याच दिवसांत ती माझ्या दुःखानं हाय हाय करीत मरण पावली व त्यानंतर माझा भाऊ घरदार सोडून कुठें गेला याचा कुणालाही पत्ता लागला नाहीं. " झालें ! या जगांत मी परकी झाल्यें; पण महाराजा धर्मचंद्रांनीं माझं सांत्वन केलं व मला आपल्या कुमुदिनीप्रमाणेंच पाळण्याचं अभिवचन दिलं. त्याप्रमाणें त्यांनीं माझा सांभाळही पण केला. कुमुदिनीही माझ्यावर बहिणीप्रमाणें प्रेम करीत असे. वसंतदुर्गांत मला अगदीं स्वतःच्या घराप्रमाणें सुख होतें; पण एक चिंता रात्रंदिवस माझ्या हृदयाला जाळीत होती. माझें लग्न झालें खरें; पण मी सधवा कीं विधवा ? महाराजांनीं माझ्या पतीचा पुष्कळ-पुष्कळ शोध केला; पण व्यर्थ. अखेरीस जगाच्या दृष्टीनें मी विधवाच ठरलें. हाय ! हाय ! ! काय माझं नशीब तरी ? " असें म्हणून कमलिनी थोडावेळ चुप्प बसली !

इंदुमतीलाही तिची ही हकीगत ऐकून फार वाईट वाटलें. ती कितीवेळ तरी दयार्द्र दृष्टीनें कमलिनीच्या फिक्कट चेहऱ्याकडे पहात होती. कांहीं कालापूर्वी इंदुमतीस स्वतःच्या स्थितीबद्दल फार वाईट वाटे; पण आतां कमलिनीची कथा ऐकतांच तिचे डोळे उघडले व ' आपल्यापेक्षांही दुःखी प्राणी या जगांत पुष्कळ आहेत. " हें तपस्विनीचें उपदेशपर वाक्य तिला पूर्णपणें पटलें.

" त्या दिवशीं आपण ज्या वसंतदुर्गांतून बाहेर पडला, त्यानंतर आपण एकदम कुठें नाहींशा झाला ? आपल्या शोधाकरितां किती खटपट केली पण- " इंदुमतीनें म्हटलें.

"हें सर्व मला माहीत आहे. माझ्या आयुष्यांत किती चमत्कारिक गोष्टी घडल्या पण!"

असें म्हणून कमलिनीनें वसंतदुर्गांतून बाहेर पडल्यापासून जें जें घडलें तें तें इत्थंभूत निवेदन केलें. तपस्विनीची व आपली भेट कशी झाली? चित्रपटाचा कसा चमत्कार घडला? तपस्विनीनें आपणास कसा शाप दिला? पुढें तिचें कांहीं कारणानें आपल्यावर कसें प्रेम जडलें? तिच्याजवळ दाई या नांवानें जी माया नांवाची दासी होती, ती दुसरी कोणी नसून आपल्या नावेंत असलेली जी म्यानारी दासी होती तीच आपण कशी ओळखली? पुढें आपण त्या जुन्या वाड्यां-तील भुयारावाटें आनंददुर्गांतील त्या पुतळ्यांच्या महालांत कशा आलों? तेथून शृगालदत्तानें आपली कशी सुटका केली; पण त्या विश्वासघा-त्यानें आपल्यास अजसेनाच्या बागेंत कसें आणून ठेविलें. पुढें एके दिवशीं अजसेन व विमलचंद्र कसे आले, त्यांत विमलचन्द्र हा दुसरा कोणी नसून आपला पतीच असावा असा आपणास कसा संशय आला. विमलचन्द्रानें आपणास तेथून कसें नेलें? त्यानें आपण खरें कोण हें कसें सांगितलें; पण जगासमोर आपली खरी हकीगत सांगण्यास त्यानें कसें नाकारलें? त्यामुळें आपण तेथून निघून जाण्याचें कसें योजिलें? त्याच रात्रीं बागेंतील कोणा दोघां मनुष्यांचें संभाषण ऐकल्यामुळें आप-णास पुनः कशी आशा वाटूं लागली व आपण पुनः विमलचन्द्राजव-ळच कशा राहूं लागलों; पण त्यानें फसविण्याचा घाट घातलाच. मथुरेला पाठवून सर्व खरी हकीगत कशी काढून घेतली? पुढें आपणास मुलगा कसा झाला? विमलचन्द्र पुनः आपल्याकडे कसा मुळींच आला नाहीं? इत्यादि दुःखमय, आश्चर्यमय कथा कम-लिनीनें इंदुमतीस सांगितली व ती आमच्या वाचकांसही पूर्णपणें माहीत आहे. तिची ती कथा ऐकून इंदुमतीस किती आश्चर्य वाटलें असेल याची कल्पनाच केली पाहिजे.

"दैवाचे खेळ तरी किती चमत्कारिक?" इंदुमतीनें आश्चर्यानें म्हटलें.

अहो, येवढ्यानेंच माझें दुर्दैव संपलं नव्हतं. त्यांनीं आपलं नांव बदललं, नानाप्रकारें माझ्याशीं गोड बोलून मला फसवलं. पण निदान

वारंवार माझ्याकडे येऊन मला पहायचं तरी होतं; पण ते मुळीं आलेंच नाहींत. आपल्या मुलाचें मुख तरी त्यांनीं एकवार पाहून जावें अशी माझी फार इच्छा होती; पण त्यांनीं पुनः दर्शनच दिलें नाहीं. माझ्या लाडक्याला मी आपल्या पोटाशीं धरून खूप रडावं. त्यावेळीं एक मथुराच काय ती माझी खरी माता होती. तिनें त्यावेळीं माझें पुष्कळ सांतवन केलें. पण तिचेंही सुख मला फार वेळ लाभलें नाहीं. माझा लाडका चार पांच महिन्यांचा झाला नाहीं तोंच मथुरा आजारी पडली व वारली ! आपलीं सुखं दुःखं सांगायला मला तेवढाच कायतो आधार होता; पण तोही ईश्वरास आवडला नाहीं ! अखेरीस काय करणार ? मी त्या पांच महिन्याच्या बाळाला घेऊन तेथून बाहेर पडल्यें ! त्या वेळीं मी अगदीं येडी झाल्यें होत्यें. मी त्या लहान मुलाला घेऊन कोठें जाणार, काय करणार, याचा मीं मुळींच विचार केला नाहीं. मी तेथून निघाल्यें, गांवोंगांवीं अन्नपाण्यावाचून भटकूं लागल्यें, इंदुमतीबाई, त्यावेळीं माझ्या त्या पाडसाचे किती हाल झाले ह्मणून सांगूं ? ते हाल माझ्यानं पहावेनात आणि एके दिवशीं मी यमुनाकिनारीं फिरत असतां त्या माझ्या लाडक्या बाळाचा सर्व भार ईश्वरावर टाकून मीं त्यास तेथेंच ठेवलें ! इंदुमतीबाई, मला दुष्ट समजाल हो. पण काय करूं, माझ्यानें त्याच्या पोटाचे हाल पाहवेनात—" असें ह्मणून इंदुमतीच्या खांद्यावर मान टाकून कमलिनी रडूं लागली. दोघीही किती वेळ तरी अश्रुपात करीत होत्या.

" कमलिनीबाई, आपला मुलगा जिवंत आहे. तो आपल्यास आत्तां इतक्यांत भेटेल ! " इंदुमतीनें तिचे नेत्र पुसून ह्मटलें.

" हंः ? काय ह्मटलंत ? माझा बाळ जिवंत ? " कमलिनीनें हर्षातिशयानें डोळे फाडून विचारिलें.

" होय आत्तां इतक्यांत. "

दार एकदम उघडलें गेलें व दया बालार्काला घेऊन आंत आली ! कमलिनीनें त्याच्याकडे पाहिलें मात्र; " माझा बाळ, माझा लाडका ! " असें ओरडतच ती बालार्काकडे धावत आली व तिनें आश्चर्यानें भेदरलेल्या बालार्कास आपल्या पोटाशीं धरलें. तिनें त्याचें प्रेमभरानें चुंबन घेतलें !

आज इंदुमतीनें दयेला बालार्काला आणण्याकरितां तपस्विनीकडे पाठविलें होतें व ज्या वेळीं तिनें कमलिनीच्या तोंडून तिच्या मुलाची हकीगत ऐकली त्या वेळीं बालार्काच्या हकीगतीशीं ती बरोबर जुळली. बालार्क हा कमलिनीचाच मुलगा असावा अशी तिची पक्की खात्री झाली व ही गोष्ट कांहीं खोटी नव्हती. ह्मणूनच तिनें कमलिनीस 'मुलगा भेटेल' असें आश्वासन दिलें व लागलींच दया बालार्कास घेऊन आलीच. कमलिनीचा पुत्र अखेरीस कमलिनीस भेटला !

पण या एकदम भेटण्याचा काय परिणाम झाला ? कमलिनीचें मन व शरीर नानाप्रकारचीं लहानमोठीं दुःखें सोसल्यामुळें अत्यंत क्षीण झालें होतें. आपल्या पुत्राच्या अनपेक्षित भेटीमुळें हर्षातिशयानें तिच्या मनाला विलक्षण धक्का बसला व तिनें आपल्या मुलाला हृदयाशीं धरून त्याचें चुंबन घेतलें मात्र तोंच तिची प्राणज्योत मालवली !

वाचकांनो ! इंदुमतीला त्या वेळीं किती दुःख झालें असेल ? कुमुदिनी व प्रभावती यांना आपल्या दुर्दैवी मैत्रिणीची कथा ऐकून काय वाटलें असेल ? तपस्विनीला ती हकीगत समजतांच तिच्या मनावर काय परिणाम झाला असेल ? इत्यादि गोष्टी स्थलाभावामुळें क्षमा मागून आह्मी आपल्याच कल्पनाशक्तीवर सोडतों !

---

## प्रकरण बेचाळिसावें.

# भयंकर दिव्य !

विमलचन्द्राच्या कैदेंत पडून बकुळीला दीड महिना लोटला. तिला वश करण्याप्रीत्यर्थ विमलचन्द्रानें किती यत्न केले; पण सर्व व्यर्थ गेले ! अलीकडे रात्रंदिवस तो बकुळीला वश करण्याचे उपाय योजीत होता; पण एकही सफळ होण्याचा रंग दिसेना.

संध्याकाळची वेळ होती. ज्या बागेंतील बंगल्यांत बकुळी कैद

होती. त्याच बागेंत विमलचन्द्र निराश होऊन इकडे तिकडे फिरत होता. इतक्यांत विषकुंभ व शैलोदर या रत्नद्वयाचें तेथें आगमन झालें. विमलचन्द्रानें त्यांचें यथायोग्य स्वागत केलें.

" कसें काय ? " ज्या वेळीं ते तिघेही एकेठिकाणीं बसले त्या वेळीं विमलचन्द्रानें विषकुंभास विचारिलें, " इतक्या दिवस कुणीकडे झुकल्या होत्या स्वाऱ्या ? "

पण दोघांनींही तिकडे लक्ष्य दिलें नाहीं

विषकुंभानें हंसून विचारिलें, " तुमचें नवें पांखरूं काय म्हणतें ? "

" जाळ्यांत सांपडलेंच असेल. " शैलोदर हंसत बोलले.

" छे बुवा, ती महा वस्ताद आहे. " विमलचंद्र निराशेनें म्हणाला.

" काय म्हणतां ? " दोघांनींही एकदम आश्चर्यानें विचारिलें. " तुमच्यासारख्या प्रेमशास्त्रपारंगत मनुष्याच्या तडाक्यांत ती आली नाहीं ? मोठेंच आश्चर्य ? "

" आश्चर्य तर खरेंच; पण आतां तुम्हीच एखादी युक्ति सांगा. तिला पाहिलें कीं, माझा तर प्राण अगदीं व्याकुळ होतो बोवा ! किती सुंदर आणि नाजुक आहे म्हणतां ? " विमलचंद्र जिभल्या चाटीत म्हणाला.

" एकंदरींत वऱ्या बोलानें ती कबूल होत नाहीं. ठीक आहे. आतां तुम्ही असें करा. आपलें सगळें वैभव तिच्या नजरेस पडेल असें करा. कदाचित् या युक्तीनें तुम्ही तिला जिंकाल. "

" हो—माझेंही म्हणणें तेंच आहे. नानाप्रकारचीं अमूल्य रत्नें, सुवर्णभूषणें, उंचीं उंचीं वस्त्रें यांचीं तिला लालूच दाखवा कीं, आतां काम फत्ते. आत्तांच पहा करून. आम्ही इथेंच बसतों. येवढ्यानें काम झालें तर ठीकच आहे, नाहींतर अखेरीस दंडाचा प्रयोग आहेच. "

विमलचंद्राला ती युक्ति पटली. विषकुंभ व शैलोदर तेथेंच बसले. विमलचंद्र वकुळीकडे आला. नेहमींप्रमाणें वकुळी आपली आतां या नरकांतून कशी सुटका होते, याची चिंता करीत बसली होती. विमलचंद्र तेथें येतांच ती उठून उभी राहिली.

" वकुल वकुल ! " विमलचंद्र आवेशानें म्हणाला, " मला वश झाल्यानें तूं किती अलोट संपत्तीची मालकीण होशील, याची तुला कल्पना आहे ? "

" मला संपत्ति नको आहे. मी संपत्तीला मातीप्रमाणें समजतें." बकुळीनें तिरस्कारानें म्हटलें.

" छे छे ! " विमलचंद्र मध्येंच म्हणाला, " तूं माझें, अलोट वैभव पाहिलें नाहींस तोंपर्यंत तुला असें वाटतें. अगदीं खरें खरें सांगतों कीं, माझें वैभव पाहून मोठमोठे चक्रवर्ती राजेही लज्जित होतील.

" मग त्या संपत्तीचा आपण असा दुरुपयोग कां करितां ? "

" तुझ्यासारख्या सुंदरीला त्याची मालकीण करणें, हा दुरुपयोग कां आहे ? " विमलचंद्र जवळच्या भिंतीकडे जात म्हणाला, " ज्या वैभवाची तूं मालकीण होणार आहेस तें एकवार पहा तरी ? " असें म्हणून त्यानें त्या भिंतींतील एक खुंटी पिरगळली. ती खुंटी पिरगळतांच त्या भिंतींतील एक गुप्त द्वार उघडलें गेलें व बकुळीच्या दृष्टीस विपुल वैभवाचें एक अजब भांडार दिसूं लागलें ! तें दृश्य मनाला थक्क करणारें होतें ! त्या वैभवभांडारांत नानाप्रकारचीं तेजस्वी रत्नें स्वयंप्रकाशानें नेत्रास दिपवीत होतीं ! हिरे आपली अजब शोभा दाखवीत होते तर लाल आपल्या आरक्त प्रभेनें चित्ताकर्षण करीत होते ! हिरवीगार पाचेचीं रत्नें नेत्रांस आल्हाद देत होतीं, तर नील-इंद्रनीलमणी आपल्या नील प्रभेनें मनास चकित् करीत होते ! पुष्कराज आपल्या चकमकाटानें शोभा पावत होते. लहानमोठीं तेजस्वी मुक्ताफळें रत्नांनाही लाजवीत होतीं. लाल उंची प्रवाळ मधून मधून भरलेले दिसत होते ! नानाप्रकारचीं सुवर्णभूषणें, तऱ्हेतऱ्हेचीं नकशी केलेलीं रत्नखचित् पात्रें त्या स्थलीं विपुलतेनें मांडिलीं होतीं. विविधप्रकारचीं उंचीं वस्त्रें आपल्या शोभेनें नेत्रांस आनंदवीत होतीं ! तो देखावा मोठा अजब होता. मनाला चकित् करणारा होता. तें मनोहर दृश्य पाहून बकुळीही क्षणभर थक्क झाली ! ती अनिमिष नेत्रांनीं त्या वैभवप्रदर्शनाकडे पहात होती. जवळ जवळ ती आपलें भान विसरली होती असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. विमलचन्द्राची दृष्टी सारखी तिच्या मुद्रेकडे लागली होती. आपल्या वैभवप्रदर्शनाचा बकुळीच्या हृदयावर परिणाम झालेला पहातांच विमलचन्द्रास आनंद झाला व त्यास थोडी आशाही वाटूं लागली. तो बकुळीच्या जवळ गेला, त्यानें आपले गुडघे टेकले व उजवा हात आपल्या वक्षःस्थलावर ठेवून प्रेमभरित आवेशानें

म्हटलें, " बकुल ! हें सर्व वैभव तुझें आहे. आणि हा तुझा दास तुझ्या पायाजवळ पडला आहे. बोल— माझ्या या हृदयाची ( छातीवर हात मारून ) आग नाहीं का शांत करणार ? " एखादा गाढ झोपीं गेलेला मनुष्य ज्याप्रमाणें एखादा चमत्कारिक आवाज ऐकतांच खाड-दिशीं जागा होऊन भांबावून एकदम उठून बसतो व चकित होऊन इकडे तिकडे पहातो त्याचप्रमाणें बकुळीची स्थिति झाली. त्या रत्नभांडाराचें अवलोकन करण्यांत ती स्वस्थिति अगदीं विसरून गेली होती; पण विमलचन्द्राचा स्वर ऐकतांच ती दचकली व तिनें आश्चर्यानें आपल्यापुढें गुडघे टेकून उभा असलेल्या विमलचन्द्राकडे पाहिलें.

" हाय ! प्राणेश्वरी ! सुंदरी बकुल ! " तिनें त्याच्याकडे पाहतांच विमलचन्द्र आवेशानें बोलला," हें वैभव, हा दास—माझें सर्व तुझें आहे. अद्यापीहि तुझें हृदय कळवळत नाहीं काय ? "

क्षणभरच-अगदीं क्षणमात्रच तो एकंदर देखावा पाहून बकुळीचें मन चलबिचल झालें. ती किंचित् घोटाळली.

" हाय ! प्राणेश्वरी ! तुला माझी दया येते तर ? " विमलचन्द्रानें तिच्या मनाची चलबिचल झालेली पहातांच म्हटलें, " ये तर— ' असें म्हणून त्यानें आपले बाहु पुढें केले; पण बकुळी चटकन् शुद्धीवर आली व मागें सरली !

" छे छे, विमलचंद्र ! असं होणं कधींहि शक्य नाहीं ! " बकुळीनें निश्चयानें म्हटलं.

या तिच्या निश्चयी भाषणानें विमलचंद्राचा आशावृक्ष पार जळून टाकला ! तो आश्चर्यचकित् झाला ! जगांत पातिव्रत्य कांहीं ईश्वरीय वस्तु आहे व त्याचें पूर्णपणें पालन करणाऱ्या कांहीं ललना या भूपृष्ठावर आहेत, याची विमलचंद्रास इतके दिवस विलक्षण शंका होती. वैभवानें, सामानें, बलात्कारानें, स्वसौंदर्यानें व आपल्या मधुर भाषणानें त्यानें अनेक अनेक अबला भ्रष्ट केल्या होत्या, पण बकुळीवर कशाचाही परिणाम झाला नाहीं, हें पाहतांच त्यास आश्चर्य वाटलें. आपल्या वैभवाचा सौंदर्याचा, मिष्ट भाषणाचा त्यास मोठा अभिमान वाटत होता; पण आज बकुळीनें त्याचा तो गर्व समूळ खंडित केला. बकुळीच्या मुखाकडे त्यानें पाहिलें, तो तिची मुद्रा एका

स्वर्गीय तेजानें झळकत होती. विमलचंद्र त्या दीमीकडे पाहतांच फिका पडला ! त्याच्या तोंडातून बराच वेळ शब्दही उमटेना. तो डोळे फाडून बकुळीकडे पहात होता. एक क्षणमात्रच आपल्यापुढें उभी असलेल्या दिव्य मूर्तीला नमस्कार करावा असें त्यास वाटलें; पण तें क्षणभरच.

बकुळीसारख्या पतिव्रतेला नमस्कार करण्याइतकी विमलचन्द्राची योग्यता होती कुठें ? तसें असतें तर विमलचन्द्राचा उद्धार झाला नसता काय ? पण सुमतीचा हा क्षण निघून गेला व पुनः विमलचन्द्र पापीच्या पापीच राहिला !

" बकुळ ! " विमलचन्द्र त्या रत्नभांडाराकडे बोट दाखवून म्हणाला, " हीं रत्नें पहा कशीं चमकताहेत ? याची धनीण तूं होऊं इच्छित नाहींस काय ? "

बकुळी किंचित् हंसली. ती गंभीरपणानें म्हणाली, " विमलचन्द्र ! तुमच्या मूर्खपणाबद्दल मला तुमची कींव येते. इतक्या अमूल्य रत्नांचे तुम्ही मालक असतां पुनः तुम्ही माझ्या सतीत्व रत्नाची इच्छा धरावीत हें आश्चर्य होय. थोडा विचार करा. या सर्व रत्नांनाही लाजविणाऱ्या रत्नाचा मी कसा अव्हेर करीन ? ही गोष्ट कालत्रयीं शक्य नाहीं. विमलचन्द्र, नीट शुद्धीवर या ! आपल्या स्थितीचा विचार करा. कुमुदिनीशीं असा विश्वासघात करूं नका. ज्या संपत्तीच्या बळानें तुम्ही अशी अत्यंत नीच कर्मं करतां आहां, त्याचाच उपयोग सत्कर्मा-कडे तुम्ही कां करीत नाहीं ? मी तुम्हाला माझे सर्व अपराध क्षमा करत्यें व मी तुमची बहीण या नात्यानें अशी विनंति करत्यें कीं, तुम्ही हा मार्ग सोडा. यांत अखेरीस नाशाशिवाय कांहींही हातीं लागणार नाहीं दुर्यो-धनानें द्रौपदीची इच्छा धरल्यानें व रावणानें सीतेची इच्छा केल्यानें ते दोघेही यवढे मोठे बलिष्ट असतां त्यांचासुद्धां अखेरीस कसा नाश झाला, इकडे लक्ष द्या ! सध्यां तुमच्या डोक्यांत हें वेड भरलें आहे; पण थोडा वेळ तुम्ही विचार करा. यांतच तुमचा अत्यंत फायदा आहे. एखाद्या अनाथ तरुणीला कैदेंत टेवून अगर तिला असलीं तुच्छ रत्नांगें दाखवून तिचें सतीत्व भ्रष्ट करण्याची इच्छा धरूं नका ! अशा लोकांत सांपडून आपलें सतीत्व भ्रष्ट करणारी तुम्हाला कोणीहि तरुणी आढळणार नाहीं. "

"चाण्डाळणी!" विमलचन्द्र ह्मणाला, "तूंच एक अशी भेटलीस!"

"अशा शिव्या दिल्यानं, लोभ दाखविल्यानं अगर गोड बोलल्यानं आपलं काम होईल अशी जर तुमची कल्पना असेल तर ती साफ फसली ह्मणून समजा. माझ्या सतीत्वापुढें आपलं धन, बल, सौंदर्य, मधुर भाषण सर्व-सर्व तुच्छ आहे. स्त्रीच्या पावित्र्यापुढें जगांतील सर्व-सर्व लहानमोठया वस्तु अगदीं कस्पटासमानाणें आहेत. स्त्रीच्या सती-त्वानें बल अलौकिक आहे. त्यापुढें आपलें कांहींएक चालणार नाहीं."

"दाखवनों आतां माझाही प्रताप!" विमलचन्द्रानें आपला ओंठ चावीत म्हटलें व तो तेथून निघून गेला.

"दयाघना श्रीकृष्णा!" विमलचन्द्र गेल्यावर बकुळी हात जोडून अनन्यभावानें प्रार्थना करूं लागली, 'या अशा संकटसमयीं तूंच माझा वाली आहेस. दीनवत्सला गोपाळा! द्रौपदीनें धावा केला त्या वेळीं तूं द्वारकेंत होतास. सध्यां कलियुगांत तुझा वास कुठें आहे हें मी जाणत नाहीं; पण माझी हाक तुला ऐकूं जाणार नाहीं काय? भक्तरक्षका गोविंदा! द्रौपदीची आपली बहीण समजून तूं भरसभेंत लाज राख-लीस, मीही तुझी कोणी लागत असल्यास माझें संरक्षण कर. चराचर-व्यापी देवकीनंदना! तूं सर्वत्र आहेस. सर्व पहातों आहेस, सर्व ऐकतों आहेस व सर्वांचें रक्षणही तूंच करतों आहेस. माझी लाज तुलाच आहे. तूंच माझा उद्धार कर!"

इतक्यांत विमलचन्द्र विषकुंभ व शैलोदर यांना घेऊन तेथें आला. त्यांना पाहून बकुळीस क्षणभर भीति वाटली; पण तिनें ईश्वराचें भक्ति-पुरःसर स्मरण केलें. तिला एकप्रकारचें धैर्य आलें व ती खालीं मान घालून स्तब्ध उभी राहिली.

"ए पोरी!" शैलोदर आपलें पोट हलवीत म्हणाले "हा तूं काय वेडेपणा आरंभिला आहेस? वेडी कुठली! हे विमलचन्द्र, ही नयार आहे पहा!" असें ह्मणून शैलोदर विमलचन्द्राकडे पाहून हंसूं लागले.

"ए छचकडी!" विषकुंभ बकुळीला उद्देशून म्हणाले, "अशी खालीं मान घालल्यानें चालणार नाहीं. मुकाटयानें कबूल झालें पाहिजे."

"अहो ती महा वस्ताद आहे. अशानें ती थोडीच वळणीवर येणार आहे!" विमलचन्द्र त्वेषानें ह्मणाला.

" ए छोकरी ! " शैलोदर बकुळीच्या अगदीं जवळ जाऊन ह्मणाले.

" मागें सरा. " बकुळीनें क्रोधानें म्हटलें.

शैलोदर चटकन् मागें सरले.

" विमलचन्द्र ! " विषकुंभ विमलचन्द्रास ह्मणाला, " अशानें काम होणार नाहींसें दिसतें. आतां दंडाचाच प्रयोग केला पाहिजे. पाहतां काय ? ध्या हातांत चाबुक आणि उडवा फटके. "

" असेंच केलें पाहिजे. " शैलोदरांनीं डोळे वटारून पहात म्हटलें.

विमलचन्द्र बाहेर गेला व त्यानें खरोखरीच एक चाबुक आणिला.

" पोरी, मुकाट्यानें कबूल हो ! " शैलोदर ओरडले.

" चाबूक पाहिल्यावर सर्व ठीक होतें आहे पहा ! " विषकुंभ बोलले.

विमलचन्द्र बकुळीजवळ आला. बकुळीचा त्यास विलक्षण क्रोध आला होता. त्याचें शरीर थरथर कांपत होतें. तो आपला खालचा ओंठ चावीत तिला ह्मणाला, " बकुळी ! अगदीं अखेरचें विचारतों. तूं नाहींना कबूल होत ? "

" नाहीं ! " बकुळीनें तिरस्कारानें त्याच्याकडे पहात म्हटलें.

" मग मला दंडाचा प्रयोग केला पाहिजे ! तरच "

" अगदीं खुशाल करा. " बकुळी शांतपणें ह्मणाली, " ज्या योगानें तुम्हाला त्रास देतां येईल तो खुशाल द्या. मी तो सर्व सोशीन; पण आपण ह्मणतां ही गोष्ट कधींही होणार नाहीं. "

तिचें हें शांत व निश्चयाचें उत्तर ऐकतांच तिघेही थक्क झाले !

" जरा प्रयोग करा ! " विषकुंभानें विमलचन्द्रास हळूंच सुचविलें.

" बकुळ ! भोग तर आपल्या कर्माचीं फळें ! " असें म्हणून त्या पाषाणहृदयीं, दुष्ट, पापी, चाण्डाळ विमलचन्द्रानें बकुळीच्या पाठीवर जोराजोरानें चाबुक मारण्यास प्रारंभ केला !

धन्य बकुळी ! शाबास आहे तुझ्या विलक्षण धैर्याची ! तिच्या कोमल शरीरावर विमलचन्द्राचे कोरडे काड काड उडत होते; पण तिनें हुं कीं चूं केलें नाहीं. ती खालीं मान घालून शांतपणें चाललेलें कठोर ताडन सहन करीत होती.

तें पाहून विमलचन्द्रास जास्तच त्वेष आला ! त्यानें जोराजोरानें कोरडे मारून म्हटलें, " आतां तरी कबूल आहेस कीं नाहींस बोल ? "

" विमलचन्द्र ! " बकुळी गांभीर्यानें त्याच्याकडे पहात म्हणाली, " आपल्या पत्नीला वैधव्यांत लोटण्याची माझी इच्छा नाहीं. तिचें अन्न मीं खाल्लें आहे. मी कांहीं तुम्हास वश होणार नाहीं ! "

" अगे कारटे ! आणा विमलचन्द्र– " शैलोदर विमलचंद्राच्या हातून चाबूक हिसकावून म्हणाला, " आतां हिला मजा दाखवतों. "

विमलचन्द्रानें शैलोदराच्या हातांत चाबूक दिला व तो मागें सरला. शैलोदर बकुळीपुढें गेले.

" पोरटे ! " शैलोदरानें चाबूक उगारून म्हटलें.

बकुळीनें एकवार त्याच्याकडे तिरस्कारानें पाहिलें.

" पहा– " शैलोदर बोलले व त्यांनीं बकुळीला चाबूक मारला !

पण हें काय ? एखाद्या वृक्षावर विद्युत्पात झाल्याप्रमाणें शैलोदरावर इतक्यांत कोणीसा आघात केला व तो धाडदिशीं जमिनीवर कोसळला. क्षणांत त्याचें प्राणोत्क्रमण झालें ! विषकुंभ व विमलचंद्र भयचकित झाले ! किती वेळ ते दोघे एकमेकांकडे पहात उभे होते.

" विमलचंद्र ! पाहिलेंत ! " बकुळीनें गंभीरपणें म्हटलें, " मला मुकाट्यानें वाट द्या. "

" अग जा ! " विषकुंभ चाबूक घेऊन म्हणाले, " अशानें आम्ही तुला सोडूं कीं काय ? " असें म्हणून त्यानें चाबूक उगारला.

" मग तर चांडाळा– तूंहि मर ! " बकुळीनें त्याच्याकडे तिरस्कारानें पहात म्हटलें. आणि काय आश्चर्य ! शैलोदराप्रमाणें विषकुंभाचीहि स्थिति झाली ! विषकुंभही यमलोकीं आपल्या पापाची झडती देण्याकरितां निघून गेला !

विमलचंद्र घाबरून गेला ! तो किती वेळ तरी त्या दोन्हीं प्रेतांकडे व बकुळीकडे आळीपाळीनें पहात होता. अखेरीस त्यास कसलीशी आठवण झाली. तो आपल्या छातीवर हात मारून म्हणाला, " अरे, आज अमावास्या ! घात झाला ! " इतकें बोलून तो एकदम तेथून निघून गेला. तो गेल्यानंतर थोड्याच वेळांत तपस्विनी तेथें आली ! दोघींनाही परस्परांस पाहतांच आश्चर्य वाटलें. बकुळीस कांहीं सुचलें नाहीं. तिनें धावत जाऊन तपस्विनीच्या गळ्यास मिठी मारिली व ती बेशुद्ध झाली.

---

## प्रकरण त्रेचाळिसावें.

## विलक्षण पत्र.

पण तपस्विनी पुनः तेथें कां आली ? एकवार विमलचंद्र ऊर्फ चंद्रपालसिंहानें तिला अत्यंत अनादरपूर्वक तेथून लाविली असतां पुनः तेथें तोंड वेंगाडण्यास जाण्याइतकी तपस्विनी निर्लज्ज नव्हती; पण ज्या वेळीं तिनें इंदुमतीच्या तोंडून कमलिनीची दुर्दैवी कथा ऐकली व बालार्क हा आपला नातू आहे, हें तिला समजलें. त्यावेळीं तिच्यानें राहवेना. एकवार पुनः चंद्रपालसिंहाकडे जाऊन बालार्कातर्फे त्यास विनंती करावी, तो आपल्या मुलाकडे पाहून तरी कांहीं विरघळेल, अशी तिला आशा वाटूं लागली व म्हणूनच मायेसह बालार्काला घेऊन ती विमलचंद्राच्या त्या बागेंत आली आणि माया व बालार्क यांना एका झाडाखालीं बसवून ती बंगल्याजवळ आली. तों तिला दरवाजा उघडा दिसला. ती बेधडक आंत शिरली. वर महालांत तिला कसलीशी गडबड ऐकूं आली. म्हणून ती कान देऊन ऐकूं लागली, तों " मर तर चांडाळा ! " इत्यादि बकुळीचे शब्द व त्या मागोमाग विषकुंभाच्या पडण्याचा आवाज तिला स्पष्ट ऐकूं आला. बकुळीचा स्वर तिला ओळखीचा वाटला. ती आश्चर्यचकित होऊन तेथेंच उभी राहिली. मध्यंतरीं विमलचंद्र दुसऱ्या रस्त्यानें निघून गेल्यामुळें तिची व त्याची भेट झाली नाहीं. थोड्या वेळांत सामसूम जाहलेलें पाहतांच तपस्विनी दबत दबत जिना चढून महालांत आली व गतप्रकरणाच्या अंतीं वर्णन केल्याप्रमाणें प्रकार तिच्या दृष्टीस पडला. ती आश्चर्य करीत उभी असतांच बकुळीनें धावत येऊन तिच्या गळ्यास मिठी मारिली.

बेशुद्ध बकुळीला आपल्या पुढ्यांत घेऊन तपस्विनी केव्हां तिच्या मुद्रेकडे, केव्हां त्या दोन्हीं प्रेतांकडे व केव्हां सभोंवतीं इकडे तिकडे आश्चर्यानें पहात होती. बकुळीला तिनें तात्काळ ओळखलें. विषकुंभ व शैलोदराच्या प्रेतांकडे पहातांच त्या दोघांनाही आपण कोठें तरी पाहिलें

असावें, असें तिला वाटूं लागलें. तिनें पुष्कळ आठवण केली. बऱ्याच वेळानें तिला स्मरण झालें व त्या प्रेतांकडे तिरस्कारानें पहात ती बोलली, "चांडाळांनो! तुह्मी त्याच राक्षसाचे मित्र आहांत नाहीं? आतां मीं पुरतं ओळखलं!" याच वेळीं बकुळीही पूर्ण शुद्धीवर आली होती. ती नीट बसून तपस्विनीकडे पहात ह्मणाली, "या चांडाळांना आपण ओळखलंत?"

"अगदीं पुरतं ओळखलं! याच चांडाळांनीं माझ्या संसाराचं वाटोळं केलं!" तपस्विनी एकदम ह्मणाली. "पण हा काय घोंटाळा आहे बरं? तूं इथें कशी?"

"आपण मला ओळखलंत?" बकुळीनें आश्चर्यानें विचारिलें.

"होय." तपस्विनी गंभीरपणें उत्तरली, "कुमुदिनी व तूं एके दिवशीं माझ्या इथें आला होता. त्या गोष्टीला पुष्कळ वर्षे लोटलीं."

"अगदीं खरं." बकुळी खालीं मान घालून पुढें ह्मणाली, "आपण पहात असलेला प्रकार पाहून आपणास काय वाटतं बरं?"

"मला कांहींच कल्पना करतां येत नाहीं."

"बायकांचं सौंदर्य किती पण वाईट आहे!" असें ह्मणून बकुळीनें आपली सर्व हकीगत तपस्विनीस निवेदन केली. तपस्विनीनेंही ती लक्षपूर्वक ऐकून घेतली. बालसिंह व बकुळी हीं एकप्रकारें पतिपत्नी आहेत हें जेव्हां तिला समजलें, तेव्हां तिनें बकुळीला प्रेमानें आपल्याजवळ ओढून म्हटलें, "बकुळी, बालसिंह माझा मुलगा आहे व तूं माझी सून आहेस. ज्याअर्थी तुझ्या शापानें हे दोघे चांडाळ मरण पावले, त्याअर्थी आतां तुझा, माझा व बालसिंहाचा भाग्योदय होण्यास फारसा अवकाश नाहीं. अशी मला आशा वाटूं लागली आहे. तुझ्या दिरानें अर्थात् चंद्रपालसिंहानें किंवा विमलचन्द्रानें समज तुझ्याशीं जें नीच व कठोर वर्तन केलें, त्याबद्दल मला फार वाईट वाटतं! तरी पण माझ्याकडे पाहून तूं त्याला तो अपराध क्षमा कर. बाई ग, हा पोरटा इतकीं पापं रोज करतो आहे कीं, तीं पाहून माझं हृदय होरपळून गेलं आहे; पण हें मातेचं हृदय आहे, हें त्याचा नाश कधींही इच्छिणार नाहीं. देवाजवळ रात्रंदिवस मी हीच प्रार्थना करीत आहे कीं, देवा! याला सद्बुद्धि दे."

बोलतां बोलतां तपस्विनी मध्येंच थांबली. बकुळी आपली कथा मुळींच जाणत नाहीं याची तिला आठवण झाली व ह्मणूनच ती बोलतां बोलतां थांबली. बकुळीलाही तिचें हें भाषण फार चमत्कारिक वाटलें. बकुळी तपस्विनीची हकीगत मुळींच जाणत नव्हती. ती आश्चर्यानें तपस्विनीच्या तोंडाकडे पाहूं लागली.

"खरंच, तूं माझी हकीगत जाणत नाहींस खरंना?" तपस्विनीनें दुःखानें विचारिलें. खरें पाहिलें तर तिनें आपली खरी हकीगत अद्याप कोणालच सांगितली नव्हती. येवढें मात्र खरें कीं, कांहीं कालापूर्वी ती जशी अगदीं मौन्य धारण करून असे, तशी आजकालची स्थिति नव्हती. क्वचित्‌वेळीं इंदुमतीजवळ तिनें आपण तपस्विनी नसून राजपत्नी असल्याचें दर्शविलें होतें. पण तें कामापुरतें. कोणीं विशेष चौकशी केल्यास ती अधिकारपूर्वक त्यास चुप्प बसवी. असा प्रसंगही पण क्वचितच येई. एक तर ती नगरापासुन बरीच दूर रहात असे. दुसरें तिच्या भेटीला फारच कमी माणसें येत. जीं येत तीं विचारी गरीब शेतकरी माणसें. मुलाबाळांचीं औषधें वगैरे विचारायला येत. तेव्हां तीं नसत्या उठाठेवी कशाला करतील. त्यांतून सर्वांना सिंहाची भीति. अशी स्थिति असल्यामुळें तपस्विनी खरी कोण, याचा खरा पत्ता कोणालाच नव्हता. पण इंदुमती, बकुळी इत्यादि सारखीं प्रेमळ माणसें मिळालीं असतां व त्यांचीं मानसिक दुःखें ऐकत असतां तपस्विनीस स्वस्थितीविषयीं एक प्रकारचा उमाळा येत असे व त्यामुळें ती चटदिशीं स्वतःविषयीं कांहींतरी बोलून जाई. सध्यां बकुळीजवळ जें ती वरीलप्रमाणें एकदम बोलून गेली, त्याचें कारण तरी तेंच होय.

"बकुळ!" तपस्विनी प्रेमानें तिच्याकडे पहात म्हणाली, "स्वतःचीं दुःखें पाहून तुला आपल्यासारखं कोणीही दुःखी नसेल, असं वाटत असेल नाहीं?"

"नेहमींच कांहीं असे वाटत नाहीं; पण एकादे वेळीं तसं वाटतं."

"नेहमीं कां वाटत नाहीं बरं?" तपस्विनीनें थोडेसें उत्सुकतेनें विचारिलें.

"वाटतं कीं, आपल्यापेक्षांही दुःखीं माणसं कदाचित् असतील." बकुळीनें सरळपणें उत्तर दिलें.

"तुला फक्त वाटतंच. तशीं माणसं तूं पाहिलीं नाहींस ?" तपस्विनीनें विचारिलें.

"कदाचित् पाहिलीं असतील; पण त्यांच्या दुःस्थितीचा विचार करण्याइतकं माझं मन त्यावेळीं ठीक नसेल."

"पोरगी मोठी चतुर आहे." तपस्विनी स्वगत पुटपुटली. तिनें पुनः प्रश्न केला, "अशा एखाद्या दुःखी माणसाची कथा ऐकली म्हणजे मनाला एक प्रकारचं स्वतःबद्दल समाधान वाटतं नाहीं ?"

"कदाचित् ती गोष्ट खरी असेल." बकुळीनें तपस्विनीच्या मुद्रेकडे कांहींसें आश्चर्यानें पहात म्हटलें.

"माझी हकीगत ऐकलीस तर तुझी खात्री होईल." असें म्हणून तपस्विनी खालीं मान घालून कांहीं विचार करूं लागली. ती स्वगत पुटपुटली, "हिच्या मुद्रेवरून ही एक सुशील मुलगी दिसते. बालसिंहावर हिचे पुष्कळ उपकार झाले आहेत. त्याचें हिच्यावर प्रेमहि पण आहे. ही सुद्धां त्याच्यावर उलट प्रेम करीत आहे, हें स्पष्ट दिसतें. मग मी हिला आपली हकीगत कां सांगूं नये बरं ? माझ्या दुःखांत मायेशिवाय आणखी एखादें मनुष्य वाटेकरी झालें पाहिजे. ही त्या गोष्टीला योग्य आहे." असा विचार करून तिनें बकुळीकडे पाहिलें.

"आतां तूं इथून कुठें जाणार ?" तपस्विनीनें प्रश्न केला.

बकुळीनें एकवार तिच्या मुद्रेकडे भक्तिपूर्वक पाहिलें व खालीं मान घालून म्हटलें, "आतां मला त्याची काळजी कशाला ? सुनेचं काम सासू सांगेल तें करण्याचं आहे."

"मी तुझी सासू असावी असं तुला वाटतं ?" तपस्विनीनें सस्मित विचारिलें.

बकुळीनें एकवार वर पाहिलें.

"माझ्यावर तुझा विश्वास आहे तर ?" तपस्विनीनें बकुळीच्या पाठीवरून हात फिरवीत म्हटलें, "इंदुमतीला तूं जाणते आहेस ना ?"

"होय." बकुळीनें तिच्याकडे आश्चर्यानें पहात उत्तर दिलें.

"आतां आपण आपल्या झोंपडींत जाऊं. दाईला तूं जाणतच आहेस. ती पूर्वीप्रमाणें अद्याप माझ्याजवळच राहते आहे. आणखी एक माणूस—मूल—माझ्याजवळ आहे, त्याच्यावर तूं प्रेम करशील ?"

तो चमत्कारिक प्रश्न ऐकतांच बकुळीस आश्चर्य वाटलें.

तपस्विनी तिचें आश्चर्य पाहून हंसली. ती म्हणाली, "कमलिनीला तूं जाणते आहेस का ?"

"फक्त नांवानें," बकुळीनें आश्चर्य करीतच उत्तर दिलें, "कुमुदिनीबाईच्या त्या मैत्रिणी होत्या."

"त्याच कमलिनीचा मुलगा माझ्याजवळ आहे."

"कमलिनीचा मुलगा ?" बकुळीनें आश्चर्यानें म्हटलें, "त्या तर विधवा होत्या !"

"ईश्वराची लीला अपार आहे. तिचा पति जिवंत असूनही ती विधवाच समजली जात असे ! ज्या विमलचन्द्रानें तुला इतका त्रास दिला तोच तिचा पति होय. कमलिनी माझी सून होती."

"म्हणजे ?" बकुळीनें आश्चर्यानें विचारिलें, "हा काय घोटाळा?"

"अग, घोटाळा कसला ?" तपस्विनी मध्येंच म्हणाली, "सगळी दुर्दैवाची कहाणी आहे झालं ! इकडे माझ्याकडे पहा— ज्या आनंददुर्गांत तूं पूर्वी रहात होतीस तिथल्या पूर्वीच्या राजाची मी स्त्री आहें. मला चार मुलें होतीं किंवा आहेत त्यांपैकीं तीन मुलगे व एक मुलगी. वडील मुलाचें नांव कृष्णसेन. हा सध्यां कुठें आहे हें मला माहित नाहीं. दुसरा चंद्रपालसिंह, ज्याला तूं किंवा सगळें जग विमलचन्द्र या नांवानें ओळखतें आहे. तिसरा बालसिंह हा नुक्ताच मला भेटला आहे पण—"

"पण काय ?" बकुळीनें सलज्ज व किंचित् भीतियुक्त होऊन विचारिलें.

"सध्यां तो कांहीं कामाकरितां एके ठिकाणीं गेला आहे."

"आपण अशा स्थितींत आहांत हें भाऊजी (विमलचंद्र) जाणत आहेत का ?" बकुळीनें मध्येंच विचारिलें.

"अग, तुझ्यासारख्यांना त्रास देण्यांत ज्याचें तनमनधन लागलेलं आहे, तो कसचा आईला विचारितो !"

"सुमारें दीड महिन्यापूर्वीं आपण आलां होतां काय ?"

"तो जिवंत असून इथेंच वसतो आहे, हें ऐकल्यापासून मीं या योगेन किनीवरी खेट घातले. असेंच एके दिवशीं त्याची भेट झाली;

पण अपमानाशिवाय काहीं फायदा झाला नाहीं." तपस्विनीनें एक दुःखाचा सुस्कारा टाकून म्हटलें.

" मुलीचा कांहीं पत्ता लागला कां ?" बकुळीनें प्रश्न केला.

"छे, अद्यापपर्यंत कांहींच पत्ता लागला नाहीं."

" आपली अशी स्थिति होऊन किती वर्षे लोटलीं ?"

" माझ्या दुर्दैवाचे खेळ सुरू होऊन तेरा-चवदा वर्षे लोटलीं. आणखी किती दिवस भोग आहे हें भगवान् जाणें !" असें म्हणून तपस्विनी उठत पुढें म्हणाली, " चल, संध्याकाळ झाली. आपल्याला बरेंच दूर जावयाचें आहे."

" चलायचं." बकुळीनें नम्रपणें म्हटलें व तीही उठून उभी राहिली.

" पण बकुळ !" तपस्विनी चालतां चालतां मध्येंच मागें वळून म्हणाली, " आपल्या झालेल्या गोष्टी कोणाला कळवायच्या नाहींत बरं?"

" पण मी राजवाड्यांतून एकाएकीं नाहींशी झाल्यामुळें माझ्या नांवाला जो कलंक लागला आहे, तो धुवून टाकायला खरी हकीगत सांगितल्याशिवाय कसं चालणार ?"

" त्याबद्दल तूं काळजी नको करूं. जर माझ्यावर तुझा खरा विश्वास असेल तर तूं स्वस्थ ऐस. ज्या अर्थी तूं इतकीं दुःखं भोगून शुद्ध आहेस त्या अर्थी सत्कर्माचीं फळं मिळालीं पाहिजेतच आणि तीं तुला लवकरच मिळतील."

दोघीही चुपचाप बाहेर आल्या व ज्या झाडाखालीं माया बालकी-सह बसली होती तेथें पोंचल्या. बालक मायेच्या मांडीवर झोंपी गेला होता. तपस्विनीबरोबर बकुळीला पाहतांच मायेला आश्चर्य वाटलें. तरी तिनें तपस्विनीस प्रश्न केला, " काय झालं ?"

' त्याच्याकडून कांहीं फायदा होण्याचं चिन्ह दिसत नाहीं. आज त्याची भेटच झाली नाहीं. पण पहिल्या भेटीला बालसिंहाची भेट झाली व आज त्याच्या बायकोची भेट झाली. आणि ज्या वेळीं सर्व गोष्टींचा मी विचार करतें त्या वेळीं मला अगदीं खात्रीपूर्वक वाटतें कीं, माझें दुर्दैव संपत आलें असावें. त्या राक्षसाच्या चांडाळ-नौकरांपैकीं दोघे तर मृत्युमुखीं पडले !"

" काय म्हटलंस ?" मायेनें आश्चर्यानें विचारिलें.

" आतां इथेंच नको सर्व विचारीत बसूस. चल. " तपस्विनी पुढें चालत म्हणाली, " हा गुलाम निजला वाटतं ? "

मायेनें बालार्काला नीट खांद्यावर घेतलें. तिघीजणी झोंपडीकडे वळल्या. वाटेनें कोणीही बोललें नाहीं. साधारण अंधःकार पडतां न पडतां इतक्यांत त्या झोंपडींत येऊन पोहोंचल्या.

दुसरा दिवस उगवला. बालार्कानें बकुळीला पाहिलें व त्यास आश्चर्य वाटलें. त्यानें मायेला हलकेंच विचारिलें, " दाई, ही कोण ग ? "

" ही तुझी काकी बाळ. " मायेनें हंसत उत्तर दिलें.

" ही माझ्याशीं खेळेल कांग ? "

" तिलाच विचार जा. मला काय माहित ? "

" इंदुमतीकाकी माझ्याबरोबर खेळते तशी ही खेळेल कांग ? खरंच दाई, एके दिवशीं मी तिच्या घरीं गेलों होतों किनी त्या वेळीं तिथें एक आजारी बाई होती. तिनं मला आपल्या पोटाशीं धरलं आणि माझा मुका घेतला बघ. ती कोण होती ग ? इंदुमतीकाकी म्हणत होती, ती तुझी आई म्हणून. खरंच ती माझी आई होती ? "

" होय बाळ. " मायेनें दुःखानें म्हटलें.

" आतां ती कुठें आहे ? " बालार्कानें दाईकडे आश्चर्यानें पहात विचारिलें.

त्यास काय उत्तर द्यावें याची मायेस मोठी पंचाईत पडली.

ज्या वेळीं इकडे माया व बालार्क बकुळीसंबंधानें बोलत होतीं, त्याच वेळीं तिकडे तपस्विनी बकुळीला बालार्कासंबंधानें कांहीं सांगत होती. ती म्हणाली, " बकुळ ! या पोरावर प्रेम करशील ना ? याच्या बापानं तुला त्रास दिला आहे; पण तूं त्या पोराबद्दल तरी क्षमा कर. याला आतां तुझ्यावांचून कोण आहे बरं ? तूंच त्याला पोटच्या पोराप्रमाणं पाळलं पाहिजेस. "

" झाल्या गेल्या गोष्टी मी मुळींच ध्यानांत बाळगणार नाहीं. आपली आज्ञा मला मान्य आहे. " बकुळीनें नम्रपणें म्हटलें.

" मग आजपासून तो तुझा झाला. आतां माझी काळजी निवारण झाली. " असें म्हणून तपस्विनी तेथून दुसरीकडे गेली. बकुळी बालार्काकडे आली. ज्या वेळीं ती बालार्काकडे आली त्याच वेळीं

बालार्कानें दाईला आपल्या आईविषयीं प्रश्न केला होता, " आतां ती कुठं आहे बरं ? "

" कोण बाळ ? " बकुळीनें हलकेंच त्याच्या पाठीमागें उभें राहून प्रेमानें विचारिलें.

बालार्कानें दचकून मागें पाहिलें. बकुळीला पहातांच तो किंचित् लाजला. बकुळीनें त्याला उचलून आपल्या कडेवर घेतलें व त्याचा मुका घेत म्हटलें, " कोण पाहिजे तुला ? "

" माझी आई ! " बालार्कानें तिच्या मुद्रेकडे आश्चर्यानें पहात म्हटलें.

" मी तुझी कोण ? " बकुळीनें हंसत विचारिलें.

" मला माहीत नाहीं. "

" मी तुझी आई नाहीं कां ? " बकुळीनें त्याचे केस सांवरीत विचारिलें.

" तूं माझी आई ? " बालार्कानें आश्चर्यानें विचारिलें.

अशा प्रकारें विनोद होतां होतां बकुळीची व बालार्काची गट्टी जमली. दुपार झाली. ऊन टळल्यावर इंदुमती आली. तपस्विनींजवळ बकुळीला पाहतांच इंदुमतीस आश्चर्य वाटलें.

तपस्विनीनें इंदुमतीला एकीकडे नेलें व म्हटलें, " बकुळीला आज माझ्याजवळ पाहून तुला आश्चर्य वाटेल व इतक्या दिवस ती कुठें होती याचाही तुला संशय येईल; पण कांहीं कारणानं खरी गोष्ट सांगतां येत नाहीं. ज्याप्रमाणें कमलिनीची गोष्ट घडली आहे, त्याच-प्रमाणें हिचीही चमत्कारिक हकीगत आहे. याकरितां हिच्यासंबंधानं कसलीही वाईट शंका घेऊं नकोस ! "

" नाहीं. हिच्यासंबंधानं आह्माला कसलीही शंका येत नाहीं. जग कांहींही म्हणो. या सुखरूप आहेत, हें पाहूनच मला कितीतरी आनंद होतो आहे. मी आतां लवकरच राजवाड्यांत जाऊन प्रभावतीबाईंना ही गोष्ट सांगतें. त्यांना यांची वारंवार आठवण होते. वाड्यांत या नाहीं कां येणार ? "

" कदाचितच येईल. "

पुनः इंदुमती बकुळीजवळ आली व त्या प्रेमपूर्वक भेटल्या. इंदुमतीनें बकुळीला वाड्यांत चलण्याबद्दल विनविलें; पण बकुळीनें तें

स्पष्टपणें नाकारलें. इंदुमती थोड्याच वेळांत राणी प्रभावतीला भेटण्या-करितां जाण्यास निघाली.

थोड्याच वेळांत ती राजवाड्यांत येऊन पोहोंचली. ती राज्ञी प्रभावतीच्या महालांत गेली व तेथें तिनें कधींही न पाहिलेली गोष्ट पाहिली ! राज्ञी प्रभावती रुदन करीत होती ! इंदुमती स्तंभितच झाली !

" काय हो झालं ? " इंदुमतीनें प्रभावतीजवळ बसत विचारिलें.

" बकुळीप्रमाणंच माझी अवस्था होणार कीं काय देव जाणे. " प्रभावती आपले अश्रु पुसून म्हणाली, " हें पत्र पहा. " असें म्हणून तिनें एक लहानलें चिटोरें इंदुमतीच्या हातांत दिलें. इंदुमतीनें आश्चर्य करीतच तें उलगडलें. त्यांत पुढील मजकूर होता.

" सरकार !

आपल्या विरहांत अशाप्रकारें रहाणें किती कठीण आहे, हें मीच जाणतों आहे. सर्व तयारी कशी अगदीं टीकठाक झाली. आपल्या येण्याचाच अवकाश कीं, पक्षी जाळ्यांत अडकलाच. आपलीच वाकी आहे कीं, बेखटका सर्व राज्य आपलेंच आहे. दासानुदास

ॐ गुप्त. "

पत्र मोठें संदिग्ध होतें. खालीं सहीच्या ऐवजीं सूर्याचें चित्र होतें. तें वाचून इंदुमतीस मोठें आश्चर्य वाटलें. तिनें आश्चर्यानें प्रभावतीस विचारिलें, " याचा अर्थ काय ? "

" हें मला कुणीसं पत्र पाठविलं आहे. बकुळीच्या नांवावरही असलींच चमत्कारिक पत्रं नेहमीं येत. आतां माझ्या नांवावर यायला सुरवात झाली आहे. "

" पण तसं यांत स्पष्ट लिहिलं नाहीं. "

" तें खरं; पण तें आहे मलाच उद्देशून. "

" त्याचा आपण पुरता तपास करा गडे. "

" तेंच; आतां तिकडून येणं होतांच मी हें पत्र तिकडे दाखविणार आहें. " प्रभावती म्हणाली, " बिचाऱ्या बकुळीची काय स्थिति झाली देव जाणें "

" ती आहे इथेंच. " असें म्हणून इंदुमतीनें आपल्याला माहीत असलेली हकीगत सांगितली.

## प्रकरण चवेचाळिसावें.

# पापबीजाचीं कडू फळें.

त्या दिवशीं अमावास्या असल्याची आठवण होतांच विमलचन्द्र एक क्षणभरही तेथें राहिला नाहीं. तो धांवतच तेथून एकदम निघून गेला. त्या वेळीं सूर्य अस्तास जाण्याच्या तयारींत होता. म्लान सूर्य-बिंब पश्चिम क्षितिजाचें चुंबन घेत होतें. क्षीण सूर्यकिरणें शैलाग्रें, वृक्षाग्रें इत्यादि उच्च वस्तूंवरच चमकत होतीं. सूर्याचा पूर्ण अस्त होण्यास अद्याप किती वेळ आहे, हें पहाण्याकरितांच कीं काय गिरिकंदरांत लपलेला अंधःकार हळूंच आपलें डोकें बाहेर काढूं लागला होता. आणि आतां एका जुलमी राजाचें ( अंधःकाराचें ) राज्य सुरू होणार, हें पाहूनच पशुपक्षिगण आसऱ्याकरितां इकडे तिकडे धावूं लागले होते. विमलचन्द्रही क्षिप्रेच्या तीरातीरानें कोणीकडेही लक्ष न देतां जात-धांवत होता; पण त्याला अंधेऱ्या रात्रीची भीति नव्हती. क्षिप्रेच्या वरील अंगास चांगलें दाट अरण्य होतें. त्याच अरण्याकडे तो मोठ्या झपाट्यानें चालला होता. श्रमानें म्हणा किंवा दुसऱ्या कांहीं कारणानें म्हणा, त्याचा चेहरा अगदीं उदास दिसत होता. त्या झाडीजवळ पोहोंचतांच विमलचन्द्रानें एक जोराची शिटी दिली. त्या शिटीचा प्रतिध्वनि हवेंत नाहींसा होतो न होतो तोंच त्या शिटीचें उत्तर शिटीं-तच मिळालें व थोड्याच वेळांत अचेतन विमलचन्द्रापुढें येऊन उभा राहिला.

" अचेतन ! " विमलचन्द्रानें अत्यंत उतावळीनें विचारिलें, " एखादें आहे कारे ? "

" कुठून असणार ? " अचेतनानें म्हटलें, " मागच्या- "

" नाहीं—मूल नाहीं ? अचेतन—अचेतन, खरेंच का एखादेंसुद्धां मूल नाहीं ? " विमलचन्द्र अस्फुट स्वरांत बोलला. त्याचा चेहरा काळा ठिक्कर पडला. त्याचें अंग थर थर कांपूं लागलें. त्याच्यानें उभेंसुद्धां राहवेना. तो मटकन् खालीं बसला. त्याचा सर्व आनंद मावळला. त्यानें आपल्या कपाळावर जोरानें हात मारून म्हटलें, " हाय ! विमल-

चन्द्र ! आज तुझ्या नाशाचा दिवस उगवला ! आज पिशाच तुझा प्राण घेणार ! आज तुझें रक्षण कोणीही करूं शकत नाहीं ! माझी अवाढव्य संपत्ति, जिवश्चकंठश्च मित्र, नोकरचाकर, बायको, मुलगा, बल यांपैकीं कोणी—कोणीही आज माझ्या कामीं येणार नाहींत ! आज मी मरणार ! या वेळीं या संकटांत माझें कोण रक्षण करणार ? या भूतलावर तर कोणी दिसत नाहीं. राजा विक्रमार्क माझा मित्र आहे. एकदोन प्रसंगीं मीं त्याचे प्राण रक्षण केले आहेत; पण आज तो माझ्या कामीं येईल कां ? छे, मुळींच शक्य नाहीं ! कुमुदिनी माझ्यावर अत्यंत प्रेम करीत आहे. माझ्याकरितां ती आपला प्राणसुद्धां देईल; पण तीहि या वेळीं—आपला प्राण देऊनसुद्धां—माझें रक्षण करूं शकत नाहीं. माझ्या वाड्यांत माझ्या स्वतःच्या तैनातींत कितीतरी नोकरचाकर आहेत; पण आज या पिशाचाच्या तावडींतून माझा बचाव करण्याचें सामर्थ्य एकाच्या तरी अंगांत आहे काय ? मग संरक्षण कोण करणार ? कोणीही नाहीं ! आणि आज तर मला मेलें पाहिजे ! हाय ! बकुळी ! तूं खरी साध्वी आहेस. नानाप्रकारच्या तरुणींचा बऱ्यावाईट प्रकारानें उपभोग घेतल्यामुळें या पृथ्वीवर सती स्त्री कोणी नाहींच अशी मला मोठी घमेंड होती. पण बकुळी ! आज तूं आपल्या चारित्र्यानें माझा गर्व खंडन केलास. मी तुला निष्ठुरतेनें छळलें ! आपल्या शापानें तूं मला दग्ध केलें असतेस ! होय ! विषकुंभ व शैलोदर यांना तूं भस्म केलेंस ! तुझ्या शापानें मीही खात्रीनें दग्ध झालों असतों; पण तूं कुमुदिनीकडे पाहून मला वाचविलेंस. बकुळी ! तूं मलाही कां बरें मारून टाकलें नाहींस ? तुझ्या शापापासून माझा बचाव करण्याची पिशाचाला कांहीं शक्ति नाहीं. तें माझें रक्षण मुळींच करूं न शकतें ! मग मला कां बरें मरण आलें नाहीं ? छे, मीं महा पापी आहें. बकुळीसारख्या साध्वीच्या शापानें मरण येण्यास तरी पुण्य पाहिजे. विषकुंभ व शैलोदर ! तुम्ही पुण्यवान् म्हणूनच तुम्हांला असा मृत्यु प्राप्त झाला ! पण माझें नशींब इतकें कुठें चांगलें आहे ? अत्यंत वाईट तऱ्हेनें मला मरण येणार ! माझीं पापकर्मे अगणित आहेत. नरकांतही मला जागा मिळेल कीं नाहीं याची शंका ! "

वर सांगितल्याप्रमाणें विमलचन्द्र वेड्यासारखा स्वतःशींच बरळत होता व अचेतन आश्चर्यानें त्याच्याकडे पहात उभा होता. त्याचें बरळणें ऐकून अचेतनास हंसूं आलें. त्याच्या हास्याचा ध्वनी विमलचन्द्राच्या कानीं पडला मात्र ! विमलचन्द्रानें दचकून वर पाहिलें. अचेतनाचें तें हंसें त्यास झोंबलें. त्यानें कठोर स्वरांत त्यास विचारिलें, " गाढवा ! कारे हंसतोस ? "

अचेतनास जास्तच हंसूं आलें. तो ह्मणाला, " आपली तब्येत आज ठीक कां नाहीं ? "

" अचेतन, सांभाळ. तूं माझ्या दुःखावर डागण्या देऊं नकोस ! " विमलचन्द्र क्रोधानें ओरडला.

अचेतनानें आपलें हंसें आवरलें. त्यानें विचारिलें, " सरकारांस कसली काळजी पडली आहे ? "

" माझ्या डोक्याची. " विमलचन्द्रानें चिडून म्हटलें. अचेतनासारख्या उर्मट मनुष्याशीं कशाप्रकारें बोलावें हें त्यास मुळींच सुचेना.

अचेतन एक पाषाणहृदयी मनुष्य होता. विमलचन्द्राचा तो एकप्रकारें नोकर होता. विमलचन्द्राकडून त्यास पगार वगैरे यथास्थित मिळत असे. तरीपण अचेतन महा उर्मट मनुष्य होता. दुसऱ्याच्या दुःखावर डागण्या देण्यास त्यास मोठा आनंद वाटत असे; मग तो मनुष्य कोणीही असो. त्यांतून ज्यांचीं तो बिंगें जाणत असे, त्यांच्यावर वेळप्रसंगीं शिरजोर होण्यास तो मुळींच मागेंपुढें पहात नसे. विमलचन्द्राचीं बिंगें तो जाणत होता.

" सरकारचें कपाळ दुखतें आहे काय ? " अचेतनानें खोंचून विचारिलें.

विमलचन्द्राची तळव्याची आग मस्तकाला गेली. त्यानें करकरा दांत खात म्हटलें, " चांडाळा ! तूंही माझा आतांच प्राण घेणार कीं काय ? "

" छे छे. " अचेतन मध्येंच ह्मणाला, " आपला प्राण घेतल्यावर मग मी पोटाची काय व्यवस्था करूं ? आपल्याकारितां मी प्राण देईन. "

विमलचन्द्राचा क्रोध थोडा शमला. तो ह्मणाला, " मग तूं असें भलतेंच कां बोलतोस ? "

" आपण आपली खरी हकीगत सांगाल तर मी आपणास मदत करीन. "

" खरी हकीगत काय थोडक्याची सांगूं ? " विमलचन्द्र मध्येंच बोलला, " आज अमावास्या आहे. आज मला एक पोर पाहिजे आहे. तें तूं आणून देशील ? "

" आतां तर रात्र पडूं लागली. या वेळीं मी कोठून आणूं बरें ? या पूर्वी कळविलें असतेंत तर कांहीं तजवीज केली असती. "

" अचेतन ! तूं महा दुष्ट आहेस ! हरेक अमावास्येला मला एक पोर लागतें, हें तुला ठाऊक नाहीं काय ? आणि याचकरितां मीं तुला नोकरही पण ठेवलें आहे. पण तूं बक्षिसाच्या आशेनें आयत्या वेळीं कानावर हात ठेवतोस. सांग, आज जर तूं एखादें मूल दिलेंस तर तूं मागशील तें देईन. "

" अगदीं इथल्या इथें ? " अचेतन काबेबाजपणें बोलला.

" आज नाहीं उद्यां ! " विमलचन्द्रानें किंचित् आशेनें मध्येंच म्हटलें.

" मग काम होणें शक्य नाहीं ! " अचेतन निष्ठुरतेनें बोलला.

विमलचन्द्रानें ओंठ चावीत विचारिलें, " मी तुझें द्रव्य बुडवीन असें कां तुला वाटतें ? "

" त्याचा काय नियम ? " अचेतन गंभीरपणें म्हणाला.

एखादा चिडलेला व्याघ्र ज्याप्रमाणें आपल्या एखाद्या प्रतिस्पर्धी व्याघ्रावर झडप घालतो त्याचप्रमाणें विमलचन्द्रानें अचेतनावर झडप घातली व त्याचें मानगूट पकडून त्यानें त्यास गदगदा हालवून म्हटलें, " गाढवा ! माझ्याशीं वात्रटपणा ! तुला जो नोकरीला ठेवला तो अपमान करण्याकरितां ? बोल. घेऊं नरडीचा घोंट ? कीं मागतोस माफी ? "

अचेतन प्रथम तर घाबरला; पण तात्काळ तो सचेत झाला व त्यानें सुटण्याकरितां धडपड करीत म्हटलें, " जारे मद्यपात्रा ! मी एखादी पोरगी आहे कीं काय ! सोड मुकाट्यानें ! "

" मग आतां तुला जिवंत नाहींच सोडत. " विमलचन्द्र त्याला आपल्या बेंबेंत दाबून म्हणाला, " मी आज मरणार तर आहेच; पण त्यापूर्वी मी तुलाही पण जिवंत ठेवीत नाहीं. " असें म्हणत विमलचन्द्रानें विलक्षण बलानें अचेतनास जमिनीवर आपटलें. यान्तिक

विमलचन्द्रापेक्षां अचेतन कितीतरी पटींनें बलाढ्य होता. पण अचेतनाचा काल जवळ आला होता. विमलचन्द्रानें त्याच्या छातीवर बसून त्याचें नरडें दाबलें ! अचेतनाचें चैतन्य नष्ट झालें !!

जिकडे तिकडे गाढ अंधःकार पडला तरी विमलचंद्र त्या प्रेतावर बसून शून्य दृष्टीनें इकडे तिकडे पहात होता. त्याची बुद्धि थोडावेळ नष्ट झाली होती असें ह्मणावयास हरकत नाहीं. अखेरीस त्याचें डोकें ठिकाणावर आलें. तो उठला व स्वगत पुटपुटला, " मरणापूर्वी कुमुदिनीस सर्व सांगितलें पाहिजे. त्या साध्वीला आतां फार वेळ संशयांत ठेवतां उपयोगीं नाहीं. " इत्यादि पुटपुटत तो आपल्या निवासस्थानाकडे वळला.

विमलचंद्राची स्थिति अशी होण्याचें काय कारण होतें ? विमलचंद्रानें पिशाचसाधन केलेलें वाचकांना माहीत आहेच. पिशाचानें एका भयंकर अटीवर विमलचंद्राला सहाय्य करण्याचें कबूल केलें होतें.

पिशाचानें गंभीर स्वरांत विमलचंद्रास बजाविलें होतें, " मनुष्या ! तूं मला बोलावलें आहेस खरें; पण ध्यानांत ठेव. आजच्याप्रमाणेंच प्रत्येक अमावास्येला एक सुंदर मूल मला बळी दिलें पाहिजे. अमावास्येच्या दिवशीं मी कोणत्याही प्रकारें तुझा गुलाम राहणार नाहीं. पण ज्या दिवशीं उरावीक बळी मिळणार नाहीं त्याच दिवशीं तुझा बळी घेण्यास मी एका क्षणाचाही विलंब लावणार नाहीं. बाकी तुझ्या सर्व आज्ञा मला मान्य आहेत. "

मंत्रसाधन केलेल्या अमास्येपासून आजपावेतों प्रत्येक अमावास्येस विमलचंद्रानें एकेक बालक बळी देऊन आपल्या पापांत तो सारखी भर टाकीत होता. आज बकुळीसारख्या साध्वीला छळण्यांत त्यास अमावास्येचें भान राहिलें नाहीं. आज त्याच्या नाशाचा काल आला !

आजच्यासारखा प्रसंग येऊं नये ह्मणून विमलचंद्रानें शिवेच्या तीरीं एका एकांत भागांत लहान लहान बालकें ठेवण्याकरितां एक घर बांधलें होतें व तेथें अचेतनासारख्या पाषाणहृदयीं मनुष्यास ठेवलें होतें; पण ईश्वराच्या मनांतून यापेक्षांही भयंकर पातकें त्याच्या हातून घडवून आणावयाचीं होतीं ह्मणूनच त्यानें इतका बंदोबस्त केला असतांही आजचा प्रसंग आलाच.

नानाप्रकारचे नैराश्यजनक विचार करीत खिन्न वदनानें विमलचंद्र घरीं आला. तो आपल्या महालांत गेला तों कुमुदिनी एकटीच तेथें कांहीं विचार करीत बसली होती. कुमुदिनीला कमलिनीची सर्व हकीगत समजली होती. आपल्या पतीनें तिच्याशीं विश्वासघात करून तिच्या सर्व जन्माचें कसें मातेरें करून टाकलें ही गोष्ट कुमुदिनीच्या मनांत सारखी घोळत होती. कुमुदिनी पापभीरु होती. आपल्या पतीनें हें जें पापकर्म केलें आहे, त्याचें फळ आज ना उद्यां केव्हां ना केव्हां मिळाल्याशिवाय राहणार नाहीं, ही चिंता रात्रंदिवस तिच्या मनाला जाळीत होती. कमलिनीची हकीगत ऐकल्यापासून ती सदा उदास राहत असे. विमलचन्द्राचें आपल्यावर प्रेम नाहीं, हें ती केव्हांच समजून चुकली होती. तरीपण तिनें त्याबद्दल कधीं एक चकार शब्द-सुद्धां आपल्या पतीस सांगितला नाहीं. विमलचन्द्रालाही कमलिनीची पुढें काय वाट झाली किंवा आपली पत्नी कमलिनीची हकीगत जाणत असेल, याची कल्पनासुद्धां नव्हती. कुमुदिनीचा उदासपणा त्याच्या नजरेस आला होता; पण त्या उदासपणाचें कारण आपलीं पापकर्मेंच असतील याची त्यास कधीं शंकासुद्धां आली नाहीं. त्यानें आपल्या पत्नीला त्या उदासपणाबद्दल कधींही विचारिलें नाहीं. आतां कुठें कुमुदिनीस आपला पति सरळ मार्गानें चालत नाहीं असें वाटूं लागलें. तरीपण त्यास कशाप्रकारें समजावून रस्त्यावर आणावें याची तिला काळजी वाटूं लागली. रात्रंदिवस ती आपल्या पतीला कसें सुधरावें याच विचारांत मग्न असे. आज तिनें आपल्या पतीला थोडा सदुपदेश करण्याचें योजिलें होतें. आणि तो उपदेश कशाप्रकारें करावा, म्हणजे त्याचा आपल्या पतीवर चांगला परिणाम होईल या गोष्टीचा ती विचार करीत बसली होती. इतक्यांत विमलचन्द्र तेथें आला. अशाप्रकारें विचार करीत बसलेल्या आपल्या पत्नीस विमलचन्द्रानें पुष्कळ वेळां पाहिलें होतें; पण आजची स्थिति त्यास जरा निराळी भासली. तो हलकेंच तिच्याजवळ गेला व तिच्या खांद्यावर हात ठेवून दुःखित स्वरांत म्हणाला, "कुमुद ! आज येवढी कसली चिंता करीत आहेस ?"

कुमुदिनी आपल्या विचारांत अगदीं पूर्ण निमग्न झाली होती. विमल-

चंद्रानें तिच्या खांद्यावर हात ठेवीपर्यंत त्याचें येणें तिला समजलें नाहीं. तिनें दचकून वर पाहिलें तों खिन्नवदन विमलचन्द्र तिच्या दृष्टीस पडला. ती थोडावेळ त्याच्याकडे चमत्कारिक दृष्टीनें पहात राहिली. विमलचन्द्र चैनी असल्यामुळें नेहमीं त्याची मुद्रा हंसतमुख असे; पण आज त्याचा चेहरा पूर्ण काळवंडलेला दिसत होता. कुमुदिनीला आश्चर्य वाटलें व तिनें विचारिलें, " आज चेहरा इतका उदास कां बरं ? "

" आज तूं येवढी कसली चिंता करीत होतीस बरें ? "

" बायकांना चिंता ही लागायचीच ! " कुमुदिनीनें कांहींसें खोंचकस्वरांत म्हटलें.

तिचें हें खोंचक उत्तर ऐकतांच विमलचंद्र चपापला ! तो थोडा वेळ स्तब्ध राहिला. बऱ्याच वेळानें कुमुदिनीनें केविलवाण्या स्वरांत त्यास विचारिलें, " प्राणनाथ ! मी सांगेन ती गोष्ट आपण ऐकाल कां ? "

तिच्या ह्या प्रश्नानें विमलचंद्रावर विद्युत्पातच झाला ! तो जवळच्या खुर्चीवर धाडदिशीं पडून अस्फुट स्वरांत ओरडला, " अरेरे ! कुमुद ! तुला सर्व समजलें असें वाटतें ! " असें ह्मणत त्यानें आपल्या हातानें आपली मुद्रा झाकून घेतली.

कुमुदिनी आश्चर्यचकित् झाली. ती डोळे फाडून आपल्या पतीकडे पाहूं लागली.

थोड्या वेळानें विमलचंद्र कुमुदिनीकडे पहात ह्मणाला, " कुमुद ! कुमुद ! ! झालेले सर्व अपराध क्षमा कर. कारण मी आतां सारा एक प्रहराचाच साथी आहे ! माझा मृत्यु आज रात्रीं बरोबर मध्यान्हाला होणार ! "

" प्राणनाथ ! प्राणनाथ ! ! " कुमुदिनी त्याच्या गळ्यास मिठी मारून ह्मणाली, " हें असं भलतंच काय बोलायचं ? "

" खोटें नाहीं सांगत. " विमलचंद्र तिला आलिंगन देऊन ह्मणाला, " आज मी खरोखरीच मरणार ! तूं माझे सर्व अपराध क्षमा कर. "

" प्राणनाथ ! आपण माझे कांहींच अपराध केले नाहींत. मीच आपली अपराधी असेन. तरीपण आपण ह्मणतां त्याप्रमाणें मी आपले अपराध क्षमा करत्यें; पण आपण भलतंच बोलून मला घाबरवूं नका ! "

" कुमुद ! मी महापापी आहें ! " विमलचंद्र दुःखानें पुढें ह्मणाला, " आतां अगदीं थोड्याच वेळांत मी— "

इतक्यांत त्यांचा मुलगा मोहन तेथें आला. आपल्या मुलाला पाहतांच दोघेंही अलग झाली व त्यांनीं आपले नेत्र पुसले. मोहनचें वय यावेळीं पांच एक वर्षांचें होतें. तो एक मोठा गोजिरवाणा मुलगा होता.

" बाबा ! " तो आपल्या बापाजवळ जाऊन लडिवाळपणानें ह्मणाला, " आईची एक मजा सांगूं का तुम्हाला ? "

पण पापी विमलचंद्राचें लक्ष आपल्या गोजिरवाण्या पोराच्या मधुर वाणीकडे मुळींच नव्हतें. आपल्या त्या अर्भकाकडे पाहतांच विमलचंद्राच्या मनांत एक राक्षसी कल्पना उभी राहिली ! पिशाचाला बळी देण्यास आपला मुलगा योग्य आहे, असें त्यास वाटलें. विमलचंद्राची फत्ते झाली ! त्याचा आजचा मृत्यु टळला. राक्षसी वृत्तीच्या विमलचंद्राची सर्व चिंता नष्ट झाली ! त्याची मुद्रा आनंदानें तळपूं लागली. त्यानें आपल्या मुलाला जवळ घेतलें व विचारिलें, " कसली रे मजा ? "

" किनी-( कुमुदिनीकडे पाहून ) सांगूं कां ? सांगतोंच. किनी बाबा, आई आज रडत होती बघा हो ! "

पण विमलचंद्राचें लक्ष या बोलण्याकडे मुळींच नव्हतें. आपल्या मुलाला कुमुदिनीस न कळवितां स्मशानांत कसें न्यावें, याच विचारांत तो गढून गेला होता. अखेरीस त्याचा विचार ठरला. तो कुमुदिनीस ह्मणाला, " जेवणाची तयारी झाली असेलच ना ? "

" केव्हांच. " मोहननें मध्येंच म्हटलें.

" चला तर. आपण जेवायला जाऊं. आज मला फार भूक लागली आहे. " असें ह्मणून आपल्या मुलाला घेऊन तो पुढें झाला. तिघेंही जेवावयास बसलीं व त्याच वेळीं त्या अधमानें संधि साधून कांहीं बेशुद्धीचें औषध कुमुदिनीच्या पानांत टाकलें. मोहनही आपल्या आईच्या पानांतच बसला होता. सर्वांचीं जेवणें आटपलीं. जेवल्यानंतर थोड्याच वेळांत कुमुदिनीवर व मोहनवर त्या औषधाचा परिणाम झाला. तीं दोघेंही महालांत जाऊन पलंगावर निजलीं. थोड्याच वेळांत दोघेंही पूर्ण बेशुद्ध झालीं !

मध्यान्ह रात्र होण्यास आतां तीन चार घटकाच अवकाश होता. राक्षसी विमलचंद्रानें तलवार, उडीद, शेंदूर वगैरे सर्व साहित्य घतलें. तो जेथें कुमुदिनी आपल्या लेंकराला घेऊन बेहोश पडली होती तेथें आला. त्यानें बेहोश पडलेल्या आपल्या मुलाकडे पाहिलें. त्याच्या हृदयांत एक विलक्षण धक्का बसला ! त्यानें आपल्या कपाळावर हात मारून म्हटलें, " हाय ! मोहन ! इतक्या दिवस मी तुला आपल्या हाताखांद्यावर खेळविलें ! ज्या हातानें तुला कुरवाळलें, त्याच हातानें आज मी तुझ्यावर तलवार चालविणार ! हायरे चांडाळ ! पापी ! ! पण मला आपले प्राण वाचविले पाहिजेतच ! " असें पुटपुटत त्यानें हलकेंच मोहनला उचलून आपल्या खांद्यावर टाकलें व तो स्मशानांत जाण्यास निघाला !

विमलचंद्र ! कोणते शब्द योजून आम्ही तुझा धिक्कार करावा ! ज्या आपल्या अर्भकाला तूं इतक्या दिवस खेळविलेंस, ज्याची बाल-क्रीडा पाहून तुझें चित्त प्रसन्न होत होतें, जो तुझ्या कुमुदिनीचा जीव कीं प्राण, त्या मोहनास आज तूं मारणार अं ! ! आपले प्राण वांचविण्याचा हाच एक तुला मार्ग सुचला ! पण दुर्बुद्धे ! दयाघन-भक्तोद्धारक प्रभूची कांहीं तुला आठवण झाली नाहीं ! नशीब तुझें !

वाचक ! पुढें काय झालें, तें आमच्यानें लिहवत नाहीं.

---

## प्रकरण पंचेचाळिसावें.

## यमलोक.

दुसऱ्या दिवशीं विमलचन्द्राच्या वाड्यांत मोहनबद्दल हाहाःकार उडाला! कुमुदिनीला किती दुःख झालें असेल, याची कल्पनाच करावी. जिकडे तिकडे मोहनाच्या अकस्मात् नाहींशा होण्याबद्दल आश्चर्य वाटूं लागलें. सर्वत्र शोध केला; पण मोहनचा पत्ता लागला नाहीं! मायावी विमलचन्द्रानेंही आपल्या मुलाच्या शोधाकरितां जिवापाड यत्न केले. "पुत्रहत्त्या! महत्पाप!!" हे शब्द रात्रंदिवस त्याच्या कानांत घुमत होते. आपल्या राक्षसी कृत्याबद्दल त्याचें अंतःकरण सारखें जळत होतें; पण आतां त्याचा उपयोग नव्हता. जनदृष्टीनें जरी तो चांगला होता, तरी चित्ररथ गंधर्वाच्या पापपुण्याच्या कीर्दखतावणींत विमलचन्द्राच्या नांवें पुत्रहत्त्येचें महत्पाप मांडण्यांत आलें होतें. कसेंका असेना? महत्पाप असो कीं राक्षसी कृत्य असो. विमलचंद्रानें तें करून आपले प्राण तर वांचविलेच. पण कुमुदिनीला पुत्रविरह असह्य झाला! तिला त्या दुःखाचा एवढा मोठा धक्का बसला कीं, ती अजारी पडली! विमलचन्द्र निष्ठुर होता हें खरें; पण कुमुदिनीचें दुःख कांहीं त्याच्यानें पाहवेना. चारपांच दिवस त्यानें मोठ्या मुष्किलीनें आपल्या असन्नमरण पत्नीजवळ बसून काढले. अखेरीस एके दिवशीं त्यास अत्यंत वैताग आला व त्यानें मनांत कांहीं निश्चय करून तो नदीकिनारीं गेला. यावेळीं तिन्हीसांजा झाल्या होत्या. विमलचंद्रानें कपडे काढून किनाऱ्यावर ठेविले व एका उंच खडकावर जाऊन त्यानें क्षिप्रेच्या अथांग पाण्यांत आपला देह फेंकून दिला!

पाण्यांत पडतां पडतां विमलचन्द्राच्या कानीं एक तिरस्कारपूर्ण हास्यध्वनि पडला! तशा वेळींही त्यास अत्यंत आश्चर्य वाटलें. आत्महत्त्या करण्याबद्दल तर आपणास कोणी हंसलें नसेल असें त्यास वाटलें. तो पाण्यांत पडतांच मोठ्या झपाट्यानें खालीं जाऊं लागला. कितीवेळ तरी विमलचन्द्र खालीं खालींच चालला होता. विमलचंद्र पटाईत

पोहणारा होता; पण उडी टाकण्यापूर्वी एकदां जें खालीं जावयाचें तें पुनः जिवंत असें वर यावयाचेंच नाहीं असा त्यानें निश्चय करूनच उडी टाकिली होती. पण पाण्यांत पडल्यानंतर मनुष्याची जी स्थिति होते, तशी त्याची स्थिति न होतां, एक नवीनच चमत्कार घडूं लागला. बऱ्याच वेळानें विमलचंद्राचे पादद्वय जमिनीला लागले. ती जमीन नदीतल नसून कोरडी जमीन असावी, असें स्पर्शावरून त्यास भासलें. त्याला मोठें आश्चर्य वाटलें व त्यानें आपले नेत्र उघडले. तों त्यास आपण एखाद्या अगदीं नवीन अपरिचित् अशा प्रदेशांत उभें असल्याचें आढळलें. पृथ्वीतलावर असतांना त्यानें पैशाचिक सहाय्यानें पृथ्वीवरील परिचित्, अपरिचित् सर्व प्रदेश पाहिले होते; पण सध्यां ज्या प्रदेशांत तो उभा होता, तो त्यास अगदीं अपरिचित् होता. तसा प्रदेश त्यानें पूर्वी कधींही पाहिला नव्हता. तो आश्चर्य करीत उभा असतां दुरून त्यास कांहीं मनुष्यें आपल्याकडे येतांना दिसलीं. आपण कोणत्या प्रदेशांत आलों आहोंत, हें या येणाऱ्या माणसांना विचारावें, असा विचार करून तो त्या माणसांकडे पहात उभा राहिला.

थोड्याच वेळांत तीं सर्व माणसें विमलचंद्राच्या अगदीं जवळ आलीं. विमलचंद्रानें लक्षपूर्वक त्यांच्याकडे पाहिलें व त्यास मोठें आश्चर्य वाटलें. अगदीं सर्वांपुढें चार काळे पुरुष हातांत भाले घेऊन चालले होते. त्यांच्या मध्यभागीं एक मनुष्य चालला होता. त्या मनुष्याच्या डोक्यावर इतकीं मोठमोठीं ओझीं टाकलीं होतीं कीं, तें सर्व ओझें उचलून त्याच्यानें एकेक पाऊल मोठ्या कष्टानें टाकवत होतें. त्याच्या गळ्यांत एक फांस अडकविला असून त्या चार काळ्या पुरुषांपैकीं एकानें त्या फांसाची दोरी धरली होती. तो ओझें घेतलेला मनुष्य मोठ्या कष्टानें चालला होता; पण थकून यत्किंचितही थांबल्यास त्या काळ्या पुरुषांपैकीं मागील दोघे त्यास भाले मारून पुढें चलण्याविषयीं दटावीत होते. ते पुरुष फारच भयंकर होते. विमलचंद्रानें लक्षपूर्वक त्या चौघांकडे व त्या ओझें घेतलेल्या मनुष्याकडे पाहिलें. ओझें घेतलेल्या मनुष्याकडे पहातांच विमलचंद्र आश्चर्यानें उद्गारला, “ अरे ! हा तर अचेतन ! ”

खरेंच, तो ओझें घेतलेला पुरुष अचेतनच होता. विमलचन्द्राचा

स्वर ऐकतांच अचेतनानें किंचित् वर पाहिलें. तो थांबला व त्याबरोबर ते चार पुरुषही थांबले. त्यांपैकीं एक विमलचंद्राकडे बोट दाखवून म्हणाला, " हाच तो मनुष्य नाहीं ? "

तें त्याचें भाषण ऐकतांच विमलचन्द्रास आश्चर्य वाटलें. त्यानें किंचित् पुढें होऊन विचारिलें, " हा प्रदेश कोणता आहे बरें ? "

दुसरा काळा पुरुष मध्येंच घोगऱ्या स्वरांत म्हणाला " या प्रदेशाला पृथ्वीवरले लोक यमलोक समजतात. "

" यमलोक ? " विमलचंद्र आश्चर्यानें म्हणाला.

" हा यमलोक. " तिसरा किंचित् हंसून म्हणाला.

" आपण कोण ? " विमलचंद्रानें आश्चर्य करीत विचारिलें.

" आम्हांला यमदूत म्हणतात. या तुझ्या मित्राला यमराजापुढें नेतों आहोंत. "

" त्याच्या डोक्यावर इतकें ओझें कां दिलें आहे ? " विमलचंद्र आश्चर्यानें म्हणाला, " त्याच्यानें चालवतसुद्धां नाहीं ! "

" तें ओझें आम्हीं थोडेंच दिलें आहे. " एकानें उत्तर दिलें, " त्यानेंच आपण होऊन आणिलें आहे. "

" मोठेंच आश्चर्य ? यांत काय बांधलें आहे बरें ? आणि हा हें घेऊन कुठें जाणार ? त्यापासून याला फायदा काय ? "

" तें त्यालाच विचार. " एक यमदूत मध्येंच म्हणाला.

विमलचंद्रानें दुःखित मुद्रेनें ओझ्यानें वांकलेल्या अचेतनाकडे पाहिलें.

एक यमदूत विमलचंद्रास उद्देशून म्हणाला, " बाबारे, आतां याकडे दुःखितमुद्रेनें पाहून काय होतें आहे. हें ओझें काय आहे, हें तुला माहीत आहे ? "

" नाहीं ! " विमलचंद्रानें विस्मित होऊन म्हटलें.

" हें ओझें याचीं अनंत पापें आहेत. "

" अरेच्या ! " विमलचंद्रानें मध्येंच दचकून म्हटलें. अचेतनापेक्षां कितीतरी पटीनें विमलचंद्राचीं पापें होतीं. मग आपल्या पापाचें ओझें कुठें आहे ? विमलचंद्रास या गोष्टीचें मोठेंच आश्चर्य वाटलें. त्यानें विचारिलें, " मी एक गोष्ट विचारूं कां ?

" समजलों, तूं काय विचारणार तें. " यमदूत म्हणाला, " पण त्याचें उत्तर मी देऊं शकणार नाहीं. "

विमलचंद्र थोडावेळ चुप्प बसला.

" हं चल रे ! " मागील यमदूतानें अचेतनास भाला मारून म्हटलें.

" हं थोडा वेळ थांबा ! " विमलचंद्र मध्येंच त्यांना थांबवून म्हणाला, " याला तुम्ही कुठें घेऊन जाणार ? "

' याबद्दल तुला कांहींच कल्पना करतां येत नाहीं कां ? " यमदूतानें हंसून प्रश्न केला.

' मलाही आपल्याबरोबर घेऊन चलाल कां ? " विमलचंद्रानें विचारिलें.

" यमदरबार पाहण्याची इच्छा आहे होय ? " यमदूतानें हंसून म्हटलें, " आमच्या मागोमाग ये तर. " असें म्हणत अचेतनाला घेऊन ते चौघेहि यमदूत पुढें चालूं लागले. विमलचंद्र त्यांच्या मागोमाग जाऊं लागला. विमलचंद्र विचार करूं लागला. तो मनांत म्हणाला, " काय आश्चर्याची गोष्ट ! मीं आत्महत्या करण्याच्या हेतूनें नदींत उडी टाकिली; पण मी इकडे या यमलोकांत कसा आलों ? क्षिप्रेच्या पोटांत तर यमलोकांत जाण्याचा दरवाजा नसेल ? आतां इथून मी कसा बाहेर निघणार ? कीं मला इथल्याइथेंच पकडून ठेवतील ? माझ्या पापांचें ओझें कुठें आहे. जर मला इथल्याइथेंच पकडून ठेवलें तर बरेंच झालें. मला वाटतें माझीं पापें पृथ्वीवरच राहिलीं असावींत. "

" छे छे वेड्या, " ज्या यमदूताजवळून विमलचंद्र चालला होता, तो म्हणाला, " पाप आणि पुण्य हीं नेहमीं मनुष्याच्या बरोबर राहतात. मनुष्याची छायासुद्धां एखादेवेळीं त्याच्याबरोबर राहण्यास विसरेल; पण पाप आणि पुण्य हीं अगदीं सदा बरोबर असतात. "

" मग माझीं पापें कुठें आहेत बरें ? " विमलचंद्रानें आश्चर्यानें विचारिलें.

" तूं आपल्यामागें पहा. " यमदूतानें हंसून म्हटलें.

" मागें काय आहे ? " विमलचंद्रानें दचकून मागें पहात म्हटलें. त्यानें मागें पाहिलें तों त्यास एक अपूर्व चमत्कार दृष्टीस पडला. स्मशानांत मंत्रसाधन करीत असतां त्यानें पुष्कळ अद्भुत चमत्कार पाहिले

५०

होते, पण त्यापेक्षांही चमत्कारिक देखावा त्याच्या दृष्टीस पडला. त्या देखाव्यांत कितीतरी लहान मोठे भयंकर कृष्णसर्प खेळत असलेले दिसत होते. नानाप्रकारचे विंचु, गोमा, कवडे साप, जहरी सरड, विक्राळ घोरपडी इत्यादि प्राणी मोठ्या झपाट्यानें आपल्याकडे येत आहेत, असें विमलचंद्रास वाटलें. पण ते सर्व प्राणी विमलचंद्रापासून दोन हातावर येऊन थबकत व तेथूनच फुत्कार टाकीत. ते एक दोन नव्हते. अगणित होते. विमलचंद्रानें दूरवर दृष्टी फेंकून पाहिलें तरी जिकडे तिकडे त्या तसल्या विषारी प्राण्यांशिवाय दुसरें कांहींही दिसलें नाहीं. विमलचंद्र आश्चर्यानें थक्क झाला. भीतीनें गर्भगळित झाला.

" पाहिलीस. तुझ्या पापांची फौज ? " यमदूत हळूंच विमलचंद्राच्या कानांत पुटपुटला

" काय ? " विमलचंद्रानें दचकून विचारिलें, " हीं सर्व माझींच पापें आहेत ? "

" यांत काय संशय ? " यमदूत म्हणाला, " तूंच आपलें चरित्र अवलोकन कर. हीं तुझींच पाळीव जनावरें आहेत व रात्रंदिवस हीं अशींच तुझ्या पाठीमागें राहणार. मृत्यु येईपर्यंत हीं अशीं दूरदूर राहतील; पण एकदा का आमचा फांस तुझ्या गळीं पडला कीं, मग पहा हीं तुझ्या डोक्यावर चढलीं म्हणून समज. हीं पापें नुसतीं डोक्यावरच बसत नाहींत, तर मनुष्याला दंशही पण करतात. "

" म्हणजे याचा अर्थ ? " विमलचंद्रानें आश्चर्यानें विचारिलें.

" याचा अर्थ ? " यमदूत हंसून म्हणाला, " तूं अगदींच वेडा दिसतोस रे. वास्तविक तुला या गोष्टी सांगावयाच्या नव्हेत, तरीपण काय असेल तें असो. मी तुझ्यावर बराच खुष झालों आहे म्हणूनच तुझ्याशीं इतक्या गोष्टी बोलतों आहे. बेट्या, जसजसा मनुष्य पापी असल, तसतसे मरणाचे वेळीं त्यास अत्यंत कष्ट होतात. आणि त्याचें कारण दुसरें कांहीं नसून, आपल्या आयुष्यक्रमांत त्यानें जीं लहान मोठीं पापें केलीं असतील, तीं त्यावेळीं त्याच्या अंतःचक्षुपुढें उभीं राहून त्याच्या मनास दंश करीत असतात. "

" मग माझा मृत्यु केव्हां आहे बरें ? " विमलचंद्रानें घाबरून विचारिलें.

यमदूत हसला व बोलला, " वेळ येईपर्यंत तुला तें कधींही कळणार नाहीं. " यमदूतानें पुढें विचारिलें, " मृत्यूबद्दल तुम्हा मानवांची मोठी विचित्र कल्पना आहे नाहीं ?

" तें कसें काय ? " विमलचंद्रानें आश्चर्यानें विचारिलें.

" मग तुम्ही मनुष्यें मरणाला इतकीं भितां कां ? "

विमलचंद्र मध्येंच म्हणाला, " जीं वेडीं असतात तीं भीत असतील, मी कांहीं भीत नाहीं. "

विमलचंद्राचें हें बोलणें ऐकतांच चारीही यमदूत गदगदा हंसूं लागले. त्यांपैकीं एक ह्मणाला, " तूं मोठा खरा बोलणारा आहेस गड्या!"

विमलचंद्राला आतां कुठें आपली चूक कळली. जर मरणाला तो न भितां तर त्यानें पुत्रहत्त्येचें पातक कधींही केलें नसतें ! विमलचंद्र अत्यंत लाजला व खालीं मान घालून मुकाट्यानें चालूं लागला.

थोड्याच वेळांत ते सर्व एका शहराच्या वेशीजवळ आले.

" ही यमपुरी आली बरें कां ! " यमदूत विमलचंद्राच्या कानांत पुटपुटला.

विमलचंद्र हात जोडून त्यास म्हणाला, ' माझी एक विनंति आहे. "

" ती कोणती ? " यमदूतानें हंसून विचारिलें.

" मी पापी तर आहेंच व पुढेंमागें मला या यमपुरींतील व नरक-लोकांतील देखावे पहायला मिळतीलच; पण आतां सहज मी या लोकांत येऊन पडलोंच आहे तर येथील सर्व देखावे पहाण्याची माझी इच्छा आहे, आपली कृपा झाल्यास– "

" ठीक–ठीक. माझ्याकडचेंही काम सध्यां पुरतें संपलें आहे. तेव्हां मी मोठ्या आनंदानें तुला सगळीकडे हिंडवून आणीन. "

ते सर्व वेशीजवळ जाऊन पोहोंचले.

वेशीवरील पाहेरकऱ्यानें आपल्या कर्कश स्वरांत विचारिलें, " कोण ? "

" अचेतन ! " एका यमदूतानें उत्तर दिलें.

" अचेतन ? काय विचित्र नांव तरी. " पहारेकरी म्हणाला, " अचेतन असून यानें येवढें मोठें ओझें आपल्याबरोबर आणिलें अं ? मग याच्यांत चैतन्य असतें तर यानें काय केलें असतें कोण जाणें ?

मृत्युलोकांतील मनुष्यें हीं मोठीं वस्ताद बरें. चला. व्हा पुढें. ( मध्येंच उंच मान करून विमलचंद्राकडे पहात ) अरे पण हा चोर कोण ? हाही मनुष्यलोकींचा कोणी दिसतो. पण याचा पाश कुठें आहे ? पाशाशिवाय याला जाऊं देणार नाहीं. " असें म्हणत त्यानें पुढें येऊन विमलचंद्रास आडविलें. विमलचंद्र घाबरून यमदूताकडे पाहूं लागला. ज्या यमदूतानें त्यास यमलोकांतील मजा दाखविण्याचें अभिवचन दिलें होतें, त्यानें त्या पहारेकऱ्यास कांहीं सांकेतिक भाषेंत सांगितलें. त्यानें त्याचें समाधान झालें. व सर्व मंडळी वेशींत शिरली.

विमलचंद्राच्या मित्र यमदूतानें हलकेंच त्याच्या कानांत सांगितलें, " विमलचंद्र ! आतां कारणाशिवाय उगीच बोलायचें नाहीं बरें कां ? कोणी कांहीं विचारल्यास माझ्याकडे बोट दाखीव. आतां मी तुला एका ठिकाणीं उभा करतों. तेथें तुला फारच थोडा वेळ एकटें उभें रहावें लागेल. मी थोड्याच वेळांत या साड्या कैद्याला पोंचवून येतों. " असें म्हणून त्या यमदूतानें रस्त्याच्या किनाऱ्यावरील एका वृक्षाखालीं विमलचंद्रास उभें केलें व तो व त्याचे तिघे मित्र अचेतनाला घेऊन पुढें निघून गेले.

विमलचंद्र त्या झाडाखालीं बसून एकंदर घडलेल्या गोष्टींचा विचार करूं लागला. अद्यापहि त्याला आपण यमलोकांत कसे आलों ? याचें आश्चर्य वाटत होतें. तो स्वगत बोलला, " सगळेंच आश्चर्य ? एकंदरींत मनुष्य मेल्यावर यमदूत त्याला इथें घेऊन येतात तर ? अचेतनाच्या डोक्यावर किती ओझें लादलें होतें. तो यमदूत म्हणाला कीं, हें पापाचें ओझें आहे, हें खरें असेल कां ? खरेंच असलें पाहिजे. अचेतनानें कितीतरी पापें केलीं असलीं पाहिजेत ? माझीं— माझीं पापेंही कांहीं कमी नाहींत ? बालहत्या पाप आहे—महत्पाप आहे—असें म्हणतात. माझ्या या हातानें किती बालकांचे प्राण घेतले आहेत बरें ? किती मातांना, बहिणींना, पित्यांना, भावांना मीं रडविलें आहे बरें ? या पापांचीं फळें मला भोगावीं लागणार अं ? रात्रंदिवस हीं पापें मनुष्याबरोबर असतात, असेंच तो यमदूत म्हणाला. होय. त्याचें म्हणणें अक्षरशः खरें असलें पाहिजे. हीं पापें मनुष्याच्या मनाभोंवतीं सारखीं फूत्कार टाकीत फिरत असलीं पाहिजेत. म्हणून तर पापी माणसाचें

मन कधींही स्वस्थ नसतें. माझीच स्थिति पहा. माझ्याजवळ अलोट संपत्ति होती, नोकरचाकर, वाडा, बागबगीचे, विक्रमार्कासारखे मित्र, कुमुदिनीसारखी स्त्री सर्व–सर्व कांहीं होतें किंवा आहे; पण मला एक दिवस तरी सुखानें निद्रा आली कां? एक दिवस तरी माझ्या मनाला खरें समाधान मिळालें कां? कसें मिळणार? चित्ताला शांति वाटेल, अशीं कोणतीं चांगलीं कामें मीं केलीं आहेत? माझ्याजवळ अगणित संपत्ति आहे; पण हाय! माझी माता योगिनी होऊन वनवासिनी झाली आहे, भाऊ शत्रूच्या कैदेंत पडला आहे. मीं त्यांची कधींतरी काळजी केली आहे कां? कमलिनीला फसविलें, त्याचा मला काय लाभ झाला? वकुळीला छळलें, मला काय मिळालें? जीं जीं कामें मीं केलीं, तीं स्वतःला सुख मिळावें, याच इच्छेनें केलीं. पण त्यानें सुख तर झालें नाहींच; उलट रात्रंदिवस मनाला टोंचणी लागली. साधुसंत रात्रंदिवस जगाच्या कानीं कपाळीं ओरडत आहेत, "बाबांनो? पापमार्गानें जाऊं नका! त्यांत तुह्मांस कधींहि सुख मिळणार नाहीं." पण त्या साधुवचनाकडे कितीजण लक्ष्य देतात. प्रत्येकजण स्वतः-च्याच अहंकारांत स्वतःच्याच पायावर कुऱ्हाड मारून घेत असतो. त्या दिवशीं शृगालदत्ताच्या मिष्ट भाषणानें भुलून तें पाप जर मीं केलें नसतें, तर आजचा प्रसंग कदापि न येता; पण–पण–" अशाप्रकारें विचार करीत विमलचन्द्र त्या झाडाखालीं बसला होता. इतक्यांत विमलचन्द्रास कोणीसें ह्मटलें, "चंद्रपालसिंह!"

विमलचंद्रानें दचकून वर पाहिलें तों काय? त्याचा पिता त्याच्या-पुढें दुःखी मुद्रेनें पहात उभा असलेला दृष्टीस पडला.

"चंद्रपालसिंह," त्याचा पिता त्यास गंभीर स्वरांत म्हणाला, "मृत्युहोण्यापूर्वी तूं इथें आलास. त्यावरून तूं अनंत पापें केलीं असावींस, असें वाटतें."

यमदूतानें कोणाशींहि न बोलण्याबद्दल विमलचंद्रास बजावलें होतें. विमलचंद्रानें आश्चर्यानें आपल्या पित्याकडे पाहिलें.

"जो अगणित पापें करतो—" त्याचा पिता त्यास बोलला, "त्यासच मृत्यूपूर्वी यमलोकाचें दर्शन होतें. यमलोकांतील हा कायदा आहे."

विमलचंद्र स्तब्धपणें आपल्या पित्याकडे पहात होता.

" चंद्रपालसिंह, " त्याचा पिता हलकेंच ह्मणाला, " ईश्वर भजन कर. नाहींतर तुझी स्थिति—"

इतक्यांत विमलचंद्राचा मित्र यमदूत तेथें आला. त्यास पाहतांच विमलचंद्राचा बाप तेथून मुकाट्यानें चालता झाला.

" तो म्हातारा तुला काय सांगत होता ? " यमदूतानें कांहींसें क्रोधानें विचारिलें, " तूं त्याच्याशीं कांहीं बोललास का ? "

" नाहीं. " विमलचंद्रानें म्हटलें, " पण हे इथें कसे आले ? काय, हेहि पापी आहेत ? "

" तुझ्याइतके नाहींत. " यमदूत खोंचून ह्मणाला, " ज्यांचे पुत्र पापी असतात त्यांना एकवार आपल्या पुत्राच्या दर्शनार्थ येथें बोलावलें जातें. यमलोकांत हा कायदा आहे कीं, ज्यांचीं पापें क्षुल्लक असतील त्यांना दंड न देतां फक्त इतर पापी माणसांना जो कठोर दंड होत असतो, तोच त्यांनीं पहावा. तुला इथें आलेला पाहून तुझ्या बापाला मोठा आनंद झाला असेल नाहीं ? "

त्या यमदूताच्या वरील व्यंगसूचक प्रश्नाकडे विमलचंद्रानें दुर्लक्ष्य केलें. तो विनंतीपूर्वक यमदूतास ह्मणाला, " मग मला नेतांना सर्व वस्तु दाखवावयाला. "

" हो खरेंच. चल आपण यमदरबारांत जाऊं. तेथें तुझ्या दोघां मित्रांचा आज निकाल होणार आहे. "

" कोण बरें ? " विमलचंद्रानें आश्चर्यानें विचारिलें.

" विषकुंभ व शैलोदर यांना तूं विसरला नसशीलच. " यमदूत म्हणाला, " त्यांनाच आज यमराजापुढें नेण्यांत येणार आहे. तेथें तुला पुष्कळ मजा पहावयास सांपडेल. मात्र कोणाशीं बोलायचें नाहीं बरें कां ? "

यमदूत व विमलचन्द्र यमदरबारांत जाण्यास निघाले.

" यमलोकांत आल्याबद्दल तुला आनंद वाटतो कीं दुःख होतें ? " यमदूतानें हंसत प्रश्न केला. विमलचंद्र किंचित् हंसला. त्यानें कांहींच उत्तर दिलें नाहीं.

थोड्याच वेळांत ते दोघेहि यमदरबारांत येऊन पोहोंचले.

यमाचा दरबार मोठा भव्य होता. एका उच्च सिंहासनावर यमराज बसला होता. त्याच्या डाव्या बाजूस चित्ररथगंधर्व, मनुष्यलोकांतील जनांच्या पापपुण्याची वही घेऊन बसला होता व यमराजापुढें आणिलेल्या मनुष्यांचीं पापपुण्यें सांगत होता. यमराजाच्या उजव्या बाजूस पापी माणसांना उभें राहण्याकरितां एक पिंजरा होता. पिंजऱ्यांत यावेळीं दोन कैदी उभे होते. यमराजानें त्यांच्याकडे बोट दाखवून चित्ररथगंधर्वास विचारिलें, "हे कोण? विषकुंभ आणि शैलोदर. यांचें खातें काढा आणि काय आढावा निघतो तो पहा."

"जो हुकूम." असें ह्मणून चित्ररथ आपल्यापुढें पडलेल्या वहीचीं पानें चाळूं लागला.

थोड्याच वेळांत विषकुंभ व शैलोदराचें खातें सांपडलें. चित्ररथानें लागलींच हिशेब करून ह्मटलें, "राजाधिराज! हिशेब तयार आहे!"

"हिशेब तयार आहे. ठीक. पाप जास्ती कीं पुण्य?" यमराजानें प्रश्न केला.

"सरकार!" चित्ररथ दुःखानें ह्मणाला, "शंभरापैकीं नव्याण्णव हिस्से पाप आहे."

"मग वाईट काय आहे? विषकुंभाच्या नांवाप्रमाणें त्याचीं पापें पाहिजेत आहेत. ई बोला पाहूं."

चित्ररथानें पुढीलप्रमाणें विषकुंभ शैलोदराच्या पापांचा पाढा वाचला.

"विषकुंभ व शैलोदर हे दोघेही आपसांत मित्र आहेत. यांनीं स्वतःस सुख लागावें म्हणून नव्हे तर दुसऱ्यास विनाकारण त्रास द्यावा या हेतूनें विश्वासघात, दगाबाजी, कपट, चोरी, हिंसा, असत्यभाषण, गरीबाचा छळ, इत्यादि करण्यास मुळींच मागें पुढें पाहिलें नाहीं. हीं पापें करीत असतां, त्यांनीं ईश्वराची कधींही आठवण केली नाहीं."

"बस्स्—बस्स् समजलें." यमराज मध्येंच म्हणाला, "अशाच प्रकारचीं पापवर्णनें ऐकतां ऐकतां माझे कान किटून गेले. यांचें कांहीं पुण्य असल्यास सांगा पाहूं!"

"सरकार! पुण्य फार–फारच थोडें आहे. ऐकावें, "या दोघां मित्रांचें आपसांत मोठें प्रेम होतें. त्यांनीं एकमेकास कधींहि ठकविलें

नाहीं. एके काळीं एका मनुष्यास लुटत असता हे खरे बोलले होते. दुसऱ्या एका वेळीं त्यांनीं एका जंगली पक्ष्यास एका संकटांतून वाच-विलें होतें." बस्स्. साऱ्या जन्मांत येवढींच काय तीं चांगलीं कामें यांच्या हातून घडलीं."

"ठीक आहे." यमराज शांतपणें म्हणाला, "ठराविक कायद्या-प्रमाणें यांना तीन महिने जळजळीत तव्यावर उभें करा. नंतर तीन महिने यांना तप्त लोहस्तंभांना बांधा. पुढें तीन महिने यांना ताप-लेल्या तेलांत बुडवून ठेवा. अशा प्रकारें सर्व कडक शिक्षा भोगून झाल्यावर नरकांतील किड्यांच्या पोटीं यांचा जन्म होऊं द्या."

लागलींच विषकुंभ व शैलोदर यांना तेथून नेण्यांत आलें.

"चल. आतां आपण नरकलोकांत जाऊं. तेथें—" यमदूत विमल-चन्द्रास ओढून म्हणाला, "आत्तां सांगितलेल्या शिक्षा कशा दिल्या जातात, तें तुला दिसेल."

यमदरबारांतील एकंदर दृश्य पाहून विमलचन्द्र अगदीं घाबरून गेला होता. त्यानें हलकेंच यमदूतास विचारिलें, "पण कायहो ? मनुष्यांचीं शरीरें तर मृत्युलोकांतच राहतात. मग शिक्षा कुणाला द्यायची ?"

यमदूत हंसला व म्हणाला, "अहारे वेड्या ! मनुष्याला नेहमीं दोन शरीरें असतात. एक जड शरीर व एक सूक्ष्म. जड शरीर पृथ्वीवरच राहतें. सूक्ष्म शरीर—पण हा विषय फार गहन आहे. तुझा मृत्यु झाल्यावर तुला सर्व आपोआपच समजेल."

"बरें, कायहो ? आत्तां सांगितलेल्या शिक्षा फारच कडक आहेत नाहीं ? तापलेल्या तव्यावर उभें करायचें, लाल झालेल्या लोखंडी खांबास बांधून घालायचें, कडकडीत तेलांत टाकायचें—फारच भयंकर बोवा."

"अरेच्या !" यमदूत आश्चर्यानें म्हणाला, "ह्या शिक्षा तुला भयं-कर वाटतात अं ? बकुळीला विनाकारण चाबकांनीं मारतांना तुझ्या मनाला यत्किंचित् तरी वाईट वाटलें कारे ? एखाद्याचा विश्वासघात करतांना, एखाद्या दीनास छळतांना, एखाद्याचें द्रव्य चोरतांना, एखाद्या तरुणीवर बलात्कार करतांना अथवा एखाद्याचे प्राण हरण करतांना

तुम्ही मानवांना कांहीं तरी वाटतें काय ? त्या वेळीं तुम्हांस आपलीं हीं कृत्यें कोठें तरी अक्षरशः मांडलीं जात आहेत याची आठवण तरी होते काय ? मग शिक्षा भोगण्याबद्दल कां रडावें ? "

" आपलें म्हणणें खरें आहे. " विमलचन्द्र खालीं मान घालून लज्जेनें म्हणाला.

" तुम्हां मृत्युलोकाच्या मानवांना मोठी घमेंड असते कीं, सर्व प्राणिमात्रांत ज्ञानानें, मानानें व बलानें आम्हीच काय ते श्रेष्ठ; पण मी तर साफ सांगतों कीं, तुम्हां मानवांसारखे मूर्ख व अविचारी असे दुसरे प्राणीच नाहींत. बिचारे पशुपक्षि पाप तरी करीत नाहींत. "

" तें खरें. " विमलचन्द्र मध्येंच म्हणाला, " पण त्यांना पशुयोनि प्राप्त होण्यास त्यांचींच कर्में कारण होतात. "

" हो, तेंही खरेंच. "

इत्यादि बोलत ते एका मोठ्या दरवाजाजवळ आले.

" याच्या आंत नरकलोक आहे बरें कां ? " यमदूतानें हलकेंच म्हटलें.

दोघेही आंत शिरले व विमलचंद्रानें मनाला थरकांप करून सोडणारा देखावा तेथें पाहिला. चोहोंकडून हृदयभेदक आक्रंदन, हाहाःकार, आरोळ्या, किंकाळ्या ऐकूं येत होत्या !

यमदूत विमलचंद्रास म्हणाला, " हें पाहिलेंस. लहानमोठ्या पापांचें कसकसें प्रायश्चित्त मिळतें तें लक्षपूर्वक पहात चल. हें पहा, हीं माणसें अव्वल नंबरचीं चोर आहेत. यांना या द्रव्याच्या ढिगांवर बसविलीं आहेत. "

" मग हीं अशीं किंचाळ्या कां मारताहेत ? "

" कां बरें " हे जे द्रव्याचे ढीग आहेत, ते थंड नाहींत; जळजळीत आहेत ! त्यांच्यावरून यांना पळून जातां येत नाहीं. हें इकडे पहा— खोटें बोलणारांची स्थिति. यांच्या हरेकाच्या तोंडांत राखेचे तोबरे दिले आहेत. हे दगाबाज पहा. हे विषयलंपटी पहा. हे गरीबांना लुटणार पहा— या प्रत्येकांना जी जी शिक्षा दिली आहे, ती पहाणारास कांहींच वाटत नाहीं; पण जे अनुभवतात त्यांनाच त्याचें खरें सुख

कळतें. या पापी मंडळींपैकीं पुष्कळ तुझ्या ओळखीची असतील नाहीं ? "

" बरीच मंडळी आहेत. " विमलचंद्रानें दुःखानें आसपास पहात म्हटलें.

" विमलचंद्र, पाप करण्याचें हें प्रायःश्चित्त आहे ! "

" बालहत्त्या करणारास कोणतीं शिक्षा देतात ? " विमलचन्द्रानें उत्सुकतेनें विचारिलें, " व्यभिचारी पुरुषांची काय अवस्था होते ? "

" कां बरें ? " यमदूतानें हंसून विचारिलें, " साधीं पापें करणारांना या ठिकाणीं आणिलें जातें समजलास ? बालहत्त्या, गोहत्त्या, परस्त्रीगमन इत्यादि–इत्यादि महत्पापांबद्दल निराळा नरक आहे. करतां काय ? प्रत्येकाच्या योग्यतेप्रमाणें आम्हाला त्याचा मान ठेवला पाहिजे. सरसकट बारा टक्के कसे करतां येतील बरें ? "

" आतां पुरें झालें हें पहाणें ! या मंडळींचें किंचाळणें ऐकून माझे कान बहिरे झाले ! "

" इतक्यांतच कंटाळलास ? " यमदूतानें विचारिलें, " आणखी थोडें फिरून येऊं. " बोलतां बोलतां ते एका नदीच्या कांठीं आले.

" या नदीचें नांव वैतरणी आहे बरें कां. " यमदूत वैतरणी नदीकडे बोट दाखवून म्हणाला, " हिच्या पलीकडे स्वर्गलोक आहे. "

" खरें कीं काय ? " विमलचन्द्रानें आश्चर्यानें विचारिलें. नंतर त्याच्या मनांत काय कल्पना आली असेल ती असो. त्यानें धांवत जाऊन वैतरणींत उडी टाकिली.

## प्रकरण शेहेचाळिसावें.

### स्वतःच अडकला.

" पण अद्याप त्याच्याकडून पत्र कसें आलें नाहीं ? " इत्यादि पुटपुटतच खिन्न वदनानें विक्रमार्क महालांत आला. महालांत राज्ञी प्रभावती एकटीच बसली होती. तिच्या आरक्त नेत्रांकडे पहातांच विक्रमार्कास अत्यंताश्चर्य वाटलें. त्यानें जवळ येऊन प्रेमानें प्रश्न केला, " आज तुझे डोळे लाल कां दिसतात ? "

राज्ञी प्रभावतीनें तें विलक्षण पत्र त्याच्या हातांत दिलें. विक्रमार्कानें तें चिटोरें वाचलें व म्हटलें, " हें कुठून आलें ? "

" मला माहीत नाहीं; पण-पण तें मलाच उद्देशून आहे, असें वाटतें. थोड्या दिवसांपूर्वी बकुळीच्या नांवावरही असलींच पत्रें येत होतीं. " प्रभावतीनें दुःखानें म्हटलें !

" आणि या पत्रामुळेंच कां तुला वाईट वाटत होतें ? ' विक्रमार्कानें तें पत्र फाडीत म्हटलें, " वेडीरे वेडी. बरें हें तुला कुठें सांपडलें?"

" इथंच त्या मेजावर कोणीसें ठेवलेलें आढळलें. "

" मग कांहीं हरकत नाहीं. ज्यानें हें पत्र लिहिलें आहे, त्याला आपण लवकरच पकडून आणू. " विक्रमार्क किंचित् हंसून म्हणाला.

राज्ञी प्रभावतीचें समाधान झालें व तिनें इंदुमतीकडून बकुळीची कळलेली हकीगत सांगितली.

" बरें झालें. बिचारीचा शोध लागला. अरे; पण खरेंच. आज अजसेन आपल्या इथें भोजनाला येणार आहेत. तेव्हां पाकगृहांत जाऊन देखरेख ठेव पांहू. "

आपल्या पतीच्या आज्ञेप्रमाणें प्रभावती तेथून निघून गेली.

विक्रमार्क तेथेंच एका खुर्चीवर बसला व स्वगत पुटपुटला, " मला तेवढीच एक काळजी होती. बरें झालें. सर्व कांहीं बिनबोभाट ठीक जुळून आलें. आतां उगला फारवेळ दुःखांत ठेवतां उपयोग नाहीं. बस्स. इतक्या दिवस केलेल्या गुप्त कटाचें थोड्याच दिवसांत सार्थक

होणार व ती राजश्री आमच्या तडाक्यांत सांपडणार. मध्यंतरी इथला सर्व कारभार अजसेनाकडे द्यावा सोंपवून. तोच एक योग्य मनुष्य आहे. इथें सर्वजण त्याला वेडा समजून धिक्कार करीत होते; पण अजसेन खरोखरीच एक अमूल्य मनुष्य आहे."

इतक्यांत अजसेन तेथें आला.

"अगदीं शंभर वर्षे आयुष्य बोवा." विक्रमार्कानें हंसून म्हटलें.

"खरें कीं काय?" अजसेनही हंसत म्हणाला, "पण आणखी शंभर वर्षे आहेत, कीं आतां जें कांहीं आयुष्य लोटलें आहे, तें त्या शंभरांतून कमी होणार?"

विक्रमार्कानें जवळच्या खुर्चीवर त्यास बसण्यास सांगितलें.

"आज कांहीं विशेष काम दिसतें?" अजसेनानें हेतुपूर्वक म्हटलें.

"त्याचकरितां तर आज आपणास तसदी दिली आहे." असें म्हणून विक्रमार्कानें आपली खुर्ची अजसेनाच्या खुर्चीच्या अगदीं जवळ आणिली व म्हटलें, "आतां मी जी कांहीं गोष्ट सांगणार आहे ती लक्षपूर्वक आपण ऐकून घ्यावी व थोड्या दिवसांकरितां ती अगदीं गुप्त ठेवली पाहिजे. मी आज एका विशेष कामाकरितां कोठेंतरी जाणार आहे. तेव्हां माझ्या पश्चात् इथला सर्व कारभार आपण सांभाळला पाहिजे."

राजा विक्रमार्काचा आपल्यावर इतका विश्वास असेल, याची अजसेनास स्वप्नांतसुद्धां कल्पना नव्हती. विक्रमार्काचें वरील भाषण ऐकतांच त्यास आश्चर्य वाटलें व त्यानें मोकळ्या मनानें म्हटलें, "आपला माझ्यावर इतका विश्वास आहे हें पाहून मला फार आनंद वाटतो; पण मला नाहीं वाटत कीं, मी त्या योग्यतेचा असेन."

"आपल्याला नसेल वाटत; पण मला वाटतें." विक्रमार्कानें मध्येंच म्हटलें, "मीं केलेली ही विनंति आपण नाकारणार नाहीं अशी मला आशा आहे."

"आपली आज्ञा या दासानें कधींही नाकारली नाहीं; मग आजच मी कसा नाहीं म्हणेन. बरें, आपण कुठें जाणार?" अजसेनानें विचारिलें.

"तें आतांच सांगतां येत नाहीं."

"बरें आपल्याला तिकडे किती दिवस लागतील?"

" फार झालें तर आठदहा दिवस. यत्या अमावास्येला मी येथें खात्रीपूर्वक येईन. "

" ठीक आहे. आणखी कोणी आपल्याबरोबर जाणार आहे कां ?"

" कदाचित् नाहीं. " विक्रमार्क मध्येंच ह्मणाला, " मग ठरलें तर हें. "

" माझ्याकडून शक्य ती सेवा करण्यास मी चुकणार नाहीं. "

इतक्यांत एका दासीनें येऊन भोजन तयार असल्याचें सांगितलें.

भोजन आटपल्यावर विक्रमार्कानें राज्यासंबंधीं काय काय व्यवस्था करावयाची तें सर्व सांगून अजसेनास निरोप दिला. अजसेन गेल्यानंतर विक्रमार्कानें आपला प्रवासी पोषाख करण्यास सुरवात केली. इतक्यांत प्रभावतीही भोजन करून तेथें आली. आपल्या पतीला प्रवासी पोषाख घालतांना पहातांच तिला मोठें आश्चर्य वाटलें व तिनें विचारिलें, " हें काय ? आज कुठं जायचं आहे कीं काय ? "

" होय. कां बरें ? जाऊं नको. " विक्रमार्कानें हंसत विचारिलें.

" मी जाऊं नका का ह्मटल्यें. आपलं सहज विचारिलं. " प्रभावतीनें किंचित् स्मित करून म्हटलें.

विक्रमार्कानें पोषाख करणें आटपलें. त्यानें प्रेमानें आपल्या पत्नीस आपल्याजवळ ओढलें व हलकेंच तिच्या कानांत म्हटलें, " राणीसरकार ! आपल्याकडून आह्माला एक आठदहा दिवसांची सुट्टी पाहिजे."

" इतके दिवस कुठं जायचं ? " प्रभावतीनें आश्चर्यानें विचारिलें.

" इतके दिवस फार वाटतात अं ? तरीपण मला गेलें पाहिजे व तितके दिवस मला लागणारही. " असें ह्मणून त्यानें प्रभावतीच्या कानांत कांहीं सांगितलें.

प्रभावतीनें दचकून विचारिलें, " खरं कां हें ? "

" अगदीं खरें. अजसेनांच्याकडे सर्व कारभार सोंपविला आहे. वाड्यांतील कारभार तूं पहा. मग जाऊं तर आतां ? "

प्रभावतीनें आपल्या पतीस तांबूल करून दिला. विक्रमार्कानें तो घेतला. त्यानें प्रेमपूर्वक आपल्या पत्नीस आलिंगन दिलें व म्हटलें, " आतां तूं पूर्वीसारखी भित्री नाहींस कांहीं ! तूं वीरपत्नी आहेस. "

प्रभावतीनेंही उलटपक्षीं आलिंगन देऊन आपल्या पतीस निरोप दिला.

थोड्याच वेळांत विक्रमार्क आपल्या आवडत्या समशेरीसह आव-डत्या घोड्यावर बसून उज्जयिनीच्या बाहेर पडला. यावेळीं प्रहर रात्रीचा समय होता.

× × × × × × ×

आनंददुर्गेश राक्षसनाथ आपल्या महालांत इकडे तिकडे फिरत होता. त्याची मुद्रा मोठी प्रफुल्लित दिसत होती. तो आनंदानें टाळी वाजवून ह्मणाला, " याला ह्मणतात मुत्सद्दीपणा ! अहा ! विक्रमार्काला पालथा पाडण्याचा मला प्रसंग येईल, याची मला आशासुद्धां नव्हती; पण माझें दैव बलवत्तर खरें ! कसा काट्यानें काटा काढला पण ? हा वेटा मित्रगुप्तही मला खूप मिळाला. दोघांचें भांडण आणि त्यांत राक्ष-सनाथाचा लाभ, हें माझ्या पांचवीलाच पुजलेलें दिसतें ! याच वेळीं तो कारटाही पण सांपडला. बरें झालें ! विक्रमार्काबरोबर त्याचीही चटणी उडवून टाकूं ! पापमार्गानें चाललें असतां बरकत होत नाहीं ह्मणतात. त्यांना ह्मणावें माझ्या चरित्राकडे पहा ! अहाहा ! काय पण मीं एकेक कृत्यें केलीं ! धवलपुरांत असतांना त्या दिवशीं पापमार्गानें दर्शन देऊन मला जो अशीर्वाद दिला, तो अक्षरशः खरा ठरला ! इंदिरा जिवंत आहे, असें कोण ह्मणत होतें बरें ? ( आठवून ) हं समजलों ! ती माझें काय करते ? तसाच तो वेटा कृष्णसेन—तोही जिवंत आहे; पण त्या गाढवाला मागचीपुढची कांहीं आठवण रहात नाहीं. राहिला हा गोपालसिंह; पण त्याचीही काळजी नको. तो नेहमीं तरुण पोरी धुंडाळण्याच्या विचारांत असतो. मग आतां भीति कुणाची राहिली ? कुणाचीच नाहीं. सर्वत्र माझें निष्कंटक राज्य ! पाहिजे तें करावें ! पूर्ण मुभा ! हं तेव्हां आतां काय काय करायचें राहिलें ? आजच्यां इतक्यांत विक्रमार्क येईलच. त्याला चिरडायचा ! त्याच-बरोबर या बालसिंहाचीही चटणी उडवावयाची ! हीं दोन्हीं कामें पार पडलीं कीं, हलकेंच या मित्रगुप्त महाराजांनाही स्वर्गाचें राज्य दाखवा-वयाचें ! प्रथम आला त्या वेळीं लेकाचा काय ह्मणतो, उज्जयिनीचें अर्धें राज्य ह्मणे मी घेणार ! घे लेका ! अर्धें राज्य घे ! याला लेकाला राज्य घेऊन करायचें काय ? नसत्या उठाठेवी ! पण आपण आतांच कशाला बोला. विक्रमार्क पालथा पडला कीं, त्याबरोबरच

मित्रगुप्तही पण गुप्त होणार ! ( आनंदानें मान डोलवून ) या विक्रमार्काची एक फटाकडी राणी आहे असें मीं ऐकलें होतें; पण माझें म्हातारपण होत आलें. पुन्हां तरुण होण्याची जर कांहीं युक्ति असेल, तर ती युक्ति सांगणाराला मी मोठें इनाम देईन. जाऊंदेत या गोष्टी. विक्रमार्क आज आला पाहिजे नाहीं ? "

इतक्यांत मित्रगुप्त तेथें आला व म्हणाला, " राक्षसनाथाचा विजय असो ! आपला शत्रु बांधून आणिला आहे. "

" खरें कीं काय ? मित्रगुप्त, खरें बोलतां ? ( मित्रगुप्तास आलिंगन देऊन ) मित्रगुप्त, तुमचे हे उपकार मी कुठें फेडूं ? " राक्षसनाथ अत्यानंदानें म्हणाला, " मी आपले पुष्कळ मित्र पाहिले; पण तुमच्यासारखा मित्र छे बुवा ! तुम्ही अगदीं आपल्या नांवाप्रमाणें आहांत. या तुमच्या उपकाराबद्दल तुम्हास काय इनाम देऊं आणि काय न देऊं असें मला झालें आहे. "

" महाराजांची अशीच कृपा असावी म्हणजे झालें. " मित्रगुप्त नम्रपणें म्हणाला, " यापेक्षां दुसरें काय इनाम असणार ? "

" हो नें तर खरेंच म्हणा. तरीपण या कामगिरीबद्दल मी तुम्हाला खात्रीपूर्वक कांहीं तरी इनाम देणार. बरें, काय हो ! तें काम केव्हां आटपायचें ? "

" आजच होऊन जाऊन द्या. " मित्रगुप्त मध्येंच म्हणाला.

" कां बरें ? इतकी गडबडशी. माझ्या मनांत त्याला राक्षसनाथाच्या कैदेची थोडी गोडी दाखवावयाची होती ! "

" तें खरें; पण एक गोष्ट अवश्य ध्यानांत बाळगा कीं, यदाकदाचित् जर ही गोष्ट बाहेर फुटली तर उज्जयिनींतील इतर सरदार चुप्प बसणार नाहींत. ते फौज घेऊन आनंददुर्गावर चढाई करतील. तेव्हां त्यापूर्वी त्यांचें बारा वाजले म्हणजे फौजेचें कांहीं विशेष चालणार नाहीं. कारण वारंवारच अशा संध्या मिळत नसतात. त्यापुढे महाराजांची मर्जी. "

राक्षसनाथ यावर कांहीं बोलणार इतक्यांत एक सैनिक आ[illegible] व त्यानें भीत भीत म्हटलें, " राजा विक्रमार्काला पकडून आणल्याचें समजलें ! उज्जयिनीची फौज दुर्गाकडे येत आहे. "

"पाहिलेंत. करा लवकर तयारी करा!" मित्रगुप्त म्हणाला, "मी त्या फौजेला तिथल्या तिथें आडकविण्याची कांहीं तजवीज करतों."

"तजवीज करून तुम्हीही लवकरच या." राक्षसनाथ चिंतातुर होऊन म्हणाला.

मित्रगुप्त गेल्यानंतर लागलीच हलाहल तेथें आला. तो गंभीर स्वरांत राक्षसनाथास म्हणाला, "राक्षसनाथ! विक्रमार्काला तूं पकडून आणिलें आहेस खरें; पण त्याला सोडून दे. मला नाहीं वाटत कीं, त्यास मारल्यापासून तुझा फायदा होईल."

हलाहलाचें हें भाषण राक्षसनाथास मोठेंच विचित्र भासलें. तो आश्चर्यानें त्याच्याकडे पहात म्हणाला, "हलाहल! तूंच कां हें बोलतोस?"

"होय. मी पुनःही तुला तेंच सांगतों कीं, मित्रगुप्ताचा विश्वास धरूं नकोस. किती झालें तरी विक्रमार्क हा त्याचा संबंधीं आहे, हें ध्यानांत ठेव."

"असला म्हणून काय झालें? त्यालाही चिरडण्यास कांहीं फार वेळ लागणार नाहीं."

"ही पोकळ घमेंड आहे. राक्षसनाथ! जरा डोळे उघडून पहा. सर्व आनंददुर्गांत मित्रगुप्ताचीं माणसें भरलीं आहेत."

हलाहलचें हें बोलणें अक्षरशः खरें होतें. राक्षसनाथासही थोडीशी शंका आली. तो पुटपुटला, "खरेंच. त्या धूर्तानें मला फसविण्याचा तर विचार केला नसेल?"

"मला तर खास वाटतें. तूं ज्याप्रमाणें आनंददुर्गेश हिमशीर्षाला विश्वासघातानें उडविलास, तशाच प्रकारचा कपटाचा डाव खेळून हा तुझा गळा दाबील!"

राक्षसनाथ कांहीं बोलणार इतक्यांत मित्रगुप्त तेथें आला. त्यानें त्या दोघांकडेही तीक्ष्ण नजरेनें पाहिलें व कल्पनेनें सर्व प्रकार ताडला. त्यानें आपल्या कमरेची तलवार नागवी केली व ती राक्षसनाथापुढें करून तो गंभीरपणानें म्हणाला, "आपल्या चर्येवरून माझ्याविषयीं आपणास संशय आलेला दिसतो! ही गोष्ट जरी खरी असेल तर ही तलवार घ्या आणि माझा शिरच्छेद करा."

हलाहल व राक्षसनाथ दोघेही मित्रगुप्ताचें हें भाषण ऐकनांच चकित् झाले. हलाहल स्वगत पुटपुटला. " मग माझा संशय खोटा तर ? "

राक्षसनाथ ह्मणाला, " मित्रगुप्त विश्वासघात करील असें मला मुळींच वाटत नाहीं. "

" मीही तेंच सांगतों. " मित्रगुप्त मध्येंच म्हणाला, " आपल्याशीं विश्वासघात करावा, ही माझी मुळींच इच्छा नाहीं. माझ्या अपमाना-बद्दल मला सूड घ्यावयाचा आहे. "

राक्षसनाथ पुढें येऊन मित्रगुप्ताचा हात धरून ह्मणाला, " मित्रगुप्त, मला तुमच्याविषयीं मुळींच संशय येत नाहीं. विक्रमार्काला इथें बोलवा."

थोड्याच वेळांत विक्रमार्कास बंधन करून तेथें आणिलें. राजा विक्रमार्काचा चेहरा शांत व गंभीर दिसत होता. सर्व मंडळी आप-आपल्या जागेवर बसली. विक्रमार्काच्या पाठीमागें सहा हत्यारबंद शिपाई नागव्या तलवारी घेऊन उभे होते. राक्षसनाथ एका खुर्चीवर मोठ्या आढ्यतेनें बसला होता. त्याच्या उजव्या हातास मित्रगुप्त व डाव्या हातास हलाहल अदबीनें उभे होते. त्यांच्या रक्षणाकरितां ह्मणून त्यांच्या पाठीमागें दोन दोन हत्यारबंद शिपाई उभे होते.

" विक्रमार्क ! " राक्षसनाथ तिरस्कारानें त्यास ह्मणाला, " सात-आठ वर्षांपूर्वी तूं नवीनचंद्र या नांवानें हलाहलापुढें आणिला गेला होतास. दैवानें त्या वेळीं तुला सोडलें; पण आज तूं राक्षसनाथापुढें उभा आहेस. आज तुझी सुटका होणें कठीण ! "

विक्रमार्क फक्त हंसला.

राक्षसनाथास तें हंसें अत्यंत झोंबलें. तो त्वेषानें ह्मणाला, " तुला हंसूं येतें अं ? तुला वाटतें, पूर्वीप्रमाणें आजही तुझी सुटका होईल ? "

" यांत काय संशय ? " विक्रमार्क सगर्व हंसला व म्हणाला, " सत्याचा विजय हा नेहमीं झालाच पाहिजे. "

" पहातों आत्तांच सत्याचा विजय कसा होतो तो ! " राक्षसनाथ ओरडून ह्मणाला, " मित्रगुप्त, करा तयारी. "

" जो हुकूम. " मित्रगुप्त पुढें होऊन ह्मणाला.

" मित्रगुप्त इथें ? " विक्रमार्क आश्चर्यानें म्हणाला.

" होय सरकार. ज्याचा आपण भरदरबारांत अपमान केलांत, तो

मित्रगुप्त आपल्या अपमानाचा मोबदला घेण्याकरितां इथें उभा आहे." मित्रगुप्त विक्रमार्काकडे चमत्कारिक दृष्टीनें पहात म्हणाला.

" राक्षसनाथ ! ध्यानांत ठेव. अशा वेळींही मला मदत मिळण्याचा संभव आहे. वेळेवर या भिंतींतील दगडच माझें रक्षण करतील." विक्रमार्क गंभीरपणें म्हणाला.

" चुप्प बैस ! राक्षसनाथ मध्येंच म्हणाला, " राक्षसनाथ आपल्या वैऱ्याला कशाप्रकारें शिक्षा देववतो, त्याचा तुला मासला दाखवितों." असें म्हणुन राक्षसनाथ एका शिपायाकडे वळून म्हणाला, " जारे ! बालसिंहास आणा."

एक शिपाई बालसिंहास आणण्याकरितां निघून गेला.

" विक्रमार्क ! " राक्षसनाथ मध्येंच खोंचक स्वरांत म्हणाला, " बोल. अद्यापीही जर माफी मागशील तर मी तुझी सुटका करीन."

" छे, ही गोष्ट कधींही शक्य नाहीं."

मित्रगुप्त मध्येंच म्हणाला, " मी आपल्या अपमानाचा प्रथम सूड उगविणार."

" वेडे आहांत. तुमच्यासारख्या मेषपात्राच्या हातून कां माझें नुकसान होणार ? " विक्रमार्कानें तिरस्कारानें म्हटलें.

इतक्यांत बालसिंहाला घेऊन तो शिपाई आंत आला.

बालसिंहाला पहातांच विक्रमार्क चपापला व म्हणाला, " अरेच्या ! तुम्ही या दुष्टाच्या तडाक्यांत ? मग तुम्ही मला भेटून जें सांगत होता तें खरें कीं काय ? पण घाबरूं नका. तुमचेंही रक्षण केलें जाईल."

यावर राक्षसनाथ तिरस्कारानें हंसला. तो म्हणाला, " तुम्हा दोघांनाही तारणें किंवा मारणें माझ्या हातांत आहे." नंतर तो बालसिंहास उद्देशून म्हणाला; " बच्चाजी ! आपण दोनदां निसटून गेला; पण आज पहातों आतां तूं कसा निसटतोस तें ? "

" अहारे नीचा ! काय तुझी ही घमेंड ? " बालसिंह तिरस्कारपूर्वक बोलला, " तुझाही पण नाश होईलच होईल ! "

" आणि तोही अगदीं अल्प काळांत." विक्रमार्कानें मध्येंच म्हटलें.

राक्षसनाथ हंसला ! त्यानें एक नागवी तलवार हातांत घेतली व तो बालसिंहाजवळ येऊन म्हणाला, " दुसरा हात पुढें कर !

( विक्रमार्काकडे वळून ) विक्रमार्क, राक्षसनाथ आपल्या शत्रूचे असे तुकडे तुकडे करून त्यांना नाहींसें करतो ! "

बालसिंहानें डावा हात पुढें करीत म्हटलें, " राक्षसनाथ ! मी वीराचा बच्चा आहें समजलास; पण अगदीं खात्रीपूर्वक ध्यानांत ठेव कीं, माझ्या रक्ताचा एकेक बिंदु नवीन बालसिंह उत्पन्न करील. "

" ओहो ! " राक्षसनाथ तलवार वर उचलून व्यंगार्थी म्हणाला, " आपल्या रक्तांत असें अजब सामर्थ्य आहे तर पाहूं बालसिंह नवे उत्पन्न होतात कीं, हा उर्मट बालसिंह मृत्युमुखीं पडतो ! "

" कीं राक्षसनाथच सापळ्यांत सांपडतो. " विक्रमार्कानें मध्येंच म्हटलें.

राक्षसनाथानें कांहींसें चमकून मागें पाहिलें.

" दगा ! " हलाहल ओरडला !

विक्रमार्कानें तात्काळ टाळी वाजविली. आणि काय आश्चर्य ? तेथें उभे असलेल्या शिपायांनीं राक्षसनाथ व हलाहल यांनाच पकडलें !

" विश्वासघात ! दगा ! कपट ! ! " राक्षसनाथ क्रोधानें बेफाम होऊन म्हणाला, " या दुष्टाचें कृत्य हें ! "

हलाहल मित्रगुप्ताकडे बोट दाखवून म्हणाला," तरी मला पूर्वींपासूनच संशय येत होता. अरे नीचा ! पण याचा सूड घेतला जाईल. " हलाहल धडपड करीत म्हणाला.

" अवश्य ! अवश्य ! ! राक्षसनाथ ओरडला.

" आतां पाहिजेल तितकें ओरडा ! " विक्रमार्क खुर्चीवर बसत म्हणाला.

हा प्रकार पाहून बालसिंह अगदीं चकित् झाला !

आतां सर्वत्र प्रकार पालटला. विक्रमार्क खुर्चीवर बसला. त्याच्या उजव्या हातास मित्रगुप्त व डाव्या हातास बालसिंह उभे राहिले. राक्षसनाथ व हलाहल यांना बंधन करून विक्रमार्कापुढें उभे केलें.

### प्रकरण सत्तेचाळिसावें.

## राक्षसनाथाचें चरित्र.

राक्षसनाथ जळफळत म्हणाला, " विक्रमार्क ! अशा दगाबाजीनें तूं मला पकडलेंस यांत कांहीं विशेष पुरुषार्थ नाहीं. "

" नसेल कदाचित् " विक्रमार्क गंभीरपणें ह्मणाला, " पण तुह्मी किती सज्जन आहांत तें आतां पुढें येतेंच आहे. राक्षसनाथ ! आतां आपली धडपड व्यर्थ आहे. हलाहलाशिवाय आनंददुर्गांतील एकूण-एक माणूस आमच्याकडचें आहे समजलांत. " असें ह्मणून तो खुर्चीवरून उठला. त्यानें मित्रगुप्तास आलिंगन देऊन म्हटलें, " शाबास मित्रा ! फार उत्तमप्रकारें काम पार पाडलेंस. आमच्या उषाताईला थोडे दिवस त्रास भोगावा लागला खरा; पण त्याचा परिणाम फार चांगला झाला. " नंतर तो बालसिंहाकडे वळून ह्मणाला, " कांहीं कालापूर्वीं आपण माझ्याकडे येऊन राक्षसनाथाविरुद्ध तक्रार केली होती व त्याचें शासन करण्याकरितां माझी मदत मागितली होती; पण त्या वेळीं आपणास मीं कां मदत दिली नाहीं, याचें कारण आपणास आतां इतक्यांत कळेलच. ( मित्रगुप्ताकडे वळून ) मित्रगुप्त ! तुह्मी आतां आपली सर्व हकीगत सांगा. ( राक्षसनाथास उद्देशून ) राक्षसनाथ ! तुह्मीही ऐका ! "

राक्षसनाथ कांहीं बोलणार होता; पण हलाहलानें त्यास दाबलें व म्हटलें, " आपली सद्दी संपलेली दिसते. आतां उगीच त्रास करून कां घेतोस ? "

मित्रगुप्त ह्मणाला, " आपल्या आज्ञेप्रमाणें त्या दिवशीं दरबारांत मी आपणाशीं भांडून तेथून निघालों, त्या वेळीं मला किती चमत्कारिक वाटलें ह्मणून सांगूं. मी घरीं आलों, त्या दिवशीं रात्रीं माझ्याकडे पुष्कळच मित्रमंडळी आली व सर्वांनींच माझा धिक्कार केला व व आपली माफी मागण्यास सांगितलें; पण मी कोणालाही दाद दिली नाहीं. पुढें काय काय तजवीज करायची कीं, ज्यामुळें आपलें काम

बिनबोभाट होईल व ही स्वारी ( राक्षसनाथाकडे बोट दाखवून ) आपल्या तडाक्यांत सांपडेल, या विचारास मी लागलों. सुमारें दोन महिने याच विवंचनेंत गेले. एके दिवशीं असेच कांहीं विचार करीत मी क्षिप्रेच्या कांठानें हिंडत होतों. यावेळीं चांगला अंधःकार पडला होता. अकस्मात् माझ्यावर चारपांच आडदांड लोकांनीं हल्ला केला. मला मोठें आश्चर्य वाटलें व स्वतःच्या सुटकेकरितां मीं पुष्कळ धडपड केली; पण कांहीं विशेष फायदा झाला नाहीं. मला त्यांनीं कैद केलेंच ! नंतर त्यांनीं मला येथें आणिलें व या राजेश्री ( राक्षसनाथापुढें ) पुढें आणून उभें केलें. यांनीं मला एकदम कैदेंत घालण्यास सांगितलें ! प्रथम त्याबद्दल मला आश्चर्य वाटलें; पण विचारांतीं या गोष्टींत कांहीं मतलब आहे, असें मला आढळलें. कैदेंत असतां मीं एक गोष्ट पाहिली कीं, हे ( राक्षसनाथ ) आपल्या नोकरांना कांहीं चांगल्याप्रकारें वागवीत नाहींत व त्यामुळें सर्व नोकरचाकर आपल्या धन्यावर बरेच असंतुष्ट आहेत. हें पहातांच मला फार आनंद झाला. राक्षसनाथाला पालथा पाडण्यास आतां विशेष कष्ट नाहींत असें मला वाटलें. एके दिवशीं यांनीं मला आपल्या महालांत बोलावून घेतलें व म्हटलें, " तुला उद्यां फांशी द्यावयाचें आहे, तेव्हां तुझी अखेरची कांहीं इच्छा असल्यास सांग. "

मीं शांतपणें म्हटलें, " आपण ती कदाचित् पुरी कराल. "

" कां बरें ? " यांनीं आश्चर्यानें विचारिलें.

" विक्रमार्काचा सूड घेण्याची माझी इच्छा आहे. " हें मी इतक्या गंभीरपणें व अगदीं खरें भासेल असें बोललों कीं, हे येवढे कपटपटु खरे; पण तेहीं चुकले. माझी कैदेंतून सुटका झाली. मी याचा जिवश्चकंठश्च स्नेही बनलों. दोघेही तासच्यातास बसून आपला सूड कसा उगवावा, या विचारांत घालवीत होतों. पण येवढी गोष्ट अगदीं खरी कीं, हे मला तोंडघशी पाडण्याच्या विचारांत होते व मी यांना पकडण्याच्या विचारांत होतों. हळूंहळूं मीं दुर्गावरील माणसें फितुर करण्यास सुरवात केली. थोड्याच दिवसांत किल्ल्यावर सर्व आपलींच माणसें झालीं. नंतर संधि साधून चारपांच दिवसांपूर्वी मीं सूर्याचें चित्र असलेलें पत्र आपणाकडे पाठविलें. मध्यंतरी यांचे विषकुंभ व दोलो-

दर या नांवाचे मित्र आहेत त्यांनीं यांना ( बालसिंहास ) पकडून आणिलें. त्यांचे ( राक्षसनाथाचें ) व यांचें ( बालसिंहाचें ) हाडवैर दिसतें. त्याच दिवशीं यांचा ( बालसिंहाचा ) मृत्यु होणार होता; पण मीं खुबीनें यांचें रक्षण केलें. एकंदरींत परमेश्वरकृपेनें माझ्या या कठीण कार्यास यश आलें व त्याचें फळ हा आपला शत्रु आपल्यापुढें उभा आहे. " असें बोलून मित्रगुप्त चुप्प बसला.

विक्रमार्क नंतर बालसिंहास ह्मणाला, " पाहिलेंत. अशाप्रकारचा कावा आम्ही खेळत होतों ह्मणूनच त्या वेळीं आपणास मीं मदत देण्याचें नाकारलें. कारण आतां जरी आह्मांस आपली हकीगत खरी वाटते आहे, तरी त्या वेळीं मला आपला विश्वास नव्हता. कदाचित् उलटप्रकारें राक्षसनाथ आपल्याशीं तसाच डाव साधत असेल, असें मला वाटलें. ह्मणूनच त्या वेळीं मीं आपलें ह्मणणेंसुद्धां ऐकून घेतलें नाहीं. आतां आपली हकीगत सांगा. ज्याच्यावर तुमचा आरोप आहे, तो मनुष्य तुमच्यापुढेंच उभा आहे. तुम्हाला योग्य तो न्याय खात्रीनें मिळेल. "

" राजन् ! " बालसिंह नम्रपणें ह्मणाला, " मी आपल्या मातेच्या-तर्फे, भावाच्या तर्फे, बापाच्या तर्फे, वहिणीच्या तर्फे या दुष्टावर असा आरोप ठेवतों कीं, माझ्या बापाला यानें मारलें, आईला भिकारीण बनविलें, भावावर, वहिणीवर व माझ्यावर अत्याचार केला ! सत्याला स्मरून मी या गोष्टी सांगत आहे. तर याचें शासन व्हावें. "

" राक्षसनाथ ! " विक्रमार्क त्याकडे वळून म्हणाला, " यावर आपलें काय ह्मणणें आहे; यांनीं सांगितलेल्या गोष्टी खऱ्या आहेत काय?"

राक्षसनाथ खालीं मान घालून कांहीं विचार करूं लागला.

हलाहल हलकेंच त्यास म्हणाला, " राक्षसनाथ ! खरी हकीगत सांगून टाक. कदाचित् प्राण वाचण्याचा संभव आहे.

तरीही राक्षसनाथ चुप्पच.

" राक्षसनाथ ! " मित्रगुप्त मध्येंच ह्मणाला, " नुसतें चुप्प बसण्यानें काम भागणार नाहीं. आणि आपली खरी हकीगत जर नाहीं सांगितली तर आपली मुळींच सुटका होणार नाहीं. "

" माझी आई जिवंत आहे, " वालसिंह मध्येंच ह्मणाला, " ती या गोष्टीची साक्ष देईल. "

" राक्षसनाथ ! " विक्रमार्कानें गंभीरपणें त्यास बजाविलें, " जरी वालसिंहाचा आरोप तुझ्यावर लागूं पडला नाहीं, तरी आनंददुर्गांतील रजेला तूं छळलें आहेस, एका कालीं माझ्याशीं तूं दगाबाजी केली आहेस, वसंतदुर्गाचे मागचे अधिपती धर्मचंद्र यांनाही तूं फार त्रास दिला आहेस, तेव्हां त्या सर्वांचा तुला जाब द्यावा लागेल. "

" राजन् ! " वालसिंह आपला तुटका हात पुढें करून ह्मणाला, " मीं या दुष्टाला कोणत्याहीप्रकारें त्रास दिला नसतां यानें निष्ठुरतेनें हा माझा हात तोडला. याचा मला न्याय मिळाला पाहिजे. "

या वेळीं राक्षसनाथाची मोठी चमत्कारिक स्थिति झाली ! नानाप्रकारच्या आरोपांचें आवडंबर त्याच्या डोक्यावर जमूं लागलें व तें आपल्या डोक्यावर कोसळणार, अशी त्यास खात्री वाटूं लागली. आपला उर्जितकाल संपला असून आतां आपली मृत्यूवांचून सुटका होणार नाहीं असें त्यास स्पष्टपणें दिसूं लागलें. त्यानें आपल्या सभोंवतीं पाहिलें तेव्हां एक हलाहलच त्यास आपल्याकडचा दिसला; पण तोही आपल्याप्रमाणेंच बांधलेला. आपली हकीगत सांगावी कीं न सांगावी या विचारांत तो पडला. त्यानें पुष्कळ वेळ विचार केला व अखेरीस विक्रमार्कास म्हटलें, " मी आपली खरी हकीगत सांगायला तयार आहें; पण ती ऐकल्यावर माझी सुटका करण्याचें आपण वचन द्याल काय ? "

" अशक्य ! " विक्रमार्क मध्येंच ह्मणाला, " अशाप्रकारचें वचन मी मुळींच देऊं शकत नाहीं. "

" मग मीही आपली हकीगत सांगत नाहीं. " राक्षसनाथ निश्चयानें ह्मणाला.

" मग आह्मालाही कांहीं कडक उपाय अमलांत आणावे लागतील. " असें म्हणून विक्रमार्कानें एका शिपायास चाबूक आणण्यास सांगितलें.

" राक्षसनाथ ! " हलाहल हलकेच ह्मणाला, " गड्या ! चिन्ह कांहीं ठीक दिसत नाहीं. तूं मुकाट्यानें आपली हकीगत सांग कशी ! "

" थांब जरा. " राक्षसनाथ जरा हासून म्हणाला.

शिपाई चाबूक घेऊन आंत आला.

" राक्षसनाथ ! " विक्रमार्कानें बजाविलें, " विचार करा. आपल्यास फारच निर्दयतेनें वागविण्यांत येईल. "

टंगळमंगळ करण्यांत कांहीं विशेष अर्थ नाहीं, असें राक्षसनाथास वाटलें. म्हणून तो किंचित् नम्र होऊन म्हणाला, " मी आपली कथा सांगण्यास तयार आहें; पण मला नंतर सोडलें पाहिजे. मी सुकाट्यानें चालता होईन. "

" त्याबद्दल आतांच सांगतां येत नाहीं. मरणापूर्वीं आपलीं सर्व पापें सांगून टाकावींत हें विशेष उत्तम. "

" नशीब माझें. " राक्षसनाथ खालीं जमिनीवर बसत म्हणाला. त्यानें खालीं मान घालून थोडा वेळ विचार केला व पुढीलप्रमाणें आपला इतिहास सांगण्यास सुरवात केली.

तो म्हणाला, " या आनंददुर्गापासून सुमारें शंभर कोसावर मरु प्रदेश आहे. त्याच प्रदेशांत रुक्षपुर या नांवाचें एक खेडेंगांव आहे. त्या गांवचा मी मूळ राहणारा. आमचा मरुप्रदेश शुष्कपणाबद्दल प्रसिद्धच आहे. अर्थात् तेथें राहणाऱ्या लोकांचें जीवन अन्नपाण्याच्या महागाईमुळें किती कष्टतर असेल हें निराळें सांगावयास नको आहे. जमिनींत पाताळापर्यंत जरी खोदत गेलें तरी डोळ्याला लावायलासुद्धां पाणी मिळण्याची पंचाईत ! मोठमोठ्या वाळवंटांतून कोसकोस चालत गेलें तरी छाया म्हणून मिळणार नाहीं ! जिकडे तिकडे वाळू, सर्वत्र रुक्ष, कधीं म्हणून डोळ्याला आनंद होईल, असा देखावा दृष्टीस पडेल तर शपथ ! अशी आमची जन्मभूमि आहे. या अशा शुष्क भूमींत जन्म झाला म्हणूनच कीं काय ? आमच्या अंतःकरणांतही दयेचा तिळभरही ओलावा नाहीं ! दुसऱ्याला छळून आपला तळीराम गार करावयाचा हें आमचें ब्रीद. आम्ही चारपांच मित्र लहानपणापासून दुष्टपणाबद्दल प्रख्यात होतों. आमचीं नांवेंही पण अगदीं गुणांला अनुरूप अशींच ठेविलीं गेलीं. माझ्या मित्रांपैकीं एकाचें नांव हलाहल! हा तुमच्यापुढें उभा आहे. हा जिथें जाईल तिथें आपल्या नांवाप्रमाणें दुधाचें हलाहल करून सोडील ! दुसरे दोन मित्र विषकुंभ व शेलोदर हे उज्जयिनीकडे आहेतसें वाटतें. हेंही आपल्या नांवाला साजेल, असेंच

वर्तन करतात. माझा चवथा मित्र कर्बेर या नांवाचा होता; पण थोड्या दिवसांपूर्वी तो वारला! त्यानेंही आपल्या नांवाला बट्टा लागेल असें कधींही केलें नाहीं. आणखीही माझा एक सवंगडी बिभीषण होता; पण तो मोठा धार्मिक असे. त्यामुळें त्याचें व आमचें केव्हांही पटत नसे. अखेरीस एके दिवशीं आम्ही त्याला मुक्ति दिली! ज्या वेळीं ही गोष्ट घडली, त्या वेळीं आम्ही सर्वच पूर्ण तारुण्यांत होतों. आमच्या वयाप्रमाणें आमचे दुर्गुणही पूर्णत्वाला पोहोंचले होते. खोटें बोलणें, विश्वासघात करणें, एखाद्यास फसविणें, या गोष्टी तर आमच्या परिपाठांतल्या होत्या. पण एखाद्याचा प्राण घेणें ही गोष्टसुद्धां आम्ही सहज करीत होतों. पोटाची आग विझविण्याकरितां आम्ही पाहिजेल तें करीत असूं! एके दिवशीं आमचें व एका शेजाऱ्याचें भांडण झालें. त्याचा वचपा काढण्याकरितां आम्हीं त्याची गाय चोरून आणिली व पांची मित्रांनीं तिला भाजून खाण्याचें योजिलें! त्याच वेळीं आमचा बिभीषण तेथें आला व लागला धार्मिक व्याख्यान द्यायला. मला राग आला व त्याच दिवशीं आम्हीं त्यालाही त्या गाईबरोबर आगींत टाकलें! आमच्या चरित्रास खरा आरंभ येथूनच झाला. त्याच दिवशीं आह्मां पांची मित्रांना ईश्वरानें दर्शन देऊन आतां तुमचा भाग्योदय होईल ह्मणून आशीर्वाद दिला. आणि त्या आशीर्वादाप्रमाणें घडलेंही. आम्हीं आपल्या कंपूसह कोठेंतरी दूर देशीं जाऊन द्रव्य मिळवावें असा विचार केला. दुसऱ्याच दिवशीं आम्हीं पांची मित्रांनीं रक्षपुरास रामराम ठोकून पूर्वेकडे मालयप्रदेशांत जाण्याचा निश्चय केला. रस्त्यानें जातां जातां माझ्या चारी मित्रांनीं मलाच आपला नायक नेमलें."

"आणि तुम्ही त्या पदाला योग्यही पण होता." विक्रमार्कानें कांहींसें व्यंगार्थी म्हटलें.

राक्षसनाथाला तो व्यंगार्थ समजला नाहीं असें नाहीं; पण त्यानें तिकडे दुर्लक्ष केलें. तो आपली हकीगत पुढें सांगूं लागला. तो बोलला, "प्रवास करतां करतां आह्मी दक्षिणेच्या प्रांतांत आलों व एका खेडेगांवीं उतरलों असतां तेथें आह्मांस इथल्या राजाविषयींची हकीकत ऐकायला मिळाली. त्यावेळीं आनंददुर्गांत हिमद्योत हे राज्य करीत

होते. हे मोठे दयाळु, प्रजावत्सल, सत्यनिष्ठ, न्यायपरायण व किंचित् भोळे असे होते."

"आणि म्हणूनच—" विक्रमार्क मध्येंच म्हणाला, "तुमच्या चांडाळ-चौकडीनें त्यांच्यावरच आपल्या कपटनाटकाचा प्रयोग करण्याचें ठर-विलें वाटतें?"

"अशी कल्पना केल्यास कांहीं हरकत नाहीं." राक्षसनाथ पुढें म्हणाला, 'हिमशीर्षांनीं आपल्या प्रजेला अगदीं खरा खरा न्याय मिळावा म्हणून एक गुप्त सभा स्थापन केली होती."

"आनंददुर्गाचा अखत्यार आपल्याकडे आल्यावर त्या सभेचा आपण खूप दुरुपयोग केलात नाहीं?" विक्रमार्कानें मध्येंच कांहींशा तिरस्कारानें म्हटलें.

राक्षसनाथानें तिकडे लक्ष्य दिलें नाहीं. तो पुढें म्हणाला, "त्या गांवांत राहून आम्हीं आनंददुर्गेश हिमशीर्षाची आम्हास पाहिजे होती तितकी माहिती काढून घेतली व नंतर एक कपटनाटक खेळण्याचा निश्चय केला. जी कांहीं तजवीज करावयाची ती केली व मी आनंद-दुर्गावर हिमशीर्षाला भेटण्यास गेलों. अहाहा! मरुभूमीसारख्या शुष्क प्रदेशांत राहणाऱ्या माझ्यासारख्या कंगालानें आनंददुर्गाचें अपूर्व वैभव पाहतांच माझे नेत्र दिपून गेले, यांत नवल तें काय? हिम-शीर्ष सर्वांचीच भेट घेत असे. त्यानें माझी भेट घेतली व मोठ्या प्रेमानें मी कां आलों याचें कारण विचारिलें.

मी डोळ्यांत अश्रु आणून म्हणालों, "राजन्! आपण गरिबाचे कन-वाळू आहांत! हाय! मी एक विनंती करण्याकरितां आलों आहें. महाराजांना राग तर नाहीं येणार?" बिचारा भोळा हिमशीर्ष! माझ्या नक्राश्रूंनीं विरघळला. त्यानें उत्तेजनपूर्वक म्हटलें, 'आपली जी इच्छा असेल ती सांगा. माझ्याकडून पार पडण्यासारखी असल्या—" मीं एक हुंदका आणून मध्येंच म्हटलें, 'राजन्! आपण सर्वशक्तिमान् आहांत. माझ्यासारख्या गरीबाची विशेष इच्छा ती काय असणार? पण—पण—"

"बोला—बोला." हिमशीर्ष मध्येंच म्हणाला.

"माझा भाऊ—महाराज," मीं आपले नेत्र पुसून म्हटलें, "अत्यंत आजारी पडला आहे. अगदीं आसन्नमरण झाला आहे—त्या—"

" औषधपाण्याकरितां कांहीं द्रव्याची जरूर आहे ? " हिमशीर्षांनीं सहानुभूतिपूर्वक विचारिलें.

" नाहीं " मीं आवंढा हुंदका दाबीत म्हटलें, " माझ्या भावाची इच्छा–" येथें मी थोडासा आडखळलों. हिमशीर्षाला मी पुढें सांगायला कचरतों आहे, असें वाटलें म्हणून ते म्हणाले, " तुम्ही कोणत्याहि प्रकारचें भय न बाळगतां जें कांहीं सांगायचें असेल तें बेधडक सांगा. "

मी जरा धीट झाल्यासारखें करून म्हटलें, " महाराज चिरायु होवोत ! राजन् माझा भाऊ आपणास पाहूं इच्छितो. "

" हं: काय म्हटलेंत ! " हिमशीर्षांनीं माझी ही अपूर्व विनंती ऐकतांच आश्चर्यानें विचारिलें.

" होय सरकार. " मीं म्हटलें. " मरणापूर्वी आपल्यासारख्या प्रजावत्सल भूपतींचें एकवार दर्शन घ्यावें, अशी माझ्या भावाची अत्यंत इच्छा आहे. "

" मोठेंच आश्चर्य ! " हिमशीर्षांनीं आश्चर्य करीत म्हटलें.

" आश्चर्य तर खरेंच–" मीं कंपित होणाऱ्या स्वरांत म्हटलें, " मीं त्याला पुष्कळ समजावून सांगितलें कीं, अशी वेडी इच्छा तूं धरूं नकोस. पण काय करूं तो अगदीं ऐकेना. त्यानें हात जोडून मला म्हटलें कीं, " दादा, तूं एकवार त्यांच्याकडे जाच. ते खात्रीनें मला दर्शन देतील. " असा त्यानें फारच आग्रह केला. तेव्हां मी आपल्याकडे आलों. यावर महाराजांची मर्जी.

माझ्या या कपटी दुःखानें हिमशीर्ष विरघळला व त्यानें गजवरोवर येऊन माझ्या काल्पनिक भावाला दर्शन देण्याचें कबूल केलें. हिमशीर्षानें माझ्याबरोबर येण्याचें तर कबूल केलेंच; पण आतां तो एकटाच कसा येईल, याची मला काळजी पडली; पण माझी ती चिंता हिमशीर्षानें स्वतःच नाहींशी केली. त्यानें साधा पोषाक केला व तो गुप्तवेषानें मजबरोबर येण्यास निघाला.

ज्या खेडेगांवांत आम्ही पांची मित्र रहात होतों, त्याच गांवांत हिमशीर्षाला संध्याकाळ पडल्यावर मी घेऊन आलों. विषकुंभानें माझ्या आजारी भावाचें सोंग फार उत्तमप्रकारें पार पाडलें. हिमशीर्ष माझ्या भावाला भेटला.

" राक्षसनाथ ! " हिमशीर्ष माझ्याकडे वळून म्हणाला, " झाली आपली इच्छा पूर्ण कीं आणखी कांहीं आहे ? "

मीं त्यापुढें साष्टांग नमस्कार घालून म्हटलें, " राजन् आपली कृपा असल्यावर आम्हां गरीबांना काय कमी ? "

पुढें थोडा वेळ हिमशीर्ष बसला व नंतर जाण्यास निघाला. मी त्यास पोंचविण्याकरितां त्याबरोबर निघालों. तें पाहून हिमशीर्ष म्हणाला, " आपण कशाला त्रास घेतां ? मी एकटा जाऊं शकेन. "

मीं मायाळूपणानें म्हटलें, " तें खरें; पण रात्र पडली आहे. एकट्या दुकट्यानें जाणें बरें नव्हे. " असें म्हणत मी त्याचा घोडा धरून चालूं लागलों. गांवाच्या बाहेर येतांच सुमारें अर्धा कोस आम्ही निर्विघ्नपणें चाललों होतों; पण एका गर्द झाडीच्या ठिकाणीं आमच्यावर तीन चार बलिष्ट चोरांनीं हल्ला केला ! "

" अरेच्या ! " विक्रमार्क मध्येंच म्हणाला, " आणि ते चोर दुसरे कोणी नसून तुझे मित्रच असले पाहिजेत. "

" खरा प्रकार तोच होता. हिमशीर्षाचें मीं खूप रक्षण केलें व त्या चोरांना पळवून लावलें. " राक्षसनाथ आपली कथा पुढें सांगूं लागला, " असें करण्यांत माझा हाच उद्देश होता कीं, हिमशीर्षाचा मजवर विश्वास बसावा आणि माझ्या या कपटनाटकाचा मी कल्पना केल्याप्रमाणेंच परिणाम झाला. "

हिमशीर्षानें माझी पुष्कळ स्तुति केली व म्हटलें, " आपला हा उपकार मी कधींहि विसरणार नाहीं. "

" राजन् ! " मीं म्हटलें, " यांत माझे गरीबाचे कसले उपकार ? आपल्या सेवेंत माझा प्राण गेला तरी मला कांहीं वाटणार नाहीं "

" तुम्ही फक्त दोघे भाऊच दिसतां ? दुसरीं कोणीं माणसें नाहींत वाटतें ? "

" सरकार ! मृत्यूनें माझ्या संसाराचें वाटोळें केलें हो ! आतां हा भाऊही चालला. " आणि मी खूप जोराजोरानें हुंदके दिले. हिमशीर्षानें माझें पुष्कळ सांतवन केलें. अखेरीस हिमशीर्षाला आनंददुर्गांत पोंचवून मी परत फिरलों. जातांना हिमशीर्षानें मला सांगितलें, " पुनः तुम्हांला केव्हांहि कसलीहि गरज लागली तर माझ्याकडे या. एखादेवेळीं येऊन आपल्या

भावाचीहि हकीकत कळवीत जा." मलाहि हेंच पाहिजे होतें. अशाप्रकारें मीं हिमशीर्षाची भेट घेतली. आठ दिवसानंतर मी अश्रु ढाळीतच पुनः हिमशीर्षाकडे गेलों व आपल्या भावाची मृत्युवार्ता कळविली. हिमशीर्षाला खरोखरीच अत्यंत वाईट वाटलें व त्यानें मला आपल्याजवळ राहण्यास सांगितलें. मोठ्या मुष्किलीनें मीं राहण्याचें कबूल केलें व अशाप्रकारें मीं आनंददुर्गांत तर प्रवेश करून घेतला! सुमारें वर्ष दीडवर्ष मीं आनंददुर्गांत अशाप्रकारें काढिलें कीं, किल्ल्यावरील सर्व माणसांना मी अत्यंत प्रिय झालों. मी लहानापासून मोठ्यापर्यंत सर्वांशीं गोड बोलावें, कोणी कांहीं काम सांगितल्यास अगदीं शीघ्र लागून त्याचें तें काम करावें, कोणी कांहीं बोलल्यास त्याचा राग मानूं नये. त्यामुळें या दीडवर्षांत मला थोडासा त्रास झाला खरा; पण त्याप्रमाणें मला फायदाहि पुष्कळ झाला. हिमशीर्षाच्या कुटुंबांतील सर्व मंडळींशीं माझा उत्तमप्रकारें परिचय झाला. हिमशीर्षाची पत्नि इंदिरा व तिचीं चारीं मुलें, माझ्यावर फार प्रेम करूं लागलीं. हिमशीर्षाचा माझ्यावर पूर्ण विश्वास बसला. हळूं हळूं आनंददुर्गांतील राज्यकारभारांत माझा हात शिरूं लागला. हिमशीर्ष भोळा होता; पण त्याची स्त्री इंदिरा चांगली चाणाक्ष होती. जरी माझ्यावर सर्वांचा विश्वास होता, तरी ती सर्व लक्ष्यपूर्वक पहात असे. अर्थात् माझ्या पुढील कपटनाटकाला हा एक मोठा अडथळा होता. त्यावेळीं मीं मनांत आणिलें असतें तर इंदिरेला अगदींच नाहींसें करून टाकलें असतें; पण ती अनुपम सुंदर होती. तिच्यावर माझें प्रेम होतें व पुढें मागें तिला आपली स्त्री करण्याचा विचार होता. याकरितां तिला कोणताहि त्रास न देतां तिचें मन अस्वस्थ होईल, अशी कांहीं तजवीज करण्याचें मीं योजिलें. इंदिरेला एक स्वयंप्रभा या नांवाची लहान मुलगी होती तिला मीं नाहींसें केलें."

"काय तिला मारून टाकलेंस?" विक्रमार्कानें घाबरून विचारिलें.

"माझ्या मनांत तेंच होतें; पण ज्याकडे मीं तें काम सोंपविलें होतें, त्यानें तिला न मारतां, तिचें पालन केलें, असें मला मागून समजलें."

"सध्यां ती मुलगी कुठें आहे?" विक्रमार्कानें मोठ्या उत्सुकतेनें विचारिलें.

"तें मला माहित नाहीं." राक्षसनाथ पुढें म्हणाला, "माझी

ही युक्ति सफळ झाली. इंदिरा आपल्या मुलींच्या दुःखांत मग्न झाली. तिचें माझ्याकडे लक्ष्य कमी झालें. मला हळूहळू आपलें हातपाय पसरण्यास संधि मिळाली व मी याचवेळीं आपल्या चारी मित्रांना आनंददुर्गांत मोठ्या हुद्यांवर बोलावून घेतलें. आमचा सर्वांचा जम बसत चालला. दुर्गावरील सर्व कारभार माझ्या हातांत आला होता. एके दिवशीं संधि साधून आम्हीं हिमशीर्षास नाहींसें केलें !"

" काय ? ठार मारून टाकलें ? " विक्रमार्कानें क्रोधानें विचारिलें.

" यांत काय संशय ? " राक्षसनाथ पुढें म्हणाला, " इंदिरा व तिचीं तिन्हीं मुलें—कारण चवथ्या मुलीला मीं नाहींसें केलेंच होतें—यांना माझ्या मदतीशिवाय गत्यंतर नव्हतें व मीहि त्यांना हिमशीर्षाच्या मृत्यूनंतर कांहीं दिवस फारच उत्तम तऱ्हेनें वागविलें. त्यामुळें त्यांच्या सर्व दुःखाला वास्तविक कारण मी असतां माझा संशय कुणालाहि आला नाहीं. आनंददुर्गाचा सर्व कारभार मी पाहूं लागलों. मी आपल्या तर्फेचे लोक भरण्यास सुरवात केली व हिमशीर्षाचे पूर्वीचे विश्वासू नोकर अगदीं काढून टाकले. पण अद्यापीहि मी निष्कंटक नव्हतों. हिमशीर्षाचीं तिन्हीं मुलें—हे सर्व मुलगेच होते—मोठीं झाल्यावर माझ्या छातीवर बसतील, असें मला वाटूं लागलें, म्हणून त्या तिघां भावांत आपसांत तंटे लागतील अशी मीं तजवीज केली. वडील मुलगा कृष्णसेन हा बिचारा आपल्या बापप्रमाणेंच भोळा होता. त्याला मी खासा वेडा करण्याचें योजिलें व त्या कामावर मीं विक्रुंभ व शेखोदर यांना नेमलें. त्यांनीं त्याला नानाप्रकारचे मादक पदार्थ खायला घालून—नशा चढल्यावर त्यास भीति दाखवावी, त्यास नामर्द म्हणून हिणवावें, अशाप्रकारें त्याचें सत्व कमी करून टाकलें व कृष्णसेन अर्धवट वेडा झाला. मला तेवढेंच कारण बस्स झालें. ' दुर्गांतील मंडळींना तुझ्यापासून त्रास होतो ' असें त्यास सांगून त्याला आनंददुर्गाबाहेर काढिलें व हाकलून दिलें. "

" अरेरे नीचा ! " विक्रमार्क दुःखानें म्हणाला, " सध्यां तो कुठें आहे ? "

" मीं जरी त्यास काढून लावलें तरी त्या पोराचें नशीब मोठें बलवत्तर. " राक्षसनाथ बोलला, " एका सावकारास तो भटकत

फिरस्त्यांना सांपडला व त्या सावकारानें त्याचें पालन पोषण केलें. सध्यां तो अजसेन या नांवानें उज्जयिनींत राहतो आहे."

"काय म्हणतां ?" विक्रमार्कानें आश्चर्यानें विचारिलें.

"होय. आणि जर का तुमचा आश्रय त्याला न मिळतां तर एव्हांना त्यास आम्हीं युक्तीनें निजविला असता. कारण विषकुंभ व शैलोदर त्याचकरितां उज्जयिनींत येऊन राहिले होते; पण तुम्ही आपल्या पंखा-खालीं त्यास घेतल्यामुळें तो वांचला. असो. आतां इंदिरा व तिचे दोघे पुत्र हेच कायदे आनंददुर्गाचे वारस असे राहिले. त्यापैकीं इंदि-रेला तर मीं आपली बायको करण्याचें योजिलें होतें. राहिले दोघे तिचे पुत्र. त्यापैकीं चंद्रपालसिंह हा चैनीखोर व शौकी होता. त्यास मीं विलासी बनविलें व तो सदा विलासांत दंग असे. तो या बाबतींत कांहींच बोलत नसे तेव्हां त्यासंबंधानें विशेष काळजी नव्हती."

"चंद्रपालसिंह सध्यां कुठें आहे ?" विक्रमार्कानें विचारिलें.

"वा ! तो तर तुमचा मोठा दोस्त आहे. त्यानेंच तर पहिल्यांदा आपल्याला माझ्या तडाख्यांतून वांचविलें."

"कोण विमलचंद्र कीं काय ?" विक्रमार्कानें आश्चर्यानें विचारिलें.

"तोच" राक्षसनाथ पुढें म्हणाला, "त्यानें तर राज्यकारभाराच्या गोष्टी आपल्याला नकोत असें स्पष्ट सांगितलें. राहिला हा बालसिंह आणि हाच माझ्या अखेरपर्यंत आडवेरी राहिला व आतां हाच आनंददुर्गाचा मालक होणार ! परंतु याला हि कैदेंत घालून मीं चिरडण्याचा निश्चय केला मीं त्यास कैदेंत घातलें. अशाप्रकारें सर्वांची विल्हेवाट लागल्या-वर मी इंदिरेच्या पाठीमागें लागलों; पण ती महा वस्ताद. तिची एक मायाराणी नांवाची वृद्ध दासी होती. तिच्या सहाय्यानें तिनें या दुर्गांतून एका गुप्त मार्गानें पलायन केलें; पण त्यावेळीं माझ्या लक्ष्यांत ही गोष्ट आली नाहीं."

"नंतर इंदिराबाई कोठें गेल्या बरें ?" विक्रमार्कानें विचारिलें.

"दुर्गांतुन पळून गेल्यावर ती कांहीं दिवस इथून थोड्याच अंतरावर एक जुनाट वाडा आहे, त्यांत रहात असावी, अशी माझी कल्पना आहे; पण मग पुढें तिचें काय झालें तें समजलें नाहीं. ती जिवंत आहे, येवढें मीं ऐकिलें होतें."

" एकंदरींत अशाप्रकारें आपण आनंददुर्गाचे मालक झालांत ! " विक्रमार्कानें तिरस्कारानें म्हटलें, " बरें माझ्यावर आपला कां दांत होता बरें ? "

" तेंही लवकरच कळेल. " राक्षसनाथ पुढें म्हणाला, " जेव्हां इंदिरेची आशा नष्ट झाली, तेव्हां मी एखादी नवीन तरुण स्त्री मिळविण्याच्या खटपटीस लागलों. त्याप्रमाणें मीं पुष्कळ तरुणी पकडून आणिल्या व भ्रष्ट केल्या; पण माझ्या मनास एकही आली नाहीं त्यांत एक कुब्जा नांवाची होती. ती कांहीं दिवस माझ्या उपयोगीं पडली पण ती तरुण नव्हती. अकस्मात् माझ्या मनांत लग्न करण्याची कल्पना आली. पण मी कुरूप, मला मुलगी कोण देणार ? अखेरीस मला एक युक्ति सुचली. चंद्रपालसिंहाचें लग्न करावें व त्याची बायको आपण घ्यावी. '

" चंद्रपालसिंह ऊर्फ विमलचंद्र असल्या नीच गोष्टीला कबूल झाले ? " विक्रमार्कानें उद्वेगानें विचारिलें.

" मीं आपला उद्देश त्यास थोडाच सांगितला ? मीं त्यास त्याचें लग्न करण्याचें माझ्या मनांत असल्याचें सांगितलें. चंद्रपालसिंह या गोष्टीला कबूल झाला व मीं त्यास घेऊन कोठेतरी दूर देशीं जाऊन एखादी फक्कड पोरगी उपटून आणावयाचा विचार केला व मी निघालों. फिरतां फिरतां आम्ही अयोध्येकडे गेलों. तेथें मला पाहिजे होती तशी एक सुस्वरूप मुलगी मिळाली. त्या मुलीला एक भाऊ व आई एवढीच कायती नातलग मंडळी होती. त्या मुलीचें नांव कमलिनी. "

" काय म्हणतां ? कमलिनी ? " विक्रमार्कानें आश्चर्यानें विचारिलें, " महाराजा दर्पचंद्राजवळ जी रहात असे ती की काय ? "

" तीच. तिचा भाऊ अव्वल नंबरचा जुगारी होता. त्याला मीं यथास्थित द्रव्य दिलें व कमलिनीचा चंद्रपालसिंहाशीं विवाह झाला. "

" मग कमलिनी *विधवा नव्हती तर ? " विक्रमार्कानें आश्चर्यानें विचारिलें, " पण ती वसंतदुर्गांत कशी आली बरें ? "

---

* येथें वाचकांनीं ही गोष्ट पक्की लक्ष्यांत ठेवावी कीं, कमलिनीचा पूर्वीचा हा वृत्तांत विक्रमार्कास मुळींच माहित नव्हता. कुमुदिनीनें इंदुमतीच्या कानीं पानीं पडून ( आपल्या पतीची अब्रू जाऊं नये म्हणून कमलिनीला एकांतांत गुप्तच ठेविली होती.

राक्षसनाथ ह्मणाला, " मजा अशी झाली कीं, लग्न झाल्यानंतर मी चंद्रपालसिंह व कमलिनीला नावेंत घालून शरयू पार करीत असतां, ज्या नावेंत कमलिनी बसली होती ती नाव बुडाली. त्याच वेळीं वसंतदुर्गेश धर्मचंद्र तिकडे यात्रा करण्याकरितां आला होता. त्याला बुडालेली कमलिनी सांपडली. "

" त्याचमुळें आपलें व धर्मचंद्र महाराजाचें वैर पडलेंसें दिसतें. "

" यांत काय संशय. ती आपल्या हातीं यावी ह्मणून मीं पुष्कळ खटपट केली; पण कांहीं केल्या ती हातीं येण्याचें चिन्ह दिसेना. त्याकरितां चंद्रपालसिंहाला विमलचंद्र या नांवाखालीं वसंतदुर्गावर मींच पाठविलें; पण त्याचा परिणाम भलताच झाला. चंद्रपालसिंह धर्मचंद्राची पोरगी कुमुदिनी हिच्या प्रेमपाशांत सांपडला. धर्मचंद्रानें त्याबद्दल विमलचंद्रास कैदेंत घातलें. तेथून तो कांहीं मंत्र साधुन सुटला असें मीं ऐकलें होतें; पण त्यानंतर तो माझ्याकडे आला नाहीं. "

" इतकीं पापें आपण केलींत, पण त्याचें आपणास कांहींच वाटलें नाहीं? " विक्रमार्कानें आश्चर्यानें विचारिलें, " आपल्याला ईश्वराची आठवण कधींही झाली नाहीं? "

" एः ईश्वर? " राक्षसनाथ तिरस्कारानें ह्मणाला, " ईश्वर कोण वस्तु आहे? "

" अरेरे! तुमचें अंतःकरण इतकें कठोर आहे अँ? कीं ईश्वराविषयींही आपल्या मनांत ना प्रेम ना भीति! "

" जे भीति बाळगतात — " राक्षसनाथ मध्येंच ह्मणाला, " अथवा जे भक्ति करतात, त्यांना ईश्वर कितीसा विचारतो? इंदिरेची ईश्वरावर किती तरी भक्ति होती; पण तिचें वाटोळेंच झालें कीं नाहीं? मीं इतकीं कुकर्में केलीं, त्यांचें प्रायश्चित्त मला काय मिळालें? "

" पण आतां फळें भोगण्याचा प्रसंग अगदीं जवळ आहे. " विक्रमार्क मध्येंच म्हणाला, " बरें तें असो. तुमची कथा पुढें चालूं द्या. "

" माझी कथा आतां बहुतेक संपत आली आहे. " राक्षसनाथ आपली पापाची कहाणी पुढें सांगूं लागला, " धर्मचंद्राची मुलगी मोठी सुंदर आहे, अशी मीं तिची ख्याति ऐकली व तिलाच आपली राणी करावी, असें मला वाटूं लागलें. त्याप्रमाणें मीं धर्मचंद्रास कळविलें; पण

तो माझी मागणी कसची पतकरतो! याच सुमारास आपण वसंतदुर्गाकडे जाण्यास निघाला होता. धर्मचंद्राच्या मुलीला माझ्या मनांत बळजबरीनें उपटायचें होतें. तुह्मी वसंतदुर्गावर गेल्यास कदाचित् तुमच्याशीं तिचा विवाह होईल अशी मला भीति पडली, ह्मणून हलाहलाच्या सल्ल्यानें मीं आपणास मारण्याचा बेत केला. पण तो फसला. पुढें काय काय झालें, तें आपणास माहित आहेच."

"बरें" विक्रमार्कानें हलकेंच विचारिलें, "इंदिराबाईची ती मुलगी कुठें आहे हें तुम्हाला खरेंच का माहीत नाहीं?"

राक्षसनाथ हंसला. त्याच्या हंसण्यावरून तो तिची हकीगत जाणत असावा असें विक्रमार्कास वाटलें, म्हणून त्यानें पुनः तोच प्रश्न केला.

राक्षसनाथानें निष्काळजीपणें म्हटलें, "मी कदाचित् तें सांगेन; पण माझी सुटका करण्याचें वचन द्या."

"तें मुळींच शक्य नाहीं."

"मग मीहि ती हकीगत सांगत नाहीं."

"विक्रमार्क!" हलाहल अगदीं प्रथमच विक्रमार्कास उद्देशून ह्मणाला, "मी तुला त्या मुलीची हकीगत सांगतों. ती सध्यां—"

"कुठें आहे?" बालसिंहानें उत्सुकतेनें प्रश्न केला.

"खरेंच. ती कुठें आहे बरें? सुखांत आहे कीं, दुःखांत?"

"ती अत्यंत सुखांत आहे. ती एका राजाची राणी आहे." हलाहल पुढें म्हणाला, "तिचें दैव खरोखरच फार चांगलें आहे."

"पण ती आहे कुठें?"

"राजन्!" हलाहल किंचित् हंसून म्हणाला, "ती आपलीच पत्नी आहे."

"काय म्हणतां?" बालसिंह आश्चर्यानें डोळे फाडून म्हणाला.

"खरें कीं काय?" विक्रमार्कानें अत्यंत विस्मयानें म्हटलें.

"मोठेंच आश्चर्य!" मित्रगुप्त स्तिमित होऊन उद्गारला.

"बालसिंह!" विक्रमार्क उठत ह्मणाला.

"विक्रमार्क!" बालसिंह पुढें होत बोलला.

आणि दोघेहि मेहुणे परस्परांस प्रेमानें भेटले.

"आपली माता कुठें आहे बरें?" विक्रमार्कानें प्रश्न केला.

" उज्जयिनीजवळ क्षिप्रेच्या कांठीं झोंपड्यांत रहात आहे. "

" खरेंच. एका सिंहवाहिनी तपस्विनीची हकीगत मीं ऐकली होती. ती तर नसेल ? " विक्रमार्कानें आश्चर्य करीत म्हटलें.

" सर्वांना हें समजल्यास किती आनंद होईल ? " मित्रगुप्त आपले आनंदाश्रु पुसून म्हणाला, " आतां आपणास ताबडतोब उज्जयिनीला गेलें पाहिजे. "

" अलबत ! " विक्रमार्कानें अनुमोदन दिलें.

" पण या दुष्टाला दंड दिल्याखेरीज ? " बालसिंहानें उद्वेगानें विचारिलें.

" तें आतां तुम्हीच पहा ! तो तुमचा अपराधी आहे; पण एक विनंती आहे. हलाहलाला जर प्राणदान दिलें, तर काय हरकत आहे बरें ? " विक्रमार्कानें हलाहलाकडे दयायुक्त नजरेनें पहात म्हटलें.

" नको राजन् ! " हलाहल मध्येंच नम्रपणें म्हणाला, " झालीं एवढीं पापें पुष्कळ झालीं ! आतां जगण्याचा मला अगदीं वीट आला आहे. "

" छे छे, हलाहल ! " विक्रमार्क त्यास म्हणाला, " अद्यापीहि राहिलेलें आयुष्य तुम्ही सत्कार्यांत घालवूं शकाल. "

" मग मलाहि अशी सवलत कां देत नाहीं ? " राक्षसनाथानें आशेनें प्रश्न केला.

" मला तुमचा भरंवसा नाहीं वाटत ! " विक्रमार्कानें खोंचून म्हटलें.

" ही गोष्ट अक्षरशः खरी आहे. " मित्रगुप्त मध्येंच म्हणाला.

" राक्षसनाथ ! " बालसिंह त्वेषानें म्हणाला, " हलाहलाची व तुझी स्थिति अगदीं भिन्न आहे. हलाहलाला मीहि क्षमा करतों; पण तुला—छे—मुळींच शक्य नाहीं ! ज्याप्रमाणें माझ्या सर्व कुटुंबाला तूं छळलेंस त्याप्रमाणें मी तुला छळीन. यमसुद्धां पाप्यांना इतक्या कठोर यातना देत नसेल, इतक्या कठोर—प्राणांतिक यातना मी तुला देईन ! ज्या ज्या गोष्टींनें तुला त्रिभुवन आठवेल, अशा गोष्टी मी अवश्य करीन. मी क्षत्रिय आहें खरा, व क्षत्रियाचा धर्म शरण आलेल्याचें रक्षण करावयाचें हा आहे खरा; पण तुझ्या बाबतींत मी क्षत्रिय नाहीं असें समज ! ", नंतर तो विक्रमार्काकडे वळून म्हणाला, " आणि या गोष्टीला कोणीही आड येतां उपयोगी नाहीं. "

" तुम्ही जाणें व तो तुमचा राक्षसनाथ जाणे; पण मला वाटतें, याला आपण प्रथम उज्जयिनींत नेऊं. " विक्रमार्क म्हणाला

" माझ्याहि मनांत तेंच आहे. माझ्या आई-बापाच्या समोर याला दंड दिला पाहिजे. "

लागलींच त्याच वेळीं राक्षसनाथ, हलाहलासह सर्व मंडळी उज्ज-यिनीकडे येण्यास निघाली.

---

## प्रकरण अठ्ठेचाळिसावें.

## दीपनिर्वाण.

वैतरणी नदीच्या पलीकडे स्वर्ग आहे, हें ऐकतांच विमलचंद्रास मोठा आनंद झाला व त्यानें स्वर्गांत पाहाचण्याच्या उद्देशानें त्या नदींत उडी घेतली. पण पाण्यांत पडतांच त्यास बेशुद्धि आली व बराच वेळ त्यास पुढें काय घडलें हें मुळींच समजलें नाहीं. पण ज्यावेळीं त्यानें शुद्धीवर येऊन डोळे उघडले, त्यावेळीं त्यास आपण आपल्या वाड्यांतील महालांत आहोंत असें वाटलें. आणि ती गोष्ट अक्षरशः खरी होती. विमलचंद्र आपल्या महालांतील पलंगावर पडला होता. आसपास कांहीं नोकर मंडळी उभी होती. विमलचंद्रानें डोळे उघडलेले पाहतांच सर्वांत मोठी चळवळ उडाली. एका दासीनें जवळ येऊन विमलचंद्रास विचारिलें, " महाराजांची प्रकृति आतां ठीक दिसते. "

विमलचंद्राचें मन कांहीं ठिकाणावर नव्हतें. त्यास सभोंवतीं चाल-लेला सर्व प्रकार दिसत होता; पण त्यास त्याचा उलगडा पडेना. त्यास एक वेळ वाटे, आपण आपल्या महालांत आहोंत; पुनः एकवेळ वाटे, आपण यमलोकांत गेलों होतों, तेथील एखाद्या घरांत आहोंत. त्यास स्वतःचीं चाकरमाणसें ओळखूं आलीं नाहींत. त्यास ते यमदूतच भासले. विमलचंद्रानें पुनः आपले नेत्र झांकले. किती वेळ तरी त्याचें मन चमत्कारिक विचारांनीं गोंधळून गेलें होतें. स्वतःच्या मनांत तो

आश्चर्यानें म्हणाला, " मी स्वर्गांत आहें, की नरकांत आहें की यमलोकांत ? पण मी आतां पाहतों तर मला हा आपलाच महाल वाटतो ! मग मला इथें कुणीं आणिलें ? हो ! हो ! स्वर्गांत जाण्याकरितां मीं त्या नदीन-त्या नदीचें नांव काय बरें ?- त्या यमदूतानें कांहींसें सांगितलें होतें ? छे, विसरलों ! पण मी कुठें गेलों होतों बरें ? मी यमलोकांत गेलों होतों नाहीं ? पण मी तिथें गेलों कसा ? गेलों होतों खास-मग ते चार दूत अचेतनाला घेऊन चाललेले मला आढळले. काय विचित्र देश तो ! म्हणे यमलोक ! हो, यमाच्या दरबारांतहि मी गेलों होतों. तेथें विषकुंभ व शैलोदर यांचा निकाल झाला. बिचाऱ्यांस किती कडक शिक्षा दिल्या पण ? मला तेथें माझे बाबहि भेटले होते ! हो, ते तेच होते. त्यांनीं मला काय सांगितलें बरें ? कांहीं आठवत नाहीं ! मीं पापें फार केलीं, असेंच ते म्हणत होते ! हो. खरेंच मीं फार पापें केलीं, नाहीं ? होय, तो पहा मोहन मला माझ्या डोळ्यापुढें दिसतो आहे ! मींच त्याला मारिलें, नाहीं ? हो-मींच मारलें. माझ्या मुलाला-पोटच्या मुलाला मीं मारलें ! आतां मीं कुमुदिनीला काय सांगूं बरें ? ती रडून रडून गोंधळ करील. ती आतां वांचणार नाहीं ! छे, ती नाहीं वांचणार. पण मीं तिच्याशीं विश्वासघात केला, नाहीं ? मी महादुष्ट आहें. कमलिनी-खरेंच-ती कुठें गेली बरें ? तिला मीं फसविलें; पण मीं तिचा पुनः तपास केला नाहीं. हें कोण रडतय् बरें ? " इत्यादि चमत्कारिक, असंबद्ध विचार एकामागून एक विमलचंद्राच्या मनांत येत होते व जात होते. पुनः त्यानें आपले नेत्र उघडले. तो उठून बसता झाला. समोरच त्यास एक दासी उभी असलेली दिसली. त्यानें तिला आपल्या जवळ बोलाविलें व विचारिलें, ' मी कुठें आहें बरें ? "

दासीला त्या प्रश्नानें मोठा अचंबा वाटला. तिनें आश्चर्यानें म्हटलें, " महाराजांनीं मला ओळखलें नाहीं कां ? "

विमलचंद्रानें बराच वेळ तिच्याकडे निरखून पाहिलें व म्हटलें, ' हो. खरेंच तूं ती दासी आहेस नाहीं कां ? "

" महाराजांना कांहीं विचित्र स्वप्न पडलेलें दिसतें ? " दासीनें विचारिलें.

" मोठेंच विचित्र स्वप्न ! " विमलचंद्र हंसत ह्मणाला, " मी नुकताच यमलोकांत गेलों होतों ! "

" काय ह्मटलें ? " दासीनें आश्चर्यानें डोळे फाडून विचारिलें.

" ओहो ! काय विचित्र स्वप्न तरी ? मीं क्षिप्रेंत जाऊन उडी काय टाकली ! पाण्यांत गेल्यावर मी यमलोकांतच जाऊन पोहोंचलों. मोठेंच विचित्र स्वप्न नव्हे कां ! "

विमलचंद्र हंसून ह्मणाला. तो दासीलाच उद्देशून हें बोलला अशांतली गोष्ट नव्हती. त्यानें यमलोकाचा जो कांहीं चमत्कार पाहिला. तो त्याला आतां एक विचित्र स्वप्न वाटूं लागलें. इतक्यांत त्यास रुदनस्वर ऐकूं आला. त्यास आश्चर्य वाटलें व त्यानें त्या दासीला विचारिलें, " काय ग ? हें कोण रडतय् ? "

" महाराज ! " दासीनें दुःखित स्वरांत म्हटलें, " बाईसाहेब अत्यंत आजारी आहेत. कुमार मोहनाचें दुःख त्यांना असह्य झालें आहे ! "

दासीचें हें बोलणें ऐकतांच विमलचंद्र खाडदिशीं शुद्धीवर आला. लागलींच त्याचें मन पूर्ण ठिकाणावर आलें व त्यास एकेक गोष्ट स्पष्ट-पणें आठवूं लागली. कुमुदिनीचें दुःख त्याच्यानें न पाहवल्यामुळें त्याच्या मनांत आत्महत्या करण्याचें घोळूं लागलें होतें. व तशा प्रकारचे विचार करतां करतां त्याचा डोळा लागला होता. त्याच वेळांत त्यास मागें वर्णन केलेलें यमलोकीं गेल्याचें विचित्र स्वप्न पडलें. आतां त्यास सर्व आठवलें.

" आतां तिची प्रकृती कशी आहे ? " विमलचंद्रानें पलंगावरून खालीं उतरत विचारिलें.

" महाराजांनींच तिकडे चलावें ! " दासीनें वाट दाखवीत ह्मटलें.

" काय ग ? तिची प्रकृति खरीच का फार अस्वस्थ आहे ? " विमलचंद्रानें आशेनें विचारिलें, " ती यांतून बरी होईल कीं नाहीं ? "

" महाराज ! ईश्वर करो आणि त्या लवकरच ब-या होवोत. " असें ह्मणत दाई पुढें झाली. लवकरच विमलचंद्र कुमुदिनीच्या महालांत पोंचला.

कुमुदिनी एका पलंगावर पडली होती. जवळच इंदुमती व राणी प्रभावती दुःखित मुद्रेनें बसल्या होत्या. एकदोन दासीहि तेथेंच कांहीं

औषधपाणी उगाळीत बसल्या होत्या. कुमुदिनी अगदीं खंगलेली दिसत होती. तिच्या कोमल मनाला पुत्रशोकाचा विलक्षण धक्का बसला होता. ती त्या दुखण्यांतून वांचेल याची कोणासच आशा नव्हती.

विमलचंद्र आंत येतांच इंदुमती व प्रभावती बाजूला झाल्या. विमलचंद्र आपल्या पत्नीच्या पलंगाजवळ आला.

" प्राणनाथ ! " कुमुदिनी अगदीं सूक्ष्म स्वरांत त्यास उद्देशून ह्मणाली, " अखेरीस त्याचा शोध नाहींना लागला ? त्याला माझ्या कुशींतून कोंहो कोणी दुष्टानें काढून नेला ! माझा बाळ ! " कुमुदिनीच्या फिक्कट गालांवरून अश्रू वाहूं लागले.

विमलचंद्राचें हृदय विदारण झालें ! त्यानें आपल्या हातानेंच आपल्या पुत्राला ठार केलें होतें. हाय ! कुमुदिनी ! तुला जर ही गोष्ट कळली तर तुझी काय अवस्था होईल बरें ?

" कुमुद ! कुमुद ! ! " विमलचंद्र अत्यंत केविलवाण्या स्वरांत ह्मणाला, " झाल्या गेल्या गोष्टीचें आतां कितीहि दुःख केलें, तरी काय फायदा बरें ? "

" तें मला समजतं हो; पण काय करूं ? राहवत नाहीं ! " असें ह्मणत कुमुदिनीनें आपले अश्रू पुसले.

" कुमुद ! " विमलचंद्र आपल्या कपाळावर हात मारून ह्मणाला, " मी खरोखरच फार पापी आहें. "

" छे छे, प्राणनाथ ! " कुमुदिनी त्याचा हात धरून ह्मणाली, " आपण असं दुःख करूं नका गडे ! माझ्याच्यानें तें नाहीं पाहवत. "

इतक्यांत इंदुमती किंचित् पुढें आली व तिनें हळूंच कुमुदिनीस ह्मटलें, " कुमुदिनीबाई ! आतां संध्याकाळ होत आली. आतां मी जातें. उद्यां पुनः येईन. "

कुमुदिनीनें हातानेंच ' बरं ' ह्मणून ह्मटलें. राणी प्रभावतीनें त्याच वेळीं निरोप घेतला. इंदुमती व प्रभावती आपआपल्या घरीं गेल्या.

कुमुदिनी दयाळु स्वभावाची स्त्री होती. ती अत्यवस्थ आजारी असल्याचें समजतांच उज्जयिनींतील सर्व मोठमोठ्या घराण्यांतील स्त्रिया तिला भेटण्याकरितां आल्या व येत. इंदुमती व प्रभावती रोज तिच्याकडे येऊन कांहीं वेळ बसून जात. पण सर्वांची एकत्र खात्री

" मोठेंच विचित्र स्वप्न ! " विमलचंद्र हंसत ह्मणाला, " मी नुकताच यमलोकांत गेलों होतों ! "

" काय ह्मटलें ? " दासीनें आश्चर्यानें डोळे फाडून विचारिलें.

" ओहो ! काय विचित्र स्वप्न तरी ? मीं क्षिप्रेंत जाऊन उडी काय टाकली ! पाण्यांत गेल्यावर मी यमलोकांनच जाऊन पोहोंचलों. मोठेंच विचित्र स्वप्न बरें कां ! "

विमलचंद्र हंसून ह्मणाला. तो दासीलाच उद्देशून हें बोलला अशांतली गोष्ट नव्हती. त्यानें यमलोकाचा जो कांहीं चमत्कार पाहिला. तो त्याला आतां एक विचित्र स्वप्न वाटूं लागलें. इतक्यांत त्यास रुदनस्वर ऐकूं आला. त्यास आश्चर्य वाटलें व त्यानें त्या दासीला विचारिलें, " काय ग ? हें कोण रडतय् ? "

" महाराज ! " दासीनें दुःखित स्वरांत म्हटलें, " बाईसाहेब अत्यंत आजारी आहेत. कुमार मोहनाचें दुःख त्यांना असह्य झालें आहे ! "

दासीचें हें बोलणें ऐकतांच विमलचंद्र खाडदिशीं शुद्धीवर आला. लागलींच त्याचें मन पूर्ण ठिकाणावर आलें व त्यास एकेक गोष्ट स्पष्टपणें आठवूं लागली. कुमुदिनीचें दुःख त्याच्यानें न पाहवल्यामुळें त्याच्या मनांत आत्महत्या करण्याचें घोळूं लागलें होतें. व तशा प्रकारचे विचार करतां करतां त्याचा डोळा लागला होता. त्याच वेळांत त्यास मागें वर्णन केलेलें यमलोकीं गेल्याचें विचित्र स्वप्न पडलें. आतां त्यास सर्व आठवलें.

" आतां तिची प्रकृती कशी आहे ? " विमलचंद्रानें पलंगावरून खालीं उतरत विचारिलें.

" महाराजांनींच तिकडे चलावें ! " दासीनें वाट दाखवीत ह्मटलें.

" काय ग ? तिची प्रकृति खरोखरीच फार अस्वस्थ आहे ? " विमलचंद्रानें आशेनें विचारिलें, " ती यांतून बरी होईल कीं नाहीं ? "

" महाराज ! ईश्वर करो आणि त्या लवकरच बऱ्या होवोत. " असें ह्मणत दाई पुढें झाली. लवकरच विमलचंद्र कुमुदिनीच्या महालांत पोंचला.

कुमुदिनी एका पलंगावर पडली होती. जवळच इंदुमती व राणी प्रभावती दुःखित मुद्रेनें बसल्या होत्या. एकदोन दासीहि तेथेंच कांहीं

औषधपाणी उशाळीत बसल्या होत्या. कुमुदिनी अगदीं खंगलेली दिसत होती. तिच्या कोमल मनाला पुत्रशोकाचा विलक्षण धक्का बसला होता. ती त्या दुखण्यांतून वांचेल याची कोणासच आशा नव्हती.

विमलचंद्र आंत येतांच इंदुमती व प्रभावती बाजूला झाल्या. विमलचंद्र आपल्या पत्नीच्या पलंगाजवळ आला.

" प्राणनाथ ! " कुमुदिनी अगदीं सूक्ष्म स्वरांत त्यास उद्देशून ह्मणाली, " अखेरीस त्याचा शोध नाहींना लागला ? त्याला माझ्या कुशींतून कोंहो कोणी दुष्टानें काढून नेला ! माझा बाळ ! " कुमुदिनीच्या फिक्कट गालांवरून अश्रू वाहूं लागले.

विमलचंद्राचें हृदय विदारण झालें ! त्यानें आपल्या हातानेंच आपल्या पुत्राला ठार केलें होतें. हाय ! कुमुदिनी ! तुला जर ही गोष्ट कळली तर तुझी काय अवस्था होईल बरें ?

" कुमुद ! कुमुद ! ! " विमलचंद्र अत्यंत केविलवाण्या स्वरांत ह्मणाला, " झालया गेल्या गोष्टीचें आतां कितीहि दुःख केलें, तरी काय फायदा बरें ? "

" तें मला समजतं हो; पण काय करूं ? राहवत नाहीं ! " असें ह्मणत कुमुदिनीनें आपले अश्रू पुसले.

" कुमुद ! " विमलचंद्र आपल्या कपाळावर हात मारून ह्मणाला, " मी खरोखरच फार पापी आहें. "

" छे छे, प्राणनाथ ! " कुमुदिनी त्याचा हात धरून ह्मणाली, " आपण असं दुःख करूं नका गडे ! माझ्याच्यानें तें नाहीं पाहवत. "

इतक्यांत इंदुमती किंचित् पुढें आली व तिनें हलकेंच कुमुदिनीस ह्मटलें, " कुमुदिनीबाई ! आतां संध्याकाळ होत आली. आतां मी जात्यें. उद्यां पुनः येईन. "

कुमुदिनीनें हातानेंच ' बरं ' ह्मणून ह्मटलें. राणी प्रभावतीनें त्याच वेळीं निरोप घेतला. इंदुमती व प्रभावती आपआपल्या घरीं गेल्या.

कुमुदिनी दयाळु स्वभावाची स्त्री होती. ती अत्यवस्थ आजारी असल्याचें समजतांच उज्जयिनींतील सर्व मोठमोठ्या घराण्यांतील स्त्रिया तिला भेटण्याकरितां आल्या व येत. इंदुमती व प्रभावती रोज तिच्याकडे येऊन कांहीं वेळ बसून जात. पण सर्वांची एकत्र खात्री

होऊन चुकली होती कीं, कुमुदिनी आतां फार थोड्या दिवसांची सोबतीण आहे. आणि ही गोष्ट कांहीं खोटी नव्हती. दिवसेंदिवस कुमुदिनीचा शक्तिपात होत चालला होता. तिचें सौंदर्य नाहींसें होत चाललें होतें एखाद्या तोडलेल्या गुलाबाच्या कळीचें सौंदर्य जसें दिवसेंदिवस कमी होत जाऊन ती सुकून जाते, त्याचप्रमाणें कुमुदिनीची अवस्था झाली. तिची प्राणज्योत निर्वाण होण्याचा काळ अत्यंत जवळ येत चालला.

आज अमावास्या! कुमुदिनीचा पुत्र नाहींसा होऊन आज बरोबर महिना झाला. मोहनाचा कांहीं शोध लागला नाहीं व कुमुदिनीहि वांचण्याची आशा दिसेना. सूर्य मावळण्याच्या बेतांत होता व सृष्टिसुंदरीस गाढ अंधकारांत फेंकण्याचा विचार त्यानें केला होता. कुमुदिनीहि आज दिव्य लोकीं गमन करून विमलचंद्रास दुःखाच्या घोर अंधःकारांत फेंकणार होती. इंदुमती व प्रभावती दोघीहि नेहमीप्रमाणें कांहीं वेळ बसून निघून गेल्या. त्यांना माहीत काय कीं, आपल्या मैत्रिणीच्या आयुष्यांतील हा अखेरचा दिवस आहे. त्या आपल्या घरीं जाऊन पोंचल्या व इकडे कुमुदिनीचा प्राण विशेष व्याकुळ झाला. विमलचंद्र त्यावेळीं तिच्याजवळ नव्हता. एका नोकरानें त्यास बोलावून आणिलें.

"प्राणनाथ!" ज्यावेळीं विमलचंद्र कुमुदिनीजवळ येऊन बसला, त्यावेळीं तिनें त्याचा हात आपल्या हातांत घेऊन म्हटलें, "माझी वेळ जवळ येत चालली!"

विमलचंद्रास ती गोष्ट स्पष्ट समजून चुकली होती.

"प्राणनाथ!" कुमुदिनी पुढें म्हणाली "मरतेवेळीं मी जर आपणाला एखादी विनंती केली तर ती आपण अमान्य करणार नाहीं ना?"

विमलचंद्रास आश्चर्य वाटलें. त्यानें म्हटलें, "कसली विनंती?"

"प्राणनाथ! मी आपणास सांगूं नये; पण--पण प्राणनाथ, मला क्षमा करा. पापमार्ग फार वाईट आहे. कमलिनीला आपण--"

"काय म्हटलेंस?" विमलचंद्रानें दचकून विचारिलें.

"कमलिनीची हकीगत मला समजली आहे--"

"तुला समजली? खरें कीं काय? मग आतां तुला तोंड

दाखविण्यांत अर्थ नाहीं." असें बोलून विमलचंद्र एकदम तेथून चालता झाला.

"प्राणनाथ! प्राण-नाथ-क्ष-मा!" कुमुदिनी अखेरचे शब्द बोलली. कुमुदिनीनें दिव्यलोकीं गमन केलें!

विमलचंद्राच्या पापपथांत सन्मार्ग दाखविणारा हाच एक काय तो दीप होता. तोही आज मावळला!

---

## प्रकरण एकुणपन्नासावें.

### अधःपतन.

विमलचंद्र आपल्या वाड्यांतून बाहेर पडला व जिकडे वाट फुटेल तिकडे जाऊं लागला. आपण काय करतों? कोठें जातों? आपली स्थिती काय आहे? इत्यादिपैकीं एकाहि गोष्टीचा विचार त्याच्या मनांत आला नाहीं. आपल्या पत्नीला आतां तोंड दाखवायचें नाहीं. आपलीं सर्व पापें तिला समजलीं आहेत, तेव्हां आतां तिच्याजवळ राहणें बरें नाहीं. असा विचार त्याच्या मनांत आला व तो आपल्या वाड्यांतून बाहेर पडला.

यावेळीं अगदीं संध्याकाळ झाली होती. ती अमावास्येची रात्र असल्यामुळें अंधःकारहि लवकरच पसरूं लागला होता. विमलचंद्र कोणीकडे तरी पहात, कांहीं तरी विचार करीत, कोणीकडे तरी चालला होता. त्याचें डोकें भ्रमण करूं लागलें होतें. अशाप्रकारें येतां येतां तो सिप्रेच्या तीरीं आला. आज अमावास्या आहे, याची त्याला आठवणच नव्हती. तो नदीकिनाऱ्यानें नदीच्या पात्राकडे पहात चालला होता.

इतक्यांत चालतां चालतां त्यास एका मनुष्यानें थांबविलें. विमलचंद्रानें वर पाहिलें तों त्यास एक साधु दृष्टीस पडला.

"कोण? चंद्रपालसिंह!" त्या मनुष्यानें विमलचंद्राकडे आश्चर्यानें पहात म्हटलें, "हो. चंद्रपालसिंहच."

पण विमलचंद्रानें त्यास ओळखलें नाहीं. त्याचें मन त्या साधूला ओळखण्याइतकें ठिकाणावर नव्हतें. तो त्या मनुष्यास बाजूला सारून ह्मणाला, " सरा–सरा–बाजूला सरा ! मी महा पापी आहें. मला शिवूं नका ! " असें ह्मणून विमलचंद्र पुढें चालूं लागला.

त्या मनुष्यास मोठें आश्चर्य वाटलेंसें दिसलें. त्यानें विमलचंद्रास हातास धरून थांबविलें व तो त्यास ह्मणाला, " चंद्रपालसिंह ! तुह्मीं मला ओळखलें नाहींत ! "

" तुह्माला ! " विमलचंद्र त्याच्याकडे विक्षिप्त नजरेनें पहात ह्मणाला, " हो, तुह्मी मला यमलोकांत भेटला होतात खरें ! "

" हें काय चंद्रपालसिंह ? " त्या मनुष्यानें आश्चर्यानें त्यास ह्मटलें, " तुह्मांला वेड तर नाहीं लागलें. "

" मी वेडाच. स्वतःच्या प्राणरक्षणाकरितां मीं स्वतःच्या मुलाला मारिलें–मी वेडाच नाहीं तर काय ? "

असें ह्मणून विमलचंद्र पुनः पुढें चालूं लागला !

" याचें डोकें बिघडलेलें दिसतें. " साधु स्वगत पुटपुटला.

" छे छे, डोकें बिघडण्यापूर्वी माझें मन बिघडलें आहे. " विमलचंद्र मध्येंच बोलला व तो जवळच्याच एका दगडावर जाऊन बसला. तो साधूहि त्याच्याजवळच जाऊन उभा राहिला.

" चंद्रपालसिंह, " तो साधु म्हणाला, " कमलिनी कुठें आहे ? "

" कमलिनी ? कमलिनी ? क–म–लि–नी ? तिला मीं फसविलें नाहीं कां ? होय. ती माझी बायको असून तिला मीं फसविलें खरेंच. " विमलचंद्र कांहीं तरी बडबडला.

त्या साधूस त्याचें हें बोलणें मोठें विचित्र भासलें. तो म्हणाला, " चंद्रपालसिंह ! माझ्याकडे नीट पहा बरें. "

विमलचंद्रानें आश्चर्यानें त्याच्याकडे न्याहळून पाहिलें. त्यास ओळख पटलीसें दिसलें. तो म्हणाला, " तुम्ही कोण बरें ? हो–तेच–तेच. "

" कोण ? " त्या साधूनें विचारिलें.

" कमलिनीचा भाऊ–गोपालसिंह. " विमलचंद्र मध्येंच म्हणाला.

" अगदीं बरोबर ओळखलेंत. " तो साधु आनंदानें म्हणाला.

तो साधु खरोखरीच कमलिनीचा भाऊ होता.

" कमलिनी कुठें आहे ? " त्यानें विचारिलें.

" मला माहीत नाहीं. "

" तुम्हाला माहीत नाहीं ? " त्यानें आश्चर्यानें म्हटलें, " चंद्रपालसिंह, तुमची अशी स्थिती कशानें झाली ? "

" अरे बाबा, " विमलचंद्र त्याच्या पाठीवर थाप मारून म्हणाला, " ही कृतकर्मांचीं फळें आहेत फळें ! " आणि तो उठून चालूं लागला.

" तुम्ही इकडे कसें आला पण ? " विमलचंद्रानें सहज विचारिलें.

" या संसाराचा मला इतका कंटाळा आला आहे-" तो साधु म्हणाला, " कीं कांहीं बोलून सोय नाहीं. म्हणूनच हीं भगवीं वस्त्रें मीं धारण केलीं आहेत. बरें तें असो. तुम्ही असे संध्याकाळचे वेळीं इकडे कुठें निघालांत ? "

" संध्याकाळ झाली कां ? " विमलचंद्रानें आश्चर्यानें चोहोंकडे पहात म्हटलें, " अंधार पडत चालला, नाहीं ? "

" तुम्ही कुठें चालला आहांत ? " कमलिनीच्या भावानें पुन्हा आश्चर्यानें विचारिलें. कारण विमलचंद्र ऊर्फ चंद्रपालसिंह खरोखरीच वेडा आहे कीं काय ? याची त्यास भ्रांत पडली. त्यानें चंद्रपालसिंहाच्या चेहेऱ्याकडे पुष्कळ वेळ सूक्ष्म नजरेनें पाहिलें; पण त्याच्या चर्येवर वेडेपणाचें चिन्ह मुळींच दिसेना. मात्र बोलण्यांत भ्रमिष्टपणा पूर्ण दिसत होता.

" तुम्ही इकडे कोणीकडे चालला आहांत ? " विमलचंद्रानें उलटपक्षीं विचारिलें.

" मी साधु झाल्यापासून असाच भटकतों आहें " साधु पुढें म्हणाला, " व पुढेंहि आयुष्य असेपर्यंत असाच भटकणार ! "

" असें काय ? बरें बोवा. असेंच भटकत रहा; पण तुम्हांला एक गोष्ट सांगतों बरें कां. " विमलचंद्र अगदीं हलकें म्हणाला, " तुम्ही पापमार्ग कधींहि धरूं नका. कसल्याहि लोभांत पडूं नका. नाहींतर फार वाईट परिणाम होईल. "

" हें मला पूर्वींच कळतें तर-" साधु दुःखानें म्हणाला, " तर मग साधूचा वेश घेण्याची पाळी कशाला आली असती बरें ? "

" म्हणजे ? " विमलचंद्र त्याकडे आश्चर्यानें पहात म्हणाला, " माझ्याप्रमाणें तुम्हींहि पापी आहांत कीं काय ? "

" अहो, या जगांत पापी माणसांचाच भरणा विशेष आहे. "

" खरें हो खरें ! " विमलचंद्र किंचित् हंसून म्हणाला, " तुम्हाला आपल्यावरून जग ओळखण्याची संवय दिसते. "

अशाप्रकारें बोलतां बोलतां ते दोघे स्मशानांत येऊन पोहोंचले.

" अहो, महाराज ! " साधूनें त्यास थांबवून म्हटलें, " आपण बोलतां बोलतां इकडे स्मशानांत आलों. तुमच्या आज मनांत काय आहे ? "

" मग तुम्ही जा तर. " विमलचंद्रानें म्हटलें.

" आणि तुम्ही ? " त्यानें आश्चर्यानें विचारिलें.

" मी—मी—आतां इथेंच राहणार. " विमलचंद्र खालीं बसत म्हणाला.

" छे छे, आज अमावास्या आहे. "

" आज अमावास्या ? " विमलचंद्रानें डोळे फाडून पहात विचारिलें.

" होय. भुताखेताची भीति आज विशेष ! "

पण आज अमावास्या आहे, हें समजतांच विमलचंद्राचा भ्रमिष्टपणा पार मावळला. त्याचे डोळे उघडले.

" अरेरे ! घात झाला ! " विमलचंद्र आपल्या छातीवर हात मारून म्हणाला, " आतां मी कसा वाचणार ! अग आईग ! आज आतां मी मरणार ! "

" अहो, पण झालें काय ? " साधूनें आश्चर्यानें विचारिलें.

पण विमलचंद्र त्यास उत्तर देण्यास थांबला नाहीं. तो ऊर्ध्वश्वासांत धांवत सुटला व थोड्याच वेळांत त्या साधूच्या दृष्टीआड झाला.

" या गृहस्थाला वेडच लागलेलें दिसतें. " असें पुटपुटत तो साधु तेथून निघून गेला.

विमलचंद्र धावत सुटला व तोंडानें " हाय ! हाय ! ! आज मी मरणार ! अगदीं खात्रीनें मरणार ! अग आई ग ! आतां मला कोण वाचविणार ! आज मी आतां कुणाला बळी देऊं ? कुठें जाऊं ? कुठें जाऊं ? " धावतां धावतां अंधेरांत त्यास ठेंच लागली व तो खालीं आपटला. त्यास बरेंच लागलें. तो पडल्या पडल्याच विवळत म्हणाला, " अग आई ग ! हाय आज मी मरणार ! आज तें भूत मला खाणार ! मी कुठें जाऊं ? काय करूं ? मध्यानरात्रीं—आज मध्यानरात्रीं तें भूत

माझ्या उरावर बसणार ! होय अगदीं खात्रीनें बसणार ! मग मला तें सोडणार नाहीं ! कुठें जाऊं ! काय करूं ? " असें म्हणत विमलचंद्र पडल्या पडल्या तळमळूं लागला. इतक्यांत त्यास जवळूनच मुलाच्या रडण्याचा आवाज ऐकूं आला. विमलचंद्र एकदम उठून उभा राहिला व त्या दिशेकडे धांवत जात म्हणाला, " मुलाचें रडणें ऐकूं येतें ! मूल—एक मूल मिळाल्यास काम होईल. "

पण तो त्यास भास झाला होता. मध्यानरात्रीचा समय जवळ येत चालला. विमलचंद्राचें हृदय धाड धाड उडूं लागलें ! ज्या स्मशानांत पूर्वी त्यानें भयंकर रात्रीं काढल्या होत्या, तेंच स्मशान आज त्यास भयानक वाटूं लागलें. तो पुनः धावत सुटला !

धावतां धावतां तो तपस्विनीच्या झोंपडीजवळ आला. झोंपडींत दीपप्रकाश दिसतांच विमलचंद्र तिकडे धावला. यावेळीं झोंपडींत बालार्क रडत होता. त्याचा आवाज ऐकतांच विमलचंद्र " मूल ! मूल !" करीत धावत झोंपडीजवळ आला व त्यानें दारावर लाथ मारिली ! याच वेळीं बरोबर मध्यान झाली होती ! विमलचंद्राच्या पाठीमागें एक कर्णकटू किंकाळी ऐकूं आली.

" वांचवा ! मला वांचवा ! ! " असें म्हणत विमलचंद्र झोंपडींत शिरला. झोंपडींत तपस्विनी, बकुळी, माया व बालार्क इतकीं माणसें विमलचंद्राला पाहतांच चकित झालीं !

' आई ! तार ग तार ! भुतानें मला पछाडलें ! " असें म्हणत विमलचंद्र आपल्या आईच्या पायाजवळ जाऊन पडला व बेशुद्ध झाला ! त्याच्या तोंडांतून रक्त वाहूं लागलें !

" तपस्विनीनें आपल्या पुत्राची ती अवस्था पाहतांच किंचाळी फोडली व म्हटलें, " देवा ! आतां मात्र धावरे धाव ! ! " तपस्विनीच्या तोंडून वरील शब्द बाहेर पडले मात्र, अकस्मात् त्या झोंपडींत एक दिव्य तेज उत्पन्न झालें व सर्वांस सिंहासनावर बसलेली श्रीकृष्णाची मनोहर मूर्ति दिसूं लागली !

---

## प्रकरण पन्नासावें.

# ईश्वरीप्रसाद.

"तें स्वरूप अत्यंत सुंदर ॥ श्रोतीं श्रवण कीजे सादर ॥ सांवळी तनु सकुमार ॥ कुंकुमाकार पादपद्में ॥ सुरेख सरळ अंगुलिका ॥ नखें जैसीं चंद्ररेखा ॥ घोटीव सुनीळ अपूर्व देखा ॥ इंद्रनीळाचियेपरि ॥ चरणीं वाळे घागरीया ॥ वाकी वरत्या गुजरिया ॥ सरळ सुंदर पोटरिया ॥ कर्दळी स्तंभाचियें परि ॥ गुडघे मांडिया जानुस्थळ ॥ कटीं तटीं किंकिणी विशाळ ॥ खालतें विश्व उत्पत्तिस्थळ ॥ वरी झळाळी सोनसळा ॥ कटीं वरतें नाभिस्थान ॥ जेथोनि ब्रह्मा झाला उत्पन्न ॥ उदरीं त्रिवळी शोभे गहन ॥ त्रैलोक्य संपूर्ण जयामाजीं ॥ वक्षः स्थळीं शोभे पदक ॥ पाहोनी चंद्रमा अधोमुख ॥ वैजयंती करी लखलख ॥ विद्युल्लतेचियेपरी ॥ हृदयीं श्रीवत्सलांछन ॥ भूषण मिरवी श्रीभगवान ॥ तयावरुते कंठस्थान ॥ जयासी मुनिजन अवलोकिती ॥ उभय बाहूदंड सरळ ॥ नखें चंद्रापरिस तेजाळ ॥ शोभती दोनी करकमल ॥ रातोत्पलाचिये परी ॥ मनगटीं विराजतीं कंकणें ॥ बाहुघटी बाहुभूषणें ॥ कंठीं लिहिलीं आभरणें ॥ सूर्यकिरणें उगवलीं ॥ कंठा वरुतें मुखकमल ॥ हनुवटी अत्यंत सुनीळ ॥ मुखचंद्रमा अति निर्मळ ॥ भक्त स्नेहाळ गोविंद ॥ दोन्ही अधरामाझी दंतपक्ति ॥ जिव्हा जैसी लावण्य जोती ॥ अधरामृत ग्रामीची गती ॥ तें सुख जाणें लक्ष्मी ॥ सरळ सुंदर नासिक ॥ जेथें पवनासी झालें सुख ॥ गंडस्थळींचें तेज अधिक ॥ लखलखीत दोही भागीं ॥ त्रिभुवनींचें तेज एकवटलें ॥ बरवेपण सिगेसी आलें ॥ दोहीं पातियांनीं धरिले ॥ तेच नेत्र श्रीहरीचे ॥ व्यंकटा भृकुटिया सुनीळा ॥ कर्णद्वयाची अभिनवलीला ॥ कुंडलाच्या फांकती कळा ॥ तो सुखसोहळा अलौकिक ॥ भालविशाल सुरेख ॥ वरती शोभे कस्तुरी टिळक ॥ केश कुरळ अलौकिक ॥ मस्तकावरी शोभती ॥ मस्तकीं मुगुट आणि किरीटीं ॥ सभोंवतीं झिळमिळ्यांची दाटी ॥ त्यावरी मयूरपिछांची [illegible] ॥ [illegible] ॥

देवीदासानें वरीलप्रमाणें आपल्या रसाळ वाणींत वर्णन केल्याप्रमाणें भगवान् श्रीकृष्णाचें मनोहर स्वरूप तपस्विनी, माया, वकुळी व बालार्क यांच्या नजरेस पडलें ! तीं सर्वजण श्रीकृष्णाच्या मनोहर मुखाकडे पहात राहिलीं !

"देवा ! मी हें स्वप्न तर पहात नाहीं ?" असें म्हणत तपस्विनीनें भक्तिपूर्वक श्रीकृष्णास नमस्कार केला.

"भगवान् !" वकुळीनें हात जोडून अस्फुट स्वरांत म्हटलें.

"गोपाळकृष्णा ! तुझेंच कां रूप आह्मी पाहतों आहोंत ?" असें ह्मणून ह्मातान्या मायेनें साश्रुनयनांनीं त्या जगपालक श्रीकृष्णास नमस्कार केला.

"बाळ !" मायेनें बालार्कास म्हटलें, "देवबापास नमस्कार कर !"

बालार्कानेंहि आश्चर्यभरित नेत्रानें हंसतमुख कृष्णाकडे पहात नमस्कार केला ! वाचकांतर्फे आह्मीहि त्या भक्तवत्सल प्रभूस वंदन करतों !

किती वेळ तरी भगवानाकडे सर्व मुग्ध दृष्टीनें पहात होतीं. अखेरीस भगवानांनीं इंदिराबाईस ( तपस्विनीस ) विचारिलें, "इंदिरे, ! बोल, तुझी काय इच्छा आहे ?"

तपस्विनीचा कंठ दाटून आला. ती गहिंवरून ह्मणाली, "दीनदयाल ! दर्शन देऊनच आपण मला धन्य केलेंत. आतां माझी काय इच्छा राहणार ? तरी पण या माझ्या मुलाचा उद्धार–"

श्रीकृष्णाची मुद्रा किंचित् दुःखी झाली. ते ह्मणाले, "इंदिरे ! तूं याशिवाय दुसरें कांहींही माग. तुझी ही विनंती मला मान्य करतां येणार नाहीं."

"छे छे, ! आपण गरीबाचे कनवाळू आहांत ! आपण त्याला असें दूर लोटूं नका." तपस्विनीनें हात जोडून ह्मटलें.

"इंदिरे !" भगवान् गंभीरपणें ह्मणाले, "मला त्याबद्दल फार वाईट वाटतें; पण काय करूं ? तूं आपल्या या पुत्राचीं सर्व कुकर्मे जाणत नाहींस. कर्माचें फळ मिळालेंच पाहिजे. त्यांतून माझीसुद्धां सुटका होत नाहीं."

"तें खरें ! पण आपण भक्तोद्धारक आहांत ! आपलें दर्शन सर्व पापांचें क्षालन करतें."

"पण जे माझें नित्य स्मरण करतात, ज्यांना माझी भीति वाटते, ज्यांचें माझ्यावर प्रेम आहे, जे प्रत्येक काम करतेवेळीं माझें स्मरण ठेवतात, त्यांनाच मी उद्धारतों! त्यांना मी सन्मार्गांत सहाय्य करतों. इंदिरे! तुझ्या या पुत्राचीं पापकर्में अनंत आहेत. त्यांचें प्रायश्चित्त् भोगल्याशिवाय त्याचा उद्धार मुळींच होणार नाहीं."

"देवा! आपण हें असें कसें बरें बोलतां? आपण एकापेक्षां एक पाप्यांचा उद्धार केला नाहींत काय? अजामिळाचा उद्धार आपण कां केलांत?"

"अजामिळ व हा तुझा पुत्र—दोघे एकाच योग्यतेचे नाहींत. अजामिळाला खरा पश्चात्ताप झाला होता."

"मग माझ्या मुलालाहि खरा पश्चात्ताप झाला नाहीं काय?"

"अद्यांप ती वेळ फार लांब आहे. इंदिरे! तूं स्वतःविषयीं कांहीं माग!"

"मला स्वतःला काय कमी आहे?"

"कां बरें? तुला आपलीं इतर मुलें पाहण्याची इच्छा नाहीं काय?"

"तीं या पृथ्वीवर आहेत कीं नाहींत कोण जाणे!" इंदिराबाई दुःखानें म्हणाली, "असल्यास सुखांत असोत झालें."

"इंदिरे! तुझीं सर्व मुलें जिवंत आहेत. दुष्टाचा नाश झाला असून आतां तुझे पुनः भाग्योदयाचे दिवस आले आहेत."

"आपला आशीर्वाद खरा होवो!"

"तुझी सर्व नातलगमंडळी आतां तुझ्या भेटीला येतील."

"खरें कीं काय?" इंदिराबाई आनंदानें म्हणाली, "मग आपण त्यांनाहि दर्शन द्यालच."

"यांत काय संशय!" भगवान् कानोसा घेऊन म्हणाले, "ऐक, बाहेर सर्व मंडळी आलेली दिसतात."

तपस्विनीनें कान देऊन ऐकलें तों बाहेर थोडी गडबड ऐकूं आली. "आई!" बाळसिंह बाहेरून दार खडखड करीत म्हणाला, 'आई, दार उघड. आम्ही सर्व आलों आहोंत."

सर्वांनाच आश्चर्य वाटलें व आनंद झाला. मायेनें जाऊन दार उघडलें.

"अद्याप तुम्ही जाग्या आहांत!" बाळसिंहानें आश्चर्यानें विचारिलें.

" बाळ ! " ...या बालसिंहाच्या कानांत हलकेंच म्हणाला, " आपला सर्वांचा भाग्योदय झालासें दिसतें. घरांत प्रत्यक्ष श्रीकृष्ण येऊन बसले आहेत ! "

बाहेर विक्रमार्क व प्रभावती, अजसेन व इंदुमती, मित्रगुप्त व सुधा अशीं तीन जोडपीं उभीं होतीं. मायेचें तें भाषण ऐकतांच सर्वांनाच आश्चर्य वाटलें.

" धीरे धीरे सर्वजण आंत या ! " माया पुढें होऊन म्हणाली.

बालसिंह आंत शिरला ! व अगदीं प्रथम त्याची नजर श्रीकृष्णावर गेली ! त्यानें भक्तिपूर्वक नमस्कार केला.

बालसिंहाच्या मागून तीं तिन्हीं जोडपीं क्रमाक्रमानें आंत शिरलीं. त्यांनाहि प्रथम श्रीकृष्णाचें दर्शन घडलें ! सर्वांनीं भक्तिपूर्वक हात जोडले !

तो दृश्य मोठा प्रेक्षणीय होता. झोपडीच्या मध्यभागीं भगवानांची दिव्य मूर्ति एका भव्य सिंहासनावर बसली होती. चोहोंकडे अपूर्व नेत्राल्हादक तेज पसरलें होतें ! श्रीकृष्णाच्या समोर वर सांगितलेली सर्व मंडळी हात जोडून भगवानाकडे मुग्ध दृष्टीनें पहात उभी होती ! भगवानांनीं एकवार सर्वांकडे प्रेमळ दृष्टीनें पाहिलें व हात वर उचलून तर्वांस आशीर्वाद दिला ! सर्वांनीं पुनः नमन केलें !

" इंदिरे ! " भगवान् सहास्य म्हणाले, " पाहिलेंस ! तुझी सर्व प्रेमाची मंडळी तुझ्या भोंवतीं उभी आहेत. ज्या बाळकृष्णाची तूं अनन्य-भावें इतके दिवस पूजा-अर्चा केलीस तो बाळकृष्णसुद्धां तुझ्यापुढें बसला आहे. इंदिरे ! आणखी तुझी कांहीं इच्छा आहे ? "

" भगवान् ! " इंदिरा जवळच भूमीवर बेशुद्ध होऊन पडलेल्या विमलचंद्राकडे दुःखानें पहात म्हणाली, " याचा उद्धार ! "

" इंदिरे ! त्याचा उद्धार होणार नाहीं. त्याच्या कर्माप्रमाणें त्यास पिशाचयोनी प्राप्त होणार आहे. त्याचा मुलगा बालार्क त्याचा उद्धार करील. " भगवान् चिमुकल्या बालार्काकडे प्रेमळ दृष्टीनें पहात म्हणाले. नंतर ते प्रभावती व विक्रमार्क यांजकडे वळून म्हणाले, " प्रभावती ! आपल्या आईला भेटून सुखी हो ! विक्रमार्क, तुम्हीहि आपल्या सासूला भेटा ! आणि मागच्या प्रमाणें पुढील आयुष्यहि सत्कर्मांत घालवा ! "

" भगवान् ! " बालसिं हात जोडून नम्रतापू तां तुमचें होकें नेहमीं दुष्टांचा जय व सज्जनांना दुःख असें कां हा प्रतीला बेकू वास प्राप्त होतो व सज्जनांना चांगली गति प्राप्त हो "
पण तें आम्हाला कसें कळा ? " हाग म्हणाले,

" बाबारे ! ना स्वर्ग आहे, ना नरक आहे. कृतीत आ. उघा ! यमयातना आहेत. जें कांहीं मनुष्य करतो, त्याचें ल सर्व गोष्टी हां, हें खरें, कित्येकांना पापाचें अथवा पुण्याचें फळ भेटा ! ती कित्येकांना थोडें उशीरा मिळतें; पण फळ मिळतें
आपल्या मनांत विचार कर. जगांतील प्रत्येक माणूस म्हणाले, चरित्र अवलोकन कर, म्हणजे तुला या गोष्टीचा आपो सत्कार्या- पडेल. ईश्वर फक्त पहाणारा आहे. तो कुणाला सुख कोणाला दुःख देत नाहीं. मनुष्य आपला आपल्यालाच घेतो त्याला माझा नाइलाज आहे. "

" आपले म्हणणें खरें आहे ! "

" आणखी तुमची कांहीं इच्छा आहे ? " श्रीकृष्णांनीं विचारिलें.

" भक्तवत्सल प्रभो ! " बालसिंह हात जोडून म्हणाला, " सर्वांतर्फे मी हेंच मागतों कीं, सन्मार्गानें चालण्याची आम्हास सद्बुद्धि दे ! व जे कोणी आमचें चरित्र वाचतील, त्यांना त्यापासून कांहीं लाभ होवो !

सर्वांनीं हात जोडले.

श्रीकृष्णांनीं सर्वांकडे प्रेमदृष्टीनें पाहिलें. त्यांनीं आपला हात वर करून गंभीर स्वरांत म्हटलें,

तथास्तु ! तथास्तु ! ! तथास्तु ! ! !

(२०७)

समाप्त.

तो भगवान

श्रीकृष्ण पुढे

बालार्क

सर्व मंडळ

लीहि हे

पुन

“ भगवान् ! ” बालसि हात जोडून नम्रतापूर्वक तुमचें डॉक्टे नेहमीं दुष्टांचा जय व सज्जनांना दुःख असें कां होतें ... घास प्राप्त होतो व सज्जनांना चांगली गति प्राप्त होते ” पण तें आम्हाला कसें कळावें ? ” ... म्हणाले,

“ बाबारे ! ना स्वर्ग आहे, ना नरक आहे, ... आ. ... यमयातना आहेत. जें कांहीं मनुष्य करतो, त्याचेंपील सर्व गो... हां, हें खरें, कित्येकांना ... पुण्याचें फक्त भेटा

| | |
|---|---|
| कित्येकांना थोडे | १— ४ |
| ६ लीला[illegible] | ०—१२ |
| ७ रंक आणि राव | १— ४ |
| ८ कार्यकारणभाव | ०—१२ |
| ९ कुकर्मपरिपाक | ०— ८ |
| १० कालाची वक्रगती | १— ८ |
| ११ इलासुंदरी | १— ४ |
| १२ राणीचंद्रावती | १— ० |
| १३ निसर्गप्रभाव | ०—१२ |
| १४ मनोरमामायाविनी | ०—१२ |
| १५ प्रणयपत्रिका | ०—१० |
| १६ निवळप्रेमासाठीं | ०— ६ |
| १७ कुसुमवसंत | ०—१२ |
| १८ रत्नाकरविलास | ०— ८ |
| १९ विवाहविभ्राट | ०— ४ |
| २० हंटचाभिल | ०—१० |
| २२ भयार्चीमाया | ०— ८ |
| २३ दर्पदर्पण | १— ० |
| २४ गजेंद्रसिंग | ०— ८ |
| २५ चिदानन्द | १— ४ |
| २७ मालती | ०—१२ |
| २८ [illegible] | |
| २९ [illegible] | |
| ३० तप्तमुद्रा | |
| ३१ केवळसुखासाठीं | १— |
| ३२ जीवितयात्रा | १— ४ |
| ३३ श्वेतकेतू | २— ० |
| ३४ मोहिनी | ०—१२ |
| ३५ दिवाळखोरांची पेढी | १— ४ |
| ३६ महाराणा जगदेव पवार | २— ० |
| ३७ विलासिनी | ०—१२ |
| ३८ कुलोद्धार | ०—१२ |
| ३९ विलक्षणस्वप्न | १— ० |
| ४० विमलेची ग्रहदशा | १— ८ |
| ४१ विलासविहार. | १— ८ |
| ४२ अखेर सावली. | १— ० |
| ४३ कर्मयोगी प्रमदा. | १— ० |
| ४४ स्वदेश सेवा. | १— ० |
| ४५ उदयास्त | २— ० |
| ४६ युवतिरत्नमाला | १ |
| ४७ भाग्यचक्राचे फेरे | १—० |
| ४८ मानवी सैतान. | १—० |
| ४९ पिशाच साधन | २—० |

व्यवस्थापक मकरन्द कार्यालय, पो. वांई, जि. सातारा.

"अजसेन !" भगवान् त्याकडे वळून म्हणाले, आतां तुमचें डोकें शांत झालें काय. आतां आपण असेच आपल्या इंदुमतीला घेऊन सुखांत रहा. जा ! इंदुमती आपल्या सासूला जाऊन भेट !"

"मित्रगुप्त व उषा," भगवान् त्या जोडप्याकडे पहात म्हणाले, "मित्रगुप्त, राजा विक्रमार्काला नेहमीं असेंच सहाय्य करीत जा. उषा ! कांहीं काळ तुला दुःखांत काढावा लागला; पण आतां मागील सर्व गोष्टी विसरून आनंदांत रहा ! जा, तुम्हीही तपस्विनीला जाऊन भेटा ! ती तुम्हांला आईप्रमाणें आहे."

"बालसिंह !" भगवान् त्यास आपल्या जवळ बोलावून म्हणाले, "आपल्या आईवर असेंच अकृत्रिम प्रेम ठेवा व नेहमीं सत्कार्याकरितां झटा."

यावेळीं बकुळी खालीं मान घालून उभी होती. भगवानांनीं तिच्याकडे पहात म्हटलें, "बकुळी ! जरा पुढें ये पाहूं !"

बकुळी लाजत लाजत पुढें आली.

"बालसिंह ! माझ्यासमोर तुम्ही हिचें पाणिग्रहण करा !"

बालसिंह लाजला. कारण त्याचा उजवा हात तुटला होता. तें पाहून भगवान् म्हणाले, "बालसिंह ! लाजायचें कारण नाहीं ! तुम्ही सदा हातानेंच हिचें पाणिग्रहण करा."

बालसिंहानें तुटका हात पुढें केला; पण काय आश्चर्य ! त्याचा हात पूर्वीप्रमाणेंच होता. त्यानें साश्रुनयनांनीं भगवानाकडे पहात बकुळीचा कोमल हस्त आपल्या हातांत घेतला. भगवानांनीं त्या नूतन जोडप्यास आशीर्वाद दिला व म्हटलें, "सुखानें संसार करा ! जा, आपल्या आईला भेट ! बकुळी ! जा, आपल्या सासूला आलिंगन दे !"

नंतर भगवान् मायेकडे वळले. त्यांनीं तिला आपल्याजवळ बोलाविलें व म्हटलें "माये, धन्याची सेवा कशी करावी, हें तुझ्या चरित्रावरून जग शिको ! तुझा उद्धार होईलच; पण थोडा काळ तूं त्या मर्त्याचें सुख पाहण्यांत घालीव."

मायेनें नमस्कार केला व म्हटलें, "आतां यांच्यावर पुनः कधींहि दुःखाचा प्रसंग येणार नाहीं ना ?"

"तें कर्माच्या आधीन आहे. यांच्या पूर्वपापाप्रमाणें यांना सुख

. कारण माय, व दुःख हीं नेहमीं जोडीने दोन्हीं एकामागून एक येतात म्हणूनच जगाचा ; आहे. "

नीं बालाकास आपल्या जवळ बोलाविलें. बालाक भीत भीत व आश्चर्य करीत भगवानांजवळ आला. . उचलून आपल्या मांडीवर घेतलें व त्यास कुरवाळीत मोठा सार्वभौम राजा होशील रे. "

बाला... त्याला त्या महत् आशीर्वादाचा काय अर्थ कळणार !

तो भगवान ... मुद्रेकडे पाहून हंसला !

श्रीकृष्ण पुढे म्हणाले, " जा, आपल्या आजीला जाऊन भेट पाहूं ! "

बालाक श्रीकृष्णाच्या मांडीवरून उतरून तपस्विनीकडे धावत गेला. सर्व मंडळी आपापसांत प्रेमानें भेटली ! सर्वांच्या आनंदास कसलीहि जोड नव्हती !

" इंदिरे ! बोल. आतां तुझी काय इच्छा आहे ? " भगवानांनीं पुनः विचारिलें, " माझ पहिली विनंती पुनः करूं नकोस बरें ! "

" आपल्या इच्छेनेंच सर्व गोष्टी होतात. आपली जशी इच्छा असेल, तसें होऊं द्या ! पण देवा ! माझ्या मित्राला ( अर्थात् वनराजाला ) आपण विसरलांत. "

" खरेंच. त्या मूक प्राण्यानें मनुष्यापेक्षांहि जास्त सत्कर्में केलीं आहेत. त्याला आंत बोलाव. "

तपस्विनीनें झोंपडीबाहेर जाऊन वनराजास आंत बोलावून आणिलें. त्या मुक्या प्राण्यानेंहि डोकें घालून भगवान् श्रीकृष्णास वंदन केलें.

" जा. वनराज ! तुझाहि उच्च कोटींत जन्म होईल. "

वनराज आदरानें एका बाजूला जाऊन उभा राहिला.

" इंदिरे ! तुझ्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या ! तुझी सर्व मंडळी तुला भेटली ! आतां तुझें या संसारांत कांहीं विशेष काम नाहीं ! तरी पण तूं आणखी कांहीं दिवस आपल्या मुलांलेंकरांत काढ. नंतर तुझा उद्धार होईल ! " नंतर भगवान् सर्वांस उद्देशून म्हणाले " आणखी कोणाची कांहीं इच्छा आहे ? "

सर्वांनीं नमन केलें.